म. ग्र. स. ठाणे
विषय निबंध
क्र. नं. ४५३

# युरोपमध्यें कार्यकारणवादाचा उदय व प्रभाव.

खंड १ ला.

REFBK-0000986

REFBK-0000986

# THE RISE AND INFLUENCE
OF
# RATIONALISM IN EUROPE

BY

W. E. H. LECKY,

VOL. 1.

TRANSLATED INTO MARATHI

BY

HARI BALLAL PARACHURE, B. A.,

Teacher, Educational Department, C.Ps.

*Under the auspices of the*
*Deccan Vernacular Translation Society,*

POONA.

PUBLISHED BY

Messrs. DAMODAR SAVALARAM & Co.

General Printers, Publishers & Commission Agents,

Thakurdwar, Bombay.

*First Edition.*

1914.

**Price One Rupee.**

This book is Printed and Published at The Indu Prakash
Steam Press, 434, Thakurdwar Road, Bombay,
by Damodar Sawalaram Yande.

*All rights (of the 1st edition only) reserved by the Publishers.*
*Registered under Act XXV of 1867.*

# यूरोपमध्यें कार्यकारणवादाचा उदय व प्रभाव.

## खंड १ ला.

हें पुस्तक,

डेकन व्हर्न्याक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटी, पुणें, या संस्थेनें मूळ, "वुइल्यम एद्वर्त एच्. लेकी," साहेबांच्या इंग्रजी ग्रंथावरून रा. रा. हरि बल्लाळ परचुरे, बी. ए., शिक्षक, मध्यप्रातांतील शिक्षणखातें, यांजकडून तयार करविलें.

प्रकाशक

दामोदर सावळाराम आणि मंडळी

जनरल प्रिंटर्स, पब्लिशर्स आणि कमिशन-एजंटस्, नं० ४३४ ठाकुरद्वार-मुंबई.

आवृत्ति पहिली.

सन १९१४.

किंमत १ रु०

१९६

हें पुस्तक घर नं. ४३४ ठाकुरद्वार रोड मुंबई येथें "इंदुप्रकाश" छापखान्यांत
रा० रा० दामोदर सांवळाराम यंदे, यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

---

सर्व हक्क (प्रथमावृत्तीचे मात्र) प्रकाशकांचे स्वाधीन आहेत.
इ. स. १८६७ च्या २५ व्या आक्टा–अन्वयें नोंदिलें आहे.

## Acknowledgment with thanks.

The Deccan Vernacular Translation Society, Poona, is thankful to Messrs Longmans, Green & Co, London, the publishers of Lecky's "Rise and Influence of Rationalism in Europe" for kindly granting permission to translate the book into Marathi.

सदरहु भाषांतर मूळ पुस्तकाच्या प्रसिद्ध कर्त्यांच्या परवानगीनें छापिलें आहे. ही परवानगी दिल्याबद्दल मेसर्स लाँगमन्स ग्रीन आणि कंपनीची डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी फार आभारी आहे.

# डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटीनें प्रसिद्ध केलेले सातारकर राजे व पेशवे यांच्या रोजनिशींतील उतारे.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. छत्रपति शाहू महाराज यांची रोजनिशी—भाग १ ला | २—८ |
| २ | श्री. बाळाजी बाजीराव पेशवे यांची रोजनिशी—भाग १ ला | २—४ |
| ३ | श्री. बाळाजी बाजीराव पेशवे यांची रोजनिशी—भाग २ रा | २—४ |
| ४ | श्री. थोरले माधवराव पेशवे यांची रोजनिशी—भाग १ ला | २—८ |
| ५ | श्री. थोरले माधवराव पेशवे यांची रोजनिशी—भाग २ रा | २—८ |
| ६ | श्री. सवाई माधवराव पेशवे यांची रोजनिशी—भाग १ ला | २—८ |
| ७ | श्री. सवाई माधवराव पेशवे यांची रोजनिशी—भाग २ रा | २—८ |
| ८ | श्री. सवाई माधवराव पेशवे यांची रोजनिशी—भाग ३ रा | २—८ |
| ९ | श्री. दुसरे बाजीराव पेशवे यांची रोजनिशी .... .... | २—० |
| १० | इंट्रोडक्शन टू धि सातारा राजाझ अॅन्ड धी पेशवाझ डायरी ( इंग्रजी ) लेखक, कै० न्या० महादेव गोविंद रानडे .... .... .... .... .... | ०—४ |

# भाषांतरकाराची प्रस्तावना.

कोणताही ग्रंथ वाचकांच्या हातीं पडण्याला लेखक, संपादक व प्रकाशक या त्रिमूर्तींचे प्रयत्न कारणीभूत होतात; तथापि कित्येकवेळां या त्रिमूर्तींचा एकोपा होणें दुरापास्त असतें. सध्याचा ग्रंथ वाचकांच्या हातीं पडेल अशी अटकळ तो तसा पडण्याची वेळ येऊन ठेपण्यापूर्वी मी केली नव्हती. हा ग्रंथ मूळ इंग्रजी भाषेंत लिहिलेला आहे. तो जशाचा तसाच मराठी भाषेंत आणण्याचें कोणाच्याही मनांत आलें नसतें; तसेंच इंग्रजींतल्या मूळ ग्रंथासारखा ग्रंथ मराठी भाषेंत स्वतंत्रपणें करणें हें तर फारच अवघड काम वाटतें; व इतका समर्थ लेखक मराठींत ज्या दिवशीं निपजेल तो दिवस मराठी वाङ्मयाच्या प्रगतीच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखा आहे यांत संशय नाहीं. असो तथापि डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटीच्या (दक्षिणच्या देशी भाषेंत भाषांतर करणाऱ्या मंडळीच्या) मनांत हा ग्रंथ मराठींत आणण्याचें आलें. सोसायटीच्या १।४।१९०१ च्या जाहिरातींत इतरांमध्यें याही ग्रंथाला जागा मिळाली व जाहिरातींतील अटींप्रमाणें प्रथमतः मूळ ग्रंथाच्या वीस पानांचें भाषांतर करून मी सोसायटीकडे परीक्षणार्थ पाठविलें. तें सोसायटीस ११।१०।१९०८ रोजीं पसंत झालें; व ता. २२।१।१९०९ रोजीं पुस्तकाचें भाषांतर करण्याचें काम मजकडे सोंपविलें गेलें. इ. स. १९०९ च्या सप्टेंबर महिन्यांत भाषांतरास आरंभ करून तें पुढच्या वर्षी आगष्ट महिन्यांत सोसायटीकडे मी रवाना केलें. या नंतर सर्व भाषांतराचें बारकाईनें परीक्षकांनीं परीक्षण करून मला कांहीं सूचना केल्या व भाषांतर पसंत केलें; व दुरुस्ती झाल्यानंतर बक्षिस देण्याचें ठरविलें. भाषांतर सूचनाप्रमाणें दुरुस्त करून, पुनः सोसायटीकडे पाठवून सोसायटीला तें पसंत पडलें व. बक्षिसाची रकम इ. स. १९१३ चे मे महिन्यांत मला मिळाली. नंतर पुस्तक छापण्याची तजवीज सोसायटीकडून करण्यांत आली व या सालच्या आरंभीं मजकडे स्थूलमुद्रणपत्रकें (proof-sheets) तपासण्यासाठीं येऊं लागलीं; व आतां इ. स. १९१५ सालीं लवकरच ग्रंथ वाचकांपुढें येईल, अशी खात्रीनें आशा वाटते.

मूळ लेकी साहेबांची या ग्रंथांतील प्रकरणें, भाग वगैरे विषयीं जी व्यवस्था आहे तींत मी थोडासा फरक केला आहे. तिसऱ्या प्रकरणाचे तीन भाग पाडले आहेत; पण पहिलें व दुसरें प्रकरण एक केलें नाहीं. प्रत्येक भागाची अनुक्रमणिका निराळी दिली आहे. अनुक्रमणिकेंत मुद्यांना आंकडे दिले आहेत व तेच आंकडे कलम या नांवानें ग्रंथाच्या प्रधान अंगांत त्या त्या मुद्याच्या आरंभीं दिले आहेत. मूळ ग्रंथांतल्या-पेक्षां लहान लहान लेख खंड करून त्यांतील विवेचनानुरूप मथळा त्या लेखखंडास दिला आहे. कलम व हे मथळे यांत मेळ नेहमीं राहिलेला नाहीं, क्वचित् कोठें कोठें आहे.

हें भाषांतर करितांना 'नामूलं लिख्यते किंचित्' हें तत्त्व पाळलें आहे; व तें, ज्या मंडळीच्या विद्यमानें हें भाषांतर केलें त्यांतल्या परीक्षकांना पसंत झालेलें आहे. भाषांतरांत बऱ्याच अगदीं नव्या अगर नूतनोत्पन्न शब्दांची योजना करावी लागली आहे. हे शब्द कित्येक वाचकांना कदाचित् बरे वाटणार नाहींत; तथापि लेखकाला जी मुभा आहे तिचा फायदा मला मिळेल अशी आशा आहे. लेखकाच्या टांकसाळींतून निघालेलीं हीं शब्दांचीं नाणीं चलनी होण्यावर काय ती भिस्त आहे, व ही गोष्ट भविष्यांतली आहे. तथापि परीक्षकांच्या मर्जीखातर एकादा शब्द मी बदलला आहे.

छापखाना मुंबईत व मी अकोल्यांत या गैरसोयीमुळें ग्रंथांत पुष्कळ अशुद्धें राहून गेलीं आहेत. त्यांची यादी व दुरुस्ती यांचें एक परिशिष्ट ग्रंथाला जोडलें आहे; तथापि त्या दुरुस्तींतही कांहीं अशुद्धें असण्याचा संभव वाटतो. आणि बरींच अशुद्धें सहज समजण्यासारखीं व कमी महत्त्वाचीं असल्यामुळें दुरुस्त केलीं नाहींत.

या ग्रंथांत मूळांत असलेल्या टीपांसंबंधानें थोडासा खुलासा केला पाहिजे. मूळांतल्या टीपा साधारण वाचकाला अर्थ समजण्यास जरूर आहेत असें नाहीं. मूळ ग्रंथकारानें आपल्या विधानास आधार म्हणून त्या टीपा दिलेल्या आहेत. त्यांपैकीं पुष्कळ मजकूर फ्रेंच भाषेंत, कांहीं लातिन भाषेंत व क्वचित् ग्रीक भाषेंतल्या संबंधाचा आहे. या तीनही भाषा मला बिलकूल येत नसल्यामुळें त्यांचें भाषांतर झालें नाहीं. पण वर म्हटल्याप्रमाणें त्यामुळें साधारण वाचकांची हानि होण्याचा संभव

नाहीं. टीपांतील जो मजकूर महत्त्वाचा आहे व इंग्रजी भाषेंत आहे त्याचें भाषांतर केलेलें आहे; पण महत्त्वाचा नसलेला गाळूनही टाकलेला आहे. यामुळें टीपा कमी झाल्या आहेत. टीपांची मूळची व्यवस्थाही फिरविली आहे. मूळ ग्रंथांत पानांतल्या टीपा अनुक्रम अंकांनीं पानाच्या पायथ्याशीं दिलेल्या आहेत. मीं भाषांतरांत समग्र भागांत अथपासून इतिपर्यंत एक दोन असे टीपांच्या ठिकाणीं अंक घातले आहेत; पण पानाच्या पायथ्याशीं किंवा भागाच्या शेवटीं त्या टीपा दिल्या नाहींत. तर सर्व टीपांचें खंडाच्या अखेरीस परिशिष्टच जोडलें आहे. तें मात्र प्रकरणवार व भागवार दिलें आहे. वाचकांना साधारणपणें वाचतांना टीपांचा उपयोग क्वचित्च होणारा असल्यामुळें, त्याच्या चित्ताचा टीपांनीं उगाच विक्षेप करणें बरें न वाटल्यामुळें अशी योजना केली आहे. टीपा बऱ्याच गाळल्या आहेत असें वर म्हटलेंच आहे; तथापि पुस्तकांत टीपांचे असावे तसे अंक आहेत; मात्र सर्वच अंकांना वाचकांस परिशिष्टांत टीप सांपडेल असें नाहीं. असें असून हे सर्व अंक मूळांतल्याप्रमाणें जेथचे तेथें घालण्याचें कारण असें कीं एकाद्या विशिष्टरीतीनें अभ्यास करणाऱ्या वाचकाच्या लक्षांत यावें कीं, जेथें जेथें टीपेचा अंक दिसेल तेथें तेथें मूळ ग्रंथकाराची कांहीं तरी टीप आहे; म्हणून तेथल्या विधानासंबंधानें ती टीप अवलोकन केल्याशिवाय आपण कांहीं विशिष्ट विपरीत ग्रह करून घेतां कामा नये.

वर टीपांसंबंधीं उल्लेखांत फ्रेंच, लातिन, व ग्रीक भाषेच्या अज्ञानामुळें मला आलेली अडचण सांगितली आहे. टीपांशिवाय इतर प्रधान अंगांतल्या मजकुरांतही क्वचित् फ्रेंच किंवा इतर भाषेंतल्या म्हणी, शब्द अगर वाक्यपर्याय आहेत. येथेंही मला तीच अडचण पडली. कधीं संदर्भानें, कधीं कांहीं व्युत्पत्तींवरून अनुमानानें वेळ मारून नेण्याचा मीं प्रयत्न केला आहे, असें प्रांजळपणें कबूल करितों. अशा ठिकाणीं चूक झाली असेल तर क्षमा व्हावी हीच विनंती.

या ग्रंथाचा विषय कार्यकारणवादाचा अथवा युक्तिवादाचा युरोपांत उदय व प्रभाव असा आहे. लेकी साहेबांनीं युरोपच्या जनमनावर हा पगडा कसा बसला व तो कसा वाढला याचा इतिहास दिला आहे. मूळ ग्रंथ लेकीसाहेबांनीं प्रथमत: इ. स. १८६५ च्या जान्युआरींत प्रसिद्ध केला. त्यानंतर आज ५० वर्षांनीं त्याचें मराठींत भाषांतर प्रथमतः

प्रसिद्ध होण्याच्या बेतांत आहे. या पन्नास वर्षांत तिकडे तो प्रभाव किती जोराचा झाला असेल याचा विचार वाचकांनीं करावा. सुमारें दोन पिढ्यांमागें आपल्या देशांत काय स्थिती होती ती समजण्याला, म्हणजे इ० स० १८६० च्या सुमारास आम्ही कसे होतों हें कळण्यास लिहिलेले इतिहासच धुंडाळिले पाहिजेत असें नाहीं. फार म्हाताऱ्या माणसांच्या तोंडच्या हकीकती ऐकिल्या किंवा आपल्या लहानपणच्या गोष्टीवरून दहावीस वर्षें पूर्वींच्या स्थितीची कल्पना केली तरी साधारण अनुमान बसेल. म्हणून ५० वर्षांच्या पूर्वींची आमची स्थिति व हल्लींची आमची स्थिति यांत कशी तफावत पडली आहे, हल्लीं आपणाला कसें वळण लागलें आहे, याचा नीटपणें विचार केला म्हणजे सुधारणेच्या मार्गावर बरेंच पुढें असलेल्या युरोपांत पन्नास वर्षांपूर्वींहून सध्यां कार्यकारणवादानें किती जोराची प्रगति केली असेल हें लक्ष्यांत येईल. ही प्रगति लक्ष्यांत आणतांना सुधारणेची गोष्ट आगगाडीसारखीच आहे हें विसरतां कामा नये. आगगाडीचा वेग स्टेशना ( विश्रामगृहा ) पासून निघतांना थोडा असतो, पण पुढें पुढें तो फारच वाढत जातो. तशीच सुधारणेची गोष्ट आहे. आरंभीं सुधारणा फार मंदगतीनें होत असते, तरी पुढें पुढें तिचा वेग झपाट्याचा होतो. म्हणून गेल्या पन्नास वर्षांत आमची जी प्रगति झाली आहे तीहून त्याच पन्नास वर्षांत युरोपची प्रगति फारच जोरानें झाली असली पाहिजे. लेकी साहेबांनीं आपल्या या ग्रंथाच्या पहिल्याच वाक्यांत सांगितल्याप्रमाणें इ० स० १८६५ च्या पूर्वींच्या तीनशें वर्षांत जनसमूहाच्या चमत्कारावरील विश्वासांत कसा पालट होत गेला आहे हें पाहिलें म्हणजे कार्यकारणवादाचा प्रभाव इतर कोणत्याही प्रभावाहून जबर आहे असें वाटतें. इ. स. १८६५ पूर्वीं तीनशें वर्षें म्हणजे इ. स. १५६५ हें साल येतें. हा काळ साधारणपणें मध्ययुगाचा अगर तमोयुगाचा शेवट होय. इतिहासकार व तत्त्वज्ञ यांचें असें मत आहे कीं क्रिस्ताच्या उपदेशानें जो प्रभाव गाजविला व त्यामुळें क्रिस्तानंतर सात आठशें वर्षें जी मानवी समाजाची उन्नति झाली, तिला या मध्ययुगांत म्हणजे पुढच्या सात आठशें वर्षांत साफ हरताळ फांसला गेला. प्रत्येक बाबतींत समाजाची अवनति झाली, समाज मागें गेला. तो पुढें धर्मसुधारणेच्या काळापासून पुनः पुढें सरसावला व आतां बहुतेक

सर्व जीवितशाखांत ख्रिस्ती समाज फार पुढें गेलेला, अत्यंत उन्नत, प्रगतीच्या बहुतेक शिखरावर चढलेला आहे. म्हणजे इतिहासाचे ख्रिस्तापूर्वीचा, ख्रिस्तानंतर मध्ययुगाच्या आरंभापर्यंतचा, मध्ययुगाचा व धर्मसुधारणेच्या सुमारापासून अगर मध्ययुगाच्या अंतापासून आतांपर्यंतचा, असे चार मोठे व ठळक विभाग करितां येतात. या चार विभागांत लोकविचाराचा ओघ कसा काय होता हें पाहून, त्यांत कसकसा पालट होत गेला, तो पालट होण्यास काय काय कारणें घडलीं याचा छडा लाविला म्हणजे कार्य झालें. म्हणून लेकी साहेबांनीं कार्यकारणवादाचा अशाच दृष्टीनें विचार केला आहे. जगाच्या सर्व तऱ्हेच्या व्यवहारांत, सर्व जीवितशाखांत कार्यकारणतत्त्व कसकसें वाढत्या प्रमाणावर दिसूं लागलें याचा त्यांनीं तलास लाविला आहे. जगतांतलीं होणारीं कार्यें कोणाच्या व कसल्या शक्तीनें होतात, कोणत्याही कार्याचीं काय कारणें आहेत हें ठरवितांना लोकांची समजूत काय असते, ती समजूत अमूक एकाकाळीं कशी होती, तत्पूर्वी कशी होती व तदनंतर आतां कशी आहे, त्या समजुतींत बदल होण्यास काय कारणें घडलीं, कोणत्या शक्तींनीं तें कार्य केलें, असा माहित असलेल्या इतिहासाच्या आधारानें त्यांनीं विचार केला आहे. या विचाराचें विवेचनात्मक फळ म्हणजे हा आपल्या समोर असलेला त्यांचा ग्रंथ.

धर्माच्या, कलांच्या, शास्त्रांच्या, नीतिकल्पनांच्या, राजनीतीच्या, उद्योगधंद्यांच्या, एकंदर सर्वप्रकारच्या इतिहासाचें नीट अवलोकन केलें असतां असें आढळून येतें कीं, ईश्वरानें निर्माण केलेल्या सर्व सृष्टजातांत जी शक्ति व नियमबद्धता त्यानें ठेविली आहे, तदनुरूप त्यांत पालट होत जातो; व त्यांत सुधारणा होते. म्हणजे हा उत्कर्ष होण्याची ताकद त्या त्या वस्तूंत परमेश्वरानें ठेविली आहे. सृष्टींतील शक्ति व नियमबद्धता जसजशी मानवी मनास दृग्गोचर होत जाईल तसतशा कोणत्याही सृष्ट अगर कृत्रिम कार्याविषयींच्या मानवांच्या समजुती पालटत जातील; व त्यामुळें त्यांच्या सृष्टीविषयीं इतर प्राण्यांविषयीं, मानवांविषयीं, व देवाविषयीं तसेंच मानवी व्यवहाराविषयीं, मानवी मनाविषयीं, मानवीबुद्धी व वृत्तींविषयीं सर्व समजुती बदलत जातील. या समजुती पालटतांना जें विचाराचें वळण तयार

होतें, जो विचाराचा ओघ असतो तो कार्यकारणात्मक कसा, केव्हां व कोणत्या कारणांनीं झाला याचा इतिहास या ग्रंथांत दिलेला आहे.

कार्यकारणाची जाणीव म्हणजे विचाराची एक ठरीव मूस, विचाराचा एक ठराविक दिशेनें वाहणारा ओघ अगर विवेचकशक्तीचा एका ठराविक बाजूकडील ओढा होय; अशा जाणिवेचा नैतिक व बौद्धिक उत्कर्षावर परिणाम घडतो. कार्यकारणाच्या जाणिवेनें धर्मांत जो हटवादीपणा असतो तो नजरेस येतो; व धर्माज्ञांहून सदसद्बुद्धीच्या आज्ञा विशेष अनुल्लंघ्य वाटूं लागतात. अर्थात् मनुष्य सदसद्विचारापुढें धर्मग्रंथ म्हणून मानलेल्या पुस्तकांची मातब्बरी समजत नाहीं. पूर्वीं अमुक एक गोष्ट धर्मपुस्तकांस अगर धर्मपंडितांस मान्य अगर अमान्य आहे हें पाहून त्याप्रमाणें मनुष्य आपल्या वर्तनाला वळण लावीत असे; पण आतां सदसद्विवेकाप्रमाणें तो ती गोष्ट आपल्या वर्तनांत आणतो, अगर वर्तनांतून गाळतो, मग धर्माज्ञा काय सांगते तें तो पहात बसणार नाहीं. म्हणजे हटवादी धर्माचा पगडा कमी झाला.

धर्माच्या साम्राज्याला असा आळा पडत चालला म्हणजे धर्मग्रंथांतून ज्या कल्पना, ज्या समजती, जीं मतें उपदेशिलेलीं असतात तीं सदसद्विवेकाच्या कसोटीवर घांसण्याची संवय लागते; त्या कल्पना, समजुती अगर मतें कसास उतरलीं नाहींत म्हणजे त्यांचें वर्चस्व कमी होतें व ज्या रीतीनें सत्य सांपडेल त्या रीतीचा अवलंब मनुष्य करतो. मनुष्याच्या विचाराला, त्याच्या सत्यान्वेषणाला लंगडें करणारे निर्बंध तो जुमानीत नाहीं; व त्यामुळें शास्त्र, कला, राजनीति, व्यापारधंदा, नीतिमत्ता वगैरे सर्व गोष्टींत धर्माची कांस धरणें त्याला आवडत नाहींसें होतें व तो सदसद्विवेकाचा आश्रय करितो. तात्पर्य धर्माला राजपदावरून लोटून सदसद्विवेक त्याचें स्थान पटकावतो.

पण त्यामुळें धर्माधिकारारी व भटभिक्षुक यांना फार राग येतो; त्यांच्या अधिकाराला कोणी जुमानीत नाहींसें होणार, इतकेंच नव्हे तर त्यामुळें त्यांच्या पोटावरही पाय येणार, म्हणून या ओघाला अटकाव करण्याचा ते प्रयत्न करूं लागतात. या अटकावांतला त्यांचा हेतू जसजसा अधिक उदात्त व निरपेक्ष असेल त्याप्रमाणें त्यांच्या या चळवळींत जोम राहणार; व दोन्ही पक्ष जर सारखे जोमदार असले, तर

त्यांचें चांगलेंच जुंपतें; व ते सद्सद्विवेकानुयायी धर्मसुधारणा करूं पाहतात व शब्दप्रमाणानुयायी त्यांचा छळ करूं लागतात; अशी प्रत्येक बाबतींत लढाई सुरू होते; पण सद्सद्विवेकानुयायांचा वरपगडा होऊन, शेवटीं दोन्ही पक्ष मिळून मिसळून सलोख्यानें वागूं लागतात. हा झगडा सर्व बाबतींत कसा सुरू झाला, चालू राहिला व बंद पडला याचा इतिहास या पुस्तकांत आहे.

शास्त्रांतील नव्या नव्या शोधांनीं कार्यांचीं कारणें विश्वाच्या नियमबद्धतेंत सांपडूं लागून पूर्वींचा अमानुष कर्तृकत्वाचा पगडा लोकमनावरून उडून जातो. कोणतीहि गोष्ट शब्दप्रमाणावरून भोळसटपणानें लोक गिळीत नाहींसे होतात; इतकेंच नव्हे तर पूर्ण विचारानें तिजविषयीं शहानिशहा करीत बसतात व विवेकाला पटल्यावांचून ती सत्य मानीत नाहींत. चमत्कारांविषयीं पूर्वींचा अनुकूल ग्रह जाऊन उलट एकप्रकारचा स्वाभाविक तिटकारा येऊं लागतो. अशी या नव्या विचारौघाची स्थिति असते.

हा विचारौघ आज सुमारें तीनसाडेतीनशें वर्षें युरोपभर चालू आहे. यामुळें असत्याची विलक्षण चीड वाढत आहे व ज्याबद्दल कांहीं खात्री वाटत नाहीं, त्याबद्दल बळकट संदेह जोरावत आहे. जसजसें एकंदर मानवी सुधारणेचें पाऊल पुढें पडत आहे तसतसा हा विचारौघ जोराचा होत आहे. पण मोठमोठ्या विचारी ग्रंथकारांच्या लेखांमुळें असला विचारौघ उत्पन्न झाला व त्यांमुळेंच तो फैलावला असें सांगतां येईल. अमुक तमुक ग्रंथांत अगर धर्मशास्त्रांत, अगर अमुक एका थोर गृहस्थानें अमुक एका गोष्टीबद्दल जें सांगितलें आहे तें त्या त्या आधारावरच खरें मानण्याची पद्धत टाकून तें आपल्या स्वतःच्या विवेचकशक्तीला पटतें किंवा नाहीं हें पाहून खरें खोटें ठरविण्याची पद्धत विशेषेंकरून फार मोठे विद्वान् तत्त्वज्ञ बेकन, देकार्त व लॉक यांच्या लेखांवरून प्रचारांत आली. यांनीं आपल्या सणसणीत, विशद व निर्भीड विचारसरणीनें लोकमनावर पगडा बसविला व 'पुराणमित्येव न साधु सर्वं न चापि किंचिन्नवमित्यवद्यं' असला धडा लोकांना चांगला शिकविला असें म्हणतां येतें. यांनीं लोकांशीं उगाच वादविवाद केला नाहीं; पण सत्यान्वेषणाची अशी नवीन रीति दाखवून दिली कीं तिच्या

योगानें शब्द प्रामाण्याच्या जोरावर घाव पडून सदसद्विवेकाला लोक प्रमाणभूत मानूं लागले. यांनीं उत्तमत्वाची कल्पनाच साफ बदलली. ही नवी कल्पना जुन्या ठराविक गोष्टींशीं विसंगत वाटून त्या जुन्या गोष्टींबद्दल लोकांचा आदर कमी झाला. भोळेपणाची मानमान्यता होऊं नये, उगाच झालेल्या पूर्वग्रहांशीं कट्टें वैर व्हावें, जुने सिद्धांत जशाचे तसेच परीक्षा न करितां खरे मानले जाऊं नयेत, व कोणतीही गोष्ट भरंशालायक म्हणून मानण्यापूर्वीं तिजबद्दल आधार काय तें बारकाईनें जपून शहानिशहा करून, बारीक सारीक तदंतर्गत गोष्टी अलग अलग करून पहावें, अशी लोकमनाला संवय लावण्याचा प्रयत्न केला. विशेषेंकरून केवळ सत्याची आवड धरून सत्यान्वेषण करावयाला त्यांनीं लोकांस शिकविलें. अशाप्रकारच्या निर्हेतुक सत्यप्रीतीनें मनुष्याच्या मनुष्यपणाला उदात्तत्व येतें. याच सत्यप्रीतीनें मानवी मन असंख्य बंधनांनीं बद्ध झालेलें असतें तें पाशमुक्त होतें. व मानवी मनाला एरवीं न गवसणारी ‘ गुहांत दडून राहिलेली ’ तत्त्वें शोधून काढण्याला साहाय्य होतें. अशाच सत्यप्रीतीनें कोणतेंही आजपर्यंत पोटाळलेलें मत सोडण्याची पाळी आली तरी खेद होत नाहीं; पुराणकालापासून मनाला गुरफटविणाऱ्या मोहपाशांची पर्वा वाटत नाहीं. असल्याच अहेतुक सत्यप्रीतीनें परमेश्वराचें प्रतिबिंब आपल्यांत आहे, अशी ओळख पटून स्वत:समाधानानें मनुष्य कृतकृत्य होतो.

असला विचारौघ एकदां लोकमनांतून वाहूं लागला म्हणजे तेथील हलकट वृत्तींची व विचारांची सर्व घाण निघून जाऊन मन सोज्ज्वल होतें; ‘ मेणाहून मऊ व वज्रभेद करण्यासारखे कठीण ’ होतें; व धर्माचा उत्कर्ष होतो; विश्वकुटुंबीयत्व वाढतें. ‘ रंजलें गांजलें त्यांस आपलें म्हणावेंसें ’ वाटूं लागतें; ‘ ज्यासि आपंगिता नाहीं त्यासि हृदयीं धरावें ’ अशी इच्छा होते; ‘ पुत्रासि तेच दासा आणि दासी दया ’ करावीशी होते; आणि चित्त ‘ लोण्यासारखें सबाह्य मृदु ’ होतें.

हा विचारौघ एकदम उत्पन्न होत नाहीं; तो कसकसा उत्पन्न होतो, कसकसा प्रचंड होत जातो, समोर असलेलीं अरण्यें, डोंगर यांतून मार्ग काढून सर्व प्रदेशावर आल्हादकारक रम्य उपवन कसें तयार करितो, ही कल्पना या इतिहासावरून येईल.

लेकी साहेबांनीं हा जो ग्रंथ लिहिला आहे, तो त्यांनीं युरोपांतील इतिहास देऊन लिहिला आहे. प्रत्येक देशांत असा इतिहास सांपडेल, नाहीं असें नाहीं. फक्त इतका विद्वान्, इतका मेहनती, इतका बहुश्रुत, इतका व्यासंगी, इतका मनाचा समतोलपणा राखणारा, इतका पूर्वग्रहविहीन, इतका सद्गुणांचा आदर करणारा, इतका प्रतिपक्षीयांवरही निर्भीड; पण सहानुभूतिपूर्वक टीका करणारा, परगुणपरमाणूही लक्ष्यपूर्वक पहाणारा, स्वहृदयानंदानें धन्यता मानणारा, आलोकांत पृथु, निर्णयांत सूक्ष्म, प्रमाणावलोकनांत दक्ष, इतिहासवस्तुदर्शनांत अंतर्भेदक, आत्मश्लाघेंत मूक, वृथाभिमानशून्य, सविनय, लेखनपटु, चतुरस्र, कलामर्माभिज्ञ, रसिक, बृहल्लेखग्रंथकार उत्पन्न झाला पाहिजे.

आमच्या महाराष्ट्रदेशांत मराठी वाङ्मयाचा निःसीम सेवक अशा प्रकारचे ग्रंथ पूर्वींच्या महाराष्ट्रकवीसारखे ऐहिक फलाकांक्षा न बाळगतां, निदान फलहेतु न ठेवतां, लिहूं लागेल तो सोन्याचा दिवस म्हणावा लागेल. तो उगवेपर्यंत परदेशच्या इतिहासानें व परकी ग्रंथकाराच्या भाषांतरानें तृप्त राहून वाचकांना दुधाची तहान ताकावर भागवून घ्यावी लागत आहे, याबद्दल भाषांतर करणाऱ्या मला अत्यंत दिलगिरी वाटते. शिवाय या भाषांतरांत मूळ ग्रंथकाराचें हृद्गत लक्षांशानें तरी उतरलें आहे कीं नाहीं याबद्दल मला शंका आहे. माझी भाषापद्धति लोकांना आवडेल किंवा नाहीं, याचीही जबरदस्त शंका आहे. तथापि चांदीच्या ताटांत,केळीअगर कुड्याच्या पत्रावळीवर वाढलेलें पक्वान्न जरी सारखेंच रुचकर लागलें नाहीं, तरी तो दोष पक्वान्नाचा नव्हे, त्या अधम पात्राचा आहे, हें आणून वाचकवर्ग पक्वान्नाचें ग्रहण करील अशी आशा आहे.

या माझ्या प्रयत्नानें, अशाप्रकारच्या ग्रंथांची मराठी वाङ्मयांत स्वतंत्ररूपानें अगर भाषांतररूपानें भर टाकण्याचें महाराष्ट्रभाषावधूचे प्रसाधक अगर प्रसाधिका मनांत आणतील तर मला धन्यता वाटेल; तसेंच वाचक वृंदाच्या मनोभूमीवर एकाठिकाणीं तरी या विचाररवीच्या असंख्य किरणांपैकीं एकतरी माझ्या प्रयत्नानें पडेल तर मीं कृतकृत्य झालों, असें मला वाटेल.

शेवटीं डे. व्ह. ट्रा. सोसायटी ( द. दे. भा. भा. क. मंडळी ), 'इंदुप्रकाश छापखाना', दा. सां. आणि मंडळी, व सर्व मराठी वाङ्मयांतील लेखक यांचे माझ्याकडून हें काम करवून घेण्यांत जें त्यांनीं साह्य केलें त्याच्याबद्दल मी आभार मानितों; आणि 'ओं तत्सद्ब्रह्मार्पणमस्तु' असें म्हणतों.

अकोलें, वऱ्हाड.<br>ता. २२ दिसेंबर १९१४

हरि बल्लाळ परचुरे,<br>भाषांतरकर्ता.

# अनुक्रमणिका.

## प्रकरण १ लें.

### अद्भुत चमत्कारांवरील विश्वासाचा ऱ्हास.

### जादूटोणा व चेटुक.


| अ.नं. | विषय. | पृष्ठ. |
| --- | --- | --- |
| | प्रस्तावना. ... ... ... ... | १-१६ |
| १ | पूर्वीची व सांप्रतची स्थिति ... ... ... ... | १ |
| २ | बायबलांत चेटकाचा पुरावा ... ... ... ... | २ |
| ३ | चेटुक करणारांचा छळ. ... ... ... ... | ३ |
| ४ | चेटक्यांस रोमच्या धर्मसंस्थेचा अडथळा ... ... | ४ |
| ५ | धर्म सुधारकांचा चेटकावर विश्वास ... ... ... | ५ |
| ६ | चेटकावरील विश्वास कसा उडाला ... ... ... | ६ |
| ७ | मत-क्रान्तीचीं कारणें ... ... ... ... | ७ |
| ८ | मानवी सुधारणेनेंच मत-क्रान्ति ... ... ... | ८ |
| ९ | चेटुक म्हणजे खूळ असें लोकांस आपोआपच कळूं लागलें ... | ९ |
| १० | भीतिमूलक धर्मतत्त्वांमुळें चेटकाच्या कल्पनेचा उद्भव ... | १० |
| ११ | अशा तत्त्वांचा निर्णायक शक्तीवर दृढ परीणाम ... ... | ११ |
| १२ | पुष्कळ न्यायपीठांचाही चेटकावर भरंवसा ... ... | १२ |
| १३ | भूताखेतांच्या प्रचीतीवर चेटकाची संभाव्यता अवलंबून आहे... | १३ |
| १४ | चेटकाच्या इतिहासाची क्रांतिस्थलें ... ... ... | १४ |
| १५ | सृष्टिचमत्कारामुळें रानटी लोकांत उद्भवलेल्या कल्पना ... | ,, |
| १६ | चेटकाच्या शान्ततेसाठीं त्यांचे प्रयत्न ... ... ... | १५ |
| १७ | सुधारणेनें कृत्रिम भीति नष्ट होते ... ... ... | १६ |
| १८ | पेगन व रोमन धर्मांच्या वेळचे चेटक्यांबद्दल कायदे ... | १७ |
| १९ | खिस्ती लोकांच्या कल्पना ... ... ... ... | १८ |
| २० | सैतानाचें साम्राज्य ... ... ... ... | १९ |
| २१ | तत्त्ववेत्ता प्लेटो याचे पाठबळ... ... ... ... | ,, |

| अ.नं. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| २२ | दुरात्म्यांच्या बुजबुजाटाचा पुरावा ... ... ... | २१ |
| २३ | पहिले ख्रिस्ती भुताटकीच्या वातावरणातलेच होते ... ... | २२ |
| २४ | जादू हा गुन्हा मानीत ... ... ... ... | २३ |
| २५ | कान्स्तन्ताइनचा जाहिरनामा ... ... ... | २४ |
| २६ | कान्स्तंतियसचा जादूगारांवरचा रोख ... ... ... | ,, |
| २७ | जादूच्या उच्छेदाविषयीं ख्रिस्ती बादशहाचे प्रयत्न ... ... | २५ |
| २८ | जादूचें खूळ ख्रिस्ती धर्मोपदेशकांनीं पोशिलें नाहीं ... ... | २६ |
| २९ | सन्त हिलेरियननें केलेला एक अद्भुत चमत्कार. ... ... | २७ |
| ३० | ज्यूलियन बादशहाची जादुगारांवरील भक्ति. ... ... | २८ |
| ३१ | पाखंडीं मतें न मानणारांचा छळ. ... ... ... | २९ |
| ३२ | छळांत धर्मनायकांच्या अंगाविषयीं पराचा कावळा झाला असावा. | ,, |
| ३३ | अंमलबजावणींतील ढिलाई. ... ... ... ... | ३० |
| ३४ | पेगनधर्माचें जादूच्या कक्षेंत रूपान्तर. ... ... ... | ३१ |
| ३५ | रानटी लोकांच्या स्वारीनें दोन्ही धर्मांची तोडजोड व भेसळ.... | ३२ |
| ३६ | पेगनधर्माचा अवशिष्ट भाग म्हणजेच जादूचे विधि. ... | ,, |
| ३७ | तमोयुगास प्रारंभ ... ... ... ... ... | ३३ |
| ३८ | भाबड्या कल्पनांवर औषध.... ... ... ... | ,, |
| ३९ | संतांच्या कांहीं गोष्टी. ... ... ... ... | ३४ |
| ४० | चेटकाविषयींच्या विश्वासोन्मुखतेचें कारण. ... ... | ३५ |
| ४१ | धर्मशिक्षणांतील एक काळी बाजू. ... ... ... | ,, |
| ४२ | चेटकाच्या भ्रामक कल्पनांनीं दुसऱ्यांसच झालेल्या शिक्षा. ... | ३६ |
| ४३ | मध्ययुग व सतराव्या शतकांतील " गुह्यवादी पंथ. " ... | ३७ |
| ४४ | रूपकांनीं दाखविलेलीं दैवतें. ... ... ... ... | ,, |
| ४५ | दैवतांचें मनुष्यांशीं संघट्टन. ... ... ... ... | ३८ |
| ४६ | मायकेल प्सेलसचे ग्रंथ. ... ... ... ... | ३९ |
| ४७ | त्याचा मुख्य आधार. ... ... ... ... | |
| ४८ | भुतांचीं शरीरें. ... ... ... ... ... | ,, |
| ४९ | चेटकीची कल्पना केव्हां उद्भवली ? ... ... ... | ४० |
| ५० | भोळसटपणाच्या कारणांचा शोध. ... ... ... | ४१ |
| ५१ | बौद्धिक स्थितींत पालट. ... ... ... ... | ,, |
| | | ४२ |

| अ.नं. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| ५२ | युरोपांत निष्पक्षपाती तत्त्वज्ञानाचा प्रारंभ ... ... | ४२ |
| ५३ | कार्यकारणाची अस्पष्ट जाणीव ... ... ... | ४३ |
| ५४ | साशंकवृत्ति व तिचे परिणाम ... ... ... ... | ४४ |
| ५५ | ख्रिस्ताच्या मूर्तीत पालट ... ... ... ... | ,, |
| ५६ | एका आधुनिक प्राचीन-वस्तु-संशोधकाचें मत ... ... | ४५ |
| ५७ | दारुण स्थितीवरून खालपर्यंत पोंचली ... ... ... | ४६ |
| ५८ | सैतानी कर्तबगारी सभोंवतीं दिसू लागली ... ... | ,, |
| ५९ | भयानकतेमुळें निराशा ... ... ... ... | ४७ |
| ६० | कृष्णकुष्टाची सांथ-दारुणतेला प्रोत्साहन ... ... ... | ,, |
| ६१ | सांथीचे परिणाम धर्माधिकारी कुबेर बनले ... ... | ४८ |
| ६२ | नाचाचे वेड व सैतानाचा विजय. ... ... ... | ,, |
| ६३ | बेबंदशाही माजली. ... ... ... ... | ४९ |
| ६४ | भयानकतेच्या भोंवऱ्यांत राष्ट्रीय जीवित घेरलें गेलें. ... | ,, |
| ६५ | धर्मसुधारणेची चळवळ. ... ... ... ... | ५० |
| ६६ | अनिष्ट गोष्ट एकाएकीं नष्ट झाली नाहीं.... ... ... | ५१ |
| ६७ | धार्मिक भयानकतेच्या कारणांचा अडाणी भोळसटपणावर दुहेरी परिणाम. ... ... ... ... ... | ५२ |
| ६८ | उच्च वर्गांतील चेटुक वगैरे खरें मानतात व त्याचा परिणाम कनिष्ठवर्गांवर होतो. ... ... ... ... | ५३ |
| ६९ | लुथरचा दाखला. ... ... ... ... ... | ,, |
| ७० | त्याला जिकडे तिकडे सैतानाची साक्ष पटे ... ... | ५४ |
| ७१ | सैतानाच्या पराक्रमाच्या प्रचितीनें त्याला चेटुक संभाव्य वाटे | ५५ |
| ७२ | आभास व ढोंग यांचे संमिश्रण ... ... ... | ,, |
| ७३ | अनीतीही होऊं लागली ... ... ... ... | ५६ |
| ७४ | भाबड्या बाया निर्दोषी असूनही गुन्हा कबूल करीत ... | ५७ |
| ७५ | पाखंड न्यायासनांची कामगिरी ... ... ... | ५८ |
| ७६ | चेटकाच्या काळांतील लोक खुळसटसे वाटतील; पण सर्वस्वीं तसें नव्हे ... ... ... ... ... | ,, |
| ७७ | अलीकडील चेटकांविषयींच्या खंडनपर ग्रंथापेक्षां पूर्वीचे मंडनपर ग्रंथ बरेच योग्यतेचे आहेत ... ... ... | ५९ |

| अ.नं. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| ७८ | त्या काळीं विद्वत्ता व भाबडेपणा यांची पुष्कळदां सांगड असे... | ६० |
| ७९ | चेटक्याच्या काळांतल्या लेखांतील मतें व त्यांचें महत्त्व ... | ६१ |
| ८० | जगभर दुरात्मे वावरत असून त्यांचें काम मानवजातीस अधः-पतनास नेण्याचें आहे ... ... ... ... | ,, |
| ८१ | चेटकी व सैतान यांचे मुख्यकृत्य वादळें उद्भविणें ... ... | ६२ |
| ८२ | चमत्कारांचे पुरावे न पाहतां त्यांस एकदम असंभाव्य कोटींत कां ढकलिलें जात नसें? ... ... ... ... | ६३ |
| ८३ | रोगसुद्धां सैतानच उत्पन्न करितो ... ... ... | ,, |
| ८४ | वरील बाबतींत लोकांचें ऐकमत्य ... ... ... | ६४ |
| ८५ | वादविवादाचे गौण मुद्दे ... ... ... ... | ,, |
| ८६ | निरुत्तर पुराव्यासही इतर अडचणी. ... ... ... | ६५ |
| ८७ | पिशाचे व सैतान हीं चेटक्यांना वाटेल तिकडे नेतात; व त्यांचीं रूपें घेतात. ... ... ... ... | ६६ |
| ८८ | सैतान व भुतें वाटेल त्या प्राण्यांचींही रूपें घेतात. ... ... | ६७ |
| ८९ | जादूच्या प्रभावाच्या आणखी गोष्टी. ... ... ... | ६८ |
| ९० | स्त्रियांविषयीं निष्कारण बनलेले दुर्ग्रह. ... ... ... | ,, |
| ९१ | चेटुक करणाऱ्या विशेषतः बायकाच कां? ... ... | ,, |
| ९२ | स्त्रिया जात्याच दुष्ट आहेत, असें रडगाणें. ... ... | ६९ |
| ९३ | ऐतिहासिक विवेचनांत गतकाळांतल्या खुळांचेंही इतकें महत्त्व कां? | ७० |
| ९४ | प्रतीति व प्रमाणें पाहण्यास शहाणे सुद्धां धजावत नसत; तशा परिस्थितींत आपणही तेंच केलें असतें. ... ... | ७१ |
| ९५ | तत्कालीन धार्मिक विचारसरणीनें चेटुक वगैरे वरील विश्वास उद्भवला व तिच्या क्षीणतेनें ऱ्हास पावला. ... ... | ७२ |
| ९६ | अंधुक संदिग्धमतित्व त्या कालींही होतें ... ... ... | ७३ |
| ९७ | चेटुक करणारांस शिक्षा झाल्यामुळें केव्हां केव्हां बंडेंही झालीं... | ७४ |
| ९८ | चेटुक करणाऱ्यांविषयीं वियर नामक वैद्याचें मत ... ... | ७५ |
| ९९ | "स्त्री जातीचा भाबडेपणा" यावर वियरचे प्रतिपादन ... | ७६ |
| १०० | वियरचा लोकमान्य मतावर हल्ला ... ... ... | ७७ |
| १०१ | बोदिनची विद्वत्ता व वजन ... ... ... ... | ,, |

| अ.नं. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| १०२ | बोदिनचा वियरवर भडिमार ... ... ... ... | ७८ |
| १०३ | वियरनें केलेलीं देवनिंदा व देवद्रोह ... ... ... | ७९ |
| १०४ | मान्तेनच्या ग्रंथांत शब्द प्रामाण्यावर भर बिलकूल नाहीं ... | ८० |
| १०५ | मान्तेन हाच पूर्वग्रहांच्या विरुद्ध जाणारा पहिला फ्रेंच ग्रंथकार | ८१ |
| १०६ | विवेचकशक्तीच्या जोरावर अडथळयांना त्यानें जुमानिलें नाहीं | ८२ |
| १०७ | मान्तेनची भरारी फार उंच गेली नव्हती ... ... | ८३ |
| १०८ | मान्तेन हा पहिला थोर कार्यकारणवादी तत्त्वज्ञ ... ... | ,, |
| १०९ | सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धाच्या अगोदर व शेवटीं ... | ८४ |
| ११० | मान्तेनचा अनुयायी शारन ... ... ... ... | ,, |
| १११ | या नव्या चेतनेच्या उलट सनातनाभिमान्यांचे प्रयत्न ... | ८५ |
| ११२ | थोर व व्युत्पन्न लोकांचीं मनें द्विधा होतीं ... ... | ,, |
| ११३ | चेटकाचे खटले विरळ व निर्जीव झालें ... ... ... | ८६ |
| ११४ | वोल्तेरचा उदय व चेटकाच्या गोष्टींची टर ... ... | ८७ |
| ११५ | हें गूढ उकलण्याचा प्रयत्नः-आबे फियर्दचा ग्रंथ ... ... | ८८ |
| ११६ | सन १५४१ पर्यंत जादूगिरीविरुद्ध इंग्लंदांत कायदा नव्हता ... | ८९ |
| ११७ | इंग्लंदांत भोळेपणा कमी असण्याचें कारण ... ... | ,, |
| ११८ | इंग्लंदांत चेटकाविषयींचे कायदे सौम्य होते ... ... | ९० |
| ११९ | रेजिनाल्द स्काट नांवाच्या ग्रंथकाराची धारिष्टाची कामगिरी ... | ९१ |
| १२० | जेम्स यास चेटकाचा खास अनुभव चेटक्यांस फांशी देण्याचा कायदा | ९२ |
| १२१ | इंग्रजी वाङ्मयही या वेळीं या भोसळपणानें रंगले. ... | ,, |
| १२२ | हे जेम्सचे प्रयत्न पुढल्या प्रजासत्ताक काळापेक्षां फारच सौम्य होते | ९३ |
| १२३ | चेटकाच्या वाहिमानें एका म्हाताऱ्याचा छल ... ... | ९४ |
| १२४ | चेटुक, गारुड वगैरेंचा कळस ... ... ... ... | ९५ |
| १२५ | चेटकांशीं वेडेविद्रेपणाची सांगड केव्हां पडली ... ... | ,, |
| १२६ | चेटकाचा विश्वास उडण्याचीं तीन कारणें ... ... | ,, |
| १२७ | चेटकाचें मंडनः-सर माथ्यू हेल ... ... ... | ९६ |
| १२८ | सर माथ्यू हेलच्या नंतर चेटकाचें मंडन करणारा गृहस्थ ... | ९७ |
| १२९ | ग्ल्यान्विल चेटकाचें मंडन करणारा होता, तरी त्यामध्यें संदिग्धमतित्व होतें ... ... ... ... | ९८ |
| ३० | विगमनात्मक तत्त्वज्ञानाचे परिणाम ग्ल्यान्विलच्या तेव्हांच आ ... ... ... ... ... | ९९ |

अ.नं. विषय. पृष्ठ.
१३१ त्याची आदर्शरूप धर्मसंस्था ... ... ... ... १००
१३२ असल्या धर्मसंस्थेच्या मंडनाचे आधार ... ... १०१
१३३ इंग्लंदांत संदिग्धमतित्वाच्या प्रसाराचें फळ ... ... ,,
१३४ विवादसंग्रामांत ग्ल्यान्विलचें मुख्य शस्त्र संदिग्धमतित्व हें होतें १०२
१३५ ग्ल्यान्विलच्या मताला पुष्टि ... ... ... ... १०३
१३६ प्रतिपक्षी लेखकांत बेक्स्तर मुख्य ... ... ... १०४
१३७ इंग्लंदांत चाललेलें खूळ अमेरिकेंत माध्यान्हीं होतें... ... ,,
१३८ भूतयोनींच्या अस्तित्वाविषयीं ग्रंथ ... ... ... १०५
१३९ सन १७१८ पर्यंत विवादी वाङ्मयाचा कल पुराण पक्षाकडेच होता १०६
१४० चेटक्यांस दिलेल्या शिक्षांचा शेवटला काल ... ... १०७
१४१ चेटकाविषयींचे कायदे सहज रद्द करितां आले ... ... ,,
१४२ चेटकाचें अस्तित्व न मानणें म्हणजे बैबलास झुगारण्या प्रमाणें आहे १०८
१४३ इंग्लंदांत चेटकाविरुद्ध कायदे होण्यास धर्माधिकारी कारण झाले आहेत ... ... ... ... ... ,,
१४४ कांहीं ठिकाणीं चेटकाच्या गुन्ह्याबद्दल अमानुष छळ केला जात असे; पण तसा प्रकार इंग्लंडांत नव्हता. ... ... १०९
१४५ इंग्लंदांतल्या चेटकांत तोतयेपणा विशेष दिसून येतो ... ११०
१४६ स्कातलंदांतील स्थिति उलट होती ... ... ... १११
१४७ घोर आपत्ति म्हणजे अशरीर-आत्म्यांच्या उठाठेवी ... ,,
१४८ कबूल-जबाबासाठीं केलेल्या उद्वेगजनक व अमानुष हालअपेष्टा ११३
१४९ असल्या यातना माथें फिरवायला पुरत ... ... ११४
१५० छळाची आणखी उदाहरणें. मारचा अर्ल काय तो विरुद्ध ... ,,
१५१ राक्षसी छळाचें वर्णन करणें म्हणजे इतिहासकारांवर दैवदुर्विलसितानें लादलेलें कर्तव्य होय... ... ... ... ११५
१५२ स्कातलंदांतील चेटुक व शुद्ध मताभिमानी पंथ ... ... ११६
१५३ शुद्धमताभिमान्यांचें पाषाणहृदयत्व व त्याची मीमांसा ... ,,
१५४ स्कातलंदच्या धर्मसंस्थेंत चांगले गुण होते ... ... ११७
१५५ स्कातलंदांतील चेटकाच्या ऱ्हासाची संगतवार माहिती उपलब्ध नाहीं ... ... ... ... ... ... ,,

अ.नं. विषय. पृष्ठ.

१५६ चेटकाच्या इतिहासाच्या पर्यालोचनाची समाप्ति ... ... ११८

१५७ कार्यकारणवादाच्या प्रगतीचे उपकार चेटकाच्या बाबतींतील छळ निरुपम असून कींव उत्पन्न करितो. ... ... ११९

१५८ हा भोळसटपणा घालवून जनतेंतली भयानकता कार्य कारण वादाच्या प्रगतीनें नष्ट केली ... ... ... ... १२०

---

# प्रकरण २ रें.

## अद्भुत चमत्काराच्या जाणिवेची उतरती कळा.

### धर्मसंस्थेतले अद्भुत चमत्कार.

अ.नं. विषय. पृष्ठ.

१ चेटुक व अद्भुत चमत्कार यांची तुलना. ... ... १२१

२ चमत्कार म्हणजे क्वचित् अपवादक गोष्टी. ... ... ,,

३ मध्ययुगांत अद्भुत चमत्कारांची मागणी व पुरवठा दोन्ही भरपूर होती. ... ... ... ... ... १२२

४ युद्धांत राजांच्या मदतीस प्रेषित येत, व अद्भुत चमत्कारांवांचून साधूंत गणना होत नसे. ... ... ... ... १२३

५ सद्यःकालीं चमत्कारांचें थोतांड बहुतेक नाहींसें झालें आहे. ... १२४

६ संदिग्ध मतित्ववादी अद्भुतापेक्षां काकतालीयाकडे सहज वळतात. ... ... ... ... ... १२५

७ असल्या विचारसरणीचें सुशिक्षणाशीं साहचर्य असतें. ... १२६

८ बौद्धिक प्रगतीशीं अदभुत चमत्कारांचे प्रमाण व्यस्त असतें. ... १२७

९ अंधश्रद्धेविषयीं तिटकाऱ्याचें मानवी सुधारणेशीं व ज्ञानप्रसाराशीं समप्रमाण असतें ... ... ... ... ... ,,

१० वर्तमानकाळांतल्याहून भूतकाळच्या चमत्काराविषयीं आदरपूर्वक विश्वास असण्याचें कारण ... ... ... ... १२८

११ प्रतिरोधिपंथी देशांत हा पालट तितका ठळक न दिसण्याचें कारण १२९

१२ लाकच्या पत्रांतील धर्मपित्यांच्या चमत्कारांविषयींचा मुद्दा ... १३०

| अ.नं. | विषय. | पृष्ठ |
| --- | --- | --- |
| १३ | लाकनें आपल्या मुर्यास सर ऐझाक न्यूतनचें अनुमोदन घेतलें असावें ... ... ... ... ... ... | १३ |
| १४ | मिदल्तनच्या ग्रंथाच्या वेळची स्थिति ... ... ... | १३२ |
| १५ | अठराव्या शतकांतील धर्मज्ञानपद्धतीचें कार्य ... ... | १३३ |
| १६ | धर्मपित्यांच्याच लेखांतून फार चमत्कार वर्णिलेले आढळतात ... | ,, |
| १७ | धर्मेतिहासांत पहिल्या धर्मपित्यापासून आतापर्यंत चमत्कार-सामर्थ्यच निक्षून प्रतिपादिलें आहे. ... ... ... | १३४ |
| १८ | मिदल्तनचा धर्मपित्यांच्या सत्यवक्तेपणावर हल्ला ... ... | १३५ |
| १९ | या हल्ल्यानें धर्मपित्यांचा मूळच्या महत्त्वास धक्का बसला ... | १३६ |
| २० | नवे महत्त्वाचें प्रश्न... ... ... ... ... | १३७ |
| २१ | मिदल्तनच्या खंडनार्थ आक्सफर्द विद्यापीठानें कंबर बांधली ... | ,, |
| २२ | आक्सफर्दच्या विद्यापीठाचें कार्य ... ... ... | १३८ |
| २३ | चमत्कार कसे बंद पडले ... ... ... ... | १३९ |
| २४ | चमत्कारासंबंधीं प्रमाणांवरून निघणारीं अनुमानें ... ... | १४१ |
| २५ | नवा करार व जुना करार यांतील भिन्नता ... ... | १४२ |
| २६ | सनातनपंथाचीं परिच्छेदक मतें चमत्कारमयच होतीं ... | १४३ |
| २७ | लोकांचें इंग्लंदांतील धर्मसंस्थेकडून रोमी धर्म संस्थेकडे प्रयाण | १४४ |
| २८ | पत्रकपंथाची चळवळ ... ... ... ... | १४५ |
| २९ | पत्रक पंथी चळवळीचे परिणाम ... ... ... | १४६ |
| ३० | कार्यकारणवादी पंथाची ' धर्मा ' विषयीं कल्पना ... | ,, |
| ३१ | कार्यकारणवादाची छाप ... ... ... ... | १४७ |
| ३२ | कार्यकारणवादानें चमत्कारपराङ्मुखता होते. ... ... | १४८ |
| ३३ | कार्यकारणवाद व अनिर्बंधविचाराचा पंथ ... ... | ,, |
| ३४ | सनातनपंथाच्या ऱ्हासानेही प्रतिरोधीपंथानें आपला फायदा करून घेतला नाहीं. ... ... ... ... | १४९ |
| ३५ | सनातनपंथाचा विस्कळितपणा आणि सोळाव्या व एकोणिसाव्या शतकांतील स्थिति. ... ... ... ... | १५१ |
| ३६ | प्रतिरोधीपंथाची सत्त्वहीनता व लोकांचा कार्यकारणाकडचा कल | १५२ |
| ३७ | प्रमाणवादी पंथ ... ... ... ... ... | १५३ |

| अ.नं. | विषय. | पृष्ठ. |
| --- | --- | --- |
| ३८ | त्यापंथाचे इतर ग्रंथकार ... ... ... ... | १५४ |
| ३९ | प्रमाणवादी पंथ लोकप्रिय झाला नाहीं ... ... ... | १५५ |
| ४० | प्रमाणवादाचें कार्यकारणवादाशीं साम्य ... ... | १५६ |
| ४१ | इच्छाशक्ति सृष्टिनियमांना वळण लावून चमत्कार करिते ... | ,, |
| ४२ | चमत्कारांचा इतिहास व कार्यकारण चळवळ ... ... | १५७ |
| ४३ | कार्यकारण मनूचें माहात्म्य ... ... ... ... | १५८ |
| ४४ | कार्यकारणवादाच्या चळवळीचें जनकत्व ... ... | १५९ |
| ४५ | तत्कालीन वाङ्मयाचा स्वतंत्र विचारावर प्रभाव पडतो ... | १६१ |
| ४६ | ख्रिस्ती धर्मामध्यें पालट ... ... ... ... | १६२ |
| ४७ | ख्रिस्ती धर्माच्या सद्यःस्थितीचें महत्त्व ... ... ... | १६३ |


## प्रकरण ३ रें.

## कार्यकारणवादाचा रमणीयक, शास्त्रीय, व नैतिक शाखांतील उत्कर्ष.

## भाग १ ला.

### रमणीयकशाखांतील उत्कर्ष.


| अ.नं. | विषय. | पृष्ठ. |
| --- | --- | --- |
| १ | उत्कर्षाचे तीन आधार ... ... ... ... | १६५ |
| २ | चमत्कारांच्या ऱ्हासाचीं दोन कारणें ... ... ... | १६६ |
| ३ | विश्वाच्या सृष्टिस्थितिविषयीं कल्पना पालटतात व तदनुरूप इतर विषयांतील विचारसरणी पालटते ... ... ... | ,, |
| ४ | या प्रकरणाचा उद्देश ... ... ... ... | १६७ |
| ५ | मानवी सुधारणेच्या आरंभापूर्वी वस्तुपूजा सुलभग्राह्य असते ... | ,, |
| ६ | वस्तूंवर अलौकिक सामर्थ्याचा आरोप ... ... ... | १६८ |
| ७ | शूलाचें सामर्थ्य ... ... ... ... ... | ,, |
| ८ | शुद्धिसंस्कारोदकाचा गुण ... ... ... ... | ,, |
| ९ | अप एव ससर्जादौ तासु बीजमवाक्षिपत् ... ... ... | १६९ |

| अ.नं. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| १० | हें जडान्धन तमोमय मध्ययुगांत ख्रिस्ती धर्मांतही अतिशय आढळतें ... ... ... ... ... | १६९ |
| ११ | सुधारणेची पुढची पायरी; अमानुष आत्म्यांची कल्पना ... | १७० |
| १२ | सुधारणेच्या तळपायावरील कल्पनादौर्बल्य ... ... | ,, |
| १३ | मूर्तिपूजा हाच साधारणपणें रानटी माणसांचा धर्म कां ? ... | ,, |
| १४ | मूर्तिपूजेचे दोन प्रकार ... ... ... ... | १७१ |
| १५ | कलांच्या इतिहासांत धर्मज्ञानाचा इतिहास ... ... | ,, |
| १६ | राष्ट्रीयधर्मांचा राष्ट्रीय कलेवर प्रभाव, पार्स, मिसर, हिंदुस्थान व ग्रीस ... ... ... ... ... ... | १७२ |
| १७ | ख्रिस्ती कलेच्या इतिहासावरून धर्माच्या उत्कर्षापकर्षाचा छडा काढतां येतो ... ... ... ... ... | १७३ |
| १८ | पेगन-कलेचा ख्रिस्तीकलेवर परिणाम ... ... ... | ,, |
| १९ | कबरेवरील कारागिरानें मृत्यूची भयानकता नष्ट होई ... | १७४ |
| २० | शवदीर्घिकांवरील कारागिरी ... ... ... ... | ,, |
| २१ | या कारागिरींत भयानक देखावे नसत ... ... ... | १७५ |
| २२ | ख्रिस्ती धर्मांतले उग्र प्रकार कलेंत उमटले नाहींत... ... | ,, |
| २३ | शववापिकेंतल्या कारागिरींतली लाक्षणिक पद्धति ... ... | १७६ |
| २४ | केवळ ख्रिस्ती रूपकें ... ... ... ... | १७७ |
| २५ | रोमी पादशाहीचा भंग व रानटी स्वाऱ्या; त्यांचा कलेवर परिणाम | १७८ |
| २६ | दैवतत्रयीचीं चित्रें ... ... ... ... ... | ,, |
| २७ | ख्रिस्ताचें चित्र ... ... ... ... | १७९ |
| २८ | सहाव्या ते बाराव्या शतकांच्या दरम्यानचा कल .. ... | ,, |
| २९ | बाराव्या शतकापर्यंत जनक-ईश्वराची मूर्ति नव्हतीशी वाटते... | १८० |
| ३० | जनक-ईश्वराची मूर्ति ... ... ... ... | ,, |
| ३१ | जनक-ईश्वराच्या चित्रांत पालट ... ... ... | १८१ |
| ३२ | दैवतांचा बहुसाळपणा ... ... ... ... | ,, |
| ३३ | स्त्रीदेवतांची कल्पना .. ... ... ... | ,, |
| ३४ | ज्ञेयवादाचें कार्य ... ... ... ... | १८२ |
| ३५ | ख्रिस्ती धर्माचा विजय कसा झाला ... ... ... | १८३ |
| ३६ | कुमारी मेरीचें चित्र व महत्त्व ... ... ... | १८४ |
| ३७ | कुमारीच्या मातृत्वाचें चिन्ह ... ... ... ... | ,, |

| अ.नं. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| ३८ | स्त्रीजातीविषयींची हलकी कल्पना जाऊन उदात्त कल्पना प्रचारांत आली ... ... ... ... | १८५ |
| ३९ | या आदर्शाचा प्रभाव ... ... ... ... | ,, |
| ४० | कुमारीला पूज्यतमत्व प्राप्त झालें ... ... ... | १८६ |
| ४१ | मूर्ती पूजासाधन नव्हे, तर पूजाविषय होऊन बसल्या ... | ,, |
| ४२ | पूजेचें साधन म्हणून मूर्तीचा उपयोग ... ... ... | १८७ |
| ४३ | पूजेचा विषय म्हणून मूर्तीचा उपयोग ... ... ... | ,, |
| ४४ | मृतांचे अवशेष व चित्रें यांच्या महत्त्वाचें मूळ एकच ... | ,, |
| ४५ | अलौकिक सामर्थ्य असणाऱ्या दोन प्रतिमा ... ... | १८८ |
| ४६ | रानटी लोकांच्या स्वाऱ्यांचा परिणाम ... ... ... | ,, |
| ४७ | मूर्तिपूजेचा विरोध; चित्रांचा निषेध ... ... ... | १८९ |
| ४८ | मूर्तिभंजक पंथ ... ... ... ... ... | ,, |
| ४९ | मूर्तिभंजकत्वाचा निषेध ... ... ... ... | १९० |
| ५० | संत आगोबार्द व त्याचे ग्रंथ ... ... ... ... | ,, |
| ५१ | आगोबार्दचें मूर्तिपूजानिषेधक प्रतिपादन... ... ... | १९१ |
| ५२ | या विचारांचें महत्त्व ... ... ... ... | १९२ |
| ५३ | महंमदी धर्माला मूर्तिपूजानिषेधांत यश आलें, हा ऐतिहासिक विकासाला अपवाद दिसतो ... ... ... ... | ,, |
| ५४ | या यशाचीं कारणें ... ... ... ... | १९३ |
| ५५ | मूर्तिपूजानिषेधासाठीं मूर्ति करणाला मनाई ... ... | ,, |
| ५६ | त्यामुळें कलेची अत्यंत हानि झाली ... ... ... | १९४ |
| ५७ | ख्रिस्ती धर्मानेंही कलेला उत्तेजन दिलें नाहीं ... ... | ,, |
| ५८ | भक्ति निराळी व रामणीयक मनोवृत्ति निराळी ... ... | १९५ |
| ५९ | म्हणून मूर्तिपूजेनें कलाभिरुचि वाढतेच असें नाहीं ... ... | ,, |
| ६० | ग्रीक लोकांत शरीर सौष्ठवाचें महत्त्व विशेष मानीत ... | ,, |
| ६१ | दैहिकप्रवृत्ति घातुक, या समजुतीनें कलेचा उत्कर्ष झाला नाहीं | १९६ |
| ६२ | कलेला प्रतिकूल दोन गोष्टी ... ... ... ... | १९७ |
| ६३ | मूर्तिपूजेचा त्याग स्वाभाविक होय ... ... ... | ,, |
| ६४ | दोन अपवादकप्रसंग ... ... ... ... | ,, |
| ६५ | पहिला प्रसंग ग्रीस देशांत ... ... ... ... | १९८ |
| ६६ | चार पायऱ्यांचें वर्णन ... ... ... ... | ,, |
| ६७ | भक्ति जाऊन अभिरुचि वाढली ... ... ... | १९९ |

| अ.नं. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| ६८ | पुराणकथांचें काव्यप्रदशांत प्रयाण ... ... ... | २०० |
| ६९ | कलोत्कर्ष गिरीवरून शेवटीं ग्रीसचा अधःपात ... ... | ,, |
| ७० | कलाविकासाच्या मार्गांत कसकसा अढथळा झाला ... ... | २०१ |
| ७१ | रोमच्या धर्मसंस्थेनें कलेला उत्तेजन दिलें ... ... | ,, |
| ७२ | युरोपांतील वाङ्मयोद्धाराच्या वेळची स्थिति ... ... | २०२ |
| ७३ | दांतीच्या काव्याचा प्रभाव ... ... ... ... | २०३ |
| ७४ | पुनरुद्भूत मानसिक सामर्थ्याचे परिणाम ... ... ... | २०५ |
| ७५ | या लाटेनें धर्माचें उज्वल स्वरूप लोपलें... ... ... | ,, |
| ७६ | खऱ्या धर्माचा पुनः उदय झाला ... ... ... | २०६ |
| ७७ | धर्माच्या पुनरुदित उज्ज्वलतेचे प्रतिबिंब कलेंत दिसूं लागलें ... | ,, |
| ७८ | कलेंतलीं धार्मिक दृष्टि नष्ट होऊन संसारिक आली... ... | २०७ |
| ७९ | या पालटाची लहानशी आणखी दोन कारणें ... ... | ,, |
| ८० | वेनिसची शाखा ... ... ... ... ... | २०८ |
| ८१ | कलेचीं अध्ययनप्रचुर शाखा वेनिसला अगदींच माहीत नव्हती | २०९ |
| ८२ | पावित्र्याच्या आदर्शाऐवजी सौंदर्याचा आदर्श तयार झाला ... | २१० |
| ८३ | सौंदर्याचें संगोपन व संवर्धन ग्रीसनें दक्षतेनें केलें ... ... | ,, |
| ८४ | ख्रिस्ती धर्मानें रामणीयक व पूज्यपूजा या वृत्ति नष्ट केल्या ... | २११ |
| ८५ | कलेंत पेगन नमुने आले ... ... ... ... | २१२ |
| ८६ | धार्मिक पुनरुद्धारासाठीं सावोनारोलाचा जोराचा प्रयत्न ... | २१३ |
| ८७ | सावोनारोलाचें धोरण ... ... ... ... | ,, |
| ८८ | त्याचीं व्याख्यानें ... ... ... ... ... | २१४ |
| ८९ | त्याचा प्रभाव ... ... ... ... ... | ,, |
| ९० | सावोनारोलाच्या मरणानंतर पुनः कला प्रापंचिक स्वरूप पावली | २१५ |
| ९१ | मध्ययुगांतले चित्रकलेचे तीन भिन्न काळ ... ... | ,, |
| ९२ | वास्तुकर्मांतही असेंच संक्रमण चाललें होतें ... ... | २१६ |
| ९३ | ख्रिस्ती धर्मांतलीं धार्मिक वृत्तींचीं तीन प्रकाशन साधनें ... | ,, |
| ९४ | गाथवास्तुपद्धतीचा उदय ... ... ... ... | ,, |
| ९५ | गाथपद्धति उन्नतावनत होत होती ... ... ... | २१७ |
| ९६ | ख्रिस्ती वास्तुपद्धतीचा उदय ... ... ... | ,, |
| ९७ | ब्रुनेलेश्चीची पद्धत ... ... ... ... ... | २१८ |
| | सेंत पीतर भजनालयाच्या घटनेचा योजक मायकेल आंजेलो ... | ,, |

| अ.नं. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| ९९ | या भजनालयाचे महत्त्व ... ... ... ... | ,, |
| १०० | याच्या पावित्र्याचें कारण ... ... ... ... | २१९ |
| १०१ | त्याचें वर्णन ... ... ... ... ... | ,, |
| १०२ | धार्मिकतेला रामणीयकतेनें गिळिलें ... ... ... | ,, |
| १०३ | इतकें विस्तृत विवेचन करण्याचें प्रयोजन ... ... | २२० |
| १०४ | धर्मसुधारणेचीं कारणें वाङ्मयोद्धारानें झालेल्या पालटांत सांपडतात | ,, |
| १०५ | रामणीयकतेनेंही आपलें पाऊल याचवेळीं पुढें टाकिलें ... | २२१ |
| १०६ | मागल्या काळच्या धार्मिक कल्पना पुढच्या काळांत काव्यरूप होतात | ,, |
| १०७ | जडपूजेच्या कल्पनांतून सुटण्याकडे युरोपचा कल आहे ... | २२२ |
| १०८ | याचा पुरावा चोहों बाजूस भेटतो ...... ... ... | २२३ |


## प्रकरण ३ रें.

### भाग २ रा.

## शास्त्रीयशाखेंतील उत्कर्ष.


| | | |
|---|---|---|
| १ | या चळवळीचें निराळेंच एक कारण ... ... ... | २२४ |
| २ | शास्त्रीय प्रमेयांची भवति न भवति पूर्वीं धर्मज्ञानासाठींच असे... | ,, |
| ३ | धर्मशास्त्रांतील कथेचा वाच्य तसाच व्यंग्य अर्थ असतो ... | ,, |
| ४ | स्वीदनबोर्ग यानें हें मत संवृद्ध केलें आहे ... ... | २२५ |
| ५ | ओरिजेन यानें रूपकात्मक पद्धति स्वीकारली ... ... | ,, |
| ६ | वाच्य व रूपकात्मक अशी दुहेरी पद्धति संत आगस्ताइननें प्रतिपादिली. ... ... ... ... ... | २२६ |
| ७ | जगदुत्पत्तिकथनाचा दुहेरी अर्थ. ... ... ... | ,, |
| ८ | सर्पाला मिळालेल्या शापांचा रूपकार्थ. ... ... ... | २२७ |
| ९ | आणखी एका वचनाचा रूपकार्थ. ... ... ... | ,, |
| १० | वाच्यार्थ नीट जुळत नसला तर वचन गूढ समजून व्यंग्यार्थच घ्यावयाचा. ... ... ... ... ... | ,, |
| ११ | अक्षरशः अर्थाची पद्धति; व तसलें उदाहरण. ... ... | ,, |

| अ.नं. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| १२ | याहून प्राचीन उदाहरण. ... ... ... ... | २२८ |
| १३ | कास्मस वैखानस.... ... ... ... ... | ,, |
| १४ | त्याचे पुस्तक " खिस्ती विश्वरचना. " ... ... ... | २२९ |
| १५ | त्यानें केलेली दुर्बल मनाच्या खिस्त्यांची निर्भर्त्सना... ... | ,, |
| १६ | कास्मसनें बसवलेली विश्वरचना ... ... ... | २३० |
| १७ | विरुद्धपादांचें अस्तित्व मानण्यानें अर्थाचा अनर्थ होतो ... | २३१ |
| १८ | विरुद्धपादांच्या अस्तित्वाची कल्पना खिस्त्यांस अनुचित होय | ,, |
| १९ | विरुद्धपादांच्या अस्तित्वाच्या उलट संघातक वाक्यें ... | २३२ |
| २० | भौतिक शास्त्राच्या शोधाचा खंडनाचा प्रयत्न व्यर्थ होय, हें तेव्हां कळलें नव्हतें ... ... ... ... ... | ,, |
| २१ | विरुद्धपादांचें अस्तित्व मानणाऱ्या संत बर्जिलियसवर मारा ... | २३३ |
| २२ | तसलेंच भांडण पुन्हां कोपर्निकसाच्या मताचा निषेध ... | ,, |
| २३ | नवीनपणा म्हणजे महदपराध होऊन बसला ... ... | २३४ |
| २४ | मध्ययुगाच्या निद्रावशतेचें बेकननें दिलेलें कारण ... ... | ,, |
| २५ | वाङ्मयोद्धाराबरोबर शास्त्रोद्धार झाला ... ... ... | २३५ |
| २६ | पृथ्वी विश्वाचें केंद्र अशी प्राचीन कल्पना ... ... | ,, |
| २७ | ज्योतिःशास्त्राचें अध्ययन मानवी अंहतेचा भंग करतें ... | ,, |
| २८ | विश्वाच्या मानानें पृथ्वी अत्यंत क्षुल्लक या शोधाचें महत्त्व ... | २३६ |
| २९ | ज्योतिःशास्त्राला भूस्तरशास्त्राची जोड मिळाली ... ... | ,, |
| ३० | भूस्तरविद्येचें महत्त्व ... ... ... ... | २३७ |
| ३१ | भूस्तरविद्येच्या अध्ययनानें मृत्यूच्या कल्पनेविषयींची घोडचूक दुरुस्त झाली ... ... ... ... ... | २३८ |
| ३२ | शास्त्रीय शोधांनीं सृष्टींतली नियमनबद्धता कळली ... ... | ,, |
| ३३ | नियमबद्धतेहून नियमच्यवन रानटी मनांवर जास्त परिणाम करते | ,, |
| ३४ | ईश्वराची अवहेलना होते, म्हणून प्राचीनकाळीं द्यूताला मनाई करीत ... ... ... ... ... ... | २३९ |
| ३५ | या संवयीचे दोन महत्त्वाचे परिणाम ... ... ... | ,, |
| ३६ | प्राक्शास्त्रीय व शास्त्रीयकाळांतील ईश्वरविषयक कल्पना ... | २४० |
| ३७ | ज्योतिःशास्त्राच्या जीर्णोद्धारानें नियमबद्धतेची कल्पना आली ... | ,, |
| ३८ | देकार्तच्या सिद्धांताचें महत्त्व ... ... ... | ,, |
| ३९ | धूमकेतूंच्या अनियमिततेमुळें भोळसटपणाचें आयुष्य वाढलें ... | २४१ |
| ४० | धूमकेतूंविषयींचा धर्मज्ञानपंडितांचा उलगडा कार्यकारणात्मक होता | २४२ |

| अ.नं. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| ४१ | धूमकेतूंविषयींचा भोळसटपणा घालविण्याचे प्रयत्न ... | २४२ |
| ४२ | भौतिक शास्त्रानेंच खरा उलगडा केला ... ... ... | २४३ |
| ४३ | प्रत्येक भौतिक शास्त्रांत असाच प्रकार घडून नवें वळण सुरू झालें | ,, |
| ४४ | शास्त्रांच्या उत्कर्षाचा प्रभाव ... ... ... ... | ,, |
| ४५ | शास्त्राच्या वरपगड्यानें धर्मज्ञानांतील भयानकता नष्ट झाली ... | २४४ |
| ४६ | परिणामवादाच्या वाढीचें कार्य ... ... ... | ,, |
| ४७ | परिणामवादानें विश्वरचनेंविषयींची कल्पना बदलते ... | २४५ |
| ४८ | जडावर चित्प्रभुत्व चालतें, हा सिद्धांत अबाधित राहणार ... | ,, |
| ४९ | मात्र मांडणी बदलावी लागेल ... ... ... | २४६ |
| ५० | इतिहासांत परिणमनशीलता ... ... ... ... | ,, |
| ५१ | मतांतील पालट ज्ञानाच्या शाखांतील विसंवादाच्या जाणीवीनें होतो ... ... ... ... ... ... | २४७ |
| ५२ | मानवी मनावर खेदजनक पगडा बसविणारीं कारणें असतात ... | ,, |
| ५३ | भौतिक शास्त्रांतील शोध धर्महानिकर वाटतो ... ... | २४८ |
| ५४ | ही कल्पना कशी चुकते त्याचीं उदाहरणें... ... ... | ,, |
| ५५ | मानवी आटोक्या बाहेरच्या गोष्टी ... ... ... | २४९ |
| ५६ | शास्त्र धर्महानिकर नाहीं; पण शास्त्रमर्यादा समजण्यांत चूक होते | ,, |
| ५७ | चित्‌चें अस्तित्व नाहीसें वाटण्याचें कारण एकाच विषयाचा आत्यंतिक नाद ... ... ... ... ... | ,, |
| ५८ | शास्त्राचे दोन शत्रु... ... ... ... ... | २५० |
| ५९ | त्याचीं उदाहरणें. ... ... ... ... ... | ,, |
| ६० | भौतिक शास्त्ररूपी बौद्धिक प्रगतीचे परिणाम. ... ... | २५१ |
| ६१ | भौतिकशास्त्रांच्या प्रगतीमुळें कार्यकारणास धरून बैबलावर टीका झाली. ... ... ... ... ... | ,, |
| ६२ | नवीन अर्थनिर्णायकपद्धतीचें फार जुनें उदाहरण ... ... | २५२ |
| ६३ | जुन्या कराराच्या पंचाध्यायीचें जनकत्व मोशाकडे नाहीं, अशी पीरेरची टीका. ... ... ... ... ... | २५३ |
| ६४ | ईश्वरी तरतूद म्हणजे चमत्कार मानतात, यावर टीका. ... | ,, |
| ६५ | ला पीरेरची अर्थनिर्णयपद्धति आजतागायत चालू आहे. ... | २५४ |
| ६६ | धर्मोद्भवाच्या दोन कल्पनांपैकीं पहिली ... ... ... | ,, |
| ६७ | दुसरी म्हणजे पुराणकूटवृत्तात्मक कल्पना ... ... | २५५ |
| ६८ | या दोन कल्पना केव्हां व कोठें मान्य होत्या ... ... | ,, |

| अ.नं. | विषय. | पृष्ठ. |
| --- | --- | --- |
| ६९ | स्पिनोझाच्या टीकेचा उद्देश ... ... ... ... | २५५ |
| ७० | या चळवळीचीं तत्त्वें; लेसिंगचें ठाम मत ... ... | २५६ |
| ७१ | कांतचें मत अधिक स्पष्ट आहे ... ... ... | ,, |

## प्रकरण ३ रें.

## भाग ३ रा.

## नैतिकशास्त्रेंतील उत्कर्ष.

| अ.नं. | विषय. | पृष्ठ. |
| --- | --- | --- |
| १ | अनुसंधान राहिलेली बाजू ... ... ... ... | २५७ |
| २ | नीतीची परिणमनीयता ... ... ... ... | ,, |
| ३ | स्पष्टीकरणार्थ उदाहरणें ... ... ... ... | २५८ |
| ४ | भूतदयेचें उदाहरण ... ... ... ... | ,, |
| ५ | आणखी तसल्याच चालींचीं उदाहरणें ... ... ... | २५९ |
| ६ | फरक नैतिक विचारांच्या उन्नतीनें पडला ... ... | ,, |
| ७ | मानवी सुधारणेच्या प्रगतीबरोबर नीतिमत्ताही बदलते ... | ,, |
| ८ | याला वैयक्तिक अपवाद आहे... ... ... ... | २६० |
| ९ | पण ह्याचा परिणाम क्षणैक टिकतो ... ... ... | २६१ |
| १० | हटवादी मतसंस्था व नीतितत्त्वें यांचा संबंध ... ... | ,, |
| ११ | मानवी प्रमादशीलत्वामुळें धर्मांत व्यंगें राहतात ... ... | ,, |
| १२ | ख्रिस्तीधर्म हा युरोपच्या नैतिक उत्कर्षाचा मुख्य झरा ... | २६२ |
| १३ | ख्रिस्ती ध्येयानें केलेलें कालाचें आक्रमण... ... ... | २६३ |
| १४ | ख्रिस्ती धर्मांतल्या नीतिभागांत स्वत्वदर्शक कांहीं नाहीं, हें म्हणणें चुकीचें आहे ... ... ... ... ... | ,, |
| १५ | ख्रिस्तीधर्मांतील फेरबदलांचे तीन भिन्न वर्ग ... ... | २६४ |
| १६ | दुसऱ्या वर्गाच्या फेरबदलाचें विवेचन ... ... ... | ,, |
| १७ | तिसऱ्या वर्गाच्या फेरबदलांत धार्मिक भयानकतेचा अंतर्भाव होतो | २६५ |
| १८ | ख्रिस्तीधर्मांत उपदेशिलेली मरणोत्तर शिक्षा अत्यंत यातनामय आहे. | ,, |

| अ.नं. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| १९ | यातनामय शिक्षेच्या मताविरुद्ध दोन अपवाद गृहस्थ ... | २६६ |
| २० | पण हें मत सर्वस्वी बाणलेलें तर कधींच नव्हतें ... ... | २६७ |
| २१ | तथापि त्याचा शिक्का धर्मज्ञानावर बसलेला होता ... ... | ,, |
| २२ | ख्रिस्तीधर्माच्या उद्भवाच्या वेळीं हें मत प्रसिद्ध नव्हतें. ... | २६८ |
| २३ | मध्ययुगांत हें मत विस्तरशः तयार झालें ... ... | २६९ |
| २४ | नरकाग्निमताचा रूपकार्थ बसविणारा एरिजेना ... ... | ,, |
| २५ | बाराव्या शतकांत ह्या मताचें आपापल्यापरी सर्व विवरण करूं लागलें ... ... ... ... ... ... | २७० |
| २६ | संताचे तद्विषयक स्वप्न ... ... ... ... | ,, |
| २७ | धर्मोपदेशक भयानकता वाढवीत होते ... ... ... | २७१ |
| २८ | सध्यांच्या व त्या काळांतील अंतर ... ... ... | ,, |
| २९ | नेहमीं काय कानावर पडे ... ... ... ... | २७२ |
| ३० | ईश्वराचें उपकारक स्वरूपच त्यामुळें नष्ट झालें ... ... | ,, |
| ३१ | हें मत कल्पकतेला फार बाधक होतें ... ... ... | २७३ |
| ३२ | दुःखाच्या निदिध्यासानें कोमल मनोवृत्ति वठतात ... ... | ,, |
| ३३ | परोपकाराची मदार उदात्त मनोवृत्तींवर असते ... ... | २७४ |
| ३४ | मध्ययुगांतील या मताचा परिणाम काय झाला असेल ? ... | ,, |
| ३५ | अशा विचारांनीं लोकमनावर होणारा भयंकर परिणाम ... | ,, |
| ३६ | आराध्यदेवतेचें सारूप्य प्राप्त होणें हें धर्माचें अंतिम साध्य ... | २७५ |
| ३७ | असल्या मतांनीं क्वचित् धार्मिक बेपर्वाई नाहींशी होते खरी ... | ,, |
| ३८ | परंतु बहुजनसमाजावर उलट परिणाम होतो ... ... | २७६ |
| ३९ | स्वधर्मबाह्यांचा छळ करण्याची प्रवृत्ति होते ... ... | ,, |
| ४० | भूतदयावंताची स्थिति काय होईल ... ... ... | २७७ |
| ४१ | तार्किभेदासारखीच माणसें फार झालीं ... ... ... | ,, |
| ४२ | एक प्रेक्ष्य ... ... ... ... ... | २७८ |
| ४३ | हा उतारा येथें घेण्याचें कारण ... ... ... | २७९ |
| ४४ | ख्रिस्तीधर्माचें बिरुद ... ... ... ... | ,, |
| ४५ | धर्माधिकाऱ्याचे धोरण ... ... ... ... | ,, |
| ४६ | या धोरणाचें वर्णन... ... ... ... ... | २८० |
| ४७ | अशा स्थितींत असल्या प्रवृत्तीला असणारीं पूर्व कारणें ... | ,, |
| ४८ | मनोवृत्तिमय कारण. ... ... ... ... | २८१ |
| ४९ | छळाचें प्रतिबिंब एकंदर दण्डनपद्धतींत आढळतें. ... ... | |

| अ.नं. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| ५० | माध्ययौगिक ख्रिस्तीधर्मात छळ सार्वत्रिक होता. ... ... | २८१ |
| ५१ | यातना देण्याच्या पद्धतीवरून कल्पकाचें नैपुण्य दिसतें. ... | २८२ |
| ५२ | छळ सर्वत्र होई. इंग्लंडांत मात्र तो बेकायदेशीर मानीत. ... | ,, |
| ५३ | निरनिराळ्या देशांतील छळाला विरोध. ... ... ... | ,, |
| ५४ | छळाचा नायनाट करण्याची चळवळ वृत्तिविशिष्ट होती. ... | २८३ |
| ५५ | छळ बंद होण्याचें कारण, मानवी सुधारणेची प्रगति. ... | ,, |
| ५६ | छळ व मरणोत्तर दंडाचें मत यांचा उद्भव, उत्कर्ष व ऱ्हास समकालीन होय. ... ... ... ... ... | २८४ |
| ५७ | दंडपद्धतीच्या रचनेंतलें धोरण... ... ... ... | ,, |
| ५८ | दंडनपद्धतीचें कार्यक्षमत्व ... ... ... ... | २८५ |
| ५९ | वरचें तत्त्व समजण्यासाठीं उदाहरण ... ... ... | ,, |
| ६० | अलीकडचा मरणोत्तर दंडाबद्दलचा धर्मोपदेश पूर्वींहून सौम्य झाला | २८६ |
| ६१ | मरणोत्तर दण्डाच्या अनंतत्वाचें मण्डन ... ... | २८७ |
| ६२ | या पालटाचें कारण ... ... ... ... | ,, |
| ६३ | देकार्त हा सत्यान्वेषणाच्या या नव्या संवयीचा जनक ... | ,, |
| ६४ | देकार्तच्या आणखी एका नव्या कल्पनेचा प्रभाव या चळवळीवर झाला ... ... ... ... ... ... | २८८ |
| ६५ | आत्म्याचें सूक्ष्मत्व अगर चिन्मयत्व ... ... ... | ,, |
| ६६ | प्राचीनांचें मत आत्म्याचें अजडत्व मानण्याकडे होतें ... | ,, |
| ६७ | देहपतनानंतरची स्थिति अंतर्यामीं असणारा कोणीतरी सुचवितो | २८९ |
| ६८ | मानसशास्त्रांतलें प्रमाण साक्रेतिस, सिसरो व प्लेतो.... ... | ,, |
| ६९ | आत्म्याची नियति ... ... ... ... | ,, |
| ७० | देहात्मबुद्धीचा परिणाम ... ... ... ... | २९० |
| ७१ | प्लेतो, आरिस्ततल व पुनः प्लेतो, असा ख्रिस्ती दर्शनांचा अनुक्रम | ,, |
| ७२ | दोन विरुद्ध परिणामी मतें ... ... ... ... | ,, |
| ७३ | दुसरें मत तर्तुलियनचें ... ... ... ... | २९१ |
| ७४ | मध्ययुगांत आध्यात्मिक कल्पनांना आधिभौतिकत्व मिळालें ... | ,, |
| ७५ | याचीं उदाहरणें ... ... ... ... ... | ,, |
| ७६ | धर्मसुधारणेच्या जरा अगोदर आत्म्याविषयींची शुद्धतर कल्पना आली ... ... ... ... ... | २९२ |
| ७७ | जडांत चैतन्य कसें आलें, याचा शोध झाला ... ... | २९३ |
| ७८ | यदृच्छोद्भव ... ... ... ... ... | ,, |

| अ.नं. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| ७९ | चैतन्योत्पत्तीच्या प्रश्नापुढें शोधक-सामर्थ्यानें हात टेंकले ... | २९३ |
| ८० | चैतन्याच्या स्वरूपाविषयीं कार्तेझियन मत ... ... | २९४ |
| ८१ | जडाग्निविषयक मत देकार्तच्या वेळपासून लोपलें ... ... | ,, |
| ८२ | या मताविषयीं इतका पाल्हाळ करण्याचें कारण ... ... | २९५ |
| ८३ | तें मत व तसलें शीलही नाहीसें झालें ... ... ... | ,, |
| ८४ | अर्वाचीन ख्रिस्तीधर्माचें स्वरूप निःसीम भूतदया होय ... | ,, |
| ८५ | अपराध-दंडनांतील भिन्नता उदाहरणादाखल दर्शविली आहे ... | २९६ |
| ८६ | हावर्डचे प्रयत्न ... ... ... ... ... | २९७ |
| ८७ | इंग्लंडांत दंडनपद्धतीचा कडकपणा ... ... ... | ,, |
| ८८ | ह्या सुधारणेचें मूळ वाल्तेर-पंथांत आहे ... ... | २९८ |
| ८९ | बेन्थामचें काम ... ... ... ... ... | २९९ |
| ९० | धर्माधिकाऱ्यांच्या कार्याचें महत्त्व ... ... ... | ,, |
| ९१ | हा परिणाम मानवी सुधारणेनें उत्पन्न झालेल्या नवीन विचारौघाचा | ,, |
| ९२ | बैबल व सदसद्विवेक बुद्धि यांचे साहाय्य ठरविण्याकडे सध्यां कल आहे ... ... ... ... ... | ३०० |
| ९३ | शब्द जुनेच, पण अर्थ नवा ... ... ... ... | ,, |
| ९४ | होत जाणाऱ्या पालटानें जुनें बुडालेंसें वाटणाऱ्या मनाला उत्तेजन देणारा विचार ... ... ... ... ... | ३०१ |


---

## प्रकरण ४ थें.

## छळाविषयीं.

## भाग १ ला.

### छळाची पूर्वसिद्धता.


| अ.नं. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ | अनुसंधान छळ हा कांहीं विशिष्ट मतांचा सांगाती असतो ... | ३०२ |
| २ | या प्रकरणाचा उद्देश ... ... ... ... | ३०३ |
| ३ | दोन नैतिक वृत्ति ... ... ... ... ... | ,, |

| अ.नं. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| ४ | परिस्थितीनें त्यांच्या सापेक्ष महत्त्वांत भेद पडतो ... ... | ३०४ |
| ५ | ग्रीक व रोमन तत्त्वज्ञान सद्गुणाच्या व ख्रिस्ती पापाच्या जाणवीकडे झुकलें ... ... ... ... ... | ३०५ |
| ६ | मनोवृत्ति थिजून साफ उलट झाल्या ... ... ... | ,, |
| ७ | प्रत्येक मत नैतिक मनोवृत्तींतून निघूनही शेवटीं तिरस्करणीय होते ... ... ... ... ... ... | ३०६ |
| ८ | आनुवंशिक पापाचा विचार अवश्य करावा लागतो ... | ,, |
| ९ | ज्याचा दोष त्याला, हें स्वयंसिद्ध आहे ... ... .... | ,, |
| १० | तथापि उलट कल्पना प्रचलित आहे ... ... ... | ,, |
| ११ | स्वयंसिद्ध व तद्विरुद्ध दोन्ही प्रकार प्रत्येक राष्ट्रांत केव्हांनाकेव्हां दिसतात... ... . ... ... ... ... | ३०७ |
| १२ | महत्सत्ता, तिचें सत्त्व; व परिणाम ... ... ... | ,, |
| १३ | लोकसत्ताकतत्त्वांच्या विजयानें आनुवंशिकता पदच्युत होईल... | ३०८ |
| १४ | आनुवंशिकतेचें मूळ काय ? ... ... ... ... | ,, |
| १५ | आनुवंशिकतेचा उल्लेख ख्रिस्तीधर्मांत उघड व जोराचा आहे.... | ३०९ |
| १६ | जन्मतांच मेलेल्यासही नरकयातना होतात. ... ... | ,, |
| १७ | शिशुशुद्धिसंस्कार सर्वमान्य होता. ... ... ... | ३१० |
| १८ | आनुवंशिकतेसंबंधीं अर्भकांविषयीं धर्मपित्याचीं मत. ... | ,, |
| १९ | आगस्ताइनचें मत... ... ... ... ... | ३११ |
| २० | ' दफायदे ' ग्रंथांतील मत. ... ... ... ... | ,, |
| २१ | मध्ययुगांत या मताचा माग सापडतो.... ... ... | ३१२ |
| २२ | शुद्धिसंस्काराऐवजीं योजिलेलीं तंत्रें. ... ... ... | ,, |
| २३ | या तंत्राचें निर्मूलन करण्याचे प्रयत्न फुकट का गेले ? ... | ३१३ |
| २४ | धर्मसुधारणेचे अंतिम परिणाम. ... ... ... | ,, |
| २५ | धर्मसुधारणेचे तात्कालिक उद्देश. ... ... ... | ३१४ |
| २६ | शिशुशुद्धिसंस्कारविरोधी पंथ. ... ... ... | ,, |
| २७ | प्रतिरोधीपंथांतले दोन विरोधी दल. ... ... ... | ३१५ |
| २८ | लूथरपंथी लोकास शुद्धिसंस्काराची जरूर वाटे, ... ... | ,, |
| २९ | काल्विनचें मत. ... ... ... ... ... | ,, |
| ३० | शिक्षेंत बहिष्काराचें तत्त्व असतें, असें मानणाऱ्याचें अर्भकशुद्धिसंस्काराविषयीं मत ... ... ... ... | ३१६ |
| ३१ | जोनाथन एडुर्ड्स ... ... ... ... ... | ,, |

| अ.नं. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| ३२ | धर्मसुधारणेनें काय केलें ... ... ... ... | ३१७ |
| ३३ | वरील विधानाला दोन अपवादक सुधारक ... ... | ३१८ |
| ३४ | सोसिनसचा पंथः इतालींतली अनुकूल परिस्थिति ... ... | ,, |
| ३५ | विचारांचीं दोन मंडळें ... ... ... ... | ३१९ |
| ३६ | त्याचा प्रतिरोधीपंथाशीं बेबनाव ... ... ... | ,, |
| ३७ | सांप्रदायिकमताांना कमी दर्जाचीं मानण्याची सोसिनसची इच्छा... | ३२० |
| ३८ | झ्विंग्लियस व सोसिनस यांच्यातील विरोध व साम्य ... | ,, |
| ३९ | झ्विंग्लियसच्या मनाचा कल लहानपणींच दिसून आला ... | ३२१ |
| ४० | प्रभुभजनाविषयीं झ्विंग्लियसचें मत ... ... ... | ,, |
| ४१ | आनुवंशिक पाप व शिशुशुद्धिसंस्कार यांत कार्यकारणाभिज्ञतेचा निणय ... ... ... ... ... ... | ३२२ |
| ४२ | ही निर्णयपद्धती विजयी होत चालली ... ... ... | ,, |
| ४३ | या दोन पंथाची बहुमान्यता ... ... ... ... | ,, |
| ४४ | आनुवंशिक पापाच्या मताचा विस्तार अर्भकापुरताच नाहीं ... | ३२३ |
| ४५ | ख्रिस्ती धर्मांत नवीन येणाऱ्यांची या मतानें होणारी स्थिती ... | ३२४ |
| ४६ | ख्रिस्ति धर्मपित्यांची एक आवडती उपमा ... ... | ,, |
| ४७ | या मताचें इतर तात्त्विक मतांहून भिन्नत्व ... ... | ३२५ |
| ४८ | ही ज्योत सर्वत्र पेटलेली आहे. ... ... | ,, |
| ४९ | तारण एकट्या ख्रिस्तीधर्मांतच आहे, हें मत सर्वसंमत होतें | ३२६ |
| ५० | या धर्माचें एकीकरणाचें व सत्तासूत्रचालनाचें सामर्थ्य नष्ट झालेसें वाटलें ... ... ... ... ... | ,, |
| ५१ | पुढच्या पायरीची तयारी झाली ... ... ... | ३२७ |
| ५२ | धर्मसुधारणेलाही हें मत मान्य होतें ... ... ... | ३२८ |
| ५३ | या मतावर ऐकमत्य ... ... ... ... | ,, |
| ५४ | झ्विंग्लियसनें हें मत धिक्कारलें ... ... ... | ३२९ |
| ५५ | या मताचे परंपरेचे परिणाम ... ... ... ... | ३३० |
| ५६ | काल्विनच्या पूर्वसंकल्पप्रमेयांविरुद्ध एकच नैतिक आरोप आहे | ,, |
| ५७ | हे नैतिक प्रमाण दूर करण्यानें ओढवणारा अनर्थ ... ... | ३३१ |
| ५८ | या मतानें मनुष्यें दैववादी बनतात ... ... ... | ३३२ |
| ५९ | इच्छास्वातंत्र्यावर इरास्मसचा ग्रंथ ... ... ... | ,, |

| अ.नं. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| ६० | ईश्वराविषयींच्या विषमतेच्या कल्पनेनें इच्छास्वातंत्र्य नष्ट होतें... | ३३३ |
| ६१ | पूर्वसंकल्पाविषयीं काल्विनचें मत ... ... ... | ,, |
| ६२ | पूर्वसंकल्पमतावर टीका ... ... ... ... | ३३४ |
| ६३ | या मताला सध्या कोणी पुरस्कर्ता मिळत नाहीं ... ... | ,, |
| ६४ | धर्मसंस्थांचें महत्त्व कशावर अवलंबून आहे ... ... | ३३५ |
| ६५ | कार्यकारणात्मक बुद्धीच्या माणसांची स्थिती ... ... | ३३६ |
| ६६ | धर्मसंस्थेंतील हटवादी मतें व नैतिक अंगें यांमधील विरोध ... | ३३७ |
| ६७ | तारणाभोगसंकोचनाचा एक परिणाम ... .... ... | ,, |
| ६८ | भक्ति व अनीति यांचें साहचर्य ... ... ... | ,, |
| ६९ | कांहीं लबाड्या, लबाड्या मानता येत नाहींत ... ... | ३३८ |
| ७० | उदाहरणें ... ... ... ... ... | ,, |
| ७१ | यांचा परिणाम ... ... ... ... ... | ३३९ |
| ७२ | वरील उदाहरणें व धार्मिक लबाड्या यांत भेद आहे... ... | ,, |
| ७३ | धार्मिक लबाड्यांचे मासले ... ... ... ... | ३४० |
| ७४ | मध्ययुगांत ही स्थिति फारच वाईट झाली होती ... ... | ,, |
| ७५ | हें सत्यौदासिन्य इतर बाबतींतही शिरलें... ... ... | ,, |
| ७६ | लबाड्यांचें पीक कसें आलें ... ... ... ... | ३४१ |
| ७७ | सत्याभिमानाचें कार्य ... ... ... ... | ,, |
| ७८ | सत्यौदासीन्य व भोळेपण तीन रातीनें वाढलें ... ... | ३४२ |
| ७९ | सत्याची आवड म्हणजे काय ? .. ... ... | ,, |
| ८० | अत्यल्प संभवनीयतेकडील दृष्टीचें उदाहरण ... ... | ३४३ |
| ८१ | पास्कलचें प्रमाण ... ... ... ... | ,, |
| ८२ | पास्कलच्या म्हणण्याचा अर्थ ... ... ... ... | ३४४ |
| ८३ | सत्याभिमानाचा प्रसार ... ... ... ... | ,, |
| ८४ | बेकन, देकार्त व लाक ह्यांच्या प्रमुखत्वाचें कारण ... ... | ३४५ |
| ८५ | लाकनें काय केलें ... ... ... ... ... | ३४६ |
| ८६ | देकार्तचें काम ... ... ... ... ... | ,, |
| ८७ | देशी भाषांतच लिहिलेले ग्रंथ ... ... ... | ,, |
| ८८ | बेकनचे कांहीं चेले... ... ... ... ... | ३४७ |
| ८९ | लाकची पद्धती माध्य यौगिक विचारसरणीला प्राणघातक ... | ३४८ |
| ९० | सतराव्या शतकांतील महद्गुरूंनीं केलेलें कार्य ... ... | ,, |

| अ.नं. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| ९१ | कार्यकारणाभिज्ञतेच्या चेतनेच्या साहाय्यावांचून तें कार्य अशक्य झालें असतें ... ... ... ... | १४९ |
| ९२ | निष्पक्षपाती व निर्बंधरहित शोधाची आवड ... ... | १५० |

समाप्त.

---

# परिशिष्ट

## ग्रंथकाराची टीपा.

| | |
|---|---|
| प्रकरण १ लें ... ... ... ... ... | १ |
| प्रकरण २ रें ... ... ... ... ... | २२ |
| प्रकरण ३ रें (भाग पहिला) ... ... ... ... | ३६ |
| ,, ,, (भाग दुसरा)... ... ... ... | ४५ |
| ,, ,, (भाग तिसरा)... ... ... ... | ५१ |
| प्रकरण ४ थें ... ... ... ... ... | ६० |
| शुद्धीपत्र. ... ... ... ... ... | ७१ |

# ग्रंथकाराची प्रस्तावना.

## धर्मसुधारणेच्या वेळची स्थिती.

धर्मसुधारणेच्या वेळीं व पाठीमागून कांहीं काळपर्यंत धर्मज्ञानसंबंधी भयंकर वादविवाद चालू होते; पण निःपक्षपात न्यायबुद्धि अजून जागृत झालेली नव्हती, व निर्भेळ घातक प्रमादाहून साफ भिन्न जें आबाधित व आवश्यक सत्य त्याचा प्रतिनिधी मी, अशी हरएक पक्षाची कल्पना होती; व श्रद्धेंत होणारा चढ उतार केवळ अद्भुत चमत्कारांमुळें होतो, असें बहुधा लोक मानीत असत; त्यामुळें धर्मज्ञानांतल्या पालटांचीं सर्व कारणें त्यावेळीं धर्मज्ञानाच्या कक्षेंतच केवळ शोधलीं जावीं, हें साहजीकच. प्रत्येक धर्मज्ञानपंडिताची कल्पना अशी असे कीं, आपण निषेधिलेल्या मतांची चलती असण्याचें कारण केवळ दुष्ट लोकांचे प्रयत्न; व या दुष्ट लोकांना यश येण्याचें कारण असें कीं, ते आभासात्मक वादप्रमाणांचा उपयोग करतात व लोकांत खऱ्याखोट्याची निवड करण्याचें सामर्थ्य नसतें म्हणून ते त्या वादप्रमाणांस भूलून फसतात. उलटपक्षीं स्वतःच्या मतांना तत्प्रीत्यर्थ उत्थान पावलेल्या प्रेषितांचा पाठिंबा आहे, अगर त्यांनीं त्या मतांचा पुनरुद्धार केला आहे, विशिष्ट प्रतिभेनें तीं उद्दीपित झालेलीं आहेत व धर्मज्ञानांतर्गत प्रमाणांच्या जोरानें त्यांना यश येत आहे, अशी त्याची समजूत असे.

## धर्मज्ञानपंडित व धर्मसंस्थेचा इतिहासकार यांची स्थिति सारखीच होती.

जोंपर्यंत विचाराची दृष्टि अशीच होती तोंपर्यंत धर्मज्ञानपंडिताची व धर्मसंस्थेच्या इतिहासकाराची स्थिति जवळ जवळ एकच होती. प्रत्ये-काचा एकच मर्यादित प्रदेश होता व प्रत्येक प्राथमिक धर्म हेंच अंतिम साध्य मानीत असल्यामुळें त्या मूळ धर्माच्या पावित्र्यावर जीं एकामागून एक नवीन पुटें चढलीं होतीं तीं त्याला दाखवावीं लागत होतीं.

## ही स्थिति अठराव्या शतकांत पालटली.

पण अठराव्या शतकाच्या अखेरीस धर्मज्ञानांच्या उत्कट वृत्तींचा ऱ्हास झाल्यामुळें जेव्हां असल्या गोष्टींचा अधिक शांत मनानें खल करण्याचें

लोकांस सामर्थ्य आलें व जेव्हां ज्ञानाच्या वाढीनें उदारकक्ष विचार उत्पन्न झाले तेव्हां इतिहासाचें आलोकस्थान बरेंच पालटलें. असें पाहण्यांत आलें कीं, धर्मश्रद्धेंत जो जो मोठा पालट झाला त्याच्या त्याच्या पूर्वी यूरोपच्या बौद्धिक स्थितींत मोठा पालट झाला होता. कोणत्याही मताचा विजय होण्याचें कारण तदर्थ योजिलेल्या वादप्रमाणांचा जोर; अगर त्यांचा पुरस्कार करणाऱ्यांची कार्यक्षमता हें होय, तथापि त्याहूनही सबल कारण असें कीं, तें मत ग्राह्य होण्यास जरूर असलेली समाजाची पूर्वसिद्धता; व ही पूर्वसिद्धता तत्कालीन सामान्य बौद्धिक स्थितीनें उत्पन्न झाली होती.

## मानवी सुधारणेच्या वाढीबरोबर काय होत जातें.

मानवी सुधारणा जसजशी अपूर्ण स्थितींतून पूर्णस्थितीकडे जाते तसतशी हळूहळू मनुष्यांच्या श्रद्धेंत उदात्तता व शुद्धता येते. पूर्वी अत्यंत प्रबळ असलेल्या प्राकृततर विचारांचा व मतांचा त्यांच्या कल्पकतेशीं असलेला संबंध नकळत तुटतो; व मानवी सुधारणेच्या नव्या पायरीनें उत्पन्न झालेल्या नैतिक व बौद्धिक इयत्तेशीं कमी अधिक उशिरां तिचा मेळ बसतो. उदाहरण: धर्मसुधारणेच्या अगोदर बराच काळपर्यंत त्या सुधारणेकडचा कल उघड दिसूं लागला होता. ग्रीक सारस्वताचा जीर्णोद्धार, कलेचा परिपोष, पंडितंमन्य पंथाविरुद्ध प्रत्याघात, या गोष्टींनीं समाजाची स्थिति इतकी उन्नत झाली होती कीं, तींत लोकस्वास्थ्यार्थ अधिक शुद्ध व कमी जाचक धर्माचीच केवळ जरूर होती. लूथर व काल्विन यांनीं फक्त लोकांच्या गरजा काय होत्या त्या दाखविल्या व त्या गरजांना निश्चित स्वरूप दिलें.

## तत्कालीन सामान्य बौद्धिक सामर्थ्य सर्व काम करितें.

तत्कालीन सामान्य बौद्धिक सामर्थ्याच्या नियंत्रणेनें श्रद्धेसंबंधीं बारिक बारिक गोष्टींचें शेवटीं नियमन करणारे पूर्व ग्रह ठरतात; व जरी या नियंत्रणेचा जोर सर्वच माणसांवर सारख्या सुलभतेनें चालत नाहीं तरी सर्व मोठमोठ्या समूहांना शेवटीं तिजपुढें नमावें लागतें. तात्त्विक मतांत पालट झाला; ह्मणजे त्या मतांचे आधारांत भर पडली असा अर्थ होत नाहीं. तर त्या मतांत प्रतिबिंबित असणाऱ्या विचारसरणींत व मनाच्या

संवयींत बदल झाला असा अर्थ होतो. निश्चितवादप्रमाणें हीं त्या पाल॰टाचीं चिन्हें व निमित्तें होत; पण कारणें नव्हत. त्या प्रमाणांचा मुख्य गुण म्हणजे अटळ आणीबाणीची वेळ त्वरेनें आणावयाची. हीं प्रमाणें ज्यांच्या-पुढें मांडावयाचीं त्यांच्या मनाच्या संवयींशीं त्या प्रमाणांचा मिलाफ असल्यामुळें त्यांच्यांत जोर व कार्यक्षमता येते. ज्या बुद्धिवादाचा एखाद्या काळीं लवभर सुद्धां ठसा उमटत नाहीं त्याचाच पुढच्या काळीं मोठ्या आवेशयुक्त गौरवानें अंगिकार होतो. त्या बुद्धिवादाचें स्वरूप समजणें ही गोष्ट निराळी व त्याची योग्यता जाणणें ही निराळी.

## तत्त्वविवेचकांची मदत.

आणखी जी ही श्रद्धेची इयत्ता, ही विचारांची सरणी व लकब, एका॰मागून एक येणाऱ्या काळांतल्या मतांची किंमत ठरविणारी वरिष्ठ न्याय-देवता, ती उत्पन्न होण्यास बुद्धीच्या कोणत्याही एका प्रांतांतून निघणाऱ्या प्रवृत्ती कारणभूत होतात असें नाहीं, तर तत्कालीन सर्व बौद्धिक व सामा-जिकही प्रवृत्तींचा समवाय कारणभूत होतो. ती उत्पन्न होण्यास अति-शय मदत तत्त्वविवेचकांची होते असें वाटतें. बेकन, देकार्त, लाक यांच्या॰सारख्यांनीं स्वकालीन विचारांचा ओघ सुरू करण्यास बहुधा इतर कोणाही-पेक्षां जास्त हातभार लावला. त्यांनीं मनाची एकप्रकारची मूस व लकब तयार केली. त्यांनीं विचारांची विलक्षण वाटणी, बुद्धिवादाची नवी मोड व चौकसपणाची नवी सरणी सुरू केली. उच्च प्रतीच्या सारस्वतास जी प्रेरणा त्यांनीं दिली, ती त्यांहून जास्त लोकप्रिय लेखकांत त्या उच्च सार-स्वताच्या द्वारें उतरली; व या उदात्त मनांचा ठसा त्यांच्या ग्रंथांची व ज्यांची बिलकुल ओळख नाहीं अशा हजारों लेखकांच्या लेखांत स्पष्ट दिसतो.

## पण तत्त्वविवेचनाशिवाय इतर कारणें असतात.

पण जरी तात्त्विक पद्धतींच्या सामर्थ्याविषयीं शंका नको व तें जरी फार थोर आहे तरी समाजाची विचारसरणी बनविणाऱ्या अनेक कारणांपैकीं तात्त्विक पद्धती हें एक कारण होय. उदाहरणार्थ: उत्सूत्र व अचिंत्य तत्त्वाच्या राज्यावर हल्ला करून, नियमबद्धतेच्या आटोक्याविषयींची आमची कल्पना विस्तृत करून, व यापूर्वीं ज्या अगदीं विस्कळित वाटत होत्या त्या संघटनांमधील

परस्पर संबंधाचें आविष्करण करून, जड शास्त्रांतील शोध मनाला अशा लकर लावतात कीं, ती जड शास्त्राच्या आवाराबाहेरही वावरूं लागते.

## याचें उदाहरण.

उदाहरण: आमची पृथ्वी हा कांहीं जड विश्वाचा अक्ष व केंद्र नव्हे तर ता एक क्षुल्लक ग्रह आहे; एकंदरींत पाहतां या ग्रहाची विश्वांतली जागाही अगदीं नीच व हलकी आहे; व तो इतर पुष्कळ ग्रहांसंगतीं एका सूर्याच्या भोंवतीं प्रदक्षिणा करीत असतो; आणि हा सूर्य स्वतः सर्व विश्वाच्या मानानें एक अति सूक्ष्म बिंदू आहे, असा ज्योतिःशास्त्रांतला शोध आहे. या शोधाची आमच्या कल्पनाशक्तीला जितकी प्रचीती येते तितकीनेंच त्याचा आमच्या धर्मज्ञानविचारांवर अवाढव्य व ठळक प्रभाव पडतो.

## दुसरें उदाहरण.

तसेंच नागरीय व वाणिज्य उत्साहामुळें विशिष्ट विचारसरणी दिसते, विशिष्ट विवेचनपद्धती दिसतात, विशिष्ट तिरस्कार व विशिष्ट ओढे दिसतात; व त्यांच्या योगानें एका विशिष्टप्रकारच्या मतांकडे त्या उत्साहाचा सदोदित कल होतो; हा उत्साह उत्पन्न करणाऱ्या धंद्यांना उत्तेजन देणें म्हणजे त्या उत्साहाला अत्यंत अनुकूल अशा मतांना उत्तेजन देणें होय. अनुकूल बौद्धिक प्रभाव उत्पन्न न करितां लोखंडी सडका करणें अशक्य होय. वात व स्तीफन्सन हे ल्यूथर अगर वाल्तेर यांच्या इतका परिणामकारक फरक मानवीमतांत करतील हें शक्य दिसतें.

## धर्मज्ञानपंडित व धर्मसंस्थेचा इतिहासकार यांच्या कामांची तुलना.

ह्या विचारांत जर चूक नसेल तर मतांचा इतिहास लिहिणारा व धर्मज्ञानपंडित यांच्या कार्यक्षेत्रामध्यें मोठें अंतर आहे असें एकदम प्रस्थापित होतें. धर्मज्ञानपंडिताचें सारें लक्ष्य विशिष्ट मतांचा खरेखोटेपणा पाहण्याकडे असतें व त्या मतांना आधारभूत जीं वादप्रमाणें त्यांचें परीक्षण करुन तीं मतें तो ठरवीत असतो. इतिहासकारानें विशिष्ट काळच्या सामान्य बौद्धिक स्थितींत आढळणाऱ्या मतांत चढ उतार करणाऱ्या कारणांचा छडा लावला पाहिजे. पहिल्याचें क्षेत्र

मानसिक संघटनांच्या एका शाखेपुरतें व निर्घृण विवेचकाचीं मतें निश्चित करणाऱ्या तार्किक संबंधांपुरतें असतें. दुसऱ्याला ज्या काळाबद्दल लिहावयाचें असतें त्यांतील बौद्धिक प्रभावांचें विस्तृत अवलोकन करणें व तार्किक वादप्रमाणांहून मतपरंपरेवर जास्त छाप पाडणाऱ्या अन्योन्य साहश्याच्या संबंधाचा छडा लावणें भाग पडतें.

## या ग्रंथाचा संबंध मुख्यत्वें इतिहासकाराच्या कामाशीं आहे.

या दोन प्रकारच्या आलोकांतील दुसऱ्या म्हणजे इतिहासकाराच्या आलोकाशींच या ग्रंथाचा संबंध आहे. तरी या ग्रंथांत त्या दोन्ही आलोकांच्या साहचर्याच्या शक्यतेचा थोडक्यांत विचार करणें आवश्यक होईल. कारण त्या प्रश्नांत इतिहासांतला एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न गुरफटलेला आहे; तो असा कीं, सामान्य कारणांच्या प्रचंड ओघांत वैयक्तिक इच्छाशक्ती व निर्णयशक्ती यांना कोणती जागा राखून ठेविली आहे.

## इच्छा ही वासनांहून निराळी आहे.

लाकचें एक असें वचन आहे; आमची इच्छाशक्ती स्वतंत्र आहे कीं नाहीं, असें विचारण्याची गरज नाहीं; तर आम्हीं स्वतंत्र आहों कीं नाहीं, हें विचारलें पाहिजे; कारण स्वतंत्रतेची आमची कल्पना म्हणजे काय तर, जेव्हां आम्ही एखादा मार्ग स्वीकारतों तेव्हां आम्हांस पसंत वाटला तर एखादा निराळाच मार्ग आम्हांस पत्करतां आला असता, अशाप्रकारें आमच्या इच्छेप्रमाणें अथवा पर्यायानें जाणिवेप्रमाणें वागण्याची आमची शक्ती होय. तथापि जर हें पृथक्करण आणखी जरा पुढें ढकलून विचारलें कीं आमची इच्छा निश्चित करणारें कोण ? तर वाटतें कीं आम्हांस लाधूं शकणाऱ्या स्वातंत्र्याचीं उच्चतम तत्त्वें दोन गोष्टींत भरलेलीं आहेत. या गोष्टी म्हणजे इच्छा ही वासनांहून निराळी शक्ती आहे; व ती इच्छा म्हणजे केवळ परकार्याची अपेक्षा धरणारी नव्हे, म्हणजे तिची दिशा व तीव्रता सुखदु:खाच्या ओढ्यातिटकाऱ्यानें अवश्य निश्चित होत नाहीं; तात्पर्य ती स्वयंस्फूरित आहे.

## आमची जाणीव काय आहे.

मनाला अत्यंत गोड लागणाऱ्या अशा इतर एखाद्या मार्गाहून अत्यंत कडू वाटणाऱ्या मार्गानें जाण्यास आपण समर्थ आहों; त्या कडू

वाटणाऱ्या मार्गानें जातांना सतत कष्टकारक यत्न चालला आहे; या प्रयत्नांत जरा विश्रांती मिळाल्याबरोबर अतिशय आनंद होत आहे; व या स्वसुखनिरभिलाषाच्या मार्गानें जाण्यास आपण तयार होण्यातला हेतू पुढील फळाच्या आशेंत बिलकूल न गुंततां केवळ न्याय्य काय तें पाहणारी दृष्टीच असणें निदान शक्य आहे. अशीच आपल्याला जाणीव आहे; आणखी आपणाला अशीही जाणीव आहे कीं, जर आपल्या वासनांचा आपल्या इच्छेवर बळकट पगडा बसतो तर आपल्या इच्छेचाही उलट आपल्या वासनांवर पगडा बसूं शकतो. इच्छेस एकसारखा व्यायाम दिला तर तिची मूळ शक्ती वृद्धिंगत होऊं शकते. वासना सदा दाबीत गेल्यानें त्यांची तीव्रता कमी करतां येते. मनोव्यायामपद्धतीनें मुद्दाम एकाप्रकारच्या मनोवृत्तींची वाढ व समाधान करून व दुसऱ्या वर्गाच्या मनोवृत्तींची वाढ चिरडून व दाबून टाकून सगळी समप्रमाणता बदलून टाकतां येते.

### इच्छास्वातंत्र्याचें गूढ उकलत नाहीं; तरी मानवी स्वातंत्र्याचा सिद्धांत बसतो.

इच्छास्वातंत्र्याविषयीं कदाचित् अवश्य असणारें गूढ या विचारांनीं अर्थात् उकलत नाहीं. इच्छा हेतूविना काम करते कीं काय ? अथवा तिचा व तिच्या हेतूंचा संबंध काय ? अथवा इच्छाशक्ती अत्यंत उन्नत स्थितीला पोहोंचविली तरी वासना कधींकधीं तिच्याहून बळकट होणार नाहींत काय ? हे प्रश्न वरच्या विचारांनीं सुटत नाहींत. तथापि त्या विचारांनीं जितकें मिळणें शक्य तितकें मिळतें; म्हणजे मानवी स्वातंत्र्याचा सिद्धांत तयार होतो. एका बाजूला आपल्या इच्छेप्रमाणें वागण्याची ताकद व दुसऱ्या बाजूला सुखदु:खाच्या साम्राज्यांतून आपली सुटका करून घेण्याची व मनोवृत्तींचा ओघ ताब्यांत घेऊन वाटेल तसा वळविण्याची आपल्या इच्छाशक्तींतली ताकद या दोन ताकदांची ज्यानें प्रचीती घेतली आहे, तो बहुधा स्वातंत्र्याच्या शिखरावर जाऊन बसला.

### इच्छा व वासना यांचा झगडा.

वासनांच्या ओढ्याविरुद्ध एखादा सद्धेतू पाहण्यासाठीं इच्छाशक्तीची चाललेली धडपड हा एक उत्तमप्रकारचा सद्गुण होय; व या

दोन प्रेरक कारणांचें परस्पर सापेक्ष प्राबल्य हें प्रत्येक व्यक्तीच्या नीतिमत्तेचें एक मुख्य माप होय. कधीं कधीं एखाद्या विशिष्ट वासनेचा व इच्छाशक्तीचा झगडा चालला असतां इच्छाशक्तीला स्वतःच्या मूळ बळकटीनें अगर शत्रूच्या मूळ दुबळेपणामुळें अथवा नुकत्याच वर्णिलेल्या मानासिक व्यायामामुळें असा कांहीं वर्चष्मा मिळतो कीं, तो कधींही विशेषसा डळमळत नाहीं; अगर क्वचित्‌च डळमळतो. कधीं कधीं प्राकृतिक कारणांमुळें; व वारंवार कदाचित् स्वतःला जबाबदार धरतां येईल अशा कारणांमुळें हे दोन्ही वीर बहुतेक समसमान दिसतात; व प्रत्येक दुसऱ्याला वारंवार नमतो. या दोन स्थितींच्या दरम्यान अनेक पायऱ्या आहेत म्हणून कांहीं अंशानें तरी वासना तीव्र करणाऱ्या प्रत्येक कारणानें कांहीं ठिकाणीं वासनांचा इच्छाशक्तीवर पगडा बसतो.

## हीं तत्त्वें अंकशास्त्रानेंही खरीं ठरतात.

नैतिक अंकशास्त्रांत सतत पुनः पुनः येतांना दिसणाऱ्या आंकड्यांस हीं तत्त्वें लावणें कठीण नाहीं. उदाहरणार्थ, अंकशास्त्री दाखवितो कीं, हवेंतील कांहीं उष्णतामानानें एखाद्या वृत्तीचा जोर अगर पर्यायानें विशिष्ट दुष्कर्मांचा मोह वाढतो व नंतर तो असें प्रतिपादूं लागतो कीं, त्या दुष्कर्मांच्या इतिहासाचें सूत्र वातावरणांतील पालटांच्याच केवळ हातीं असतें. उष्णतामानाच्या चढतीनें दुष्कर्मांच्या ओढ्याला जोर येतो; त्याच्या स्थिरतेनें तो स्थिर असतो; व त्याच्या उतरणी बरोबर तो कमी होतो. वर्षोंवर्ष जवळ जवळ तेच आंकडे व तीच आलटापालट पुनः पुनः दिसते. अगदीं साम्य नसलेल्या निरनिराळ्या देशांत केलेल्या चौकशीनें सिद्धांताला बळकटी मात्र येते. आणि पुरावा इतका भरपूर मिळतो कीं, कांहीं निर्बंध राखून भविष्य सुद्धां बरोबर सांगण्यास आपण समर्थ होतों. हिंवाळ्यांतील जलौघांनीं अगर उन्हाळ्यांतील सुकव्यानें पाण्याचा चढ उतार होणाऱ्या नद्या, अनुकूल वसंतानें जन्मास येणारी व करपविणाऱ्या दवानें नाश पावणारी कीटककोटी, ऋतूंच्या आवर्तांबरोबर ठराविक पालट खाणारें वनस्पतींचें स्वरूप, ह्यांतसुद्धां मानवी कृत्यांच्या कांहीं थोर वर्गांहून बाह्य प्रेरणांचें जास्त बिनचुक प्रतिबिंब दिसत नाहीं, अगर त्या बाह्य प्रेरणांना हीं जास्त निमूटपणें नमत नाहींत.

## नैतिक स्थितींत फार हळू हळू पालट होतो.

आंकड्यांच्या कोष्टकांवरूनही गोष्ट सिद्ध होते. पण या कोष्टकांवरून अनुमान काय निघतें ? इच्छास्वातंत्र्य ह्मणजे कांहीं नाहीं, हें तर खात्रीनें नव्हे. तर मग काय ? तर आपण पूर्वींच संभाव्य मानलें असतें तेंच; म्हणजे निरनिराळ्या काळीं तिच्या काम करण्याच्या जोमाचें मान बहुतेक सारखेंच असतें. जोंपर्यंत विरोधाचें मान कायम असतें तोंपर्यंत आपल्या वासनांतील चढउतारानें आमच्या आचरणांतील चढउतार निश्चित होतो, यांत कांहीं विलक्षण नाहीं; तर याच्या उलट झालें असतें तर विलक्षण सद्गुणाचें सरासरी मान कायम किंवा जवळ जवळ कायम राहून निरनिराळ्या वेळीं जितकें वासनांचें प्राबल्य असतें तितकें किंवा जवळ जवळ तितकें वासनानुवर्तन प्रबळ होणार नाहीं, तर विलक्षण म्हणून दुष्कर्मांच्या इतिहासांत अनुक्रम व व्यवस्था आहे; व मनुष्याच्या ताब्यांत बिलकूल नसणाऱ्या प्रेरक कारणांनीं त्या दुष्कर्मांचा प्रवाह बराच निश्चित होतो. एवढ्या गोष्टीवरून इच्छाशक्तीचें स्वातंत्र्य बिलकूल नष्ट होत नाहीं; व इतिहासकाराच्या निकालाचा अखेर नीतिशास्त्र-ज्ञाच्या तत्त्वांशीं पूर्ण मिलाफ राहतो. ही नियमबद्धता पाहून आपण इतकेंच अनुमान करितों कीं, मनुष्यजातीच्या नैतिक स्थितींत फार हळूहळू पालट होतो. कांहीं प्रसंगीं कांहीं विशिष्ट वासना स्वाभाविक कारणांनीं प्रबळ होतात; व त्यांशीं झगडण्याचें काम इच्छाशक्तीला अत्यंत जड जातें व दुष्कर्मांचा इतिहास बाह्य प्रेरक कारणांचा विचार मनांत न घेतां लिहिण्याचा प्रयत्न अगदीं भिकार होईल.

## चिकित्सेहून अगदींच निराळ्या रीतीनें मनुष्यें निर्णय ठरवितात.

पुन्हां जर आपण एका निराळ्या प्रकारच्या संघटनांकडे वळलों, तर आपल्या मतांविषयीं फार भवति न भवति करणाऱ्यांनींही आपले निर्णय चिकित्सेहून अगदींच निराळ्या रीतीनें ठरविले आहेत, अशी लक्ष्यपूर्वक विचार पाहणारांची खात्री होईल. त्यांच्या ही गोष्ट बिलकुल लक्ष्यांतही नसेल; पण त्यांच्यावर जुन्या अनुबंधांचें वर्चस्व असतें; व अत्यंत भिन्न श्रद्धेचे लोक शेंकडा नव्याणव अंशीं पूर्वीं शिकलेल्या मतांसच केवळ मान्यता

देऊन आपल्या चौकशीचा निकाल ठरवितात. आपणांस मिळालेल्या शिक्षणानें मानसिक इयत्ता ठरवून तिच्यावरून ते सर्व प्रश्नांचा नकळत निकाल ठरवितात. आपल्या नजरेसमोर आलेल्या गोष्टी अगर वादप्रमाणें यांचा आपल्या पूर्वसिद्ध निकालांस जितका पाठिंबा मिळेल त्या मानानें ते त्याकडे लक्ष लावून व सहानुभूतीनें पाहतात. व येणेंप्रमाणें ते लवकर स्वतःची खात्री करून घेतात कीं, आपल्या परंपरागत मतांस अनुकूल प्रमाणें अनिवार्य सुसंबद्ध असून प्रतिकूल प्रमाणें अगदीं असंबद्ध आहेत. शिक्षणानें मिळालेल्या मतांचा त्याग करून जे दूर गेले आहेत, तेहि अप्रस्तुत कारणांच्या जाळ्यांत वरच्यांहून कमी गुरफटलेले नसतात. विक्षिप्तपणाची आवड, इतरांहून आपण बुद्धीनें श्रेष्ठ आहों असें लोकांस वाटावें ही महत्त्वाकांक्षा, रुचिवैचित्र्य, दुष्कर्माचा मोह, मित्रत्वाची वग, बुद्धिवैभवाचा ओढा ह्या व आणखी सांगत बसण्याची जरूरी नाहीं अशा इतर शेंकडों कारणांनीं मनुष्याचे निर्णय ठरत असतात.

## कार्यकारणविवेचनानें निर्णय ठरविणारे थोडे.

आपल्या श्रद्धेचा पाया कार्यकारणविवेचनावर रचणाऱ्या लोकांची संख्या बहुधा अत्यंत अल्प, "अनामिका सार्थवती" करणारी असेल. कांहीं चिकित्सा न करणारांचीच श्रद्धा काय ती असंबद्ध कारणांनीं ठरते असें नव्हे; तर चिकित्सा करणाऱ्यांच्याही विचारांत असंबद्ध कारणें शिरून आपल्या वजनानें ताजव्याचा कांटा बराच एका बाजूस झुकवितात. पण यावरून मतें बनविण्यांत कार्यकारणविवेचकशक्तीचा भाग अगर काम नाहींच असें ठरविणें हा उघड उघड मूर्खपणा होय. हें खरें कीं, कोणतेंही मन विचलनशील कारणांच्या प्रभावांतून कधींही साफ सुटलेलें नाहीं. तथापि वासना व इच्छाशक्ति यांमधील झगड्यांत इच्छाशक्तीला थोडेंबहुत यश येऊन सद्गुणाची जशी निष्पत्ति होते, तशीच मनोविकृती व विवेचकशक्ति यांमधील झगड्यांत विवेचकशक्तीला थोडें फार यश येऊन सत्कृत्याची निष्पत्ति होते; व प्रगतीच्या असंख्य पायऱ्या दिसूं लागतात. यावरून योग्य अनुमान इतकेंच काढावयाचें कीं, विवेचनक्रिया साधारणपणें वाटते त्यापेक्षां फारच कठिण आहे; व चालू मतांचीं कारणें शोधूं पहाणाऱ्यांस वादप्रमाणांच्या परिशीलनाहून पूर्वप्रवृत्तींचें परिशीलन जास्त महत्त्वाचें आहे.

## मतांचा ओघ विशिष्ट दिशेनें वाहूं लावणारें विशिष्ट बळकट कारण असतें.

विशिष्ट काळांतल्या मतांना समाजाच्या बौद्धिक अवस्थेनें मुख्यत: निश्चितपणा आलेला असतो; व मतांतील प्रत्येक मोठा पालट म्हणजे सर्वसामान्य कारणांचा परिणाम असतो; या सिद्धांतांतला अर्थ केवळ इतकाच कीं, ताजव्याचा कांटा बाजूला झुकविणारें एखादें बळकट कारण सर्व जनसमूहावर परिणाम करणारें असतें व परिणामीं तें प्रत्येक अडथळा पार दूर सारतें. मानवी सुधारणेच्या निरनिराळ्या पायऱ्या, विशिष्ट परिस्थितीमुळें उद्भवणाऱ्या विचलनशील कारणांचा प्रभाव, पुराणप्रियतेचा जोर, वैयक्तिक बुद्धिवैभवाचे प्रयत्न यांनीं असंख्य विचित्र प्रकार उत्पन्न होतात. पण लक्षपूर्वक परीक्षण करणाराला असें दिसेल कीं, हे केवळ पुढें वाहणाऱ्या जलौघांतले भोंवरे आहेत, नानाप्रकारच्या या सर्व संस्थांना हळू हळू एकाच विवक्षित दिशेनें वळण लागत आहे; व बुद्धीच्या निरनिराळ्या सर्व कक्षांत एका विशिष्टप्रकारच्या प्रवृत्ती जास्त प्रमुख होत आहेत. या प्रचंड ओघाला अडथळा करूं पाहणाऱ्या व्यक्ति असतील व त्यांवरून धर्मज्ञानपंडिताला दृढ व योग्य आलोकस्थान मिळेल; पण हे त्याचे प्रयत्न इतके विरळ व कमजोर असतात कीं, त्या सर्वसाधारण ओघावर त्यांचा परिणाम कांहीं होऊं शकत नाहीं.

## बुद्धिवैभवशाली माणसांचा अपवाद.

तथापि या शेवटच्या विधानाला एक महत्त्वाचा अपवाद आहे. तो बुद्धिवैभवाच्या माणसांतर्फेनें आहे. हीं माणसें साधारणत: प्रतिनिधीभूत तशींच उत्पादनकारणीभूत असतात. या माणसांत तत्कालीन प्रवृत्ती मूर्तस्वरूपानें वास करतात व अशीं माणसें म्हणजे तत्कालीन प्रवृत्तींच्या मूर्तीच होत; व अशा माणसांत त्या प्रवृत्ती प्रतिबिंबित असतात; पण शिवाय वारंवार त्या प्रवृत्तींत ते महत्त्वाचा फरकही करितात, आणि त्यांच्या कल्पना त्या प्रवृत्तींच्या पुढच्या वाढीचा पाया अगर विषय बनतात. प्रत्येक प्रचंड चळवळींत वैयक्तिक कारणांचा भाग कोणता व सामान्यकारणांचा भाग कोणता याचा कोणतीही बाजू जास्त खुलवून न दाखवितां छडा लावणें हें इतिहासकाराचें एक अत्यंत नाजूक काम आहे.

## इतिहासकाराहून धर्मज्ञानपंडिताचें काम साफ कमी दर्जाचें आहे.

धर्मज्ञानपंडिताच्या कक्षेपासून इतिहासकाराची कक्षा किती भिन्न आहे, हें दाखविण्यास आतांपर्यंत केलेलें विवेचन बस्स आहे, अशी खात्री वाटते. तथापि त्या दोहोंत संयोगबिंदूहि आहेत, हें कबूल केलें पाहिजे. कारण एखादें मत तयार होण्यास काय कारणें झालीं याचें आविष्करण करणें, त्या मताची स्वयंसिद्ध योग्यता काय हें थोडें तरी उघड केल्याशिवाय शक्य नसतें. असेंही आणखी कबूल केलें पाहिजे कीं, या दोन्ही कक्षा एकरूप करणारी अथवा जास्त बिनचुक बोलावयाचें तर धर्मज्ञान-पंडिताला इतिहासकाराच्याहून साफ कमी प्रतीचा मानणारी, एक शोधाची पद्धती अगर उपपत्ति आहे.

## निर्णयशक्तीला वाटाड्या लागतो.

व्यक्तींचीं अगर राष्ट्रांचीं मतें ठाम व्हावयाला निश्चित वादप्रमाणांचा किती अत्यंत अल्प उपयोग होतो, हें ज्यांना पटलें आहे, म्हणजे मानवी सुधारणेच्या वाढीनें श्रद्धेंत कसा हटकून पालट होतो. हें ज्यांच्या ध्यानांत आलें आहे; व एका मागून एक येणाऱ्या प्रत्येक काळांतलें निंदक स्वकालीन गाढ अंत:प्रवाहाच्या कलेस न जाणतां पूर्णपणें स्वाधीन होऊन त्या प्रवाहाचे निदर्शक व तो प्रवाह नाचवील तशा नाचणाऱ्या बाहुल्या होऊन राहतात, हें ज्यांला कळून चुकलें आहे, ते आपल्या एकाकी विवेचकशक्तीचा अगदीं साफ बेभरंवसा करतील व स्वाभाविकपणें आपल्या निर्णयशक्तीला कोणी वाटाड्या शोधूं लागतील.

## विवेचनाच्या या मोडीवरून निघणारे तीन प्रश्न.

इतिहासाच्या वाढींत दिसणारा जो मानवी ज्ञानसंग्रह तो वाटाड्या करण्याकडे सध्याची सामान्य वाढती प्रवृत्ती आहे, हें कबूल केलें पाहिजे असें वाटतें. हेंच पर्यायानें सांगावयाचें तर कळत वा नकळत आमचे विचारधुरीण आपलीं मतें बनवितात ती रीत अशी कीं, श्रद्धेंत एकामागून एक होणाऱ्या पालटांचें नियमन करणारे नियम कोणते, मानवी सुधारणेच्या प्रगतीबरोबर मानवी बुद्धीची प्रगती होण्याच्या दिशा कोणत्या व प्रगती होती कोणत्या कल्पनांकडे, रानटी राष्ट्र व युगें यांच्याशीं तुलना

करून पाहतां सुधारलेल्या राष्ट्रांची व युगांची आणि अगदीं निरक्षर लोकांशीं तुलना करून पाहतां अत्यंत सुशिक्षित लोकांची श्रद्धा दाखविणाऱ्या मुख्य खुणा कोणत्या, हें निश्चितपणें ठरविण्याचा ते प्रयत्न करीत असतात. विवेचनाच्या या मोडीचें पृथक्करण होऊन तीन प्रश्न निघतात, असें म्हणतां येईल. पहिल्यांदां मानवी सुधारणेच्या सामान्य बौद्धिक प्रवृत्ती कोणत्या, हें ठरविणें जरूर आहे; नंतर त्या प्रवृत्तींचा परस्पर संबंध किती म्हणजे एकीचें अस्तित्व दुसरीच्या अस्तित्वावर किती अवलंबून आहे; आणि एकीच्या अस्तित्वांत इतरांचें अस्तित्व किती व्यक्त होतें हें निश्चित केलें पाहिजे, व शेवटीं त्यांच्याबरोबर सुखाची, सद्गुणाची व परोपकारबुद्धीची वाढ होते; अगर खूट होते याचा निर्णय करणें अवश्य आहे.

## कार्यकारणाभिज्ञता म्हणजे काय ?

कार्यकारणाभिज्ञतेच्या चेतनेचा इतिहास अवलोकन करण्याचा या ग्रंथांत हेतू आहे. कार्यकारणाभिज्ञतेची चेतना या शब्दांनीं कोणत्याही एकाप्रकारचीं निश्चित मतें अगर गुणदोषविवेचनें असें समजावयाचें नाहीं, तर गेल्या तीन शतकांत युरोपांत जिला ठळक वर्चस्व प्राप्त झालेलें आहे, अशी विचाराची एक ठरीव मूस अगर विवेचकशक्तीचा एका ठराविक बाजूकडील ओढा, असें समजावयाचें. या ओढ्याचें स्वरूप या ग्रंथांत निरनिराळ्याप्रकारच्या नैतिक व बौद्धिक परिपोषांवर त्याचा कसा पगडा बसला, याचें निरीक्षण करतांना तपशीलवार दिसेल.

## या ओढ्याचा परिणाम.

सध्या इतकें सांगणें बस्स आहे कीं, या ओढ्यानें सर्व प्रसंगीं विवेचकशक्तीच्या व सदसद्बुद्धीच्या ज्ञानांहून हटवादी धर्मज्ञानाचा दर्जा कमी लेखण्याकडे व याचा अवश्यंभावि परिणाम म्हणून जीवनक्रमावरील त्या धर्मज्ञानाचा पगडा बराच संकुचित करण्याकडे मनुष्यांचा कल होतो. इतिहासाच्या बाबतींत या ओढ्यानें मनुष्यांचा कल असा होतो कीं, सर्वप्रकारच्या संघटनांचें जनकत्व अद्भुत चमत्कारांच्या माथीं न लादतां तें नसर्गिक कारणांकडे द्यावें; धर्मज्ञानाच्या बाबतींत असा कल होतो कीं, एका मागून एक होणाऱ्या धर्मसंस्था मनुष्यमात्रांत ठेविलेल्या धर्मप्रवृत्तीच्या आकांक्षा व अपेक्षा यांचा उद्गारच होत, असें मानावें;

नीतिशास्त्रांत तो कल असा बनतो कीं, सदसद्विचारबुद्धीनें जीं दिसतील त्यांलाच कर्तव्य लेखावें.

## मानसिक प्रवृत्तीचा इतिहास लिहिणें अवघड आहे.

वास्तविक घडलेल्या गोष्टींची साधी हकीकत देतांना ज्या अडचणी येतात, त्यांहून अगदीं भिन्न अशा अडचणी एखाद्या मानसिक प्रवृत्तीचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न करतांना अनुभवाव्या लागतात, हें उघड आहे. एखाद्या धर्मसंस्थेंतल्या वादप्रमाणांला सुसंगतीचें व सत्याभासाचें स्वरूप जेथून येतें, तें आलोकस्थान जर कोणाच्या कांहीं अंशीं तरी प्रचीतीस आलें नाहीं, अर्थात् त्या संस्थेंतलीं निरनिराळीं मतें संभाव्य, समतोल व सुसंगत भासविणारी विचारसरणी जर कोणाच्या थोडी तरी लक्ष्यांत आली नाहीं, तर त्याला त्या धर्मसंस्थेंतलें खरें रहस्य समजलें असें म्हणतां येणार नाहीं. तथापि सध्या चालू असलेल्या मोठमोठ्या वादविवादांतसुद्धां सनातन व प्रतिरोधीपंथांमधील तंट्यांतसद्धां फार थोड्या विवादकाना आपण ज्यावर हल्ला करितों त्या प्रतिपक्षाच्या मतांचें अशा रीतीनें रहस्य कळलें असेल.

## त्या अवघड कामाचें स्वरूप.

परंतु जेव्हां ज्या धर्मांचीं प्रतिनिधी मानतां येतील अशीं माणसें हयात नाहींत व निरनिराळ्या समाजांत असणाऱ्या संभवनीयतेचीं निरनिराळीं प्रमाणें केवळ ठरवावयाचीं नसून त्यांचीं कारणें व त्यांतील पालटसुद्धां दाखवावयाचे आहेत, तेव्हां ही अडचण फारच मोठी वाटते. आपल्यांतून बऱ्याच काळापासून लुप्त झालेले भोळसटपणाचे प्रकार उत्पन्न करणाऱ्या विचारसरणींची पुन्हां जुळवाजुळव करणें, प्रत्येक काळांत प्रचीतीस आलेली श्रद्धा वादप्रमाणांच्या कलहाहून, धर्ममतांतल्या पालटांहून जास्त निश्चित करणाऱ्या कल्पकतेच्या अंतर्गूढ झोंकांचा माग गतकाळाच्या अंधुक वाटेवर लांबवर काढीत जाणें; एखाद्या ठराविक काळांतल्या कल्पना एकवटून समताल करणाऱ्या एकरूपतेच्या अगर साम्यतेच्या तत्त्वाचें आकलन करून शास्त्रांतले नवे शोध, तत्त्वज्ञानांतल्या क्रांत्या, अगर औद्योगिक अथवा नागरिक जीवितांतले परिपोष यांनीं नवे आकर्षणबिंदू कसे उत्पन्न झाले; व साम्यतेच्या प्रेरणेला

नवीन वळण कसें लागलें हें दाखविणें; विवेचकशक्तीनें एकदां स्वाभाविकपणें व बहुतेक आपोआप स्वीकारलेले सिद्धांत विसंगत व विद्रूप दिसूं लागण्याचा काळ येईपर्यंत व बौद्धिक प्रवृत्तींचा सर्व ओघच बदलेपर्यंत तें कार्य कसें होत जातें याचा छडा लावणें; हें अवघड काम मतांतील चढ उतारांचें कथन करूनच तृप्त न राहणाऱ्या व त्या चढ उतारांचें नियमन करणाऱ्या नियमांवरही थोडा बहुत प्रकाश पाडूं पाहणाऱ्या प्रत्येक इसमावर येऊन पडतें.

## श्रद्धेचीं दोन स्वरूपें.

अशाप्रकारच्या परीक्षणांत एक मोठी अडचण येते. श्रद्धेचीं दोन स्वरूपें असतात. प्रचीतीस येणारी श्रद्धा व नुसती लोकांना दाखविण्याची श्रद्धा. या दोन स्वरूपांत महदंतर आहे; व या अंतरामुळें ती अडचण उद्भवते. जेव्हां एखादें मत त्या काळाच्या विरुद्ध असून बदलण्यासारखें नसतें व प्रगतीला अडथळा करतें; तेव्हां सरतेशेवटीं त्याचा उघड अव्हेर होतो. आणि त्याचें कांहीं प्रचलित हितसंबंधांशीं एकरूपत्व असलें अगर एखाद्या चिरंतन सत्याशीं त्याचा अनुबंध असला तर त्याच्या अव्हेराबरोबर कासाविस करणारे मनोयातनांचे झटके येतात; पण वारंवार असें घडतें कीं, मानवी सुधारणेच्या प्रगतीशीं विरोध करणारीं मतें त्या सुधारणेच्या जोरानें स्मृतिशेष होतात. त्यांचा लोप औदासिन्यामुळें होतो, वादविवादामुळें होत नाहीं.

## जीवमान धर्माच्या सभोंवतालचें अंगण.

प्रत्येक जीवमान धर्माच्या सभोंवतीं जें मंद तेजाचें अंगण असतें. त्यांत तीं जाऊन पडतात. या अंगणांत पडलीं म्हणजे तीं साफ नष्ट झालीं असें नव्हे, तर तीं मृतप्राय होऊन राहिलीं. या अंगणांत असतां त्यांची प्रचीती येत नाहीं व त्यांच्याकडून कांहीं कार्य होत नाहीं. असेंही कधीं कधीं आढळतें कीं, मानवी सुधारणेंत जरूर लागली म्हणून एखादी मतपद्धति सुरू झाली आहे; व त्या सुधारणेच्या जोमानें ती जिवंत आहे; पण त्या पद्धतीशीं एखाद्या बऱ्याच काळापूर्वीं लुप्त झालेल्या श्रद्धेंतले शब्द, विधि, व तंत्र हीं जोडून दिलेलीं आहेत. याचें सादृश्य प्राचीन इथियोपियांतील लोकांतील एका चालीशीं आहे. हे लोक आपल्या मृत

पूर्वजांचीं चित्रें आपल्या आंगांवर रंगवीत. त्याचा हेतु हा कीं, जणूं काय ज्यांचें चित्र अजून आपल्या आंगावर दिसत आहे; व अतएव ज्यांचा जीविताशीं संबंध आहे ते खरोखर मेले नाहींत, ही गोड फसवणूक कायम राहावी. ह्या पालटाचें रहस्य कळण्यासाठीं या मतांचें कृत्यांत रूपांतर करणें जरूर आहे. पूर्णपणें प्रचीतीस उतरल्यास त्यांचा काय परिणाम होईल याचें निरीक्षण केलें पाहिजे; व तसा परिणाम खरोखर किती झाला आहे, हें ठरविणें अवश्य आहे. म्हणून श्रद्धांचें अनुक्रमानें नुसतें परीक्षण करणेंच जरूर आहे असें नव्हे तर आणखी एका मागून एक येणाऱ्या काळांच्या स्वरूपाच्या नमुन्याचें परिशीलन केलें पाहिजे.

## या ग्रंथांत योजिलेली पद्धत.

ही प्रस्तावना पुरी करण्यापूर्वीं एकच काम करावयाचें आहे. मतांवर कार्यकारणाभिज्ञतेच्या चेतनेच्या झालेल्या परिणामाचा छडा लावण्याची कोणती पद्धत या ग्रंथांत योजिली आहे ती सांगावयाची आहे. प्रथमतः मानवी सुधारणेचें उघड दिसणारें फळ, अद्भुत चमत्कारांवरील विश्वासास लागलेली उतरती कळा, तिचीं कारणें व इतिहास पाहिला आहे; पण याच चळवळीचें एकटीचेंच विवेचन करणें अशक्य होय, असें लवकरच समजून येतें. बौद्धिक परिपोषाची तळची पायरी अगर जिला मानवाकार मूर्तिकरणाची पायरी असें म्हणतां येईल त्या पायरीवर असतां मनुष्याच्या ईश्वरस्वरूपाविषयींच्या व विश्वाच्या नित्य नियमाविषयींच्या कांहीं विशिष्ट कल्पना असतात, त्यांनींच चमत्कारानुकूल पूर्वग्रहांचा उगम होतो व त्याचा बरोबर उलगडा होतो. या पायरीच्या स्वरूपाची कांहीं महत्त्वाची साक्ष कलेच्या इतिहासांत मिळते. कला म्हणजे तत्कालीन धार्मिक प्रचीतीचा बहुधा अत्यंत बिनचूक उद्गारच होय. आणि या पायरीचा ऱ्हास विश्वरचनेच्या आमच्या पहिल्या कल्पनांवर जडशास्त्रांनें जो कब्जा मिळविला त्याच्या इतिहासामुळें बराच लक्ष्यांत येतो. बौद्धिक प्रगती बरोबर होणाऱ्या नैतिक प्रगतीचा पण विचार करावा लागतो. या नैतिक प्रगतीचा परिणाम असा होतो कीं, कर्तव्यहेतू म्हणून जो भीतीचा प्रभाव प्रथम असतो तो कमी होतो, हटवादी धर्मोपदेशाचें पूर्वीं असणारें अपरंपार महत्त्व नष्ट होतें व सदसद्विचाराचें वर्चस्व प्रस्थापित होतें. या प्रगतींत पुष्कळ महत्त्वाचे परिणाम अंतर्भूत असतात; पण त्यांतील

अत्यंत ठळक म्हणजे छळाचा ऱ्हास हा होय. या ऱ्हासाचा धर्मज्ञानाच्या प्रचीतील मोठ्या पालटाशीं अत्यंत निकट संबंध आहे, असें दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. सरतेशेवटीं कार्यकारणाभिज्ञतेच्या चेतनेचा व्यापार राजकारण व उद्यम यांच्याही अफाट क्षेत्रांत चालू आहे, असा ताजा पुरावा गोळा करण्याची खटपट केलेली आहे. राजकारणाच्या प्रत्येक शाखेंतून धर्माचें घोडें हांकून लावण्याची चळवळ कशी वाढत चालली आहे, लोकसत्तेच्या प्रगतीचा धर्मज्ञानप्रवृत्तींचा परस्परांवर कसा पगडा बसला आहे, व राजकारणांतील प्रयत्नांमुळें विचारसरणी बनण्यास कशी मदत होते, व त्या विचारसरणीमुळें आमच्या निर्णयशक्तीच्या सर्व कक्षेंत कसा फरक होतो; हें पहिल्यांत म्हणजे राजकारणक्षेत्रांत दाखविलें आहे. दुसऱ्यांत म्हणजे उद्यमक्षेत्रांत युरोपांतल्या औद्योगिक चेतनेच्या उदयाचा छडा लाविला आहे, तिचा धर्माशीं कलह दाखविला आहे. तिच्यामुळें झालेले विलास, बौद्धिक व नैतिक पालट सांगितले आहेत व उद्योगांचें उद्धारभूत जें सांपत्तिक शास्त्र त्याची प्रवृत्ती दर्शविली आहे.

## कामाचें महत्त्व व ग्रंथकर्त्याचें स्वतःविषयीं विनयशील मत.

या सर्व विषयांचें हा ग्रंथ म्हणजे फार फार झालें तर एक भिकार टांचण आहे; व या विषयाचें यथायोग्य विवेचन करावयाला जी विद्वत्ता व जें सामर्थ्य पाहिजे तें आंगीं आहे, अशी घमेंड मीं बाळगूं शकत नाहीं, हें पूर्णपणें मीं जाणून आहें. कारणांच्या लांब सांखळींतील एखादा विस्मरणानें गळलेला दवा ओळखून काढल्याचें अगर मतमतांतराच्या इतिहासांतील काळोखांत कुजत पडलेल्या कांहीं पानांवर प्रकाशाचा एखादा किरण पाडल्याचें श्रेय मला मिळालें म्हणजे मला धन्यता वाटेल.

अ. क्र. ९०८५५ १८

# युरोपमध्यें कार्यकारणवादाचा उदय व प्रभाव.

## प्रकरण १ लें.

## अद्भूत चमत्कारांवरील विश्वासाचा ऱ्हास.

### जादूटोणा व चेटुक.

#### पूर्वीची व सांप्रतची स्थिति.

( क० १ ) गेल्या तीनशें वर्षांच्या व त्याच्या पूर्वीच्या इतिहासाकडे पाहिलें, तर गेल्या तीनशें वर्षांत पुष्कळ बाबतींत फरक झालेले आढळतील; तथापि त्यांपैकीं एका बाबतींत मात्र ज्यास्त लक्ष्यांत भरण्यासारखा व जिज्ञासा उत्पन्न करणारा फरक झाला आहे. ही बाबत म्हणजे अद्भूत चमत्कारांविषयीं लोकांना वाटणारें महत्त्व ही होय. सध्यां बहुतेक सुशिक्षित माणसांची अशी स्थिति आहे कीं, आपल्याच काळांत घडलेल्या एकाद्या अद्भूत चमत्काराची हकीकत जर कोणीं त्यांस सांगितली, तर हीं माणसें सांगणाराची टर उडवतील; त्यावर बिलकुल विश्वास ठेविणार नाहींत व साक्षी-पुरावा पहात बसण्याची त्यांना गरजच वाटणार नाहीं. एकाद्या घडलेल्या गोष्टीच्या कारणाविषयीं समाधान होण्यासारखा उलगडा या सुशिक्षितांना बिलकुल करितां यावयाचा नाहीं; तरी तेवढ्यामुळें ती गोष्ट अलौकिक सामर्थ्यानें घडली, असें तीं कधींही स्वप्नांत सुद्धां म्हणावयाचीं नाहींत. कारण अशी कल्पना करणें म्हणजेच त्यांच्या मतें वादविवादाची

विचारशुद्ध मर्यादा साफ सोडून पलीकडे जाणें होय. तथापि थोड्याच शतकांपूर्वी जरा मति गुंग करणारा प्रश्न आला, कीं माणसाचें मन अलौकिक सामर्थ्याच्या कल्पनेशिवाय इतर कोणत्याही उलगड्याकडे ज्यास्त सहजीं वळत नसे. त्याकाळीं अद्‌भूत चमत्काराची हकीकत म्हणजे पूर्णपणें विश्वास ठेवण्यासारखी, अगदीं शक्य व केवळ रोजच्या परिपाठांतली असें सर्वत्र मानीत. असें गांव किंवा देऊळ क्वचित्‌च सांपडावयाचें कीं, जें केव्हांना केव्हां तरी अलौकिक सामर्थ्याच्या नाटकाची रंगभूमि झालें नव्हतें. दैवी व आसुरी शक्ति परस्पर विजयासाठीं प्रत्यक्ष झगडत आहेत, असें त्या काळीं मानीत. भगवद्भक्तांनीं केलेले चमत्कार, रोग बरे करण्याचे अलौकिक उपाय, मन चकित करून टाकणारे खटल्यांचे निवाडे, दृष्टांत, भाकितें आणि हरतऱ्हेच्या विलक्षण गोष्टी यांनीं एका पक्षाची हालचाल व्यक्त होत असे. तसेंच चेटुक, जादूटोणा व तदनुषंगिक भयंकर प्रकार यांनीं दुसऱ्या पक्षाचें स्वरूप दृश्य होत असे.

## बायबलांत चेटकाचा पुरावा.

चेटुक, जादूटोणा, भुताटकी वगैरे नाना नांवांखालीं मोडणाऱ्या अद्भूत गोष्टींच्या भांडाराचें चालू प्रकरणांत परीक्षण करण्याचें योजिलें आहे. मत-मतान्तराच्या इतिहासांत या विषयाला योग्य तें स्थळ क्वचित्‌च मिळालें आहेसें वाटतें. असें होण्याचें कारण हें कीं, हा विषय म्हणजे जणूं काय प्राक्कालीन आहे, वर्तमानकाळच्या वादांत त्याचा बिलकुल संबंध नाहीं, व त्याला अगदीं मान नाहीं, अशा समजुतीनें प्राचीन-वस्तु-संशोधक-दृष्टीनें त्याचें फारच सामान्यपणें विवेचन झालेलें आहे. तथापि पंधराशेंपेक्षां ज्यास्त वर्षें असा सार्वत्रिक समज होता कीं, बायबलांत चेटकाचा खरेपणा म्हणजे चेटुक म्हणून कांहीं शक्ति खरोखरीच आहे; अर्थात् या दुराचाराला खरोखर अस्तित्व आहे; असें स्पष्टपणें शाबित केलें आहे. आणि हा दुराचार जगांत जारीनें चालू आहे, याबद्दल इतका विपुल व तऱ्हतऱ्हेचा पुरावा आहे कीं, त्याविषयीं संशयाच्या छायेला सुद्धां वाव नाहीं. धर्मोपदेशक तर शास्त्राधाराच्या जोरावर त्याचा निषेध करीत. बहुतेक देशांतल्या कायद्यांत तो गुन्हा समजून त्याबद्दल शिक्षा ठरविलेल्या असत. पुराव्याची छाननी करण्यांत ज्यांचें सगळें आयुष्य

गेलें, अशा न्यायनिष्णात न्यायाधिशांनीं अमितप्रसंगीं या प्रश्नाची चौकशी करून आरोपितास दोषी ठरविलें आहे. हजारों माणसें या गुन्ह्याच्या आरोपावरून अधिकाऱ्यांच्या हातून विह्वल करणाऱ्या हाल-अपेष्टा दीर्घकाल सोसून प्राणांस मुकलीं आहेत; पण त्याबद्दल कोणालाही यत्किंचित् द्रव आला नाहीं. हीं जीं हजारों माणसें बळी पडलीं, तीं बहुतेक अगदीं अज्ञान व दरिद्री वर्गांतली होतीं; यावरून अमुक एखाद्या धर्मपंथाच्या हटवादीपणामुळें अगर द्रव्यलोभामुळें हे बळी घेतले असतील, असें क्वचित्च (१) म्हणवतें. स्थितीनें, हितसंबंधांनीं, न्याय-नीतीच्या कल्पनांनीं, अगदीं अलग असूनही या एका बाबतींत मात्र पुष्कळ राष्ट्रांचें ऐक्य व साम्य होतें.

## चेटुक करणारांचा छळ.

जर्मनींत बहुतकरून प्रत्येक प्रांतीं, पण मुख्यतः जेथें धर्मोपदेशकांचें विशेष प्राबल्य होतें, तेथें चेटुक करणाऱ्यांचा छळ कांहीं भयंकर रीतीनें होई. ट्रेव्हस् प्रांतांत सात हजार माणसें उभीं जाळलीं; बाम्बर्ग येथें एका धर्मोपाध्यक्षानें एकट्यानें सहाशें माणसांना ती शिक्षा दिली; आणि वुर्टझ्बर्गच्या धर्मोपाध्यक्षाच्या हद्दींत एका वर्षांतच नऊशें बळी (२) पडलीं. फ्रान्सांत पारीस, तुलूस, ऱ्हीम्स, रुआन्, बोर्दो, दिजान् व रेन्स येथल्या राजसभांत या बाबतींत कायदे होऊन तदनुसार रक्ताच्या नद्या वाहल्या. सनातन पंथाचें पाखंड्यांस शिक्षा देण्याचें न्यायासन तुलूस येथें भरत असे; तेथें एकदां एका बैठकीस चेटकाच्या आरोपावरून चारशें माणसें मारलीं गेलीं, व दुए येथें एका वर्षांत पन्नास मारलीं गेलीं. नान्सी येथील न्यायाधीश रेमी हा मोठ्या डौलानें सांगत असे कीं, सोळा वर्षांत मीं आठशें चेटक्यांना देहान्त-शासन दिलें आहे. एका प्राचीन लेखकानें पारीस शहरीं थोडया महिन्यांच्या अवधींत जवळ जवळ (३) अगणित देहान्त-शिक्षा दिल्या गेल्या, असें जोरानें म्हटलें आहे. जे कोणी पळून स्पेन देशांत जात-त्यांना तेथें पकडीत आणि पाखंड-न्यायासन त्यांना जाळण्याची शिक्षा देई. या देशांत छळाची लाट अगदीं लहान लहान गांवांतही पोंचली होती. लोकांच्या मनोभूमींत या विश्वासाचीं मूळें इतकीं खोल गेलीं होतीं कीं, इ० स० १७८० इतक्या अलीकडे

एका चेटक्याला जाळलें. तार्किमेदानें पाखंडाइतकाच चेटकाचा कळकळीनें उच्छेद करण्याच्या कामीं स्वतःला वाहून घेतलें होतें; व त्यानें या गुन्ह्याच्या (४) अमर्याद वाढीविषयीं एक ग्रंथ लिहिला. फ्लांदर्समध्यें सोळाव्या व बहुतेक सतराव्याहि शतकांत चेटक्यांच्या छळाला सारखा ऊत आला होता; व गुन्हेगाराचा तपास लावण्याकरितां नानाप्रकारें हाल करीत (५) असत. इताली देशांत कोमोप्रांतीं एका वर्षांत एक हजार लोक मारले गेले; व इतर प्रांतीं तर पाखंड-न्यायासनाच्या कडकपणामुळें लोकांनीं शेवटीं अगदीं बंड (६) केलें. स्वित्झर्लंद व सव्हाय प्रांतांतल्या भयाण दऱ्याखोऱ्यांतहि अशींच कृत्यें चाललीं होतीं. जिनिवा शहरीं त्या काळीं धर्मोपाध्यक्षाचा अंमल असे; तेथें तीन महिन्यांच्या अवधींत चेटक्या बाया म्हणून पांचशें माणसें मारलीं. कान्स्तन्स अथवा राव्हेन्सवर्ग येथें अठ्ठेचाळीस व सव्हायमधल्या व्हालेरी नांवाच्या लहानशा शहरीं ऐंशीं माणसें जाळून (७) मारलीं. (८) स्वीदन देशांत इ० स० १६७० सालीं सत्तर आरोपींना शिक्षा दिल्या, व त्यांपैकीं बहुतेकांस जाळन मारिलें. बहुतेक प्रत्येक देशांत कित्येक शतकेंपर्यंत उग्रपणा यत्किंचित् कमी न होतां चालू राहिलेल्या चेटक्यांच्या छळाचीं केवळ मासल्यादाखल म्हणून हीं थोडीं ठळक ठळक उदाहरणें दिलीं आहेत.

## चेटक्यांस रोमच्या धर्मसंस्थेचा अडथळा.

रोमच्या धर्मसंस्थेनें आपल्या हातीं होतें नव्हतें तेवढें करून हा दुराचार खरोखरच अस्तित्वांत आला आहे, काल्पनिक नव्हे; व तो एकसारखा चालत आहे; असें जगजाहिर केलें. चेटुक करणाऱ्यांचा छळ जोरानें चालू रहावा, म्हणून त्या संस्थेनें जंग जंग पछाडलें. त्या संस्थेनें सर्वतोमुखीं उपदेश चालविला होता कीं, चेटुक करणाराची गय करणें म्हणजे प्रत्यक्ष सर्वशक्तिमान् परमेश्वराचा अवमान करणें होय. या संबंधांत जो एवढा रक्तस्राव झाला, त्या बहुतेकाला या पंथाचेच अविरत श्रम कारण होत. इ० स० १४८४ त आठव्या इन्नोसेन्त नांवाच्या पोपाचार्यानें एक आज्ञापत्र काढून या छळाला भयंकर उत्तेजन दिलें. पाखंड न्यायासनांत स्प्रेंजरची नेमणूक याच आचार्यानें केली. या न्यायाधीशानें प्रतिवर्षी शेंकडों लोकांस देहान्त-शासन दिलें, असें म्हणतात;

व याचें पुस्तक या विषयावरचा प्रमाणग्रंथ म्हणून पुष्कळ दिवस मानिलें जात असे. तसेंच दुसऱ्या ज्यूलियसनें इ० स० १५०४ त व सहाव्या एंड्रियननें इ० स० १५२३ त अशींच आज्ञापत्रें काढिलीं होतीं. चेटुक हा दुराचार चालू आहे, असें विधान करून चेटकाशीं संबंध ठेवणाऱ्यांना कित्येक प्रांतिक धर्मपरिषदांनीं शाप दिले. जादू, चेटुक, वगैरेची चौकशी मुद्दाम निराळी करण्याचा धर्मसंस्थेचा सार्वत्रिक परिपाठ असे, आणि फ्रान्स येथें तर चेटक्ये, जादूगार वगैरेस बहिष्कृत (९) करीत. तसेंच धर्मसंस्कारांच्या विधींत भूतप्रतिबंधक म्हणून एक नवीनच मंत्र गंभीरपणें घातला. चेटुक वगैरे करणारास देहान्त–शासनच दिलें पाहिजे, अशाबद्दलचे जे मोठमोठे ग्रंथ झाले, ते बहुतेक धर्माधिकाऱ्यांनींच लिहिले होते. धर्माधिकारविहीन गृहस्थांनीं लिहिलेले बहुतेक सर्व ग्रंथ धर्माधिकाऱ्यांला अर्पण केलेले असत व त्यांची त्यांना अनुमति मिळालेली असे. धर्मसंबंधीं न्यायासनांनीं हजारों माणसांनां देहान्त–शिक्षा दिल्या; व अपराध्यांची संख्या फुगविण्याकरितां असंख्य धर्मोपाध्यक्षांनीं आपल्या सगळ्या वजनाचा उपयोग केला. सारांश, पुष्कळ शतकें असा सार्वत्रिक समज होता कीं, चेटुक वगैरे प्रकार चालू आहेत असें सांगणें, हा धार्मिक उपदेशांतला ऐक महत्त्वाचा भाग होय व सर्व युरोपभर चेटुक वगैरे करणारांचा जो जारीनें छळ चालू राहिला, त्याला धर्माची कधीं चूक व्हावयाची (१०) नाहीं या समजुतीचा जोरदार पाठिंबा होता.

## धर्मसुधारकांचा चेटकावर विश्वास.

या विषयासंबंधानें रोमच्या धर्माच्या गादीची अशी वर सांगितलेली दृष्टि होती; पण यांचा व याच्या विरुद्धपक्षाचा म्हणजे धर्मसुधारकांचा या बाबतींत मुळींच तंटा नव्हता. भुतांखेतांच्या गोष्टींवर लूथरचा जो विश्वास दिसत होता, तो त्या काळच्या मानानें सुद्धां विस्मय वाटण्यासारखा होता; आणि चेटकाविषयीं लूथर जेव्हां कधीं बोलत असे, तेव्हां त्याचे शब्द जोराचे व ठाम असत. एकदां त्यानें असे उद्गार काढिले होते कीं, ' मला या चेटक्यांची रतिभरही कींव येत नाहीं, त्यांना सर्वांना (११) जाळून टाकावें, असें मला वाटतें.' इंग्लंदांत सुधारलेल्या धर्माची प्रस्थापना झाल्याबरोबर या वेडगळ समजुतीला एक प्रकारचा

ऊतच आला; आणि इतर देशांतल्याप्रमाणें येथेंही या वेडगळ समजुतीचा ऱ्हास होत चालला; तेव्हां तें धार्मिक संदिग्धमतित्वाच्या अगदीं प्रसाराचेंच प्रत्यक्ष फळ व तंतोतंत माप आहे असें धर्माधिकाऱ्यांनीं भासविलें. इतर देशांतल्यापेक्षां स्कातलंदांत या सुधारलेल्या धर्मपंथाच्या धर्माधिकाऱ्यांचें वजन विशेष असे; आणि तेथें चेटुक करणाऱ्यांच्या चौकशीचें काम बहुतेक सर्वस्वी त्यांचे हातीं असे; म्हणून तेथें चेटुक करणाऱ्यांचा छळही त्या मानानें विशेष भयंकरच झाला. चेटकाविषयींची लोकांची समजूत योग्य आहे, असें चांगलें समर्पक रीतीनें मंडन करणारा बहुधा ग्लान्व्हिल होय; हा इंग्लंदच्या धर्मखात्यांतला एक अधिकारी होता, आणखी या समजुतीचें समर्थन करणाऱ्यांत फार वजनदार असा एक शुद्धमताभिमानी पंथाचा ब्याक्स्तर म्हणून फार थोर गृहस्थ होता. ह्या शुद्धमताभिमानी पंथाचे लोक जेव्हां नवीन महाद्वीपांत म्हणजे अमेरिकेंत गेले, तेव्हां त्यांच्याबरोबर ही चेटकाविषयींची समजूतही तेथें गेली; व मासाचुसेत्स संस्थानांत जे चेटक्यांचे बळी पडले, त्यांचें वर्णन अमेरिकेच्या इतिहासास काळिमा आणणारें आहे. गेल्या शतकांत धार्मिकबाबतींत लोकनायकत्व प्राप्त झालेला थोर गृहस्थ वेस्ले हा या समजुतीच्या अगदीं अलीकडच्या पुरस्कर्त्यांपैकीं होय.

## चेटकावरील विश्वास कसा उडाला ?

जी समजूत एकाकाळीं सर्वत्र पसरली होती, व जिच्याबद्दल लोकांचा दृढ विश्वास होता, तीच समजूत आतां पार नाहींशी कशी झाली ? एखादी जख्खड बाई केरसुणीच्या दांडयावर बसून घोडयावर बसल्याप्रमाणें रपेट करिते अगर लांडग्याचें रूप घेऊन आपल्या शेजाऱ्यांचे मेंढरांच्या कळपांचा खाऊन फडशा उडविते, असल्या गोष्टींवरचा विश्वास साफ उडाला कसा ? असा जर प्रश्न केला, तर त्याचें निश्चयात्मक उत्तर पुष्कळांस बहुधा देतां यावयाचें नाहीं. या गोष्टींच्या खरेखोटेपणाबद्दल पुरावा तपासून पहातां विश्वास पटण्याइतका भक्कम तो मिळाला नाहीं, म्हणून हा विश्वास उडाला असें नव्हे; कां कीं, कोणत्याही गोष्टीचा खरे-खोटेपणा पहाण्याची बुद्धि उत्पन्न होण्यास अगोदर त्या गोष्टीवरचा विश्वास ढळावा लागतो. मात्र विश्वास साफ उडून बेभरंवसा होतां कामा नये. कारण बेभरंवशानें

खरे-खोटेपणा पहावयाची बुद्धिच व्हावयाची नाहीं. विश्वास उडण्याचें कारण कदाचित् असें असावें कीं, असल्या हकीकती म्हणजे खुळेपणाचा बाजार, ही समजूत इतकी दृढ झाली कीं, त्या गोष्टी भारदस्तपणें मनावर घेणें सुद्धां कठीण वाटूं लागलें. तथापि एका काळीं असल्या हकीकतींत कांहीं असंभाव्य आहे, असें वाटत नसे; आणि मागें सांगितलेल्या दोन मुद्यांवरच शेंकडों माणसांना जाळण्यांत आलें.

## मत-क्रान्तीचीं कारणें.

जेव्हां एकाद्या राष्ट्रांतील लोकांत अशी विलक्षण मत-क्रांति होते, तेव्हां ती पुढील दोहोंपैकीं कोणत्या तरी एका कारणानें होत असावी. एकाद्या प्रश्नाविषयीं एकदां शक्य ती भवति न भवति होऊन सर्व पक्षांचें पूर्णपणें समाधान होण्यासारखीं भक्कम प्रमाणें अथवा वास्तविक-स्थितीचीं उदाहरणें एका पक्षाकडून पुढें येऊन त्याचें म्हणणें कायम ठरतें; आणि पूर्वीचें मत पालटतें; व सर्व सुशिक्षित लोक तोच सिद्धान्त म्हणून समजतात;—मग त्याचीं आधारभूत प्रमाणें त्यांनीं जातीनें तपासून पाहिलीं असोत वा नसोत.— समजा कीं, साधारण सुशिक्षित मंडळींत कोणीं एकानें पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरत नाहीं, अगर आपल्या अंगांत रक्ताचें अभिसरण होत नाहीं, असें म्हटलें; तर लगेच त्याची काय फजिती होईल म्हणतां ! तथापि तेथें असलेल्यांपैकीं कांहीं तरी लोक असे सांपडण्याचा संभव आहे कीं, त्यांना पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरते हें सिद्ध करितां येणार नाहीं; आणि रुधिराभिसरण होत असतें, हें सिद्ध करावयाला अवश्य तीं प्रमाणें फारच थोड्यांना देतां येतील. तथापि उलट बोलणाऱ्याची फजिती टळेल काय ? नाहींच; कारण, हंसणाऱ्यांना आपलें मत सिद्ध करून दाखवितां आलें नाहीं, तरी त्यांना माहीत असतें कीं, अमुक एका काळीं या प्रश्नाबद्दल पूर्ण चर्चा होऊन नामांकित लेखकांनीं त्यावेळीं कांहीं खात्री होण्याजोगीं प्रमाणें व प्रयोग दाखवून त्यांचा साफ निकाल लाविला आहे; आणि त्यामुळें सर्व सुशिक्षित लोक तोच सिद्धान्त, असें घेऊन चालतात; त्यांत कांहीं व्यंग राहिलें आहे, असें मानीत नाहींत. दुसरें मत-क्रांतीचें कारण म्हटलें म्हणजे ज्याला आपण कालमाहात्म्य म्हणतों तें. कोणत्याही काळीं जे ग्रंथ निर्माण होतात, त्यांत जो विचाराचा सर्वसाधारण कल असतो, त्यायोगें एकंदर

जनसमूहाच्या मनावर जमीन-अस्मानाचा फरक करणारा परिणाम होतो. तत्कालीन ग्रंथांच्या परिशीलनानें लोकमताला नवीन वळण व दिशा लागते. या वाङ्मयानें संभाव्यतेचें माप बदलतें; नवीन आवडी-निवडी अगर राग-द्वेष उत्पन्न होतात; आणि परिणामीं कांहीं जुन्या मतांबद्दल इतका पक्का तिटकारा उत्पन्न होतो कीं, जणूं काय मुद्देसूत व खात्री पटविण्यासारख्या प्रमाणांनीं तीं त्याज्य म्हणून ठरलीं आहेत.

## मानवी सुधारणेनेंच मत-क्रान्ति.

युरोपांत चेटकावरचा विश्वास उडाला, हा वर सांगितल्यापैकीं दुसऱ्या कारणाचा प्रभाव होय; नवीन शोध अगर निर्णायक प्रमाण-परंपरा यांचा तो परिणाम नव्हे; तर केवळ न कळत, हळूहळू, पण विलक्षण पालट करणारें जें लोकांच्या विचारसरणीला वळण लागलें, त्याचा तो परिणाम होय; एवंच तो मानवी सुधारणेच्या प्रगतीचा, तिनें लोकमताला लागलेल्या वळणाचा, परिणाम; असें जो कोणी या प्रश्नाचा निष्पक्षपातानें विचार करील, त्याला उघड दिसलें पाहिजे. चेटकावरचा विश्वास उडूं लागल्यापासून काय काय नवीन प्रमाणें सांपडलीं आहेत, असें जर विचारलें, तर कबूल केलें पाहिजे कीं, एवढें मतान्तर करण्यास तीं बिलकूल अपुरीं आहेत. हाल-अपेष्टा भोगतांना दिलेल्या कबुली जबाबांचें असमाधानकारक स्वरूप, कधीं कधीं उघडकीस आलेलीं तोतयेपणाचीं उदाहरणें, आरोप करणाऱ्यांच्या मनांतला मूळचा द्वेषभाव, याबद्दल जें काय आतां आपणांस म्हणतां येईल, तेंच मध्ययुगाच्या गाढ अज्ञान तिमिराच्या काळांतही म्हणतां आलें असतें. ज्ञानाची व ग्रंथसमूहाची वाढ झाल्यानें या सहज समजण्यासारख्या प्रमाणांत आणखी कांहीं भर पडली असेल असें नाहीं. पुराव्यावरूनच या प्रश्नाचा निकाल लावावयाचा असेल, तर ज्या काळीं चेटुक केल्याच्या पुष्कळ गोष्टी घडत असत आणि रावापासून रंकापर्यंत, पंडितापासून मूर्खापर्यंत, सर्व दर्जाचे लोक त्यांत मन घालीत असत, त्या कालचे लोक आमच्याप्रमाणेंच त्याचा निकाल लावावयाला निखालस योग्य असले पाहिजेत. चेटकाचे आरोप होण्याचेंच जें हळू हळू बंद पडलें, तें संदिग्धमतित्वाचें फळ होय; कारण नव्हे. या विषयावर लिहिणाऱ्या कांहीं लेखकांच्या खाजगी मतांवर वैद्यकीय ज्ञानाच्या प्रसारामुळें बराच

परिणाम झाला असेल; पण एकंदर जनतेच्या मनावर तसा कधीं परिणाम घडला नव्हता किंवा वैद्यकीय ज्ञान हें या वादांतील संग्रामाची भूमि कधींहि झालें नाहीं. खरोखर ' वेड ' या विषयाची मीमांसा करण्याचें मुख्य श्रेय पिनेलला आहे; पण पिनेलनें आपले लेखही वेडगळ समजूत पार नाहींशी झाल्यावर बऱ्याच उशीरानें लिहिले; आणि जरी चेटुक हा एक रोग आहे असें मानलें गेलें असतें, तरी देखील त्यामुळें त्यांतला सैतानाचा संबंध त्या काळीं नाहींसा झाला नसता; कारण तो काळच असा होता कीं, त्यांत जरा विलक्षण रोग वाटला कीं, तो अमानुष सामर्थ्याचा परिणाम समजत असत; आणि धर्मज्ञानपंडितही असें प्रतिपादित कीं, सैतान सुद्धां पुष्कळदां सृष्टिनियमास अनुसरून कार्य करितो. जादूविरुद्ध जे कायदे होते, ते रद्द करावे असें म्हणणाऱ्यांचा एका गोष्टीवर फार कटाक्ष असे; ती गोष्ट या प्रश्नावर जो कडाक्याचा व सर्वांचें लक्ष वेधणारा वाद झाला, त्यांत खरोखर उघडकीस आली. ती गोष्ट ही कीं लेव्हिटिकस (म्ह० जुन्या कराराचें तिसरें पुस्तक ) मध्यें ज्या शिक्षा सांगितल्या आहेत, त्यांत ' वुइच् ' (म्ह० चेटुक करणारी) असें ज्या शब्दाचें भाषान्तर केलें आहे, त्याचें भाषान्तर (१२) 'पायझनर' (म्ह० विष घालणारा–री) असें केलें पाहिजे.

## चेटुक म्हणजे खूळ असें लोकांस आपोआपच कळूं लागलें.

तथापि केवळ याच गोष्टीमुळें एवढें मतान्तर झालें असें म्हणतां येणार नाहीं, हें उघड आहे. जादूटोण्याच्या प्रकारांविषयीं जो अचाट भक्कम पुरावा मिळे व ज्यामुळें चेटकाविषयीं संशयाच्या छायेलासुद्धां वाव रहात नाहीं, असा एकदां समज असे; त्या पुराव्यावर वर सांगितलेल्या भाषान्तराच्या चुकीसंबंधीं नव्या शोधानें कांहीं परिणाम होण्यासारखा नाहीं. चेटकावर ज्यांचा विश्वास होता, ते आपलीं सर्व प्रमाणें सोडून निघाल्यावर प्रतिपक्षाला निरुत्तर करण्याकरितां ' एंदोर ' च्या चेटकीच्या व नव्या करारांतील भुतांनीं पछाडलेल्यांच्या ज्या गोष्टी मोठ्या प्रौढीनें सांगत, त्यांना या नव्या शोधानें किंचित्‌ही बाधा होण्यासारखी नाहीं. घटकाभर आपण मानूं कीं, चेटुक करणाऱ्या म्हणून कोणी बाया खरोखरीच होत्या; आणखी असेंही मानूं कीं, भुतें, वेताळ वगैरेच्या साह्यानें आपल्या शेजाऱ्यांवर नानाप्रकारचीं संकटें आणण्याचा उद्योग खरोखरीच

त्या सतत चालवीत, आणि असे कावे केल्यामुळें असंख्य प्राणांची हानि होत असे; असें मानलें, तर मग या बायांना देहान्त-शासन दिलेंच पाहिजे ही गोष्ट सहजीं, ओघानें, निःसंशय आली; मग त्याला धर्मशास्त्राची स्पष्ट आज्ञा असो वा नसो. खरें पाहिलें तर जादूटोणा म्हणून कांहीं आहे असें वाटण्याला धर्मशास्त्रांत जो आधार आहे, त्याविरुद्ध एक ब्रही निघूं लागला नव्हता, तोंच आधीं जादूटोण्यावरचा विश्वास साफ उडाला होता. भुतें-खेतें, जादू-टोणा, चेटुक वगैरेबद्दल अविश्वास म्हणजे सतराव्या शतकांत संदिग्धमतित्वाची एक मुख्य खूणच झाली होती. प्रथम प्रथम हा अविश्वास आपणांस उघडपणें अनिर्बंध-विचारी असें म्हणवून घेणाऱ्यांमध्येंच विशेष होता; परंतु हळूहळू त्यांचें क्षेत्र वाढत गेलें व त्यांत बहुतेक सर्व सुशिक्षितांचा समावेश होऊं लागला. मात्र बरेच धर्मोपदेशक त्या क्षेत्राबाहेर राहिले. तथापि ही प्रगति कोणाच्या मुद्दाम केलेल्या खटपटीनें झाली नाहीं. ही प्रगति एकाद्या मोठ्या प्रमाणग्रंथानें अगर नांवाजलेल्या लेखकाच्या लेखानें झाली असें नाहीं. एकपक्षीय प्रमाणांची वादांत उलट पक्षावर सरशी झाल्याचाही हा परिणाम नव्हे. तर उलट, हें प्रगमन मुख्यत्वेंकरून न बोलतां, न चालतां, ऊहापोह न होतां, नकळत झालें; चेटकावरचा लोकांचा विश्वास हळू हळू उडत गेला. कां ? तर त्यांना हें सर्व खूळ आहे असें हळुहळु वाटूं लागलें. आणि विचाराची ही नवीन सरणी प्रथमतः धर्मज्ञानाचा ज्यांस गंध नाहीं, अशा लोकांत दृष्टीस पडली, व तेथून लवकरच सर्व सुशिक्षित पण धर्माधिकारविहीन लोकांत पसरली; आणि सरते शेवटीं ती धर्मोपदेशकांमध्यें आली. याहून कोणतीही गोष्ट चेटकावरील वाङ्मयांत ज्यास्त स्पष्टपणें प्रस्थापित झालेली नाहीं.

### भीतिमूलक धर्मतत्त्वांमुळें चेटकाच्या कल्पनेचा उद्भव.

(क० २) ज्या धर्माचा पाया बहुतांशीं भयानकतेवर रचिलेला असतो, आणि ज्यांत भुतां-राक्षसांच्या पराक्रमांचें व मनुष्याच्या दैन्यावस्थेचें चित्र भयाण व ठसठशीत रंगांनीं वठविलेलें असतें, अशा धर्माची सत्यता लोकांच्या मनावर तीव्रपणें बिंबली, तर त्यायोगें चेटुक, जादूटोणा असल्या गोष्टींवर विश्वास उपजेल, हें अढळ सत्य होय; असें म्हणावयास कांहीं हरकत नाहीं असें वाटतें. असल्या धर्मातील उपदेशानें जें भय

ग्रं. २००५ ९०८५५

उत्पन्न होतें, त्यानें असंख्य लोकांच्या मानसिक शक्तीचें स्थैर्य डळमळतें. अमानुष पराक्रम करणाऱ्या व अविश्रान्तपणें दुष्ट कृत्यें करण्यांत गढून राहिलेल्या भुतां—राक्षसांच्या भयाण छाया मनुष्यांच्या कल्पनाभूमीवर सतत नाचत असतात. वार्द्धक्यांत, संकटांत, व दुखण्यांत जे भास होतात, तद्रूप त्या बनतात; व ज्यांचें आपणांस भय मात्र विशेष वाटतें पण उलगडा होत नाहीं, अशा सृष्टचमत्कारांत त्या विशेष ठळकपणें दृग्गोचर होतात.

## अशा तत्त्वांचा निर्णायक शक्तीवर दृढ परिणाम.

( क• ३ ) ज्या काळीं कोणत्याही गोष्टीवर विश्वास बसण्यास कल्पनाशक्तीचा प्रभावच बहुतांशीं कारण होतो, त्या काळीं जादूटोण्याची कल्पना कशी उद्भवली, हें वरील विचारावरून लक्ष्यांत येईल. यानंतर बराच काळ लोटल्यावर हेच भुतांखेतांचे भास फारच स्पष्ट होऊन मनुष्याच्या विचारशक्तीवरहि त्यांचा फारच जोराचा परिणाम घडतो. सोळाव्या व सतराव्या शतकांत जी विचारसरणी प्रबळ होती, ती टाकून आज आम्ही इतके दूर गेलों आहों; आणि आतां चेटुकबिटुक सब झूट आहे, अशी आमच्या मनाची इतकी पक्की खात्री झाली आहे कीं, चेटकावरच्या विश्वासाचें समर्थन करणाऱ्या त्या काळच्या लोकांची मनःस्थिति कळण्यास आमच्या कल्पनाशक्तीला बराच ताण द्यावा लागतो. तथापि या बाबतींत निष्पक्षपातानें शोध करूं गेलें असतां, चेटुक म्हणजे खरोखरीच कांहीं आहे, नुसती कल्पना नव्हे, असें प्रस्थापित करण्यासारखा इतका तऱ्हेतऱ्हेचा व भक्कम ऐतिहासिक पुरावा आहे कीं, पूर्वीपासूनच चेटुक म्हणजे झूट असा आपला ठाम ग्रह नसेल आणि सुधारणेच्या प्रगतीबरोबर चेटकावरचा विश्वास हळू हळू कसा उडत गेला, हा आपला अलीकडील अनुभव नसेल, तर तो पुरावा झिडकारणें कधींही योग्य होणार नाहीं; असा आपला निर्णय झाल्यावांचून राहणें कठीण आहे; असें वाटतें. या ग्रहाचें मंडन करणारे पुष्कळ गृहस्थ मोठे अलौकिक बुद्धीचे लोक होते; हे असें प्रतिपादित कीं, या बाबतींत जितका भक्कम पुरावा इतिहासांत मिळतो, तितका दुसऱ्या कोणत्याही बाबतींत मिळत नाहीं; आणि म्हणून ही बाब भरंवशालायक न मानणें म्हणजे अद्भूत चमत्कारांच्या ऐतिहासिक पुराव्याच्या मूळावरच घाव घालणें होय. असा ग्रह होता, याचाच अर्थ हा कीं, त्या वेळीं मनावर

ठसा उमटाविणाऱ्या व फार विलक्षण अशा गोष्टी सतत घडत व त्या मानवी बुद्धीच्या आटोक्याच्या अगदीं आंतल्याच असत.

## पुष्कळ न्यायपीठांचाही चेटकावर भरंवसा.

युरोपांतल्या बहुधा प्रत्येक देशांतल्या न्यायासनापुढें या बाबतींत हजारों खटल्यांची चौकशी झाली हें मागें आलेंच आहे; त्या न्यायासनांत त्या काळचे मोठाले न्यायनिपूण कायदेपंडित व धर्माधिकारी असत. जेथें व जेव्हां हे चेटकाचे चमत्कार घडले म्हणून म्हणत असत, तेथें व तेव्हां शपथेवर सागणाऱ्या असंख्य साक्षीदारांच्या मदतीनें ही चौकशी होत असे. आरोपितांवर गुन्हा शाबीत होण्यांत न्यायाधिशांचा कांहीं मतलब साधे असें नव्हे; पुन्हा गुन्हा शाबीद झाला, तर भयंकर देहान्त–शिक्षा ठरलेली असल्यामुळें मोठ्या सावधगिरीनें व विचारपूर्वक आपला अधिकार ते बजावींत; कां कीं न जाणो आपल्या हातून चूक झाली तर एकाद्याचा नाहक जीव घेतल्याचें पाप लागावयाचें अशी भीति होती. कित्येक शतकेंच्या शतकें लोकमताचा सगळा भर सतत व कळकळीनें याच प्रश्नाकडे होता. चेटकाचे चमत्कार असुक होतात, अमुक होत नाहींत, असा तपशीलाबद्दल वाद असला तरी एकंदर चेटकाच्या खरेपणाविषयीं निश्चित मत ठरून राहिलें होतें. चेटकाविषयींचा पुरावा मुख्यत्वें उपचित असे म्हणजे त्यांत आधारपरंपरेनें पुष्टि येण्यासारख्या गोष्टी एकावर एक उपस्थित असत. कांहीं गोष्टी एकतानभ्रमाच्या, कांहीं तोतयेपणाच्या, कांहीं काकतालीय न्यायाच्या, तर कांहीं दृष्टि–विभ्रमाच्या म्हणून म्हणतां येतील, परंतु ज्या लाखों चमत्कारिक गोष्टी न्यायासनांपुढें शपथेवर सांगितलेल्या म्हणून कागदोपत्रीं नमूद केलेल्या आहेत, त्यांचा विचार करूं जातां, त्या सर्वांस साधारणपणें लागू पडणारें एकादें सयुक्तिक व विलक्षण असंभाव्य न वाटणारें असें कारण बसविणें फार अवघड जातें. हल्लींच्या काळीं आपण खात्रीपूर्वक सांगूं शकूं कीं, ज्याला खरोखर कांहीं म्हटल्या कांहीं वास्तविक आधार नाहीं, अशाबद्दल इतका साक्षी–पुरावा जमणें अगदीं अशक्य होईल. चेटकाची चलती चालली होती तो मनूच विलक्षण भाबडेपणाचा हें खरें; व भाबडेपणामुळें चेटकावर विश्वास जडला असें आपण म्हणतों; तथापि सर्वच

धर्मेतर बाबतींच्या इतिहासांत आपण त्या काळचा पुरावा तुच्छ म्हणून झुगारून देत नाहीं. आपण चेटुक संभाव्य मानीत असतों, तर हल्लीं उपलब्ध असलेल्या पुराव्याच्या शतांशानेंही चेटकाविषयीं आमची संशय-निवृत्ति झाली असती. जर चेटुक म्हणजे सृष्टिक्रमांतीलच पण फारच असंभाव्य गोष्ट असती, तर त्याविषयींची आपली विश्वासपराङ्मुखता पुराव्याच्या भाराखालीं साफ दडपून जाऊन, गुदमरली असती व त्यावर विश्वास ठेवणें प्राप्त झालें असतें.

## भुतांखेतांच्या प्रचीतीवर चेटकाची संभाव्यता अवलंबून आहे.

आतां हें उघड आहे कीं, भुतांखेतांविषयीं जें आमचें मत असेल व त्याचा ज्या मानानें आपणांस प्रत्यय येत असेल, त्यावर चेटकाच्या इतिहासाच्या असंभाव्यतेचें मान अवलंबून असणार. अलौकिक शक्तीचे, अविश्रांत खटपट करणारे व दुष्टपणाची कमाल करणारे, कोणी अदृश्य आत्मे या जगांत एकसारखे वावरून, मनुष्यांना मोहांत पाडून, त्यांना छळण्यांतच आपलें सर्वस्व खर्चितात, असा जर लोकांचा समज असेल; गत कालांत हे अदृश्य आत्मे मनुष्यांच्या शारीरिक कार्यांवर अंमल चालवून विलक्षण चमत्कार करीत व भविष्य सांगत असा जर लोकांचा विश्वास असेल; रूढि आहे, काय करावें! कोण विचार करतो! कोण अनुभव घेतो! अंः द्या तसेंच मत, कोणीं जावें जगाच्या उलट, अशा विचारांनीं उत्पन्न होणाऱ्या-निरुत्साही थिल्लरपणानें नव्हे, तर पक्क्या प्रचीतीनें, उत्साहानें व दक्षतेनें खात्री करून घेऊन जर लोकांचा हा ग्रह झाला असेल; आणि हा ग्रह आपल्या महत्त्वाच्या मानानें विचार–शक्तीवर पगडा बसवून व मानवी विचारांत उंच पायरी बळकावून मनुष्याच्या मनाला व कल्पकतेला प्रत्यक्ष अनुभव दाखवील; तर अर्थांत्च चेटकाविषयीं पुरावा पहाण्याच्या अगोदरच वाटणारी असंभाव्यता या अदृश्य दुष्ट आत्म्यांविषयींचा ग्रह त्याज्य वाटता अगर अप्रतीत रहाता तर जितकी वाटती त्यापेक्षां कमी वाटेल. अर्थात् या अदृश्य, दुष्ट आत्म्यांच्या अस्तित्वाविषयीं व कृत्यांविषयीं आपला ग्रह जितका ज्यास्त बळकट तितकी चेटकाची असंभाव्यता आपणांस कमी वाटली असती; म्हणजे चेटुक ज्यास्त संभाव्य वाटलें असतें, तर मग भुतांखेतांच्या

चाळ्यांच्या गोष्टी म्हणजेच खुळेपणा, त्यांबद्दल पुरावा पाहिला काय आणि नाहीं काय, त्या मनावर घेण्याजोग्याच नव्हत, अशी जर लोकांची प्रवृत्ति उत्तरोत्तर वाढत आहे, असें आपण पहातों, तर यावरून भुताखेतासंबंधीं जो ग्रह त्याची प्रचीति कमी येत चालली आहे, असें अनुमान निघूं शकतें.

## चेटकाच्या इतिहासाचीं क्रान्तिस्थलें.

या आतां सांगितलेल्या दोन गोष्टींवरून चेटकाच्या इतिहासाचा नीट उलगडा करतां येईल व मानवी सुधारणेच्या प्रगतीचें माप या दृष्टीनें त्या इतिहासाचें मोठें महत्त्व व सार्थत्व दाखवितां येईल असें वाटतें. आतां या विषयाचें सांगोपांग विवरण करावयाचें म्हटलें, तर विस्तार फार होईल; आमच्याजवळ तितका स्थलावकाश नाहीं; म्हणून या चेटकाच्या इतिहासांतील मुख्यमुख्य क्रांतिस्थळें मात्र दाखवितों. तथापि या त्रोटक वर्णनानें अवश्य तितकें विवरण होईल, अशी आशा आहे.

## सृष्टचमत्कारांमुळें रानटी लोकांत उद्भवलेल्या कल्पना.

( क० ४ ) रानटी लोकांच्या निकृष्टावस्थेंत हा चेटकाविषयींचा विश्वास सर्वत्र (१३) सारखा पहाण्यांत येतो; आणि पुष्कळदां विलक्षण भयंकर प्रकार घडलेले दिसतात. याचें कारण उघड आहे. जिकडे तिकडे भीति हा धर्माचा मूळ पाया असतो. रानटी माणसांच्या मनांवर ज्या गोष्टींचा विलक्षण ठसा उमटतो, त्या म्हणजे ज्या उघडपणें सृष्टिनियमानुसार घडतात व परिणामीं फार हितकर असतात अशा नव्हत; तर ज्या दिसण्यांत निसर्गविरुद्ध व हानिकारक असतात त्या होत. त्या स्थितींत भीतीच्या इतका कृतज्ञतेचा ठसा उमटत नाहीं. निसर्गाच्या नित्यकृत्यांपैकीं अत्युदात्त कृत्यांचा जो रानटी माणसाच्या मनावर ठसा उमटेल, त्यापेक्षां एखादा सृष्टिनियम जरा किंचित् मोडल्यासारखें दिसल्यानें फार खोल ठसा उमटतो. यामुळें सृष्टींतले विस्मयकारक व भयप्रद देखावे जेव्हां पहाण्यांत येतात, जेव्हां राहण्याचें ठिकाण फार घातुकरोगानें अगर उत्पातानें उद्ध्वस्त होतें, तेव्हां तेणेंकरून रानटी माणसाच्या मनांत अमानुष, दुष्ट शक्तीच्या अस्तित्वाची कल्पना पूर्ण प्रतिबिंबित होते. रात्रीच्या अंधकारांत, डोंगरांच्या गुहांत, तुटलेल्या कड्यांतून निघणारे प्रतिध्वनि एकून, धूमकेतूची प्रज्वलित शिखा पाहून, ग्रहणांतल्या भेसुर प्रकाशांत, दुष्काळानें प्रदेश उद्ध्वस्त झाला

असतां, धरणीकंपानें किंवा सांथीच्या रोगानें हजारों बळी घेतले असतां, बुद्धिभ्रंश करणाऱ्या रोगाच्या वेळीं, सारांश, जें जें म्हणून विलक्षण, अद्‌भत व घातुक तें तें अनुभावित असतां, रानटी मनुष्याला अमानुष शक्तीचा भास होतो व तिच्यापुढें तो भेदरून जाऊन अगदीं दीन होतो. त्याच्या मनावर सृष्टीचा सर्व प्रकारें पूर्ण पगडा बसत असल्यामुळें व सृष्टीच्या निरनिराळ्या अवयवांना बद्ध करणारी नियमशृंखलेची परंपरा त्यास अगदीं माहित नसल्यामुळें त्याला ह्या सर्व गोष्टी म्हणजे अमानुष दुष्ट शक्तीचींच लहरीप्रमाणें झालेलीं असंबद्ध कृत्यें असें वाटतें व त्याला तिची नेहमीं भीति वाटत असते.

## चेटकाच्या शान्ततेसाठीं त्यांचे प्रयत्न.

सदोदित ह दुष्ट आत्मे आपल्या सभोंवतीं आहेत. या बुद्धीनें तो त्याच्याशीं संभाषण करण्याचा प्रयत्न करणार. देणीं देऊन त्यांची मर्जी सुप्रसन्न राखण्याचा तो प्रयत्न करणार. तो जर एकाद्या मोठ्या संकटांत सांपडला असला किंवा सूड घेण्याच्या प्रबल इच्छेनें त्याच्या विवेकावर पगडा बसविला असला, तर त्या दुसऱ्यांचा अधिकार आपल्या हातीं घेण्याचा तो प्रयत्न करणार; आणि मग विवेकाची व त्याची फारखत पूर्वींच झाली असल्यानें व कल्पनेचा वारू बेलगाम उधळल्यानें आपल्या इच्छेप्रमाणें घडून आलें आहे, असेंही त्यास वाटावयास लागणार. त्याचें कर्तृत्व व महत्त्वाकांक्षा जर कां असाधारण असलीं तर या त्याच्या समजुतीमुळें त्याला समाजांत वर्चस्व मिळण्याचा मार्ग सुलभ होईल. अमानुष आत्म्यांशीं संभाषण करण्याची व त्यांना आपले दास बनविण्याची शक्ति आपणांत आहे असें स्वतः सांगत असल्यामुळें, सभोंवतालच्या लोकांवर त्यांचें अमर्याद वजन बसेल; आणि त्याच्या आंगीं थोडीशी धूर्तता अगर सृष्टिनियमांचें अल्प तरी ज्ञान असेल तर, त्या अमानुष सामर्थ्यासंबंधीं अत्यंत विश्वासोन्मुख लोकांत त्यांचें वर्चस्व राहण्यास चांगली मदत होईल. एखाद्या मोठ्या संकटाच्या भीतीनें लोक गांगरले असतां, त्या भीतीच्या ऐवजीं त्यांच्या मनांत जादू-टोणा करणारें म्हणून प्रसिद्ध असलेल्या एकाद्या माणसाविषयीं राग उत्पन्न करून आपला ज्यांनीं अपराध केला आहे, असें त्याला वाटत असेल, त्यांचा तो पक्का सूड उगवूं शकतो व शिवाय लोकां-

तलें महत्त्वही वाढवूं शकतो. संवयी, चर्या अगर ज्ञान अशा एखाद्या विशेषामुळें साधारण लोकसमूहांतून जो सहज वेगळा पडतो, त्याचें भुतांखेतांशीं सूत जमलें आहे असा लोकांना सहजीं संशय येतो; व जर कां कांहीं मानसिक रोगानें तो विशेष ज्यास्त ठळक झाला तर त्यांचा तसा ठाम ग्रह होऊन बसतो. याप्रमाणें अज्ञान, कल्पकपणा, व ढोंग, यांची सांगड बसते व यांच्या जुटीनें चेटकाविषयीं विश्वास उद्भवण्यास, तसेंच चेटुक किंवा जादू–टोणा करण्याचा ज्यांच्यावर वहीम असतो, त्यांचें ज्या मानानें भय वाटत असेल, त्या मानानें त्यांविषयीं तिटकारा उत्पन्न होण्यास मदत होते.

## सुधारणेनें कृत्रिम भीति नष्ट होते.

मानवी सुधारणेचें पाऊल जरा पुढें पडलें म्हणजे चेटक्यांची भीति आपोआपच कमी होते; याचें कारण असें कीं मानवी सुधारणेच्या प्रगतीबरोबर ज्ञानाची वाढ होते व लोकांच्या राहणीसवरणींत कृत्रिमपणामुळें कल्पनाशक्तीवर पगडा बसविणाऱ्या नैसर्गिक कारणांच्या तडाक्यांतून मनुष्यें तितकीं सुटतात; आणि सृष्टींतल्या ज्या घटनांचें पूर्वीं फार भय वाटत असे, त्यांतून कांहींचा वाढत्या ज्ञानामुळें उलगडा पडतो. तथापि प्राचीन ग्रीस व रोम या राष्ट्रांत अलौकिक सामर्थ्यानें मानवांस दुःख देणें शक्य आहे, असा सर्वसाधारण समज होता; आणि सन्त आगस्ताईननें खात्रीपूर्वक म्हटलें आहे कीं, कोणत्याहि पंथाचा जरी तत्त्वज्ञानी असला तरी त्याचा हा समज असेच; फक्त एका ‘ ऋणं कृत्वा घृतं पिब ’ मताच्या पंथाच्या, तत्त्वज्ञांचा, भुतांखेतांवर विश्वास नसे. रोमच्या दशनर ( दिसेंव्हर ) शासनाच्या अमदानींत जादूगारांना देहान्त शासन देण्याचा कायदा झाला होता. असाच कायदा प्राचीनकाळीं ग्रीसमध्यें होता व दिमास्थेनीसच्या काळीं लेमिया नांवाच्या चेटकीला देहांत शिक्षा झाली (१४) होती. प्लेटोच्या तत्त्वज्ञानानें अध्यात्मिकतेचें क्षेत्र बरेंच वाढविलें, व त्याबरोबर हा विश्वासही वाढला; आणि ख्रिस्ती शकाच्या पूर्वीं काय किंवा नंतर काय, जेव्हां जेव्हां म्हणून प्लेटोच्या तत्त्वज्ञानाचें वर्चस्व झालें, तेव्हां तेव्हां त्याबरोबर जादूकडची लोकांची प्रवृत्ति वाढली. शिवाय प्राचीन मानवी सुधारणेची प्रवृत्ति सृष्टिघटनांच्या मीमांसेकडे कळकळीनें कधींही

वळली नव्हती; त्यामुळें त्या बाबतींत फारशी प्रगति झालेली नव्हती. तथापि त्या देशांत जो छळ झाला, तो एकंदरींत धार्मिक वेडामुळें क्वचितच झाला. जादूगाराला शिक्षा करण्याचें कारण तो मनुष्यास इजा करतो हें; तो देवाचा अवमान करतो, हें नव्हे.

## पेगन व रोमन-धर्मांच्या वेळचे चेटक्यांबद्दल कायदे.

पेगन-धर्मांच्या उत्तरकाळीं रोममध्यें एका बाबतींत जादूविषयींच्या कायद्यांची पुनरावृत्ति झालेली दिसते; व त्या कायद्यांना निराळेंच स्वरूप आलेलें दिसतें. तथापि धार्मिक चळवळींचें मात्र त्यांना स्वरूप आलें नाहीं. असे कायदे करणें राजकारणाला जरूर झालें. फलज्येतिषाच्या व इतर कांहीं साधनांनीं भविष्य सांगणें हेंही जादूमध्येंच मोडूं लागलें व या भविष्यज्ञानामुळें बादशहांविरुद्ध कट करण्याची प्रवृत्ति बळावूं लागली. भविष्यवाद्यानें कोणा गृहस्थाला खात्रीनें सांगावें कीं, 'राजचिन्हें' तुह्मांला प्राप्त व्हावीं, असा योग आहे, व त्यामुळें त्या गृहस्थास बंड करण्यास उत्तेजन यावें; असें पुष्कळदां होई. तख्तनशीन बादशहाची जन्मपत्रिका पाहून ज्योतिषीबुवांनीं, सरकारावर केव्हां हल्ला केला असतां जय मिळण्याची विशेष खात्री आहे, हें वर्तविलें आहे; असा लोकांचा समज होई; व यामुळें बंडाळी माजण्याला सतत कारण घडे. जादूचे कांहीं प्रकार ग्रीस-देशांतून नुकतेच रोमन-बादशाहतींत आले असल्यामुळें, तेथें वर्चस्व असलेल्या पुराणप्रिय लोकांस त्यांचा तिटकारा वाटे, या सगळ्याचा परिणाम असा झाला कीं, कित्येक बादशहांनीं जादूगारांविरुद्ध जाहीर आज्ञापत्रें काढलीं व तदनुसार अंमलबजावणीही मधून मधून शिथिलतेनें पण जोमानें झाली (१५). असा जरी जादूगारांचा वारंवार छळ होई, तरी त्यावरून जें जें मिळून जादूच्या नांवाखालीं मोडे, तें तें नीतिदृष्ट्या वाईट असा ग्रह असे, असें समजावयाचें नाहीं. उलट भविष्यज्ञान करून घेण्याचे पुष्कळ प्रकार धर्माचें प्रधान अंग म्हणून मानिले जात. देवळांत कौल घेणें, वगैरे भविष्य जाणण्याचे कित्येक सार्वजनिक प्रकार तसेच अव्याहत चालू असून, मानमान्यतेचे समजले जात. बादशहाचें भविष्य जाणण्याचा प्रयत्न करणें म्हणजे राजद्रोह होय, असा कायदा होता; यावरून भविष्यज्ञानाच्या सन्मान्य प्रकारांशिवाय इतर प्रकार

कसे बंद केले असावे, तें दिसतें. भविष्यज्ञान आपणांस मात्र व्हावें, या हेतूनें बादशहा आपल्या पदरीं पुष्कळ ज्योतिषी बाळगीत; पण देशांत इतर ठिकाणीं त्यांस राहूं देत नसत, राहिले तर हद्दपार करीत (१६). भविष्यें जाणण्याचें सामर्थ्य अंगीं यावें, म्हणून जे प्रकार ज्योतिषी किंवा भविष्यवादी जादूगार करीत, ते धर्मोच्छेदक होत; अशी कल्पना सुद्धां त्या बादशहांच्या मनांत येत नस. फार कशाला, मार्कस आरेलियस व ज्यूलियन हे मोठे धर्माभिमानी बादशहा होते व आजपर्यंतचे जे तख्तनशीन पुरुष उत्तम म्हणून गणले जातात, त्यांमधलेच हे दोघे होते; तथापि हे सुद्धां जादूगारांच्या मोठ्या पुरस्कर्त्यांपैकींच होते.

येणेंप्रमाणें रोममध्यें पेगन-धर्माच्या अखेरच्या दिवसांत जादूगारांची ताळ ना तंत्र, अशी स्थिति होती; व पुढें खिस्ती-बादशहांच्या राज्यधोरणावर तिचा जो परिणाम घडला, त्यानें तिच्याविषयीं फार कुतूहल वाटतें.

## खिस्ती लोकांच्या कल्पना.

( क० ५ ) जेव्हां खिस्ती-लोक रोमन-बादशाहतींत प्रथमच पसरले तेव्हां या जादू, चेटुक वगैरेविषयीं त्यांचे विचार इतर लोकांच्याहून निराळे होते. स्वतःच्या रक्तपातानेंहि आपल्या धार्मिक उत्साहाची ते औदार्यानें परमावधि करीत; इतका त्यांचा उत्साह उत्कट असल्यामुळें चेटकाच्या राजकीय परिणामांपेक्षां धार्मिक परिणामांकडे त्यांचें विशेष लक्ष्य असे; व अराजकतेपेक्षां धर्मोच्छेद त्यांच्या दृष्टीला ज्यास्त भयंकर वाटे. त्यांच्या कांहीं विशिष्ट धर्ममतांवर त्यांच्या स्थितीचा परिणाम होऊन त्यांना स्वकीयेतर सर्व गोष्टींत सैतानच भरलेला दिसे. सैतान ( म्हणजे सेतन ) असें खिस्ती धर्मांत ईश्वराच्या शत्रूला म्हणतात. तेव्हां खिस्त्यांच्या प्रत्येक धर्ममताशीं सैतानाचा संबंध येऊन पोंचावयाचाच; आणि पेगन धर्मीयांच्या प्रत्येक चळवळींत सैतानाचा पगडा आहे, असें त्यांना पूर्वग्रहानेंच दिसावयाचें. चिरकालिक दंडाची भयंकर कल्पना केवळ मूर्तस्वरूपानें त्यांच्या मनांत तीव्रतेनें उद्दीप्त झाली होती. त्याचा असा समज असे कीं, आपल्या धर्माच्या लहानशा जमातीबाहेर जेवढे म्हणून लोक आहेत, त्यांना अंतीं हा दंड भोगावा लागणार; आणि आपला छळ करणाऱ्यांच्या वांट्यास विलक्षण तीव्र यातनाच येणार!

## सैतानाचें साम्राज्य.

सर्व विश्वाचे त्यांच्या मतें दोनच भाग; एक देवाचें साम्राज्य व दुसरें सैतानाचें. पहिलें म्हणजे दैवी साम्राज्य छळ होत असलेल्या धर्माच्या म्हणजे ख्रिस्ती धर्माच्या लोकांवरचें. दुसरें म्हणजे सैतानी किंवा आसुरी साम्राज्य. बाकीचें—म्हणजे ख्रिस्ती लोकांचा छळ करीत असलेल्या लोकांवरचें. आपल्या धर्ममतांची निंदा झाली, आपल्या लोकांना धमकावणारें बादशाही आज्ञापत्र निघालें, आपल्या धर्मप्रसाराला अडथळा होण्यासारखी गोष्ट घडली, कीं त्या त्या ठिकाणीं त्यांना सैतानाचें किंवा आसुरी अंग प्रत्यक्ष व नेमकें दिसावयाचें. आपल्या सभोंवतीं प्राचीन प्रचंड धर्माचें प्राबल्य त्यांना दिसत होतें. त्यांतले भव्य संस्कारविधि, त्यांतलीं कथापुराणें, त्यांचे आचार्य, त्यांतले अद्‌भूत चमत्कार, यांचा पगडा लोकांच्या मनावर पूर्वींच पूर्णपणें बसलेला होता. त्यामुळें हा आपल्या धर्मप्रसाराच्या कामीं अलंघ्य आगळच होय; असें ख्रिस्त्यांस प्रथम वाटलें. या जुन्या धर्मांत जिथें तिथें ख्रिस्त्यांना आसुरी कारागिरी विशेष दिसे; आणि प्रत्येक गोष्ट अद्‌भूत चमत्काराच्या मापानें मोजण्याचा त्यांच्या मनाचा प्रथमपासूनच बळकट कल असल्यामुळें, त्या जुन्या धर्मांत जे अद्भूत चमत्कार होत, अशी तद्धर्मीयांची घमेंड असे, ते खरोखर चमत्कारच असें ख्रिस्त्यांच्याही मनाला वाटे. इतकेंच नव्हे, तर ते चमत्कार कसे घडतात याचा उलगडाही ते सहज करीत. त्यांचा समज होता कीं, ह्या जगांत दुष्ट राक्षसांचा बुजबुजाट आहे व हे दुरात्मे मानवजातीला मोहांत पाडून सदासर्वकाळ छळीत असतात. ईजिप्तच्या जादूगारांपासून तों तहत नव्या करारांतील भुतांनीं पछाडलेल्यांपर्यंत या दुरात्म्यांनीं निरंतर पराक्रम गाजविला आहे. देवाच्या लाडक्या देशांत हे फक्त त्रासच देऊं शकत; छळच करूं शकत; पण इतर देशांत ह्यांचें स्तोम फार माजलेलें आहे. हे सर्वशक्तिमान् मानले जातात व यांची देवाप्रमाणें पूजा होते; असा या ख्रिस्ती-लोकांचा समज असे.

## तत्त्ववेत्ता प्लेतो याचें पाठबळ.

हें मत म्हणजे त्या कालच्या बौद्धिक उन्नतिमानाचा नैसर्गिक परिणाम होय. या मताचा भुतां-खेतांविषयींच्या लोकग्रहावर व धर्मशास्त्रां-

तील पिशाच वगैरेच्या कृत्याच्या हकीकतीवर परिणाम घडला; व त्याला येथें प्लेतोच्या सिद्धांतांचा आणखी पाठिंबा मिळाला. प्लेतोच्या सिद्धांतांचें अलेक्झांद्रिया येथें रूपान्तर होऊन, त्यांनीं ख्रिस्ती धर्माच्या आरंभींच्या मतांत विलक्षण फरक पडला होता (१७. या सिद्धान्तानुसार असें मानलें जात असे कीं, पेगन-धर्माच्या लोकांचीं प्रत्यक्ष उपास्यें म्हणजे सान्तसत्ताधारी विकलनीतिमत्तेचीं क्षुद्र दैवतें होत; यांलाच देवदूत, किंवा त्याकाळीं म्हणत तें राक्षस अगर पिशाच असेंही नांव आहे. हे देवदूत अगर राक्षस, मानव व परमेश्वर यांमध्यें मध्यस्थी करितात; व त्या परात्पर अगम्य परमेश्वराच्याच अनुज्ञेनें मानवांतील धर्मशासन चालवितात; अशा रीतीनें ईश्वरविषयक एकत्व व अनेकत्व मानणाऱ्या दोन मतांची एकवाक्यता झाली. राजमान्य धर्म, सत्य व कायदेशीर होता, पण तो केवळ एकेश्वरी धर्माशीं विरोधी नव्हता. खिस्त्यांनींही क्षुद्र दैवतांची कल्पना स्वीकारली होती. पण ते या क्षुद्र दैवतांना परमेश्वराचे स्वयंसेवक मानीत नसत, तर त्याचे प्रतिस्पर्धी मानीत. यामुळें पेगन लोकांत ज्या 'दमिन्' शब्दानें परात्पराहून नीच प्रतीचें दैवत असें समजत, त्याच शब्दानें खिस्ती लोक सैतान किंवा भुत, राक्षस, असा अर्थ घेत.

ख्रिस्ती धर्माच्या अगदीं आरंभींच ही कल्पना अस्तित्वांत आली होती असें दिसतें; आणि इ० स० च्या दुसऱ्या शतकांत अतिसूक्ष्म व सांगोपांग विचारानें ती विस्तृत केलेली आढळते. त्या शतकांतला लेखक तर्तूलियन खात्रीपूर्वक लिहितो कीं, या दुरात्म्यांनीं सर्व जग व्यापून टाकिलें आहे; आणि पेगन धर्माच्या अंगींप्रत्यंगीं त्यांचें प्राबल्य आढळतें. त्यांपैकीं कांहीं तर सैतानाबरोबर नरकांत लोटून दिलेल्या बंडखोरांच्याच टोळींतले आहेत. बाकीचे जलप्रलयापूर्वी मानवकन्यांना मोहित होऊन गेलेले देवदूत होत. त्यांनीं मानवकन्यांना लोंकरीला रंग देण्याची कला शिकविली; व याहूनहि भयंकर अपराध करण्यास म्हणजे आपल्या तोंडांना रंग देण्याला शिकविलें; म्हणून त्यांना चिरकाल यातना भोगण्याचें यथायोग्य शासन मिळालें (१८). हे सर्व देवदूत आतां त्या सर्वशक्तिमान् परमेश्वराचे हेतु सर्वस्वी विफल करण्याची खटपट करीत आहेत; आणि तो एक परात्परच जिला पात्र, ती पूजा आपणांकडे बळेंच ओढून घेण्यानें

त्यांना विशेष आनंद होत असतो. ख्रिस्ती धर्माच्या बाहेरच्या लोकांतलीं अतिशय अनीतिमान् दैवतेंच नव्हत; वीनस् (कामदेव किंवा रति), मार्स (कार्तिकेय, महासेन) मर्क्युरी (त्वष्टा किंवा व्यापारदेवता, कलादेवता) प्लूतो (नरकाधिप) असल्या देवताच नव्हत; पण आणखी ज्या अति पवित्र दिसतात, त्या सुद्धां निःसंशय प्रत्यक्ष दुष्ट राक्षसयोनींतल्या आहेत. ज्ञानमूर्ति मिनर्वा (बृहस्पती किंवा सरस्वती) पिशाच आहे. तशीच पावित्र्यखनि दायाना (सावित्री) ही आहे. ख्रिस्तीधर्म–बाह्य लोक ज्याला देवांचा राजा म्हणतात, तो ज्यूपितर (देवेन्द्र) ही त्यांतलाच. प्रेतगति पावलेल्या वीरविभूतींच्या नांवांनीं ज्यांचें पूजन होत असतें व ज्यांनीं परोपकाराचीं आणि पराक्रमाचीं इतकीं उदात्त कृत्यें केलीं म्हणून मानतात, ते आत्मे सुद्धां दुरात्मेच होत. फक्त त्यांनीं या मृतविभूतींचीं नांवें धारण केलीं आहेत. कविप्रतिभेच्या सोज्ज्वल अपत्यांवरही तोच शेरा मारला आहे. हीं अपत्यें म्हणजे प्रत्येक राई, प्रत्येक झरा (१९) आपल्या वास्तव्यानें ज्यांनीं पवित्र केला आहे, त्या मध्ययुगांतल्या वनदेवता, जलदेवता वगैरे देवतांचीं पितरें होत. सर्व वातावरण या असंख्य दुरात्म्यांनीं बुजबुजलें आहे (२०); आणि देशोदेशींच्या दंतकथा त्यांच्या पराक्रमाच्या गोष्टींनीं परिपूर्ण आहेत. त्यांच्या अस्तित्वाचा पुरावा पाहिजे असेल, तर हा पहा.

## दुरात्म्यांच्या बुजबुजाटाचा पुरावा.

वीनस्च्या देवळांत (कामदेवायतनांत) तेज मंद न होतां जळत राहणारा अक्षय्य दीप; आकाशमार्गे अदृश्य हस्तांनीं झालेलें गृहदेवतांचें स्थलांतर; कौमारदेवतांस भजणाऱ्या कन्या, कौल घेण्याचीं देवळें व रोमच्या सत्तेचीं केन्द्रें यांसंबंधानें झालेले चमत्कार, यांवरून त्यांचें अस्तित्व लक्ष्यांत येतें. सिल्वन (वनदेवी) फान् (चतुष्पाददेवी) व दुसीई या नांवांनीं हे दुरात्मे येऊन मानवसमाजांत वारंवार वावरले आहेत; इतकेंच नव्हे तर आणखी ह्यांनीं असंख्य स्त्रियांना प्रेमपात्रें केलीं आहेत. या गोष्टीला इतका पुरावा आहे कीं, ती झाली नाहीं म्हणणें म्हणजे शुद्ध उद्धटपणा होय (२१). भुतांनीं पछाडलेल्या माणसांना भुतांपासून खिस्ती लोकांनीं नेहमीं मुक्त केलें आहे; आणि भूत काढणाऱ्या मांत्रिकांचीं थडगीं रोमच्या प्रेत–वापींत सांपडलीं आहेत. एखादा खिस्ती माणूस कर्तव्यमार्गापासून जरा का ढळला, तर कधीं-

कधीं त्याला दहशत घालण्यास प्रत्यक्ष सैतानाची मूर्ति त्याच्यापुढें प्रकट होई. एक ख्रिस्ती-बाई मूर्खपणाच्या लहरींत नाटक पहावयाला गेली, तर तेथें तिला भुतानें पछाडलें. असें केल्याबद्दल त्या भुताची मांत्रिकानें चांगली कानउघाडणी केली. तेव्हां तें भूत गयावयां करून म्हणालें, 'हें झाड मला माझ्या घरांत मिळालें' (२२). पेगन धर्मांतील संस्कारांचा संसारांतील सर्वच कामांशीं थोडाबहुत संबंध असे; म्हणून वाटेल तें काम करणारें माणूस असो, भुतांखेतांवरच्या विश्वासाचा पगडा त्याच्या मनावर असावयाचाच. नाटकगृहांत, घोडरंगणांत, बाजारकट्ट्यांत, सर्व सार्वजनिक उत्सवांत, भुताखेतांचा संबंध दिसून येईल, असें कांहींतरी असावयाचेंच. एक ख्रिस्ती सैनिक होता, त्यानें एकदां एका उत्सवप्रसंगीं मुकुट घालण्याचें नाकारलें; कारण कीं, लारेल झाडाचीं पानें ( यांचा मुकुट करण्याची चाल होती) प्रथमतः ब्याकस (पानदेवता) व वीनस (कामदेव किंवा रति) यांस अर्पण केलेलीं होतीं. या त्याच्या रूढिविरुद्ध बागण्याबद्दल त्याला जबर शिक्षा झाली; पण तीही त्यानें सोशिली; तथापि त्यानें तो मुकुट घातला नाहीं. या कृत्यावरून पुष्कळ वादविवाद माजला; पण तर्तुलियननें एक पुस्तक लिहिलें (२३) व त्यांत त्या धर्मवीरानें फक्त आपलें योग्य कर्तव्य बजाविलें, असें प्रतिपादिलें.

## पहिले ख्रिस्ती भुताटकीच्या वातावरणांतलेच होते.

प्रथमारंभींच्या ख्रिस्ती लोकांत असल्या मतानें जें भय पसरलें असेल, त्याची यावरून सहज कल्पना होईल. अद्भूत चमत्काररूपी वातावरणांतच जणूं काय ते श्वासोच्छ्वास करीत;असें दिसतें. त्यांना दुरात्म्यांनीं घेरिलें होतें, ते वळत तिकडे हे दुरात्मे आहेतच त्यांना भंडावयाला. अमानुष कृत्यांनीं ते आपलें अस्तित्व सदोदित व्यक्त करीत असत. प्रत्येक धर्मवेदीजवळ या दुष्टांचा खडा पहारा असायचा; संसारांतल्या प्रत्येक कामधंद्यांत ते शिरायचे; आणि ख्रिस्ती लोक म्हणजे त्यांच्या हाडवैराचें विशिष्ट स्थान; हा सार्वत्रिक समज असे; आणि त्याचा खरेपणा इतका सुरेख पटे कीं, हल्लींच्या धर्मभ्रष्टतेच्या अभावाच्या काळांत त्याची आपल्याला क्वचितच कल्पना होईल. जीवित-सर्वस्व अर्पण करून एकान्तिक भक्तीनें एकाद्या धर्मांच्या तत्त्वांचें पालन करितांना छळाच्या भट्टींत तीं तत्त्वें तावून सुलाखून

निघाल्यानें अधिकच तेजस्वी दिसून तद्धर्मीयांना जशीं सत्य वाटतात, तसेंच हें मत तेव्हां ख्रिस्ती लोकांस सत्य वाटे.

[stamp]

### जादू हा गुन्हा मानीत.

जादू वगैरेवर या मताचा परिणाम काय व्हावा, हें उघड आहे. वर आपण पाहिलेंच आहे कीं, ज्यास्त सुधारलेल्या पेगन लोकांमध्यें जादू वगैरे करणें हा मुख्यत्वें सामाजिक गुन्हा मानीत व बादशाहतीच्या अखेरच्या दिवसांत मुख्यत्वें राजकीय मानीत. राजकीय अस्वास्थ्याच्या काळांत त्याला मोठें महत्त्व येई; पण इतर वेळीं तो मागें पडे. तत्कालीन धर्माशीं त्याचा संबंध फार अनिश्चित असे;व त्यांत असे पुष्कळ विधि असत कीं, ते किंचित्‌ही नीति–बाह्य मानले जात नसत. आतां उलट ख्रिस्ती–धर्माच्या आरंभींच्या काळीं जादू वगैरे करणें म्हणजे भुतांखेतांच्या प्रत्यक्ष साह्यानें केलेला अति भयंकर धर्मोच्छेद होय, असें मानीत. पेगन धर्माचा सर्वतोपरी जादू वगैरेंत अंतर्भाव होई, त्या धर्मांतील सर्व अद्‌भूत गोष्टींचा त्याच्या योगें उलगडा पडे; व त्यांतल्या सर्व पौराणिक कथांना उग्र रूप प्राप्त होई. यामुळें त्याला धर्मपित्यांच्या उपदेशांत विलक्षण महत्त्व आलें व जनतेच्या कल्पनाशक्तीवर त्याचा निरंतर व जोराचा परिणाम घडला.

( क० ६ ) राजकीय सत्तेचें सुकाणूं जेव्हां ख्रिस्ती धर्माच्या हातीं आलें; तेव्हां पूर्वीं उपदेशिलेलीं सहनशील तत्त्वें लवकरच बदलून किंवा साफ झुगारून देऊन त्यानें यहुदी व पाखंडी यांच्या विरुद्ध थोड्या वर्षांच्या अवधींतच जाचक कायदे केले. तथापि कान्स्तंताइन बादशहाच्या कारकीर्दींत पेगन धर्मीयांची सख्या अजून इतकी मोठी दिसते व बादशहाची कळकळ इतकी कमजोर होती असें दिसतें कीं, जुन्या धर्माविरुद्ध मुद्दाम व उघडपणें आपल्या कायद्यांचा रोंख धरण्यास तो प्रथम कचावला. आणि जुनेपणाच्या पांघरुणाखालीं त्या धर्माच्या मुळांतच तुंबडी लावण्याची कावेबाज युक्ति त्यानें योजिली. मागें सांगितलेंच आहे कीं, रोमी लोकांत जादूमध्यें दुसऱ्यांना संकटांत पाडण्याकरितां दुरात्म्यांचें साह्य मागणें व संकटसमयीं त्यांचा धावा करणें हे धर्मोच्छेदक म्हणून सदा निंद्य मानलेले एवढेच प्रकार अंतर्भूत होत असत असें नाहीं; तर आणखी नीतिदृष्ट्या अयोग्य नव्हत, पण फक्त राजकारणांत संकटावह मानिलेल्या कित्येक भविष्यकथनाच्या

प्रकारांचासुद्धां त्यांत समावेश होत असे. या दुसऱ्या समाविष्ट प्रकारांची एक शाखा झाली; पूर्वी त्यांची कधींही साफ फारखत झालेली नव्हतीच; बंडें व तोतयेपणा उद्भवूं नये म्हणून कायदे केलेले होते; व त्याच दृष्टीनें त्यांची अंमलबजावणीही होत असे. खिस्ती बादशाहांनीं या कायद्यांचें पुनरुज्जीवन केलें व ते अतिशय कडक रीतीनें अमलांतही आणिले; पण त्यांचा सर्व रोख पेगन धर्माकडे होता (२४). जे जादूचे गुप्त प्रकार पूर्वी दुशनर शासनपद्धतीच्या अमदानींत मना केले होते, पण पुढें जिकडे तिकडे चालू झाले होते, तेवढेच यावेळीं प्रथमतः दंडास्पद ठरविले; पण थोड्याच बादशहांच्या कारकीर्दींत कायद्यांचें क्षेत्र विस्तृत होऊन सरते शेवटीं सर्व पेगन धर्माचा त्यांत अंतर्भाव होऊं लागला.

## कान्स्तन्ताइनचा जाहिरनामा.

कान्स्तंताइन बादशहानें ख्रिस्ती धर्माची दीक्षा घेतांक्षणीं गुप्त जादूविरुद्ध एक फार कडक कायदा केला; त्या कायद्यानें असें ठरविलें होतें कीं, कोणा नागरिकाच्या घरांत मेध्यांत्रावलोकनानें बळी दिलेल्या प्राण्यांचीं आंतडीं पाहून भविष्य सांगणारा, भविष्य सांगण्यास जाईल, तर त्या भविष्यवाद्याला जिवंत जाळलें जाईल; त्याला बोलावणारांची जिंदगी जप्त केली जाईल; व सरकारांत ही वर्दी देणाऱ्याला बक्षिस दिलें जाईल (२५) तथापि यामागून दोन वर्षांनीं एक जाहिरनामा काढला गेला, त्यानें या कायद्याचें उग्र स्वरूप बरेंच कमी झालें; कारण त्या जाहीरनाम्यानें असें जाहीर केलें होतें कीं, रोगांवर उपाय शोधून काढण्याकरितां अगर गारा, बर्फ, तुफानें यांपासून पिकाचें संरक्षण करण्याकरितां केलेल्या जादूच्या प्रकारांचा प्रतिबंध करण्याचा बादशहाचा उद्देश नाहीं (२६). ही जी थोडीबहुत सवलत मिळाली, ती फक्त त्या बादशहाच्या मरणापर्यंतच चालली; त्याचा मुलगा कान्स्तंतियस त्याच्या मागून गादीवर बसल्यावर ती अजीवात गेली.

## कान्स्तंतियसचा जादूगारांवरचा रोख.

बापापेक्षां मुलाचीं मतें ज्यास्त ठाम होतीं असें दिसतें. अलेक्झांद्रिया येथील, ख्रिस्ताचें देवत्व न मानणाऱ्या, एकेश्वरीपंथ स्थापन करणाऱ्या, एरियसचा कान्स्तांतियस हा अनुयायी होता; म्हणून त्याला पाखंडी म्हणत. तत्पंथी धर्मोपाध्यायांचें त्यावर चांगलें वजन असे. पेगन धर्म

लोकांच्या पूजे-अर्चेचे विधि व कांहीं जादूचे प्रकार यांत अंतर नसेच म्हटलें तरी चालेल. असल्या जादूविरुद्ध उग्र व बेसुमार कळकळीनें त्यानें आपल्या कायद्यांचा रोख धरिला. यांपैकीं एका कायद्याच्या उपोद्घातांत त्यानें नमूद केलें आहे कीं, पुष्कळ लोक सैतानाच्या मदतीनें तुफानें उत्पन्न करून आपल्या शत्रूंचा प्राण घेत आले आहेत, म्हणून मीं जादूचा हरएक प्रकार, कायदा मोडणारास कडक शासन करून, कोणाचीही भीड मुर्वत न धरितां, बंद करण्यास सिद्ध झालों आहें. भविष्य सांगण्याचा जे जे प्रयत्न करित ते धंदेवाले भविष्यवादी असोत अगर कधीं कधीं वाटेल तेव्हां तें काम करणारे असोत, त्यांचा त्यांचा या कायद्यांत जोरानें निषेध केला होता. रोममध्यें पकडलेल्या जादूगारांना रानटी पशूंपुढें फाडून खाण्याकरितां फेंकायचें आणि देशाच्या इतर भागांत पकडलेल्यांचे हाल-हाल करून शेवटीं त्यांस सुळावर द्यावयाचें असें ठरविलें होतें. जर कोणीं हट्टानें गुन्हा कबूल केलाच नाहीं, तर लोखंडी आकडयांनीं हाडांपासून त्यांचें मांस ओढून काढून त्यांस तो कबूल करावयास लावावयाचें (२७). जिकडे तिकडे पुष्कळ दिवसांपासून रूढ असलेले, पेगन धर्मांत कर्तव्य म्हणून लावून दिलेले नव्हत, तरी निदान करण्यास पूर्ण हक्क असलेले, विधि जे करीत; त्यांच्या विरुद्ध या भयंकर शिक्षांचा रोख होता. 'मानव जातीचे वैरी ' असें जें उपपद जुन्या पेगन कायद्यांत खिस्त्यां-विरुद्ध योजिलेलें होतें व ज्यामुळें जनतेच्या मनांत ह्यांविषयीं त्वेष उत्पन्न करण्याचें काम चांगलें तडीस गेलें, तेंच उपपद ह्या कारकीर्दीत जादूगारांना लाविलें (२८) ही महत्त्वाची गोष्ट म्हणून नमूद झाली आहे.

### जादूच्या उच्छेदाविषयीं खिस्ती बादशहांचे प्रयत्न.

( क० ७ ) जादूचा उच्छेद करण्याचें जें काम खिस्ती बादशहांनीं हातीं घेतलें होतें, तें खरोखर अवघडांतलें अवघड म्हणून जी आपली कल्पना आहे तसें होतें; आणि म्हणून त्या काळच्या भावड्या स्वभावाला साहजिकपणें अनुरूप असलेल्या चाली नष्ट करण्याचें काम रोमी लोकांच्या रानटी क्रूर बुद्धीनें योजिलेल्या शिक्षांच्या योगेंही झालें नाहीं. भविष्य आपणांस सहजीं कळूं शकेल असा जोंपर्यंत लोकांचा ग्रह होता, तोंपर्यंत शिक्षेच्या भीतीवर जिज्ञासेला जय मिळण्याची अगदीं खात्री होती.

थोडेसे साधे विधि केल्यानें आपल्या शत्रूंचा पाडाव करितां येईल व आपले मनोरथ सिद्ध होतील, असा जोंपर्यंत त्यांचा समज होता, तोंपर्यंत त्यांनीं तसले विधि करण्याचें सोडून दिलें असतें अशी शंकासुद्धां नको. धर्मोपाध्यायांनीं शापांचे वाटतील तसे फूत्कार सोडावे; पादशहांनीं शिक्षा वाटतील तितक्या ज्यास्त देण्याची भीति घालावी; पण या रोगावर भीति हा उपायच नव्हे. संदिग्ध-मतित्व हा एकच खरा उपाय आहे. हें संदिग्ध-मतित्व कोठेंही दिसत नव्हतें. जनतेच्या मनांत जादूच्या सामर्थ्याबद्दल कधींही बिलकूल कशी ती शंका आली नाहीं. नव–प्लेतोपंथाच्या स्वप्नांनीं पेगन तत्त्वज्ञ मोहून जाऊन ईजिप्तांतला गूढवाद, अमानुष आत्म्यांची धर्मसत्ता व या आत्म्यांचें मनुष्यांशीं संघटन, या विषयांवर मोठमोठे ग्रंथ लिहिण्यांत गुंतले होते. ख्रिस्ती धर्मपिते आवेशानें जादूचा निषेध करित होते खरे, पण हा सर्व भ्रम आहे असा त्यांस तिळभरही संशय आला नाहीं असें दिसतें. या मना केलेल्या विधींच्या मोहाशीं तोडीसतोड असें कांहीं तरी उभें करण्यास ख्रिस्ती धर्मांत नसतें तर एवढ्या प्रचंड लोकसमूहाला त्या विधींकडे पुनः धांव घेण्यापासून परावृत्त करण्याचें काम अशक्य झालें असतें. पण फारच सहजगत्या ख्रिस्ती धर्मज्ञानांत पुष्कळशा नव्या कल्पना भराभर शिरल्या; या कल्पना जादूच्या पद्धतीला प्रतिस्पर्धी म्हणून शोभूं लागल्या; व तीर्थोदकांचे व ख्रिस्ती संस्काराचे रक्षागुण त्या बेकायदेशीर मंत्रतंत्रांच्या गुणांच्या तोडीला तोड जमून गेले. तथापि एवढें नमूद करण्यासारखें आहे कीं, जरी हे पवित्र रक्षागुणावह पदार्थ वाढत वाढत असंख्य झाले, तरी जादूचा जोराचा मोह पाडणारी दुसरी गोष्ट जी भविष्य-कथन करण्याची शक्ति ती आपल्या अंगीं आहे, असें ख्रिस्ती उपदेश-कांनीं मुळींच कधींही म्हटलें नाहीं.

### जादूचें खूळ ख्रिस्ती धर्मोपदेशकांनीं पोशिलें नाहीं.

अठराव्या शतकांतील लेखकांचें प्रतिपादन बिनचूक असतें, मध्य युगांतील अज्ञानांत ज्याची परमावधि झाली तो खुळेपणा म्हणजे ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या कावेबाजपणाचेंच केवळ फळ असता, तर आतांच नमूद करण्यासारखी म्हणून म्हटलेली गोष्ट खात्रीनें घडली नसती. अर्थात् इतर धर्मोपाध्यायांप्रमाणें ख्रिस्ती धर्मोपाध्यायांनीं सार्वत्रिक जिज्ञासेच्या

छंदानें वर्तन केलें असतें व प्राचीन कौल किंवा भविष्यकथन यासारखें कांहीं तरी खिस्ती धर्मांत शिरलें असतें. पण तसें कांहीं झालें नाहीं; व त्याचें कारण असें कीं, ख्रिस्ती धर्मज्ञानांत जो फरक झाला, त्यांत लबाडीचा प्रकार नव्हता; तो केवळ स्वाभाविक विकास होता. ख्रिस्ती धर्माच्या कोणत्याही अंगाचा झोंक असा नव्हता कीं, त्याचा परिपोष होऊन कौल घेण्याची पद्धत तयार व्हावी; आणि कौलाची पद्धत जर का उद्भवली असती तर तो जाणून बुजून केलेल्या लबाडीचा परिणाम असें ठरलें असतें. आतां उलटपक्षीं अशा पुष्कळ कल्पना, व मुख्यत्वेंकरून शुद्धि-संस्कारोदकाच्या गुणावहकतेच्या कल्पना, खिस्तीधर्माशीं संलग्न होत्या कीं, त्यांत या आधिभौतिक वळण लावणाऱ्या काळाच्या झपाट्यामुळें योग्य नव्हे तरी सुलभ व स्वाभाविक फरक होत होत त्या जडपूजेप्रमाणें होऊन बसल्या; आणि जिकडे तिकडे पसरलेल्या जादूगिरीच्या कल्पनांत मिसळून गेल्या.

## सन्त हिलेरियननें केलेला एक अद्भूत चमत्कार.

( क० ८ ) सन्त हिलेरियनचें जीवनचरित्र लिहिण्याऱ्या सन्त जेरोमनें त्या पुस्तकांत त्या साधूनें केलेल्या एका अद्भूत चमत्काराची हकीकत दिली आहे. हा चमत्कार कान्स्तंतियस बादशाहाच्या मरणानंतर थोड्याच वर्षांनीं घडला; व त्यावरून खिस्ती संस्कार जादूशीं ताडून पहातां कोणत्या स्थितीप्रत येऊन पोंचले होते हें स्पष्ट कळतें. असें दिसतें कीं, गाझा येथील पेगन धर्मी द्विनर-शासक गादीवरील एका पुरुषाच्या घोड्याशीं इतालिकस नांवाचा एक खिस्ती माणूस शर्यत लावीत असे; आणि त्यांत तो राजा नेहमीं जिंकीत असे; याचें कारण तो कांहीं जादू करीत असे, तीमुळें त्याच्या घोड्यांना स्फुरण येई व प्रतिस्पर्ध्याच्या घोड्याचे पाय मरगळत. यामुळें निराश होऊन तो खिस्ती मनुष्य सन्त हिलेरियनकडे आला. हिलेरियन प्रथमतः त्याच्या विनंतीनें दचकल्यासारखा झालासा दिसला; आणि घोड्यांच्या शर्यती लावण्यांत आपलें अंग घालण्यास कचरला. पण सरतेशेवटीं या कामांत आपण पडणें योग्य आहे, अशी समजूत घालून इतालिकसनें त्या साधूचें मन वळविलें. मग हिलेरियननें एक भांडें भरून पाणी घेऊन तें स्वतः मंत्रून त्याला दिलें; त्यामुळें त्या पाण्यांत विलक्षण गुण आला. होतां होतां शर्यतीचा दिवस

आला. रथ एका रांगेनें जवळ जवळ उभे होते आणि प्रेक्षकांची रंगणावर गर्दी जमली होती. शर्यत सुरू करावयाची खूण होतांच इतालिकसनें तें पाणी आपल्या घोड्यावर शिंपडलें. त्यासरशी त्या ख्रिस्त्याचा रथ अमानुष वेगानें शर्यतीच्या समाप्तिस्तंभाशीं येऊन थडकला; व त्याच्या प्रतिस्पर्ध्यांचे घोडे बुजाले व अडले; जणूं काय कोणी अदृश्य राहून त्यांना हाणीतच होतें. आश्चर्य, आनंद किंवा राग यांच्या आरोळ्यांनीं तें रंगण दणाणून गेलें. या ख्रिस्ती जादूगाराला ठार करावा, असें कित्येक म्हणाले; पण त्या चमत्कारानें दुसऱ्या पुष्कळांनीं पेगन धर्म सोडिला (२९).

## ज्यूलियन बादशहाची जादूगारांवरील भक्ति.

( क० ९ ) कान्स्तंतियसनें जादूगारांचा मांडलेला छळ अर्थातच ज्यूलियनच्या कारकीर्दीत बंद पडला. या बादशहाचा काळ, त्याला सोसावा लागलेला चीड उत्पन्न करणारा त्रास, व त्यानें दाखविलेला उत्कट धार्मिक उत्साह, या गोष्टींचा विचार केला असतां, याची सहनशीलता इतिहासांत वाखाणण्यासारख्या गोष्टींपैकीं होय. पेगनधर्मांत मानिलेल्या जादूच्या प्रकारांबद्दल त्याला उत्कट भक्ति होती, आणि त्याच्या वाड्यांत जादूगारांची नेहमीं गर्दी असे. मेध्यांत्रावलोकनानें ( बळी दिलेल्या प्राण्यांचीं आंतडीं पाहून) भविष्य सांगण्याचा प्रकार कान्स्तंतियसनें मना केला होता, पण तो ज्यूलियनच्या राज्याभिषेकाच्या वेळीं पुनः सुरू झाला; आणि ख्रिस्ती लोकांत अशी बातमी पसरली कीं, त्या प्रसंगीं सुळावर मुकुट चढविलेला आहे, अशी आकृति त्या आंतड्यांत दिसली (३०). जोव्हियनच्या थोड्या दिवसांच्या कारकीर्दीत ही सहनशील दृष्टीच कायम राहिलेली दिसते; पण व्हालेन्तिनियननें छळ पुनः सुरू केला; व अजून चालू असलेल्या अधर्म्य प्रार्थनेच्या व निशीथयागांच्या विरुद्ध एक कायदा केला. (३१) हा कायदा ग्रीसमध्यें प्रस्थापित धर्माच्या अगदीं उलट असल्यामुळें, फारच असंतोष उत्पन्न करण्यास कारण झाला; इतका की, व्हालेन्तिनियननें त्या प्रांतांत त्याची अंमलबजावणी न करण्यास संमति दिली; पण बादशहातीच्या इतर भागांत जिकडे तिकडे भयंकर छळ व हालअपेष्टा चाललेल्या दिसूं लागल्या (३२).

## पाखंडी मतें न मानणारांचा छळ.

रोमी बादशाहतीच्या पूर्व भागांत एरियसचीं पाखंडी मतें ग्रहण न करणारांचा पक्षपात न करितां कळकळीनें व्हालेन्स छळ करित होता. असें म्हटलें आहे कीं, 'तत्त्वज्ञ' हें नुसतें नांवच दंडपात्र होण्यास पुरेसें असे; आणि अति क्षुल्लक गुन्ह्यांना देखील देहान्ताशिक्षा देत असत. एका तत्त्वज्ञानें खासगी पत्रांत आपल्या बायकोला उपदेश केला होता कीं, दरवाज्याच्या कमानीवर मुकुट घालण्यास ( दरवाज्यावर तोरण बांधण्यास ) विसरूं नको; एवढ्यावरून त्याला देहान्त–शासन मिळालें. जादूच्या गाण्यांनीं ज्वराच्या वेदना कमी करण्याचा प्रयत्न केल्यावरून एक म्हातारी बाई जीवें मारली गेली. एका तरुण मनुष्यास हगवण लागली; तेव्हां तोंडानें मूळाक्षरांतले स्वर म्हणत राहून संगमरवरी दगडांच्या खांबाला हात लावून तो आपल्या अंगाला लावायचा; असें वारंवार केल्यानें आपलें दुखणें बरें होईल असें त्याला वाटलें. पण तसें करण्याचें प्रायश्चित्त म्हणून हाल हाल होऊन ठार मरण्याची शिक्षा त्याला भोगावी लागली (२३). तरी हा त्याचा धार्मिक खुळेपणाचा प्रकार कांहीं मोठा भयंकर नव्हता.

## छळांत धर्मनायकांच्या अंगाविषयीं पराचा कावळा झाला असावा.

( क० १० ) पाखंडी एरिअसच्या पंथाच्या व सनातन ख्रिस्ती धर्मांच्या लोकांनीं जादूगारांचा जो हा छळ केला, त्याविषयीं वाचीत असतां, कांहीं ठिकाणीं पराचा कावळा साहजिकपणें झाला असेल. एवढें लक्ष्यांत बाळगलें पाहिजे. ज्या राजाज्ञापत्रांवरून हा छळ झाला, त्यांचा संबंध प्रत्यक्ष ख्रिस्ती धर्मनायकांकडे-लावणें फार गैरवाजवी होईल, आणि त्या आज्ञापत्रांची अंमलबजावणी ज्या आवेशानें झाली, त्याचा संबंध त्यांच्याकडे लावणें त्याहून गैरवाजवी होईल. कांहीं बादशहा व शासनशाखाधिप यांच्या स्वतःच्या अंगचा रानटी निष्ठुरपणा, तसेंच श्रीमंतांची मालमत्ता जप्त करायला कांहींतरी निमित्त शोधणारी त्यांची अपहारबुद्धि व सध्यांच्या बादशहाच्या मागून राज्यसूत्रें कोणाच्या हातीं जातील हें शोधून काढण्याच्या प्रत्येक प्रयत्नानें बादशहाच्या मनांत उद्भवणारी भीति; यांच्या वांट्यास देण्यास या छळाविषयीं बराच दोष राखून ठेविलाच पाहिजे. या तीन कारणांपैकीं

एक नाहीं एक छळाच्या बहुतेक तीव्र उद्रेकांशीं निगडित असे अशाबद्दल निर्णायक पुरावा आहे; व प्राचीन इतिहासावरून कळतें कीं, ख्रिस्ती धर्माचें प्राबल्य होण्यापूर्वीं पुष्कळ दिवस राजकीय व धार्मिक दोन्ही कारणांनीं जादूबद्दल छळ होत असे. आणखी कायद्यांत वापरलेल्या भाषेवरूनच केवळ छळाची तीव्रता मापतां नये. नमूद केलेल्या कानूंकडेच पाहिलें तर पेगन धर्मांतील पूजे-अर्चेचा बहुतेक भाग फार प्राचीन काळींच जिकडे तिकडे अगदीं बंद केला होता असें म्हणावें लागेल.

## अंमलबजावणींतील ढिलाई.

तथापि वारंवार ते कायदे व्यवहारांत धाब्यावर बसाविले जात. बादशहातीच्या सर्व भागांत सामान्यपणें सरकारी अंमलबजावणीचें काम इतकें शिथिल झालें होतें कीं, तसें अर्वाचीनकाळीं कोणत्याही निर्बल सरकारच्या अमदानींतही क्वचित्च झालेलें दिसतें. लोकमत पुष्कळ कायद्यांविरुद्ध होतें; म्हणून कायदे मोडले, तर पुष्कळदां अंमलदार तिकडे काणाडोळा करित. यामुळें कायद्यांत सांगितलेल्या शिक्षा देण्याच्या कामीं अनियमितपणा, अनिश्चितपणा व धरसोडीचा प्रकार आढळतो. कधीं या कायद्यांची अंमलबजावणी अत्यंत कडक रीतीनें होई, तर कधीं कधीं त्या कायद्यांनीं मना केलेले विधि ढळढळीत नजरेसमोर होत. राज्याच्या एका भागांत छळ क्रूरपणें जारी असावा, तर दुसऱ्या एकाद्या भागांत त्याचें नांवसुद्धां ऐकूं येऊं नये, असें सुद्धां पुष्कळदां होत असे. तथापि या सर्व कमजोर करणाऱ्या गोष्टी लक्षांत घेऊनही मूळ सिद्धांत स्पष्टपणें शिल्लक राहिलेला दिसतोच; तो हा कीं, पेगन धर्म निःसत्त्व करण्याच्या हेतूनें त्या धर्मांतून उद्भवलेल्या व त्या धर्माचें अंग म्हणून पुष्कळ दिवस सर्वत्र प्रचारांत असलेल्या बिलकूल निरुपद्रवी विधींवर रोंख धरून कायद्यांवर कायदे करण्यांत आले. आणखी हेंही स्पष्ट दिसतें कीं, जादूच्या सत्यत्वाबद्दल सर्व धार्मिक पुढाऱ्यांचा विश्वास होता, व त्यांनीं सगळे पेगन-विधि म्हणजे जादूचे प्रकार, या आरोपानें तिच्या भयंकरपणाबद्दलचें लोकमत फारच बळकट केलें. थिओदोसियसच्या अमदानींत जादूच्या इतिहासाच्या या स्वरूपाचा शेवट झाला. आपल्या कारकीर्दीच्या आरंभीं पूर्वीच्या बादशहांच्या जाहिर-

नाम्यांची पुनरावृत्ति करून तो स्वस्थ बसला; पण लवकरच त्यानें पांघरूण साफ झुगारून दिलें, व पेगन धर्मांतील प्रत्येक अंगाची कडक शिक्षेच्या दहशतीनें मनाई केली.

### पेगन धर्माचें जादूच्या कक्षेंत रूपान्तर.

( क० ११ ) ख्रिस्ती धर्मानें आरंभींच्या काळीं जादूगारांविरुद्ध वर सांगितल्या प्रकारचें धोरण ठेविलें होतें. त्याचा पुढच्या इतिहासावर कांहीं अंशीं फार महत्त्वाचा परिणाम झाला. प्रथमतः दंतकथांचें एक भांडार तयार झालें; यामुळें पुढील काळांत या दुराचाराच्या सत्यत्वाविषयीं संशयाला वाव राहिला नाहीं. आणखी तथ्याच्या मूळ कंदासभोंवतीं पाखंड न्यायासनाविषयींच्या भाकड कथांचें जाळें पसरून मोठें रान माजलें. जुन्या पेगनधर्माचा बराच भाग फार साहजिकपणें पण विलक्षण रूपांतर पावून धर्माच्या कक्षेंतून निघून जादूच्या कक्षेंत गेला. खेड्यापाड्यांतल्या लोकांत पूर्वजांपासून चालत आलेले विधि गुप्तपणें प्रचारांत होतेच; मात्र लोकांना त्याबद्दल एकसारखा धोका वाटत असे. या विधींनीं पराक्रमी व दुष्ट दुरात्म्यांचें साह्य तुम्ही मागतां अशी ओरड त्यांच्या कानीं येई; व कित्येक पिढ्या लोटल्यावर त्यांच्या कानीं येणाऱ्या गोष्टींवर त्यांचा भरंवसाही बसला. तथापि ते निषिद्ध मानलेले आचार व विधि त्यांनीं टाकले नाहींत. धार्मिक भाबडेपणाच्या काळांत साळ्याभोळ्या लोकांना आपल्या धार्मिक आचारांशीं संलग्न असलेल्या कल्पना टाकून तशाच दुसऱ्या स्वीकारणें जितकें सुलभ असतें; तितकें त्यांचा मनावरचा पगडा साफ झुगारून देणें सोपें नसतें. स्वाभाविक ऱ्हासावांचून धर्म कधींही नामशेष होत नसतात. जेव्हां ख्रिस्ती धर्माचा उदय झाला तेव्हां शहरांतल्या पेगन धर्माच्या वार्द्धक्याचे अखेरचे दिवस लागले होते; यामुळें शहरांत ख्रिस्ती धर्माचा ताबडतोब निश्चित जय झाला. पण खेड्यापाड्यांत पेगन धर्म अजून चांगला जोमांत असल्यामुळें तेथें ख्रिस्ती उपाध्याय व ख्रिस्ती सरकारी अंमलदार यांच्या त्या धर्माचें उन्मूलन करण्याच्या प्रयत्नांस त्यानें दाद दिली नाहीं.

### रानटी लोकांच्या स्वारीनें दोन्ही धर्मांची तोडजोड व भेसळ.

रानटी लोकांच्या स्वारीनें पेगन धर्माला आणखी जोर चढला; आणि सरते शेवटीं एक प्रकारची तोडजोड झाली. पेगन धर्म विशिष्ट-संस्था या रूपानें नष्ट झाला; मात्र त्यांतले निरानिराळे भाग रूपांतर पावून नव्या नांवांनीं चालू राहिले. त्या संस्थेचे पुष्कळ भाग नव्या धर्मांत निगलित झाले. नव्या धर्मांतल्या ज्या मतांशीं त्यांचें विशेष साम्य होतें त्यांशीं ते एकरूप झाले. खिस्ती धर्मांत त्या मतांस विलक्षण प्रामुख्य आलें व तीं लोकांना फारच ग्राह्य वाटून त्यांचा पगडा लोकांवर चांगला बसला. पुराणवस्तुसंशोधकांनीं पुष्कळ दिवसांपूर्वींच सिद्ध केलें आहे कीं, सनातन पंथाच्या बहुतेक प्रत्येक भागांत या मिलाफाचा मागमूस लावतां येतो. पेगन धर्मांचा एक भाग प्रस्थापित खिस्ती धर्माच्या अंगावर अवाळू होऊन राहिला. त्याला आमित धार्मिक भोळेपणाच्या विधींचें रूप आलें; व त्याची स्थिति द्विविध झाली. कधीं त्याचा मान तर कधीं निषेध होई; धड ना घरांत ना बाहेर, असा तो नव्या धर्माच्या उमाळ्यांत लडबडत राहिला. विहित धर्माचारांशीं संलग्न व अंतर्मग्न असूनही कधीं कधीं धर्मपारिषदांनीं त्याचा निषेध करावा, तर अज्ञान धर्माधिकाऱ्यांनीं त्याला वारंवार उत्तेजन द्यावें; व मधून मधून तर ज्या विहित धर्मविधींशीं तो संलग्न असेल (२४), त्यांच्याहून यांच्यावरच लोकांची भक्ति ज्यास्त निष्ठापूर्वक जडे.

### पेगन धर्मांचा अवशिष्ट भाग म्हणजेच जादूचे विधि.

(क० १३) पेगन धर्माचा तिसरा एक भाग जादूच्या विधींच्या रूपानें चालू राहिला; छळ व शाप यांस धाब्यावर बसवून हे आचार लोक चालवीत. ज्यावेळीं पेगन धर्म बुडाला म्हणून मानतात, त्या वेळानंतर सुमारें आठ शतकें हे आचार चालत होते (२५). हे पेगन धर्मांतले जादूचे विधि म्हणजे अर्थात् चेटुक वगैरेचा एक भाग आहे, व तोही तितका प्रमुख नाहीं; तथापि चेटुक वगैरेचें विवेचन करितांना हा भाग सोडून दिला असतां; तें विवेचन अपूर्ण म्हणावें लागेल. शेक्स्पीअरनें म्याक्बेथ (मराठींत मानाजी-राव) नाटकांत दाखविलेले वेडेविद्रे प्रकार जुन्या पेगन धर्मांतूनच घेतलेले होते. वेताळ-जत्रांच्या (वुईचेस साब्बाथ) अनेक वर्णनांत दायाना व हिरो-दियास यांचीं नावें हीं दोन प्रमुख पात्रें म्हणून एकत्र आढळतात. आणि

चेटक्यांवर केलेल्या आरोपांच्या कलमांत रोममधल्या भविष्य-ज्ञान्यांचे पुष्कळसे जुने आचार नमूद केलेले आढळतात.

## तमोयुगास प्रारंभ.

( क० १३ ) बाह्यांग म्हणून धर्मांचा विचार करितां पेगन-धर्मावरील ख्रिस्ती धर्माचा विजय व ख्रिस्ती धर्माची स्वतःची भ्रष्टता हीं दोन्ही इ० स० च्या सहाव्या शतकांत पूर्ण झाली; आणि ज्याला तमोयुग असें योग्य नांव देतात तें सुरू झालें म्हणण्यास हरकत नाहीं. सहाव्या व तेराव्या शतकाच्या मधल्या काळांत जेव्हां भावडेपणा सर्वत्र होता, व भोळसटपणाचे प्रकार असंख्य होते, तेव्हां चेटुक वगैरेबद्दल देहान्तशिक्षा त्यामानानें क्वचित् झाल्या; हें सकृद्दर्शनीं कांहींसें चमत्कारिक व विसंगत दिसतें. माणसांचीं मनें अमानुष गोष्टींच्या कल्पनांनीं बनलेलीं व त्यांतच साफ मुरलेलीं, तसेंच सैतान सदा जवळ उभा असतो आणि तो पराक्रमी आहे अशा कल्पना खोल व सर्वत्र पसरलेल्या जशा या काळांत होत्या तशा इतर कोणत्याही काळांत नव्हत्या. भुतांनीं पछाडल्याचे, भुतें काढल्याचे, चमत्कार केल्याचे व सैतान पाहिल्याचे हजारों दाखले नमूद केलेले आहेत. त्यांबद्दल कोणालाही यत्किंचित्ही शंका येत नसे; व त्यामुळें कल्पनेचे तंतु वाटतील तितके दूर पसरावयाला नेहमीं वाव मिळे. कधींना कधीं तरी एखाद्या दुरात्म्यानें प्रत्यक्ष भेट दिली नाहीं, असा मोठासा संत विरळाच आढळावयाचा. हे दुरात्मे कधीं कधीं किळसवाण्या विद्रूप प्राण्याच्या रूपानें, कधीं कधीं काळ्या कभिन्न माणसाच्या देहानें, तर कधीं मोहक सुंदरीच्या थाटानें, कधीं व्यासपीठावरून प्रवचन करणाऱ्या धर्मोपदेशकाच्या आविर्भावानें, तर कधीं देदीप्यमान देवदूताच्या वेषानें व कधीं कधीं त्याहूनही पवित्र स्वरूपानें दिसत (३६). तथापि या कल्पनांवर जरी पूर्ण विश्वास असे व त्यांची पूर्ण प्रचीति येई, तरीही त्यामुळें समाजाला फारशी भयानक स्थिति प्राप्त झाली नाहीं; हें आतां चमत्कारिक वाटेल खरें, पण वस्तुस्थिति तशी होती.

## भावड्या कल्पनांवर औषध.

भावडेपणाच्या प्रकारांची वाढच त्या कल्पनांवर औषध झालें. दुरात्माधिराज सैतान महाराज सदा ख्रिस्ती माणसांभोंवतीं घिरट्या घालीत अस-

तात, असा दृढ समज असे; पण त्याबरोबर असाही समज असे कीं, सूळाची आकृति, तीर्थोदकाचे चार शिंतोडे, किंवा मेरीचें नामस्मरण, यांनीं त्यांची स्वारी लगेच लाजिरवाण्या रीतीनें 'यःपलाय' करते. संतांच्या जीवन–चरित्रांत या महाराजांचे कावे बरेच भरलेले आढळतात; पण त्यांचा जेथें तेथें पाडाव झालेला, त्यांचें नाक ठेचलेलें, त्यांची छीः थुः झालेली दाखविली आहे. सिप्रिअनच्या आज्ञेवरून प्रत्यक्ष सैतानानें धर्म-दासी झालेल्या एका अनाथ, अज्ञान, कुमारिकेला वारंवार अडविलें होतें; कौमारव्रताची निंदा करण्यांत आपलें सगळें तर्कटशास्त्र खर्ची घातलें होतें, व त्या तरुणीवर आसक्त असलेल्या एका पेगन–धर्मी थोर गृहस्थाचे गुणा-नुवाद गाण्यांत आपल्या अलौकिक वाक्चातुर्याचा प्रवाह चालविला होता. पण केवळ सूळाची आकृति दाखविल्याबरोबर सर्व तर्कटें उघडीं पडलीं; ऐहिक प्रीतीचा झरा वाळून गेला, आणि त्या दुष्टाचे सर्व प्रयत्न फसून तो घाबरून आपणांस पाठविणाऱ्या जादुगाराकडे पळून गेला (३७).

## संतांच्या कांहीं गोष्टी.

सन्त मार एकदां देवळाकडे चालला असतां भुतांचीं पथकें भयंकर व्यूह रचून देवळाला वेढा देऊन बसलीं व धमकावणीच्या हावभावांनीं त्या साधूला अडवूं लागलीं; पण भूतापसारक मंत्राचीं चार अक्षरें उच्चारलीं नाहींत, तोंच तीं सर्व भुतें क्षणांत वातावरणांतून दशदिशा पळून गेलीं. रोम-मधल्या सन्त डामिनिकच्या देवळांत पुष्कळ दिवस एक प्रचंड शिळा दाख-वीत. ही शिळा सन्त डामिनिकच्या डोक्यांत एकदां सैतानानें निराशेच्या आवेशांत घातली होती; अशा हेतूनें कीं, त्या साधूचें मस्तक चिरडून टाकावें; पण संरक्षक देवदूतानें पाठीशीं घातल्यामुळें मस्तक बचावलें; व सैतानाचा प्रयत्न व्यर्थ गेला. दुष्ट दुरात्म्यांचा मत्सरमूलक प्रयत्न फसवायला निष्ठावंत धार्मिकांना दिलेल्या हजारों कवचरूप पवित्र वस्तूंपैकीं एकादी पुरे होई. सन्त जानचें शुभ वर्तमान गळ्यांत बांधावें, एकादी स्मरणी हातीं घ्यावी, किंवा एकाद्या भगवद्भक्ताची राखून ठेवलेली एखादी स्मरणीय वस्तु जवळ बाळगावी, म्हणजे काम झालें. या धर्मशिक्षणामुळें उत्पन्न होणारी ही विचार-सरणी हल्लींच्या काळच्या विचारसरणीहून इतकी भिन्न आहे कीं, तिची कल्पना होण्यास आपल्या कल्पकशक्तीला बराच ताण द्यावा लागतो.

## चेटकाविषयींच्या विश्वासोन्मुखतेचें कारण.

चेटुक वगैरेविषयींच्या समजुतीला जो बौद्धिक आधार म्हणून मानितां येईल, तो त्यावेळीं अतिशय होता. दुरात्म्यांच्या अस्तित्वाविषयींची सर्व कल्पना अर्थात् अद्‌भूत चमत्कारांविषयींची विश्वासोन्मुखता त्यावेळीं होती, आणि पंधराव्या व सोळाव्या शतकांतल्या लोकांच्या कल्पनाशक्तीवर तिचा फार भयंकर परिणाम झाला; पण ज्या श्रद्धातिशयानें, ज्या अमर्याद व उत्कट भावडेपणानें, धार्मिक विधींच्या अंगचा गुण सर्वांना मान्य होई, त्यायोगें ती चेटकाविषयींची विश्वासोन्मुखता निरुपद्रवी होऊन जाई. जर का लोक जरा कमी भावडे असते, तर ही विश्वासोन्मुखता बरीच भयपरिणामी झाली असती. खऱ्या धर्माच्या सरळ मार्गातून जर का कोणाचें पाऊल जरा वांकडें पडलें, तर तो सैतानाच्या तावडींत पूर्णपणें लवकरच सांपडायचा, अशी लोकांची पक्की समजूत असे; पण ज्यापक्षीं शंका घेण्याची किंवा बंड करण्याची प्रवृत्ति नसे, त्यापक्षीं त्या समजुतीमुळें कांहीं विलक्षण भयानक स्थिति उत्पन्न झाली नाहीं.

## धर्मशिक्षणांतील एक काळी बाजू.

( क्र० १४ ) तथापि या विलक्षण धर्मशिक्षणांत एक विशेष कृष्ण-रंगाचा भाग होता. निसर्गाच्या विशेष भयप्रद संघटनांवर भूतापसारक मंत्रांचा व शुद्धिजलसेकांचा मुळींच परिणाम होत नसे; आणि ह्या संघटना सदोदित अमानुष शक्तींचा प्रभाव म्हणून मानल्या जात. प्रत्येक देशांत प्राथमिक काळीं असा समज असे कीं, रोगांच्या सांथी, दुष्काळ, धूमकेतु, इंद्रधनुष्यें, ग्रहणें वगैरे क्वचित् घडणारे पण अचंबा वाटण्यासारखे प्रकार सृष्टिनियमांच्या नित्य क्रमानुसार होत नाहींत; तर ते अमानुष दुरात्म्यांच्या प्रत्यक्ष कृतीनें घडतात. अशा रीतीनें अर्धवट सुधारलेल्या राष्ट्रांचा विशेष गुण जी अद्‌भूत-चमत्कारांविषयीं विश्वासप्रवणता तिची परंपरा कायम राखली जाते; आणि कित्येकदां धर्माधिकाऱ्यांनींही असल्या संघटना म्हणजे स्वतःविरुद्ध बंडाळी म्हणून मानली आहे. सनातन पंथाचे जुने धर्मोपाध्याय या कलेंत फार निष्णात होते; व मध्ययुगांत कोणतीही क्वचित् घडणारी सृष्ट-संघटना म्हणजे अतितीव्र भयानक स्थिति उत्पन्न करण्याला त्यांना एक प्रसंगच मिळे. उदाहरणार्थ, आठव्या शतकांत जेव्हां फ्रान्स-देशाला

भयकर दुष्काळानें ग्रासलें, तेव्हां फ्रेंचलोकांनीं दशमांशदान—पद्धतीविषयीं दाखविलेल्या तिटकाऱ्याचें हें फळ, असें साधारणपणें भासविलें गेलें (३८). नवव्या शतकांतल्या सूर्याच्या खग्रास-ग्रहणामुळें सर्व युरोपखंड भयानें गांगरून गेलें होतें व तें एका फ्रेंच राजाच्या मृत्यूचें एक कारण म्हणून म्हणत (३९). दहाव्या शतकांत अशासारख्याच एका गोष्टीनें सगळें सैन्यचें सैन्य दशदिशा पळून गेलें (४०). अनेकदां धूमकेतूच्या दर्शनानें सर्व यूरोप भयानें वेडावून गेलें होतें; व जेव्हां जेव्हां एकाद्या नांवाजलेल्या व्यक्तीला एकाएकीं कांहीं दुखणें होऊन मरण येई, तेव्हां त्याच्या मरणाला चेटुक वगैरे कारण झालें असें मानीत.

## चेटकाच्या भ्रामक कल्पनांनीं दुसऱ्यांसच झालेल्या शिक्षा.

असल्या विचारसरणीचा स्वाभाविक परिणाम असा व्हावासा वाटतो, कीं चेटकाची कल्पना आंगवळणीं पडून तिच्या भयानें मन बिलकूल भ्रमूं नये. भावडेपणा जिकडे तिकडे परिचयांतला झाला होता; पण धार्मिक भयानक स्थिति मधून मधूनच व्हावी व झाली तर क्षणभंगुर असावी. म्हणून ज्या काळाच्या संबंधानें हें विवेचन चाललें आहे, त्या काळीं चेटुक वगैरे गोष्टी जरी माणसांच्या संवयींतल्या झाल्या होत्या; तरी त्यांना पुढें जें महत्त्व आलें, तें या काळीं नव्हतें म्हणून विस्मय वाटायला नको. या काळीं अजून सैतानाशीं विधिपूर्वक करार केल्याची कल्पना निघाली नव्हती; परंतु चेटकासंबंधीं पुष्कळशा गोष्टींना गुन्हे मानून त्यांबद्दल चौकशी होई आणि शाप व शिक्षा दिल्या जात. उदाहरणार्थ, फ्रेदेगांदचा एक मुलगा सहाव्या शतकाच्या अखेरीस थोडा वेळ दुखणाईत होऊन वारला, व पुष्कळ बायांना वेदनामय यातना बराच वेळ देऊन सरते शेवटीं जाळून अगर राहाटावर ताणून मारिलें; कां ? तर त्यांनीं मंत्रांनीं राजपुत्राला मरण आणिलें म्हणून(४१). फ्रान्समध्यें जसा जुना 'सालिक' कायदा तसाच त्याच संबंधींचा 'कोदेक्स द म्याथेम्यातिसिस एत् म्यालेफिसिइ' 'गणक व दुराचारी यांसंबंधीं कायदा'(४२). हा कायदा जर्मनींत पुष्कळ दिवस अमलांत होता. चेटुक करणाऱ्यांस देहान्त शिक्षा देणारे फार जाचक व नवे कायदे शार्लमेननें केले व त्याच्या कारकीर्दींत असंख्य लोक मारले गेले. (४३) गारांची वृष्टि, विजांचे कडकडाट, हीं बहुधा सर्वत्र जादूगारांच्या कृत्यांचीं

फळें मानीत. मात्र या बाबतींत नवव्या शतकांतल्या एका धर्माधिकाऱ्यानें म्हणजे आगोबार्द नांवाच्या लियान्सच्या धर्माध्यक्षानेंच काय तें या लोकग्रहाला विरोध करण्याचें दुष्प्राप्य श्रेय घेतलें (४४).

## मध्ययुग व सतराव्या शतकांतील "गुह्यवादी पंथ."

( क्र० १५ ) मध्ययुगांत आणि सतराव्या शतका इतक्या अलीकडे सुद्धां क्याब्यालिस्तांचा ( गुह्यवाद्यांचा ) म्हणूनही एक पंथ होता; त्यांचा विशेषेंकरून जादुगार म्हणून छळ झाला. त्यांच्या गूढ मतांची स्पष्ट कल्पना होणें सोपें नाहीं; या मतांकडे पुष्कळ दिवसपर्यंत बहुत लोकांचा विलक्षण ओढा होता; आणि कार्दन, आग्रिपा व पारासेल्सस यांच्या जबरदस्त व धाडशी बुद्धीलाही या मतांनीं मोहून टाकलें होतें. ज्यू लोकांत पुष्कळ काळ चालू असलेल्या अनेक दंतकथा, प्लेटोच्या जुन्या पंथाचें दीमन (भुतें, राक्षस) विषयीं मत व निव्वळ निसर्गधर्माचा बराचसा भाग इतक्या गोष्टी या पंथांत समाविष्ट झालेल्या दिसतात. आपल्या काळांत ज्याला केवळ बुद्धिभ्रंश मानतील, पण त्या काळांत जो स्वाभाविक प्रकारच होता, असला कांहीं भोळसटपणा त्या पंथांत होता; व त्याच्या बरोबरच विलक्षण धीटपणाचें संदिग्धमतित्वही होतें; आणि उघडपणें मान्य करीत त्यापेक्षां बहुधा बराचसा भाग रूपकांनीं आच्छादिलेला असे. हा पंथ निसर्गदैवतें मानी.

## रूपकांनीं दाखविलेलीं दैवतें.

हीं दैवतें सद्‍गुणांनीं मानवजातीहून श्रेष्ठ पण मर्त्य असून त्यांच्या अंगीं मानवी भंगुरतेचा अंश नसे असें नाहीं. हीं दैवतें म्हणजे चार महाभूतांचे प्रतिनिधि किंवा प्रकट मूर्ति होत. त्या ह्याः—पृथ्वीची नोम, जलाची ओन्दिन, तेजाची सालाम्यान्दर व वायूची सिल्फ. या निसर्गदैवतांशीं संभाषण करण्यास समर्थ होणें ही तत्त्वज्ञानें मिळवावयाची श्रेष्ठ सिद्धि होय. ही सिद्धि प्राप्त करून घेण्यास मनुष्यानें प्रपंचाचा त्याग केला पाहिजे. ब्रह्मचर्य, निरशन, अश्रांत व अविरत अध्ययन, निसर्ग व निसर्गनियम यांचें निदिध्यासपूर्वक ध्यान, या उपायांनीं आपल्या आत्म्याची शुद्धि केली पाहिजे; व विशेषतः धर्माधर्मांतील क्रोधमूलक वाद तुच्छ मानिले पाहिजेत, प्रत्येक धर्मांत मानवजातीवरील

निसर्ग-दैवतांच्या परिणामाचें आविर्भवन व नवें रूप शाश्वत-नियमाचें अंग आहे, हें ओळखलें पाहिजे.

## दैवतांचें मनुष्यांशीं संघट्टन.

या धर्ममतांची आधारभूत कल्पना ओळखणें कठिण नाहीं; तथापि तत्त्वें कशींही असलीं तरी, त्या त्या काळच्या स्थितीशीं टक्कर देऊन यश मिळविणें कोणत्याही धर्माला शक्य नसल्यामुळें, याही धर्माच्या या साध्या कल्पनांवर मध्य-युगांतल्या विचारसरणीनें निरपवाद उत्पन्न झालेल्या पुष्कळशा हास्यास्पद व जडात्मक बारीक सारीक गोष्टींचीं लवकरच पुटें चढून त्यांना विद्रूपता आली, व म्हणून त्यांच्या केवळ बाह्यरेखा आंखण्यासच सूक्ष्मानिरीक्षण केलें पाहिजे. या निसर्गदैवतांशीं तत्त्वज्ञान्यांना खरेंखुरें लग्न लावितां येतें आणि असले संबंध जोडण्याची त्या देवतांना अत्युत्कट इच्छा असते, असा समज असे. ह्या संबंधांनीं त्या जोडप्यांस ऐहिकसुखाची जोड लाभत असे; इतकेंच नव्हे तर, परलोकींच्या सुखाचीही आशा बळकट होत असे. वायुदेवता सिल्फ हिला पुष्कळ शतकें आयुष्य होतें तरी ती अमर नव्हती; आणि तिला स्वतःच्या पुण्याईनें परलोक मिळविण्याची आशा नव्हती; पण तिच्या मानवी पतीचें अमरत्व तिला लाभे;मात्र तो जर बहिष्कृत असला तर तिला फायदा होत नसे; तथापि बायकोच्या मर्त्यत्वाचा वांटा घेऊन नरकयातना त्यास चुकवितां येत. या सामान्य कल्पनेचा बराच विस्तार झाला; आणि मानवी अधःपतनाच्या इतिहासाशीं व पेगन-धर्मज्ञानाशीं त्याचा संबंध जोडला गेला; व दोन्ही गोष्टींच्या संबंधांतलीं सनातन मतें रागानें झुगारून दिलीं गेलीं. या दैवतांचें अस्तित्व अगर मानवी-प्राण्यांना दृश्य होण्याची त्यांची संवय याबद्दल क्वचित्च कोणी शंका घेत असे. त्यांनीं आपले पंख हालविले म्हणजे जें तेज चमकतें तेंच ध्रुवांकडील उपस्तेजःस्फुरण होय असें म्हणत (४५). त्यांचा स्वभाव कसा काय आहे, याबद्दल काय ती शंका असे. क्याब्यालिस्तांच्या मतें तीं पवित्र व सद्गुणी होतीं, पण सत्यधर्माच्या मतें संत आगस्ताईननें सांगितलेले रति-सुख-भोक्ते ते हेच; आणि म्हणून त्यांच्याशीं सूत बांधणाऱ्यांस जाळून मारलें, हें योग्यच (४६).

## मायकेल प्सेलसचे ग्रंथ.

( क० १६ ) जो काळ धर्माच्या बाबतींत अनिर्बंध विचाराचा आदर करण्याइतका अद्यापि पक्क झाला नव्हता, त्या काळीं अनिर्बंध विचाराचा ओघ भलतीकडे धांवल्याचें ध्यानांत ठेवण्यासारखें उदाहरण या क्याब्या-लिस्त ( गुह्यवादी ) पंथाच्या इतिहासानें मिळतें असें वाटतें. ख्रिस्ती-धर्माचे खुद्द शत्रूच जर लाटेबरोबर इतके साफ भलतीकडे वाहून गेले व हाजिआलाजी ( ख्रिस्ती धर्मपुस्तकांतलें 'संतलीलामृत ') मधल्या विचित्र कथानकांसारख्या खुळसट पौराणिक-कथांनीं अगदीं घेरून गेले, तर सत्यधर्माच्या पक्षांतले तत्त्वज्ञ अति विश्वासोन्मुख व्हावे व त्यांच्या कल्पनांत नीरस जडवादाचें प्राबल्य असावें यांत आचंबा तो कसला ? ज्या काळचा इतिहास चालला आहे, त्या काळीं ज्या थोड्या लोकांनीं धर्मेतर वाङ्मय अल्पांशानें तरी तयार केलें, त्यांमध्यें मायलेक प्सेलस यास अग्रस्थान दिलें पाहिजे. याचे ग्रंथ हल्लीं फारच थोडे लोक वाचतात, असें दिसतें. पण हा बृहल्लेख ग्रंथकार होऊन गेला. कित्येक शतकेंपर्यंत हा बायझान्शियांतला नांवाजलेला असा बहुतेक एकटाच ग्रंथकार म्हणून वाङ्मयाच्या इतिहासांत याला अजून कांहीं विशेष मान आहे. या ग्रंथकारानें अकराव्या शतकाच्या अखेरीस 'भुतांचीं कृत्यें' म्हणून एक संवाद लिहिला आहे. जुन्या नव-प्लेतोपंथांतील अमानुष आत्म्यांची धर्मसत्ता या मताविषयीं या संवादांत बहुधा विवेचन आहे; पण त्याच्या काळीं चालू असलेल्या विचारसरणीवरही या संवादानें बराच उजेड पडतो. तो खात्री-पूर्वक लिहितो कीं, जगांत भुतें जिकडे तिकडे आहेत; माझ्या देशांतल्या लोकांत तीं वारंवार वावरतात, व नानातऱ्हांनीं आपलें अस्तित्व जाण-वितात. मीं स्वतः एकही भूत पाहिलें नाहीं, पण त्यांच्याशीं चांगलें वळण असलेल्या माणसांची व माझी ओळख आहे.

## त्याचा मुख्य आधार.

या ग्रंथकाराचा मुख्य आधार मार्कस नांवाचा एक ग्रीक माणूस होय. ह्या मार्कसचा पूर्वी भुतांखेतांवर विश्वास नसे; परंतु पुढें यानें अगदीं एकांतवास पत्करला होता; या एकांतवासांत भुतेंखेतें त्याच्या भोंवतीं मिळत; आणि म्हणून मार्कस भुतांखेतांची चालचर्या चांगली बारकाईनें

वर्णन करूं शके. येणेंप्रमाणें या विषयाची बरीच माहिती गोळा करून तिला सुव्यवस्थित रूप देऊन प्सेलसनें एक दर्शन तयार केलें. त्यांत प्राचीन मतांशीं संगति लावून भूतयोनींचीं कृत्यें व नियम हीं विवरण करून सांगितलीं. सर्व भुतें देहधारी आहेत, हा मूल सिद्धांत त्यानें स्थापिला. तो म्हणतो कीं, सत्य धर्माच्या मतें या आत्म्यांस अग्नीनें जाळिलें तरी ते ती यातना सोसतात (४७), तेव्हां त्याच मतावरून माझा सिद्धान्त अवश्यमेव निघतो.

## भुतांचीं शरीरें.

तथापि यांचीं शरीरें मनुष्यांच्या व मनुष्येतर प्राण्यांच्या शरिरांसारखीं कायमचीं घडलेलीं नाहींत; तीं वाटेल तशीं बदलतां येतात. तीं आकाशांतल्या मेघांप्रमाणें विरळ व सूक्ष्म द्रव्याचीं घडलेलीं असतात; त्यांना वाटेल तें रूप धारण करितां येतें; व वाटेल त्या अति सूक्ष्म छिद्रांतून सुद्धां त्यांना पार निघून जातां येतें. त्यांना शिक्षा भोगण्याच्या ठिकाणीं ज्या भयंकर यातना सहन कराव्या लागतात, त्यांमुळें त्यांचीं शरीरें फारच हुळहुळीं होऊन दुःखाला भितात; म्हणून ते दुरात्मे आपल्या वेदना शमविण्याकरितां सुसह्य व थोडी आर्द्र उष्णता सदोदित शोधीत असतात; आणि ते जे असे वारंवार मनुष्यांच्या व इतर प्राण्यांच्या शरीरांत प्रवेश करतात, ते यासाठींच. असें दिसतें कीं, अंगांत येणें हें अगदीं परिपाठांतलें झालें होतें; आणि वेड हा हे दुरात्मे अंगांत येण्याचाच परिणाम, असा साधारण समज असे. तथापि प्सेलस असेंही लिहितो कीं, सर्वसाधारण जो ग्रह होता त्याला कांहीं वैद्य मात्र अपवाद असत. ज्याला सर्व लोक भुताटकीचा प्रकार म्हणत त्याला हे वैद्य आंगरोग म्हणत. धोपट मार्गाला हे वैद्य सोडून कां जात याचें कारण प्सेलसला एवढेंच देतां आलें कीं, वैद्यकीचा धंदा करणाऱ्यांत भौतिकता वाढली होती. जातां जातां रतिसुखभोक्त्या दुरात्म्यांच्या पराक्रमाच्या गोष्टीही त्यानें सांगितल्या आहेत, त्यांवरून हे दुरात्मेही त्यावेळीं माहीत होते असें दिसतें. आणि त्यानें एका भुतासंबंधीं लांबलचक ऊहापोह केला आहे; हें भूत आर्मेनियनच्या चांगल्या परिचयाचें होतें असें म्हणत.

## चेटकीची कल्पना केव्हां उद्भवली ?

यावरून तर मग आपणांस आढळून येतें कीं, मध्ययुगानंतर पाखंड-न्यायासनाच्या गृहस्थांनीं चेटुक वगैरेसंबंधीं लिहिलेल्या पुस्तकांत संकलित केलेले बहुतेक सर्व गुन्हे मध्ययुगभर माहित होते; आणि त्यांतल्या बऱ्याचशा गुन्ह्यांबद्दल ते करणारांस वारंवार प्रायश्चित्त भोगावें लागे. असें असूनही पंधराव्या व सोळाव्यां शतकांतल्या कोणत्याही एकाद्या दहा वर्षांत या गुन्ह्यांबद्दल जितक्या लोकांस देहान्तशिक्षा भोगाव्या लागल्या, तितक्यांना मध्ययुगांतल्या सहा शतकांत सुद्धां भोगाव्या लागल्या नाहींत. तथापि बाराव्या शतकांत या विषयाला अगदींच अपूर्व स्वरूप आलें. चेटकी म्हणजे कोण याविषयीं जी आपली हल्लीं कल्पना आहे, ती प्रथमतः या बाराव्या शतकांत उद्भवली ( ४८ ). चेटकी म्हणजे हल्लीं आपण असें समजतों कीं, ही एकादी बाई असते; तिचा व सैतानाचा समजून उमजून राजी-खुषीनें करार झालेला असतो; वाटेल तेव्हां अद्भूत चमत्कार करण्याची तिला ताकद मिळालेली असते; भुतांच्या निशीथोत्सवाच्या म्हणजे वेताळ-जत्रेच्या ठिकाणीं वातावरणांतून ती जाऊं शकते; आणि तेथें ती सैतानाची पूजा–अर्चा वगैरे करिते. या समजुतीनें उत्पन्न झालेलें भय पहिल्यानें जरी हळूहळू पसरलें तरी पुढें पुढें त्याचा वेग भयंकर वाढला. कधीं कधीं थोड्याशा वर्षांत हजारों लोक जिवंत जाळले जात. युरोपांतील प्रत्येक देशांत हें भय उग्रस्वरूपानें पसरलें व लोक हवालदील झाले. या गुन्ह्याच्या उन्मूलनार्थ शेंकडों चतुर न्याया-धीश निवडून त्यांची त्या कामीं योजना झाली. या विषयावर अवाढव्य ग्रंथ वाढला. आठरावें शतक बहुतेक संपेपर्यंत देहान्त–शिक्षा अजिबात बंद झाल्या नाहींत ( ४९ ).

## भोळसटपणाच्या कारणांचा शोध.

या भोळसटपणाच्या उताला सामान्यपणें जीं कारणें झालीं, त्यांचा शोध करण्याचा आतां प्रयत्न करूं. त्यांवरून आपणांस दोन गोष्टी दिसून येतील असें वाटतें; एक, धार्मिक विषयांवरील विचाराला जें वळण लागलें होतें, त्याच्याशीं चेटकाच्या ह्या व प्राचीन स्वरूपाचा निकट संबंध होता; व दुसरी, मानवी सुधारणेच्या प्रगतीशीं धर्ममतांच्या उलटापालटीच्या निय-

मांचा जो संबंध असतो, त्याचा चेटकाचा इतिहास हा एक विनचूक निदर्शक होय.

## बौद्धिक स्थितींत पालट.

( क० १७ ) युरोपांतल्या धर्मसुधारणेच्या पूर्वीच्या शतकांच्या इतिहासाचें जितकें जितकें बारकाईनें अवलोकन करावें, तितकी तितकी एक गोष्ट स्पष्ट दिसूं लागते. ती गोष्ट ही कीं, बाराव्या शतकांत युरोपच्या बुद्धिसरितेचा ओघ साफ पालटला. त्या शतकांत लातिन वाङ्मयाचें जिकडे तिकडे पुनरुज्जीवन झालें. या पुनरुज्जीवनाचीं कारणें पुष्कळ व गुंतागुंतीचीं आहेत व तो गुंता उकलीत बसणें त्रासाचें व अवघड काम आहे. या पुनरुजीवनानें युरोपच्या बौद्धिकस्थितींत गाढ पालट झाला व त्या पालटांतच लोकग्रहांतला फरक गुप्तरूपानें होता; व त्या पालटानेंच तो होणें अवश्य झालें होतें. पुष्कळ शतकानंतर संदिग्धमतित्व पहिल्यानेंच भावडेपणाशीं तोंड देतांना दिसतें; तसेंच केवळ धर्मेतर ज्ञानाबद्दलची हांव धर्मज्ञानेच्छेची थोडीशी जागा पटकावतांना आढळते, आणि या सर्व गोष्टींचा परिणाम असा नजरेस येतो कीं, ख्रिस्ती धर्माच्या परिघाबाहेरच्या लोकांबद्दल जो पूर्वी तुच्छतापूर्ण द्वेष वाटत असे, तो कांहीं कमी झाला. विचाराच्या व ज्ञानाच्या प्रत्येक प्रांतांत एक प्रकारची अस्पष्ट चल-बिचल, एक प्रकारची चंचल व मनाला पोळणारी चिंता दिसूं लागली, व ही चिंता पूर्वीच्या निद्रावशतेशीं ताडून पाहतां विलक्षण विरोध भासूं लागला. निश्चितपणें दीर्घकाळ घोरत पडलेल्या सत्य धर्माची पुष्कळ पाखंडांनीं झोंपमोड केली व या पाखंडांचा वारंवार जरी मोड झाला, तरी प्रत्येक पुढील शतकांत त्यांना अधिकच जोर व स्थैर्य आलें, असें दिसतें. ख्रिस्तीधर्मानुयायांतच जें म्यानिकि ( द्वितत्व ) मत कांहीं काळ धुमसत होतें, त्याचा आल्बिजेन्स ( याज्ञिकी-विरोधी ) लोकांत एकदम भडका उडाला; आणि भिक्षुकी चिथावणीनें हजारों लोकांची भयंकर कत्तल झाल्यामुळेंच तो भडका शमला.

## युरोपांत निष्पक्षपाती तत्त्वज्ञानाचा प्रारंभ.

आबेलार्दनें निष्पक्षपाती तत्त्वज्ञानाचा युरोपमध्यें जो पहिल्यानें झेंडा रोंविला; आणि विद्वानांचीं मनें जीं ख्रिस्ती धर्माच्या प्रमुख मतांविषयीं

सूक्ष्म व मन गांगरवणाऱ्या शंकांनीं द्विधा झालीं; तें सर्व याच वेळीं घडलें. त्याच वेळीं आणखी सेविल व कार्दोवा या नगरांकडून हेकेखोर व उग्र पाखंडमतांची वीज चमकूं लागली; व आव्हेरो-मताचा प्रसार इतका अफाट वाढूं लागला कीं, त्यानें पुढें अखिल युरोपीय बुद्धीला आपल्या तेजानें दिपवून टाकलें; आणि आतां ख्रिस्त–विरोधी साम्राज्य सुरू झालें, असें कांहीं समर्थ विद्वान् गृहस्थांना बहुतेक वाटूं लागलें (५०). आणखी त्याच समयीं फलज्योतिष व तद्गर्भभूत भवितव्यतावाद हीं पेगन वाङ्मयाच्या जीर्णोद्धाराबरोबर पुनरुज्जीवित झालीं व त्यांचा राजांच्या वाड्यांत व सरदारांच्या हवेल्यांत शिरकाव झाला. जरा कोणी कांहीं शंका घेतली, प्रस्थापित धर्माच्या अधिकाराविरुद्ध पुंडाई करण्याचा जरा का कोणाचा कल दिसला, व विशेषेंकरून जर का कोणी पाखंडमत प्रतिपादलें, तर तें थेट सैतानाच्या चिथावणीचें फळ, असें मानलें जाई व या गोष्टींची वाढ म्हणजे त्याच्या विजयाचें मापच लोकांना वाटे. तथापि आतां या गोष्टी एकवटून जिकडे तिकडे कुंदपणा आणित होत्या. युरोप यावेळीं अनिर्वाच्य यातना उत्पन्न करणाऱ्या युगाच्या उंबरठ्यांत पाऊल टाकित होतें.

## कार्यकारणाची अस्पष्ट जाणीव.

अशा युगांत मनुष्यांना शंका घेण्याचें समजलेलें असतें; पण अजून शंका म्हणजे निरुपद्रवी असते हें उमजलेलें नसतें. अशा युगांत नवीन मानसिक जागृतीनें लोकांत नानामतें उत्पन्न होतात; पण एका प्रकारच्या मतांहून इतर सर्व प्रकारचीं मतें म्हणजे सैतानाच्या शिकवण्या, असें जुन्या भोळसटपणानें त्यांना वाटतें. कार्य–कारणान्वेषी चेतना अजून उपजली नव्हती. अथवा आबेलार्दच्या मनांत जर तिचें किंचित् चिह्न उमगून काढतां येतें असें म्हटलें, तर निदान तें उद्भूत भीति शमविण्याला अत्यंत कमजोर होतें असें म्हणावें लागेल. स्वतंत्र परीक्षण-बुद्धि नव्हती; प्रामाणिकपणें केलेल्या चौकशीवर विश्वास नव्हता; परंपरागत मतांपेक्षां किंवा हटवादी सिद्धांतांपेक्षां जरा उंच पाहण्याची प्रवृत्ति नव्हती; निर्णय लोंबत राहिल्यामुळें होणारा ताप सहन करण्याची शक्ति नव्हती; बुद्धीचा वापर केल्यामुळें अवश्यमेव उत्पन्न होणाऱ्या शंका निंद्य

मानण्यानें खिस्ती धर्मानें प्रत्यक्ष मानवी बुद्धीलाच निंद्य मानलें व प्रामाणिकपणें वागूनही जर चूक झाली, तर तो सुद्धां गुन्हा ठरविण्यानें प्रत्यक्ष मानवी नीतिप्रवृत्तीलाच दंड्य ठरविलें.

## साशंकवृत्ति व तिचे परिणाम.

( क० १८ ) विचारसरणीच्या असल्या स्थितींत सैतान सदोदित जवळ उभा आहे, या कल्पनेला विलक्षण प्रमुखता व भयोत्पादकता यावी; हें कळणें कठिण नाहीं. लोकांचीं मनें शंकांनीं ग्रस्त होत; त्या दाबण्याचा ते प्रयत्न करीत, पण तो वायां जाई; आणि त्यांचा ठाम समज होई कीं, सैतानाच्या शिकवण्यांनीं या शंका उद्भवतात. तत्त्वज्ञान व भौतिक शास्त्रें यांची जसजशी त्यांस गोडी लागत गेली, तसतशी त्यांची पेगन-धर्मी व महंमदी लोकांविषयींची भीति कमी होत गेली. कारण पहिल्यांजवळ तत्त्वज्ञानाचा व दुसऱ्यांजवळ भौतिकशास्त्रज्ञानाचा सांठा होता. ज्ञान-सोपानाची एकेक पायरी जसजसे ते चढून जात, तसतसे ते त्या काळीं प्रचारांत असलेल्या नीरस जडवादाकडे अधिकाधिक तिरस्कार-दृष्टीनें पहात; व मागचींतल्यापेक्षां प्रत्येक पुढील पिढींत बुद्धीचा सामान्य कल खिस्ती धर्मा-विषयीं ज्यास्त उघडपणें वैरभावाचा होई. उलटपक्षीं खिस्ती धर्मानें अत्युग्र करारीपणाचें रूप दाखविलें. त्या धर्माच्या दृष्टीनें पुंडाई किंवा शंका म्हणजे अति मोठा गुन्हा. दुरात्म्यांविषयीं व परलोकाविषयीं जें त्या धर्माचें मत होतें, त्यामुळें भयोत्पादनाचीं यंत्रेंच त्याच्यापाशीं होतीं; व या यंत्रांचा होईल तितका उपयोग करून घेण्याला तो तत्पर होता. यामुळें बाराव्या शतकाच्या सुमारास धार्मिक लोकशिक्षणाचें स्वरूप अधिक उग्र व गंभीर होऊं लागलें व लोकांच्या भक्तिभावांत धार्मिक हट्टाची छटा ज्यास्त गहिरी दिसूं लागली. सैतानाला प्रायः खेळवणें करणारी व अढळ भावाच्या उद्दामतेमुळें त्याच्या कावेबाजपणाच्या युक्त्यांची टर उडवणारी जुनी विश्रब्धवृत्ति जाऊन तिच्या जागीं कठोर व उदास तापसवृत्ति आली. सैतानाच्या मूर्तीची भीषणता ज्यास्त झाली व खिस्ताच्या मूर्तीची मोहकता कमी झाली.

## खिस्ताच्या मूर्तींत पालट.

दहाव्या शतकाच्या समाप्तिपर्यंतच्या खिस्ती कारागिरींतल्या चित्रांत कर्णिकेंतली मूर्ति प्रायशः अलौकिक चमत्कारानें शरणा-

गताचें रक्षण करण्यांत गुंतलेल्या व मुखावर अत्रस्त सौम्यता व शांतता पसरली आहे, अशा नवयौवनसंपन्न पुरुषाची असत असे. रोमच्या शवदीर्घिकेंतलें बहुधा प्रत्येक पूजामंदिर मंडित करणारा सज्जनधनगराचा दृष्टांत हा अजून प्रत्येक चितान्याचा आवडता विषय असे; व ख्रिस्ती धर्मांतल्या उग्रस्वरूपाच्या प्रसंगांचे देखावे त्या मानानें क्वचित् आढळत. अकराव्या शतकांत हें सगळें बदलूं लागलें. सज्जनधनगर अगदींच लोपला. स्वजनरक्षणचमत्कार कमी झाले व त्यांच्याऐवजीं ' अखेरच्या निर्णया ' संबंधीं नानाविध यातना व ख्रिस्ताच्या अखेरच्या क्लेशांचे देखावे आले; ख्रिस्ताची मुद्रा उग्र, वयस्क व खिन्न झाली. बाराव्या शतकाच्या सुमारास हा बदल बहुधा सर्वत्र झाला.

## एका आधुनिक प्राचीन–वस्तु–संशोधकाचें मत.

एक फार विद्वान् आधुनिक प्राचीन–वस्तु–संशोधक लिहितो कीं, या वेळेपासून ' ख्रिस्त अधिकाधिक खिन्न आणि पुष्कळदां खरोखरच भयंकर दिसतो. तो खरोखर आमच्या ईश्वरी क्रोधाचें राजकीय प्रखर तेज होय. तो बहुधा भय हा ज्ञानाचा पाया (५१) करणारा यहुद्यांचा देव दिसतो.' याच काळीं प्रतोदपात व मठांतील बारीकसारीक नियम–नित्य रक्तस्रावाची चाल–मठांत सर्वसाधारणपणें प्रचारांत (५२) आले. नंतर लवकरच कशापाती म्हणजे स्वतःच्या अंगावर चाबूक ओढणाऱ्या मठवाशांचा एक पंथ निघाला. यांचें उग्र तप व जगांत सर्वत्र दिसणाऱ्या विषमतेबद्दल कळवळ्याचा आक्रोश, यांनीं जनतेच्या विचारांचा ओघ तिच्या कल्पकशक्तीला सुतराम् चेतविणाऱ्या विषयांकडे वळविला. बहुतेक याच सुमारास सत्यधर्माच्या शांततेच्या छायेंत मागील बऱ्याच शतकांत प्रायः माहीत नसलेल्या धर्माच्या बाबतींतला छळ पुनः सुरू होऊन तीव्रतर झाला. तेराव्या शतकाच्या आरंभीं तिसऱ्या इनोसेन्टनें पाखंड–न्यायासन स्थापिलें व राजे लोकांकडे पाखंड–निर्मूलनार्थ आपल्या सामर्थ्याचा उपयोग करा, अशी पहिली चेतवणी पाठविली; व पुढल्या शतकांत हें नवें न्यायासन सुरू झालें, अथवा निदान पाखंडाच्या गुन्ह्याबद्दल युरोपांतल्या बऱ्याच मोठाल्या देशांत बळी पडले.

## दारुण स्थिति वरून खालपर्यंत पोंचली.

स्थित्यंतरविमुख धर्म व अल्प तरी प्रगति करणारा आणि पुढाव्याकडे दुर्बळ पण खरीखुरी प्रवृत्ति असणारा काळ, या दोहोंमध्यें झालेल्या झगड्यानें जी दारुण स्थीति झाली, ती पाखंडी व्हावयालाही अयोग्य अशा अज्ञानांधकारांत खोल बुडालेल्या लोकांपर्यंत जाऊन पोंचली. व्यासपीठावरून अगर पापांगीकारपीठावरून उपाध्यायानें, खेडवळाशीं व्यवहार करितांना मठवाश्यानें, शोकपूर्ण पद्यांनीं व देहदंडनाच्या देखाव्यांनीं कशापाती वैराग्यानें, व विशेषतः गुन्ह्यांच्या निकालांनीं पाखंडन्यायासनांतील न्यायाधिशानें, खालच्या वर्गांतील लोकांना सैतान सदोदित जवळ उभा असतो व त्याचा विजय होत असतो, या गोष्टींचें असें ज्ञान करून दिलें कीं, तें त्यांनीं स्वाभाविकपणेंच स्वतःला अतिपरिचित अशा कल्पनांला जोडून दिलें. अजून भावडेपणा व अज्ञान विलक्षण भरून राहिलें होतें अशा काळांत जनतेच्या धर्मांत अवश्यमेव वेडेविद्रे भोळसटपणाचे प्रकार असत; व धार्मिक मतांच्याही बरेच पलीकडे पुष्कळदां ते जात, तरी त्यांत त्या मतांची झांक व सामान्य सरणी हुबेहुब प्रतिबिंबित झालेली असे.

## सैतानी कर्तबगारी सभोंवतीं दिसूं लागली.

या भोळसटपणाच्या प्रकारांत एकदां यक्षिणी, जलाधिकामिनी, राक्षस व पक्षवन्नाग यांच्या भीषण दंतकथा असत; संतांचे चमत्कार, ज्यांत सैतान प्रमुखत्वानें झुंजला पण एकसारखे पराभव पावला असे झगडे, अथवा मंत्र अगर ( साधुसंतांचे ) अवशेष यांच्या अमर्याद सामर्थ्यांचे दाखले, यांची प्रायः गर्दी असे. बाराव्या शतकाच्या सुमारास हा भोळसटपणा गाढ होत गेला व वेताळजत्रेच्या आनंदाच्या व सैतानाच्या हस्तकांच्या भयंकर सामर्थ्यांच्या गोष्टींविषयीं लोकांच्या मनांत कल्पना-तरंग उठूं लागले. पाखंडन्यायासनाच्या न्यायाधीशांनीं सर्व युरोप पालथें घातलें आणि ते असें जाहीर करीत सुटले कीं, जिकडे तिकडे सैतानाची अविश्रांत खटपट चालू आहे. त्या न्यायाधीशांनीं जे प्रथमच बळी घेतले, त्यांच्यावर जादूचा आरोप होता व अर्थांतूच त्यांना शिक्षा झाल्या. ( ५३ ) असल्या शिक्षांमुळें त्या गुन्ह्याच्या सत्यतेविषयींचा लोकांचा ग्रह पूर्वी होता त्यापेक्षां ज्यास्त निश्चित झाला, असें नाहीं; पण त्यांच्याचमुळें आरोपांची संख्या

मात्र वाढली. लोकांची कल्पनाशक्ति त्याच विषयांत गुंतली. भयानकतेची सांथ उद्भवली. या सांथीनें ज्यांचीं मनें पूर्ण ग्रस्त झालीं, त्यांना सैतानाशीं आपलें सूत्र जमलें असें वाटूं लागलें; व सर्व लोकांत सैतानी कर्तबगारी सभोंवतीं दिसण्याला लागणारा पूर्वग्रह वाढला.

## भयानकतेमुळें निराशा.

या सर्व गोष्टींला सामाजिक व राजकीय गोष्टींची एक लांब माळच जोडली पाहिजे; पण एका मायकेलेत नांवाच्या प्रख्यात हयात लेखकानें आपल्या जादूसंबंधीं ग्रंथांत नुकतेंच त्या गोष्टींचें शब्दचित्र असें ठळकपणानें वठविलें आहे कीं, तसें कोणालाही वठवितां येणार नाहीं; म्हणून त्या भानगडींत पडण्याची जरूर नाहीं. समाजांत सुरक्षितपणा नाहीं, आपली अवस्था दीनवाणी झाली आहे, असें सर्व लोकांस वाटूं लागून त्यांची वारंवार साफ निराशासुद्धां होई; अशी लोकसमाजाची स्थिति झाली असतां भोळसटपणाच्या काळांत लोकांच्या मनांत भयंकर कल्पना व उच्छृंखलवृत्ति उत्पन्न व्हावयाच्याच व त्याप्रमाणें झाल्याही. पांखडन्यायासनाच्या न्यायाधीशांच्या निरीक्षणांत सदोदित पुढील गोष्टी आल्या आहेतः जिवंत जाळण्याची शिक्षा दिलेल्यांमध्यें स्त्रियांची संख्या फार असते; या स्त्रियांचें जीवित कांहींतरी विलक्षण दुःखानें गांजलेलें असतें; आणि मनोवृत्तीची खळबळ शांत करण्याचा व अनुतापाच्या वेदना शमविण्याचा ज्याचा धर्मच आहे त्या गायनवादनाची भूतबाधा झालेल्यांवर कांहीं विलक्षण छाप बसते ( ५४ ).

## कृष्णकुष्ठाची सांथ–दारुणतेला प्रोत्साहन.

( क० १९ ) आतांपर्यंत ज्यांचा छडा लावण्याचा प्रयत्न झाला त्या कारणांच्या प्रभावानें जादू, चेटुक वगैरेच्या कल्पनेला जास्त निश्चित स्वरूप आलें; व बाराव्या व तेराव्या शतकांत वाढतें प्रामुख्य लाधलें. या कल्पनेच्या उत्पादक कारणांपैकीं बहुतेक स्वधर्मानुसार चक्रारूढ वेगानें वाढत गेलीं; आणि लोककल्पना त्याच विषयांत अधिकाधिक गुंतून राहिली. चवदाव्या शतकांत अशी एक गोष्ट घडून आली कीं, तिच्या योगानें दारुण स्थितीला भयंकर प्रोत्साहनच मिळावें व मानवी इतिहासांत खरोखर ती अतिशय भयानक म्हणून मानणेंच योग्य व्हावें. ही गोष्ट म्हणजे अर्थात्

कृष्णकुष्ठाची सांथ. एका मोठ्या जर्मन वैद्यानें त्या काळच्या इतिहासाची मोठ्या विद्वत्तेनें व चातुर्यानें माहिती मिळविली आहे. त्यानें असें मत नमूद केलें आहे कीं, सर्व अतिशयोक्ति बाजूला सारून अगदीं नेमस्तपणानें हिशेब करूनही, ही कृष्णकुष्ठाची सांथ चालू होती, त्या सहा वर्षांत, एकंदर दोन कोटी पन्नास लक्ष म्हणजे युरोपच्या लोकसंख्येचा चवथा हिस्सा (५५) माणसें या सांथीनें मृत्युमुखीं पडलीं. पुष्कळ मोठ्या शहरांत निम्यापेक्षां जास्त लोकसंख्या कमी झाली; पुष्कळ खेडीं बहुतेक उजाड झालीं.

## सांथीचे परिणामः धर्माधिकारी कुबेर बनले.

मानवी कल्पनेवर अधिक भयंकर जोरानें परिणाम करण्यासारखी या सांथीहून अन्य गोष्ट घडेल, असें वाटणें क्वचित्च शक्य होईल. हल्लीं आमच्या काळींही सांथीमुळें धार्मिक भयानकतेचें मान किती वाढतें, तें आपणांस माहीत आहे; पण ज्याकाळीं अलौकिक कारणांनीं रोग होतात, असा विश्वास सर्वत्र होता त्याकाळीं तर असल्या अद्वितीय राक्षसी-सांथीनें भय उत्पन्न होऊन भ्रमिष्टासारखी घोर स्थिति झाली. या स्थितीच्या पहिल्या परिणामांपैकीं एक असा झाला कीं, धर्माधिकाऱ्यांचें संपत्तिभाण्डार अवाढव्य वाढलें; कारण या दारुण स्थितीला जे बळी पडले, त्यांची संपत्ति धर्माधिकाऱ्यांस मिळाली. कशापात्यांचा एक शतकभर मागमूस नव्हता; पण ते पुन्हां आतां उपटले; व त्यांची संख्या दसपट झाली; व त्यांच्या गाण्यांनीं युरोपाचा प्रायः प्रत्येक भाग दणाणून गेला.

## नाचाचें वेड व सैतानाचा विजय.

त्याचवेळीं आणखी जर्मनी व फ्लांदर्स येथलें नाचाचें वेड निघालें. या नाचांत हजारों लोक जमून वेड्यावांकड्या आरोळ्या मारून व वांकडे तिकडे हावभाव करून नाचत. जमावामुळें त्यांची दहशत बसे व अधिकाराचें कांहीं चालत नसे. आपल्या आडदांड नाचानें व भयंकर आरोळ्यांनीं सैतानाचा ( ५६ ) पराक्रम व विजय हे नाचणारे लोक जाहीर करीत. कलोन व ट्रेव्ज या धर्मोपाध्यक्षांच्या वृत्तिप्रदेशांत हा वेडाचा प्रकार विशेष जोरानें चालू होता ( ५७ ), असें नमूद केलेलें आहे. याच प्रांतांत पुढें चेटकाचा प्रचार फार झाला होता. स्वित्झर्लंदांत व जर्मनीच्या कांहीं भागांत यहुदी लोकांच्या विषानें सांथ आली, असें म्हणत.

आणि हा लोकभ्रम दूर करण्यास पोपाचार्यांनें जरी उमदा प्रयत्न केला, तरी त्या अभागी जातीचीं असंख्य माणसें जिवें मारलीं गेलीं. एकट्या मेयन्समध्यें कित्येक हजार माणसें यमसदनास पाठविलीं. पण साधारणपणें ईश्वरी कोप किंवा सैतानी शक्तीचें प्रदर्शन असेंच या सांथीचें निदान लोक करीत; व विलक्षण कारणें लढवित. निमुळत्या पंजांचे बूट नुकतेच प्रचारांत आले होते; व पुष्कळांचा असा समज होता कीं, सर्वशक्तिमान् परेश्वराचा असल्या या बुटांनीं अपमान होतो (५८). तथापि येथें मुख्यत्वेंकरून नमूद करावयाचें इतकेंच कीं, जादू, चेटुक वगैरेबद्दलच्या खटल्यांची संख्या भयंकर जलदीनें वाढली (५९).

## बेबंदशाही माजली.

पंधराव्या व सोळाव्या शतकांत या खटल्यांची कमाल झाली, असें म्हणतां येईल. त्यावेळीं युरोपांत जिकडे तिकडे बेबंदशाही व भयानकता यांचें साम्राज्यच झालेलें दिसत होतें. ख्रिस्तीधर्मरूप मंदिराच्या आधारस्तंभांस पुष्कळ दिवसांपासून कोरून खाणाऱ्या बुद्ध्युत्कर्षरूप कीटकानें आपलें काम यथास्थित केलें होतें. आणि या बुध्द्युत्कर्षाबरोबर भयंकर नैतिक अवनति झाली व धर्मसंस्थेच्या भांडारांत नवीन आलेल्या संपत्तीमुळें तींत भर पडली. तथापि या सर्व बेबंदशाही अंधेरनगरींत एका कल्पनेचें अढळ राज्य होतें. ती कल्पना म्हणजे पाप व सैतान यांची जाणीव; अर्थात् मानवांच्या नरकयातना चुकविण्यासाठीं शुद्ध हटवादी मतपद्धतीची अत्यंत जरूर आहे, ही जाणीव होय. ख्रिस्ती धर्म हा जो तदनुयायांचें पुष्कळ दिवसांपासून सर्वस्व होऊन बसला होता, तो आतां अंतकाळच्या वेदना भोगीत होता. धर्मविवेकाच्या मर्यादा लुप्तप्राय झाल्या होत्या. बुद्धीची अनिश्चयात्मक स्थिति सहन करण्यास अगदीं असमर्थ अशा लोकांच्या मनांत परस्परविरोधी विकार व प्रवृत्ति यांचें भयंकर काहूर माजलें होतें;व विरुद्धमतवादी लोक आपापल्यापरी मोक्षप्राप्तीला आवश्यक अशीं आपापल्या पंथांचीं विशिष्ट मतें जाहीर करीत होते.

## भयानकतेच्या भोंवऱ्यांत राष्ट्रीय जीवित घेरलें गेलें.

संदिग्धमतित्व हा फारकरून सर्वत्र अपराध गणीत व चूक दंडपात्र समजत; तथापि चौकसबुद्धि उपजायला पहिलीची म्हणजे

संदिग्धमतीची अपेक्षा असते व दुसरी म्हणजे चूक ही चौकस बुद्धीमुळें होण्याचा संभव असतो. लोकांचीं मनें, स्वतंत्र विचार करण्यास पूर्णपणें अनभ्यस्त असल्यामुळें, विषयविवेचनांतलीं परस्परविरोधी प्रमाणें ज्यांतून घेतलीं जात, त्या ज्ञानक्षेत्राचा अफाट व निःसीम विस्तार पाहून भांबावून गेलीं होतीं; निर्णयात्मक बुद्धीच्या व कर्मप्रवर्तक इच्छेच्या आंदोलनांस कारणीभूत होणारा सैतानाचा नित्य प्रभाव व शुद्ध धर्माची अत्यंत आवश्यकता या दोन गोष्टींची गाढ जाणीव तीं बाळगीत होतीं; अप्रबुद्ध मानसशास्त्राच्या सिद्धांतानुसार अमानुष प्रतिभेमुळें निपजणाऱ्या परस्परविरोधी मनोवृत्तींनीं तीं विह्वल व व्यग्र झालीं होतीं; विशेषतः एकदां मोक्ष-मोक्ष व्हावा या अत्युत्कट उत्कंठेनें होरपळून गेलीं होतीं; व म्हणून घोर भयानें ग्रस्त होऊन इतस्ततः भ्रमण करीत होतीं. या अनवस्थेच्या व भयानकतेच्या लाटेंतून कोणीही सुटला नाहीं. तिनें सर्व युरोप भयभीत झालें; तिचा प्रतापी ओघ पोंचतां पोंचतां प्रत्येक प्रकारच्या विचारांत व क्रियेंत शिरला; व आपल्या क्षणोक्षणीं रुंदावणाऱ्या भोंवऱ्यांत तिनें राष्ट्रीय जीविताचें प्रत्येक बीजतत्त्व घेरलें.

## धर्मसुधारणेची चळवळ.

(क० २०) मानवी मनाला भोळसटपणानें निपजणाऱ्या भीतीच्या कचाट्यांतून परिणामीं मुक्त करण्याचें इतकें थोर श्रेय घेणारी धर्मसुधारणेसारखी कोणतीही दुसरी चळवळ खरोखर कधींही झाली नाहीं. या सुधारणेमुळें नाना पंथ उपजले; पुष्कळ दिवसांपासून बेबंदशाहीला कारणीभूत झालेलेंच संदिग्धमतित्व विशिष्ट व असमग्र रूपानें या पंथांत मोकळेपणें वाढून पुनः शिस्तीला धरून राहूं शकलें. धर्माचें सर्व क्षेत्र बहुतेक व्यापून राहिलेल्या हटवादी कल्पनांचा व याज्ञिकीचा बराचसा अंश या सुधारणेनें त्याज्य ठरवून धर्मज्ञानाला तेव्हांपासून नीतिमत्तेकडे ओढणारी अखंड चळवळ शक्य केली. विशेषतः या सुधारणेनें उपाध्येबुवांचें वर्चस्व कमी करून अर्वाचीन मानवी सुधारणेचें विशिष्ट चिह्न जो सर्वसाधारण धर्मवैशिष्ट्याचा अभाव, त्याप्रत पोंचण्याला युरोपच्या बुद्धीला मार्ग तयार केला. ह्या सुधारणेपासून झालेल्या कल्याणपरंपरेच्या महत्त्वाचें आकलन करणेंही कठिण आहे; तथापि तिच्या योगें जें अनिष्ट दूर कर-

ण्याचा उद्देश होता, तेंच कांहीं काळपर्यंत दुणावलें; हें नाकबूल करणें फुकट होय. कांहीं काळपर्यंत ह्या सुधारणेमुळें केवळ एकाच्या स्वामित्वा-ऐवजीं दुसऱ्याचें स्वामित्व झालें इतकेंच. प्रतिरोधीपंथाच्या लोकांनीं सनातन पंथाच्या लोकांइतक्याच हट्टानें व अधिकारानें आपल्या विशिष्ट मतांची सत्यता व अपेक्षा प्रतिपादावी. पोपाचार्यांच्या प्रमादराहित्याबद्दल जितका दृढ विश्वास सनातन पंथाचा, तसाच व तितकाच तो प्रतिरोधी पंथाच्या माणसाचा स्वतःच्या प्रमादराहित्याबद्दल होता.

[library stamp]

## अनिष्ट गोष्ट एकाएकीं नष्ट झाली नाहीं.

सदोष-पद्धतींतून मन मोकळें होण्याची क्रिया फारच सावकाश घडते; व बारांहून ज्यास्त शतकांच्या शिकवणीनें सर्व धार्मिक विचारांत हटवादी मतांची गुणावहकता भिनून इतकी एकजीव झाली होती कीं, जें काय नष्ट करावयाचें होतें, तें नष्ट तर नव्हेच, पण कमजोर करण्यास सुद्धां दीर्घ-काल व कष्टकारक शिस्त लावून घ्यावी लागली. सत्याचें स्वरूप, मानवी मनाच्या सामर्थ्याची मर्यादा, संभाव्यतेचे नियम व निष्पक्षपातानें शोध करावयाला अवश्य त्या गोष्टी, हे विषय त्या वेळीं प्रगति-मार्गावर अघाडी मारलेल्या मनांसही अगदीं अपरिचित होते. तर्कशास्त्र या शब्दाचा अतिशय संकुचित अर्थ घेतला, तर त्या शास्त्राचाही अभ्यास तेव्हां खरोखर बराच होत असे. तथापि मानसशास्त्राच्या सर्व क्षेत्रांचें, कार्यकारणविवेचक बुद्धीचे नियम व मर्यादा यांचें, समुच्चयानें अवलोकन होईल, अशासारखें कांहीं नसे. कोणत्याही कल्पनाविषयीभूत गोष्टींकडे बेशक करारीपणानें कार्यकारण-विवेचक-बुद्धिपूर्वक बघावयाचें; तसेंच धर्मज्ञानाच्या सर्व भागांकडे पहाव-याचें; असाही मनाशीं ताळा बसलेला नव्हता. धर्म म्हटला म्हणजे विवेचक-पणा बाजूला सारून किंवा पालथा घालून बनलेली बुद्धीची निसर्ग-भिन्न-स्थिति अशी नेहमीं कल्पना मनापुढें उभी राही. कधीं त्याहून ज्यास्त अर्थही त्यांत समाविष्ट असे; पण नेहमीं एवढा खास असेच. संदिग्धमतित्व व तद्विषयक चेतना यांच्या, धर्म ही कल्पना अगदीं विरुद्ध असे. भक्तिहीन माणसें ज्याला भोळसटपणा म्हणत, त्यालाच भाविक माणसें श्रद्धा म्हणत; आणि पहिल्यापेक्षां दुसरा शब्द ज्यास्त आदरदर्शक आहे, तरी बहुतेकांस ते दोन्ही शब्दही बिलकुल सामानार्थकच वाटत असत.

कांहीं प्रतिरोधी पंथाच्या लोकांनीं त्या शब्दाच्या अर्थांत नैतिक वगैरे कल्पना मिसळून दिल्या; पण बौद्धिक कल्पना त्यांनीं कायम ठेविलीच. जोंपर्यंत असली कल्पना अस्तित्वांत होती, तोंपर्यंत धार्मिक संक्षोभाच्या काळांत अवश्यमेव ऐकान्तिक दुःख व भीति यांचें राज्य होतें; आणि यामुळें धर्मसुधारणा म्हणजे मानवी बुद्धीनें अनुभविलेल्या सर्वांपैकीं अति-दुःखप्रद क्रांति होय; यांत यत्किंचित् संशय नाहीं.

## धार्मिक भयानकतेच्या कारणांचा अडाणी भोळसटपणावर दुहेरी परिणाम.

जर अजूनपर्यंतच्या विवेचनाचें धोरण वाचकांच्या ध्यानांत आलें असेल, तर चेटकाच्या इतिहासाला तें कसें लागतें, हें त्यांना यापूर्वींच कळून चुकलें असेल. चेटक्यांसंबंधानें विश्वास बसायला सैतान पराक्रमी आहे व तो सदोदित जवळ उभा असतो, या कल्पनेचा मनुष्याच्या मनाला परिचय असून तीवर अढळ विश्वास असावयाला पाहिजे. चेटुक वगैरे गोष्टींला प्रामुख्य यावयाला या श्रद्धेच्या गोष्टींकडे त्यांचीं मनें इतक्या जोरानें खेंचलीं गेलीं पाहिजेत कीं, त्यांच्या विचारांच्या नित्याच्या ओघाला त्याच गोष्टींचें वळण व छटा मिळालीं पाहिजेत; व स्वतःसभोंवतीं सैतानी सामर्थ्य काम करीत आहे, असें पक्कें वाटूं लागलें पाहिजे. ज्या दीर्घ परिस्थितिपरंपरेची कमाल होऊन शेवटीं धर्मसुधारणा घडून आली, तिच्यामुळें सर्व ख्रिस्ती धर्माच्या अनुयायांत घोर धार्मिक भयानकता पसरली. या भयानकतेची सावली हळुहळू विचार-क्षितिजावर पडली व धर्माच्या भावी स्थितीबद्दल सर्वत्र चिंता निर्माण झाली आणि सैतान सदोदित जवळ उभा असतो अशी तीव्र व स्पष्ट जाणीव उत्पन्न झाली. या कारणांचा संबंध मुख्यतः तात्त्विक श्रद्धेच्या दुर्गम विषयांशीं होता हें खरें, परंतु लोकांच्या अडाणी भोळसटपणाच्या मतांवर त्यांचा द्विविध परिणाम झाला. अज्ञ लोकांचें गुरूंनीं शिकविलेल्या ज्यास्त भानगडीच्या तात्त्विक विचारांकडे जरी अवधान राहत नाहीं; तथापि मागें म्हटल्याप्रमाणें त्यांना त्या तात्त्विक विचारांपासून निघणाऱ्या गोष्टींच्या सामान्य स्वरूपाचें व झोंकाचें आकलन करतां येतें; आणि स्वतःच्या विचारप्रांताला ते त्या गोष्टी लागू करण्यांत मोठे तत्पर असतात.

## उच्च वर्गांतील लोक चेटुक वगैरे खरें मानतात व त्याचा परिणाम कनिष्ठ वर्गांवर होतो.

याशिवाय उच्चवर्गांतील लोकांचीं मनें, सैतान सदोदित जवळ असतो, या जाणिवीनें व्यापलीं असल्यामुळें चेटकाची वाटेल ती हकीकत खरी समजण्याकडे त्यांचा कल असतो. ते लोक चेटक्यांचे खटले न्यायासनासमोर आणतात व त्याचा अवश्य परिणाम असा होतो कीं, या भ्रमाला जोर येतो. जेव्हां हा विश्वास कनिष्ठ वर्गांतल्याच माणसांना धरून असतो, तेव्हां त्याचा फैलाव न होतां तो कमजोर होत जातो; पण जेव्हां कायदे करणारे लोक त्यासंबंधीं कायदे करून त्याचा निषेध करतात, जेव्हां धर्माचे मुख्य आचार्य त्याबद्दल आज्ञापत्रें काढून तो गर्ह्य ठरवितात, जेव्हां धर्मोपदेशक व्यासपीठावरून त्याची निंदा करतात, आणि पाखंड न्यायासनांतील न्यायाधिश त्याबद्दल हजारों लोकांना खांबाला बांधून जाळण्याची शिक्षा देतात, तेव्हां लोकांची कल्पनाशक्ति प्रज्वलित होते; भयानकतेची सांथ पसरत जाते; आणि तो तदुद्भूत भ्रम दुणावत जातो. आतां सदरहू गोष्टी करणारे हे लोक पूर्वनिर्दिष्ट कल्पनांविषयीं आपल्या विश्वासांतील दृढतेच्या व धार्मिक भयानकतेमुळें त्या कल्पनांकडल्या आपल्या ओढ्यांतील तीव्रतेच्या मानानेंच त्या गोष्टी करितात.

## लूथरचा दाखला.

( क० २१ ) धर्मसुधारणेमुळें कांहीं काळ चालू राहिलेल्या विचारसरणीचा चेटुक वगैरे कल्पनांवर झालेल्या परिणामाचा ठळक दाखला लूथरच्या जीवनचरित्रांत आपल्यास मिळतो. पापाविषयीं तीव्र व उत्कट जाणीव त्याच्या अंगीं जितकी स्पष्ट दिसते, तितकी स्पष्ट दुसरी कोणतीच गोष्ट दिसत नाहीं. आपल्या वितेन्बर्ग येथील निर्जन मठांत असतां आपल्यावर यमराजाची छाया कशी पडली, आपल्या पायाखालीं नरकाचें द्वार कसें उघडल्यासारखें वाटलें, नैराश्ययुक्त दैन्यावस्था कशी प्राप्त झाली, आणि त्यामुळें ऐहिक जिण्याचें गांठोडें कसें भारी वाटूं लागलें, तें सर्व त्यानें पुष्कळ वेळां हुबेहुब शब्दचित्र काढून वर्णिलें आहे. आपल्या अंगीं नैतिक योग्यता नाहीं, याची अतिशय तीव्र जाणीव उत्पन्न होऊन इकडे तो तळमळत होता; व तिकडे संदिग्धमतित्वानें त्याचा बुद्धिभेद झाला

होता. मोठ्या कष्टांनीं दीर्घकाल शोध चालविल्यावर त्याला कोठें प्रतिरोधी मतें आढळलीं. ह्या शोधाकरितां तो चांचपडत असतां हळूहळू त्याच्या श्रद्धेंत एकामागून एक बदल होत होता. त्याच्या मनाला हुरूप आणण्यास सहानुभूतीच्या शब्दाचें सुख कित्येक वर्षांत मिळालें नाहीं; आणि हिंदोळ्यावर बसल्याप्रमाणें त्याचें मन परस्पर विरुद्ध सिद्धांतांच्या मध्यें झोंके घेत होतें.

### त्याला जिकडे तिकडे सैतानाची साक्ष पटे.

पण जीं माणसें अशाच परिस्थितींत असतात व ज्यांची कल्पकशक्ति फार जाज्वल्य असते, त्यांच्या मनाभोंवतीं धार्मिक ज्ञानाचें वातावरण तयार होत असतें आणि तद्द्वारा कोणत्याही गोष्टीचा विचार होत असतो; तद्वत्च ल्यूथरची गोष्ट झाली. त्याला पुष्कळसे विचित्र आभास होत आणि निश्चयांत चलबिचल होई. ही सर्व सैतानाचीच प्रत्यक्ष करणी, असें तो निरंतर म्हणे. यामुळें सैतान त्याच्या चरित्राची अधिष्ठात्री कल्पना होऊन बसला. प्रत्येक आणीबाणीच्या प्रसंगीं, प्रत्येक मानसिक अस्वास्थ्याच्या स्थितींत, त्याला सैतानाच्या पराक्रमाची साक्ष पटे. वितेन्बर्गच्या मठांतल्या निवांत स्थानांतून त्याला सदा सैतानाचा आवाज ऐकूं येई. आणि ही गोष्ट त्याच्या इतकी आंगवळणीं पडली कीं, ‘ एकदां तशा आवाजानें मीं झोंपेंतून जागा झालों आणि हा आवाज सैतानाचाच, असें ओळखून लगेच पुनः झोंपीं गेलों ’ असें त्यानें सांगितलेलें आहे. वार्तबर्गच्या गढींत सैतानाला शाईचा शिसा त्यानें फेंकून मारला होता; ती तेथली काळी झालेली जागा अजून दिसते. त्रान्ससब्स्तांशिएशन ( आभारदर्शक प्रभुभोजनाच्या पदार्थांचें तिष्ठद्रूप सत्त्वांतर ) विषयीं ल्यूथरचें मन दीर्घकाळ साशंकवृत्तीचे कष्ट भोगीत असतां सैतानानें प्रकट होऊन त्याला त्याविषयीं एक नवीन प्रमाण सुचविलें. मनाची अशी स्थिती असतां सैतानाच्या चमत्कारांची प्रत्येक आख्यायिका तो साहजिकपणें पूर्ण श्रद्धेनें मान्य करी. एक वृद्ध धर्मोपदेशक ध्यान करित बसला असतां त्याच्या पाठीमागें डुकरासारखें ओरडून त्याचा एका भुतानें कसा ध्यानभंग केला, ती गोष्ट तो सांगे. तोर्गो येथें सैतान थाळ्या, भांडीं फोडून तेथील धर्मों-

स्थं. ००५ १०२५५

पदेशकाच्या कपाळांत मारीत असे; शेवटीं त्याच्या बायकोला व नोकरांना अर्धवट वेड लागून तीं घराबाहेर निघून गेलीं. दुसऱ्या एका प्रसंगीं सैतान एका प्रमुख बालिस्टराच्या रूपानें न्यायासनांत हजर झाला; व त्यानें त्या बालिस्टराचें काम अगदीं योग्यप्रकारें बजाविलें असें म्हणतात.

**सैतानाच्या पराक्रमाच्या प्रचितीनें त्याला चेटुक संभाव्य वाटे.**

मूढ, अपंग, आंधळे, मुके अशांना भुतें पछाडित. हे रोग नैसर्गिक कारणांनीं होतात, असेंच दाखविण्याचा खरोखर वैद्यांचा प्रयत्न असे; पण ते वैद्य म्हणजे काय अज्ञानी, त्यांना सैतानाच्या पराक्रमाची माहिती नाहीं. सैतानाला हवा तो रोग उत्पन्न करितां येतो; तसा त्याच्या हस्तकांना म्हणजे चेटक्यांना करितां येतो. लूथरला होण्यासारखें कोणतेंही दुखणें आंगरोगाचें नसे; आणि त्याचें कानाचें दुखणें तर विशेषेंकरून वाऱ्यावावटळीचेंच असे. गारा पडणें, विजा पडणें, रोगांच्या सांथी येणें, हे प्रकार दुरात्म्यांच्या उपद्रवाचेच प्रत्यक्ष परिणाम होत. आत्महत्येनें मेले असें म्हणत, त्यांपैकीं पुष्कळसे खरोखर वाटमाऱ्याप्रमाणें सैतानानें पकडून गळा दाबून मारलेले असत. मनांत आलें तर सैतान माणसांना वातावरणांतून वाटेल तिकडे नेई. सैतान मुलें निर्माण करी. असलें एक मूल स्वतः लूथरला आढळलें होतें. या थोर धर्मसुधारकाच्या अंगीं जे अनेक गोड गुण होते, त्यांतलाच मुलांविषयीं अत्यंत वात्सल्य हा एक होता. तथापि याप्रसंगीं त्या मुलाचे आप्त म्हणून म्हणविणाऱ्यांना तें मूल नदींत फेंकून देऊन भुताच्या संबंधांतून आपलें घर मोकळें करून घ्या असा लूथरनें उपदेश केला. असल्या विचारसरणीचा स्वाभाविक परिणामच असा झाला कीं, चेटकाविषयींची काडीइतकी सुद्धां असंभाव्यता त्याच्या मनाला शिवली नाहीं. स्वकालीन ओघानुसार चेटकाच्या गुन्ह्याची सत्यता व पौनःपुन्यता तो सदोदित प्रतिपादी, व चेटुक करणाऱ्यांना जाळून मारणें हें कर्तव्य आहे असें आवेशानें जाहिर करी ( ६० ).

**आभास व ढोंग यांचें संमिश्रण.**

( क० २२ ) धर्मसुधारणेच्या मागच्या व पुढच्या एकेक शतकांतल्या चेटुक, जादू वगैरेच्या इतिहासांत जशीं भयंकर व विलक्षण उदा-

हरणें आढळतात, त्यांहून ज्यास्त भयंकर व विलक्षण उदाहरणें खरोखर थोडकींच माहीत आहेत. सुशिक्षितांमध्यें मतांचा झगडा चालला असतां तदनुवर्ती छायेप्रमाणें अज्ञ लोकांत जादू वगैरेवरचा विश्वास पसरत होता (६१); आणि सनातन व प्रतिरोधी दोन्ही पंथांमध्यें या प्रसाराच्या आस्थेविषयीं चढाओढ लागली होती. कल्पकशक्तीचा प्रभाव अधिक संस्मरणीय इतर वेळीं कधींही दिसला नाहीं; आणि कल्पकशक्ति ही अशी कांहीं विलक्षण चीज आहे कीं, सर्व चराचर विश्व तिच्या छायेखालीं येतें; व आपल्या स्वतःच्या उंच नमुन्यावरहुकुम या जीवलोकांतल्या सर्व संघटना ती संकलित करिते. लोकांचीं भीतीनें गांगरलेलीं व भाबडीं मनें अद्भूत चमत्कारांकडे व सैतानी पराक्रमाकडे अनिवारपणें ओढलीं जात; व त्यांना आपल्या आजूबाजूला सर्व त्याच गोष्टी दिसत. आभास व ढोंग यांचा इतका विलक्षण मिलाफ झाला होता कीं, एक दुसऱ्यापासून वेगळें करणें आतां अशक्य आहे. कधीं कधीं एखाद्या महत्त्वाकांक्षी स्त्रीनें आपल्या कृत्यापासून उद्भवणाऱ्या संकटांस तोंड देण्यास तयार होऊन अमानुषशक्ति आपल्या अंगीं आहे असें धिट्टाईनें ढोंग करावें; आणि तिच्यापुढें मानी व मोठ्या शूर माणसांनींही वरमून जावें.

## अनीतीही होऊं लागली.

कधीं कधीं चेटकाच्या न्यायासनांत येऊन एखाद्या पुरुषानें स्वधर्मानें अभेद्य मारलेली लग्नाची गांठ तोडण्याचा प्रयत्न करावा; व त्यायोगें त्याच्या स्त्रीला खांबाशीं बांधून जाळण्याची शिक्षा व्हावी; अशा रीतीनें असंख्य बायका बळी पडल्या. कधीं कधीं एखाद्या धूर्त गुन्हेगारानें लोकांना वाटत असलेल्या भीतीचा फायदा घेऊन आपल्यावर आरोप आणणाऱ्यावरच उलट चेटकाचा आरोप करून आपण सपशेल निसटून जावें. आणखी कधीं कधीं कोणावर चेटकाचा आरोप आणून कोणीं आपला खाजगी द्वेष उगवून घ्यावा, अथवा खरा गुन्हा जादूवर लादून द्यावा; किंवा गारांची वृष्टि झाली, विलक्षण दुखणें आलें, तर लगेच कोणीतरी चेटुक केलें असें मनांत यावें. परंतु बहुधा ह्या खटल्यांत निव्वळ व निर्भेळ भास दिसून येत. चेटकावरच्या विश्वासाचें मंडन करणारे असें प्रतिपादण्यास समर्थ असत कीं, सैतानाशीं आमचें सूत आहे, असा

आपखुषीनें असंख्य लोकांनीं कबूल जबाब दिला आणि मरेपर्यंत तो त्यांनीं हट्टानें कायम ठेविला. मोठमोठ्या धर्मक्रांतींच्या किंवा राज्यक्रांतीच्या काळांत नेहमीं वेडाचीं उदाहरणें विलक्षण वारंवार आढळायचीं ( ६२ ); आणि सोळाव्या शतकांत सर्व प्रकारचीं वेडें चेटकाच्या प्रघातांत लुप्त झालीं होतीं; व त्यावेळच्या जारी असलेल्या पूर्वग्रहाची झांक त्यांत झळकूं लागली होती ( ६३ ).

## भाबड्या बाया निर्दोषी असूनही गुन्हा कबूल करीत.

प्रसंगविशेषीं अशाही म्हाताऱ्या, अर्धवट चळ लागलेल्या बायका आढळत कीं, आपण निरुपद्रवी आहोंत, आपण गुन्हा केलेला नाहीं, अशी त्यांची प्रथम खात्री असून पाठीमागून उगीच न्यायदेवतेच्या ओजस्वितेनें घाबरून जाऊन भेकडपणानें विचारीत कीं, स्वतांला नकळत सैतानाशीं संबंध जडणें शक्य आहे काय ? आणि सरते शेवटीं आपणांवर केलेले आरोप आपण खरोखर केले आहेत असें त्यांचें त्यांनाच बहुतेक वाटूं लागे. पुष्कळदां असें होत असे कीं, खटल्याच्या चौकशीची भीति, पुढें ओढवलेलें विलक्षण यातनामय मरण, आणि दुर्बल स्त्रीजातीच्या नाजुक अंगास म्हातारपणीं लावलेल्या वेदना, या सर्व गोष्टींनीं त्या बाईची बुद्धि नष्टप्राय होई; ( ६४ ) दुःखानें घेरल्यामुळें तिचें डोकें फिरे; स्वतांच्या निरुपद्रवीपणाबद्दल असलेली मनाची खात्री निघून जाई; व आपणास आतां निरवधि नरकयातना भोगाव्या लागणार होत्या, अशी खात्री होऊन दीन व भ्रमिष्ट होत्साती अग्निनारायणाला स्वदेह अर्पण करण्यास ती सिद्ध होई. धर्माधिकाऱ्यांचा छळाला उत्तेजन देण्याचा आवेश मंदावला नाहीं. तो जर्मनी, फ्रान्स, स्पेन, इताली, फ्लांदर्स, स्वीदन, इंग्लंद, स्कातलंद वगैरे सर्व ठिकाणीं सारखाच दिसत होता. या छळांतला सक्तपणा ज्याला मनापासून पसंत होता, अशा एका प्राचीन लेखकानें लिहिलें आहे कीं, एकट्या कोमो प्रांतीं पाखंडन्यायासनाचे आठदहा न्यायाधीश सतत काम करीत होते. आणि एका वर्षांत शिक्षा दिलेल्यांची संख्या हजार झाली होती; व पुढच्या कित्येक वर्षांत या बळींची संख्या दरवर्षी शंभरांखालीं क्वचित् गेली होती; असेंही तो आणखी लिहितो (६५).

## पाखंड-न्यायासनांची कामगिरी.

( क० २३ ) पाखंडन्यायासन म्हणजे विद्वान् लोकांचें मंडळ होतें; व त्यांची विचारसरणी पूर्वावलोकनप्रचुर होती; तेव्हां असल्या लोकांनीं जादू वगैरेच्या गोष्टी पूर्वेतिहासाशीं जोडून व त्यांना संघटित स्वरूप देऊन कांहीं तरी सामान्य तत्त्वें काढलीं असावींत हें साहजिक होतें आणि तदनुसार आपण पाहतोंच कीं, सुमारें तीन शतकांच्या अवधींत या विषयावर अवाढव्य वाङ्मय तयार झालें. चेटकाच्या निरनिराळ्या प्रकारांचें काळजीपूर्वक वर्गीकरण होऊन त्यांची विशिष्ट मतांशीं सांगड पडली. सैतानासंबंधीं सर्व तत्त्वज्ञानाचें संशोधन होऊन सनातन पंथाच्या धर्मज्ञान-संग्रहास एकदां ललामभूत झालेल्या असंख्य ग्रंथांनीं तत्कालीन विचार-सरणीला मूर्तस्वरूप मिळालें.

## चेटकाच्या काळांतील लोक खुळसटसे वाटतील; पण सर्वस्वी तसें नव्हे.

या ग्रंथांचा योग्य विचार करणें अगर ज्या दृष्टीनें ते लिहिले गेले, ती प्रतीत करणें हें काम सध्यांच्या काळीं फार अवघड आहे. सध्यां प्रायः प्रत्येक सुशिक्षित मनुष्याच्या मतांच्या अंतर्यामीं सैतानासंबंधीं सर्व गोष्टींबद्दल गाढ संदिग्धमतित्व असल्यामुळें तत्संबंधीं प्रतीत व उत्कट विश्वास वागविणाऱ्या मानसिक स्थितीची कल्पना करणेंसुद्धां अवघड जातें. सैतानाचें जींत प्रत्यक्ष अंग आहे अशी गोष्ट यक्षिणीच्या किंवा सिल्फ ( वायुदेवते ) च्या गोष्टीइतकीच भारदस्तपणें लक्ष देण्यास बिलकूल नालायक आणि मुळांतच अगदीं खुळसट असें सध्यां समजतात. म्हणून जेव्हां सध्यांच्या काळांत कोणी वाचक चेटुक, जादू वगैरेसंबंधीं एखाद्या जुन्या ग्रंथांचीं पानें चाळतो व त्याला त्यांत मोठ्या गंभीरपणें खात्रीपूर्वक सांगितलेल्या तसल्या शेंकडों गोष्टी आढळतात, तेव्हां त्या ग्रंथकाराची मानसिक स्थिति आपल्याहून निराळीच दिसल्यामुळें त्याच्या बुद्धिमत्तेची किंमत भलतीच्या सलतीच कमी समजण्याकडे याची बहुधा प्रवृत्ति होते. असल्या लेखकांच्या अंगीं मनुष्याला भोगाव्या लागणाऱ्या यातनांबद्दल कळवळ्याचा जो अभाव दिसतो, तो पाहून तर याच्या विचारशक्तीच्या

ताजव्याचा कांटा ज्यास्तच पलीकडे झुकतो. आणखी त्यांत त्या लेखकांची विलक्षण पंडितंमन्यता, त्यांचें तिरस्कार्य लातिनभाषालेखन, व भौतिक शास्त्रासंबंधीं त्यांच्या ढोबळ चुका, यांची भर पडून वाचकाला अधिकच थट्टा करायला जागा होते. याशिवाय स्प्रेंजरची विशेष गम्मत आहे. हा लेखक अतिशय प्रख्यात, कदाचित् तत्पक्षीयांतही अतिशय भोळा होता; यानें स्वकीर्तीच्या दैवदुर्विलासानें स्वक्षेत्राचें अतिक्रमण करून मोठ्या महत्त्वाकांक्षेनें भलत्याच विषयांत भ्रमण केलें. या नसत्या उठाठेवींत व्युत्पत्तीच्या अनेक चुका करून त्यानें आपलें नांव अमर केलें आहे. अर्थात् ह्या काळानंतरच्या व्युत्पन्नांना तो एक गमतीचा विषय झाला आहे ( ६६ ).

## अलीकडील चेटकांविषयींच्या खंडनपर ग्रंथांपेक्षां पूर्वींचे मंडनपर ग्रंथ बरेच योग्यतेचे आहेत.

पण हे सर्व बाद लक्षांत घेतल्यावरही—आणि शेवटला खेरीज करून—हे सर्व वाद तत्कालीन कोणत्याही प्रकारच्या ग्रंथाला लागू पडतील. चेटुक वगैरेवरच्या विश्वासाच्या मंडनपर पुस्तकांची संख्या तदनंतर लिहिलेल्या खंडनपर पुस्तकांच्या संख्येहून ज्यास्त इतकेंच नव्हे, तर आणखी मंडनपर पुस्तकांत ग्रंथकारांची अभिरूपता, अनुमानचातुर्य, व सामान्य पात्रता हीं सुद्धां खंडनपर पुस्तकांतल्यापेक्षां ज्यास्त दिसतात; ह्या गोष्टी नाकबूल करणें अशक्य आहे असें वाटतें. पुष्कळ शतकेंपर्यंत मोठीं समर्थ माणसेंही या भोळसटपणाचा अव्हेर करायला नाराज असत. इतकेंच नव्हे, तर तीं त्याचें मंडन करण्यास मोठ्या आस्थेनें व अत्युत्कट खात्रीनें पुष्कळदां मी मी म्हणून पुढें सरसावत. चेटुक, जादू वगैरेचा प्रघात फार असणाऱ्या काळांत असे गौरवशाली ग्रंथकार फारच थोडे होते कीं, ज्यांनीं कोणत्या तरी प्रसंगीं जादू वगैरेवरचा विश्वास तोलण्याच्या ताजव्यांतील विश्वासाच्या पारड्यांत आपल्या गौरवाचें वजन घालण्याला विशिष्ट प्रयास केले नाहींत. थामस एक्विनास हा तेराव्या शतकांतला बहुधा अतिशय समर्थ लेखक होता; हा खात्रीपूर्वक लिहितो कीं, रोग व तुफानें प्रायः सैतानाचीं प्रत्यक्ष कृत्यें होत; वातावरणांतून माणसांना वाटेल तेव्हां सैतान इकडून तिकडे नेतो; व तो त्यांचीं रूपें पालटतो. पारीस विश्वविद्यालयाचा अध्यक्ष, व पुष्कळांच्या मतें ' धि इमिटेशन ' ग्रंथाचा कर्ता जो गर्सन तो

तत्कालीन वाचस्पति हें योग्य पद पावला होता. यानेंही आपल्या लेखांत जादू–चेटकाबद्दलच्या विश्वासाचें समर्थन केलें आहे. म्याकियावेलीनंतर अतिशय स्वतंत्र विचाराचा राजकारण–तत्त्वज्ञानी जो झाला तो निर्विवादपणें बोदिन हा होय. यानें चेटकासंबंधीं वाढतें संदिग्धमातित्व चिरडून टाकण्यासाठीं आपली सर्व विद्वत्ता व धूर्तता खर्चीं घातली.

**त्याकाळीं विद्वत्ता व भावडेपणा यांची पुष्कळदां सांगड असे.**

खरी गोष्ट अशी आहे कीं, त्या काळीं विद्वत्ता हें कांहीं प्रमादराहित्याचें प्रमाण नसे. कारण त्याकाळीं विचारशक्तीला एकच व्यवसाय असे; तो हा कीं, धर्मांतून कांहीं आधार–सिद्धांत घेऊन त्यावरून अनुमान बसवावयाचें; म्हणजे त्या आधार–सिद्धांतांची वाढ व विस्तार करावयाचा. उपदिष्ट मूलतत्त्वाची निःशेष व निर्भीड परीक्षा करावयाची, ही गोष्ट त्यावेळीं माहितच नव्हती. केवळ अधिकारदत्त सिद्धांतांवरून काढलेल्या अनुमानाविरुद्ध विचारानें बंड करावें, अशांतली कांहीं गोष्ट त्यावेळीं नव्हती. आपल्या काळांत व अर्धबोवड्या श्रद्धेच्या इतर प्रत्येक काळांत पूर्ण वाढ झाल्याआधींच सिद्धांतांचा पुष्कळदां स्वीकार होत असतो. या सिद्धांतांपासून जर अनुमान काढलें तर अनुमान काढण्यांत कोठें चूक झाली नाहींना, इतकीच विचारपूस करून लोक थांबत नाहींत; पण तें स्वतंत्रपणें संभवनीय दिसतें कीं नाहीं, हें सुद्धां पाहतात; आणि जर का तें अनुमान तसें संभवनीय दिसलें नाहीं, तर तें स्वीकारिलें जात नाहीं. मात्र ज्या सिद्धांतांवरून तें काढण्यांत आलें, ते सिद्धांत सर्वस्वी त्याज्य मानिले जात नाहींत. चेटकाच्या काळांत निर्भीड तर्कशास्त्र प्रचारांत होतें. उपदिष्ट मतांच्या खरेपणाविषयीं इतकी भक्कम खात्री असे कीं, लोक तीं मतें म्हणजे संभाव्यतेचें माप मानीत; आणि त्यांना अनुसरून ज्या गोष्टी होत त्यांचा त्यांच्या मनाला बिलकूल वाऊ वाटत नसे. हीं उपदिष्ट मतें कल्पनाशक्तीवर नुसता अंमलच गाजवीत; पण विचारशक्तीला तीं चिरडून टाकीत; आणि त्या मतांनीं केलेल्या खात्रींत धर्म्येतर विचारांनीं बिलकूल अंतर पडत नसे. जीं माणसें मोठीं विद्वान् तींच अतिशय भावडीं असें थोडकेदां घडे असें नाहीं; कारण धर्ममतें व चकित करणाऱ्या गोष्टी यांत साम्य

किती आहे, हें शोधून काढण्याकडे मुख्यत्वेंकरून त्यांची विद्वत्ता खर्च होत असे; आणि या कामीं मिळालेल्या यशानें त्यांची अक्कल मापली जात असे.

## चेटकाच्या काळांतल्या लेखांतील मतें व त्यांचें महत्त्व.

( क० २४ ) ज्या काळाविषयीं विवेचन चाललें आहे, त्या काळच्या लेखांना मतांतराच्या इतिहासांत इतकें महत्त्व मिळालें आहे, तें सदर्हु विचारांमुळेंच; या विचारामुळें आणखी आम्हांला त्या काळच्या लेखांचें धोरण समजायला अवघड जातें. या लेखांत आढळणारीं कांहीं मुख्य मुख्य मतें शक्य तितक्या त्रोटक रीतीनें वाचकांपुढें मांडण्याचा विचार आहे. या मतांचा तत्कालीन लोकांच्या कल्पनाशक्तीवर परिणाम होऊन चेटकाचे चमत्कार घडण्यास एक कारण झालें, आणि विवेकशक्तीवर परिणाम होऊन या चेटकाच्या हकीकतींची प्रमाण वगैरे न पहातांच संभाव्यता मानण्याकडे लोकांचा कल झाला ( ६७ ).

## जगभर दुरात्मे वावरत असून त्यांचें काम मानवजातीस अधःपतनास नेण्याचें आहे.

सर्वत्र असा उपदेश चाले कीं, असंख्य दुरात्मे जगभर भटकत असतात; ते मानवजातीला सध्यां दुःख व्हावें व पुढें तिचा विनाश व्हावा; म्हणून खटपट करीत असतात; हे दुरात्मे म्हणजे देवाशीं बंडाळी केल्यामुळें स्वर्गच्युत झालेले देवदूत होत; यांच्या अंगीं देवदूतांचा सर्व नव्हे तरी बहुतेक पराक्रम अझून राहिलेला आहे;आणि कांहीं झालें तरी निदान मानवीशक्तीच्या मर्यादेपलीकडे त्यांना शहाणपण व पराक्रम आहे. या विचारावरून पुष्कळ महत्त्वाचीं अनुमानें तयार झालीं. जर हे दुरात्मे आमच्या आसमंतात् सदा फिरत असतील, तर त्यांच्याबद्दल कांहीं तरी खुणा आम्हांला पटण्याचा खात्रीनें संभव आहे; असें अनुमान लोकांनीं काढलें. मानवावर जरासें जरी संकट आलें तरी तेवढ्यानेंच जर त्यांना आनंद आहे, आणि पीडा करण्याची अमानुष कर्तबगारी जर त्यांच्या अंगांत आहे, तर त्यांनीं आपलें अमानुष द्वेषाचें सर्व बळ मानवांविरुद्ध योजावें यांत नवल तें काय ! जर त्यांचा प्रधान हेतु अखेरीस मनुष्यांचा विनाश घडवून आणावा हाच आहे, तर आपल्या स्वतःच्या आशा सोडून लांच देऊन

त्यांना खुष करणाऱ्या माणसांची सेवा करण्याचें त्यांनीं पत्करलें तर आपणास आश्चर्य वाटण्याची गरज नाहीं. अशाप्रकारचा तह किंवा करार मानवांना त्यांच्यापाशीं करतां येतो. मानवी प्राण्यांना अमानुष दुरात्म्यांच्या शक्तींचा सूत्रधार होतां येतें, हें ( धर्मोपदेशांतील ) स्पष्ट आधारांनेंच ठरलें होतें. 'चेटुक करणाऱ्यास जिवंत राहूं देऊं नको' अशी गंभीर आज्ञा 'लेवितिकस' ( जुन्या करारांचें तिसरें पुस्तक ) च्या नियमावलींत अनेकदां आढळतें; व एन्दोरच्या चेटकीच्या हकीगतीवरून त्या गुन्ह्याच्या परिस्थितीचें विस्तरशः वर्णन मिळतें. ख्रिस्ती धर्मपित्यांचें जादूच्या निषेधाच्या बाबतींत ठाम एकमत होतें; व प्रत्येक राष्ट्रांतील वाङ्मयांत जादूवरच्या सार्वत्रिक विश्वासाचा पत्ता लागतो. पूर्वावलोकनप्रचुर काळांत जादूहून ज्यास्त संभाव्य मताचें नांव घेऊन सांगणें अशक्य आहे; कारण धर्म्य घ्या किंवा धर्म्येतर घ्या, कोणत्याही प्रकारचें दुसरें मत प्राचीन काळाशीं याहून अधिक संनिकट संबंधाचें असें सांपडावयाचें नाहीं.

## चेटकी व सैतान यांचें मुख्य कृत्य वादळें उद्भाविणें.

तथापि लोकग्रह चेटकाची शक्यता व सतत अस्तित्व यांच्या प्रतिपादनांतच दिसत होता असें नव्हे; तर हल्लीं आपणांस अति विचित्र व बेताल वाटतील अशा तत्संबंधीं पुष्कळ बारीक सारीक गोष्टींतही तो दिसत होता; पहिलीच गोष्ट अशी कीं, चेटकीचें किंवा तिच्या हुकमानें वागणाऱ्या सैतानाचें नित्याच्या परिपाठांतलें कृत्य म्हणजे वादळ उपस्थित करून त्यानें वारंवार एकाच माणसाचीं शेतें उद्ध्वस्त करायचीं;पण आजूबाजूच्यांना काडीचा ढका लावायचा नाहीं. सैतानाच्या अंगीं अशी शक्ति नाहीं, अगर असली तरी तो बहुधा तिचा असा उपयोग करणार नाहीं, असें म्हणण्याचें जर कोणीं धाडस केलें, तर धर्मशास्त्रांतला प्राचीन दाखला काढून दाखवून त्याला त्वरित निरुत्तर करीत. जुन्या करारांत लिहिलें आहे कीं, ईश्वराच्या अनुमतानें सैतानानें जाबचा छळ केला; तेव्हां त्यानें ज्या युक्त्या योजल्या त्यांतली एक अशी होती कीं, त्यानें वादळ उपस्थित करून ज्या घरांत त्या गृहस्थाचे मुलगे जेवीत होते त्या घराचा नाश केला. प्रकटीकरणाच्या पुस्तकांत चार देवदूतांचें वर्णन आहे; या चार देवदूतांच्या हातीं चार वायु होते; व पृथ्वीचा छळ करायचें सामर्थ्य त्यांना दिलेलें होतें; या गोष्टीचाही

वरील विश्वासाशीं बहुधा संबंध जोडण्यांत येत असे; कारण या गोष्टींत देवदूतांचा संबंध आहे तरी, सन्त आगस्ताइन म्हणतो कीं, देवदूत हा शब्द सदात्मे व दुरात्मे या दोहोंलाही सारखाच लावीत.

## चमत्कारांचे पुरावे न पाहतां त्यांस एकदम असंभाव्य कोटींत कां ढकलिलें जात नसे ?

शिवाय सैतानाला नेहमीं मरुत्पति म्हणतात. त्याच्या अफाट ज्ञानानें व प्रचंड शक्तीनें वातावरणाची व्यवस्था मोडणारीं प्रत्यक्ष साधनें त्याच्या हातीं होतीं; आणि म्हणून अकस्मात् उत्पन्न झालेलेंही वादळ सृष्टीच्या नियमांस कांहीं बाधक नव्हे; तर केवळ त्या सृष्टिनियमांचा कोणी अमानुष सामर्थ्यानें तसा उपयोग केल्याचें हें उदाहरण होय, इतकेंच. अमुक एक गोष्ट घडली, असें जर कोणीं म्हटलें तर, साक्षीपुरावा पहाण्या-अगोदर ती असंभाव्य कोटींत ढकलून देण्याची कल्पना घालवण्यास वरील विचार पुरेसे होत असें मानलें जाई; तथापि अनिश्चितपणा सर्वतोपरी नाहींसा झाला, तो धर्माच्या सतत व सर्वत्र त्याच त्याच उपदेशानें. ख्रिस्ती धर्माधिकाऱ्यांनीं व मध्ययुगांतल्या संतांनीं मानवी सुधारणेच्या त्याच प्राथमिक स्थितींत असलेल्या इतर धर्मांतल्या उपदेशकांप्रमाणेंच सर्वदा असाच उपदेश चालविला होता कीं, वातावरणांत होणारे विशेष स्मरणीय बदल अमानुष आत्म्यांच्या प्रत्यक्ष हस्तप्रक्षेपानें होतात ( ६८ ). पर्जन्यवृष्टि ईश्वरी हस्तप्रक्षेपानें होते, असा साधारण समज होता असें दिसतें व तसाच समज अजूनही इंग्लंदच्या धर्मांत आहे; पण वारा व गारा यांचा संबंध विलक्षण रीतीनें सैतानाशीं जोडलेला मानीत. वादळ उपस्थित करण्याची शक्ति जर सैतानाच्या अंगीं असेल तर ओघानेंच आलें कीं, ती शक्ति सैतानाशीं संधि करणाऱ्या चेटक्यांच्या अंगीं येत होती.

## रोगसुद्धां सैतानच उत्पन्न करितो.

रोगांसंबंधींही हेंच प्रतिपादन लागू पडतें. सैतानानें जाबला भयंकर रोगांनीं छळलें होतें; अर्थात् तो इतरांना छळूं शकेल. देवदूतांनीं सुरू केलेल्या मोठमोठ्या रोगांच्या सांथींचें वर्णन जुन्या करारांत ठिकठिकाणीं आहे; तस्मात् प्रभूच्या अनुमतानें व अंगांत देवदूताचे धर्म असल्यामुळें

सैतान तशा सांथी सहज निर्माण करूं शकेल. भुतें लागलेल्यांच्या हकीकतीं-वरून सिद्ध होतें कीं, भुतांचा अंमल मानवी शरीराच्या स्वाभाविक धर्मां-वर चाले व त्यांत तीं बिघाडही करूं शकत. आणि म्हणून भूत-पिशाच्चांना रोग उत्पन्न करण्याची ताकद नाहीं म्हणणें म्हणजे या कथानकांच्या सत्य-तेला हरताळ फांसणें होय. आणि या विषयावरील त्या काळा–अलीकडचा धार्मिक पुरावा जरी एकमताचा नसला, तथापि निदान अतिशय बळकट आहे. म्हणून जशी वातावरणांतली फारच विलक्षण उलटापालट बहुधा सैतानानानें केली असें म्हणत, व लहानशा क्षेत्राचेंच नुकसान झालें असेल, तर तो वातावरणांतला फरक चेटक्यांनीं केला म्हणत; तसेंच जेव्हां रोगाच्या सांथीनें राष्ट्रांच्या राष्ट्रें उद्ध्वस्त होत, तेव्हां ती सांथ सैतानानें उत्पन्न केली, व एकाद्या व्यक्तीला विलक्षण, कारण न समजण्यासारखा, रोग होई, तेव्हां ती एकाद्या चेटक्याची दुष्टपणाची करणी, असें मानीत. चेटुक करणारी बाई जर मंत्रांनीं रोग उत्पन्न करूं शके, तर ती ते रोग दूरही करूं शके असें मानण्यास अडचण नव्हती ( ६९ ).

## वरील बाबतींत लोकांचें ऐकमत्य.

ह्या सिद्धांतांवरचा लोकांचा विश्वास एकमताचा होता. त्यांच्या स्पष्टी-करणार्थ तत्संबंधीं असंख्य गोष्टी सांगितल्या जात; मात्र या गोष्टींचें रहस्य ज्यांनीं त्या वाङ्मयाचा मूळ ग्रंथांवरून अभ्यास केला आहे, त्यांसच कळण्या-सारखें आहे. शेंकडों खटले व त्यांत दिलेल्या देहान्त–शिक्षा यांमुळें लोकांच्या मनांवर हे सिद्धांत निघून न जाण्यासारखे कोरले गेले होते; आणि ते ख्रिस्ती धर्माच्या अनुयायांपैकीं प्रायः सर्व थोर थोर विद्वानांनाही पटत.

## वादविवादाचे गौण मुद्दे.

तथापि दुसऱ्या कांहीं बारीक सारीक गोष्टींबद्दल पुष्कळ वाद माजला. त्यांपैकीं ध्यानांत ठेवण्यासारखी एक गोष्ट, वातावरणांतून चेटक्या स्थलांतर करितात कीं नाहींत, ही होय. एकादी म्हातारी केरसुणीच्या दांड्यावर किंवा बकऱ्यावर बसून अथवा सैतानाच्या मर्जीस येईल त्या दुसऱ्या रीतीनें थोड्याशा पळांत शेंकडों मैल प्रवास करूं शके; ही गोष्ट सध्यांच्या काळीं इतकी विचित्र व मुळांतच खुळेपणाची वाटेल कीं, तिच्या खरेपणाबद्दल मनास वाटेल तितका पुरावा दिला, तरी लोकांची खात्री व्हावयाची नाहीं;

असा संभव वाटतो. ज्या काळाविषयीं हें लिहिणें चाललें आहे, त्या काळांत ही कार्यकारणविवेचक दृष्टि थोड्या तरी मनांत निःसंशय वसत होती. कारण या विषयावर लिहिणाऱ्यांपैकीं कांहींनीं ऐकान्तिक तिरस्कारानें कां होईना, पण तिची दाद घेतली आहे. मात्र या दाद घेणाऱ्या लेखकांनीं तिची गणना उघड बुद्धिभ्रंशांत केली आहे. तथापि अजून या कार्यकारणविवेचक दृष्टीला कांहीं महत्त्व आलें नव्हतें. संभाव्यतेचें माप अजून मुख्यत्वेंकरून धर्मज्ञानविषयकच होतें. म्हणून आक्षेप इतकाच येत असे कीं, पुराणांतल्या दुरात्म्यांच्या कल्पनेशीं या हकीकतीचा मेळ कितपत बसतो, या मुद्यासंबंधीं सकृद्दर्शनीं मोठी अडचण दिसली; व त्याचें स्पष्टीकरण करण्याकरितां बरीच अक्कल लढविली गेली. सैतानानें ख्रिस्ताला वातावरणांतून उचलून नेऊन एका देवळाच्या कळसावर ठेविलें होतें, ही गोष्ट ध्यानांत होतीच; तेव्हां सन्त थामस एक्विनास म्हणे कीं, त्यानें जर एकाला असें नेलें, तर कोणालाही तो नेऊं शकेल. भविष्यवादी हबक्कुक यास असेंच ज्यूडियापासून बाबिलोनपर्यंत नेलें होतें. शुभवर्तमान गाजविणारा फिलिप याच्या संबंधींही असाच चमत्कार झाला होता. सन्त पाल यालाही तिसऱ्या स्वर्गांत असेंच नेलें होतें. कदाचित् सदेह नेलें असेल.

## निरुत्तर पुराव्यासही इतर अडचणी.

हा पुरावा विपुल व निरुत्तर करण्यासारखा होता; पण इतर घोटाळा करणाऱ्या अडचणी उद्भवल्या. चेटकाच्या खटल्यांत सैतानाच्या निशीथोत्सवा ( वेताळजत्रे ) च्या इतकी तपशीलवार हकीकत दुसरी कोणतीहि सांगितली जात नसे; व शेंकडों बायांना त्या उत्सवाला जाण्याबद्दल जीवें जाळलें होतें. तथापि कधीं कधीं असें होई कीं, जेव्हां एकाद्या बाईला इतर चेटक्यांच्या साक्षीमुळें अगर तिच्या कबूलजबाबामुळें वेताळ-जत्रेला हजर राहण्याच्या आरोपावरून शिक्षा होई; तेव्हां तिचा नवरा पुढें येऊन शपथेवर सांगे कीं, सदर्हु रात्रीं माझी बायको माझ्या जवळून हालली नाहीं. इतक्या जवळच्या नातलगाची साक्ष कदाचित् ' खोटी प्रतिज्ञा ' म्हणून धुडकावितां येईल; पण त्याला आणखीही पुरावा पुढें येत असे व तो धुडकावणें तितकें सोपें नसे. अशीं विधानें केलीं जात कीं, पुष्कळ वेळां स्त्रिया मूर्च्छितावस्थेंत पडलेल्या आढळत, त्यांना इजेचें भान नसे, आणि

धुगधुगीसुद्धां रहात नसे; पण त्या पुनः कांहीं वेळानें देहभानावर येत; व अशा शुद्धीवर आल्यावर आपण सैतानाच्या निशीथोत्सवास गेल्याचें त्या कबूल करीत. धर्मज्ञान-पंडितांचें लक्ष लवकरच असल्या विधानांकडे वेधलें आणि मग त्यांचीं मतें भिन्न पडूं लागलीं. कांहींचें मत पडे कीं, सैतानाच्या आभासानें त्या चेटकीचें मन गोंधळलें होतें; व ते आपल्या या म्हणण्याला पुष्कळदां जोड लावीत कीं, हा भास तरी सैतानाशीं जुळवलेल्या सूत्रानेंच उद्भवला; म्हणून कांहीं झालें तरी तिला जाळली ही पाहिजेच. इतर, याचा उलगडा जरा धाष्टर्याचा व आश्चर्य वाटण्यासारख्या रीतीचा सुचवीत. तेंच जडद्रव्य एकाच समयीं अनेक ठिकाणीं असूं शकत नाहीं. ह्या सिद्धांताला सर्वस्वी सृष्टिनियमाचा आधार आहे; पण ज्याला अद्भुत चमत्कार म्हणावयाचें, त्याच्या संबंधांत ह्या सृष्टिनियमांना अस्तित्वच नाहीं; व तिष्ठद्रूप सत्त्वांतराच्या चमत्कारावरून मानवी देहाच्या नैकस्थवासाची असंभाव्यता पार नाहींशी होते असें दिसतें. कांहीं झालें तरी सैतान निदान त्या काळापुरता द्वितीय देह देऊं शकेल. त्याचा हेतु हा कीं, न्यायाधिशांचा गोंधळ उडावा. हा दुसरा उलगडा धर्मज्ञानपंडितांना अतिशय रुचला; व ते त्याच्या पुष्टिकरणार्थ सनातन धर्मांतील दोन प्रख्यात अद्भुत चमत्कार मोठया दिमाखानें पुढें आणीत.

## पिशाचें व सैतान हीं चेटक्यांना वाटेल तिकडे नेतात; व त्यांचीं रूपें घेतात.

एका प्रसंगीं सन्त आंब्रोज हा मिलन येथील देवळांत उपासना चालवीत असतां मध्येंच एकाएकीं थांबला, वेदीवर त्याचें डोकें टेंकून राहिलें व तो सारखा तीन तास निश्चल राहिला. श्रोतृसमाज आशीर्वचनाची स्तब्धपणें वाट पहात राहिला. सरतेशेवटीं संत महाराज देहभानावर आले; आणि तेव्हां त्यांनीं श्रोतृवृंदाला खात्रीपूर्वक सांगितलें कीं, मी तूर्स येथें सन्त मार्तिनचा अंत्यविधि चालवीत होतों; अर्थात् हें त्यांचें सांगणें पुढें थोड्या दिवसांनीं प्रत्यंतर पुराव्यानें खरें ठरलें. सन्त क्लीमेन्ताविषयींही असलाच एक चमत्कार सांगत. हा ख्रिस्ती धर्माच्या प्राथमिक काळांतला संत रोम येथें उपासना चालवीत असतां पिसा येथील देवळाचा समर्पणविधि चालविण्याकरितां त्याला बोलावणें आलें. तेव्हां त्याचा देह अथवा तद्रूपधारी

देवदूत रोम येथें राहिला; पण तो संत त्याच वेळीं पिसा येथें हजर होता; व तेथें संगमरवरी शिळेवर या चमत्काराच्या स्मरणार्थ आपल्या रक्ताचे थोडे बिंदु त्यानें पाडून ठेविले ( ७० ). एकंदरींत साधारण मत असें झालेलें दिसतें कीं, चेटक्या कधीं देहासकट तर कधीं देहविरहित निव्वळ चिन्मयरूपानें सैतानाच्या निशीथोत्सवाला नेल्या जात; व न्यायाधिशांची अक्कल गुंग करण्याकरितां पिशाचें कधीं कधीं बायांचीं रूपें धारण करून त्यांच्या ठिकाणीं राहत ( ७१ ).

## सैतान व भुतें वाटेल त्या प्राण्यांचींही रूपें घेतात.

दुसरा महत्त्वाचा व विवाद्य मुद्दा म्हणजे दुरात्मे व मानवेतर प्राणी यांचा काय संबंध आहे हा होय. सैतान वाटेल त्या प्राण्याचें रूप धारण करूं शकतो (७२) हें सामान्यपणें सर्वांस मान्य असे आणि सैतानाचें या पृथ्वीवर प्रथम आगमन सर्परूपानें झालें व एकदां डुकराच्या रूपानें पुष्कळ भुतें डुकरांच्या कळपांत शिरलीं ( ७३ ); या गोष्टी ज्यांच्या ध्यानांत होत्या, त्यांना या प्रश्नासंबंधीं बिलकुल अडचण नव्हती. सन्त जेरोमनेंही खात्रीपूर्वक लिहिलें आहे कीं, अरण्यांत संत आंतनीला सेन्तार ( अश्वमुख ) व फान ( मेषपाल अगर सशृंग वामनबटु ) भेटले; ते तद्रूपधारी पिशाच असावेत ( ७४ ). आणि कांहीं झालें तरी तदनंतरच्या कांळीं ख्रिस्ती संतलीलामृतांत दुरात्मे वारंवार पशुरूपधारी आढळतात. तथापि वृकरूपधारण (म्हणजे चेटक्या लांडग्याचें रूप धारण करितात) याविषयीं मात्र जास्त अडचण वाटे. नेब्यूक्याडनें झारची कथा, व लाटच्या स्त्रीचें रूपांतर या गोष्टी पूर्वोक्त रूपधारणाच्या शक्यतेच्या समर्थनार्थ उत्साहानें पुढें आणीत हें खरें; पण सन्त आगस्ताईन वृकरूपधारणाची गोष्ट कल्पित मानीसें दिसतें आणि अनसीराच्या परिषदेच्या ठरावानें या विश्वासाचा जोरानें निषेध केला आहे या गोष्टी विसरणें शक्य नव्हतें. पण उलटपक्षीं हा विश्वास प्राचीन लोकांत फारच दूरवर पसरला होता. पुष्कळ थोरथोर आणि अत्यत सनातनी धर्मज्ञानपंडितांनीं, पोपाचार्यांनीं, अधिकृत पाखांडन्यायासनांतल्या न्यायाधिशांनीं, व पुष्कळ देशांच्या न्यायासनांनीं, तो मान्य केला होता. त्याला आधारभूत जो पुरावा मिळे तो फार विलक्षण व निश्चित असे. एखाद्या प्राण्याचें रूप घेतलेलें असतांना जर त्या प्राण्याच्या आंगाला कोठें जखम झाली, तर ती जखम

त्या चेटकीच्या मानवी आंगाला लागत असे, व असल्या शेंकडों गोष्टी न्यायासनांपुढें सांगितल्या जात. कधीं कधीं शिकारी आपल्या आंगावर उलटून तुटून पडणाऱ्या श्वापदाचा पंजा तोडून विजयचिह्न म्हणून बाळगून ठेवण्याकरितां तसाच तो आपल्या म्हसकेंत टाकी. पण म्हसक उघडून पाहतां त्याला फक्त रक्तबंबाळ मानवी हात मात्र दिसे; व आणखी तो आपल्या बायकोचाच अशी खूण पटे (७५).

### जादूच्या प्रभावाच्या आणखी गोष्टी.

सनातन पंथांतल्या ब्रह्मचर्येच्या कल्पनेवरून निघालेल्या म्हणजे मनोविकारांवर होणाऱ्या जादूच्या प्रभावाच्या गोष्टींकडे अखेरीस आतां वळूं.

### स्त्रियांविषयीं निष्कारण बनलेला दुर्ग्रह.

जुन्या सनातन-पंथाच्या धर्मज्ञानाची ध्यानांत राहण्यासारखी विशिष्ट खूण होऊन बसलेली जी स्त्रीसंबंधीं बेसुमार शिसारी, ती उत्पन्न करणारी कल्पनापरंपरा समजणें कठीण नाहीं. ब्रह्मचर्य हा सर्वत्र उत्तमोत्तम सद्गुण मानीत व हा सद्गुण लोकांस सुलभतेनें मान्य व्हावा, एतदर्थ ज्यांच्या मोहनीनें तो इतका विरळ आढळतो, त्या सुंदरीच्या दुष्टपणाच्या वर्णनांत धर्मज्ञानपंडित आपल्या वाक्चातुर्याचें भांडार रितें करित. स्त्रियांच्या अंगीं अद्वितीय मत्सर, अकल्प्य धूर्तपणा, हलकटपणा, बेमानपणा, अनिवार्य दुष्ट प्रवृत्ति, आहेत; अशाबद्दल लांबलचक व आवेशयुक्त व्याख्यानें होत तीं यामुळेंच. यांनी एका युगांत लोकांना स्त्रियांचा मोठा बाऊ वाटे; पण पुढच्या काळांत त्यांच्या योगानें करमणूक होऊं लागली. हीं आवेशयुक्त व्याख्यानें पूर्ण गंभीरपण वाचणें कांहीं सोपें काम नाहीं. पण हीं व्याख्यानें ज्या मतांचीं निदर्शक आहेत, त्यांचा प्रभाव बहुधा जादू वगैरे विश्वास बसण्यासारखा लोकांचा पूर्वग्रह करण्यांत व लोकांना दण्डय अपराध्यांचे विपळाप पाहूनही यत्किंचित् द्रव न येण्यासारखे पक्के पाषाण बनविण्यांत दिसतो; यामुळें त्या व्याख्यानांस एक प्रकारचें विषादकारक सार्थत्व येतें.

### चेटुक करणाऱ्या विशेषतः बायकाच कां ?

ज्यांच्यावर चेटुक, जादू वगैरेचा आरोप असे, त्या बहुतेक बायकाच असत, याचें कारण काय ? या प्रश्नाकडे प्रथमारंभीं लक्ष्य

लागलें होतें; आणि या प्रश्नाचें उत्तर सर्वत्र असें मिळे कीं, बायकांची जातच तशी दुष्ट, यामुळें त्या चेटुक करतात; त्यांच्या शरिरांतल्या नाजुक शिराजालाच्या सुलभ संवेद्यतेमुळें आणि अतएव धार्मिक एकतानभ्रम अगर मारक रोग होण्याच्या त्यांच्या पात्रतेमुळें त्यांच्यांवर चेटुक वगैरेचा ज्यास्त परिणाम घडतो असें कोणी म्हणत नसे. प्राचीन लेखक क्रोधावेश-युक्त अगर दृष्टांतबाहुल्ययुक्त वक्तृत्वविस्तार ज्यावर अधिक करीत, असा दुसरा कोणताही विषय नव्हता (७६). असें सांगत कीं, 'या जगांत जर का स्त्रीजात नसती, तर देवाशीं मानवांचें संघटन झाल्यावांचून राहिलें नसतें,' असें केतोनें विधान केलें आहे. सिसरोचें म्हणणें असें कीं, 'पुरुषाची एखाद्या गुन्ह्याकडे प्रवृत्ति होण्यास पुष्कळ हेतु असावे लागतात; पण एखाद्याच हेतूच्या पूर्तीस्तव स्त्रिया सर्व प्रकारचे गुन्हे करतील.' सालेमनला या बाबतींत निरीक्षण करावयाला अतिशय वाव होता; त्यानें आपला अनुभव अनेक सणसणीत उक्तींनीं गोंवून ठेविला आहे. जेव्हां स्त्रीजातीबद्दल 'आवश्यक अनर्थ, स्वाभाविक मोह, इष्ट संकट, घरगुती विघ्न, घातुक भुरळ, नटवलेलें अनिष्ट,' असे उद्गार क्रिसास्तोमच्या तोंडून निघाले, तेव्हां ख्रिस्ती प्राचीन धर्मपित्यांचा भावच त्यानें व्यक्त केला; यापेक्षां जास्त कांहीं नाहीं.

## स्त्रिया जात्याच दुष्ट आहेत, असें रडगाणें.

एकामागून एक पंडित हेंच रडगाणें गात सुटला. स्त्रीजातीच्या अघटित कृत्यांचीं उदाहरणें जमविण्यास इतिहास उलथे पालथे करूं लागला, व एतद्विषयक पुरावा धर्मग्रंथांतून काढून दाखवूं लागला; व हें सर्व चित्तक्षोभ बिलकुल न होतां अतिशय कळकळीनें व भारदस्तपणें चाललें होतें. बहुतेक स्त्रीजातीबद्दल ज्या पुरुषांनीं मोठ्या गंभीरपणें हेंच अनुमान बसविलें होतें, ज्यांनीं ब्रह्मचर्याला सद्गुण-मालिकेचा मेरु ठरविलें होतें व तद्भंगकारी हरएक मोह म्हणजे सैता-नाच्या सदोदित जवळ उभें असण्याचा प्रत्यक्ष परिणाम असें मानलें होतें, ते साहजिकपणेंच शृंगारविषयक प्रत्येक गोष्ट सैतानाच्याच प्रभावानें विशेषेंकरून झालेली आहे असें म्हणूं लागले. चेटकासंबंधीं वाङ्मयाच्या आकाशांत चमत्कारिक व विचित्र कादंबऱ्यांचे पुष्कळ अस्ताव्यस्त किरण

चमकतात, ते याचमुळें. रतिसुखदायिनी व रतिसुखभोक्ते दुरात्मे सदासर्वकाळ मनुष्यांत येऊन वावरत असत; आपल्या अलौकिक सौंदर्यानें अवशेंद्रिय माणसांना मोहून टाकून त्यांचा नाश करीत; व संतांचें सत्त्व हरण्याकरितां कारस्थानें योजीत व तीं पुष्कळदां सफलही होत. कधीं कधीं वैखानस व्रतानें राहणाऱ्यांच्या मनांत ऐहिक प्रेमाची ज्वाळा चेटक्या उत्पन्न करित व एका मत्सरी बाईच्या तोडग्यानें असल्या राजस संतापज्वालेनें एका जर्मन मठांतल्या चार अधिपतींचा एकामागून एक क्षयानें कसा अंत झाला हें लोक घाबरून सांगत (७७). तो दुष्ट दुरात्मा सैतान जरा जास्त साजऱ्या मत्सरानें कधीं कधीं एखाद्या प्रख्यात धर्माधिकाऱ्याचें रूप धारण करून त्याच्या नांवाला कालिमा लावण्याचें मनांत आणी; आणि एखाद्या तरुणीला आपल्या ओळखीच्याच व आपणास संत वाटत असलेल्याच एखाद्या धर्मोपाध्यक्षाला आपल्या पायांवर लोटांगण घालतांना पाहून आश्चर्य वाटे (७८). या मारक शस्त्रांचा उपयोग ब्रह्मचर्य व्रतानें राहणारांवरच काय तो होत असे असें नाहीं; विवाहसौख्यांतही विघ्न कालवण्याचीं चेटक्यांचीं कारस्थानें सदा चालू असत; व विवाहशय्येला वैफल्य आल्यामुळें कितीशें माणसें झुरून मेलीं आहेत तें कोणीही सांगूं शकणार नाहीं (७९).

## ऐतिहासिक विवेचनांत गतकाळांतल्या खुळांचेंही इतकें महत्त्व कां ?

हीं वर सांगितलेलीं मतें व हे मुद्दे वाचकांना बहुधा फारच पोरकट वाटतील; तथापि इतका वेळ हें लांब चऱ्हाट वळल्याबद्दल वाचकांची माफी मागण्याचें कारण नाहीं; कांकीं या मतांचें व मुद्यांचें महत्त्व त्यांच्या अंगच्या मगदुरावर अवलंबून नाहीं, तर मत–मतांतराच्या इतिहासाशीं जो त्यांचा संबंध त्यावर अवलंबून आहे. गत काळांतलीं खुळें शहाण्या शहाण्या माणसांनींही आदरल्यामुळें विवेचनाला योग्य झालीं आहेत; व प्रस्तुत विषयांत तर बुद्धीच्या उत्कर्षाच्या नियमांचें कुलूप उघडण्यास ही एक अमोलिक किल्लीच मिळाली आहे असें वाटतें. आपल्या काळापेक्षां मागचा काळ फारच भावडेपणाचा होता, असें वारंवार म्हणतात व तें खरें आहे. पण हा फरक, भावडेपणा कोणती दिशा स्वीकारतो त्यांत जितका आहे,

तितका भाबडेपणा किती होता व किती आहे, यांत नाहीं. जें कांहीं विशेष संभाव्य असा विश्वास असतो, तें थोड्याशा पुराव्यानें खरें मानण्यास लोक नेहमीं तयार असतात. संभाव्यतेच्या मापानेंच अखेर लोकांच्या श्रद्धेचा प्रांत निश्चित होतो; व स्वतः हें माप मानवी सुधारणेच्या प्रभावानें सतत फिरत असतें. मध्ययुगांत, सोळाव्या शतकांत, व सतराव्या शतकाच्या आरंभीं संभाव्यतेचें माप मुख्यत्वेंकरून धर्मज्ञानानें ठरत होतें. त्या काळांतलें लोकांच्या भोंवतालचें श्वासोच्छ्वास करण्याचें वातावरणच अगदीं धार्मिक होतें. त्यांच्या बुद्धीच्या व कल्पकशक्तीच्या सर्व विषयांत धर्मज्ञानाच्या अनुबंधांची झांक असे; व जी जी गोष्ट त्यांच्या परिचित विचारांशीं जुळती असे, ती ती खरी मानण्यास ते आनंदानें एका पायावर तयार असत. अमानुष गोष्टींसंबंधीं विश्वासोन्मुखता इतकी जबरदस्त होती कीं, थोड्याशा सृष्टिनियमित गोष्टींवरून चेटुक वगैरेचें मोठ्या गुंतागुंतीचें एक बाडच तयार झालें; त्याबद्दल परिस्थित्यात्मक व विविध पुराव्याचा अवाढव्य डोंगर बनला; कित्येक शतकेंपर्यंत सर्व व्युत्पन्न लोकांना त्याचा खरेपणा निर्विवाद मान्य झाला होता; व तो युरोपांतील प्रत्येक देशांतल्या न्यायासनांच्या छाननींतून चाळतांना जशाचा तसाच कायम उतरला; व हजारों लोकांना भयंकर मरणाला बळी पडावें लागून, त्यांच्याबद्दल कोणालाही यत्किंचित् वाईट वाटलें नाहीं.

**प्रतीति व प्रमाणें पाहण्यास शहाणे सुद्धां धजावत नसत; तशा परिस्थितींत आपणही तेंच केलें असतें.**

चमत्कारांच्या हकीकतींची नेहमीं येणाऱ्या अनुभवाशीं सांगड पडावी म्हणून त्या हकीकतीचा जोर जरा कमी करायची, अगर तिच्याविषयीं कांहीं तरी कारण सांगून तिची कशीतरी वासलात लावायची, थोडीसुद्धां कोणाला इच्छा नसे; कारण अनुभवाशीं यत्किंचितही संबंध नाहीं अशा कल्पनांनीं लोकांचीं मनें पूर्णपणें व्यापलेलीं होतीं. जर सृष्टपदार्थनियमांस धाब्यावर बसवून दुरात्मे आमच्या सभोंवतीं घिरट्या घालीत असतात, असेंच आपणांसही वाटलें असतें; जर असेल नसेल ती आपली अमानुष शक्ति खर्च करून मानवजातीला त्रास देण्याच्या इराद्यानें घातक मत्सरबुद्धीनें आमच्या प्रत्येक कृत्यावर हे दुरात्मे नजर ठेवतात, असेंच आपणांसही दिसलें असतें; जर

आमच्या प्रत्येक व्यवहारकक्षेंत त्यांनीं आपल्या भयाण छायांनीं अंधार पाडला असता; जर असिरियाच्या सैन्याच्या डोकीवर अगर यरुशलेमच्या रस्त्यांवर आपली यमसदनास पाठविणारी तरवार विनाशबुद्धि देवदूत परजीत आहे, असेंच आपल्याही दृष्टीस पडतें; व जर सैतान ख्रिस्ताला हवेंतून घेऊन जात आहे, अगर सैतानाच्या पकडींत सांपडून पछाडलेले लोक दुःखोद्वेगानें घाबरून तोंडांतून फेंस टाकीत आहेत, असेंच आपल्याही नजरेस आलें असतें; तर आपलासुद्धां बहुधा यासंबंधीं सोळाव्या व सतराव्या शतकांतल्या धर्मज्ञानपंडितांप्रमाणेंच विचार झाला असता. आमचीं सुद्धां मन या भयाण मूर्तींनीं इतकीं व्याप्त झालीं असतीं कीं, त्यामुळें आयुष्यांतील नित्याच्या अनुभवावरून जें संभाव्यतेचें माप आपणांस माहीत आहे, त्याहून तें कांहीं निराळेंच झालें असतें; दुरात्म्यांच्या सतत सान्निध्याच्या भयोत्पादक जाणीवीनें आपला नेहमीं पिच्छा पुरविला असता; व त्यांच्या पराक्रमाचे दाखले सदा हुडकून काढण्याकडे आपली प्रवृत्ति झाली असती.

## तत्कालीन धार्मिक विचारसरणीनें चेटुक वगैरे वरील विश्वास उद्भवला व तिच्या क्षीणतेनें ऱ्हास पावला.

चेटकावरील विश्वास उत्पन्न होण्याचीं जीं सबळ कारणें आहेत त्यांचें विशदीकरण वरील हकीकतीवरून होण्यासारखें आहे अशी खात्री वाटते. या हकीकतीवरून कळून येईल कीं, चेटुक वगैरेचा उद्भव काकतालीयन्यायानें झाला नाहीं, वैयक्तिक विक्षिप्तपणांतून झाला नाहीं, किंवा शास्त्रीय अज्ञानामुळेंही झाला नाहीं; तर या संसारांत सैतानी कर्तबगारी हुडकण्याकडे असलेल्या सामान्य पूर्वप्रवृत्तीपासून झाला. हा चेटकाचा उद्भव त्या काळीं रूढ असलेल्या धार्मिक विचारसरणीपासून झाला व त्या विचारसरणीचें त्यांत प्रतिबिंब उठलें होतें; आणि ही विचारसरणी क्षीण किंवा साफ नष्ट झाली, तेव्हांच त्याचा ऱ्हास झाला. मध्ययुगांतल्या बहुतेक प्रत्येक भागांत थोडीं तरी माणसें अशीं असत कीं, सर्वसाधारण जे भोळेपणाचे प्रकार त्यांच्या थोड्या अंशीं तरी तीं उलट असत; पण त्यांचीं मतें बिलकूल दुर्ज्ञेय मानलीं जात; व अशा माणसांचा तत्कालीन लोकांवर

उमगण्यासारखा कांहीं परिणाम घडला नाहीं. खरोखर या अल्पसंख्य माणसांच्या मतांवर गूढ तत्त्वांचें आवरण असल्यामुळें त्यांचा इतका विपर्यास झाला व त्यांस इतका भौतिकपणा आला कीं, त्यांच्यायोगें असलेला अंधकार वारंवार ज्यास्तच गाढ मात्र झाला. जोंपर्यंत सर्वसाधारण भाबडेपणा कायम होता, जोंपर्यंत अद्भुत चमत्कारांकडे व सैतानी प्राबल्याकडे लोकांच्या मनांची प्रवणता होती, तोंपर्यंत हा चेटकाचा भोळेपणा कोणत्याही प्रयत्नानें उन्मूलित होऊं शकला नाहीं. असल्या विचारस्थितींत पुरावा झुगारून देण्यापेक्षां तो स्वीकारण्याकडेच नेहमीं लोकांची ज्यास्त प्रवृत्ति असावयाची. न जाणों, कदाचित् उलट ठरेल असा तीव्र अंदेशा मनांत येऊन त्या पुराव्याची छाननी करण्याचें ते नाकारावयाचे; आणि ढोंगाला यांत थोडीशी जागा आहे असें जरी त्यांनीं कबूल केलें, तरी चेटकावरील श्रद्धा एकंदरीच्या मानानें निर्व्याज आहे, याबद्दल ते कधींही शंका घ्यावयाचे नाहींत. हा भोळसटपणा नाहींसा व्हावयालाही लोकांच्या मनाची पूर्वग्रहप्रवृत्ति पालटली पाहिजे; अगदीं उघड उघड असंभाव्य म्हणून असल्या हकीकतींपासून लोकांचीं मनें परावृत्त झालीं पाहिजेत; आणि ह्या गोष्टींच्या असंभाव्यतेच्या जाणिवेचा पगडा शास्त्रवचनप्रमाणापुढें वांकण्याच्या लोकमनाच्या प्रवृत्तीवर इतका बसला पाहिजे कीं, सर्वतोपरी या गोष्टींबद्दलचा पुरावा टाळण्याची ते खटपट करतील; व तो पुरावा खोटा ठरवितां आला नाहीं तरी त्यावरून त्यांचा विश्वास उडेल. इतक्या गोष्टी झाल्या नाहींत तोंपर्यंत या घातक भोळसटपणाला अर्धचंद्र मिळावयाचा नाहीं. या भोळसटपणाच्या ऱ्हासानें युरोपांतल्या कार्यकारणाभिज्ञ चेतनेचा उदय लक्षांत येतो व त्याच्या नाशानें तिचा पहिला जय जाणवतो.

### अंधुक संदिग्धमतित्व त्या कालींही होतें.

पाखंडन्यायासनांमधील न्यायाधिशांच्या लेखांत ठिकठिकाणीं असे उद्गार आढळतात कीं, त्यांवरून त्या कालींही कांहीं लोकांच्या मनांत थोडा तरी संदिग्धमतित्वाचा अग्नि धुमसत असावा असें दिसतें. लोकमतावर खोल ठसा उमटविण्यास तें संदिग्धमतित्व समर्थ नव्हतें खरें व कोणा थोर व्यक्तीच्या नांवाशीं अजूनपर्यंत तें संबद्ध झालेलें माहीत नाहीं ( ८० ). तसेंच तत्संबंधीं एकादा मोठा ग्रंथ झालेलाही माहित नाहीं. पग कांहीं धर्मज्ञानपंडि-

तांना हुरहुर लावण्यापुरतें तें स्पष्ट होतें; गर्सननें लिहिलें आहे कीं, धर्मज्ञान-पंडित जेव्हां जेव्हां पिशाचांविषयीं बोलतात, अथवा कांहीं गोष्टी त्यांच्या सामर्थ्यानें घडल्या असें म्हणतात, तेव्हां तेव्हां जणू काय या अगदीं कादंबरीवजा गोष्टी, म्हणून त्यांची थट्टा जे उडवितात त्यांचा तिटकारा केला पाहिजे, व त्यांना खरोखर कडकपणें शिक्षा लाविली पाहिजे. कांहीं विद्वानांच्या अंगीं ही चूक आढळते; तिला अंशतः त्यांचा श्रद्धाभाव व अंशतः त्यांच्या बुद्धीचें दौर्बल्य व अपूर्णता कारण होत..... कां कीं, प्लेतोनें म्हटल्या-प्रमाणें हरएक बाबतींत इंद्रियांचें मत घेणें व त्यांना सोडून वागण्याचें सामर्थ्य नसणें, हा सत्याकडे जाण्याच्या मार्गांतला जबरदस्त अडथळा होय (८१). स्प्रेंजरनेंही धर्मज्ञानपंडितांना, कांहीं तदितर लोकांत जी अस्पष्ट संदिग्धमतित्वाची चेतना उदित झाली होती, तिच्याशीं कसा सामना करावा याविषयीं एका लांबलचक भागांत उपदेश केला आहे. 'या अश्रद्धाळु लोकांना खरोखर ठराविक विचारपद्धति माहीत नव्हती, ते अंधारांत चांचपडत होते, कधीं या मुद्यावर, तर कधीं त्या मुद्यावर त्यांचा हात पडे,' असेंही तो म्हणतो. इ०स० १४८७त कलोन विश्वविद्यालयाच्या पंडितांची सभा भरली होती (८२). या सभेनें याहूनही विस्मय-कारक बंडाबद्दल दिलगिरी प्रदर्शित करून अधिकारयुक्त वाणीनें व कडक-पणें त्याचा निषेध केला. हें बंड जेथें उपस्थित झालें तेथें तें होईल अशी क्वचित्‌च कल्पना होती. कलोनच्या वृत्तिप्रदेशांत जेव्हां चेटकाच्या भयाचें वेड पसरलें होतें, तेव्हां तें जरा कमी व्हावें म्हणून कांहीं उपाध्यायांनीं त्या गुन्ह्यांच्या सत्यतेबद्दलच शंका प्रदर्शित केली.

### चेटुक करणारांस शिक्षा झाल्यामुळें केव्हां केव्हां बंडेंहीं झालीं.

यानंतर सुमारें तीस वर्षांनीं स्पिना लिहितो कीं, कांहीं ठिकाणीं असंख्य लोकांस देहान्त शिक्षा मिळाल्यामुळें अतिशय कडवा विरोध उत्पन्न झाला. (८३) इतालीच्या उत्तर–भागांत तर प्रत्यक्ष बंडच झालें; त्यावेळीं एक प्रकारची विश्वासपराङ्मुखता झाली होती, व तिच्याबद्दल या धर्मज्ञानपंडिताला अत्यंत खेद झाला. "दूरदर्शीपणा, भक्ति व निष्ठा यांचा ज्यांच्या अंगीं अत्यंत अभाव तीं माणसें विश्वास ठेवण्यास पात्र अशा गोष्टींवर विश्वास ठेवीत नाहींत; व याहूनही शोचनीय गोष्ट अशी कीं, ख्रिस्ताच्या शत्रूंचा

नाश करणाऱ्यांना अडथळा व्हावा म्हणून हे लोक आपलें असेल नसेल तें बळ खर्च करितात.'' स्पिनानें बरोबर शेरा दिला आहे कीं, असल्या वागणुकीचा दोष ज्यांच्याकडे येतो, त्यांना ती अत्यंत कष्टप्रद होय; कारण त्यांनांच त्या गुन्ह्याकडे कानाडोळा केल्याबद्दल शासन भोगावें लागणें न्याय्य होईल. पुनः ज्या धर्मसंस्थेचे पाखंड न्यायासनावरील न्यायाधीश प्रतिनिधि होत, त्या धर्मसंस्थेला व त्या न्यायाधिशांना अधिकार देणाऱ्या पोपाचार्यांना असल्या वागणुकीनें बट्टा लागतो. असेंही आढळतें कीं, असले चेटकाचे खटले अखेर निकालासाठीं आमच्याकडे यावे, असें धर्माधिकारी खरमरीतपणें म्हणत, व चेटक्यांना दोषमुक्त करणाऱ्या धर्म्येतर न्यायाधीशांच्या गैराशिस्त वर्तनाबद्दल मधून मधून तक्रार करीत; तथापि हें सगळें संदिग्धमतित्व अव्यक्त व अस्पष्ट होतें, असें दिसतें; व जान वियरनें आपल्या ' दी प्रीस्तिजिइ दिमोनम् ' नांवाच्या ग्रंथांत तिला जें पद्धतशीर रूप दिलें तें इ० स० १५६३ पर्यंत दिलेलें नव्हतें.

### चेटुक करणाऱ्यांविषयीं वियर नामक वैद्याचें मत.

( क० २५ ) वियर हा क्लीवज येथील एक विद्वान् व समर्थ वैद्य होता. वैद्यकानुरोधानें त्याची खात्री झाली होती कीं, चेटुक करण्याबद्दल ज्यांना शिक्षा होते, त्यांपैकीं पुष्कळ माणसें वेड लागलेलीं असतात; व हा मनुष्य मोठा दयाळु अंत:करणाचा असल्यामुळें त्या माणसांना सोसाव्या लागणाऱ्या अपेष्टांनीं त्याच्या मनाला मोठा धक्का बसला. तो प्रतिरोधी पंथाचा होता; आणि म्हणून कदाचित् आपल्या समकालीन कांहीं लोकांइतका संप्रदायाचा अगदीं दास बनलेला नव्हता. मात्र एवढें खरें कीं, अधिकारप्रमाणापुढें मान वांकविण्याच्या त्याच्या प्रवृत्तीस आजच्या काळांत निवळ वेडेपणा मानतील. लोकशिक्षणाच्या एखाद्या आद्यतत्त्वाविरुद्ध बंड करून त्याचें जूं झुगारून द्यावें, अथवा रूढ विचारसरणींतून आपली मान सोडवून घ्यावी, अशी त्याला तिळमात्र इच्छा नव्हती. जगाच्या वस्तींत दुरात्म्यांची मोठी दाटी आहे व हे दुरात्मे सदा सर्वकाळ मानवजातींत अद्भुत चमत्कार करीत असतात, अशी त्याची पक्की खात्री होती. त्याचा उद्देश केवळ एवढाच होता कीं, अलौकिक म्हणून मानलेल्या संघटनांपैकीं कांहीं आंगरोगामुळें घडतात असा जो आपला

स्वतांचा विश्वास, त्याची व दुरात्म्यांच्या सर्वव्यापकतेच्या आपल्या जाणिवेची सांगड घालावी. सगळ्या चेटक्या सैतानाच्या कपटजालांत गुंतलेल्या असत, असें त्याला वाटे. त्या खरोखर सैतानाशीं सूत बांधण्याचें काम करीत, अगर वातावरणांतून रपेट करीत, अथवा वादळें उत्पन्न करित किंवा रोग आणीत, अथवा सैतानाच्या प्रत्यक्ष उपस्त्रिया होत, अशांतला कांहीं प्रकार नसे; तर सैतान त्यांच्या आंगांत येई व त्यामुळें आपण असल्या गोष्टी केल्या, असें त्यांना वाटे. येणेंप्रमाणें 'आंगांत येणें' अगर 'पछाडणें' याचा अर्थ इतका विस्तृत झाला कीं, त्यांत चेटकाचा समावेश होऊं लागला. चेटकानें भारलेलें माणूस म्हणजे सैतानानें ग्रासलेलेंच खरें; पण हें काम खुद्द सैतानानें केलेलें; एखाद्या चेटकीच्या द्वारें केलेलें नव्हे. मात्र काम करूनच्या करून वहीम एखाद्या थेरडीवर जावा, असें केलेलें; हेतु इतकाच कीं, होईल तितकी तिची हालअपेष्टा वाढावी.

### 'स्त्री जातीचा भावडेपणा' यावर वियरचें प्रतिपादन.

वियर म्हणे कीं, रोगानें माणसाच्या शक्ति क्षीण झालेल्या असतात तेव्हां, व हाल सोसून स्वभाव कडू झालेला असतो तेव्हां, त्यावर सैतानाचा पगडा विशेष बसण्याचा संभव असतो. 'स्त्रीजातीचा भावडेपणा व भंगुरपणा' यांवर त्याच्या पुस्तकांत एक विद्वत्ताप्रचुर व वक्तृत्वपूर्ण प्रकरण आहे; यांत त्यानें ग्रीक तत्त्वज्ञ व ख्रिस्ती धर्मपिते यांचे आधार देऊन बायकांवर वाईट गोष्टींचा परिणाम विशेष होतो असें दाखविलें आहे. त्यानें आणखी असेंही दाखविलें आहे कीं, मानसिक व नैतिक अस्थैर्य हा दोष चेटुक करणाऱ्या बायकांच्या आंगीं विशेषेंकरून आढळतो. त्यानेंच प्रतिपादिलें आहे कीं, 'लेवितिकसच्या' कायद्यांत 'चेटकी' म्हणून ज्या शब्दाचें भाषांतर केलें आहे, त्याचें 'विष घालणारी' असें भाषांतर करतां येईल. तसेंच जलप्रलयाच्या अगोदर स्त्रियांचा देवदूतांशीं संबंध असे, म्हणून जी धर्मपित्यांची कल्पना ती अग्राह्य आहे, असेंही त्यानें प्रतिपादिलें. लोकग्रहांपैकीं कांहींची ठळक असंभाव्यता त्यानें स्पष्टपणें दाखविली आहे; व बरीच अनावश्यक विद्वत्ता ओतून त्याबद्दल स्पष्टीकरण केलें आहे; आणि या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत युरोपच्या राजांना निरुपद्रवी रक्ताचा स्राव बंद करण्यास कळकळीनें विनंति केली आहे.

## वियरचा लोकमान्य मतावर हल्ला.

या ग्रंथांतील अश्रद्धा धाडशीपणाची मानतां येत नाहीं, चेटकाच्या इतिहासांत वियर हा अद्वितीय होय. या विषयावर नंतर ज्या ग्रंथकारांनीं लिहिलें आहे ते सर्व व वियर यांमध्यें मुख्य बाबतींत तफावत आहे. वियर हा दोन काळांना जोडणारा दुवाच होय. त्याचें मन त्याच्या विरुद्धपक्षांतील लोकांच्या मनाइतकेंच अद्भुतांच्या जाणिवेनें व्यापलेलें होतें; व अमानुष शक्तीच्या परिघाचा संकोच करण्याचें त्याच्या कधीं स्वप्नींसुद्धां नव्हतें. तथापि त्याचा ग्रंथ, होता त्या स्वरूपांतच तो लोकमान्य मतांवरचा थोडा बहुत महत्त्वाचा म्हणण्यासारखा पहिला हल्ला होता; व त्याकडे विद्वान् लोकांचें बरेंच लक्ष वेधलें. बेसल व आम्स्तरदाम हीं जीं त्या वेळचीं स्वतंत्र विचाराचीं केंद्रें होतीं, त्या ठिकाणीं थोड्याशा वर्षांत या ग्रंथाच्या तीन आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या. इ० स० १५६९ त त्याचें फ्रेंच भाषेंत भाषांतर झालें. या ग्रंथामागून 'द लामिइ' नांवाचा ग्रंथ त्यानें लिहिला; व त्याबरोबर नरकांतल्या नायकांची विलक्षण यादी व नरकाच्या रचनेचें वर्णन हीपण प्रसिद्ध केलीं (८४). या नव्या पुस्तकांमागून लगेच उत्तरादाखल एक ग्रंथ प्रसिद्ध झाला; 'लोकशासन' नांवाच्या ग्रंथाच्या नांवाजलेल्या कर्त्याच्या लेखणींतून तो उतरला होता; त्या कर्त्याचें नांव बोदिन; हा युरोपांतला एक अतिशय नाणावलेला तत्त्वज्ञ होता.

## बोदिनचची विद्वत्ता व वजन.

(क० २६) बोदिन यास त्याच्या पुष्कळ समकालीनांनीं फ्रान्सांत त्यावेळीं उदयास आलेला अतिशय समर्थ माणूस म्हणून नांवाजलें होतें व हें त्यांचें मत नंतरच्या लेखकांनीं क्वचित्च बदललें (८५). चैनींत सामर्थ्य उधळणाऱ्या व कारस्थानें करणाऱ्या अतएव स्वास्थ्य बिघडविणाऱ्या दरबारांत राहून व न्यायाधीशाच्या कामाचे परिश्रम करूनही त्यानें इतकें अफाट व विविध ज्ञान संपादिलें होतें कीं, तो आपल्या राष्ट्रांतील विद्वन्मालिकेंत मेरुस्थानीं जाऊन बसला. राजकीय तत्त्वज्ञान व राजकीय इतिहास यांच्या मुख्य उत्पादकांत बसण्याची व आजच्या कालीं या विषयांसंबंधीं ठरलेले पुष्कळ सिद्धांत अगोदरच प्रतिपादिल्याची फारच उंच पुण्याईही त्याच्या पदरीं आहे. न्यायाधीश या नात्यानें चेटकाचे कित्येक खटले त्याच्या अध्यक्षत्वाखालीं चालले होते या विषयावर त्यानें आपल्या विद्वत्तेचें सर्व

सामर्थ्य खर्चिलें होतें. त्यानें आपल्या ' दिमोनोमानी द सार्सिएर् ' नामक ग्रंथाचा बराच भाग वियरच्या शेवटच्या ग्रंथाच्या प्रकाशनापूर्वी लिहिला होता.

## बोदिनचा वियरवर भडिमार.

' दिमोनोमानी द सार्सिएर् ' हा ग्रंथ म्हणजे मुख्यत्वेंकरून शब्दप्रमाणावर दिलेला हवाला होय. बोदिनला वाटत होतें कीं, या विषयावरील या शब्दप्रमाणांत इतकें ऐकमत्य व निर्णयात्मकत्व होतें कीं, याला विरोध करणें, कोणाही देहभानावर असलेल्या मनुष्यास क्वचित्च शक्य होतें. त्यानें दिलेला हवाला सर्वकाळच्या, सर्वदेशांच्या व सर्वधर्मांच्या लौकिक श्रद्धेवर होता. प्राचीन पेगन लेखकांपैकीं पुष्कळ थोर थोर लेखकांचीं व अति प्रख्यात ख्रिस्ती धर्मपित्यांचीं मतें त्यानें उतरून घेतलीं होतीं. सर्व राष्ट्रांच्या कायदेकानूंत चेटुक वगैरेचें आस्तित्व कसें मानलें जात होतें, हें त्यानें दाखविलें. स्वदेशांतल्या व परदेशांतल्या न्यायासनांपुढें चौकशीस आलेल्या शेंकडों खटल्यांची माहिती त्यानें जमा केली. वेताळजत्रे ( निशीथोत्सवा ) चें सर्व कामकाज, वातावरणांतून जाण्याच्या चेटक्यांच्या युक्त्या, चेटक्यांचें रूपांतर, त्यांचा सैतानाशीं शरीरसंबंध, शत्रूंना इजा करण्यास्तव त्यांनीं योजिलेलीं नानाविध साधनें, त्यांचा पत्ता काढण्याच्या खुणा, दोषी ठरविल्यावर त्यांनीं दिलेले कबूलजबाब, व जाळण्याच्यावेळीं त्यांची वागणूक, यांचें वर्णन त्यानें आतिशय बारकाईनें व यथातथ्य तपशिलानें आणि आतिशय अढळ विश्वासानें दिलें आहे. वियरच्या ग्रंथाविषयीं म्हणाल तर तो वाचतांना वाटलेलें आश्चर्य व आलेला संताप व्यक्त करण्यास बोदिनजवळ शद्बच नव्हते. सर्वकाळीं मानलेल्या प्रमाणांविरुद्ध तोंड देण्यास एखाद्या लुंग्यासुंग्या वैद्यानें धजणें व एखाद्या आतिशय मशहूर प्रत्यक्ष घडणाऱ्या गोष्टीबद्दलच्या पुराव्याकडे संदिग्धमतीनें नाकतोंड मुरडून तो तुच्छ मानण्याइतका स्वतःच्या मतांविषयीं अमर्याद विश्वास व मानवजातींतील प्राज्ञांच्या मतांबद्दल असा अत्यंत तिटकारा त्यानें बाळगणें म्हणजे खरोखर मनुष्याच्या उद्धटपणाची अगदीं कमाल झाली; मनुष्याच्या मूर्खपणाचा अगदीं कळस झाला; यांत धाडसाची सीमा दिसली; हें तर खरेंच. पण धार्मिकतेचा अभाव जास्तच दिसला.

## वियरनें केलेली देवनिंदा व देवद्रोह.

वियरनें 'प्रत्यक्ष देवाविरुद्ध शस्त्र उचलिलें' त्याचा ग्रंथ म्हणजे 'भयंकर देवनिंदा' होय. 'ज्याला म्हणून देवाबद्दल यत्किंचित् अभिमान वाटतो त्याला ही निंदा वाचून सात्त्विक त्वेष आल्यावांचून राहणार नाहीं.' इतक्या नेकीच्या न्यायाधिशांनीं दिलेल्या शिक्षांना दोष लावण्याचें धाडस त्यानें केलें आहे. ज्यांवर धर्मशास्त्र व धर्मसंस्था यांनीं अति निंद्य अपराधी म्हणून मुद्रा मारली, त्यांना बचावण्याचा त्यानें प्रयत्न केला; इतकेंच नव्हे तर, आणखी त्यानें एका जगजाहीर जादुगारापासून मंत्रशिकून घेतलेले प्रसिद्ध करण्याचें धाडस केलें. ( ८६ ) ही प्रसिद्धि पाहून ख्रिस्ती धर्माचें भविष्यकाळीं काय होणार याबद्दलच्या विचारानें कोणालाही धडकी भरल्यावांचून राहिली असती काय ? अशा रीतीनें प्रसिद्ध झालेल्या गोष्टी जिकडे तिकडे पसरल्यामुळें चेटक्यांची संख्या अगण्य वाढेल, सैतानाचें प्राबल्य फार अफाट होईल, व निरुपद्रवी लोकांस अमित यातना सोसाव्या लागतील, याबद्दल कोणी शंका घेतली असती काय ? सभोंवतालची स्थिति अशी असतां चेटुक, जादू वगैरेचे खटले कमी तर नाहींच होतां कामाचे; पण, उलट ते दुप्पट उत्साहानें चालवावयाला पाहिजे होते; व ज्यानें इतकें धार्मिकतेच्या अभावानें भरलेलें पुस्तक लिहिलें व धर्मभ्रष्ट धंद्यांतल्या गुप्त गोष्टींशीं ज्याचा इतका परिचय दिसला, त्या माणसाहून योग्य वहिमास जास्त पात्र खचित दुसरें कोणीही झालें नसतें. ईश्वराच्या कायद्यानें ज्यांला देहान्तशासन सांगितलें, त्यांना क्षमा करण्याचें काम खरोखर राजाच्याही कर्तव्यप्रांताबाहेरचें आहे. असल्या कृत्याचा दोष ज्यांच्या पदरीं आला, त्यांनीं देवाचा द्रोह केला; त्यांनीं देवाचा कायदा खरोखर धाब्यावर बसविला आणि म्हणून सांथींचे रोग व दुष्काळ यांनीं त्यांचा मुलूख बेचिराख झाल्याविना कधीं रहावयाचा नाहीं. ( ८७ ) एका राजाचा या बाबतींतल्या आपल्या कर्तव्याला न जागल्यामुळें कसा घात झाला, तो दाखला आलेला आहे. त्राथ एकेले नांवाच्या प्रसिद्ध जादुगाराचा जीव नवव्या चार्लस राजानें त्याच्यापासून आपल्या साथीदारांविरुद्ध जबानी देण्याची अट करून घेऊन बचाविला होता; या घोर पापाबद्दलच त्या

राजास मृत्यूनें अकालीं गांठलें, असें बहुधा म्हणावें लागतें: 'कारण ईश्वराचा शब्द कधीं खोटा व्हावयाचा नाहीं, ईश्वरानें ज्याला देहान्त-दंडास पात्र ठरविलें, त्याला जो सुटूं देतो तो ती शिक्षा आपणावर ओढून घेतो; याला उदाहरण आहाब राजाला ईश्वराच्या प्रेषितानें म्हटलें आहे कीं, मरणास पात्र अशा माणसाचा जीव बचाविल्याबद्दल तुला मरावें लागेल. कारण जादुगारांना क्षमा केल्याचें कधींच कोणीं ऐकिलें नाहीं. ( ८८ )'

### मान्तेनच्या ग्रंथांत शब्दप्रामाण्यावर भर बिलकूल नाहीं.

( क० २७ ) सोळाव्या शतकाच्या अखेरी अखेरीस असल्या मतांचा जाहीर उपदेश चालला होता. हा उपदेश युरोपांतल्या एका प्रमुख राष्ट्रांतील अतिशय उन्नत बुद्धीच्या एका माणसानें केला; आणखी हा उपदेश करितांना त्याच्या भाषेंत जो निश्चितपणाचा व विजयाचा झोक उतरला आहे, त्यावरून आपल्या वाचकांची सहानभूति आपणास मिळेल अशी त्याला कशी पूर्ण खात्री वाटत होती हें दिसतें. 'दिमोनोमानी द सासिंएर' हा ग्रंथ इ० स० १५८१ त प्रसिद्ध झाला. यानंतर केवळ सात वर्षांनीं मान्तेननें फ्रेंच भाषेंतला पहिला मोठा संदिग्धमतिप्रधान ग्रंथ प्रसिद्ध केला; आणि ज्या पुष्कळ विषयांवरून त्याची संदिग्ध-मतित्वाची दृष्टि फिरली, त्यांत चेटकाला प्रमुख स्थान आहे. चेटका-विषयीं त्यानें केलेल्या विवेचनाची पद्धत व बोदिन आणि वियर यांच्या ग्रंथांतील पद्धत यांत जितका विरोध आहे, त्याहून जास्त लक्षांत भरण्या-जोगा विरोध कल्पिणें क्वचितच आहे. शब्दप्रमाणाची जी अवाढव्य फौज या दोन ग्रंथकारांनीं आवडीनें उभी केली आहे व जिच्यायोगें त्यांनीं आपल्या सर्व विचारसरणीला घाट आणला आहे, तिचा मान्तेननें निमूटपणें व निश्चयानें अव्हेर केला आहे. अद्भुतांची बेसुमार आवड, भूतपिशाचा-दिकांच्या सामर्थ्याची सर्व स्वाहा करणारी जाणीव वगैरे चट सारें निमिषार्धांत अदृश्य झालें. जुनें धर्मज्ञानाचें माप पार नाहींसें होऊन त्याच्या ठिकाणीं धर्मेतर धूर्त व्यवहारज्ञानाचें माप आलें. चेटक्यांच्या जबान्या नुसत्या एकाकी पाहिल्या तर अविश्वास्य होत, असा त्यांवर शेरा मिळाला. त्यांतल्या पुष्कळ जबान्यांचें कारण संक्षुब्ध कल्पनाशक्तीचीं स्वप्नें अगर यातनाकारक

यंत्रांची भयानकता होय, असें सांगतां येईल. पण जेव्हां पुढें आलेल्या पुराव्याची कसें बसें कारण सांगून वासलात लावणें अशक्य असतें, तेव्हांसुद्धां त्या पुराव्यावर विश्वास ठेवणें अगदीं अनावश्यक होय. मान्तेननें म्हटलें आहे कीं "अनुभव व वास्तविक घडलेल्या गोष्टी यांवर स्थापलेला पुरावा व प्रमाणें आहेत, नाहींत असें नाहीं; त्यांचा उलगडा करण्याचें मी ढोंग करीत नाहीं. जशी शिकंदरानें गांठ सोडली नाहीं, तर कापून टाकिली; तसेंच मीही या पुराव्यासंबंधानें वारंवार करतों. एकंदरींत आमच्या मतांवरून मनुष्यांना जिवंत जाळणें म्हणजे आमच्या मतांची किंमत फारच चढवणें होय." या विषयासंबंधीं कांहीं जबान्यांतील कांहीं विधानांचा समर्पक उलगडा आम्हांस कदाचित् करतां येणार नाहीं; तथापि आपण असा विचार केला पाहिजे कीं, एखादी जख्खड बाई केरसुणीच्या दांड्यावर घोड्यासारखी बसून धुराड्याच्या वाटेनें हवेंत निघून जाते, हें जितकें संभवनीय आहे, त्याहून आपलीं इंद्रियें आपणांस फसवितात, असें होणें फारच ज्यास्त संभवनीय आहे; आणि चेटक्यांनीं त्यांच्यावर आरोप केलेलीं कृत्यें केलीं ( ८९ ) हें जितकें विस्मयकारक आहे, त्याहून साक्षीदार खोटें बोलतात असें होणें फारच कमी विस्मयकारक आहे. यानंतर बऱ्याच काळानें धर्मज्ञानाच्या वादविवादांत अतिशय प्रामुख्य मिळण्याचें जिचें भाग्य होतें, तीच प्रतिपादनपद्धति या ठिकाणीं मान्तेननें अगोदरच स्वीकारली होती.

### मान्तेन हाच पूर्वग्रहांच्या विरुद्ध जाणारा पाहिला फ्रेंच ग्रंथकार.

मोठा विवेचक अशी लायकी नसूनही लोकमतावर ज्यांचें जबरदस्त व सर्वसाधारण वजन होतें अशा लेखकांपैकीं मान्तेन हा एक होता, असा मेलब्रान्शनें शेरा दिला आहे व तो योग्य आहे. या वस्तुस्थितीचा उलगडा पडणें फारसें कठिण वाटणार नाहीं. मान्तेनच्या कालांत लोक भूतकाळच्या मोहक गोष्टींनीं मन्त्रबद्धासारखे थिजून राहिलेले होते; असें असून मान्तेनची प्रत्येक प्रश्नावरची विचारसरणी शुद्ध होती, म्हणजे ती धर्म-ज्ञानपंडितांच्या कल्पनाभ्रांनीं मलिन झालेली नव्हती; किंवा शब्द-प्रमाणाच्या शृंखलांनीं जखडलेली नव्हती. मान्तेनच्या मानसिक शक्तीची अपूर्वता त्याच्या मनाच्या सामान्यकालांत व स्वभावांत जितकी दिसते,

तितकी त्याच्या निश्चित मतांत अगर त्याच्या प्रतिपादनांत दिसत नाहीं. मान्तेन हाच असा पहिला फ्रेंच ग्रंथकार होऊन गेला कीं त्यानें आपणाला इतक्यां दिवस सर्वत्र रूढ असलेल्या पूर्वदर्शी विचारसरणीच्या दास्यांतून मुक्त करून घेतलें होतें; त्यानें सर्वच प्रश्नांचा निकाल धर्मेतर दृष्टीनें, व्यवहारज्ञानाच्या उजेडानें, नित्याच्या अनुभवावरून मिळालेल्या संभाव्यतेच्या मापानें, करण्याचें धाडस केलें.

## विवेचकशक्तीच्या जोरावर अडथळ्यांना त्यानें जुमानिलें नाहीं.

निःसंशय त्याला पूर्णपणें माहित होतें कीं, प्लेतोच्या, द्वादशसूत्री (रोमचा आरंभींच्या बारा कायद्यांचा संग्रह) च्या, रोमी लोकनायकांच्या व रोमी बादशहांच्या तसेंच इराणी, यहुदी, ग्रीक, लातिन, जर्मन, फ्रेंच, इतालिअन, स्पानिश, इंग्लिश या सर्व राष्ट्रांच्या व तेथल्या कायदे करणाऱ्या मंडळांच्या, कायद्यांत चेटक्ये, जादुगार वगैरेस देहान्तशासन सांगितलेलें आहे. त्याला हेंही माहित होतें (९०) कीं, भविष्यवादी, धर्मज्ञानपंडित, वैद्य, न्यायाधीश व फौजदारी अंमलदार यांणीं हजारों भलतेच पूर्वग्रह, आरोप, पुरावे, गुन्हेगारी ठरविणारे निकाल, पश्चात्ताप, राजीखुषीचे व मरेपर्यंत न बदललेले कबूलजबाब यांच्या साह्यानें या गुन्ह्यांची सत्यता स्पष्टरीतीनें सिद्ध केलेली होती. तथापि मानवी विवेचकशक्ति अत्यंत प्रमादशील आहे, हेंही त्याच्या लक्ष्यांत होतें. ऐतिहासिक संघटनांत आपल्या पूर्वग्रहांचें प्रतिबिंब मानवी मनाला कसें सुलभतेनें आढळतें, आणि भाबड्या व तारतम्यशून्य काळांत कल्पित गोष्टींची कथा कशी लवकर तयार होते हेंही तो जाणत होता. सनातनपंथी, प्रतिरोधीपंथी व केवलेश्वरपंथी गतकाळाचे पोंवाडे गाण्यास अहमहमिकेनें सरसावत असतां, प्रत्येक व्युत्पन्नाला व धर्मज्ञानपंडिताला आपल्या सभोंवतीं असलेल्या जगाचा बिलकूल गंध नाहीं; अशा विचारांचें वातावरण आपल्या मनाभोंवतीं बनविण्याची महत्त्वाकांक्षा असतां, ज्ञानसुलभ श्रद्धाळुपणाची गुलामगिरी करीत असतां, पूर्वग्रहाच्या जड बेड्या ज्यांच्या बुद्धीच्या पायांत आहेत तेच मानवजातींत अत्यंत ज्ञानी ह्मणून मानले जात असतां, मान्तेननें आपल्या जोमदार बुद्धीच्या बळावर वास्तवतेच्या स्वच्छ उंच प्रदेशांत चढून जावें;

ज्ञानानें गुलाम बनलेल्या नव्हे, तर जोमास चढलेल्या बुद्धीनें आपल्या काळांतल्या लोकमतांचें त्यानें परीक्षण करावें; व भूतकाळच्या संस्थांसभोंवतीं असलेल्या पूज्यभावाच्या तेजोवलयानें दिपून न जातां त्याचें त्यानें मनन करावें; हें त्यास भूषणावह होय. इतिहासाच्या अफाट क्षेत्राकडे, त्यांतील परस्परविरोधी उत्साही संस्थांकडे, त्यांतील विसंवादी पद्धतींकडे, त्यांतल्या सदा पालटणाऱ्या लोकग्रहांच्या भरती–ओहोटीकडे तो तुच्छतेनें पाही व त्यांच्या मननानें आपल्या समकालीन लोकांच्याहून अत्यंत भिन्न धडा शिके.

## मान्तेनची भरारी फार उंच गेली नव्हती.

आतां हें खरें कीं, तात्त्विक मतांच्या भरती ओहोटीनें उंच पायरीवरचीं जीं अढळ तेजानें चमकणारीं नैतिक मूलतत्त्वें त्यांची पूर्ण ओळख त्याला पटली नव्हती; लोकग्रहांवर आधिष्ठान घेऊन त्यांच्या प्रगतीला वळण देणारे, अव्यवस्थित दिसणाऱ्या स्थितींत व्यवस्था आणणारे, व वरवर पाहिलें तर धोपटमार्ग सोडून जातेशी वाटणाऱ्या प्रत्येक गतींत हेतु व अर्थ दाखविणारे, शाश्वत उन्नतीचे थोर नियम त्याला गवसले नव्हते; तथापि त्याला निदान मानवी बुद्धीची प्रमादपात्रता तीव्रतेनें प्रत्यक्षीभूत झाली होती; हें जुनें ह्मणूनच त्याला अत्यंत मान देण्यांतला वेडेपणा त्याला पूर्णपणें कळला होता; आणि ज्या मतांबद्दल खात्री ह्मटली तर अत्यल्प, त्यांच्याच जोरावर माणसांना जिवें मारण्याची शिक्षा देण्यांतल्या धोक्याची तीव्र जाणीव त्याला आली होती.

## मान्तेन हा पहिला थोर कार्यकारणवादी तत्त्वज्ञ.

या गोष्टीमुळें चेटुक वगैरे प्रकार म्हणजे नुसता भ्रम असावा, अशी शंका त्याला वाटूं लागली. त्याच्या मानसिक प्रकृतीनें व प्रवृत्तीनें चेटुक बिलकुल असंभाव्य आहे, असा त्याचा ग्रह केला. अर्वाचीन धर्मेतर व कार्यकारणवादी चेतनेचा हाच पहिला थोर प्रतिनिधि होय. जुन्याच्या लिगाडांतून आपलें मन मोकळें करून घेतल्यामुळें भूत–पिशाचांच्या करणींच्या गोष्टींचा निकाल, लोकांना बराच काळपर्यंत अपरिचित असलेल्या दृष्टीनें व मापानें, लावण्यास तो शिकला होता. जुन्या धर्मज्ञानपंडितांचा कल चेटुक, जादू वगैरेंच्या सर्व गोष्टी सैतानामुळें होतात, असें मानण्याकडे

असे; आणि जेव्हां कांहीं फसवाफसवीच्या अगर वेडाच्या ढोबळ खुणा दिसत, तेव्हां अमानुष कर्तबगारीच्या आपल्या सिद्धांतांशीं कसातरी त्यांचा मेळ बसवण्याची ते खटपट करीत. चेटुक वगैरे सर्व गोष्टी म्हणजे स्वाभाविक कारणांचाच परिणाम, असें मानण्याकडे मान्तेनचा बळकट कल होता; आणि म्हणून जरी ऐकलेल्या सर्वच गोष्टींचा उलगडा करण्याचा त्यानें प्रयत्न केला नाहीं, तरी त्या गोष्टी खऱ्या मानणें म्हणजे कल्पनातीत असंभाव्यता खरी मानणें होय; अशी त्याची खात्री झालेली होती. हा कांहीं मूषक–सर्पन्यायाचा मासला नव्हे किंवा ही अज्ञानाची सुंदर कल्पना नव्हे. धर्मज्ञानाच्या सर्वच प्रश्नांस त्यानें लाविलेल्या विचारसरणीच्या कसोटीचा हा प्रत्यक्ष परिणाम होता.

## सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धाच्या अगोदर व शेवटीं.

मान्तेनच्या ग्रंथासारखा ग्रंथ याहून पन्नास वर्षें अगोदर निर्माण झाला असता, तर त्या वेळीं तो बिलकूल दुर्ज्ञेय वाटता व त्याच्या जनकाला कदाचित् जळून मरावें लागतें. सोळाव्या शतकाच्या अखेरीस त्याचा आदर करण्याइतकी लोकांच्या मनाची तयारी झाली होती; आणि ईश्वरदत्त सत्याचा जसा पडावा तसा त्याचा फ्रान्सवर लखकन् उजेड पडला. मान्तेनच्या निबंधांच्या प्रकाशनाच्या वेळेपासून सदोदित वाढत जाणाऱ्या व प्रतिभावान् कार्यकारणवादी पंथाच्या प्रभावाला आरंभ झाला. या कार्यकारणवादानें चेटुक वगैरेवरचा विश्वास हळुहळु साफ नष्ट केला. हें काम त्यानें तत्संबंधीं पुराव्याचें खंडन करून किंवा त्याचीं कारणें दाखवून उलगडा पाडून केलें, असें नव्हे; तर केवळ चेटुक वगैरे गोष्टी जात्याच खुळेपणाच्या आहेत, अशी लोकांची अधिक समजूत घालून केलें.

## मान्तेनचा अनुयायी शारन.

( क्र० २८ ) मान्तेनच्या मागून तेरा वर्षांनीं शारननें आपला 'ज्ञान' या विषयावरचा ग्रंथ लिहिला. यांत त्यानें मान्तेनच्या पुष्कळ मतांस व्यवस्थित स्वरूप दिलें; पण अपूर्वता व बुद्धि यांचें मान या ग्रंथांत कमी होतें. मान्तेनप्रमाणें शारनही अद्भूत चमत्कारांविषयीं तिटकारा करी. पण मान्तेनप्रमाणें त्याच्या संदिग्धमतित्वाचा उगम पुराव्याच्या रीतसर परीक्षणापासून झाला नव्हता; तर केवळ पुरावा पहाण्याच्या अगोदर वाटणाऱ्या

असंभाव्यतेच्या पक्क्या जाणिवेपासून झाला होता. मान्तेननें ज्याविषयीं केवळ बळकट शंका दर्शविली होती, त्याबद्दलच शारननें नास्तिकता प्रकट केली.

### या नव्या चेतनेच्या उलट सनातनाभिमान्यांचे प्रयत्न.

( क० २९ ) सर्व सतराव्या शतकभर हीच विचारसरणी चालू होती. तिनें हळूहळू पण खात्रीनें जुन्या लोकग्रहांचें सत्त्व एकसारखें शोषून टाकलें. परंतु जरी अलीकडील प्राचीनवस्तुसंशोधकांच्या उद्योगानें या विषयावरचे प्रसिद्ध झालेले दोन तीन कोनाकोपऱ्यांत पडून राहिलेले ग्रंथ उकरून काढले होते ( ९१ ); तरी त्यायोगें लोकांचें लक्ष्य या विषयाकडे वेधलें अगर या चळवळीची गति वाढविण्यांत म्हणण्यासारखें त्यांचें वजन पडलें, अशांतला प्रकार नाहीं. ही चळवळ म्हणजे कांहीं वादविवादाचा अगर मतविरोधाचा देखावा नव्हे, तर फक्त मूक ऱ्हासाचा व अस्ताचा होय. पछाडलेल्यांचें पिशाच काढण्याचें काम उपाध्यायांनीं चालविलेंच होतें, ते चेटक्यांवर फिर्यादी करीतच होते, यासंबंधीं जो जो शंका प्रकट करी त्याला त्याला 'नास्तिक' असा शाप देण्याचा सपाटा त्यांनीं सुरू ठेविलाच होता. कायद्यांच्या पुस्तकांतून कायदेबाजांनीं असंख्य कायदे शोधून काढिले व न्यायासनांपुढें चौकशा झाल्याचे अगणित प्रसंग काढून दाखविले, आणि अशा प्रकारें धर्मोपाध्यायांप्रमाणेंच चेटकावरच्या विश्वासाचें त्यांनीं चिकाटीनें समर्थन केलें. तथापि उपाध्याय व कायदेपंडित या पूर्वदर्शी वर्गांच्या बाहेरच्या लोकांत चेटकाविषयींच्या असंभाव्यतेची जाणीव सारखी बळकट होत गेली; ती इतकी कीं, सैतानाचें अंग असलेल्या कोणत्याही गोष्टीचा त्यामुळें बहुधा उपहास होऊं लागला. ज्यांच्या विचारांचें वळण अगदीं धर्मवैशिष्ट्यविहीन व ज्यांच्या मनांवर शब्दप्रमाणाचा पगडा अत्यंत कमी अशा लोकांत विशेषेंकरून हें पाणी दिसे ( ९२ ).

### थोर व व्युत्पन्न लोकांचीं मनें द्विधा होतीं.

( क० ३० ) कांहीं थोर व्युत्पन्न गृहस्थ व ग्रंथकार यांच्या मनाची स्थिति या विषयासंबंधानें द्विधा झाली होती व भीतीनें निर्णयशक्ति दोलारूढ होऊन हेलकावे खात होती; कारण चेटकासंबंधीं असंभाव्यतेची त्यांना पूर्ण जाणीव आली होती, तरी पण उलटपक्षीं तत्संबंधीं पुरावा

अप्रतिकार्य दिसत होता. लाब्रुएरनें म्हटलें आहे कीं, जादूचा ज्यावर आधार तीं तत्त्वें अस्पष्ट, अनिश्चित व आभासमान दिसतात; पण गांगरून टाकणाऱ्या पुष्कळ गोष्टी स्वतःच्या डोळ्यांदेखत घडलेल्या म्हणून भरंवशालायक माणसांनीं सांगितल्या आहेत; तेव्हां त्यांचा अंगीकार अगर अव्हेर करणें दोन्ही सारखींच अविचाराचीं कामें होत; म्हणून 'सर्वच कबूल' म्हणणाऱ्या श्रद्धाळूंच्या व 'सर्वच त्याज्य' म्हणणाऱ्या अनिर्बंध विचार करणाऱ्यांच्या मधली स्थिति बरी ( ९३ ). यासंबंधीं बेलचीही दृष्टि अशीच दिसते ( ९४ ). देकार्तविषयीं जितकी माहिती आहे, तेवढ्यावरून पाहिलें तर, प्रत्यक्ष या विषयासंबंधीं त्यानें कधींच कांहीं म्हटलेलें नाहीं; तथापि या विषयावर बहुधा त्याच्या विचाराचा बराच परिणाम झालेला आहे. कारण त्याच्या विचाराचा कल संप्रदायाचें जूं मनावरून झुगारून देण्याकडे, तत्त्वज्ञानाला धर्मवैशिष्ट्यहीन स्वरूप देण्याकडे, व आत्म्याशीं बरेच दिवस निगडित झालेल्या भौतिक कल्पना नष्ट करण्याकडे होता. मेलब्रांश सांगतो कीं, माझ्या काळीं कांहीं राजसभांनीं चेटक्यांना जाळण्याचें बंद केलें होतें; व त्यांच्या अमलाखालच्या प्रदेशांत चेटक्यांची संख्या कमी झाली होती. यावरून त्यानें असें अनुमान काढलें होतें कीं, कल्पनाशक्तीच्या सांसर्गिकतेमुळें चेटकाविषयींच्या पुष्कळ गोष्टी उत्पन्न झाल्या होत्या. त्यानें फार दक्षतेनें वृकरूपधारणमत तयार करणाऱ्या विचारशैलीचें पृथक्करण केलें. पण स्वतः धर्मोपाध्याय असल्यामुळें, खऱ्याखुऱ्या जादुगारांना निःसंशय देहान्तशासन दिलें पाहिजे ( ९५ ), हें वाक्य त्यास तेथें नमूद करून ठेवावें लागलें. वोल्तेरनें या सगळ्या विषयाचें विवेचन तुच्छतायुक्त विनोदानें केलें आहे; त्यानें म्हटलें आहे कीं, फ्रान्स देशांत तत्त्वज्ञांची संख्या जशी वाढली तशी त्या मानानें चेटक्यांची संख्या विरळा आढळूं लागली. त्यानें स्पिना व स्प्रेंजर यांप्रमाणेंच जोरानें याविषयींच्या श्रद्धेबद्दल आधारभूत धार्मिक वचनें एकत्र केलीं आहेत; पण यांत त्याचा उद्देश मात्र सदहू दोन गृहस्थांच्याहून फार निराळा आहे (९६).

## चेटकाचे खटले विरळ व निर्जीव झाले.

(क० ३१)सत्राव्या शतकाच्या पहिल्या अर्धांत चेटक्यांचा नाश करण्यासाठीं दिवाणी सत्तेनें एकसारखें आपलें सामर्थ्य वेंचलें. मान्तेनच्या व शारन-

च्या ग्रंथांच्या प्रकाशनाच्या दरम्यान संत क्लादच्या न्यायासनांत बोगे अध्यक्ष होता व तेथें त्यानें सहाशें माणसें विशेषेंकरून वृकरूपधारणाच्या गुन्ह्यावरून जाळलीं असें म्हणतात. नंतर थोड्या वर्षांनींच दुए येथें मागें सांगितल्याप्रमाणें पन्नास माणसें मारलीं. आणि इ० स० १६४२ त कार्दिनल माझारिननें एव्रोच्या धर्मोपाध्यक्षाला एक पत्र लिहिलें, त्यांत त्यानें या बाबतींत या धर्मोपाध्यक्षानें दाखविलेल्या कळकळीला यश आल्याबद्दल त्याचें अभिनंदन केलें होतें ( ९७ ). तथापि सत्राव्या शतकाच्या मध्यास या बाबतींतल्या वाढत्या अश्रद्धेचा ओघ अधिकारी–मंडळीपर्यंत पोंचला होता. चेटकाचे खटले विरळ होऊं लागले व त्यांत जीव नाहींसा झाला. आणि इ० स० १६७२ त कोलबर्तनें जादुगिरीचे आरोप नोंदून घेऊं नये असा फौजदारी अंमलदारांना हुकूम केला; व पुष्कळ खटल्यांत या गुन्ह्याबद्दल झालेली देहान्तशिक्षा फिरवून हद्दपारीची केली. रूआनच्या शासनसभेनें राजाकडे एक फारच विलक्षण अर्ज पाठविला होता, तो कांहीं शिक्षा अशा रीतीनें जेव्हां पालटल्या तेव्हां होय. या अर्जांत ईश्वराचा शब्द, फ्रान्सच्या कायद्यांतले मागील दाखले व ख्रिस्ती धर्माचे सर्व संप्रदाय यांला अगदीं सोडून ही सवलत दिलेली आहे; अशी तक्रार धर्माच्या कळकळीनें तारस्वरानें केली होती (९८). यानंतर जादू वगैरेचे केवळ अगदीं थोडे खटले झाले.

## वोल्तेरचा उदय व चेटकाच्या गोष्टींची टर.

इ० स० १६८१ त झालेला लक्झेंबर्गच्या मार्शलचा खटला कदाचित् अतिशय ध्यानांत धरण्याजोगा असेल. खटले इतके कमी होण्याचें कारण असें कीं, चेटुक वगैरेसंबंधीं संदिग्धमतित्व यापूर्वींच फार टळक झालें होतें; व सत्राव्या शतकाच्या शेवटल्या वीस वर्षांत फ्रान्सदेशांत फक्त सात जादूगार जाळले गेले. याहून पुढें इ० स० १७१८त बोर्दोच्या शासनसभेनें या आरोपावरून एका माणसाला जाळलें. यापुढेंही एक–दोन खटले झाले खरे, पण त्यांत आरोपी दोषमुक्त ठरले. वोल्तेर तारा क्षितिजाच्या वर आला होता; व चेटक्यांविषयीं कसलीही गोष्ट सांगितली तरी तिची वोल्तेरचे अनुयायी बाकी न ठेवतां टर उडवीत. त्यायोगें ज्यांच्या अंगीं ही अश्रद्धा नव्हती, त्यांना भीति वाटे. सनातन पंथाच्या याज्ञिकींत भूता-

पसारक मंत्र अद्यापि होतेच व आजतागायतही तें आहेत. या मंत्रांचा आठव्या शतकभर वारंवार उपयोग करीत असत. पण धर्मोपाध्यायांपैकीं जे ज्यास्त सुशिक्षित होते, ते याविषयाची हेळसांड होऊं देत; व जर कोणीं त्याचें पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केला, तर त्यांचा तो प्रयत्न ते दाबीत. या नवीन चळवळीची प्रगति कशी होते, हें समजणें जुन्या परंपरेला अजूनही चिकटून राहणाऱ्यास मुष्किलीचें झालें असलें पाहिजे. मनुष्यांच्या मनांत सैतानाला अगदीं इवलीशी जागा सुद्धां मिळूं नये म्हणजे शोचनीय गोष्ट खरीच; पण सैतान सदोदित जवळ उभा आहे, याजबद्दलच्या अद्भूत खुणा देखील साफ नाहींशा व्हाव्या म्हणजे मोठेंच गूढ होय.

## हें गूढ उकलण्याचा प्रयत्नः–आबे फियर्दचा ग्रंथ.

चालू म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीं हें गूढ उकलण्याच्या इच्छेनें **आबे फियर्द** यानें ग्रंथ प्रसिद्ध केला. त्यानें त्या ग्रंथांत दाखविलें कीं, गेल्या म्हणजे अठराव्या शतकांतले क्रांतिकार व तत्त्वज्ञ प्राचीन जादुगारांचेच प्रतिनिधि होत, त्यांना त्यांच्या कामीं प्रत्यक्ष सैतानामुळें स्फूर्ति येई व केवळ सैतानाच्या सामर्थ्यामुळेंच त्यांना यश येई. तथापि हा सैतानाचा प्रभाव अद्भूत प्रकरणांतला नव्हे, तर केवळ नैतिक प्रकरणांतला होय असें कोणी ह्मणेल, म्हणून त्यानें आपल्या म्हणण्यास अशी पूरणिका जोडली कीं, थक्क करून सोडणारे पुष्कळ मोठमोठे चमत्कार या तत्त्वज्ञानविषयक चळवळीच्या बरोबर घडत आले व अद्यापि ते बंद पडले नाहींत. मेस्मरचे रुक्प्रतीकार व क्याग्लिओस्त्रोचीं भाकितें हीं दोन्हीं अमानुष कर्तृत्वाचींच फळें मानलीं पाहिजेत. पण सैतान सदोदित जवळ उभा आहे याबद्दलचीं थक्क करणारीं चिह्नें गारुडवाणीच्या नित्य वाढत जाणाऱ्या लोकप्रियतेंत दिसत होतीं. या शेवटल्या ह्मणजे गारुडवाणीच्या बाबतींत आमच्या एकाकी अनुमानावरच आह्मांला भिस्त ठेवावी लागत नाहीं, हें आमचें सुदैव होय. चवदाव्या शतकांतल्या धर्मपरायण विद्वानांनीं गंभीरपणें ठरविलें आहे कीं, मनुष्यानें आपल्या मुखानेंच बोलावें असा ईश्वरी संकेत असतां, जर तो इतर कोणत्याही द्वारानें बोलेल ह्मणजे जर तो उदरवाणी काढील, तर तें त्याचें करणें सैतानाच्या साह्यानें होतें असें ह्मटलें पाहिजे (९९).

## सन १५४१ पर्यंत जादूगिरीविरुद्ध इंग्लंदांत कायदा नव्हता

( क० ३२ ) सनातनपंथी देशांतल्याहून नव्या प्रतिरोधी पंथाच्या देशांतला चेटकाचा इतिहास अल्पांशानेंच भिन्न असल्यामुळें, त्याविषयीं विशेष पाल्हाळ करण्याची गरज नाहीं. उभय पंथांत चेटकावरच्या श्रद्धेचें बीज अद्भुताकडच्या कलांत होतें; व धार्मिक भयानकतेच्या कमी--ज्यास्त प्रमाणावरून छळाची तीव्रता उणी–अधिक होत असे. आणखी या उभय पंथांच्या देशांत झालेला कार्यकारणाचा उगम व वाढ हीं चेटकाविषयींच्या श्रद्धेच्या ऱ्हासाचें मूळ व माप झालीं होतीं. इंग्लंदांत इ० स० १५४१ पर्यंत म्हणजे धर्मसुधारणेच्या पहिल्या उद्रेकानें तो देश संक्षुब्ध होईपर्यंत जादूगिरीविरुद्ध कायदा नव्हता असें दिसतें. ह्या गुन्ह्याची माहिती या काळापूर्वींच होती व त्याबद्दल कांहीं देहान्त–शिक्षाही झालेल्या होत्या; पण त्या फारच विरळा होत्या; व त्याच्या मुळाशीं श्रद्धालुत्व व अन्य हेतु यांचें बहुधा मिश्रण असे. या चेटकाच्या श्रद्धेला बळी पडलेल्या माणसांत अतिशय योग्यतेचें मनुष्य जी आर्कची जोन तिचा अंत इंग्रजांहातीं झाला, मात्र तो फ्रान्सच्या भूमीवर व फ्रेंच धर्मोपाध्यक्षाच्या दोषी ठरविणाऱ्या निवाडयावरून झाला. नंतर कांहीं वर्षांनीं बोफर्टच्या कार्दिनलनें ग्लुस्तरच्या दचेसवर जादू टोण्यानें राजाचा जीव घेण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केल्यामुळें त्या दचेसला देह-दण्डन सोसणें भाग पडलें, आणि तिच्या नोकरांपैकीं दोघांस देहान्त–शासन झालें. आणखी कांहीं उदाहरणें सांगोसांगीं आमच्या पिढीपर्यंत उतरलीं आहेत.

## इंग्लंदांत भोळेपणा कमी असण्याचें कारण.

तथापि युरोपांतील इतर देशांपेक्षां हा भोळेपणा इंग्लंदांत कमी ठळक होता यांत कांहीं संशय नाहीं (१००). मात्र एवढें खरें कीं, जुन्या गुन्ह्यांच्या नोंदणींत अतिशय दोष असल्यामुळें आणखी कांहीं उदाहरणें घडलीं असून त्यांचा विसर पडला असण्याचा संभव आहे. इंग्लंद देश बेट असल्यामुळें इतर देशांपासून अलग आहे; व तेथल्या लोकांत प्राचीन काळापासूनच राजकीय व्यवसायाचा तीव्र आवेश भरलेला आहे, अंशतः या दोन्ही कारणामुळें इंग्लंदांत न डगमगणाऱ्या व स्वावलंबी स्वभावाचीं माणसें तयार झालीं; हा स्वभाव युरोपांत सर्वसाधारण दिस-

णाऱ्या स्वभावाहून विशेषेंकरून भिन्न होता. मुख्यत्वेंकरून भोळसट व सत्त्वशोषक भयांतून ते मुक्त होते व मनुष्याचा तेजोभंग करणाऱ्या धर्मांगांस ते पारखे होते. तथापि धर्मसुधारणेच्या लढालढींत कांहीं भोळसटपणाचे आसुरी प्रकार दिसूं लागणें साहजिकच; व तदनुसार क्रान्मर आपल्या चौकशीच्या कलमांत हाताखालच्या धर्मोपदेशकांस सांगतो कीं, " जे कोणी मंत्र, जादू, मोहिनी, चेटुक, भाकित वगैरेसारख्या सैतानानें काढलेल्या विद्येचा उपयोग करीत असतील, त्यांचा शोध लावा. "

## इंग्लंदांत चेटकाविषयींचे कायदे सौम्य होते.

( क० ३३ ) आठव्या हेन्रीच्या कारकीर्दींत चेटकांविरुद्ध झालेला कायदा पुढच्याच कारकीर्दींत रद्द झाला; व इलिझाबेथ गादीवर येईपर्यंत तत्संबंधीं नव्यानें कायदा झाला नाहीं, हें ध्यानांत धरण्याजोगे आहे (१०१).

( क० ३४ ) इलिझाबेथच्या कारकीर्दींत नवा कायदा झाला; व त्याची अम्मलबजावणी फार कडकरीतीनें झाली; आणि ज्युएलनें एकदां राणीसमोर उपासना चालवीत असतां चेटक्यांचा सुळसुळाट झाला आहे, हें लक्षांत घेऊन चेटक्यांना शिक्षा करण्यांत सध्यांहून ज्यास्त कडकपणा दाखविला जाईल अशी मला आशा आहे, असे उद्गार काढले. तो आणखी म्हणाला कीं, ' अलीकडच्या थोड्या वर्षांत चेटक्ये व जादूगार यांचा सरकारच्या राज्यांत विलक्षण सुळसुळाट झाला आहे. हें सरकारस्वारीच्या लक्षांत आलेंच असेल. सरकारची प्रजा झुरून मरत आहे, त्यांचे चेहरे निस्तेज होत आहेत, त्यांचें मांस कुजत आहे, त्यांची वाचा बसत आहे, त्यांच्या इंद्रियांची शक्ति नष्ट होत आहे...माझी ईश्वराजवळ एवढीच प्रार्थना आहे कीं, या चेटक्यांचा व जादूगारांचा प्रयोग त्यांनीं धरलेल्या झाडांहून इतरांवर न चालो (१०२). तथापि युरोपांतील इतर देशांतल्यापेक्षां इंग्लंदांतले तत्संबंधीं कायदे एकंदरींत सौम्य होते. ज्या चेटक्यांनीं मंत्रांनीं कोणाचा जीव घेतलेला नाहीं, अगर दुरात्म्यांचें आवाहन केलेलें नाहीं, त्यांवर चेटुक केल्याच्या आरोपाची प्रथमच शाबिदी झाली तर त्यांना कैदेची अगर **पिलरीची** ( हा एक प्रकारचा खोडाच असतो. एका चौकटीला लांकडी पडदा असतो. व त्यांत भोंकें ठेवलेलीं असतात. या भोंकांतून डोकें व हात बाहेर काढून गुन्हेगाराला

सार्वजनिक जागीं अडकवून ठेवतात. ) शिक्षा होत असे व ज्या चेटक्यांना देहान्त–शिक्षा फरमाविली जाईल, त्यांना सुळावर चढ-वीत, बांधून जाळीत नसत. शिवाय आरोपितांनीं कबूल व्हावें म्हणून इंग्लंदांतही कधीं कधीं साक्षीपुरावा फुगविणारा छळ होत नसे असें नाहीं; तथापि छळ करणें हें येथें बेकायदेशीर मानलेलें होतें. चेटकाचा तपास लावणाऱ्यांना पुढें दिलेल्या तीनच प्रकारांनीं छळ करून स्वस्थ बसावें लागे. आरोपितांनीं कबूलजबाब द्यावा म्हणून अंगा-वरच्या बधिर जागा शोधून काढण्याच्या उद्देशानें त्यांना सर्वांगभर सुयांनीं टोंचणें ( १०३ ); तीं बुडतात कीं तरंगू शकतात हें पाहण्याकरितां त्यांना पाण्यांत फेंकणें; व कित्येक अहोरात्र त्यांस निजूं न देणें; या तीन प्रका-रांचा उपयोग केला असतां यश हें हटकून यायचेंच. यामुळें पुष्कळ बायकांना शिक्षा ठोठावल्या गेल्या व त्यांपैकीं बऱ्याच जणींना फांसावर चढविण्यांत आलें.

**रेजिनाल्द् स्कात् नांवाच्या ग्रंथकाराची धारिष्टाची कामगिरी.**

(क० ३५) परंतु असल्या गोष्टींबद्दल थोरमनानें एकही तक्रार न होतां त्या घडल्या, असें मात्र नाहीं. इ० स० १५८४ त रेजिनाल्द स्कात नांवाच्या धर्मखात्याबाहेरील मनुष्यानें ‘ चेटकाचा तपास ’ म्हणून एक पुस्तक प्रसिद्ध केलें. यांत त्यानें या बाबतींतली लबाडी व भ्रांति यांचा बुरखा काढून त्यांस उजेडांत आणिलें; व हें त्यानें इतक्या धिट्टाईनें केलें कीं, तितकी धिट्टाई पूर्वीं कोणाही लेखकानें केली नव्हती; तसेंच या कामीं त्यानें इतकी कर्तबगारी दाखविली कीं, त्यानंतर थोड्याच लेखकांनीं त्या गुणांत त्याची बरोबरी केली आहे; आरोपितांकडून कबूलजबाब काढून घेण्या-करितां त्यांचा केलेला भयंकर छळ, साक्षीपुरावा गोळा करण्याच्या पद्धतींतला अन्याय व ढिलेपणा, पाखंडन्यायाध्यक्षांच्या लेखांत भरून राहिलेल्या ढोबळ चुका, सैतानाच्या सामर्थ्यैंकरून होतात अशा मानलेल्या जादूगिरीच्या गोष्टी, व मन्त्रतन्त्रांतला दूधखुळेपणा त्यानें दक्ष-तेनें, वाक्चातुर्यानें व न डगमगतां चवाठ्यावर आणला. पाखंडन्यायासनां-तून निघालेल्या विधानांवरचा विश्वास उडविण्याकरितां त्यानें प्रतिरोधी पंथाच्या जबरदस्त मनोवृत्तीचा मोठ्या कुशलतेनें फायदाही घेतला. ह्या

प्रश्नाचा निकाल जर प्रमाणें पुढें करून प्रतिपादन करण्यानें होण्यासारखा असता, विवादकांच्या विद्वत्तेवर अगर सामर्थ्यावर जर अंशतः अथवा सर्वस्वी तो अवलंबून असता, तर स्कात्च्या ग्रंथाचा जबरदस्त परिणाम झाला असता. कारण तत्कालीन रूढ भोळसटपणावर अजूनपर्यंत कधीं झाला नव्हता असा प्रचंड हल्ला ह्या ग्रंथानें केला; व या ग्रंथाची लेखनशैली लोकांना अतिशय आवडती व समजण्यासारखी होती. वास्तविक पहातां या ग्रंथाचें म्हणण्यासारखें वजन पडलें नाहीं. चेटकाचीं आधारभूत कारणें सामान्य होतीं; व त्यांवरून तत्कलीन धार्मिक विचाराची सरणी दृष्टोत्पत्तीस येई. यामुळें या खंडनाच्या प्रयत्नानें चेटकासंबंधींच्या श्रद्धेला कांहीं सुद्धां आंच पोंचली नाहीं. म्हणून जेव्हां पहिला जेम्स गादीवर आला तेव्हां चेटक्यांविरुद्ध त्यानें जो कळकळीचा प्रयत्न केला, त्याला दुजोरा देण्यास सर्व राष्ट्र अगदीं तयार आहे; असें त्याला आढळलें.

### जेम्स यास चेटकाचा खास अनुभव चेटक्यांस फांशीं देण्याचा कायदा.

( क० ३६ ) जेम्स शुद्धमताभिमानी पंथांतील लोकांचा जरी द्वेष करी, तरी त्यावेळीं स्कातलंदांत जें सैतानाच्या प्रभावाविषयींच्या विचाराचें धोरण दिसत होतें, त्याचा त्यालाही संसर्ग जडला होता. शुद्धमताभिमानी पंथांतील लोक या धोरणाला नेहमीं उत्तेजन देत व तें स्कातिश लोकांच्या मनांत पूर्णतेनें दिसत असे. जेम्सच्या मनांत नेहमीं हा विषय घोळत असे. त्याविषयीं त्यानें एक संवाद लिहिला होता. जेव्हां तो देन्मार्कहून माघारा आला, तेव्हां त्या सफरींत तो वादळांत सांपडला होता; हें संकट चेटक्यांच्या कारस्थानानें आपल्यावर आलें (१०४) असें त्यास बिनदिक्कत वाटे; व तो बढाई मारीत असे कीं, सैतानाला तेव्हां आपण जबरदस्त शत्रूशीं सामना केला असें वाटलें. तो इंग्लंदच्या गादीवर बसल्यानंतर लगेच त्यानें एक कायदा केला, या कायद्यानें चेटकाचा आरोप एकदां शाबीत झाला म्हणजे त्या बाईला देहान्तशासन ठरविलें होतें; मग हा गुन्हा पहिलाच कां असेना, व तिनें शेजाऱ्यांस कांहीं का इजा दिली नसेना ?

### इंग्रजी वाङ्मयही यावेळीं या भोळसटपणानें रंगलें.

( क० ३७ ) हा कायदा घडविला तेव्हां कोक हा अतर्नी जनरल म्हणजे मुख्य कारभारी होता. बेकन हा शासनपरिषदेचा सदस्य होता; व तो

घडण्यासाठीं बारा धर्मोपाध्यक्षांची पंचायत नेमली होती ( १०५ ). सर्वच देशभर पण मुख्यतः त्यांकाशायरांत फिर्यादींची संख्या जलद वाढत गेली; व त्याच वेळीं वाङ्मयाचें सामान्य धोरण या भोळसटपणानें खूपच रंगलें होतें. सर थामस ब्राउननें तर असें बोलून दाखविलें कीं, चेटकाचें अस्तित्वच ज्यांना नाकबूल आहे, ते पाखंडीच नव्हत तर ध्वन्यर्थानें नास्तिक होत ( १०६ ). स्वकालीन बहुतेक नाटककारांप्रमाणें शेक्सपियरनेंही या भोळसटपणाचा पुनः पुनः उल्लेख केला आहे. आर्कच्या जोनचें जें दैन्यपूर्ण चित्र आपल्या हातीं शेक्सपिअरनें दिलें तें यामुळेंच होय. शेक्सपिअरच्या प्रतिभाशक्तीवर हें चित्र म्हणजे एक काळाकुट्ट डागच होय ( १०७ ). सृष्टितत्त्वशोधनांत जादूगारांकडून होणाऱ्या दोषांबद्दल बेकन फार भर्त्सना करी. तथापि त्यानें पाखंड, मूर्तिपूजा व गारुड हीं तीन धर्मपथभ्रंशाचीं उदाहरणें म्हणून आपल्या एका महत्त्वाच्या ग्रंथांत दिलीं आहेत ( १०८ ). सेल्देन यानें कांहींशी विचित्र व विशिष्टताद्योतक स्थिति पत्करली होती. चेटकाच्या गुन्ह्याबद्दल बायांना देहान्त शिक्षा देणारा कायदा अगदीं योग्य होय; पण चेटुक संभाव्य आहे कीं नाहीं, हें पहात बसण्याची बिलकूल गरज नाहीं असें तो प्रतिपादी. मंत्रानें शेजाऱ्याच्या जिवाचा नाश करण्यास एखादी स्त्री समर्थ नसेल, पण तसें करण्याचा जर तिचा हेतु असेल तर तिला फांशीं देणें योग्य होय ( १०९ ).

**हे जेम्सचे प्रयत्न पुढल्या प्रजासत्ताक काळापेक्षां फारच सौम्य होते.**

( क० ३८ ) पण चेटकाचा नायनाट करण्यासाठीं जेम्सनें आटोकाट प्रयत्न केले, तरी प्रजातंत्री राज्यपद्धतीच्या कालीं झालेल्या प्रयत्नांच्या ते पासंगाला सुद्धां पुरावयाचे नाहींत. देशांत शुद्धमताभिमानी पंथाचें वर्चस्व माजल्याबरोबर, राज्यकारभार पहाणाऱ्या लोकांस त्या पंथाच्या धर्मोपदेशकांनीं आपल्या उदासवाण्या मतांचा संसर्ग लाविल्याबरोबर, या भोळसटपणाला राक्षसी स्वरूप प्राप्त झालें. प्रजातंत्री कारभाराच्या थोड्या अवधींत चेटुक केल्याच्या आरोपावरून इंग्लंदांत जितक्या चेटक्यांना देहान्तशासन मिळालें, तितक्यांस तत्पूर्वींच्या व तदनंतरच्या काळांतही मिळालें नाहीं ( ११० ). ह्या गोष्टीचें कारण, केवळ न्यायाधीश किंवा

कायदे करणारे लोक नव्हत, कांकीं मागच्या कारकीर्दींतले न्यायाधीश चेटक्यांना दोषी ठरविण्याला कधींहो कचरले नाहींत; व क्राम्वेल तर पूर्वीच्या अधिकाऱ्यांपेक्षां बहुतेक बाबतींत वरच्या दर्जाचा माणूस होता. शुद्धमताभिमानी पंथाच्या मतांचा मनावर जो प्रभाव पडला त्याचा हा केवळ साहजिक परिणाम होय. या मतांनीं सैतानी प्राबल्य या संसारांत दिसूं लागावें अशी मनाची पूर्वप्रवृत्ति होई व तेणेंकरून चेटकाचे प्रकार उत्पन्न होत. याविषयीं देशाला भयोत्पादक स्थिति प्राप्त झाली; जिकडून तिकडून सैतानाच्या सामर्थ्याच्या आख्यायिका येऊन गर्दी उसळली; व सफक परगण्यांत विशेषच धूम मचली.

## चेटकाच्या वहिमानें एका म्हाताऱ्याचा छळ.

माथ्यू हापकिन्स म्हणून जो चेटक्यांचा सुप्रसिद्ध तलास लावणारा त्यानें तर ह्या परगण्यांत चेटकाच्या सांथीनें कहर केला आहे असें जाहीर केलें. त्यावरून शासनसभेनें एक पंचायत नेमली व दोन प्रेस्बितेरियन (गुरुजनाधिष्ठित पंथाचे ) धर्मोपदेशक निवडून तिच्याबरोबर रवाना केले. या खटल्यांना ज्यास्त ऊत आणण्यासारखा दुसरा उपाय योजणें शक्यच नव्हतें; व त्याप्रमाणें सफकमध्यें एका वर्षांत साठ माणसें चेटकाप्रीत्यर्थ बळी घेतलीं असें आढळतें (१११). या माणसांमध्यें लोवेस नांवाचा एक आंग्लिकन (इंग्लंदांतील प्रस्थापित पंथाचा)धर्मोपदेशक आपल्या पंथाचीं पन्नास वर्षे निर्दोष सेवा केल्यावर वयाच्या ऐशींव्या वर्षी चेटकाविषयींच्या वहिमांत सांपडला. या दुर्दैवी ह्मातार्‍याला कित्येक अहोरात्र झोंप घेऊं दिली नाहीं. व त्याचा असा छळ मांडला होता कीं, ' सरतेशेवटीं म्हातारा जीविताला त्रासला व आपण करतों काय व ह्मणतों काय याचें त्याला भानच राहिलें नाहीं'. मग त्याला पाण्यांत फेंकलें, दोषी ठरविलें,व फांशीं दिलें. प्रस्थापित धर्माच्या सदस्यांमध्यें पसरलेल्या गोष्टीवरून शेवटपर्यंत, आपण निरपराधी आहों असें तो धैर्यानें प्रतिपादन करीत होता. शुद्धमताभिमानी पंथानें दिलेली याबद्दलची हकीकत विश्वसनीय मानली तर चौकशी चालली असतां त्याचें डोकें ठिकाणावर राहिलें नाहीं व त्याच्यावर आरोप करणाऱ्यांनीं त्याच्या तोंडून एक कादंबरी वदवली असें दिसतें; ही कादंबरी पुढें ब्याक्स्तरनें दुसऱ्या कित्येक तस-

त्याच कादंबऱ्यांसह सादूसी व पाखंडी लोकांची मति पालटविण्याकरितां जशीच्या तशीच दिली आहे (११२).

### चेटुक, गारुड वगैरेंचा कळस.

आपण पाहिलें आहे कीं, गारुड, चेटुक वगैरेंची कल्पना प्राचीन काळापासून इंग्लंदांत होतीच; पण धर्मसुधारणेच्या भयानक स्थितींत तिला प्रथमच एक प्रकारचें प्रामुख्य आलें; या बाबतींतले खटले व शिक्षा यांच्यायोगानें लोकांचें लक्ष्य या विषयाकडे लागून हें प्रामुख्य हळूहळू वाढलें; आणि सरते शेवटीं शुद्धमताभिमानी पंथाच्या औदासीन्यप्रचुर धर्मज्ञानानें या प्रामुख्याचा कळस झाला. आतां फक्त त्याच्या ऱ्हासाची हकीकत पहाणें आहे.

### चेटकांशीं वेडेविद्रेपणाची सांगड केव्हां पडली ?

( क० ३९ ) या कामाचा पिच्छा पुरवीत असतां हें पुनः सांगितलें पाहिजे कीं, एखाद्या राष्ट्राच्या सामान्य बौद्धिक प्रवृत्तींमुळें होणाऱ्या गोष्टी व वादांतील प्रमाणें यांचें परीक्षण करतांना जितक्या अंशानें ठामपणा ठेवतां येतो, तितक्या अंशानें तो त्या प्रवृत्तींचें परीक्षण करतांना ठेवतां येत नाहीं. इंग्लंदच्या इतिहासांतल्या कोणा एका काळीं चेटकाच्या गोष्टी ह्मणजे खुळसटपणा असें मानण्याकडे कित्येक वर्गांतल्या लोकांचा जबरदस्त कल दिसत होता याबद्दल भरपूर पुरावा आहे; पण या बाबतींतल्या विश्वासाशीं वेडेविद्रेपणाची सांगड पाहिल्यानें कधीं बसली हें नेमकें सांगतां येत नाहीं; तसेंच याच्या प्रगतीच्या पायऱ्या नेमक्या चितारूं ह्मटलें तर तें होत नाहीं. तथापि सामान्यपणें बोलूं जातां, इंग्लंदांतल्या राजपरावर्तनामागून जी संदिग्धमतित्वाची मोठी लाट आली त्यावेळीं प्रथमतः या गोष्टीला प्रामुख्य आलें यांत शंका नाहीं.

### चेटकाचा विश्वास उडण्याचीं तीन कारणें.

( क० ४० ) या परावर्तनाच्या अगोदरच्या अमलाखालीं जो कडक करारीपणा चालू होता, त्याविरुद्ध झालेल्या प्रतिक्रियेनें खुशालचंद लोकांत अतिशय टवाळ अश्रद्धाळुपणा अकस्मात् उद्भवला होता. शुद्धमतपंथी लोकांची चालण्याची भारदस्त ढब, त्यांचें नाकांत बोलणें, त्यांची नाटकी भाषा, यांची थट्टा उडवितां उडवितां त्यांच्या मतांचीही ते साहजिकपणें टर

करूं लागले; आणि चेटकाच्या बाबतींत त्यांचा उपहास करण्याला हवी तितकी सामग्री लोकांस लवकरच मिळाल्यामुळें चेटकावरची अश्रद्धा म्हणजे जनराहटीची एक कसोटीच त्यांनीं करून टाकिली होती. इकडे याचवेळीं अशाच प्रकारची चळवळ व्युत्पन्न लोकांत उत्पन्न करण्याकडे कांहीं उंच प्रतीच्या बौद्धिक कारणांचा नेटाचा कल होता. त्यावेळीं जिवंत असणाऱ्या तत्त्वज्ञांत हाब्स हा मोठा नामांकित होता; त्यानें आपल्या संदिग्धमतित्वाचें सर्व सामर्थ्य अशरीर आत्म्यां-विरुद्ध वेंचलें होतें व भुतें-खेतें वगैरेच्या कल्पनांची टेर उडविण्यांत कांहीं बाकी ठेविली नव्हती; व त्यांबद्दल तिरस्कार दाखविणें म्हणजे सुद्धां त्यांचा गौरव करणें होय; अशी बुद्धि आपल्या अनुयायांच्या ठायीं त्यानें तयार केली होती. ( ११३ ) अशाच प्रकारची समजूत बेकनच्या तत्त्वज्ञा-नामुळेंही तयार झाली होती; व त्यावेळीं बेकनी तत्त्वज्ञान फारच लोकप्रिय झालें होतें. राजमान्य विद्वन्मंडळ नुकतेंच स्थापन झालें होतें ( ११४ ). फ्रेंच राज्यक्रांतीच्या अगोदर झाली होती तशीच या वेळीं सृष्टितत्त्व-ज्ञानाची आवड सर्वसाधारण झाली होती. व इंग्रजी राष्ट्राचें सर्व बुद्धिबळ सृष्टीच्या संघटनांचा अभ्यास करण्याकडे व सृष्टिनियम शोधून काढण्याकडे लागलें होतें. अशा रीतीनें प्रत्येक गोष्टीला कांहीं तरी नैसर्गिक कारण लावून देण्याकडे सर्वसाधारण कल बनला होता. यामुळें अमानुष आधारावर या संघटनांचा उलगडा करण्यांतला खुळसटपणा लवकरच लोकांच्या मनांत भरला व त्यांचा चेटक्यांच्या गोष्टींवरचा भरंवसा चटकन उडाला. कोणीं काळजीपूर्वक त्यांतल्या बारीक सारीक गोष्टींचें निरीक्षण केलें होतें, असें दिसत नाहीं. तथापि प्रयोगप्रधान तत्त्वज्ञानानें उत्पन्न झालेल्या विचारसरणीशीं त्या जुळत नव्हत्या; यामुळें त्यांवर विश्वास ठेवण्याचा लोकांचा कल कमी कमी होत गेला.

## चेटकाचें मंडनः-सर माथ्यू हेल.

( क० ४१ ) या तीन कारणांच्या संयोगानें असा प्रभाव दिसूं लागला कीं, चेटकाकडे ज्या दृष्टीनें अजूनपर्यंत लोक पहात आले, तींत लवकरच खूप फरक पडला. त्याच्या असंभाव्यतेची जाणीव सुशिक्षित धर्माधिकार-विहीन लोकांत प्रथमच सर्वसाधारण झाली व त्याबद्दलच्या खटल्यांची

संख्या झपाट्यानें कमी झाली. तथापि इ० स० १६६४ त दोन बायांना सफकमध्यें फांशीं दिलें. या बायांना शिक्षा सुनावणारा **सर माथ्यू हेल** यानें हा प्रसंग साधून जाहीर केलें कीं, चेटकाच्या खरेपणाबद्दल शंका नको; कारण, पहिल्यांदां धर्मग्रंथांत किती तरी विधानें अनुकूल आहेत; आणि शिवाय सर्व राष्ट्रांतल्या शहाण्या लोकांनीं असल्या माणसांविरुद्ध कायदे केले आहेत; हीच गोष्ट त्या राष्ट्रांचा या गुन्ह्यांच्या खरेपणाबद्दल विश्वास आहे याचें प्रमाण आहे. **सर थामस ब्राउन** हा मोठा लेखक, तसाच मोठा वैद्य होता; त्याची साक्ष सदहूं खटल्यांत नेमिली होती. त्यानें शपथेवर सांगितलें कीं, " माणसांवर चेटुक करितात, असें माझें स्पष्ट मत आहे ( ११५ ). "

## सर माथ्यू हेलच्या नंतर चेटकाचें मंडन करणारा गृहस्थ.

( क्र० ४२ ) यानंतर सत्रा वर्षांनीं चेटकाविषयींचा विश्वास अस्तंगतप्राय झाला असतां, **जोसेफ ग्ल्यान्विल** नांवाच्या एका धर्माधिकाऱ्यानें त्याचें मंडन करण्याचें काम अंगावर घेतलें. ग्ल्यान्विल हा स्वकालीं फार प्रसिद्ध होता; व त्याच्या अलीकडच्या काळांत त्याच्यावर बुद्धिमत्तेंत ताण करणारे थोडेच निपजले; असें म्हणण्याचें धाडस करतां येतें. तत्कालीन लोकांत त्याची थोर विद्वान् व तर्ककोविद अशी मुख्यत्वेंकरून ख्याति असे. आणखी त्याच्या भाषापद्धतींत पांडित्याच्या आढ्यतेचा तत्कालीन दोष जरी नव्हता असें नाहीं; तरी **मिल्तन, सर थामस ब्राउन,** व प्राचीन आंग्लिकन धर्माधिकारी, यांची ज्याचे मुकुटमणि म्हणून गणना आहे; त्या विविध व उदात्त समतोलपणाची आढ्यता मिरवणाऱ्या वैभवशाली वाक्चातुर्याचे उमदे मासले वारंवार त्याच्या भाषापद्धतींत नजरेस पडतात. तथापि अनुभवाचा फायदा मिळून त्याच्या जीवनचरित्राकडे आम्ही पहात असल्यामुळें, त्या चरित्रांत याहूनही विशेष गोडी लागते; कारण इंग्रजांच्या मनाला वळण लावणारें जें थोर प्रयोगप्रधान तत्त्वज्ञान, त्याच्या इतिहासांत **जोसेफ ग्ल्यान्विलच्या** चरित्राची जागा अत्यंत महत्त्वाची आहे. ग्ल्यान्विलच्या ग्रंथाची असावी त्याहून फारच कमी माहिती असल्यामुळें व त्यानें केलेल्या चेटकाच्या मंडनाचा व त्याच्या तरुणपणांतील वाङ्मयांतल्या धाडशी उद्योगाचा अत्यंत

निकट संबंध असल्यामुळें, त्याच्या मतांच्या सामान्य बाह्य रेषा येथें देण्यास वाचकांची क्षमा मागण्याचें कारण नाहीं.

### ग्ल्यान्विल चेटकाचें मंडन करणारा होता, तरी त्यामध्यें संदिग्धमतित्व होतें.

ग्ल्यान्विल हा चेटकाचें मंडन करणारा होता इतकीच ज्यांना त्याची माहिती आहे, त्यांना जर सांगितलें कीं, तीव्र संदिग्धमतित्व हा ग्ल्यान्विलच्या मनाचा प्रधान विशेष होता; तर ही गोष्ट त्यांना विरोधाभासासारखी वाटून थक्क करीलशी दिसते. एका अर्वाचीन ग्रंथचिकित्सकानें त्याच्याविषयीं असेंही म्हटलें आहे कीं, 'संदिग्धमतित्वाला नियत स्वरूप देणारा पहिला इंग्रज ग्रंथकार हाच होय ( ११६)'; आणि याचा अर्थ जर केवळ मानवी शक्तींचा अतिबेविश्वास इतकाच घ्यावयाचा असेल; आणि कोणत्याही स्पष्ट हटवादी—मतपद्धतीचा त्याग, असा बिलकुल समजावयाचा नसेल; तर या ग्रंथचिकित्सकाचे मताविषयीं वादच नाहीं. आणि साधारणपणें जो भोळसटपणा व जी विश्वासोन्मुखता चेटकाविषयीं श्रद्धा बाळगणाऱ्यांच्या अंगीं लावतात, तो भोळसटपणा व ती विश्वासोन्मुखता ग्ल्यान्विलनें आपलीं तत्त्वज्ञानासंबंधीं मतें ज्यांत प्रतिपादन केलीं आहेत, त्या " मतांविषयीं अभिमान अगर हटवादीमतांचा डौल " या नांवाच्या ग्रंथांत जितकीं दिसतात ( ११७ ), त्याहून कमी तीं दुसऱ्या कोणत्याही ग्रंथांत सांपडणें खात्रीनें मुष्कील आहे. मानवी शक्तींचें विश्वावलोकन करण्याचें, आमची विवेचकशक्ति वक्र करणाऱ्या अगर साफ गंजवून टाकणाऱ्या विरूपकारी कारणाचें पृथक्करण करण्याचें, अतिसमर्थ बुद्धीचें मांद्य व प्रमादपात्रत्व उघडकीस आणण्याचें, व आमच्या अल्पज्ञानाच्या सभोंवतीं असणाऱ्या अज्ञानतमाच्या वेष्टनाच्या अनंतत्वाचा पार शोधून काढण्याचें काम त्यानें बेकननें सुचवलेल्या कोठल्या तरी चार गोष्टी घेऊन त्यांचा विस्तार करून करण्याचें पत्करिलें. मानवी बुद्धीला जेव्हां अत्यंत आत्मविश्वास वाटत असतो, तेव्हांही प्रमादपात्रतेचें तिच्याशीं जें साहचर्य असतें, तें अतिशय ठळक व कच न खाणाऱ्या शब्दांनीं त्यानें वर्णिलें इतकेंच नव्हे; व पूर्वग्रहांचा चिवटपणा,

अ.नं. २००५ ९०८५५

व दुर्दम्यपणा काळ्याकुट्ट रंगानें त्यानें चितारला इतकेंच नव्हे; तर आपल्या मताच्या परिणामाची अखेरची मर्यादा सुद्धां त्यानें अंगिकारली व देकार्त प्रमाणेंच शिक्षणामुळें मान्य झालेल्या मतांचा सर्वस्वी त्याग हीच संशोधनाची पहिली अट असेंही त्यानें उपदेशिलें. बौद्धिक प्रवृत्तीच्या विविध रूपत्वाशीं अगर त्यानें ज्याला निरनिराळ्या काळांतील 'मतांचें हवापाणी' असें सुरेख नांव दिलें, त्याच्याशीं आपला पूर्ण परिचय होता असें त्यानें दाखविलें; कल्पकतेच्या दगलबाजीसाठीं त्यानें एक संबंध भागच खर्ची घातला आहे ( ११८ ). या कल्पकतेचा बत्लर प्रमाणेंच त्यानेंही फारच कडकपणें समाचार घेतला आहे.

## विगमनात्मक तत्त्वज्ञानाचे परिणाम ग्ल्यान्विलच्या तेव्हांच ध्यानांत आले.

या ग्रंथाच्या प्रकाशनानंतर ग्ल्यान्विलला राजमान्य विद्वन्मंडलाचा पांक्तेय ( फेलो ऑफ धि रायल सोसायटी ) निवडलें व तो जे अगदीं थोडे पण हुशार धर्माधिकारी विगमनात्मक तत्त्वज्ञानाचे भक्त बनले होते, त्यांत एक अग्रगण्य झाला. त्यानें आपलें शेष आयुष्य धर्माधिकाऱ्यांमध्यें या तत्त्वज्ञाना-विषयीं जो बळकट वैरभाव होता, त्याच्या प्रतीकारांत व त्या तत्त्वज्ञानाच्या मूल सिद्धान्तांशीं धर्मज्ञानाचा एकोपा करून देण्यांत खर्चिलें. स्प्रात याच थोर कार्यासाठीं खटपट करीत होता. तसेंच आणखी एक दोन धर्मा-धिकारी तेंच काम करीत होते; पण स्प्रातच्या मानानें जरा कमी. तथापि ग्ल्यान्विलचें काम ज्या पद्धतीनें चाललें होतें, तीमुळें त्याच्या सहकार्य-कार्यांतून चटकन तो स्पष्टपणें वेगळा पडतो असें वाटतें. कारण ग्ल्यान्विलच्या समकालीनांना एकतर असें वाटत होतें कीं, या तत्त्व-ज्ञानाचा अखेर परिणाम म्हणजे भौतिकशास्त्रें व बैबल यांमध्यें विरोध दिसतात असें आढळून येऊन मोठा घोटाळा उडून जाईल; नाहींतर त्या अडचणींचा उलगडा पडून व सृष्टिचक्रचालनांत दृष्टीस पडणारें चालकाचें चातुर्य अधिक प्रत्ययास येऊन धर्माचा पुरावा वाढ-लेला दिसेल. पण ग्ल्यान्विलच्या तेव्हांच स्पष्टपणें ध्यानांत उतरलें कीं, विशेष खोल जाऊन पोंचणाऱ्या व विशेष सर्वत्र पसरणाऱ्या घडामोडींचा काल जवळ येऊन ठेपला होता. त्याला कळून चुकलें कीं, कोणत्याही

राष्ट्रांत धर्मज्ञानपद्धतीचा संबंध लोकांत रूढ असलेल्या विचारसणीशीं अगर लोकांच्या बौद्धिक स्थितीशीं फार निकटवर्ती असतो; या नवीन तत्त्वज्ञानानें ती बौद्धिक स्थिति खास पालटणार; व प्रस्थापित धर्मानें एक तर पालटलेल्या स्थितीशीं आपलें तादात्म्य करून घेतलें पाहिजे, नाहींतर इंग्रजांच्या मनांवरच्या आपल्या वर्चस्वावर पाणी सोडण्यास तरी तयार झालें पाहिजे. त्यानें ताडलें कीं, ज्या धर्मज्ञानाचा अखेरचा आधार शास्त्र-वाक्यप्रामाण्य होय, ज्याला शंका म्हणजे मोठा गुन्हा वाटतो व जें कोण-त्याही तत्त्वशोधनाच्या निष्पक्षपाती प्रयत्नांत जोराचा मोडता घालतें, त्या धर्मज्ञानाचें, या सर्व गोष्टींच्या उलट जाणाऱ्या विचारसरणीला ज्ञानाचा केवळ ओनामा समजून उत्तेजन देणाऱ्या तत्त्वज्ञानाबरोबर, फार दिवस साहचर्य राहणार नाहीं.

## त्याची आदर्शरूप धर्मसंस्था.

तो समजून होता कीं, जोंपर्यंत कोणत्याही एकाद्या विलक्षण गोष्टीचा उलगडा पडला नाहीं तोंपर्यंत,ती अमानुष करामतीची होय; असें लोक प्रति-पादित असतात तोंवर भौतिकशास्त्रांचें पाउल जितकें पुढें पडेल तितकें धर्मज्ञानाला जरूर मारक होतें. आणि तो समजून गेला कीं, अरिस्तातलाचा उत्कट आदर, मेलेल्या लोकांचीं साधीं वचनें असलीं तरी तीं सुद्धां निर्णा-यक प्रमाणें मानणारी अंध व आढ्यतेची भक्ति, विश्वविद्यालयांनीं अखंड श्रम करून उत्तेजन दिलेली पूर्वदर्शी विचारसरणी, या सर्व गोष्टी बेकनकडे प्रतिनिधित्व असलेल्या (११९) नव्या प्रवृत्तीशीं विसंवादी होत . 'अति-श्रद्धोन्मादविरोधी धर्म व निर्बन्धमुक्त तत्त्वज्ञान' या मथळ्याखालीं बेक-नच्या 'न्यू अत्लांतिस' पुस्तकाचा उत्तरार्ध म्हणून त्यानें लिहिलेल्या एका निबंधांत बौद्धिक व चिकित्सक काळाच्या सर्व गरजा भागविणारी धर्मसंस्था आदर्श म्हणून रचून तिचें मोहक चित्र त्यानें चितारलें होतें. या धर्मसंस्थेंतलीं श्रद्धावचनें अगदीं उदार तत्त्वांवर बसवावयाचीं होतीं; कारण योग्य समा-धानपूर्वक मंडन करण्यासारखीं मतें म्हणजे फारच अल्प व साधीं असा-वयाचीं. या धर्मसंस्थेंतल्या उपदेशकांनीं भूतकाळच्या सांप्रदायिक गोष्टींचें आगर बनण्यांत गुंग रहावयाचें नाहीं, तर 'स्पष्ट व सुव्यक्त विचारपद्ध-तीचें सौकर्य' व 'विचारांतील आलोकक्षेत्राचें विस्तृतत्व' संपादण्यास

[stamp]

झटावयाचें. धर्मश्रद्धा म्हणजे विवेचकशक्तीचा शत्रु न मानतां तिचेंच एक स्वरूप आहे असें त्यांनीं समजावयाचें. मानवी दौर्बल्याची जाणीव अंगीं भिनवून घेऊन हटवादी विश्वास व विधान यांकडील प्रवृत्तीची त्यांनीं निर्भर्त्सना करावयाची व लोकांना असा उपदेश करावयाचा कीं, संदिग्धता म्हणजे गुन्हा तर मानावयाचा नाहींच, पण उलट प्रत्येक मनुष्यानें आपणांस उपदेशिलेल्या मतांचें स्वतः निष्पक्षपातानें परीक्षण व मनन करीपर्यंत त्यांना पूर्ण व निश्चित अनुमोदन द्यावयाचें नाहीं, हेंच आपलें कर्तव्य मानावयाचें.

## असल्या धर्मसंस्थेच्या मंडनाचे आधार.

शाब्दिक प्रमाणाचा आधार अशा रीतीनें तोडून टाकलेल्या धर्मसंस्थेचें मंडन दोन आधारांनीं करितां येईल. पहिला आधार कार्यकारणात्मक; यानें सदसद्विवेकाशीं ती संस्था जुळती राहते, मनुष्यमात्राच्या अंतर्यामीं असणारी ज्योति त्या संस्थेच्या रूपानें दिसते व प्रतिबिंबित होते; आणि अशा रीतीनें ती संस्था स्वमंडनमंडित होऊन बसते. अथवा ती विशिष्ट हटवादी संस्था म्हणून साक्षीपुरावा पाहून केलेल्या विवेचनमालिकेच्या जोरावर तिचें मंडन करितां येईल. शेल्यान्विलच्या मनाची वृत्ति व तत्कालीन लोकांतली नैतिक अधमावस्था यांमुळें नैतिकापेक्षां बौद्धिक सिद्धांतसामग्री त्याला ज्यास्त पसंत पडली; व त्याला वाटलें कीं, चेटकाचा विषय हीच पहिल्या वाग्युद्धाची भूमि होणार. कारण चेटकासंबंधींचे चमत्कार सद्यःकालीन व सुलभनिकष होते. "कारण दूरच्या, जुन्या काळच्या गोष्टी कोणाला खऱ्या वाटत नाहींत, अगर त्यांचें स्मरणच अजिबात गेलेलें असतें. पण आत्मकालीन गोष्टी ताज्या व नव्या असून, भरंवशालायक परिस्थितींतल्या असल्यामुळें अश्रद्धालु माणसांच्या मनाच्या हटवादीपणावर त्यांना उत्तम जय लाभावा, अशी अटकळ वावगी होणार नाहीं" (१२०) असें तो म्हणतो.

## इंग्लंदांत संदिग्धमतित्वाच्या प्रसाराचें फळ.

चेटुक वगैरे भोळसटपणाच्या समर्थनार्थ प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांत 'साद्युसिज्मस त्रायंफेतस' (आत्म-पुनरुत्थानविरोध विजय) नांवाचें पुस्तक बहुधा अतिशय योग्यतेचें आहे. त्यांत इंग्लंदांत संदिग्ध-

मतित्वाचा जो शीघ्र प्रसार झाला (१२१), त्याचें ठसठशीत चित्र आरंभींच आहे; जिकडे तिकडे उच्च वर्गांत चेटकाविषयीं अविश्वास ही एक लोकांची धाटीच होऊन राहिली. पण हा अविश्वास म्हणजे चेटकाच्या असंभाव्यतेच्या पूर्वग्रहाच्या जाणीवेमुळेंच समूळ उत्पन्न झालेला होता. सनातन धर्मांचा विरोध करणारे सर्व चेटकाची बदनामी करण्यास एकत्र झाले. चेटुक ह्मणजे निव्वळ खुळेपणा, फारच विचित्र व हास्यास्पद गोष्टींचें आगर, व विश्वासास इतकें अपात्र कीं त्याची चिकित्सा करीत बसणें ह्मणजे वेळ व्यर्थ घालविणें; असें समजून त्याची ते टेर उडवीत. राजपरावर्तनाच्या वेळेपासून हा छंद निघाला; मात्र तद्विषयक कायदे जसेच्या तसेच अजून अमलांत होते; व या विषयावर प्रत्यक्ष असा कोणीं विचार केला नव्हताच, म्हटलें तरी चालेल. या नव्या छंदाचा पाडाव करण्याच्या इराद्यानें अद्भुतांवर विश्वास ठेवण्यासारखा आहे कीं नाहीं, या सामान्य प्रश्नाची चिकित्सा ग्ल्यान्विलनें चालविली. त्यानें पाहिलें कीं, चेटकाची अशी टेर उडण्याचें कारण चेटुक हें अद्भुताच्या स्वरूपाचें व सैतानाच्या करामतीचें आहे हें होय; ज्यांची अद्भुतांविषयीं व सैतानाविषयीं गोष्टींवर श्रद्धा नव्हती, त्यांच्यामुळेंच मुख्यत्वेंकरून चेटकाविषयीं संदिग्धमति उत्पन्न झाली; व बैबलांतल्या चेटकाच्या अगर भुताटकीच्या गोष्टी व इंग्लंदांतल्या न्यायासनांपुढें चौकशीस आलेल्या खटल्यांच्या हकीकती, नेहमीं एकाच दर्जाच्या मानीत.

### विवादसंग्रामांत ग्ल्यान्विलचें मुख्य शस्त्र संदिग्धमतित्व हें होतें.

त्याचा तर दृढ विश्वास होता कीं, चेटकाविषयींच्या श्रद्धेला भरपूर पुरावा होता (१२२); आणि ह्याबद्दल खरोखर वादही क्वचित्‌च होता; पण पूर्वग्रहीत असंभाव्यतेची जाणीव नष्ट केल्यावांचून वस्तुस्थितीचा पुरावा कितीही उपचित असला तरी लोकांचा चेटकावर भरंवसा बसणार नाहीं. ग्ल्यान्विल या कामाला लागला. अर्वाचीन विवादकांची कल्पना व प्रायः भाषासुद्धां इतक्या मागच्या काळीं उचलून त्यानें असा मुद्दा आग्रहानें पुढें केला कीं, अश्रद्धेसंबंधींही भोळसटपणा असतोच; व चेटुक वगैरे सब झूट, अशी कल्पना धारण केली म्हणजे आवश्यक होऊन बसणारा आभासांचा

एकसमयावच्छेदेंकरून इतका चमत्कारिक मिलाफ ज्यांना श्रद्धेय वाटतो, तेच चेटुक श्रद्धेय मानणाऱ्यांहून अधिक दुधखुळे होत ( १२३ ). आपलें संदिग्धमतित्वच त्यानें विवादसंग्रामांत आपलें मुख्य शस्त्र ठरविलें होतें; व चांगल्या कुशाग्रतेनें पूर्वगृहीत आक्षेपांचें पृथक्करण करून त्यानें सिद्ध केलें कीं, या आक्षेपांच्या बुडाशीं अशरीर आत्म्यांच्या विश्वाच्या नियमांसंबंधीं आपल्या ज्ञानावर आपण त्याच्या योग्यतेहून ज्यास्त भरंवसा टाकतों ही गोष्ट आहे; या आक्षेपांतून ध्वनित होतें कीं, सशरीर व अशरीर आत्म्यांच्या शक्तींमध्यें कांहीं पूर्ण साम्य आहे; आणि ज्या अर्थी असें साम्य असण्याचा प्रायः संभव नाहीं, त्याअर्थी साम्य आहे या कल्पनेच्या पायावर रचलेल्या विचारांच्या इमारतीमुळें पुराव्याची चिकित्सा मनुष्यांनीं करायला नको असें होऊं शकत नाहीं. अखेरीस ज्यांच्यांविषयींचा पुरावा त्याच्या मतें अविवाद्य होता अशीं पुष्कळ उदाहरणें ग्ल्यान्विलनें गोळा केलेलीं आहेत.

## ग्ल्यान्विलच्या मताला पुष्टि.

( क० ४३ ) ‘ साद्युसिज्मस त्रायंफेतस ’ या पुस्तकाचा विलक्षण खप झाला. त्याच्या पुष्कळ आवृत्त्या निघाल्या; व त्यांत प्रतिपादिलेल्या मतांना पुष्टि देण्यास कित्येक थोर समर्थ माणसें पुढें सरसावलीं. हेन्री मोर नामक प्रख्यात तत्त्वज्ञानें ग्ल्यान्विलला निर्व्याज स्तुतीनें भरलेलें एक पत्र लिहिलें; व त्याच्याच धोरणानें एक लांबलचक विवेचन–प्रबंध रचला. या प्रबंधांत त्यानें आणखी कांहीं चेटकाचे खटले दिले. त्यानें या विषयासंबंधीं ज्यांना श्रद्धा नव्हती त्यांस ‘ अज्ञान, वृथाभिमान व वेडसर अश्रद्धा, यांनीं चढेल बनलेले मूर्ख ’ असें दूषण दिलें आहे ( १२४ ). क्यान्तरबरीचा विद्वान् दुय्यम धर्मोपाध्यक्ष जो क्यासाबान त्यानें अशाच अर्थाचा पण जरा सौम्य भाषेंत लेख लिहिला आहे ( १२५ ). विख्यात बॉइल यानें पुष्कळ चेटकाच्या हकीकतींतल्या साक्षीपुराव्यांतला कमजोरपणा मनांत आणून व त्या मिळवण्यांत फार सावधपणा राखला पाहिजे हें लक्षांत घेऊन सुद्धां म्यास्कनाच्या समंधाच्या गोष्टीवर आपला दृढ विश्वास आहे, असें ग्ल्यान्विलला लिहिलें ( १२६ ). इंग्लंदांतील प्रस्थापित धर्मांत जे थोर विद्वान् होऊन गेले त्यांत कड्वर्थ मोठा जाडा विद्वान् होता, असें म्हणायला हरकत नाहीं. यानें चेटकाविषयींचें संदिग्ध-

मतित्व हा हाब्सच्या सामर्थ्याचा मुख्यतः परिणाम होय असें म्हटलें आहे. व त्यानें पुढेंही म्हटलें आहे कीं, ज्याला संदिग्धमतित्वाचा गंध लागला त्याला निरीश्वरवादी म्हणण्यांत अन्याय होणार नाहीं (१२७). दुसरेही पुष्कळ धर्माधिकारी हाच रोंख धरून पुढें सरसावले; व त्यांनीं कांहीं काळपर्यंत इंग्लंदांत चेटुक हा एक मुख्य चर्चेचा विषय करून सोडला. या वादविवादांत प्रतिपक्षाकडून होणारी चर्चा अगदीं मिळमिळित होती. सामर्थ्य व विद्वत्ता या दोन गुणांत ग्ल्यान्विल, मोर कद्वर्थ किंवा निदान क्यासाबानच्या तरी बरोबरीचा कोणी लेखक चेटकाविषयींच्या श्रद्धे-बद्दल उत्तरपक्ष करण्यास पुढें सरसावलेला दिसला नाहीं. तसेंच ‘ साद्युसिज्मस ’ ग्रंथाइतका यशस्वी झालेला एकही ग्रंथ प्रतिपक्षाच्या बाजूनें निर्माण झालेला नाहीं.

## प्रतिपक्षी लेखकांत वेब्स्तर मुख्य.

(क० ४४) प्रतिपक्षाकडचा मुख्य लेखक म्हणजे वेब्स्तर नांवाचा कोणी शस्त्रवैद्य होता. त्याचा ग्रंथ म्हणजे बैबलांतल्या जादूच्या चमत्कारांचा कार्यकारणतत्त्वानुसार अर्थ बसविण्याच्या पद्धतशीर खटपटीचीं पहिल्यांदा झालेलीं जीं उदाहरणें दाखवितां येतील, त्यांपैकीं एक म्हणून संस्मरणीय आहे. ह्याच्या मताप्रमाणें ईजिप्तांतले जादूगार म्हणजे साधे रोजच्या परिचयांतले गारुडी होत; एन्दोरच्या चेटकीनें आपल्या एका साथीदाराला तोतया स्याम्युएल म्हणून तयार केलें होतें. लेवितिकसमध्यें ज्या शब्दाचें ‘ चेटुक करणारा ’ असें भाषांतर केलेलें आहे, त्याचा खरा अर्थ ‘ विष घालणारा ’ असा होतो; भुतांनीं पछाडलेले लोक बहुधा वेडे होते; आणि म्याग्दालीनला सप्तपातकांपासून मुक्त केलें होतें.(१२८) आक्सफोर्ड येथल्या व्याग्स्ताफ नांवाच्या एका अप्रसिद्ध विद्वानानेंही या विषयावर दोन लहानसे ग्रंथ लिहिले होते (१२९); आणि एकादोघांनीं निनांवीच कांहीं लेख प्रसिद्ध केले होते. संदिग्धमतित्व मात्र एकसारखें वाढत गेलें.

## इंग्लंदांत चाललेलें खूळ अमेरिकेंत माध्यान्हीं होतें.

(क० ४५) थोडींशीं वर्षें लोटल्यावर या अश्रद्धेच्या ओघाला बांध घालण्याकरितां अमेरिकेंत घडलेल्या ताज्या चेटकाच्या हकीकती सांगून नव्यानें व जोरानें प्रयत्न करण्यांत आला. चेटकाच्या खुळाचें वीं अमेरि-

केला आद्य यात्रिकांनीं नेलें; आणि ज्यासमयीं इंग्लंडांत हें खूळ भरभर मावळत चाललें होतें, त्याचसमयीं म्यासाच्युसेत्स संस्थानांत तें माध्याह्नींच्या प्रखर तेजानें तळपत होतें. शुद्धमतावलंबी दोन धर्माधिकारी होते, त्यांचीं नांवें कातन म्याथर व प्यारिस हीं होतीं. त्यांनीं हा गुन्हा वारंवार घडत असतो असें जाहीर केलें. त्यांना त्यांच्या व्यवसायबंधूंकडून मनापासून पाठिंबा मिळाल्यामुळें सगळ्या देशभर भयानकतेचें साम्राज्य पसरण्यांत यश आलें. पंचायत नेमण्याचा हुकूम सुटला. स्ताउतन नांवाच्या एका न्यायाधिशानें खटल्यांची चौकशी मांडली. हा न्यायाधीश धर्मोपाध्यायांच्या सर्वस्वी कह्यांत होता असें दिसतें. व्यासपीठावरून वर्णिलेल्या भयानक स्थितीला चाबकाचे फटके व हालअपेष्टा यांची जोड मिळाली; व पुष्कळ कबूलजबाब घेण्यांत आले. खटले करण्याच्या विरुद्ध जाण्यास जे कोणी थोडे धजावले, त्यांना अश्रद्धा व पुनरुत्थानविरोधक अशीं दूषणें लावण्यांत आलीं. शेंकडों लोक तुरुंगांत पाठविले गेले; इतर लोक मालमत्ता सोडून परागंदा झाले; व सत्तावीस जिवें मारले गेले. एका ऐशीं वर्षांच्या म्हाताऱ्याला दाबून मारण्याची शिक्षा झाली; पण ही भयंकर शिक्षा नंतर कधींही अमेरिकेंत अमलांत आली नाहीं. बोस्तन व चार्लेस्तन येथील धर्माधिकाऱ्यांनीं एक मानपत्र तयार केलें; त्यांत त्यांनीं पंचायतींतल्या न्यायाधिशांचे त्यांच्या कामांतल्या कळकळीबद्दल मनापासून आभार मानले होते व ती कळकळ कधींही शिथिल होणार नाहीं, अशी आशा प्रकट केली होती (१३०).

## भूतयोनीच्या अस्तित्वाविषयीं ग्रंथ.

या खटल्यांच्या पहिल्या वर्षीं कातन म्याथरनें पहिल्या पहिल्या चौकशांतली हकीकत लिहून काढली. रिचर्ड ब्याक्स्तरनें हा इतिहास इंग्लंदांतील लोकांपुढें आणला. या पुस्तकाला त्यानें जी प्रस्तावना जोडली आहे, तींत तो प्रतिज्ञापूर्वक म्हणतो कीं, ‘ जो यावर विश्वास ठेवणार नाहीं तो पक्का उफराट्या काळजाचा पुनरुत्थानविरोधक असला पाहिजे. ’ येणेंप्रमाणें या भोळेपणाला आपल्या थोर नांवाच्या वजनाचा पाठिंबा देऊनही ब्याक्स्तरचें समाधान झालें नाहीं. त्यानें पुढच्याच वर्षीं ‘ अशरीर आत्म्याच्या योनी ( भूतयोनी ) चें निश्चित आस्तित्व ’ म्हणून

एक पुस्तक लिहिलें. आणि त्यांत त्यानें चेटकाचे अनेक खटल फार परिश्रमानें जमवून प्रसिद्ध केले. कातन म्याथरची व त्याच्या या धर्मयुद्धांची अतोनात स्तुति केली, तसेंच जे या विषयाबद्दल संदिग्धमति होते, त्या सर्वांची उच्छृंखळ भाषेनें निंदा केली. इ० स० १६९१ त हा ग्रंथ उजेडांत आला; या वेळीं अमेरिकेंतल्या भयानक स्थितीचा अजून कळस झाला नव्हता, पण तो ग्रंथ अतलांतिक महासागरापलीकडे चहूंकडे पसरल्यामुळें, चेटकाच्या खटल्यांना ऊत आणण्यास त्यानें हातभार लावला ( १३१ ).

## सन १७१८ पर्यंत विवादी वाङ्मयाचा कल पुराणपक्षाकडेच होता.

(क० ४६) इंग्लंदांत त्याचा फारच थोडा परिणाम झाला. ज्या संदिग्धमतित्वाचा प्रभाव सर्व वर्गाच्या लोकांत यापूर्वींच प्रवेश करून राहिला होता, तें धिम्मेपणानें व मुकाट्यानें वाढत चाललें. कारण त्याला बौद्धिक प्रगतीचा पाठिंबा मिळत होता.ही बौद्धिक प्रगति इतकी सार्वत्रिक व प्रचण्ड होती कीं, तिला थोपवून धरण्याची कोणाही वैयक्तिक बुद्धीची शहामत नव्हती. राजपरावर्तनाच्या काळीं चेटकावरची श्रद्धा अत्यंत विद्वान् लोकांत सर्वसाधारण होती. इ० स० १७१८ त जेव्हां हचिन्सन यानें लेख लिहिले, तेव्हां त्या श्रद्धेचा मागमूस क्वचित्च राहिला. फक्त अगदीं अज्ञ लोकांचा व थोड्याशा धर्माधिकाऱ्यांचा आश्रय धरून ती राहिली होती ( १३२ ). तथापि या मधल्या काळांत म्हणजे राजपरावर्तनापासून तों इ० स० १७१८ पर्यंत विवादी वाङ्मयाचा कांटा पुराणप्रिय पक्षाकडे बराच लवलेला होता यांत संशय नाहीं. एवढ्या काळांत या श्रद्धेच्या मंडनपर असे कमींत कमी पंचवीस ग्रंथ इंग्लंदांत प्रसिद्ध झालेले माहीत आहेत (१३३); व ते इंग्लंदांतल्या थोर थोर विद्वान् मंडळींपैकींच कांहींजणांच्या लेखणींतून उतरले आहेत. ब्याक्स्तरच्या ग्रंथाला त्याच्या थोर नांवाचा पाठिंबा असतांही व या ग्रंथांतलीं विधानें फारच निश्चित स्वरूपाचीं असतांही तो प्रसिद्ध झाल्यावर सव्वीस वर्षांनीं हचिन्सननें त्याचें परीक्षग केलें. तोंपर्यंत तत्खंडनार्थं बिलकुल प्रयत्न झालेला दिसत नाहीं. तथापि स्कातच्या ग्रंथांत संदिग्धमतित्व पैदा करण्याचें जसें सामर्थ्य नव्हतें, तसेंच संदिग्धमतित्वाच्या ओघाला बंधारा घालण्याचें सामर्थ्य ब्याक्स्तरच्या ग्रंथांत नव्हतें.

## चेटक्यांस दिलेल्या शिक्षांचा शेवटला काल.

( क० ४७ ) इ० स० १६८२ त तीन चेटक्यांना देहान्तशिक्षा झाली, व आणखी कांहींचा इ० स० १७१२ त तोच शेवट झाला. पण ह्या शिक्षा म्हणजे इंग्लंदांतल्या न्यायासनांकडून मिळालेल्या शेवटल्याच शिक्षा होत (१३४). निदान थोडातरी प्रसिद्धीस आलेला शेवटला खटला इ० स० १७१२ त झाला. तो जेन वेन्ह्याम हिच्यावर हर्तफर्द परगण्यांतल्या कित्येक धर्मोपाध्यायांनीं केला होता. या खटल्यांतल्या न्यायाधिशाची चेटकावर बिलकूल श्रद्धा नव्हती. त्यामुळें पंचांना खटला समजावून देतांना आरोपीला बराच अनकूल ग्रह त्यानें उत्पन्न केला; आणि त्या गांवांतल्या ज्या पुरोहितानें ही स्त्री चेटकी आहे, अशी खात्री असल्याचें 'मी पुरोहित खोटें बोलणार नाहीं ' असें बोलून प्रतिज्ञेनें सांगितलें, त्याची चांगली निर्भत्सना केली. पंच अज्ञ व हट्टी असल्यामुळें त्यांनीं आरोपीला दोषी ठरविलें. पण तिच्या शिक्षेची तिला माफी मिळवून देण्यास न्यायाधिशाला जड गेलें नाहीं. त्यामुळें कागदी लढाई सुरू झाली व पुष्कळ दिवस चालली. ज्या धर्माधिकाऱ्यांचें तो खटला उपस्थित करण्यांत अंग होतें त्यांनीं एक लेख तयार केला. या लेखांत त्यांनीं आरोपिताच्या सदोषतेबद्दल आपली खात्री आहे, असें जोरानें विधान केलें; न्यायाधीशाच्या वर्तणुकीवर कडक टीका केली; आणि ' लिबऱ्याविमस ऑनिमस नोस्त्रास' हे गंभीर शब्द लिहून तो लेख संपविला (१३५).

## चेटकाविषयींचे कायदे सहज रद्द करितां आले.

( क० ४८ ) हें कांहींसा विचित्रच धर्मवेडाचें उदाहरण असण्याचा संभव आहे; आणि स्वतः धर्माधिकारी असणाऱ्या हचिन्सननें कांहीं वर्षांनंतर चेटुक म्हणजे नुसता भ्रम होय असें म्हटलें (१३६); तेव्हां आपल्या धंदेभाईपैकीं बहुतेक विशेष सुशिक्षितांचें मत त्यानें प्रदर्शित केलें असण्याचाही संभव आहे. इ० स० १७३६ त यासंबंधीं कायदे रद्द करण्यांत आले; व त्यासाठीं अडचण पडली नाहीं किंवा चळवळ करावी लागली नाहीं. आणि ते रद्द झाल्याबद्दल सुशिक्षित लोकांस दुःख वाटल्याचीं अगदीं थोडीं उदाहरणें आहेत.

**चेटकाचें अस्तित्व न मानणें म्हणजे बैबलास झुगारण्याप्रमाणें आहे.**

( क्र० ४९ ) तथापि इ० स० १७६८ त इलिजाबेथ हाब्सन नांवाच्या मुलीनें सांगितलेली भूत पाहिल्याची हकीकत **जॉन वेस्ले** यानें प्रस्तावना जोडून प्रसिद्ध केली; त्यांत या विषयासंबंधीं कांहीं विलक्षण उद्गार त्यानें काढले आहेत. त्यानें लिहिलें आहे कीं, "एकंदरींत इंग्रज लोकांनीं व खरोखर युरोपांतल्या बहुतेक विद्वानांनीं भुतांच्या व चेटकाच्या सर्व हकीकती आजीबाईच्या कल्पित गोष्टी म्हणून उडवून दिल्या आहेत, हें पण खरें आहे; याच्याबद्दल मला फार खेद वाटतो. जे **बैबलावर** निष्ठा ठेवितात ते निष्ठा न ठेवणाऱ्यांची ही जी विलक्षण स्तुति गातात तिच्या विरुद्ध माझें मत गंभीरपणें नमूद करण्याची ही संधि मी खुषीनें साधतों. त्यांची अशी पूजा करण्याचें मला कांहीं काम नाहीं. मला असें वाटतें कीं, जिकडे तिकडे जी हाकाटी चालली आहे, तिच्या बुडाशीं हेच लोक आहेत; त्यांनीं ही अनिष्ठा सर्व देशभभर मगरुरीनें पसरली आहे. यांत त्यांनीं केवळ बैबलाच्याच विरुद्ध नव्हे, तर सर्व देशांतल्या व सर्व काळांतल्या उत्तमोत्तम व शहाण्या लोकांच्या माताविरुद्ध गोष्ट केली आहे. चेटुक झुगारून देणें म्हणजे तात्पर्यानें पाहिलें तर **बैबल** झुगारण्यासारखेंच आहे ( १३७ ); हें त्यांना पक्कें ठाऊक आहे, ( ख्रिस्ती लोकांस माहित असो वा नसो )".

**इंग्लंदांत चेटकाविरुद्ध कायदे होण्यास धर्माधिकारी कारण झाले आहेत.**

( क्र० ५० ) चेटकाचा इंग्लंदांतील इतिहास अवलोकन करीत असतां इंग्लंदच्या प्रस्थापित धर्माचा युरोपांतल्या इतर देशांतल्या सनातन धर्माशीं व शुद्ध मताभिमानी पंथाशीं असलेला विषमभाव इंग्लंदाला विशेष अनुकूल आहे, हें लक्षांत आल्यावांचून राहत नाहीं. इंग्लंदांतले धर्मोपाध्यक्ष तेथल्या चेटकाविरुद्ध कायदे होण्याला पुष्कळ अंशीं कारणीभूत झालेले आहेत, या गुन्ह्याच्या सत्यतेविषयीं तेथल्या धर्मोपाध्यक्षांपैकीं बहुतेकांची खात्री होती, व बहुतेक धर्माधिकारबाह्य सुशिक्षित लोकांनीं चेटकावरचा विश्वास झुगारून दिला, तरीही ते उपाध्याय त्या विश्वासाचें प्रतिपादन व मंडन करीत होतेच, ह्या गोष्टी खऱ्या. चेटकासंबंधीं संदिग्धमतित्व ज्या लोकांच्या मनावर धर्माचा पगडा अत्यल्प होता त्यांमध्यें उद्भवलें. धर्मो-

पाध्यायांचें वर्चस्व जसजसें ऱ्हास पावत चाललें, तसतसें हें संदिग्धमातित्व वाढत चाललें व त्याच्यावर नास्तिकतेची कळा व स्वरूप अशी साधारणपणें छाप बसली, याही गोष्टी खऱ्या. तथापि उलटपक्षीं वरच्या दर्ज्याच्या धर्माधिकाऱ्यांतल्या एकंदर नेमस्तपणाची स्तुति करावी तितकी थोडीच होय, व ज्यांचा भोळसटपणा बेसुमार होता ते सुद्धां इतर देशांत सर्वसाधारण दिसणाऱ्या रुधिरतृष्णेपासून विशेषेंकरून मुक्त होते; या गोष्टी नाकबूल करणें अशक्य होय. युरोपांतल्या ग्रेतब्रितन व आयर्लंदशिवाय करून इतर देशांत मरणाऐवजीं जरा हलकी शिक्षा देण्याचा प्रयत्न म्हणजे ईश्वरी कायद्याचाच प्रत्यक्ष भंग समजून फार भयंकर रीतीनें निंद्य मानीत. जाळण्यापूर्वी चेटकीचा गळा दाबून टाकणें कायदेशीर आहे काय ? असा प्रश्न करण्याइतकीही खरोखर कांहींजणांची मजल गेली होती. त्यांचें म्हणणें असें पडे कीं, तिचा गुन्हा म्हणजे सर्वशक्तिमान् परमेश्वराचा द्रोह. यामुळें त्या गुन्ह्याचें प्रायश्चित्त म्हणून जी शिक्षा द्यावयाची, ती जर अतिशय वेदना करणाऱ्या मरणाव्यतिरिक्त कोणती असेल तर तिच्यायोगें प्रत्यक्ष ईश्वराचा अपमान होतो.

## कांहीं ठिकाणीं चेटकाच्या गुन्ह्याबद्दल अमानुष छळ केला जात असे; पण तसा प्रकार इंग्लंडांत नव्हता.

आणखी, लेवितिकसच्या कायद्यांत सांगितलेली शिक्षा म्हणजे दगड हाणून ठार करणें ही होय, व यहुदी धर्मज्ञानपंडितांनीं जाळून मारण्यापेक्षां दगडांनीं हाणून मारणें हें ज्यास्त वेदना देणारें आहे असें ठरविलें होतें. (१३८).असला प्रकार इंग्लंदांत झालेला आढळला नाहीं.आमच्या माहितीप्रमाणें इंग्रज धर्माधिकाऱ्यांनीं या बाबतींतल्या कायद्यांतील मवाळपणाबद्दल गाऱ्हाणें केल्याचें अगर असल्या खटल्यांत हाल करण्याची सुरुवात करण्याचा यत्न केल्याचें एकही उदाहरण नाहीं. भूत काढणें व धर्मोन्मादक उपदेश करणें, या गोष्टींनीं छळ तीव्र करण्याची त्यांची कळकळ ही इतर ठिकाणच्या मानानें शिथिलच होती. जेम्सच्या कारकीर्दीइतक्या जुन्या काळीं पंडितांच्या सभेनें नियम केला कीं, कोणाही धर्माधिकाऱ्यास भुतानें पछाडलेल्याचें भूत काढण्याची आपल्या धर्मोपाध्यक्षाकडून परवाना असल्याशिवाय मनाई आहे. व असले परवाने क्वचितच्च कधीं मिळत (१३९). इ०स०१६२०

त लिचफील्दचा धर्मोपाध्यक्ष जो **दा० मार्तन** यानें एका **सनातनपंथी** उपाध्यायाला खऱ्या वाटलेल्या चेटकाच्या हकीकतींतली लबाडी उमगून काढण्यांत मोठ्या कळकळीनें काम केलें (१४०); व अखेरीस त्याचा यत्न तडीस गेला; आणि आरोपीचा जीव बचावण्यांत त्याला यश आलें. याच्याही अगोदर **दा० हार्सनेत** (हा पुढें **यार्कचा** धर्माध्यक्ष झाला) यानें पोपाचार्यांच्या पंथांतल्या लबाड्यांवर हल्ला करतांना चेटकाच्या पुष्कळ प्रकारांची त्यांत धिट्टाईनें गणना केली (१४१); व तत्संबंधीं त्याची बिलकुल श्रद्धा नव्हती असें दिसतें. चेटुक हा **सनातनपंथाचा** परिणाम होय असा जो त्यानें आरोप केला, तो निःसंशय चुकीचा होता; कारण शुद्धमताभिमानी पंथाच्या पाखरेखालीं चेटकाची निदान **सनातन**-पंथाच्या वेळच्या इतकी तरी भरभराट होती; तथापि इतक्या धिट्टाईनें जें मत उच्चारून दाखविण्यांत आलें, त्याच्याकडे लक्ष पोंचाविणें योग्य आहे; व हें मतोच्चारण झाल्यावेळीं तरी इंग्रजधर्माधिकाऱ्यांमध्यें ती गोष्ट अद्वितीय होती असें वाटतें (१४२). स्वतः हचिन्सननें आपला इतिहासाचा ग्रंथ चेटकावरची श्रद्धा बिलकुल उडून जाण्यापूर्वी लिहिला.

**इंग्लंदांतल्या चेटकांत तोतयेपणा विशेष दिसून येतो.**

पण इंग्लंदांतील धर्माधिकाऱ्यांचा नेमस्तपणा अतिशय ध्यानांत भरण्यासारखा जो दिसतो, तो इंग्लंदांतील चेटकाच्या इतिहासांत भ्रमाचा भाग फारच थोडा आढळतो या गोष्टींत होय. ग्रेतब्रितन व आयर्लंद यांखेरीज युरोपांतल्या इतर देशांत फसवणूक निःसंशय बरीच होती. तथापि पुष्कळ अंशीं चेटुक म्हणजे जशी कांहीं सांथ अगर एकतानभ्रम असें वाटतें. धार्मिक भयानकतेनें दूषित कल्पकतेला विकृत केलें, प्रत्येक प्रकारच्या वेडाला रंग भरविला, व अमानुष गृहीत गोष्टींच्या बळावर प्रत्येक कोड्याचा उलगडा करून घेण्याकडे मनुष्यांच्या मनाचा कल वळविला. उलटपक्षीं इंग्लंदांतल्या चेटकाचा तोतयेपणा हा सर्वसाधारण विशेष दिसतो. तद्विषयक पुस्तकांत गारुड्यांच्या हातचलाखीच्या गोष्टीच भरलेल्या आहेत (१४३); आणि शुद्धमताभिमानी पंथाच्या वर्चस्वाचा काळ खेरीज करून चेटकाला सार्वत्रिक व गाढ-भयानकतेचें स्वरूप कधींच प्राप्त झालेलें दिसत नाहीं. चेटकाचे जे अत्यंत वाईट प्रकार आढळले

त्यांतल्या बहुतेकांत खरें पाहिलें तर, शुद्धमताभिमानी पंथाचा धर्मोन्माद दिसतो (१४४).

### स्कातलंदांतील स्थिति उलट होती.

(क० ५१) इंग्लंदांत या धर्मोन्मादाला लगाम पडून तो दबला होता. तथापि त्याच्या निष्कंटक वर्चस्वाखालीं एक देश होताच. शुद्धमताभिमानी धर्माधिकाऱ्यांनीं जनतेच्या शीलाला व संवयींना वळण लावण्यांत व समाजाच्या प्रत्येक वर्गांत आपलीं कडक व उदास मतें फैलावण्यांत जेथें यश मिळविलें, असा एक देश होताच. अत्यंत प्राचीन भोळसटपणाच्या बिड्या तोडून टाकण्यांत व ज्ञानमार्गाचें राक्षसीगतीनें आक्रमण करण्यांत इंग्लंद गुंतलें असतां स्कातलंद आपल्या धर्मोपाध्यायांपुढें खुषीनें मान वांकवून अजून कांपत राहिलें होतें. मानसिक दास्याचा पगडा इतका पूर्ण कधींही बसला नव्हता; जुलम इतक्या दुराराध्य पशुवत् आचरणानें कधींही चालला नव्हता. लोकमताच्या पाठिंब्यानें स्कातलंदांतल्या धर्मोपाध्यायांना सर्व विरोध भेडसावून नाहींसा करण्यांत, उलटमताचा ब्र काढण्याचीही मनाई करण्यांत, घरगुती कामांतल्या अतिशय खाजगी गोष्टींतही शिरून तेथें अंमल गाजविण्यांत, आपण घालून दिलेले धार्मिक नियम प्रत्येकाला सर्वस्वी पाळायला लावण्यांत, व अखेर कायद्यांचा रोंख व क्षेत्र आपल्या मर्जीनुरूप राखण्यांत, यश प्राप्त झालें होतें. आपणाला आतां क्वचितच कल्पना होईल, इतकी धार्मिक भयानकता उत्पन्न करून लोकमतांवर त्यांनीं आपलें वर्चस्व राखलें होतें. त्यांच्या धर्मोपदेशांत मानवी दैन्य, सर्वशक्तिमानाचा क्रोध, सैतानाचें भयोत्पादक सामर्थ्य व निरंतर दर्शन, नरकाच्या यातना, हे विषय सदा येत असत. बहुतेक मानवांना पुढें चिरकाळ भोगाव्या लागणाऱ्या शिक्षेचें अंधुक स्वरूप म्हणून सर्व अत्यंत भयंकर मानवी दुःखांचे प्रकार लोकांपुढें एकत्र करून मांडले जात. देशांत असंख्य अद्भुत चमत्कार घडतात, असें सांगितलें जात असे; पण हे बहुतेक सर्व भयोत्पादक असत.

### घोर आपत्ति म्हणजे अशरीर–आत्म्यांच्या उठाठेवी.

रोगराई, वादळ, दुष्काळ, जी जी म्हणून भयंकर आपत्ति मानवीजातीवर येई अगर जमिनीच्या पिकाचा नाश करी, ती ती अशरीर-

आत्म्यांच्या प्रत्यक्ष उठाठेवीनें झाली, असें म्हणत असत; व खुद्द सैतान पृथ्वीतलावर जडदेह धारण करून वारंवार संचार करितो असें भासविलें जात असे ( १४५ ). असल्या उपदेशाचा स्वाभाविक व्हावयाचा तो परिणाम होत असे. ज्या ठिकाणीं मोळसटपणा सार्वत्रिक होता, जेथें असल्या भयंकर कल्पनांनीं बुद्धि थिजून बेभान झाली होती, जेथें करमणुकीचे बहुतेक सर्व प्रकार दाबून टाकलेले होते, व जेथें मानवी-विचारांचा जोर एकाग्रतेनें धर्मज्ञानांतल्या कल्पनांवर पडला होता, त्या देशांत चेटकाचें खूळ असल्या उपदेशाच्या योगानें सहज उत्पन्न झालें. चेटुक वगैरे हें केवळ या उपदेशामुळें उपस्थित झालेल्या भयानकतेचें एक स्वरूप होतें; तें केवळ रोगट कल्पकशक्तीमुळें लोकांच्या मनावर उमटलेलें लोकप्रिय धर्मज्ञानाचें प्रतिबिंब होतें. यामुळें त्याला अत्यंत भीषण आकार व अत्यंत कृष्ण स्वरूप प्राप्त झालें असें आढळतें. इतर देशांत या खुळांत लबाडीची बरीच भेसळ तरी आढळते, पण स्कातलंदांत हें खूळ केवळ शुद्धस्वरूप होतें (१४६). सर्वत्र धर्मोपाध्यायांनीं केलेला उपदेश ही या लेंकराची आई, व त्यांनीं केलेला छळ ही दाई. हाव धरून, दयामाया गुंडाळून, केवळ रक्ताच्या तहानेनें, थकवा विकवा न पाहणाऱ्या कळकळीनें, त्यांनीं आपलें काम तडीस नेलें. इ० स० १६०३ त अबरदीनच्या विद्यापीठानें सभा भरवून प्रत्येक धर्माधिकाऱ्याला गंभीरपणें ताकीद दिली कीं, आपल्या वृत्तीच्या गांवांतल्या दोन बुजुर्ग माणसांना बरोबर घेऊन त्यांनीं गुप्त व बारीक तपास करावा; व गांवच्या प्रत्येक माणसाला चेटक्यांच्या माहितीबद्दल शपथ देऊन विचारावें ( १४७ ). आरोप दाखल करून घेण्याच्याच केवळ उघड उघड हेतूनें देवळांत पेट्या ठेविलेल्या असत (१४८). कोणाही बाईचा वहीम आला असतां, उपाध्याय व्यासपीठावरून तिचें नांव घेऊन तिची निर्भर्त्सना करी, गांवांतल्या लोकांस तिच्याविरुद्ध पुरावा देण्यास उपदेश करी; व तिला पाठीशीं घालण्याची सर्वांना मनाई करी ( १४९ ). वृत्तिप्रदेशाच्या वांटणीच्या व्यवस्थेनें जितकी सत्ता उपाध्यायाच्या हातीं असे, तिचा अंमल तो याच धोरणानें करी; आणि ही व्यवस्था युरोपांतल्या दुसऱ्या कोणत्याही ठिकाणच्या व्यवस्थेहून ज्यास्त कुशलतेनें तपशीलवार

तयार केलेली होती. भोंवतालीं अशी स्थिति असल्यामुळें चेटकाचे खटले बहुतेक सर्वस्वी उपाध्यायांच्या हातांत गेले. मुख्य पंच ते असत; कबूल-जबाव त्यांच्या पुढें होत; उंदराला मांजर साक्षी तेच; अगर कबूल-जबाब आरोपितांच्या तोंडून काढून घेण्याकरितां हाल करायला आज्ञा देणारे तेच ( १५० ).

## कबूल-जबाबासाठीं केलेल्या उद्वेगजनक व अमानुष हालअपेष्टा.

ज्याची कल्पना करण्याला पौरस्त्य लोकांचीच कल्पकता योग्य, अशा या हालअपेष्टांचें स्वरूप जेव्हां आपण वाचतों; व त्याचा प्रयोग बहुधा म्हाताऱ्या, जख्खड, चळलेल्या, निर्माल्य झालेल्या बायांवर होत असे, असें जेव्हां आपल्या ध्यानांत येतें; तेव्हां त्या हालअपेष्टा देणाऱ्या व देवविणाऱ्या माणसांबद्दल जो अत्यंत तिरस्कार उत्पन्न होतो तो आंवरणें अवघड जातें. जर एकादी चेटकी हट्टी असली तर तिला वठणीवर आणून तिच्याकडून कबूलजबाब घेण्याचा पहिला व रामबाण उपाय म्हणून म्हणत तो जागवणें हा होय. हें जागवणें म्हणजे काय ? तर, एक लोखंडाची लगाम अगर कडें तिच्या तोंडावर बांधावयाचें. त्याला चार कांटे असत; ते तिच्या तोंडांत खुपसावयाचे; मग तो लगाम अगर कडें पाठीमागें एका भिंतीला सांखळीनें घट्ट बांधावयाचें; तें असें बांधावयाचें कीं, त्या बाईला जमिनीवर पडतां येऊं नये, अशी त्या बाईला कधीं कधीं कित्येक दिवस ठेवीत; व तिच्यावर सक्त पहारा असे; या पहारेवाल्यांनीं तिचा क्षणभरसुद्धां डोळ्याशीं डोळा लावूं द्यावयाचा नाहीं (१५१). शिवाय तिच्या अंगाला लांब सुया टोंचीत (१५२); त्या दुहेरी उद्देशानें; एक तिला झोंप घेऊं द्यावयाची नाहीं व दुसरा तिच्या अंगांतून रक्त येतें कीं काय तें पहावयाचें. कारण, रक्त न येणें व नुसताच टोंचल्याचा वण राहणें, ही चेटकीची पक्की खूण होय. या यातनांतच तिला अतिशय तान्हेलीं ठेवण्याच्याही अपेष्टेची भर घालीत (१५३), कारण स्कातलंदांत म्हण आहे कीं, चेटकीला पाणी प्यायला मिळालें तर ती कधींही अपराध कबूल करावयाची नाही. कांहीं कैद्यांना पांच अहोरात्र जागविल्याचीं उदाहरणें आहेत. व एकाला तर नऊ अहोरात्र जागविल्याचा दाखला आहे, ( १५४ ) असें म्हणतात.

## असल्या यातना माथें फिरवायला पुरत.

असल्या प्रयोगानें मनाला व शरीराला होणारें दुःख पुष्कळांचा निश्चय ढळवण्यास व कांहींचें माथें फिरविण्यासही पुरेसें आहे; पण आणखी व विशेष त्रासदायक अपेष्टा होत्याच. हालअपेष्टांचीं जीं तीन आणखी मुख्य हत्यारें उपयोगांत आणीत, तीं 'पेनिविंकिस्' 'बूट' व 'क्याशिएलाविस' हीं होत. 'पेनिविंकिस' म्हणजे एक पेंच-खिळयानें आंगठा चिरडण्याचें हत्यार असे. 'बूट' म्हणजे एक प्रकारचा खोडाच होता. या खोड्यांत एक तंगडी अडकवावयाची व त्यांत हातोड्यानें पाचरा ठोकून ती मोडावयाची. 'क्याशिएलाविस' हा पण एकप्रकारचा लोखंडी खोडाच होता. यांत पाय अडकवून पुनः पुनः तो शेगडीवर तापवावयाचा ( १५५ ). कधीं कधीं आरोपिताच्या अंगाला आगकाड्या लावीत ( १५६ ). तत्कालीन न्यायसंबंधीं नोंदनिशींत एका मनुष्याला दोन अहोरात्र लोखंडी खोडा घालून त्याचे हाल चालवि-ल्याचें आपणास वाचावयास मिळतें; तसेंच दुसऱ्या एकाला त्याच भयंकर यंत्रांत अकरा अहोरात्र ठेविलें होतें; शिवाय त्याचे पाय 'बुटां' त घालून दररोज मोडावे, असें चवदा दिवस चाललें होतें; त्याला रोज चाबकाखालीं असा मारीत कीं, त्याच्या सर्वांगाची कातडी सोलून गेली होती ( १५७ ). ही परमावधि होय; अशी या कृत्याची विशेष निर्भर्त्सना झाली हें खरें; पण सामान्य हालअपेष्टेचा येथें फाजील उपयोग झाला, एवढेंच काय तें.

## छळाचीं आणखी उदाहरणें. मारचा अर्ल काय तो विरुद्ध.

या उपायानें किती कबूल-जबाब मिळाले, व किती माणसांचे बळी पडले, हें सांगणें आतां अशक्य आहे. असंख्य जबान्या व कबूल–जबाब राखून ठेविले आहेत; पण ते सर्व एकाच न्यायासनापुढें चाललेल्या कामासंबंधीं आहेत; व अशी पुष्कळ न्यायासनांपुढें ह्या गुन्ह्यांच्या खटल्यांची सुनावणी होत असे. इ० स० १६६२ त चेटकाच्या आरोपाबद्दल दीडशेंहून अधिक माणसांवर खटले झाले होते ( १५८ ); व त्याच्या आदल्या वर्षीं अशा खटल्यांची चौकशी करण्याकरितां हुकूम दिलेल्या पंचायतींची संख्या चवदांहून कमी नव्हती ( १५९ ); असें आपणांस माहीत आहे. या गोष्टी समजल्यावर, एका प्रवाशानें इ० स० १६६४ त लीथ येथें नऊ बायांना

एकत्र जाळिल्याचें सहज जातां जातां पाहिलें; अगर इ० स० १६७८ त एकाच दिवशीं ( १६० ) दुसऱ्या नऊजणींवर आरोप ठेविला म्हणून नमूद केलें आहे; असें सांगण्याचें प्रयोजन क्वचित् उरतें. आरोपांचें क्षेत्र खरोखर विस्तृत असे; व स्प्रेंजर आणि नायदर यांच्या अकटोविकट कल्पनांचें प्रेस्बितेरियन ( गुरुजनाधिष्ठित पंथी ) धर्माधिकाऱ्यांकडून समर्थन होत असे ( १६१ ). पुष्कळ सनातनपंथी देशांत धर्माधिकाऱ्यांचें असें गाऱ्हाणें असे कीं, जे आपल्या जादूच्या बळाचा उपयोग केवळ रोग बरे करण्याकडे करीत, त्यांना देहान्तशासन देण्याचें दिवाणी अधिकारी नाकारीत. स्कातलंदांत अशा माणसांसही निःशंकपणें देहान्तशिक्षा देत (१६२). चेटक्यांना जाळण्यापूर्वी त्यांचा गळा बहुतकरून दाबण्याची चाल असे, पण ही दयेची सवलत फार करून गाळली जात असे. मारचा कोणी एक अर्ल हाच कायतो असलीं कृत्यें मनुष्यपणाला साजत नाहींत, अशी जाणीव असणारा एकटाच प्राणी दिसतो. एकदां कांहीं बाया मंद अग्नींत जळत असतां अर्धवट जळल्यावर कशा आरोळ्या ठोकीत निसटल्या व सभोंवतीं जमलेल्या तमासगिरांत येऊन निराशेच्या जोमानें दोनचार पळें कशा धडपड करीत राहिल्या; पण लगेच आपण निरपराध आहों, असा भयाण ओरडा करीत व ईश्वराला दूषण लावून किंकाळत आगींत जाऊन विव्हळत कशा पडल्या, हें सर्व त्या अर्लनें सांगितलें आहे ( १६३ ).

**राक्षसी छळाचें वर्णन करणें म्हणजे इतिहासकारांवर दैवदुर्विलसितानें लादलेलें कर्तव्य होय.**

अशा प्रकारांच्या देखाव्यांचें मनन करणें म्हणजे इतिहासलेखकावर येऊन पडणारें एक अत्यंत कष्टप्रद कर्तव्य आहे; पण गतकालाविषयीं बरोबर अंदाज बांधावयाची इच्छा असेल, तर त्यानें असल्या कर्तव्यापुढें भीतीनें काचावून उपयोगी नाहीं. कांहीं मतांच्या इतिहासाचा शोध त्या मतांमुळें झालेल्या छळाच्या योगानें जो रक्तस्राव झाला असेल, त्यावरून लावावा लागतो; व या छळाच्या तीव्रतेनें ह्या मतांच्या प्रतीतीची तीव्रता मापावी लागते.

## स्कातलंदांतील चेटुक व शुद्धमताभिमानी पंथ.

स्कातलंदांतील चेटुक त्या देशांतल्या शुद्धमताभिमानी पंथाच्या मतांचेंच फळ होय; व त्यांत उत्पादक कारणाचें स्वरूप हुबेहुब प्रतिबिंबित झालें होतें. धर्मसुधारणेच्या अगोदर लोकांत अज्ञान व भोळसटपणा हीं हवीं तितकीं होतीं हें खरें; पण त्याबरोबर हेंही खरें कीं, चेटकाचें कृष्णतर स्वरूप इतकें विरळ होतें कीं, तद्विषयीं इ० स० १५६३ पर्यंत कायदा झाला नव्हता; व इ० स० १५९० पर्यंत कायद्याच्या तीव्रतेची कमाल झाली नव्हती. स्कातलंदांतल्या धर्मोपदेशकांनीं इतक्या कळकळीनें चालू ठेविलेल्या धार्मिक भयानकतेचें व या आभासाचें अचुक साहचर्य होतें; व याच धर्मोपदेशकांनीं सर्व स्कातलंदभर चेटक्यांच्या छळाची वाहवा करून त्यास जोर आणला हें पण खरें ( १६४ ); त्यांच्याकडे आलेल्या वर्चस्वाला सीमा उरली नव्हती; व या बाबतींत तर त्यांच्या सत्तेबद्दल बिलकूल वाद नव्हता. त्यांच्या नुसत्या एका शब्दानें छळाची बंदी झाली असती; पण हा शब्द उच्चारणें त्यांच्याकडून कधींच झालें नाहीं.

## शुद्धमताभिमान्यांचें पाषाणहृदयत्व व त्याची मीमांसा.

त्यांच्या वागणुकीवरून त्यांच्या नुसत्या बुद्धीलाच भ्रम झालेला दिसत नाहीं, तर दुर्व्यसन—कर्दमांत सर्व जन्मभर लोळत पडणाऱ्यांच्या हृदयालाही क्वचित्च येईल, असें पाषाणमयत्व त्यांच्या हृदयाला आलें होतें, असें दिसतें. तथापि याच माणसांच्या अंगीं अत्यंत आणीबाणीच्या प्रसंगीं अतिशय उंच प्रतीचे व अतिशय उदात्त सद्गुण वारंवार चमकतांना दिसले होते. हीं माणसें अशीं होतीं कीं, सभोंवार छळ जारीनें चालू असतां त्यांचें मनोधैर्य लवमात्र डगमगलें नाहीं, राजकृपा संपादण्याकरितां त्यांनीं आपल्या सदसद्बुद्धीची मान कधींही मुरगाळली नाहीं, आपल्या पवित्र कर्तव्याची कळकळ बाळगून तत्सिद्ध्यर्थ तनमनधन अर्पण करण्याच्या गुणांत त्यांच्यावर क्वचित्च कोणीं ताण केली असेल, व आपल्या खाजगी चरित्रक्रमांत ते निःसंशय मोठे मायाळू व मनमिळाऊ होते. आपण देणार तो दोष त्यांना देतां कामा नये. त्यांना ती अवस्था आणणाऱ्या एकंदर पद्धतीच्या माथीं तो मारला पाहिजे. हीं माणसें ह्मणजे एका थोर सत्याचीं निदर्शक होत. तें सत्य असें कीं, जेव्हां आपल्या बांधवां-

पैकींच एखादा वर्ग सर्वशक्तिमान् ईश्वराच्या कोपानें विव्हळ करणाऱ्या यातना चिरकाळ भोगण्यास पात्र झाला आहे, असें मनुष्यांना वाटूं लागतें; व धर्मज्ञानामुळें असल्या यातनांच्या चिंतनाकडे आपलें मन प्रतीति येऊन तीव्र आस्थेनें वळतें, तेव्हां ईश्वराचे शत्रु म्हणून जे त्यांना वाटतात, त्यांच्या यातनांविषयीं मानवी-प्रकृतीला लाभण्यास शक्य तितकी निर्भेळ वृत्तिशून्यता त्यांच्याठायीं उत्पन्न होते.

## स्कातलंदच्या धर्मसंस्थेंत चांगले गुण होते.

इतर ज्या देशांत शुद्धमताभिमानी पंथ होता, त्यांतल्यांहून स्कातलंदांतल्या धर्मज्ञान्यांच्या अंगीं हृदयकाठिन्य व निर्दयत्व ज्यास्त होतें; पण यानें तेथल्या धर्मोपदेशकांची कित्येक बाबतींत कीर्ति होण्यासारखेंच कांहीं विशेष कारण आहे. स्कातलंदची धर्मसंस्था म्हणजे लोकसत्ताक चळवळीचा परिणाम होय व कांहीं काळपर्यंत राजकीय स्वातंत्र्याची कच न खाणारी पुरस्कर्त्री युरोपांत बहुतेक ही एकटीच संस्था होती; स्वातंत्र्याच्या तत्त्वांचें स्पष्ट उठावानें शब्दचित्र वठविणारा पहिला गृहस्थ बुक्यानन हा स्काच गृहस्थ होता. हीं स्वातंत्र्यतत्त्वें उचलून धरण्यांत स्काच धर्मोपदेशकांनीं जें धैर्य दाखविलें, त्याची स्तुति करावी तितकी थोडीच. त्यांच्या परिस्थितीमुळें, ते स्वतंत्रतावादी बनले व साहजिकच त्यांनीं आपल्या स्वातंत्र्यतत्त्वांना धर्मज्ञानाचें पांघरूण देण्याचा प्रयत्न केला. यहुद्यांतल्या न्यायाधीश व सेनाधीश यांच्या इतिहासांतून त्यांनीं लवकरच आपल्या बंडांना पूर्व निदर्शनें हुडकून काढलीं. आणि त्यामुळें धर्मज्ञानाची व स्वातंत्र्याची तीव्र वृत्ति एकवटून त्यांचीं मनें मार्गे जुन्या करारांतल्या देखाव्यांकडे, यहुद्यांच्या दुःखांकडे व त्यांच्या विजयांकडेही विलक्षण मायेच्या ओढ्यानें वळलीं. त्यांचें सर्व धर्मज्ञान जुन्या करारांच्या सांच्यातून ओतून निघालें. त्यांच्या विचारसरणीचा, प्रत्यक्ष त्यांच्या वाक्यपर्यायाचा उगम जुना करारच; व क्यानानच्या महासंहारांचें व लेवितिकसमधल्या कायद्यांच्या कलमांचें सतत चिंतन झाल्यामुळें त्यांच्या मनांवर साहजिक व्हावयाचा तो परिणाम झाला (१६५).

## स्कातलंदांतील चेटकाच्या ऱ्हासाची संगतवार माहिती उपलब्ध नाहीं.

(क० ५२) स्कातलंदांतल्या चेटकाचा ऱ्हास कसा होत गेला, ह्याचा इतिहास लिहिणें क्वचितच शक्य आहे; कारण इतिहासाला ज्यांचें

विवेचन करतां येईल, अशा घटनांचीं चिन्हें या मतांच्या पालटांत प्रायः बिलकूल दिसत नाहींत. एकाकाळीं चेटक्यांवर श्रद्धा ठेवण्याचा कल प्रत्येक माणसांत आढळतो, तर पुढच्या कांळीं हा कल निमूटपणें पार नाहींसा झालेला आढळतो (१६६). यासंबंधांत निश्चयानें अशा दोनच गोष्टी सांगतां येतील असें वाटतें; त्या ह्याः इंग्लंदांतल्यापेक्षां स्कातलंदांत संदिग्ध-मतित्वाच्या ओघाचा वेग फारच मंद होता, व त्याच्यापुढें धर्मोपदेशक सर्वांमागून वांकले. सतराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत खटले हवे तितके होत होते; पण त्यानंतर ते विरळ झाले. या बाबतींत शेवटली देहान्त-शिक्षा इ० स० १७२२ त झाली, असें साधारणपणें सांगतात; पण इ०स० १७३०त क्यासन बर्त या देशांत आला होता, तो इ०स० १७२७त एका बाईला जिवंत जाळल्याचें सांगतो (१६७). इंग्लंदांत सुशिक्षित वर्गांतल्या लोकांतून जेव्हां हा विश्वास साफ नाहींसा झाला होता, तेव्हां तो स्कातलंदांत इतका पसरलेला आढळला कीं, त्याचे कळकळीचे पुरस्कर्ते प्रेस्बितेरियन धर्माधिकाऱ्यांपैकीं होते, हें पाहून या सूक्ष्मनिरीक्षक प्रवाशाला फारच आश्चर्य वाटलें. इ० स० १७३६ इतक्या अलीकडेही संयुक्त प्रेस्बितर मंडळांतल्या धर्माधिकाऱ्यांनीं चेटकावर आपला विश्वास आहे व संदिग्धमतित्व सर्व-साधारण होत चालल्याबद्दल आपणांस दिलगिरी वाटते (१६८), असा ठराव मंजूर केला.

## चेटकाच्या इतिहासाच्या पर्यालोचनाची समाप्ति.

( क० ५३ ) चेटकाच्या इतिहासाचें पर्यालोचन आतां पुरें झालें आहे. रोम, इंग्लंद व जिनिवा एवढ्याच ठिकाणच्या धर्मज्ञानाशीं या पर्यालोचनाचा संबंध आहे. या पर्यालोचनांत असें दाखविलें आहे कीं, चेटकासंबंधीं जे पालट झालेले दिसतात, त्यांचीं कारणें पहावयाचीं असतील तर तीं विशिष्ट-मतांच्या निरुंद परिघांत न धुंडतां तत्कालीन बौद्धिक व धार्मिक सर्वसाधारण-स्थितींत हुडकलीं पाहिजेत; हेंच दुसऱ्या शब्दांनीं सांगावयाचें तर असें. या पर्यालोचनांत असें दाखविलें आहे कीं, चेटुक हा विश्लिष्ट गोष्टींचा परिणाम नव्हे, तर विचारसरणींचा परिणाम होय; विशिष्ट धर्मज्ञानमतांत विकृति उत्पन्न करणाऱ्या बौद्धिक उष्णतामानामुळें त्याचा उद्भव झाला; व प्रत्येक मोठ्या बौद्धिक विकाराचें त्यांत विस्मयकारक स्पष्टतेनें प्रतिबिंब उमटलें. चेटकावरचा विश्वास मानवी सुधारणेच्या आद्य काळांतल्या अज्ञानांत उगम

पावला; भोळसटपणाशीं भयानकतेची सांगड घालणाऱ्या धर्मज्ञानासंबंधीं झटापटीनें त्यांत जीवन व जोम भरला; व सतराव्या शतकापासून धर्मज्ञानाच्या प्रांतांत चोहोंबाजूंनीं हळूहळू हातपाय पसरणाऱ्या कार्यकारणवादाच्या प्रचंड ओघाच्या प्रभावानें त्याला उतरती कळा लागली. चेटकावरच्या श्रद्धेच्या ऱ्हासाचें हें विवेचन बरेंच लांबलचक केलें आहे; कारण कार्यकारणवादाला मिळालेला हा एक अगदीं आरंभींचा व अतिशय महत्त्वाचा जय होय. ज्यांत मर्यादा बिलकूल सुटलेली नसते, एकपंथीय मनोविकारांनीं अगर वैयक्तिक बुद्धिविशालत्वानें ज्याला स्फुरण आलेलें नसतें; व अतएव बौद्धिक परिपोषाच्या नियमांचें विवरण करण्यास जें चांगलें सोईचें पडतें, अशा मतांतराचीं उदाहरणें फारच थोडीं आढळतात. याशिवाय जेव्हां जेव्हां या श्रद्धेची प्रचीति आली तेव्हां तेव्हां नेहमीं छळ झालेला आहे. या गोष्टीमुळें तिच्या स्थित्यंतरांचा माग पुष्कळ बिनचूकपणें काढतां येतो; आणि या श्रद्धेचा नायनाट झाल्यापासून जो काळ लोटला, त्याच्यायोगानें वादाच्या तुफानी वातावरणापासून पुष्कळ अंशीं हा विषय दूर आहे.

**कार्यकारणवादाच्या प्रगतीचे उपकार चेटकाच्या बाबतींतील छळ निरुपम असून कींव उत्पन्न करितो.**

कार्यकारणवादात्मक सुधारणेच्या प्रगतीनें निदान या चेटकाच्या बाबतींत तरी किती हालअपेष्टा नाहींशीं झाली आहे, हा विचार मनांत आल्यावांचून चेटकाच्या इतिहासाची रजा घेणें अशक्य आहे. धर्मज्ञानासंबंधीं दुफळी झाल्यानें वेळोवेळीं जीं भयंकर संकटें उद्भवलीं आहेत, त्यांची आठवण झाली म्हणजे, अंधारकोठड्यांत अथवा सुळावर स्वमतार्थ प्राणत्याग करावा लागलेले असंख्य धर्मवीर, धर्मयुद्धांत समरांगणीं देह ठेवणारे लाखों सैनिक, पुष्कळ थोर राष्ट्रांत पेरलेलीं व पुष्कळ श्रेयस्कर व्यवसायांचा पक्षघात करणारीं प्रायः चिरकाळ टिकणाऱ्या कलहाचीं बीजें, यांचा विचार केला म्हणजे, जिवंत जाळलेल्या निर्दोष माणसांचे जे थोडेसे हजार बळी पडले, त्यांची कथा काय असें वाटतें. ही गोष्ट लक्षांत आहे; तथापि इतक्या निर्भेळ व तीव्र यातना कोणत्याही प्रकारें बळी पडलेल्या माणसांनीं बहुधा सोसल्या नाहींत. त्यांच्यांमध्यें धर्मवेडही नव्हतें कीं, त्यानें तरी संकटास तोंड देण्याची त्यांना छाती व्हावी, व यातना सोसण्यास त्यांचे देह वज्राचे बनावे; कीर्तिकर शाश्वत सुखाची त्यांना खात्रीही

नव्हती कीं, तेणेंकरून त्यांनीं आपल्या आत्म्याला स्वर्गी नेणाऱ्या एलायजाच्या रथाकडे व आपल्या देहाचें भस्म करण्यास तयार असलेल्या अग्निज्वालांकडे सारख्याच आनंदी-दृष्टीनें पहावें. शोकाकुल मित्रांचें सांत्वनही त्यांना मिळत नसे. पुढच्या पिढ्या सन्मानानें व आदरानें आपल्या नांवाचें स्मरण ठेवतील, ही जाणीवही त्यांना नसे. हीं माणसें जीं मेलीं त्यांच्याबरोबर कोणीं सहगमन केलें नाहीं, त्यांच्याकरितां कोणीं एकही अश्रु गाळला नाहीं, कोणीं अनुकंपा दाखाविली नाहीं, उलट सर्वांनीं त्यांचा तिरस्कार केला; अत्यंत दुष्ट पापी असा सर्वांचा त्यांच्यांविषयीं ग्रह होता. हीं भ्रष्ट, निंद्य म्हणून प्रत्यक्ष त्यांचीं आप्तेष्टमाणसेंही त्यांच्यापासून दूर पळत.

### हा भोळसटपणा घालवून जनतेंतली भयानकता कार्यकारणवादाच्या प्रगतीनें नष्ट केली.

बालवयांत जे भोळसटपणाचे प्रकार त्यांच्या कोंवळ्या मनांत भिनले, ते मोठ्या वयांतल्या आभासांशीं एकजीव होऊन व स्वतःच्या स्थितींतल्या दुःखांचा दुजोरा घेऊन पुष्कळदां त्यांची अशी भावना करून देत कीं, आपण सैतानाचे खरोखर बंदे गुलाम आहों; व इहलोकींच्या या हालअपेष्टांच्या ऐवजीं इतक्याच कष्टप्रद व चिरंतन यातना अल्पावधींतच आपणांस प्राप्त होतील. आणि त्या सर्व गोष्टींखेरीज, आपणांला याचाही विचार केला पाहिजे कीं, एकंदर जनतेमध्यें या श्रद्धेनें किती भयप्रद स्थिति झाली असेल. आपलें व ज्याचें कांहीं वांकडें आहे, त्याच्या हातीं आपल्या प्रेमाचा सर्व सांठा एका क्षणांत नष्ट करण्याचें सामर्थ्य आहे, ही कल्पना मनांत येतांच चिंतातुर होणाऱ्या आईचें चित्र आपल्या मनांत आपण आणलें पाहिजे. याहूनही आणखी, सर्व आपणांस सोडून गेलीं, आपल्या जवळ आतां कोणी उरलें नाहीं, या काळजींतच आपल्यावर कोणी चेटुक केल्याचा आरोप करील कीं काय, अशी भीति पडून चिंता दुणावली असतां वार्धक्यानें शक्तिक्षीण झालेल्यांच्या कष्टमय जीविताची आपण कल्पनाच केली पाहिजे. या सर्व अपेष्टा एका भोळसट प्रकाराचीं फळें होत, व हा भोळसटपणा कार्यकारणवादाच्या प्रभावानें नष्ट केला आहे.

---

# प्रकरण २ रें.

## अद्भुत चमत्काराच्या जाणिवेची उतरती कळा.

### धर्मसंस्थेंतले अद्भुत चमत्कार.

#### चेटुक व अद्भुत चमत्कार यांची तुलना.

( क्र० १ ) चेटुक म्हणजे जात्याच अश्रद्धेय म्हणून आपोआप त्याच्या-बद्दल स्वाभाविक तिटकारा उत्पन्न होऊन लोकांचीं मनें ज्या विचारसरणीनें त्यावरील विश्वासापासून प्रथमत: पराङ्मुख झालीं, व नंतर त्याचा उघड उघड अव्हेर करूं लागलीं, त्याच विचारसरणीचा तशाच रीतीनें तसाच परिणाम अर्वाचीन अद्भुत चमत्कारांवरील विश्वासावर झाला. तथापि चेट-काच्या बाबतींत या विचारसरणीला जितका पूर्ण जय प्राप्त झाला तितका या बाबतींत झाला नाहीं; कारण अद्भुत चमत्कारांची शक्ति कायम आहे, असें रोमी पंथ अजून प्रतिपादतो. तसेंच या बाबतींतला ऱ्हासही चेट-काच्या बाबतींतल्या इतका मर्यादा न सोडतां झालेला नाहीं; कारण रोमी-पंथाच्या बहुतेक चमत्कारांचा संबंध स्पष्टपणें रोमी पंथाच्या मतांशीं लागत असल्यामुळें या प्रश्नांत नाना वादग्रस्त मुद्दे शिरले आहेत. परंतु हे विचार सोडून दिले तरी या मतौघाच्या सामान्य बाह्यरेषा स्पष्ट उमटलेल्या आहेत; व त्यांच्याकडे थोडी नजर फेंकणें योग्य आहे.

#### चमत्कार म्हणजे क्वचित् अपवादक गोष्टी.

धर्मसुधारणेच्या अगोदर या विषयावरची विचारसरणी काय होती तिची जर प्रतीति घ्यावयाची असेल तर प्रतिरोधिपंथाचें याविषयीं जें साधारण मत आहे, त्याला आपल्या मनांतून साफ हद्दपार केलें पाहिजे. चमत्कारांविषयीं प्रतिरोधिपंथाची कल्पना अशी आहे कीं, चमत्कार म्हणजे क्वचित् अपवादक गोष्टी होत; व जें दैवी तत्त्व इतर रीतींनीं प्रतिपादन करतां येत नसे, तें उपदेष्टा सांगूं लागला असतां त्यावर भाव बसावा, हा चमत्कार करण्याचा मुख्य उद्देश नेहमीं असे. आरंभींच्या ख्रिस्ती धर्म-

पित्यांच्या व विशेषतः चौथ्या व पांचव्या शतकांतल्या लेखांत चमत्कार विपुल होत असत, असें म्हटलेलें आढळतें. इतकेंच नव्हे तर, त्यांचा नानाप्रकारचा उद्देश असे, असेंही त्या लेखांत लिहिलेलें आहे. चमत्कार म्हणजे दैवी कृपा होय; त्यांनीं दुःखविमोचन, रोगनिवारण व भक्तकामपूर्ति होई. चमत्कार वारंवार धर्मस्फूर्ति करीत; ग्लानि आलेल्या मनाला धर्मसाधनतत्पर करीत; व कडकडीत धर्मनिष्ठेच्या तपाचें फळ देत. ते साधूंच्या थोर सद्गुणांचीं चिह्नें होतीं; जे मनःशुद्धीच्या उंच पायरीवर गेले असतील, त्यांना चमत्कारांनीं सर्वत्र पूज्यता प्राप्त होई अथवा त्यांच्या याहूनही खडतर तपश्चर्येला त्यांनीं साहाय्य मिळे. याचें एक असें उदाहरण सांगतात कीं, एक साधु सर्वसंगपरित्याग करून तपश्चर्येकरितां वनांत गेला; तेव्हां रोज त्याच्या पोटापुरतेंच त्याला पाखरें अन्न आणून देत व जेव्हां कोणी त्याच्यासारखाच साधु त्याच्याकडे अतिथी येई, तेव्हां तीं पांखरें दोघांच्या पोटाला पुरेल इतकें अन्न आणीत; जेव्हां या साधूनें देह ठेविला, तेव्हां त्या वनांतून दोन सिंह त्याच्याकरितां गर्ता खणण्यास निघाले; त्यांच्या शवाजवळ त्यांनीं फार शोक केला; व मृत्यूच्या तडाक्यांत न सांपडलेल्यापासून त्याच्या आत्म्याला आशीर्वाद मिळावा (?) म्हणून गुडघे टेंकून त्यांनीं प्रार्थना केली (१). तसेंच दुसरा एक साधु होता, याचें मत असें होतें कीं, विराग्यानें स्वतःला नग्नस्थितींत पाहूं नये. हा साधु एकदां नदीकांठीं आला; त्या नदीवर पूल नव्हता. म्हणून तो कष्टी होऊन निराशेनें कांठावर उभा राहिला. इतक्यांत एक देवदूत आकाशांतून खालीं उतरला, व त्यानें या साधूला त्या नदींतून सुरक्षित पार नेलें (२); (त्याचें आंग भिजलें नाहीं व त्याला कपडे काढावे लागले नाहींत) शिवाय मागें आलेंच आहे कीं, ख्रिस्ती व पेगन दोन्ही धर्मांत जादूचा प्रभाव पूर्णपणें मान्य होता; व दोन्ही धर्मांचे लोक परस्परांच्या चमत्कारांची सत्यता कबूल करीत, मात्र परस्परांचे चमत्कार भुतांच्या करामती म्हणून म्हणत (३).

## मध्ययुगांत अद्भूत चमत्कारांची मागणी व पुरवठा दोन्ही भरपूर होतीं.

आरंभींचे ख्रिस्ती धर्मपिते सोडून मध्ययुगांत जर आपण शिरलों तर अमानुष-शक्तीच्या कल्पनांनीं बुजबुजलेल्या घनवातावरणांत आपण सांप-

डतों. चमत्कारालां त्या काळांत प्रायः अमर्याद मागणी होती; व मागणीला पुरा पडेल इतका पुरवठाही होत होता. अलौकिक पावित्र्य अंगीं असणाऱ्यांस सहजगत्या व निरंतर चमत्कार करण्याची ताकद प्राप्त होत असे, असें दिसतें; आणि त्यांच्या चरित्रांतून त्यांच्या सिद्धींची गर्दी दिसते; व धर्माच्या अत्युच्च गुरूची त्याला अनुज्ञा मिळालेली असे, असें दिसतें. नेहमींचा चमत्कार म्हणजे एकादा साधु समाधि लावून बसलेला असतां तो जमिनीपासून वर उठावा व अधांतरीं रहावा; किंवा त्याला कुमारी मेरी अगर एखादा देवदूत दृष्टांत व्हावा. प्रत्येक गांवांत कांहींना कांहीं तरी साधूंचा अवशेष असावयाचाच, व त्यानें रोग बरे व्हावयाचेच; अथवा साधूची मूर्ति असावयाचीच. तिनें कधीं कधीं डोळे उघडावे व मिटावे अगर आस्थेवाईक भक्तापुढें तिनें मान वांकवावी. सन्त आंतनी धर्मोपासना चालवीत असतां समुद्रांतल्या माशांची ऐकण्याकरितां किनाऱ्यावर गर्दी जमावी किंवा बर्गोस येथील सुळावर चढलेल्या ख्रिस्तमूर्तीचे केंस दरमहा वाढावे व कापावे लागावे, अथवा सारागोजा येथल्या पिलरच्या कुमारीनें आपल्या भक्तांपैकीं एकाची प्रार्थना ऐकून त्याचा तोडून टाकलेला पाय होता तसा करावा (४). हे चमत्कार ज्यास्त विलक्षण खरे; पण अविश्वास्य बिलकूल नव्हत. ख्रिस्त किंवा कुमारी यांच्या अवशेषाचा स्पर्श केला असतां असाध्य दिसणाऱ्या रोगानें ग्रस्त झालेलीं माणसें तत्क्षणीं खणकन उठून उभीं रहात. असल्या अवशेषांचा हा गुण सभोंवतीं कल्याणकारक परिवेषानें स्फुरत असे. ते अवशेष सांपडावयाचे असले म्हणजे अगोदर कांहीं दिव्य दृष्टांत होत असे; व देवदूत ते अवशेष एका ठिकाणाहून काढून हवेंतून दुसऱ्याच एखाद्या ठिकाणीं नेऊन ठेवीत. जर एकादा धर्मप्रचारक परधर्मी लोकांत गेला, तर तत्पूर्वींच अमानुष चिह्नें दिसून त्या लोकांची तारांबळ उडे व त्याच्या आगमनापूर्वी आसुरी शक्ति ‘ यः पलायते ’ करीत.

## युद्धांत राजांच्या मदतीस प्रेषित येत; व अद्भुत चमत्कारांवांचून साधूंत गणना होत नसे.

धार्मिक कार्याकरितां जर कोणीं ख्रिस्ती राजानें तरवार उपसली, तर त्याच्या सैन्याच्या बाजूनें प्रेषित लढत व त्याच्या शत्रूंचा

धुव्वा उडविण्यास चमत्कार करीत असें समजत. जर कोणा निर्दोष माणसावर कांहीं आळ आला, तर लगेच तो कांहीं तरी दिव्य करी; त्यामुळें त्याची अब्रू साफ होऊन आळ घेणाऱ्यांची निंदा होई. अशा सर्व गोष्टी सर्व युरोपभर नेहमीं चालत व त्याबद्दल कोणालाही यत्किंचित् विस्मय अगर संदेह वाटत नसे. बोलंदच्या संग्रहांत साधूंचीं सुमारें पंचवीस हजार जुनीं चरित्रें आहेत (५) असा अंदाज एम. गिजो यानें केला आहे. एवढ्यावरून श्रद्धापूर्वक सांगण्यांत व ऐकण्यांत येणाऱ्या अद्भुत चमत्कारांची संख्या किती प्रचंड असावी, याची थोडीशी कल्पना तसल्या जुन्या चरित्रांत अमानुष कर्तबगारीचा किती बुजबुजाट असतो, हें ज्यांना माहित आहे, त्यांना करितां येईल. पण ही अद्भुत चमत्कारांची केवळ एक शाखा होय. चमत्कार करणाऱ्या हजारों मूर्ति व चित्रें ख्रिस्ती धर्मांतर्गत लोकांत जें चमत्कार नेहमीं करित असत; आणि सर्व देशांत व सदा सर्वदा जे असंख्य दृष्टांत व नानाविध विलक्षण गोष्टी घडत;त्यांचा वरच्या चमत्कारांत अंतर्भाव होत नाहीं. जेव्हां जेव्हां एकाद्या साधूचें नांव संतमालिकेंत ओंवावयाचें असे, तेव्हां तेव्हां त्यानें अद्भुत चमत्कार केले; असें सिद्ध करून दाखवावें लागे. पण या प्रसंगांशिवाय चमत्काराची हकीगत ऐकून कोणीं शंका घेतली असें कधीं होत नसे. मनुष्य अत्यंत सुशिक्षित असो वा अगदीं अक्षरशत्रु असो, हरएक मनुष्य प्रत्येक अडचणीचा सुलभ उलगडा म्हणून अमानुष शक्तीकडे स्वाभाविकपणें वळे.

## सद्यःकालीं चमत्कारांचें थोतांड बहुतेक नाहींसें झालें आहे.

(क० २) हें सर्व आतां नाहींसें झालें आहे. जेथें प्रतिरोधीपंथ विजयशाली आहे, त्याच देशांत हें नाहीसें झालें आहे असें नव्हे; तर, सनातन पंथाचें प्राबल्य जेथें अजून आहे व मध्ययुगांतल्या साधूंची जेथें अजून पूजा चालते, तेथेंही तें राहिलें नाहीं. नेपल्स येथें सन्त जानुआरिअसला अजून घाम येत असतो हें खरें; व फ्रेंच धर्मोपाध्यक्षांच्या पत्रांत अजून कुमारीचे दृष्टांताची गोष्ट अगदीं निरक्षर व भोळसट खेडवळांमध्यें कथन केलेली असते हें खरें. तथापि मागें जसे तारतम्य न पाहतां येईल तें निमूटपणें गिळणारे श्रोते होते, तसे आतां उरले नाहींत; उलट भाव टाकून मस्करी करणारेच आज बरेच दिवस फार झाले आहेत. या

विषयावर बोलतांना सनातन पंथी देशांतल्याही सुशिक्षित लोकांच्या भाषणाचा नेहमींचा झोंक ज्यांना माहित आहे, त्यांस कबूल होईल कीं, जे थोडेसे अर्वाचीन अद्भुत चमत्कारांचे वृत्तांत सांगण्यांत येतात, त्यांना आनंदाची उकळी फुटण्याचें दूर राहून, उलट ते मोठ्या संकटासारखे आडकाठी करणारे व अब्रूची नुकसानी करणारे असे सर्वत्र मानतात. त्याविषयीं बोलतांना बहुतेक सुशिक्षित लोक आपली तिरस्काराची व अश्रद्धेची वृत्ति उघड दाखवितात; कांहीं नैसर्गिक नियमांच्या आधारें त्यांची कशी तरी वासलात लावण्याचा अगर कशी तरी वेळ मारून नेण्याचा प्रयत्न करितात; व अगदीं थोडे भीतभीत व प्रांजळपणें कमीपणा पदरीं घेऊन त्यांचें समर्थन करितात. या चमत्कारांच्या वृत्तांताच्या आधारभूत पुराव्याची बारीक व बिनचूक छाननी करण्याचीच इच्छा ते दाखवितात, असें म्हणावें तर तसें म्हणवत नाहीं. उलट चमत्कार म्हणून सांगितलेल्या गोष्टी बहुतकरून एकदम उडवून दिल्या जातात असें म्हटलें तर खपेलसें वाटतें; आणि ही उडवून देण्याची तऱ्हा मागील काळीं त्यांचा अंगीकार करण्याच्या तऱ्हेसारखीच अविचाराची व सुलतानी थाटाची असते. चमत्कारांवर भरंवसा न ठेवणाऱ्यांकडून त्यांच्या आधारभूत पुराव्याची भारदस्तपणें छाननी क्वचित्च होते. त्यांचा अव्हेर होण्याचें कारण त्यांचा निराधारपणा नव्हे, तर त्यांचा अद्भुतपणा हेंच होय.

**संदिग्धमतित्ववादी अद्भुतापेक्षां काकतालीयाकडे सहज वळतात.**

अमानुष शक्तीनें अमुक गोष्टी घडतात अशी कल्पना करीत बसण्यापेक्षां स्वाभाविकपणें जे असंभाव्य, तसले प्रकार एकाच वेळीं घडले अशी कल्पना करितां येण्यासारखी असेल, तर करण्यास मनुष्यें तयार असतात. म्हणजे अद्भुतापेक्षां काकतालीय त्यांस बरें वाटतें. ही विचाराची धर्ती बोलून चालून जीं संदिग्धमतित्ववादी असतात, त्या माणसांत दिसते; इतकेंच नव्हे, तर, स्वधर्मावर उत्कट श्रद्धा नसली तरी खरी निष्ठा ठेवणाऱ्या माणसांतही दिसते. ज्यांचा जन्म बहुधा प्रापंचिक उद्योगांत जात असतो व जे सनातन धर्माचीं मुख्य मतें अंध श्रद्धेनें स्वीकारीत असून व तत्संबंधी मुख्य कर्में यथायोग्य करीत

असूनही स्वकालीन सार्वत्रिक विचारौघानुरूप ज्यांच्या मनाचें रंगरूप पालटतें, असा जो समाजांत सुशिक्षितांचा मोठा वर्ग असतो त्यांतल्या माणसांचा हा स्थायिस्वभाव होय. त्यांच्याजवळ एतद्विषयीं कोणी बोलायला गेलें तर ते बाव्हळे उडवून जरासें हंसून देतील म्हणजे झालें. ते म्हणतील कीं एकोणिसाव्या शतकाच्या मध्यमार्गी अशा हकीगती सांगण्यांत याव्या हें खरोखर शोचनीय होय. त्या हाकीगती म्हणजे बोलून चालून कालविपर्यासाचे सासले, वस्तुतः स्पष्टपणें अश्रद्धेय, असें म्हणून ते त्यांची वाट लावितील. परंतु वरतीं सांगतील, कीं सर्वच सनातन धर्मीयांनीं त्यावर विश्वास ठेवणें आवश्यक नाहीं; व अज्ञ समाजाच्या भोळसटपणाच्या मापानें सर्व सुशिक्षित सनातन धर्मीयांना मोजणें गैर आहे.

## असल्या विचारसरणीचें सुशिक्षणाशीं साहचर्य असतें.

बहुतेक सुशिक्षित सनातन धर्मीयांच्या बोलण्यांत व लिहिण्यांत सामान्यपणें हीच धाटणी स्वीकारलेली असते, याबद्दल क्वचित्‌च वाद पडेल. मानवी सुधारणेचें हें प्रत्यक्ष माप व फळ होय, हेंही अगदीं उघड आहे. ज्या प्रांतांत अर्वाचीन अद्भुत चमत्काराची हकीगत ऐकून मस्करी क्वचित् होते, तो प्रांत अतिशय मठ्ठ व एकलकोंडा होय, यांत चूक नाहीं. ज्यांच्या विचारसरणीला असल्या हकीगतीनें क्वचित् धक्का बसतो त्यांना शिक्षणाचा लाभ फारच थोडा मिळाला असला पाहिजे; व मानवी सुधारणेच्या प्रचंड लोंढ्याच्या तडाख्यांत ते फारसे सांपडले नसावे. धर्माधिकारी व त्यांच्या केवळ बगलेंतलीं माणसें जर वगळलीं, तर असल्या विचारसरणीचें व सुशिक्षणाचें निरंतर साहचर्य असतें असें आढळतें. आणि ही विचारसरणी म्हणजे ज्यांच्या बौद्धिक सहानुभूतीचें क्षेत्र फार विस्तृत झालें आहे व अतएव ज्यांच्यांत स्वकालीन नानाविध बौद्धिक प्रभावांचें हुबेहुब प्रतिबिंब वठलें आहे, अशा लोकांचा विशिष्ट गुण होय. अजूनपर्यंत बराच काळ जें एकलकोंडें राहिलें आहे व ज्यांत भोळसटपणा भरला आहे, अशा एकाद्या राष्ट्राचा, आगगाड्या सुरू करून, मुद्रणस्वातंत्र्य देऊन, अगर उद्योगविषयक संरक्षक कायदे रद्द करून, युरोपच्या मानवी सुधारणेच्या सामान्य ओघाशीं संबंध जोडून दिला, तर त्याच्या अंगीं तुम्हीं सदरहू विचारसरणीचें बीज बिनचूक घातलें म्हणून समजा.

## बौद्धिक प्रगतीशीं अद्भुत चमत्कारांचें प्रमाण व्यस्त असतें.

ही विचारसरणी म्हणजे कांहीं एकाद्या अपवादक संघटनेनें अगर एकाद्या आमच्या शतकांतल्या वाङ्मयाच्या विशिष्ट क्षणैकजीवि धाटीनें उपस्थित झालेली तेरड्याच्या रंगासारखी क्षणभंगुर चळवळ नव्हे; हें पण उघड आहे. जिकडे तिकडे इतिहासावरून हेंच दिसतें कीं, राष्ट्रांच्या बौद्धिक प्रगतीची पायरी जसजशी उंच जाते तसतसे अद्भुत चमत्कारवृत्तान्त विरळ विरळ आढळतात; व अखेर ते साफ नाहींसे होतात ( ६ ). ही गोष्ट जुन्या विचारसरणीच्या उतरत्या कळेची स्पष्ट निदर्शक आहे; कारण हे अद्भुत चमत्कार ज्यांना खरे वाटतात, ते त्यांच्या अभावाचें कारण अश्रद्धालुत्वाची वाढ म्हणून सांगतात. व ज्यांना ते भरंवशालायक वाटत नाहींत ते प्रतिपादितात कीं, कल्पनाशक्तीला लागलेल्या विशिष्ट वळणाचें व मध्ययुगांतल्या विचारसरणीनें सुचलेल्या व उपस्थित झालेल्या विशिष्ट प्रकारच्या दृष्टिबंधाचें ते फळ होत. पर्यायानें बोलावयाचें तर एका वर्गाच्या मतें विचाराचें जुनें वळण, ही अद्भुत चमत्कारांच्या रोपाला अनुकूल जमीन व दुसऱ्या वर्गाच्या मतें जुनें वळण हें त्यांचें उत्पादक कारण होय; व म्हणूनच अद्भुत कथानकांच्या अभावाबरोबर श्रद्धेय मतांचा उघड पालट झाल्याचें दिसणार नाहीं तर त्या विचाराच्या वळणाचा ऱ्हास झाल्यासारखेंच होय.

## अंधश्रद्धेविषयीं तिटकाऱ्याचें मानवी सुधारणेशीं व ज्ञानप्रसाराशीं समप्रमाण असतें.

जो कोणी सरळ मनाचा माणूस या विषयाचें भारदस्तपणें निरीक्षण करील, त्याला या वरील विधानांबद्दल शंका घेतां येईलसें क्वचितच वाटतें. तीं जर तशीं खरीं असतील तर त्यांवरून फार महत्त्वाचा सर्वसामान्य सिद्धांत प्रस्थापित होतो व तो टाळतां येत नाहीं. या विधानांवरून दिसतें कीं, अद्भुत वृत्तान्त भरंवशालायक मानण्याचा लोकांचा कंटाळा मानवी सुधारणेच्या प्रगतीशीं व ज्ञानाच्या प्रसाराशीं समप्रमाणांत असतो. धूमकेतु, ग्रहणें वगैरे पूर्वीं जीं अमानुष कर्तबगारीचीं फळें मानलीं जात, तसल्या चमत्कारांचा भौतिक शास्त्रांच्या आधारानें उलगडा करतां येऊं लागला; एवढेंच केवळ नव्हे तर, संत, पूज्य विभूतींचे अवशेष, मूर्ति, एतत्संबंधीं जे

अद्भुत चमत्कार होतात म्हणून सांगतात, त्यांवरचा भाव सनातन पंथी देशांत तरी उडालेलाच आढळतो; आणि पुन्हा भौतिक शास्त्रामुळें यांचा कांहीं ज्यास्त उलगडा पडूं लागला म्हणावें तर तसेंही नाहीं; किंवा त्यांत कांहीं असंभाव्यतेचें बीज आढळलें म्हणावें तर तसेंही नाहीं; फक्त ते अद्भूतचमत्कार आहेत एवढेंच काय तें. सनातनपंथाला मानवी सुधारणेची मदत न होतां ती प्रतिरोधीपंथाला झाली आहे इतकेंच नव्हे तर, अर्वाचीन चमत्कारांच्या पूर्वग्रहनिश्चित असंभाव्यतेची कल्पना साफ नष्ट करण्याकडे जरी सनातनपंथांतील सर्व धर्मज्ञानाचा सारखा कल असतो व हे चमत्कार आपल्याच पंथांत होतात असें म्हणतात, एवढ्यानेंच जरी त्यांकडे त्यांचा विलक्षण ओढा रहातो; तरी हें नवें वळण खुद्द सनातनपंथी लोकांत पहावयाला मिळतें. आणखी चिकित्सेंशिवाय आंधळ्यासारखी ठेवलेली जी श्रद्धा तिचा तिटकारा वाढत जात आहे; एवढेंच केवळ नव्हे तर, चमत्कार म्हणून मानलेल्या गोष्टींच्या अंगीकारार्थ लोकांच्या मनांची तयारी करण्यास्तव होती नव्हती तेवढी ताकद खर्चणाऱ्याच धर्मपंथांच्या घटकांनीं त्या गोष्टींवर विचार न करतां ताबडतोब अश्रद्धेयतेचा शेरा ठोकून त्यांची वाट लाविली आहे. तात्पर्य काय कीं, मानवी सुधारणेच्या प्रगतीनें विचाराला एक प्रकारचें वळण व रूप अवश्यमेव येतें. त्यामुळें चमत्कारांच्या वृत्तांताचा साहजिकपणें व लगेच तिटकारा येऊन मनुष्यें त्यापासून पराङ्मुख होतात. त्यांना वाटतें कीं, जणूं कांहीं ते वृतान्त मुळीं अश्रद्धेयच व मग तीं त्याविषयीं निश्चित प्रमाणें पहात बसत नाहींत व हटवादी धर्मोपदेशाला जुमानीत नाहींत; हें मनाला लागणारें वळण चांगलें कीं वाईट हा वाद यावेळीं नको. जेथें जेथें म्हणून मानवी सुधारणेचा उत्कर्ष होत असतो, तेथें तेथें हें वळण लागतें ही गोष्ट निर्विवाद वाटते.

### वर्तमानकाळांतल्याहून भूतकाळच्या चमत्काराविषयीं आदरपूर्वक विश्वास असण्याचें कारण.

(क० ३) तथापि भूतकाळच्या पेक्षां वर्तमानकाळच्या चमत्कारांवर या गोष्टीचा परिणाम ज्यास्त जोरानें होतो हें लक्षांत येईल. आपल्याच काळांत घडणाऱ्या चमत्कारांची हकीगत ऐकतांक्षणींच जे ती फेंटाळून लावतील तेच सनातन पंथी लोक तसलाच एकादा चमत्कार मध्य-युगां-

तल्या साधूनें केला म्हणून सांगितलेला असल्यास त्याबद्दल मोठ्या आदरानें बोलतील; व या फरकाचें कारण शोधून काढणेंही अगदीं कठीण नाहीं. आपल्या डोळ्यांदेखत घडणाऱ्या गोष्टींची प्रतीति जितकी पूर्ण हुबेहुबपणें येते, तितकी जुनाट गतकालीं घडलेल्या गोष्टींची येत नाहीं. दोघांचा ठसा सारखाच तीव्र जोरदार व प्रत्यय देणारा नसतो व दोघांचा लेखाही एकाच मापानें होत नसतो. गतकाळच्या गोष्टी आम्हांपर्यंत येतां येतां त्यांना दंतकथांच्या संप्रदायाचा वेष मिळतो, कालावधीच्या धुक्यामुळें त्या अंधुक दिसतात व त्यांची एकंदर सभोंवतालची स्थिति सध्यांच्या गोष्टींच्या परिस्थितीहून इतकी वेगळी असते कीं, कल्पकतेचें वक्रीभवन होतें; व तदुद्भूत चित्रें अंधुक व वेडींविद्रीं दिसूं लागतात. खेरीज हे गतकाळच्या चमत्कारांचे पुष्कळसे वृत्तान्त सनातनपंथी मनुष्याच्या बालवयांतल्या गोष्टींशीं अगदीं संलग्न झालेले असतात. त्यांच्यावरची श्रद्धा अजून अपक्क असलेल्या मनांत भरविलेली असते; व येणप्रमाणें पक्क व निर्ग्रहात्मक निर्णायक शक्तीशीं त्यांची सांगड कधींच पडलेली नसते. म्हणून आपल्याला आढळून येतें कीं, विचाराच्या ह्या सर्वसाधारण वळणाचा प्रभाव निःसंशय कांहींसा पूर्वदर्शी असला, तरी हेंच कांहीं त्यांचें पहिल्या प्रतीचें व अत्यंत बलवान् कार्य नव्हे.

### प्रतिरोधिपंथी देशांत हा पालट तितका ठळक न दिसण्याचें कारण.

(क० ४) ज्याचा आपण विचार करीत आहों, तो पालट जसा सनातनपंथी देशांत पूर्ण दिसतो, तसा प्रतिरोधिपंथी देशांत दिसत नाहीं; कारण विचाराचें जुनें वळण जेव्हां बरेंच ऱ्हास पावलें होतें, तेव्हां मुळीं प्रतिरोधिपंथाचा आरंभ झाला. धर्मसुधारणाच मुळीं नव्या वळणानें जन्मास आली व नवें वळणच तिला व्यापून राहिलें आहे. म्हणूनच तिच्या नायकांस स्वस्थितिवशतेमुळें स्वकालीन अद्भुत हकीकतींचा अव्हेर अवश्य करावा लागला. जे अर्चनविधि धर्मसुधारकांनीं भोळसटपणा, मूर्तिपूजा व पांखड यांनीं दूषित म्हणून एकदां ठरविले, त्यांचीच सर्वशक्तिमान् प्रभूनें आपल्या कृपाप्रसादाचे विशिष्ट मार्ग म्हणून योजना केली व त्यासच असंख्य अद्भुत चमत्कारांनीं वैभवाप्रत चढविलें; असें कबूल करणें म्हणजे आपल्याच उलट आपण बोलण्यासारखें होतें. म्हणूनच

आपणाला आढळतें कीं, ( चेटकाच्या संबंधाशिवाय इतर ) अर्वाचीन अद्भुत चमत्कारांचा प्रतिरोधिपंथांत प्रथमपासूनच तिटकारा व त्याविषयीं अश्रद्धा असे; व या त्यांच्या दोन वृत्तींचा त्यांच्या विरुद्ध पक्षांतल्या लोकांच्या अंगच्या दिक्कतरहित श्रद्धाळूपणाशीं ठळक विरोध दिसतो. प्रतिरोधी पंथाच्या पोटशाखांच्या इतिहासांत अद्भुत चमत्कार म्हणून मानलेल्या कांहीं गोष्टी दिसतात हें खरें; पण असें दिसतें कीं, तें आवेश अगर अज्ञान यांचें फळ होय व त्यांत कांहीं थोडेसे उघड उघड ठकबाजीचेही प्रकार होते. याचें उदाहरण म्हणजे मेरी-राणीच्या कारकीर्दींत उपासना मूर्ति-पूजक आहे, असें जाहिर करणारा भिंतींतून निघणारा सर्वप्रसिद्ध आवाज; तसेंच मेरी-राणीच्या नंतरच्या कारकीर्दीत दब्लिनच्या क्रिस्त नामक देवालयांतल्या वधस्तंभानें आयर्लंद देशांत प्रतिरोधिपंथाची उपासनापद्धति सुरू केली गेल्याकारणानें ढाळलेले रक्ताचे अश्रु. तथापि एकंदरीनें पाहतां प्रतिरोधिपंथ अशा प्रकारच्या ठकबाजीच्या गोष्टींतून पार मोकळा होता; व त्या पंथांतील धुरीणांची बहुधा एकवाक्यता असे कीं, जगांत ख्रिस्ती धर्माचें वर्चस्व निश्चितपणें स्थापित झाल्याबरोबर अद्भुत चमत्कार बंद पडले. धर्मपित्यांच्या लेखांत चमत्कारांचे वृत्तान्त ओतप्रोत भरलेले आहेत; व या धर्मपित्यांना सुधारकांमध्यें व विशेषतः इंग्लंदांतल्या सुधारकांमध्यें मोठा मान आहे. म्हणून प्रख्यात धर्मपिते सर्व नाहींसे झाले तो काळ अद्भुतप्रधान व अद्भुतविहीन युगांचा संधिकाळ मानतात. राजशासनावर ख्रिस्ती धर्माचा पूर्ण ताबा झाल्यानंतर थोड्याच काळानें ही गोष्ट झाली; त्यामुळें या मताच्या पुष्ट्यर्थ पुष्कळ योग्य प्रमाणें दाखवितां आलीं; व हें मत निदान इंग्लंदांत तरी सार्वत्रिक आहे, असें दिसतें.

### लाकच्या पत्रांतील धर्मपित्यांच्या चमत्कारांविषयींचा मुद्दा.

( क० ५ ) जेव्हां लाक सहिष्णुतेवरचीं आपलीं विख्यात पत्रें लिहीत होता, तेव्हां कोण्या एका प्रमाणभूत मुद्यामुळें त्याला धर्मपित्यांच्या चमत्कारांच्या विचाराकडे वळावें लागलें. तो मुद्दा त्यावेळीं फार जोरदार समजला जाई; पण हल्लीं तोच मुद्दा आमच्या मतप्रांताहून निराळ्या प्रांतांतला असल्यामुळें कुचकामाचा व गर्ह्य मानला जाईल. त्यावेळीं असा वाद करीत कीं, साधारण स्थितींत ख्रिस्ती धर्माच्या कल्याणासाठीं छळाची त्याला पुष्टि मिळणें अगदीं अवश्य होतें, म्हणजे राजशासनानें

ख्रिस्ती धर्माच्या विरोध्यांस जमीनदोस्त करणें जरूर होतें. राजशासनाचा पाठिंबा जोंपर्यंत ख्रिस्ती धर्मास मिळालेला नव्हता, तोंपर्यंत तो धर्म अनिर्बंध स्थितींत होता. तत्पक्षपातास्तव सृष्टीचे नियमही तात्पुरते रद्द झाले; व एकामागून एक चमत्कार घडून त्याला यशःप्राप्ति झाली. तथापि कान्स्तंतैन बादशहानें ख्रिस्ती धर्म अंगीकारल्यामुळें राजशासनाची धर्माला जोड लाधल्यावर अमानुषतेच्या युगाची समाप्ति झाली. छळाचें शस्त्र हातीं आल्यावर चमत्काराचें शस्त्र काढून घेतलें गेलें. धर्म व राजशासन यांचा मिलाफ झाला, तेव्हां धर्माची अनिर्बंध स्थिति जाऊन त्याला नियमबद्ध व श्रेष्ठतम स्थिति प्राप्त झाली; व त्यामुळें त्याला विशिष्ट साहाय्याची आवश्यकता राहिली नाहीं ( ७ ).

**लाकनें आपल्या मुद्यास सर ऐझाक न्यूतनचें अनुमोदन घेतलें असावें.**

( क० ६ ) आक्सफर्डच्या धर्मज्ञानपंडितांनीं पुढें केलेल्या या मुद्यानें लाक कच खाण्यासारखा नव्हता; पण त्यामुळें उपस्थित होणारा ऐतिहासिक प्रश्न लाकसारख्याचीही कुशाग्र व दुर्दान्त बुद्धि खुंटविणारा वाटला. ज्याला कशाचीही पुष्टि नाहीं अशा नुसत्या शब्दप्रमाणापुढें मान वांकविण्याची लाकच्या बुद्धीला बिलकूल संवय नव्हती; व यावेळीं तर ती त्यांची दुर्दान्त बुद्धि धार्मिक संप्रदायाच्या सैन्यभाराशीं सहिष्णुतेच्या बाजूनें सामना करण्यांत गुंतली होती. सर ऐझाक न्यूतनचें लाकनें अनुमोदन घेतलें होतें असें दिसतें. कारण न्यूतनच्या एका पत्रांत या विषयीं कांहींसा धरसोडीचा उल्लेख आढळतो. न्यूतननें लिहिलें आहे कीं, 'दोन तीनशें वर्षेंपर्यंत ख्रिस्ती धर्मांत भरंवशालायक चमत्कार होत होते. तेव्हांपासून ग्रेगोरिअस थोम्यातुर्गसचें नांव झालें. हें सामर्थ्य अंगीं असलेल्या अगदीं अलीकडच्या गृहस्थांपैकीं तो एक होता. पण चमत्कारांची संख्या व ते केव्हां केव्हां घडले, हें मला बरोबर सांगतां येत नाहीं. त्या काळचा इतिहास फारच अपुरता आहे.' ( ८ ) लाकनें हें मत अंगीकारलेलें दिसत नाहीं. आक्सफर्डच्या धर्मज्ञानपंडितांना उत्तर देतांना लाकनें एक संस्मरणीय लेख लिहिला आहे. त्या लेखाकडे योग्य तितक्या आदरानें त्या वेळीं कोणाचें लक्ष गेलें नाहीं हें उघड दिसतें. पण बराच काळ गेल्यानंतर या वादविवादांत तो लेख अगदीं ठळक जागा पावला. लाकनें लिहिलें आहे कीं, "धर्माच्या इतिहासकारांनीं

सांगितलेल्या चमत्कारांवर जो कोणी आपल्या भावाचा अगर विचारपद्धतीचा पाया घालील, त्याला एक तर प्रेषितांच्या काळाशींच थांबावें लागेल; नाहीं तर कान्स्तंतैनच्या काळाशीं थांबतां येणार नाहीं, हें उघड आहे; असें मला वाटतें. कां तर कान्स्तंतैननंतरच्या लेखकांनीं आपापल्या काळच्या अद्भूत चमत्कारांचा उल्लेख चौथ्या शतकापूर्वीच्या धर्मपित्यांहून खात्रीनें कमी केला आहे असें नाहीं व या कान्स्तंतैननंतरच्या लेखकांचा शब्द इतर बाबतींत आपण बिलकूल शंका न घेतां स्वीकारण्यास तयार असतों. आणखी दुसऱ्या आणि तिसऱ्या शतकांतले बहुतेक चमत्कार चौथ्या शतकांतल्या लेखकांच्या पतीवरच आपण खरे समजतों (९)."

## मिद्ल्तनच्या ग्रंथाच्या वेळची स्थिति.

( क० ७ ) यानंतर धर्मपित्यांच्या अद्भुत चमत्कारांचा विषय जो घेरत पडलासा दिसतो तो मिदल्तनच्या सुप्रसिद्ध ग्रंथानें लोकांचें लक्ष त्याकडे ओढलें तोंपर्यंत उठला नाहीं. ' अनिर्बंध शोध ' ह्या ग्रंथांत अलौकिक गुण होते; त्यांत वाक्चातुर्य अलोट, धिट्टाई जबर, व विवादकौशल्य विपुल दिसतें; आणि त्याच्या गुणाला योग्य असा त्याच्याशीं सामनाच झाला नाहीं, या गोष्टी क्वचित्च कोणी नाकबूल करील. पण या ग्रंथाच्या यशाचें रहस्य कळण्यास वरील गोष्टींशिवाय जेव्हां तो प्रकाशांत आला तेव्हांचा साधारण विचारौघ आपण ध्यानांत आणला पाहिजे. लाक व मिदल्तन यांच्या दर्म्यान जो अर्ध्या शतकाचा काळ लोटला त्यांत पुष्कळ कारणें अशीं घडलीं कीं, त्याच्या प्रभावानें इंग्लंदच्या धर्मज्ञानाचें स्वरूप फारच पालटलें. हीं कारणें कोणतीं ही चिकित्सा फारच कंटाळवाणी होईल. तथापि स्वतः लाकनें आपल्या तत्त्वपद्धतीनें या कारणांत मोठी भर घातली हें सांगितलें पाहिजे. आरंभींच्या धर्मपित्यांची गतशतकांतील धर्माधिकाऱ्यांवर जी मोहिनी व माया पसरली होती ती अजिबात नाहींशी झाली. धर्मपित्यांचे ग्रंथ भराभर कोनाकोपऱ्यांत पडूं लागले. जे कोणी थोडे लोक त्या ग्रंथांचें अवलोकन करीत त्यांवर त्या ग्रंथांतील विचारांचा पगडा क्वचित्च बसे. खरोखर धर्मपित्यांची विचारसरणी कोणीकडे व अठराव्या शतकांतली निस्तेज, नीरस, विचक्षणा करणारी धर्मज्ञानपद्धति कोणीकडे !

## अठराव्या शतकांतील धर्मज्ञानपद्धतीचें काय.

या धर्मज्ञानपद्धतीनें ख्रिस्ती धर्माला पुरपालांचा (पोलिसांचा आदरणीय साहायकच असें ठरविलें; या धर्मज्ञानपद्धतीनें ख्रिस्ती धर्माला समाजांतील परस्पर स्नेह व आदर उत्पन्न करणारें तत्त्वच ठरविलें; पण त्या पद्धतीनें धर्मांतली सर्व कळकळ फार काळजीपूर्वक हद्दपार केली, त्यांतील सर्व गूढ गोष्टींवर पांघरूण घातलें अगर त्या गोष्टींना सौम्यत्व आणलें, आणि खरोखर त्याला नीतितत्त्वविवेचनाची प्रमाणभूत पद्धति बनविलें. जें जें म्हणून विचाराविरुद्ध अगर विलक्षण दिसेल त्याची इतकी तीव्र भीति धर्माधिकाऱ्यांना वाटली असा दुसरा काळ कधींही आला नाहीं. मागल्या शतकांत ज्या विचारौघानें चेटकावरचा विश्वास उडविला होता, तोच विचारौघ यांच्या लेखांत जोरानें शिरला. त्यांनीं जें जें कांहीं लिहिलें त्याची मुख्य खूण म्हणजे व्यवहारचातुर्य होय. उदार वृत्ति निरपेक्ष सद्गुण, आदरशील भाव, उदात्त कल्पना हीं सर्व नाहींशीं झालीं होतीं; ख्रिस्ती धर्म म्हणजे सर्वतोपरी मानवी विचारशक्तींशीं सुसंगत आहे असें दर्शविण्याच्या, व विवेचक शक्तीचा अवमान करणारी अगर मनोवृत्तींना धक्का देणारी हरएक बाब दृष्टीआड किंवा हद्दपार करण्याच्या, खटपटींत जो तो धर्मोपदेशक गुंतलेला असे; व धर्माचा जन्म—समाजाला सुसंबद्ध व उन्नत करण्यास, संसारांतले सर्व संबंध लोभनीय करण्यास, मानवी विमृश्यकारितेच्या आज्ञांना अधिकारयुक्त पावित्र्य आणण्यास, व त्या मानवी विमृश्यकारितेचें क्षितिज विस्तृत करून मरणोत्तरप्रदेशांचा त्यांत समावेश करून देण्यास,—झालेला आहे; असें दाखविण्याची ज्या त्या धर्मोपदेशकाची खटपट असे. मनःस्थिति अशी झाल्याचा परिणाम असा घडला कीं, धर्मपित्यांच्या चमत्कारांचा जसा अंगीकार होई तसा ख्रिस्ती धर्माच्या सत्यतेच्या पुराव्यांत सामिल नसलेल्या इतर चमत्कारांचा अंगीकार न होतां तद्विषयक पराङ्मुखता वाढत गेली; व ज्यांच्या साक्षीवर त्यांची मदार असे, त्या लेखकांविषयीं आदर कमी होत गेला.

## धर्मपित्यांच्याच लेखांतून फार चमत्कार वर्णिलेले आढळतात.

(क० ८) मिदल्तननें धर्मपित्यांच्या चमत्कारांवर जो हल्ला केला व या विषयाचें महत्त्व व अडचणी दोन्ही स्पष्ट निदर्शनास आणलीं तें सर्व

विचारौघाच्या या स्थितींत होय. धर्मपित्यांच्या लेखांत चमत्कारांचे अगणित वृत्तान्त आहेत. हे चमत्कार आपल्या वेळीं आपल्या नजरेसमोर घडले असें त्यांनीं लिहून ठेविलें आहे. या चमत्कारांचें स्वरूप असें आहे व ते अशा रीतीनें कथन केले आहेत कीं, त्यांवरून एक तर ते खरोखर घडले असावेत; नाहीं तर, धर्मपित्यांनीं मुद्दाम हातचलाखीनें ते आपल्या वाचकांच्या श्रद्धाळूपणाच्या गळीं बांधले असावेत; असा तर्क टाळतां येणें क्वचित्च शक्य दिसतें. पहिल्या शतकांतले जे लेख आज उपलब्ध आहेत, ते फारच थोडे आहेत; व ते बहुधा सर्वच लहान लहान पत्रात्मक आहेत. तीं पत्रें लिहिण्यांतला उद्देश इतिहासलेखन अगर वादविवाद हा नसून, केवळ भाविकजनांना उत्तेजन अगर ज्ञान प्राप्त व्हावें हा होता. पण या पहिल्या शतकांतही संत पोलिकार्प याच्या धर्मवीरत्वाचा वृत्तान्त म्हणजे केवळ चमत्कारमय आहे. दुसऱ्या शतकाच्या अगदीं आरंभीं व असें म्हणतात कीं, संत जानच्या देहावसानानंतर पन्नास वर्षांच्या आंतच ज्या जस्तिन मार्तिरनें लेख लिहिले, तो आपल्या काळीं चमत्कार घडत होते असें निक्षून सांगतो; आणि या काळाच्या पुढें पुरावा अखंड व भरपूर आहे. प्रतिरोधी पंथाची कल्पना अशी आहे कीं, चमत्कार हळू हळू कमी कमी होऊं लागले व सरते शेवटीं ते साफ होत नाहींसे झाले. इतिहास सांगतो कीं, पिढ्यानुपिढ्या चमत्कारांची संख्या, प्रदेश व अलौकिकता वाढत चालली.

### धर्मेतिहासांत पहिल्या धर्मपित्यापासून आतांपर्यंत चमत्कारसामर्थ्यच निक्षून प्रतिपादिलें आहे.

‘ धर्मेतिहासकारांच्या हातून कोणत्याही गोष्टीचें विवरण किंवा प्रकाशन जितकें शक्य आहे, तितक्यापुरतेंच पाहिलें तर त्या सर्वांनीं पहिल्या धर्मपित्याच्या चमत्काराच्या उल्लेखापासून तों तहत धर्मसुधारणेपर्यंत सर्वकाळभर चमत्कारसामर्थ्य चालूच आहे; ही गोष्ट जितकी सतत, स्पष्टपणें व मतैक्यानें निक्षून सांगितलेली आहे, तितकी त्या सर्व इतिहासांत दुसरी कोणतीच गोष्ट सांगितलेली नाहीं १०).’ तेव्हां आपण जर या विषयावरील ऐतिहासिक पुराव्यावर साधारण भरंवसा ठेविला, तर आपण पहिल्या शतकापासून तों तहत माध्ययौगिक अरण्याच्या गर्द झाडीपर्यंत—न थांबतां,

खंड न पडतां, चमत्कारमार्गानें–जाऊन पोचूं; व जरूर कबूल करूं कीं, ज्यांना प्रतिरोधी पंथ सनातन पंथाच्या अत्यंत वाईट भोळसटपणाच्या गोष्टी म्हणून म्हणतो, त्या कित्येक शतकेंपर्यंत दैवी प्रसादाचे परिचित व विशिष्ट मार्ग होते. आणखी जर ऐतिहासिक विचिकित्सेचे साधारण नियम धाब्यावर बसवून चौथ्या शतकांतील लेखकांच्या विधानांवर भरंवसा ठेविला आणि नवव्या शतकांतल्या लेखकांच्या तितक्याच निक्षून केलेल्या विधानांविषयीं बेभरंवसा केला, तरसुद्धां आपणांपुढें तीच अडचण,–मात्र जरा पालटलेल्या स्वरूपांत,–उपस्थित होईल. येथें असें प्रतिपादितां येईल कीं, चौथ्या शतकांतले धर्मपिते सनातन पंथी नव्हते; पण त्यावर प्रत्युत्तर असें आहे कीं, प्रतिरोधीपंथ या नांवाचा जो सामान्य अर्थ आहे, त्या अर्थानें ते प्रतिरोधीपंथी पण नव्हते; ही अगदीं खात्री. त्यांच्यामध्यें अगदीं खात्रीनें असे पुष्कळ भजनविधि, मतें व चाली होत्या कीं, त्यांना कदाचित् प्रत्यक्ष सनातन पंथी म्हणतां येणार नाहीं; पण त्या निदान सनातन पंथाच्या केवळ सीमेवर होत्या, त्या अवश्यमेव सनातन पंथाकडे ओढल्या गेल्या व त्या मध्ययुगांतलें धर्मज्ञान उत्पन्न करणारीं बीजें व गर्भ होत. आतां, चमत्कारांचे वृत्तान्त जे अगदीं अगणित आहेत ते केवळ त्यांच्या धर्मज्ञानाच्या याच प्रकरणाच्या संबंधांत होत.

## मिदल्तनचा धर्मपित्यांच्या सत्यवक्तेपणावर हल्ला.

प्रतिरोधी पंथाच्या विचारानें पाहिलें तर या प्रश्नांतही मोठी अडचण होती. या अडचणीला तोंड देण्यास मिदल्तननें धर्मपित्यांच्या सत्यवक्तेपणावरच हल्ला केला. हा हल्ला इतका बिनतोड, वाक्चातुर्यपूर्ण व नांवाजण्यासारख्या माऱ्यानें केलेला होता कीं, सर्व इंग्लंद देश लवकरच या वादानें दणाणून गेला. त्यानें असें प्रतिपादिलें कीं, चौथ्या शतकांतल्या धार्मिक पुढाऱ्यांनीं केवळ पावित्र्यातिरेकाच्या आकांक्षांच्याच साफ उलट, नव्हत, तर अत्यंत साधारण प्रामाणिकपणाच्या आज्ञांच्याही साफ उलट अशीं तत्त्वें स्वीकारलीं; त्यांची वाखाणणी केली व तदनुरोधानें ते नित्य वागलेही त्यानें दाखवून दिलें कीं, ते लबाड्यांची वाहवा करीत; ते सररहा कपटलेख करीत; इतिहासांत ढोबळ व नित्यशः लबाड्या घुसडून देत. धर्मासाठीं लबाड्या करण्याची पद्धत त्यांनीं पूर्णपणें अंगीकारली; व लोकांची भक्ति चेतविण्याकडे त्या पद्धतीचा सतत उपयोग केला. ज्यांच्या

मुखाभोंवतीं आज शतकेंच्या शतकें साधुत्वदर्शक तेजोवलय, प्रभा यत्किंचित् मंद न होतां, स्फुरत राहिलें आहे, ज्या थोर धर्मपित्यांनीं युरोपच्या धर्मज्ञानपद्धति तयार केल्या आहेत, जे इतक्या वादांत निर्णय करणारे पंच झाले आहेत व जे इतक्या पंथांच्या निष्ठेचें स्थान बनून राहिले आहेत, अशा पुरुषांवर असले आरोप मिदल्तननें आणले. त्यानें दिलेला पुरावा प्रत्यक्षतया चौथ्या शतकांतल्या लेखकांस लागू पडत होता; तथापि त्यानें तत्पूर्वींच्या काळासंबंधानेंही तेंच प्रतिपादन चालविलें. त्याचें म्हणणें असें कीं, "ह्या चौथ्या शतकांतल्या मोठमोठ्या धर्मपित्यांनीं स्वतः बनावट केलेल्या अगर निदान बनावट म्हणून माहीत असलेल्या गोष्टी खऱ्या म्हणून विस्मयकारक खात्रीनें व भरंवशानें सांगितल्या; याचा विचार करून पाहिलें तर साहजिक संशय येतो कीं, पवित्र सत्याचा इतक्या धिट्टाईनें एकाएकीं उपमर्द व्हावयाचा नाहीं व तो इतका सर्वसाधारण व्हावयाचा नाहीं; तर रूढीनें, पूर्वकालच्या उदाहरणानें व लोकसमूहाच्या भोळसट-पणाला व श्रद्धाळूपणाला काय खपेल याच्या फार दिवसांच्या अनुभवानें हळूहळू चढतचढत त्याचें मान या उंचीला चढलें असलें पाहिजे (११)."

या हल्ल्यानें धर्मपित्यांच्या मूळच्या महत्त्वास धक्का बसला.

अशा प्रकारच्या हल्ल्यानें अत्यंत गंभीर व प्रचंड प्रश्न उपस्थित झाले; हें उघड आहे. केवळ सनातन पंथांतच नव्हे, तर धर्मसुधारणेच्या समर्थ वीरांजवळही जिकडे तिकडे अजूनपर्यंत जी धर्मपित्यांची किंमत होती तिला धक्का बसला. विशेषेंकरून इंग्लंदांतल्या धर्मसंस्थेंत धर्म-पित्यांचीं वचनें जवळ जवळ 'आविर्भूत ज्योतिष' लेखकांच्या 'व्यवहारां' इतकीं प्रमाणभूत मानतात. इंग्लंदांतील धर्मसुधारणेचें पहिलें धर्मज्ञानसंबंधीं मोठें पुस्तक म्हणजे 'धि अपालजी (प्रतिवाद) हें होय. या पुस्तकांत ज्युएलनें धर्मसुधारकांच्या समर्थनार्थ धर्मपित्यांच्या विचारांना सोडून सनातनपंथी किती दूर गेले आहेत हें दाखविलें आहे. सतराव्या शतकांतल्या थोरथोर धर्माधिकाऱ्यांचा नेहमीं बाणा असे कीं, धर्म-पित्यांच्या लेखांचा आपण खोल विचार केला आहे, त्यांचे व आपले विचार तंतोतंत जुळतात, व त्यांचीं वचनें अत्यंत एकनिष्ठेनें आपण प्रमाण मानतों. त्यांचें वचन जरी एकाएकी असलें तरी, तें वादविवादांत अगदीं निर्णायक नव्हे तरी, फार वजनाचें मानलें जाई. पण मिदल्तनचा अंदाज

बरोबर असेल तर खात्रीनें हा विचाराचा ओघ फुकट, अगदीं कुच-कामाचा होय. जर धर्मपित्यांचा श्रद्धाळूपणा खरोखरच अत्यंत अमर्याद व त्यांचा खरेपणा अतिशय ढिला असेल; जर हटवादी मतांच्या महत्त्वाची जाणीव प्रामाणिकपणाच्या जाणिवेहून त्यांच्या मनांत अधिक असेल; तर त्यांना हा अलौकिक मान देणें, हा मूर्खपणा होय. तरीसुद्धां त्यांच्या कळकळीबद्दल शंकाही घ्यावयास नको; अत्यंत उदात्त शौर्याचे पुतळे म्हणून ते मानास पात्र होऊं शकतील; त्यांच्या काळच्या श्रद्धाळूपणाचे साक्षीदार म्हणून त्यांचीं नांवें सांगतां येतील; तसेंच त्यांच्या काळच्या बुद्धीच्या कलांचे निदर्शक म्हणून त्यांना म्हणतां येईल. पण त्यांच्याविषयींची वरिष्ठ प्रामाण्यबुद्धि साफ नाहींशी झाली.

## नवे महत्त्वाचे प्रश्न.

तथापि या सर्वांच्याही पलीकडचे दुसरे कांहीं प्रश्न सूचित झाले, आणि कदाचित् हे प्रश्न ज्यास्त गंभीर स्वरूपाचेही होते. सर्व धर्मेतिहासकारांची एकजुटीची व बिनपडद्याची साक्ष तरी कोणत्या परिस्थितींत नामंजूर करण्याची मोकळीक होती ? त्यांच्या श्रद्धाळूपणाची व खरेपणाची मोजदाद तरी कोणत्या मापानें करावयाची ? आणखी चमत्कारांच्या पूर्वग्रहमूलक असंभाव्यतेचें अंशमान तरी किती ? खोट्यापासून खरें निवडून काढण्याची कसोटी तरी कोणाची ? व ते चमत्कार खरे आहेत असें सिद्ध करून दाखविण्यास बस्स होईल इतका पुरावा म्हणजे तरी तो कोणता ?

( क० ९ ) या महाधर्मपंडितानें इ० स० १७४८ त जे मोठे प्रश्न उपस्थित केले व इंग्लंदांतील अत्यंत समर्थ शोधकांचें लक्ष्य कित्येक वर्षें वेधण्यास जे पुरेसे झाले ते प्रश्न हे होत. धर्माधिकारबाह्य लोकांत मिद-ल्तनच्या ग्रंथाचा फारच आदर झाला.

## मिदल्तनच्या खंडनार्थ आक्सफर्द विद्यापीठानें कंबर बांधली.

धर्मोपदेशकांत या ग्रंथाच्या जहाल, बिनतोड व संदिग्धमतित्वाच्या स्वरूपामुळें साहजिकपणें फार भीति उत्पन्न झाली; व आक्सफर्दच्या विद्यापीठानें खंडनार्थ कंबर बांधली; पण त्याकाळची एक विचित्र खूण अशी कीं, चर्च व दाद्वेल यांहून ज्यास्त मगदुराचे मंडनकार या धर्मपित्यांना मिळाले नाहींत. गिबन हा या वेळीं फार

तरुण होता, व अगोदरच तो बोस्वेतच्या प्रतिपादनांत गुरफटून गेला होता. त्याची या वादविवादांत प्रतिरोधी पंथावरची अवशिष्ट निष्ठा साफ उडाली. तो म्हणतो कीं, "मिदल्तनचा निर्णय या वेळीं माझ्यानें मान्य करवत नाहीं; सनातन पंथाचीं मुख्य तत्त्वें धर्मांत प्रविष्ट झाल्यावरही चांगला विश्वास ठेवण्यास पात्र असे चमत्कार धर्मसंस्थेंत होत राहिल्याचा पुरावा मला अनिवार्य वाटतो." यास्तव त्यानें तीं तत्त्वें अंगीकारलीं व पदवी न घेतांच त्यानें विद्यापीठ सोडलें. ह्यूमनें या विषयाचें मंथन तत्त्वज्ञानदृष्ट्या केलें. ऐतिहासिक पुरावा व चमत्कारांचा वृत्तान्त यांचा परस्पर संबंध काय, चमत्कारांचा खरेपणा व इतिहासकारांचा खोटेपणा यांची परस्पर सापेक्ष असंभाव्यता किती, हें ठरविणारें एक सामान्य तत्त्व बांधण्याचा त्यानें प्रयत्न केला; व त्याचें फळ म्हणजे चमत्कारांवरचा त्याचा निबंध होय (१२). लाइतफूत, वेब्स्तर व सेम्लर यांची एक जुनी कल्पना पुढें आणून, व या बाबतींत जर्मनींतल्या कार्यकारणवादाच्या ओघाचें अगोदरच स्वरूप दाखवून धर्मशास्त्रांतल्या भुतानें पछाडलेल्यांसंबंधीं हकीकतींचा उलगडा अपस्माराच्या साधारण गोष्टींनीं करण्याचा फार्मरनें प्रयत्न केला ( १३ ). बार्बर्तन, दग्लस, व बहुधा बहुतेक थोरथोर धर्मोपदेशक धर्मपित्यांच्या चमत्कारांची गोष्ट सोडून देऊन शुभवर्तमान गाजविणाऱ्या धर्मशास्त्रकारांनीं उल्लेख केलेल्या चमत्कारांचें विलक्षण स्वरूप व तत्संबंधीं पुरावा प्रस्थापित करण्याच्या कामीं लागले.

## आक्सफर्डच्या विद्यापीठाचें कार्य.

( क० १० ) या विचारसरणीचा अंगीकार सामान्येंकरून झाल्यामुळें चमत्कारांच्या इतिहासाला एक नवीन स्वरूप प्राप्त झालें असें म्हणतां येईल.

( क० ११ ) इंग्रजांच्या बुद्धीनें धर्मज्ञानसंबंधीं प्रगतीच्या रस्त्यावर जें जें महत्त्वाचें पाऊल टाकलें तें तें आक्सफर्डच्या विद्यापीठानें कळकळीनें व हट्टानें केलेल्या विरोधास धाब्यावर बसवून टाकिलें; ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी म्हणून पुष्कळदां उल्लेखिली जाते. मिदल्तनच्या वादांत आक्सफर्डच्या विद्यापीठानें जी वृत्ति स्वीकारली तीच मागल्या शतकांतल्या दोन महत्त्वाच्या प्रश्नांसंबंधीं त्यानें स्वीकारली होती. क्रियाशून्य परतंत्रतेच्या उलट जी सामाजिक स्वतंत्रता व छळाच्या उलट जी परमतसहि-

ष्णुता या दोहोंच्या पुरस्कर्त्यांविरुद्ध आक्सफर्ड येथें कच न खाणारे समर्थ प्रतिपक्षी उभे राहिले. खुद्द आमच्याच शतकांत जेव्हां सनातनपंथी लोकांच्या राजकीय विमोचनावर व 'तेस्त आक्ता' वर ( सनातनपंथी लोकांना राज्यांतील हुद्यांच्या जागीं नेमण्याला अडथळा करणारा कायदा रद्द करण्याच्या प्रश्नावर ) माजलेल्या रणांनीं जनतेच्या मनावर राज्यव्यवहाराची धर्मांशीं फारखत करण्याचा प्रश्न येऊन आदळला; व जेव्हां ह्याच प्रश्नावर विचाराचा नवा ओघ व पूर्वपरंपरा यांमध्यें रण माजणार असें दक्षतेनें अवलोकन करणाऱ्या सर्व लोकांस उघड दिसूं लागलें; तेव्हां आक्सफर्डच्या विद्यापीठानें आपलें वजन बरेंचसें कमी झालें असलें तरी आपलें जुनें पाणी तिखटपणांत यत्किंचित्‌ही कमी झालें नाहीं; असें स्पष्टपणें निदर्शनास आणून दिलें. याहूनही अलीकडे इ० स० १८३३ त त्याच दिशेकडून फार मोठी प्रतिक्रियारूप चळवळ निघाली. तिचा रोंख उघडपणें अर्वाचीन मानवी सुधारणेनें जागजागीं उपजविलेल्या धार्मिक विचारसरणीविरुद्ध होता. या चळवळीच्या पुरस्कर्त्यांनीं या विचारसरणीचा 'ती तत्त्वतः व मुळांतच खोटी आहे' असा निषेध केला. त्यांनीं इंग्रजी धर्मज्ञानाच्या दीड शतकाच्या इतिहासाला ऱ्हासाचा इतिहास असेंच म्हटलें आहे. त्यांची अशी समजूत होती कीं, 'आविर्भूत सत्याचा त्याग करणाऱ्या वाटेला राष्ट्र लागलें आहे (१४)' व हे जोराचे शब्द त्यांच्याच थोर नायकाचे आहेत. कांहीं काळानें ती चळवळ सनातन पंथाकडे वळली; त्या वेळचा तिचा वेग व जोम लक्षांत न येणें अशक्य होतें. या चळवळीमुळें जें मार्गच्यवन झालें तसें स्तुअर्त घराण्यापासून हा वेळपर्यंत कधींच झालें नव्हतें आणि या चळवळीचा आणखी एक असा विशेष होता कीं, तिजवर कोणत्याही अधम हेतूचा बिलकूल पगडा नव्हता; पण मागील चळवळीची गोष्ट मात्र अशी नव्हती.

## चमत्कार कसे बंद पडले ?

(क० १२) या प्रकरणांत जिचा शोध चालविला आहे ती विचारसरणी विशद करणारा म्हणून या मार्गच्यवनासंबंधीं जो मुद्दा लक्ष्यांत घ्यावासा वाटतो तो हा कीं, सनातनपंथी चमत्कारांच्या विषयाला या वादांत अत्यल्प स्थान मिळालें आहे.

(क० १३) चमत्कार बंद पडले हें मत साधारणतः प्रस्थापित करण्याला आधार काय म्हणून विचारलें तर बहुधा पुढें दिल्याप्रमाणें थोडक्यांत ते आधार दाखवतां येतील असें वाटतें:-

अंत:प्रेरणा झालेला एखादा धर्मदूत कांहीं मतें प्रतिपादूं लागला व तीं दुसऱ्या कोणत्याही रीतीनें स्थापितां येत नाहींशीं झालीं, तर त्याच लोकांनीं अंगीकार करावा म्हणून चमत्कार हे ईश्वराकडून त्याला मिळालेलीं प्रत्यय उपजविणारीं अभिज्ञानपत्रेंच होत. या प्रत्ययोत्पादकांवरून असें सिद्ध होतें कीं, तो मनुष्य ढोंगी किंवा उत्कट भक्तीमुळें वेडा झालेला नव्हे; त्याचा उपदेश कारस्थानी बुद्धीचें कार्य नव्हे व अति तप्त कल्पकबुद्धीचाही तो प्रकार नव्हे. ही गोष्ट जात्याच अशी आहे कीं, ती अन्य तऱ्हेनें सिद्ध करितां आली नसती. सृष्टीच्या कृतींत प्रतिबिंबित होऊन राहिलेल्या अगर मानवी सदसद्विवेकाच्या पटावर कोरलेल्या धर्माव्यतिरिक्त एकादी धर्मपद्धति,—मानवी जातीला आविर्भूत करावयाचा त्या सर्वशक्तिमान् परमेश्वराचा हेतु असला, तर अंत:प्रेरणा करून आपल्या एखाद्या धर्मदूताच्या हातून तें काम त्याला घडवून आणावें लागतें. ईश्वराचा आपणास साक्षात्कार होऊन आविर्भूत झालेलीं मानवदर्शनातीत सत्यें मानवांस कळविण्याचें आपल्या द्वारें परमेश्वरानें योजिलें आहे, असा अभियोग जर एखादा उपदेशक करित असेल तर आपला अभियोग ज्या मार्गानें खरा करून दाखवितां येईल त्याच मार्गाचें अवलंबन करून म्हणजे अलौकिक कृत्यें करूनच तो खरा करून दाखवील अशीच अटकळ होणें उचित होय. तर मग आविर्भवनाहून चमत्कार कांहीं असंभाव्य नव्हत; कारण चमत्कारांवांचून आविर्भवन लटकें पडेल. पण अशा प्रकारें शुभवर्तमानाचे चमत्कार भिन्न आहेत हें त्याच विचारानें ठरतें. शुभवर्तमानासंबंधीं चमत्कार बोलून चालून अपवादात्मक होत; ते बिलकूल जरूर होते; नव्या धर्माची संस्थापना करण्याचा त्यांत हेतु होता; व मानवदर्शनातीत संदेश प्रस्थापित करण्याचा त्यांत उद्देश होता. सनातन पंथी चमत्कार फक्त ज्ञानार्जनाचें साधनच काय ते; दुसऱ्या तऱ्हेनें सिद्ध करितां येत नाहीं अशा एखाद्या गोष्टीकडे त्यांचा रोख नव्हता; व दृष्टीसंबंधीं नव्हे, तर श्रद्धेसंबंधीं योजिलेल्या व्यवस्थेंत ते घडले म्हणून सांगितलें जाई. याशिवाय चमत्कार हें दैवी प्रभावाचें अत्यंत आदरयुक्त भीति व ठसा उपजावणारें

प्रदर्शन म्हणून समजलें पाहिजे. चमत्कार नित्याच्या परिपाठांतले होऊं देणें म्हणजे त्यांतलें स्वारस्य नष्ट करणें नव्हे, तरी कमी करणें होय; आणि जर का लुंगे सुंगे व पोरकट चमत्कारही त्यांत सामील झाले तर चमत्कारांचा दर्जा अतिशय हलका केल्याप्रमाणें होईल. नव्या करारांतले चमत्कार नेहमीं भारदस्त व गंभीर स्वरूपाचे असत; त्यांच्यावरून कांहीं तरी आध्यात्मिक बोध मिळत असे; त्यामुळें कांहीं तरी खरा फायदा होत असे; व शिवाय चमत्कार करणाऱ्याच्या शीलाची कसोटी ही त्यांनीं ठरे. मध्ययुगांतले चमत्कार पुष्कळदां याच्या उलट म्हणजे हलकट व निरुपयोगी असून त्यांचा कांहीं ठसा उमटण्यासारखा नसे; ते नेहमीं विद्रूपतेच्या सीमेजवळ असत. कधीं कधीं तर ती सीमा ओलांडून विद्रूपतेच्या प्रांतांत जात

## चमत्कारांसंबंधीं प्रमाणांवरून निघणारीं अनुमानें.

चमत्कार बंद पडले याच्या समर्थनार्थ साधारण जीं प्रमाणें त्यांचा हा असा योग्य गोषवारा होय असें वाटतें; हीं प्रमाणें निःसंशय चांगलीं, सुसंगत व खरींशीं वाटतात पण इतकें सर्व म्हटल्यावर मग काय ? त्यांवरून काय सिद्ध होतें ? चमत्कार बंद पडले असें नव्हे; तर, ते बंद पडले असें कल्पिलें तर त्यांत दचकण्या-भिण्यासारखें कांहीं नाहीं हेंच. धर्मसंस्थेंतल्या चमत्कारांची असत्यता ज्याच्या मनाला पटली त्यानें हे विचार आपल्या निर्णयानें बैबलांतल्या हकीकतींना विरोध येत नाहीं; किंवा परमेश्वराच्या अनुसंधानांत घोटाळा किंवा विसंगति शिरलेशी होत नाहीं; हें सिद्ध करण्यास पुढं आणणं ठीक होईल. पण त्या विचारांची मजल रास्त रीतीनें जी अति अति पुढें जाऊ शकेल ती येथपर्यंतच खरोखरीच कांहीं कसोटी लागेल तर टिकाव धरण्यास त्यांत ताकद नाहीं; हें पूर्वींच सिद्ध असल्यासारखें प्रमाण म्हणून सांगतां येईल. चमत्कारांचा उद्देश अतःप्रेरणा झालेल्या देवदूतांविषयीं केवळ प्रत्ययोत्पादन हाच होय असें म्हणतात. पण इतकें म्हणून झालें तर काय ? याबद्दल कांहीं प्रमाण आहे ? का ही केवळ कल्पना आहे ? ही कल्पना खराशी व सुसंगत वाटेल. पण प्रत्यक्ष पुराव्याचा तिला बिलकूल आधार मिळालेला नाहीं. खरोखर जरा पुढें जाऊन असें म्हणतां येईल कीं, ही कल्पना तुम्हीं स्वतःच पुढें आणलेल्या गोष्टीच्या स्पष्टपणें विरुद्ध आहे. चमत्कार हे सर्व राष्ट्रांत साधारण परिपाठांतल्याच गोष्टी होत्या, असा जो प्रारंभींच्या ख्रिस्ती लोकांचा सर्वांचाच विश्वास

त्याचा पाहिजे तर अनादर करा; खिस्ती चमत्कारांचा न दचकतां अंगीकार होतो व भुतांनीं पछाडलेलीं माणसें व तीं भुतें काढणारे मांत्रिक आहेत, या गोष्टींवरून निघणारीं जीं बळकट प्रमाणें त्यांना पाहिजे तर विरोध करा; पण जुन्या करारांत असे पुष्कळ चमत्कार कथन केलेले आहेत कीं, ते तुमच्या नियमाखालीं येत नाहींत, हें तरी निदान तुम्हांस कबूल करावें लागेल.

## नवा करार व जुना करार यांतील भिन्नता.

सृष्टयुत्पादन हा चमत्कार, तसाच जलप्रलय हाही चमत्कार व सपाटीवरच्या नगरांचा विध्वंस हा सुद्धां चमत्कारच. जुन्या करारांतील चमत्कार पुष्कळ बाबतींत नव्या करारांतल्या चमत्कारांहून वेगळे आहेत; तेव्हां या दोहोंहूनही भिन्न अशा चमत्कारांचा आणखी एक वर्ग असणें अशक्य आहे का ? पण धर्माधिकाऱ्यांचे चमत्कार पुष्कळदां विद्रूप असतात; सकृद्दर्शनीं ते वेडगळ दिसतात; व अनिवार चिळस उत्पन्न करतात; असें म्हणतात. कोणत्याही प्रकारचे चमत्कार असोत त्यांवर विश्वास ठेवण्यास मनुष्यांना ज्यास्त ज्यास्त जड जाऊं लागलेल्या काळांत ही फारच भयंकर कसोटी ! जळप्रळय, साम्सनच्या लीला बोलणारा गाढव, पछाडलेलीं डुकरें, वगैरे गोष्टींसंबंधीं युरोपच्या पुष्कळ भागांत बऱ्याच काळापासून जी विचारसरणी अंगीकारलेली आहे ती माहीत असणाऱ्यांस ही फारच भयंकर कसोटी ! आणखी धर्माधिकाऱ्याच्या चमत्कारांपैकीं बरेच बैबलांत कथन केलेल्या चमत्कारांच्या पुनरावृत्तीच होत; आणि जर का या चमत्कारांत कांहीं उघड उघड ढोंगाचे प्रकार मिसळलेले दिसले, तर या हकीकती डोळ्यांत तेल घालून तपासून स्वीकाराव्या; असें म्हणण्यास सबळ कारण होईल इतकेंच. पण त्या सर्वच चमत्कारांची तिरस्काराहूनही ज्यास्त वाईट रीतीनें वाट लावण्याला ते पात्र आहेत असें समजण्याला तें कांहीं योग्य कारण खात्रीनें होत नाहीं. बैबलांत अलौकिक सामर्थ्याच्या दानाच्या लोपाबद्दल स्पष्ट किंवा ध्वनित उल्लेख नाहीं; आणि अशा सामर्थ्याच्या दानासंबंधीं जी सामान्य प्रतिश्रुति ती मुक्त प्रेषितांपुरतीच संकुचित अर्थानें घ्यावयाची असें म्हणावें, तर निदान आणखी निराळा त्याचा अर्थ बसवतां येण्यासारखा आहे. जर हे चमत्कार खरोखरच चालू राहिले असतील तर त्यांनीं झालेली

हितावह फलसिद्धि उघडकीस आणणें खात्रीनें कठिण नाहीं. ते भक्तीला आलेली ग्लानि घालवून उत्तेजित करतील; रानटी विचारशून्य लोकांत धर्मप्रसाराची खटपट करणाऱ्या प्रचारकांना त्यांचें अमूल्य साहाय्य होईल. कारण उपदिश्यमान धर्माचा अंगीकार करण्यास तयार होण्याकरितां धर्माच्या सत्यतेच्या प्रमाणांची किंमत ओळखावी लागते; ती ओळखण्यास आपल्या मनाच्या संवयीमुळें व परिस्थितीमुळें रानटी लोक बिलकुल नालायक असतात. युरोपखंडांत सुद्धां गेल्या तीनशें वर्षांच्या चर्चेचा परिणाम इतका साफ समाधानकारक झाला नाहीं कीं, प्राचीन काळच्या अनिश्चित उद्गारांहून ज्यास्त निश्चित आणखी कांहीं प्रमाणें मिळविण्याची जरूरी उरली नाहीं. हे चमत्कार सनातनपंथी म्हणून खोटे म्हणणें म्हणजे वादाचा मूळ मुद्दाच गृहीत धरणें आहे. प्रतिरोधी व सनातन पंथांमधील वादांत गुंतागुंतीच्या व पृथग्मुख प्रमाणांचा भरणा फार आहे. हजारों मनांनीं या प्रमाणांचें परिशीलन केलें आहे व पावलोपावलीं प्रतिरोधी पंथावरील त्यांची श्रद्धा बळकट झालेली त्यांना दिसून आली आहे. हजारों मतें तोच मार्ग स्वीकारून अगदीं उलट फळ पावलीं आहेत. तेव्हां प्रश्न एवढाच आहे कीं, सनातन पंथांतल्या चमत्कारांची चिकित्सा केल्यानें वादाचा निकाल लावण्यास कांहीं निश्चित निकष अथवा निदान एखादें बळकट प्रमाण निघणार नाहीं काय ?

### सनातन पंथाचीं परिच्छेदक मतें चमत्कारमयच होतीं.

सनातन पंथाचीं परिच्छेदक मतें हजारों चमत्कारांच्या मुकुटानें सुशोभित झालीं होतीं, जेथें जेथें त्याचा उदय झाला तेथें तेथें त्याच्या मस्तकाभोंवतीं दिव्य परिधी स्फुरत होता व त्याची प्रभा त्याच्या सर्व पराक्रमांवर फांकली होती ( १५ ), यांहून याच्या सत्यतेबद्दल आणखी जोरदार पुरावा तो कोणता असणार ? आपण विधान केलेल्या असंख्य चमत्कारांपैकीं एखाद्याचीही सत्यता स्थापित करण्यास तो पंथ असमर्थ होता. ह्या सर्व चमत्कारांचा भेदक टीकेच्या घणानें चूर होऊन तो दशदिशा उडून गेला, संतांची सिद्धांमध्यें गणना झाली, अर्चनाविधि ठराविक झाले, धर्मगुरूंचीं अगणित आज्ञापत्रें व धर्मोपदेशकांचीं शासनपत्रें निघालीं, असंख्य उत्सव, दिंड्या, मिरवणुकी व यात्रा वगैरे अधिकृत वाणीनें सुरू झाल्या, कधींही न घडलेल्या अगर घडल्या असल्या तर अगदीं विपर्यास

झालेल्या अशा गोष्टींनीं सर्व ख्रिस्ती धर्मांतील लोकांचें मत जोरानें व एकसारखें प्रक्षुब्ध झालें; या गोष्टींहून सनातन पंथाच्या मिथ्यत्वाबद्दल ज्यास्त निश्चित पुरावा तो काय असूं शकणार ? प्रमादपात्रत्वाच्या अतिरेकानें होणाऱ्या चुकांसाठीं सर्व सवलत ठेवूनही वरच्या कल्पनेप्रमाणें सनातन पंथाचा इतिहास म्हणजे मानवजातीच्या इतिहासांतील बहुधा अद्वितीय ढोंग दिसेल. पुनः जर तुम्ही म्हणाल कीं, इतर प्रमाणें पाहून त्या विषयावर निश्चित व बिनचूक मत बनलें; तर त्यावर प्रत्युत्तर हें कीं, या तुमच्या उत्तरानें सूचित होणारे सर्व इतर विचार बाजूला सारले, तरी सध्यां चिकित्सा चाललेल्या पत्रकपंथी चळवळीला तें तुमचें म्हणणें लागू पडत नाहीं.

## लोकांचें इंग्लंदांतील धर्मसंस्थेकडून रोमी धर्मसंस्थेकडे प्रयाण.

इंग्लंदांतील धर्मसंस्थेपासून रोमी धर्मसंस्थेकडे पुष्कळांनीं या चळवळीमुळें जें प्रयाण केलें, तें एकाएकीं अगर बिनदिक्कत केलेलें नव्हतें. उलट तें मंद, खेदजनक, दिक्कतखोर, व साशंक होतें असें प्रयाण केलल्या कांहीं इसमांनीं आपण कित्येक महिने, कित्येक वर्षें, विरुद्ध पंथांच्या दरम्यान कापत होतों, आपलीं मनें पुढें मागें हेलकावत झोंके घेत होतीं, असें वर्णन केलें आहे. असंख्य अडचणी, विरोधी तत्वें, अतिभिन्न विचारपद्धति, हरेक प्रकारच्या मिश्र व परस्परमारक वृत्ति, या सर्व गोष्टींनीं त्यांचीं मनें संशयानें पीडित केलीं व कधीं कधीं आलेल्या विरोधानें त्यांची प्रत्यक्ष विवेचकबुद्धीही बहुतेक नष्ट केली. खचित कोणालाही कल्पना करितां यईल कीं, असल्या स्थितींतल्या कोणत्याही मनुष्यांनीं नेहमीं पकड चुकविणारे, मन गांगरवणारे व प्रत्येक पालटणाऱ्या विचारसरणीचा रंग घेणारे, चंचल कल्पनातरंग आनंदानें टाकून देऊन त्यांऐवजीं ऐतिहासिक टीकेचा त्या मानानें स्थिर व निश्चित आधार आपलासा केला असता. उपरानिर्दिष्ट माणसें अशी टीका करावयाला अत्यंत पात्र होतीं. तीं अत्यंत व्युत्पन्न व प्राचीन वस्तुसंशोधक होतीं; व बौद्धिक स्वरूपानें ही चळवळ म्हणजे विशेषेंकरून गतकालाचें पुनरुज्जीवन होतें व तो काळही सकृद्दर्शनीं तसल्या साहसी कृत्याला कमी पात्र दिसत नव्हता. धर्मसुधारकांच्या काळीं पुराव्याचें परिशीलन व खरोखर गतकाळच्या गोष्टींचा बारकाईचा शोध हीं माहीत नव्हतीं. तथापि जेव्हां पत्रकपंथी चळवळ सुरू झाली, तेव्हां ऐतिहासिक टीकेचे नियम अगदीं पूर्णतस आले व ते युरोपच्या बौद्धिक

बलाचा बहुतेक भाग आकर्षून घेत होते. विशेषेंकरून इंग्लंदांतील धर्मज्ञानांत त्यांचें वर्चस्व झालें होतें. पवित्रशास्त्रांतल्या चमत्कारांवर वुल्स्तन व त्याच्या अनुयायांनीं जे हल्ले केले ते लार्दनर व पेले यांनीं परतविले; तेव्हां त्यांनीं इतका अनपेक्षित जोम व इतकी अशंकनीय पात्रता दाखविली, व इतकें अजिंक्य यश मिळविलें, अशी बराच काळ कल्पना होती कीं, सर्व धर्मज्ञानांतल्या विवेचनाचा ओघ या पात्रांत वळला होता. तरीही पत्रकपंथी चळवळींत अर्वाचीन चमत्कारांच्या विषयाची समजेशी छाप पडली असें क्वचित्‌च म्हणतां येईल. गिबनचा मुख्यत्वें या चमत्कारांच्या सत्यतेकडे कल झाल्यामुळें तो रोमच्या बाजूला गेला हें मागें आलेंच आहे. चिलिंगवर्थनें याच्याही पूर्वीं सांगितलें आहे कीं, गिबनसारखेंच रोमच्या बाजूला जाण्याचें आपल्या मनांत येण्यास जीं कारणें घडलीं त्यांतलेंच हें एक होतें. पास्कलनें आपल्या जान्सेन–मताच्या समर्थनाचा पाया बहुतांशीं ‘पवित्र कंटका’च्या चमत्कारावर घातला; पण या वृत्तान्ताकडे आक्सफर्डच्या विद्वानांचें कचित्‌च लक्ष वेधलेलें दिसतें. जी थोडी बहुत त्यांची छाप बसली ती मुख्यत्वें तिटकाऱ्याची होती. त्यांना अनुकूल असें जें थोडें बहुत लिहिलें गेलें तें व्यपदेशरूप होतें; जणूं काय त्यांतला हेतु धर्म सत्य प्रस्थापित करण्याचा नसून केवळ अडचणीची उग्रता कमी करण्याचा होता ( १६ ).

## पत्रकपंथाची चळवळ.

पत्रकपंथी चळवळीच्या धुरीणांची परिस्थिति व विद्वत्ता आणि इंग्लंदमध्यें बऱ्याच काळापासून चमत्कारांच्या पुराव्याला जें महत्त्व आलें होतें, तें ध्यानांत घेतलें असतां त्या चळवळीचा हा वर सांगितलेला विशेष खात्रीनें संस्मरणीय होता. पत्रकपंथ अर्वाचीन धर्मज्ञानाविरुद्ध ज्या मोठ्या तक्रारी करी त्यांपैकीं सृष्टातीताची भावना निर्जोर व अंधुक झाली होती आणि सृष्टातीताच्या दाखल्यांची एकतर सहज कशीतरी वासलात लाविली जाई; नाहींतर दूरच्या गतकाळाशींच त्यांचा संबंध लाविला जाई, अशी एक तक्रार होती, हें ध्यानांत आणलें तर तो विशेष जास्तच संस्मरणीय होतो. आपल्या काळाच्या स्वरूपाची ज्यांना उत्तम ओळख होती तेच त्या स्वरूपाविरुद्ध उठलेले असतांही त्या काळच्या ओघापासून अलिप्त राहण्यास जणूं काय असमर्थ होते असें दिसेल.

## पत्रकपंथी चळवळीचे परिणाम.

(क० १४) पत्रकपंथी चळवळीच्या पलीकडे पाहिलें तर बहुतेक प्रतिरोधी पंथी देशांत बाणेदार व व्यवस्थित कार्यकारणवादानें जी विलक्षण प्रगति केली तद्रूपानें ज्या प्रवृत्तीची त्या कालीं छाप होती, तिचा याहून जास्त थक्क करणारा दाखला आढळतो. ब्रिटिश बेटांखेरीज युरोपांतील देशांतला प्रतिरोधी पंथ त्या कार्यकारणात्मक चळवळीकडे किती झुकला तें चहूंकडे कळून चुकलें, व त्यामुळें कित्येकांच्या मनांत जर अत्यंत मोठी आशा उत्पन्न झाली तर इतरांच्या मनांत प्रचंड भीति उत्पन्न झाली. हेंही नमूद करण्यालायक आहे कीं, चळवळ अतिशय दिसून पडूं लागली ती अशा देशांत कीं, जेथें प्रमुख धर्मपंथ श्रद्धेयांच्या भारुडानें अगर सामाजिक ठराविक प्रार्थनांनीं संबद्ध नाहींत; आणि जेथें संप्रदायाची जड बिडी पायांत बहुधा नसल्यामुळें विवेचक बुद्धि आपल्या वाढीच्या साहजिक परिणामाचा अनुभव घेण्यास बहुतेक मोकळी आहे. कार्यकारणवाद हा शब्द कांहींसा अनिश्चित आहे हें खरें. त्यामध्यें मतांचीं पुष्कळ निरनिराळीं स्वरूपें येतात. सव्यमार्गी प्रतिरोधी पंथांच्या लोकांकडून अत्यंत तिरस्कारानें ही गोष्ट एकसारखी आग्रहानें पुढें मांडली जाते. पण हे लोक एक गोष्ट साफ विसरतात; ती अशी कीं, हाच आक्षेप तीनशें वर्षेपर्यंत खुद्द प्रतिरोधी पंथावर नेहमीं आणला जात असे व त्या आक्षेपाला पुढील दोन मुद्यांवर उत्तर देऊन त्या पंथाचें समर्थन केलें जात असे. तें उत्तर असें कीं, कोणत्याही मताचीं नानास्वरूपें होणें हें प्रामाणिक चौकस बुद्धीचें अवश्यंभावि फळ होय; व तपशीलांत अगणित भिन्न प्रकार असले तरी प्रतिरोधी पंथांत अशा कांहीं मूलभूत कल्पना आहेतच कीं, त्यामुळें परस्परांपासून भिन्न दिसणाऱ्या पोटभेदांची मुख्य गोष्टींत एकवाक्यता होत असे. बऱ्याच अंशीं तशाच प्रकारची एकवाक्यता प्रतिरोधी कार्यकारणवादाच्या नानाविध स्वरूपांत आढळेल.

## कार्यकारणवादी पंथाची 'धर्मा' विषयीं कल्पना.

या पंथाची मध्यवर्ती कल्पना म्हणजे सदसद्विवेक बुद्धीला उच्चासन द्यावयाचें व तिला धार्मिक इंद्रिय म्हणजे सत्य व प्रमाद यांमधला भेद जाणणारी निर्णायकशक्ति म्हणावयाचें. खिस्तीधर्म म्हणजे मानवजातीच्या

नैतिक प्रगतीचा पूर्वसंकल्पित मार्गदर्शक होय व तो धर्म म्हणजे जसजसें मानवी मन नव्या कळा धारण करील व ज्यास्त ज्यास्त घननिर्मुक्त प्रकाशाचें तेज सोसण्यास समर्थ होईल तसतशी अधिकाधिक उदात्त व चैतन्यमय होत जाणारी कल्पना होय; असें कार्यकारणवादी पंथाला वाटतें. प्रगतीच्या सामान्य नियमाला धर्म अपवाद आहे असें त्याला वाटत नाहीं; तर उलट, म्हणजे धर्म हा प्रगतिनियमाच्या प्रकटनाचें उच्चस्वरूप होय असें वाटतें; व त्या उच्चस्वरूपाच्या पूर्वीच्या संस्था म्हणजे केवळ अपुऱ्या वाढींतल्या जरूर असणाऱ्या पायऱ्याच होत असें त्याला वाटतें. त्याच्या दृष्टीनें ख्रिस्ती धर्मातलें नैतिक अंग म्हणजे जसा कांहीं आकाशींचा सूर्य; व हटवादीमतांच्या संस्था म्हणजे ढग; हे ढग त्या सूर्याच्या तेजःपुंज किरणांच्या आड येऊन त्यांचा प्रकाश अंधुक करितात. क्षणैकजीवि कीटकाला हे ढगच खरे खरे शाश्वत, त्यांचा भव्य स्तंभ अगदीं अढळ व त्यांचीं चकचकीत आवरणें हाच प्रकाशाचा उगम व केंद्र असें वाटेल, तर खुशाल वाटो; तथापि हे ढग वाऱ्याच्या हरेक पालटणाऱ्या झुळकेसरसे अस्ताव्यस्त होतात व ते मिसळतात व वेगळे होतात; ते नवीं रूपें घेतात व नवे आकारमान धारण करितात; त्यांच्यावर उंच असणाऱ्या सूर्याचें तेज जसजसें प्रखर होत जातें तसतशी त्याची स्फुरत्प्रभा आंत भिनून अखेरीस ते ढग तींत अंतर्लीन होतात; ते ढग मागें हटतात, विकल होतात व लोपतात; आणि आपली दृष्टि त्या ढगांनीं त्यास अशा दिग्मंडळाच्या पलीकडे वर असणाऱ्या फार उंच देदीप्यमान अनंत आकाशांत संचार करण्यास समर्थ होते.

### कार्यकारणवादाची छाप.

कार्यकारणवादाच्या गुणावगुणांची चिकित्सा करण्याचें हें स्थळ नव्हे. मानवी मतांच्या गतकाळांतल्या सर्व प्रकारांची एकवाक्यता करून त्यांचा उदात्त मिलाफ करणारी, खिलीभूत नियमाचेंच समर्थन करावयाचें नसल्यामुळें हरेक नवीन शास्त्रीय प्रसृति जयोत्साहानें व विलंब न लावता अंगीकारणारी, परमेश्वराविषयींच्या परिपूर्ण व अतींद्रिय ज्ञानाकडे नेणाऱ्या अखंड प्रगतीचा अत्युन्नत विषयांतला मार्ग चोखाळणारें मानवी मनाचें स्वरूप दर्शविणारी, अशी कोणतीही संस्था बुद्धीला बळकट ओढा लावायला कधींही चुकणारी नव्हे. मनुष्याच्या नैतिक अंतःशक्तीकडे श्रद्धेचें मापन व निर्णय करण्याचा अधिकार सोंपवणारी संस्था त्या अंतःशक्तीचा अत्यंत अभ्युदय

झालेल्या माणसांवर नेहमीं बळकट परिणाम करणारच. अखंडित व अस्खलित अभ्युदयाच्या ह्या कल्पनेची सद्यःकालावर पूर्ण छाप बसली आहेशी दिसते. कोणत्याही विषयावरील कोणताही खरोखरीच समर्थ ग्रंथ उघडा कीं, कोणत्या तरी रूपानें या कल्पनेचें दर्शन झाल्याखेरीज राहणें शक्यच नाहीं; अखिलशास्त्राचें खोल ठावापासून ती मंथन करित आहे; सगळ्या ऐतिहासिक वाङ्मयांत ती क्रांती करीत आहे. धर्मज्ञानांत तर तिचें वर्चस्व इतकें झालें आहे कीं, तिच्या छापेंतून साफ निसटलेला पंथ क्वचित्च असेल. आमच्याच काळीं खुद्द रोमी धर्माचें समर्थन 'अभ्युदय' नामक एका प्रबंधांत व प्रगतीचे नियम विलक्षणपणें लावून केलेलें आम्हीं पाहिलें आहे.

## कार्यकारणवादानें चमत्कारपराङ्मुखता होते.

कार्यकारणवाद वारंवार अनिश्चित व अस्पष्ट दिसतो व त्यानें पुष्कळ विरोधाभास उत्पन्न केले आहेत. तरीही सध्यांच्या शतकांत त्याची असाधारण त्वरेनें जी प्रगति झाली आहे, तिचा उलगडा होण्यास त्याच्याकडील ओढ्याचीं वर दिलेलीं अंगें बरींच उपयोगी पडतात. पण ही गोष्ट येथें नजरेखालीं घालण्यालायक आहे कीं, या विचारतरंगांना नेहमीं जें अगदीं पहिलें वळण लागतें, म्हणजे त्यांच्या व्यापाचाराची जी केवळ खूण व विशेष आहे, तो हा होय कीं, त्यांमुळें धर्मशास्त्रांतील चमत्कारांचा सहज उलगडा करण्याचा यत्न मन करूं लागतें. ही कार्यकारणवादाची इतकी जबरदस्त ओळख पटविणारी खूण आहे कीं, बहुतेक लोकांच्या मनांत कार्यकारणवाद या शब्दानें तेवढीच कल्पना येते. जेथें जेथें त्याचा उदय होतो तेथें तेथें त्याचें रूप व अर्थ असा असतो कीं, चमत्कारांचे वृत्तान्त ऐकून घेण्याची वृत्ति सर्वत्र मावळते (१७); आणि त्या वृत्तान्तांची छाप टाळण्यासाठीं अर्थबोधनिकेची हरेक क्लृप्ति योजिली जाते. यावरून त्याच्या प्राबल्यानें प्रतिरोधीपंथी देशांत चमत्कारपराङ्मुखता किती मानानें वास करिते व अलीकडे ही पराङ्मुखता किती त्वरेनें वाढली आहे, तें स्पष्ट कळतें.

## कार्यकारणवाद व अनिर्बंधविचाराचा पंथ.

या विषयाकडे ज्यानें यत्किंचित् लक्ष दिलें आहे, त्याची साहाजिक प्रवृत्ति अशी होते कीं, आपण काढलेले निर्णय हे स्वकालीन विचारौघा-

मुळें उत्पन्न होणाऱ्या सामान्य पूर्वग्रहाचें फळ म्हणण्यापेक्षां आपल्या समतोल मनीषेच्या दाबांत काम करणाऱ्या स्वतःच्या विवेचक बुद्धीच्या प्रयत्नाचें फळ होत असें म्हणावें. यावरून हें संभाव्य वाटतें कीं, कार्य-कारणवादी लोक आपल्या समर्थनार्थ सांगतात त्या विचारांहून अन्य कोणत्याही विचारांनीं आपल्या मनावर छाप ठेविल्याचें सामान्येंकरून ते कबूल करणार नाहींत; व जर्मनीनें तयार केलेल्या बैबलाच्या सूक्ष्म व चिकित्सक संशोधनपद्धतीकडे आपल्या मतांचा खरा उगम म्हणून बोट दाखवितील. पण त्याला कार्याहून कारण म्हणणें बरेंच वाईट दिसेल असें वाटल्यावांचून रहात नाहीं; व याचें स्पष्ट निदर्शन पाहिजे असेल तर या टीकेचें कधींच अनुसरण होत नाहीं अशा दुसऱ्या एका दिशेनें अगदीं अशीच मतप्रवृत्ति दिसते ही गोष्ट तें निदर्शन होय. येथें सनातनपंथी देशांत विपुल पसरलेल्या अनिर्बंध विचार करणाऱ्या माणसांकडे रोंख आहे. या विस्तृत पंथाच्या मतांची बळकट छाप सद्यःकालीन वाङ्मयावर व राजनीतीवर बसली आहे; व त्या पंथाचीं मतें लक्षपूर्वक तपासून पाहणाऱ्या कोणासही कळून चुकलें पाहिजे कीं, पुष्कळ बाबतींत जुन्या वाल्तेरच्या विचारसरणींत व या मतांत महदंतर आहे. अनिर्बंध विचाराच्या पंथाचीं मतें केवळ अकिंचित्कर व विघातक नाहींत. तर उलट तीं अत्यंत कर्तृत्ववान् असून त्यांचें नैतिक स्वरूप पूर्ण ख्रिस्ती आहे. त्या पंथाच्या आत्म्याच्या ठिकाणीं मूलतः ख्रिस्ती असा कल्पनाकलाप आहे; त्या कल्पना ह्याः——समता, विश्वबंधुता, कलहनिवृत्ति, सत्यप्रीति, दीनोद्धार व स्वातंत्र्यप्रसार. ख्रिस्ती धर्माच्या ध्येयाभोंवतीं हा पंथ घिरट्या घालीत असतो व तो ख्रिस्ती धर्माचें सारसर्वस्वच आहे; पण ख्रिस्ती धर्मांतील हटवादी मतें अगर अमानुष-वृत्तान्त यांपासून हा पंथ अलग आहे. या दोन गोष्टींपासून तो घरसोड न करितां परावृत्त असतो; पण त्याच्या सर्व सामर्थ्याचा व पोषणाचा झरा ख्रिस्ती नीति होय.

## सनातनपंथाच्या ऱ्हासानेंही प्रतिरोधीपंथानें आपला फायदा करून घेतला नाहीं.

( क० १५ ) या चळवळीचें सामान्य स्वरूप असें आहेसें वाटतें; प्रतिरोधी कार्यकारणवादाशीं त्या चळवळीचा उघड उघड संबंध पोंचतो;

व त्याहूनही ही चळवळ युरोपांत विजयी थाटानें व त्वरेनें पावलें टाकीत पसरत चालली आहे. गेल्या शंभर वर्षांत या पंथांनीं सनातन पंथाचे समर्थ शत्रू या नात्यानें व त्या पंथाला कंटाळून निवृत्त होणाऱ्यांना साहजिक आकर्षि'ारें केंद्र या नात्यानें प्रतिरोधी पंथांतल्या हटवादी प्रकारांची जागा पूर्णपणें पटकावली, ही गोष्ट ज्याच्या लक्षांत येत नाहीं तो खरोखर इतिहासगतीकडे जाणूनबुजून काणाडोळा करीत असला पाहिजे. सोळाव्या व कांहींशी सतराव्या शतकांतही युरोपच्या कारभारांत प्रतिरोधी पंथाची ओजस्वी व वजनदार छाप बसली होती. मनुष्यांचीं मनें क्षुब्ध करणाऱ्या बहुतेक सर्व मोठमोठ्या प्रश्नांचा त्या पंथाच्या प्रगतीशीं कमजास्त संबंध होता. या पंथांत पुष्कळ घाणेरडे तंटे व विचित्र अत्याचार दिसले खरे; पण त्यांतील प्रत्येक पोटपंथाची अढळ व नियमित हटवादी पद्धती होती व सभोंवतालच्या लोकांवर त्याची जोरदार छाप पडे. सनातनपंथी मतांनीं ज्याचें समाधान होत नसे तो लगेच यांपैकीं कोणत्या तरी पोटपंथाच्या जाळ्यांत ओढला जाई व लीन होई; व जुन्या पंथांत असतां त्यांतील हटवादी मतांबद्दल जितकी त्याची कळकळ असे तितकीच नव्या पंथांतल्या हटवादी मतांबद्दलही असे. गेल्या शतकांत ही सर्व घडी बिघडली. सनातन पंथाचीं मतें व आचार सोडून देणाऱ्या प्रत्येक शाखेंतल्या शेंकडों थोर लेखकांतून व तत्त्वविवेचकांतून प्रतिरोधी पंथाच्या एखाद्या पुराणप्रिय पद्धतीला कायमचे चिकटणाऱ्या, खऱ्याखऱ्या थोर व अशंकनीय कळकळीच्या गृहस्थांचीं नांवें घेणें सुद्धां मुष्कील होईल. हजारों माणसांची श्रद्धा ढळवणाऱ्या व समाजाशीं सनातन पंथाच्या असलेल्या संबंधांत मोठा फरक करणाऱ्या मोठमोठ्या अर्धवट धार्मिक क्रांत्या चालल्या असतां प्रतिरोधी पंथाचें पाऊल बिलकुल पुढें पडलें नाहीं; कीं जाणवण्यासारखा त्याचा पगडा बसला नाहीं; गोंधळ, अशासकता व संक्रमण या अवस्थांतून आम्ही मार्ग क्रमित आहों, असें म्हणणें ही बऱ्याच काळापासून केवळ स्वयंसिद्धोक्ति झाली आहे. गेल्या शतकभर आम्हां सभोंवतीं भेदाचीं मुळें वाढत आहेत. सनातनपंथासंबंधीं उघड वैर अगर तिटकारा व बेपर्वाई युरोपच्या वाङ्मयाच्या एवढ्या भागानें यापूर्वी क्वचित्च कधीं दाखविली असेल. सबंध राष्ट्रेंचीं राष्ट्रें सनातन पंथाच्या निंदेला भीक न घालतां त्याची मालमत्ता जप्त करूं लागलीं आहेत; व हरएक राजकीय शाखेची

त्याच्या कहांतून सुटका करीत आहेत. पण इकडे सनातनपंथांत येणेंप्रमाणें मुळापासून संक्षोभ व खळबळ झाली आहे. चोहोंबाजूंनीं त्याच्या फाटाफूटीच्या चिन्हांची गर्दी झाली आहे. त्या पंथांत दिसणाऱ्या शिथिलतेनें व दुर्बलतेनें प्रत्येक तत्त्वज्ञाला एक नवीन कोडेंच येऊन पडलें आहे व प्रत्येक नीतिकोविदास एक आयताच विषय मिळाला आहे. असें असूनही तिकडे प्रतिरोधी पंथांतील पोटपंथांनीं आपल्या पुराण्या शत्रूच्या ऱ्हासापासून कांहीं एक फायदा करून घेतला नाहीं. धार्मिक संस्थांची त्यांची व्यवस्था व जुने विधी तसेच्या तसेच अजूनपर्यंत कायम आहेत तरी त्यांत एकदां असलेली मनोवेधकता साफ नाहींशी झाली आहे.

## सनातन पंथाचा विस्कळितपणा आणि सोळाव्या व एकोणिसाव्या शतकांतील स्थिति.

धर्मसुधारणेनंतर हटवादी मतांनीं जीं जीं नानाविध शिलीभूत स्वरूपें धारण केलीं, त्यांतून एकाच्याही आंगीं स्वप्रांतापलीकडच्या कोणासही आपल्याकडे ओढण्याची ताकद नाहींशी दिसते. सनातन पंथाची जितकी हार तितकी कार्यकारण पंथाची जीत ( १८ ). कार्यकारण पंथाचें पाऊल जेथें जेथें मागें तेथें तेथें सनातन पंथाचें पुढें. गतशतकाच्या अखेरीस फ्रान्सनें ख्रिस्तीधर्माचें जूं झुगारून दिलें. आपल्या गतसंप्रदायांचा नायनाट करण्याचा प्रयत्न केला व मानव जातीच्या धार्मिक इतिहासांत नवा मनू सुरु झाल्याचें जाहीर केलें. लवकरच आपल्या अविचाराबद्दल त्याला अनुताप झाला व अप्रातिपाद्य म्हणून समजून आलेल्या स्थितीचा त्याग करून तो मागें हटला. अर्धें राष्ट्र पोपाचार्याधिष्ठित सनातनपंथी झालें व राहिलेलें अर्धें तटस्थ अगर कार्यकारणवादी झालें ( १९ ). युरोपांतील ब्रिटिश बेटांशिवाय इतर देशांतल्या लेखकांपैकीं पुष्कळसे सनातन पंथाच्या मतांचा अव्हेर करून त्याच्या प्रामाण्याला यत्किंचित्‌ही मान न देतां आपल्या विचारतरंगांत पोहत राहिले आहेत. सोळाव्या शतकांत असल्या सर्व माणसांनीं प्रतिरोधी पंथाच्या कोणत्याना कोणत्या तरी निश्चित स्वरूपाचा अवलंब केला असता; सध्यां तीं अशा स्थितींत आहेत कीं, त्या काळीं तशा स्थितीचा अगदीं मागमूस नव्हता; व त्या काळीं ही स्थिति म्हणजे अगदीं न उकलणारें कोडेंच होऊन बसली

असती (२०). पाखंडचूडामणींचे दिवस आतां गेले. मोर्मनपंथावरून दिसतें तसें अगदींच अशिक्षित लोकांत नवीन हटवादी मतांच्या संस्थांस अजूनही यश येईल. पण त्यांची सर्व वेधकता व शक्ती सुशिक्षितांपुरती तरी गळून गेलेली दिसते. इंग्लंदांतल्या धर्मप्रचारक अगणित संस्थांना, सनातनपंथी देशांतल्या थोड्याशा पृथक् पृथक् व्यक्तींस प्रतिरोधी पंथांत ओढण्याचें श्रेय खरोखर मधून मधून मिळतें. पण पूर्वीच्या काळांत याप्रमाणें समाजचे समाज प्रतिरोधी पंथाच्या गोटांत शिरूं लावणारा व युरोपांतील सर्व थोर प्रश्नांस महत्त्व प्राप्त करून देणारा विचारांचा स्वाभाविक ओघ व लोंढा जर आपण आतां शोधूं गेलों तर तो खटाटोप फुकट होईल. सोळाव्या शतकांतील पंथांची वेधकता अल्पांशानें तरी पुनः दृष्टीस पाडणाऱ्या चळवळी म्हणजे फक्त संत सायमन व माझिनी यांच्या प्रयत्नांसारखे परोपकाराचे व लोकसत्तेचे प्रयत्न होत. युरोपला हालवून सोडणारे महत्त्वाचे सर्व बौद्धिक प्रश्न, राष्ट्रीयत्वांचे हक्क, लोकसत्तेची प्रगती अगर कामकरी वर्गाच्या स्थितीची थोरवी यांशीं निगडित असतात. सोळाव्या शतकांत ख्रिस्ती धर्माच्या धोरणाचे मुख्य सूत्रधार बनून राहिलेले व एकोणिसाव्या शतकांत आपलें वर्चस्व बहुतेक हारवून बसलेले जे हटवादी मताचे प्रश्न त्यांची जागा या वर सांगितलेल्या प्रश्नांनीं आतां पटकावली आहे.

## प्रतिरोधी पंथाची सत्त्वहीनता व लोकांचा कार्यकारणाकडचा कल.

हा निःसंशय अत्यंत संस्मरणीय व अर्थपूर्ण विरोध आहे. प्रामाणिक माणसांना त्याचें अस्तित्व नाकबूल करणें कठीण जाईल. शहाणीं माणसें वास्तविक गोष्टीकडे डोळेझांक करणार नाहींत; किंवा तिच्या परिणामाकडे टक लावून पाहण्याचें नाकारणार नाहींत. प्रतिरोधी पंथांतच तयार झालेल्या कार्यकारणवादाच्या चळवळीशीं निगडित असलेल्या या विरोधामुळें पुष्कळ लेखकांचा निर्णय झाला आहे कीं प्रतिरोधी पंथाचीं आरंभींचीं स्वरूपें केवळ संक्रमणावस्थेंतलीं होत; त्या स्वरूपाची आयुर्मर्यादा जी लांबली ती त्यांच्यांत कांहीं राम होता म्हणून नव्हे, तर संवय व परंपरा यांच्या जोरावर ती लांबली; श्रद्धेच्या प्रांतांतली सतत होत आलेली प्रगति प्रतिरोधी पंथाची नैसर्गिक इतिस्थिति व अवश्यंभावी नियम होय; व हटवादी मतांच्या नगरांतून पळून जाऊन पुनः माघारे त्याच्याकडे पहात

राहणाऱ्या पंथांसाठीं लातच्या स्त्रीला प्राप्त झालेलें भोक्तृत्व राखून ठेविलेलें आहे. तथापि प्रतिरोधी पंथांतली आपल्या सभोंवतालच्या लोकांवर पगडा बसवण्याची शक्ति नष्ट झाली, असें दिसूं लागल्यामुळें त्यांतलें धार्मिक सत्त्वच समूळ नष्ट झालें, असें मानणें म्हणजे त्या सत्त्वाचें एकच स्वरूप पाहणें होय. पण प्रस्तुत विवेचनार्थ घेतलेल्या चळवळीवरून अगदीं व अबाधितपणें एक निर्णय आपण काढूं शकतों. तो असा कीं, तत्कालीन बुद्धीचा साधारणपणें कार्यकारणाकडे कल असे. हीच गोष्ट पर्यायानें सांगायची तर ख्रिस्ती धर्माचें रहस्य व नैतिक बीज यांचें महत्त्व ओळखण्याकडे जोराचा कल असे. पण हटवादीमतांच्या पद्धतीची विशेषेंकरून अद्भुतचमत्कारांच्या वृत्तान्तांचा अव्हेर करण्याकडे जोराची प्रवणता आहे, असें म्हटलें पाहिजे.

## प्रमाणवादी पंथ.

(क० १६) आपण पाहिलें आहे कीं, जरी पत्रकपंथ तत्कालीन प्रवणतेशीं विरोध करण्यासाठीं व तिच्यापासून आपलें संरक्षण करण्यासाठीं उभारलेला होता, तरी खुद्द त्यामध्येंही वर सांगितलेली प्रवणता निष्फळ नव्हती; ही गोष्ट बहुधा ज्यांस सव्यमार्गी प्रतिरोधी पंथी म्हणतात त्या लोकांत प्रमाणवादी पंथाचा जो जलद ऱ्हास झाला त्यावरून उघड होते. गेल्या शतकांत इंग्लंदांतल्या प्रमाणवादी पंथाला जें चूडामणित्व प्राप्त झालें होतें तें अद्भुत चमत्कारांकडे असलेल्या सर्वसाधारण प्रवणतेमुळें खास नव्हे. लादेनर, पेले व तदनुयायी हे वादांत केवळ स्वसंरक्षणदक्ष राहिले. व म्हणून प्रतिपक्षानें घेतलेल्या मुद्यांवरच त्याच्याशीं उत्तरपक्ष करणें त्यांस भाग पडलें. संदिग्धमतित्वानें आपली वाट धर्मसुधारणेच्या वेळीं विशिष्ट पंथांच्या प्रामाण्यतेपर्यंतच अगर धर्मशास्त्राच्या विशिष्ट अर्थाच्या न्याय्यतेपर्यंतच चोखाळली होती; पण तें हळुहळु इतकें पसरलें कीं, शेवटीं धर्मज्ञानाचा सर्व प्रदेश त्याच्या आटोक्यांत आला व अद्भुत चमत्कारांवर एकामागून एक निकराचे हल्ले झाले, हे हल्ले मागें हटविण्याकरितां प्रमाणवादीपथ उद्भवला. या पंथानें मिळविलेल्या पूर्ण जयांहून ज्यास्त पूर्ण जय मिळाल्याचा दाखला धार्मिक वादाच्या इतिहासांत फारच थोडा मिळेल. अठराव्या शतकांल्या सर्व इंग्रजी कूटस्थपरमात्मवादी ग्रंथांतून केवळ दोनच ग्रंथ वादविवादांतून तगून छाप पाडित आहेत. चमत्कारांवरचा ह्यूमचा

निबंध जरी हल्ला व टीका झाल्यावांचून राहिला नाहीं तरी त्यास मृतप्राय व निष्फळ मानतां येत नाहीं. गिबन स्वक्षेत्राचा बहुतेक निष्कंटक स्वामी राहिला आहे. पण त्याच्या मोठ्या ग्रंथानें ख्रिस्ती धर्माच्या प्रमाणांच्या विषयाची भूमि जरी खास व्यापली आहे, तरी त्या प्रमाणांचा प्रत्यक्ष अंतर्भाव त्या ग्रंथांत झालेला नाहीं. पण हे दोन ग्रंथ अपवाद म्हणून काढून टाकले तर इंग्रज कूटस्थपरमात्मवाद्यांना जसें ग्रहण लागलें तसें किंवा त्याहून पूर्णग्रास ग्रहण कोणाला लागल्याची कल्पना करणेंही दुर्घट आहे.

## त्या पंथाचे इतर ग्रंथकार.

वुल्स्तन व तिंदल, कालिन्स व चब हे छायेच्या प्रांतांत जाऊन फार काळ झाला व त्यांच्या ग्रंथांची विस्मृतीच्या अंधारांत माती होऊन राहिली आहे. बोलींग ब्रोकचा त्याच्या देदिप्यमान नांवाहून ज्यास्त कांहीं अवशेष आतां राहिला नाहीं; व त्याच्या अद्वितीय भाषाशैलीच्या सौंदर्याच्या आंगींही त्याच्या तत्त्वविचारांचा विस्मृतितमांत लोप होऊं न देण्याइतकें तेज नाहीं. अमूर्तवादाच्या थोड्या अनुयायांतून एक शाफ्तस्बरी काय तो लाकचा पगडा बसूं न देतां जागा धरून आहे. पण त्याचें महत्त्व केवळ ऐतिहासिक होय. त्याच्या अत्यंत सुसंस्कृत पण निचव एकसूर प्रवचनांना आतां कोठेंही कोणी पुसत नाहीं, कोणी वाचक तीं फारशीं हातीं धरीत नाहीं व त्यांची छापही बसत नाहीं. वर बांधलेल्या समाधीच्या अंधारांत तीं सर्व गडप झालीं आहेत. त्यांच्या सभोंवतीं घोर अभंग शांतता व मृत्यूचें शैत्य हीं नांदत आहेत. इंग्लंदच्या बुद्धीला कांहीं प्रेरणा देण्याचें, कांहीं प्रश्न सुचविण्याचें, अगर तींत कांहीं कुतूहल जागृत करण्याचें, काम त्यांनीं सोडून दिल्याला फार काळ झाला. अठराव्या शतकांतल्या इंग्लंदांतील वादविवादांचा हा परिणाम झाला. यांत पुराणप्रिय पक्षातर्फे मुख्यत्वेंकरून चमत्कारांच्या पुराव्याची भवतिनभवती झाली. निःसंशय हा परिणाम जात्या फार ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. पण सनातनपंथी देशांत काय चाललें होतें त्याच्याशीं तोलून पाहतां तो विशेषच स्मरणीय आहे. वाल्तेर व रूसो ह्यांना आपला पवित्रा कायम राखण्यांत यश आलें; एवढेंच नव्हे, तर आणखी त्यांच्याशीं सामना करण्यास, केवळ आवेशोन्मादालाही त्यांच्या पायरीचा वाटेल, अशा कोणाही माणसानें दंड ठोकले नाहींत. त्यांनीं लिहिलेल्या ग्रंथांवर एकही खंडनपर असा लेख निपजला

नाहीं. बहुधा आजतागायत हयात राहण्यासारख्या अधिकाराचा एक मुद्दाही अगर थोडीशी टीकाही झाली नाहीं म्हटलें तरी चालेल. दिदरो, रेनल व तत्पक्षीय इतर कित्येक लेखक यांनीं फ्रेंच वाङ्मयांत बहुधा अढळ जागा पटकावली आहे; व इतकी उंच जागा त्यांच्या प्रतिपक्ष्यांतून एकानें ही मिळविली नाहीं, हें खास.

### प्रमाणवादी पंथ लोकप्रिय झाला नाहीं.

या तुलनेवरून अशा स्मरणीय विजयाची कलगी चढवलेल्या प्रमाणवादी पंथाला अढळ व अपार लोकप्रियता प्राप्त झाली असेल अशी कोणी कल्पना करील; पण त्यांत मात्र त्याची निराशा होईल. जर्मनींत कांतनें या विचारसरणीला प्रथमपासूनच तत्त्वविवेचनबाह्य ठरविली होती (२१); इंग्लंदांत कालेरिजनें तिची निखालस अब्रू घेण्यांत यश मिळाविलें; व लोकांचा कल ख्रिस्ती धर्माची सत्यता चमत्कारांच्या पुराव्यावर लोंबत ठेवण्याच्या उलट आहे, असें प्रतिवर्षी अधिकाधिक स्पष्ट दिसूं लागलें. थोडेसे धर्मज्ञानपंडित पुराणपद्धतीनें दीर्घोद्योगानें काम चालवितात खरे व त्यांच्या श्रमांची अवहेलना कोणीही करणार नाहीं. तथापि या चळवळीच्या सार्वत्रिकतेविषयीं त्यांचीच साक्ष उत्तम आहे; कारण आपले प्रयत्न अरण्यरुदितासारखे आहेत व चहूंकडे जुन्या पद्धतीची कोणी पर्वा करीत नाहीं, तिचा सर्वांनीं त्याग केला आहे (२२), अशी त्यांची केविलवाणी तक्रार आहे. ख्रिस्ती धर्माचें मंडन करणें ही गोष्ट धर्माच्या अंतर्गत होय, बहिर्गत नव्हे; असें मानण्याची वृत्ति सर्वत्र प्रचलित आढळते. श्रद्धा म्हणजे ऐतिहासिक कोड्याचा निकाल, अर्थात् अगदींच थोड्या अडचणी व विरोध मनापुढें मांडणारा अत्यंत गुंतागुंतीच्या बौद्धिक प्रश्नाचा उलगडा, असें मानलें जात नाहीं; तर श्रद्धा म्हणजे नैतिक सत्याची सदसद्विवेकाच्या द्वारें झालेली ओळख म्हणून समजली जाते. पर्यायानें, धर्माचें सत्त्व तसेंच मंडन हा मानवी प्रकृतीचा, बौद्धिक नव्हे तर, नैतिक भाग मानला जातो. आत्मप्रत्यय हा त्याचा पाया, विचार हा नव्हे; आणि हा आत्मप्रत्यय म्हणजे एक विशिष्ट नैतिक प्रबोध होय. हरएक हटवादी मत म्हणजे एकाद्या नैतिक सत्याची मूर्ति, त्या सत्याची अपर्याप्त व्याहृति होय; व या मूर्तींत, या व्याहृतींत, सत्यरूप आत्मा स्फुरत नसेल तर ती व्यर्थ. ऐतिहासिक धर्माची परिस्थिति चिकित्साप्रगतीनें बदलेल, तिचें उच्चाटन होईल, विचाराच्या नव्या

सरणीच्या उदयानें प्राचीन धर्म निर्जीव व निष्क्रिय होतील; पण त्यांच्या मुळाशीं असलेलें सत्त्व चिरकाळ टिकणारें असतें. मानवी सुधारणेच्या प्राचीन पायरीवरच्या आधिभौतिक कल्पना टाकून दिल्या असतां शीलाच्या आदर्शाला व नमुन्याला कांहीं तरी नवीन मोहिनींचें साहाय्य लागेल. हटवादीमतांची पूजा नष्ट होईल; ख्रिस्ती धर्माला विद्रूप करणाऱ्या सहनशीलतेच्या व एकीकरणाच्या अभावापासून त्याची सुटका होऊन स्वतःच्या नैतिक तेजानें तो प्रकाशमान होईल; व वादविवादाच्या कक्षेंतून उच्चतर प्रदेशांत चढल्यामुळें आपल्या योग्यतम स्थानीं विराजमान होईल; तेव्हां त्याचें स्वरूप पद्धत्यात्मक न राहतां आदर्शात्मक राहील, कल्पनात्मक न राहतां वास्तवतात्मक राहील.

### प्रमाणवादाचें कार्यकारणवादाशीं साम्य.

( क० १७ ) प्रमाणवादाचें मंडन करणारांमध्येंही सीमोल्लंघन करून कार्यकारणवाद्यांच्या मार्गावर बरेंच पुढें येऊन जणूं काय अर्ध्या मार्गांत त्यांना भेटण्याचा जोराचा कल आढळतो. ते प्रतिपादितात कीं, चमत्कार हे निर्दोष पुरावे होत; पण एवढ्यावरूनच चमत्कारांशीं नैसर्गिक नियमाच्या भंगाच्या ज्या कल्पनेची अजूनपर्यंत सांगड घातलेली आहे, तिचा अर्थ अवश्य निघतो असें नाहीं. अलौकिक ज्ञानाच्या अनुरोधानें नैसर्गिक साधनांचाच उपयोग करून चमत्कार करण्यांत येतात, असें म्हणतात.

### इच्छाशक्ती सृष्टिनियमांना वळण लावून चमत्कार करिते.

( क० १८ ) मानवाला असलेलें स्वातंत्र्य ज्याला म्हणून कबूल आहे ( २३ ), त्याला परकार्यप्रवेशाच्या कल्पनेची अडचण वाटणार नाहीं, असें प्रतिपादण्यांत येतें; कारण मानवी स्वातंत्र्य कबूल करणाराला मान्य असलेंच पाहिजे कीं, सृष्ट पदार्थांचे नियम आपल्या काबूंत आणून त्यांना हवें तें वळण देण्याची शक्ति मनुष्याला असते; मनुष्याचा हात आंत शिरकल्यावांचून न घडणारे परिणाम आपल्या स्वतंत्र इच्छाशक्तीनें मनुष्य घडवून आणूं शकतो; व जसजसें सृष्टिनियमांविषयींचें त्याचें ज्ञान वाढत जातें, तसतशी आपल्या हेतूंच्या पूर्तीकरितां त्या ज्ञानाचा उपयोग करून घेण्याची त्याची ताकद बळावते; अर्थात् चैतन्याचा जड पदार्थांवर पगडा बसूं शकतो, हा एक खुद्द सृष्टिनियमच आहे.

अलौकिक ज्ञान व शक्ति ज्याच्यापाशीं आहे, तो आपल्या सामर्थ्याचा माफक उपयोग करून आमच्या सामर्थ्याच्या व पोंचाच्या बाहेरचीं कार्यें करूं शकतो, हें विधान चांगलेंच विचारवंत आहे. विशिष्ट हेतूंना साजेसा सामान्य नियमांत फेरफार करून त्यांचा उपयोग करून घेणें हें प्रत्येक बुद्धीचें काम व विशिष्ट चिन्ह आहे; असें असून ईश्वरी बुद्धीला असली शक्ति नाहीं म्हणून म्हणणें म्हणजे ईश्वराचें अस्तित्व नाकबूल करण्याहून फारसें वेगळें दिसत नाहीं. ईश्वराच्या बुद्धीच्या ठायीं ती शक्ति नाहीं म्हणणें म्हणजे सर्व विश्वांत एकट्या ईश्वराची बुद्धि काय ती मंद आहे असें म्हणणें होय. म्हणून आम्हांला ठाऊक नसलेल्या सृष्टिनियमांची निवड करून घेऊन आम्हीं ज्यांना अद्भुतचमत्कार ( २४ ), म्हणतों तीं सर्व कृत्यें सर्वज्ञाला करितां येतात या श्रद्धेंत असंभाव्य कांहीं नाहीं असें म्हणतात. या कल्पनेच्या अनुरोधानें चमत्कार मानवी कृत्याहून सामान्यतः भिन्न असणार नाहीं; तथापि तो प्रमाण म्हणून पुढें मांडण्यास पूर्वी इतकाच उपयोगी मात्र पडेल. यावरून गेल्या शतकांतल्या बहुतेक सर्व विवादकांनीं चमत्कारांचें ज्या कल्पनेशीं सारूप्य मानलें होतें व सध्यांच्या लोकांचा कल विशेषेंकरून जिचा तिटकारा करण्याकडे आहे, तिजहून ते भिन्न ठरतात.

## चमत्कारांचा इतिहास व कार्यकारण चळवळ.

( क० १९ ) चमत्कारांच्या इतिहासाची आतां सामान्य सिद्धांत ठरवण्यास हवी तितकी विस्तृत पहाणी झाली आहे. धर्मसुधारणेच्या अगोदर जेव्हां वाङ्मयाचें पुनरुज्जीवन झालें व कित्येक शतकें युरोपास आपल्या पोटांत गडप करून ठेवणाऱ्या आलस्यमय व अज्ञानमय तमोराशीचा त्यानें विध्वंस केला, तेव्हांपासून या विषयाचा पिच्छा पुरविण्याचा क्रम मानवी मनानें एकसारखा व बदल न करितां चालविला आहे, असें आढळून आलं आहे. प्रत्येक धर्मसंस्था व प्रत्येक राष्ट्र या चळवळींत सांपडलेलें आहे; प्रत्येकाचा वांटा कांहीं सारखा नाहीं; पण या चळवळीच्या प्रगतीची छाप ज्यावर बिलकुल पडली नाहीं, असा युरोपांत एकही भाग नाहीं. खुद्द प्रत्याघात करणाऱ्या पक्षांवर सुद्धां या चळवळीच्या स्वरूपाचें प्रतिबिंब वठलें होतें; व सरते शेवटीं वाढत जाणाऱ्या तिच्या ओघानें हे पक्ष साफ वाहून गेले. या चळवळीशीं सर्व परंपरा, सर्व विद्या व सर्व प्रकारची

पुराणप्रियता यांनीं आपलें सर्व वजन, सर्व बळ, खर्चीं घालून विरोध केला; पण व्यर्थ. पिढ्यानुपिढ्या चमत्कारांचें राज्य संकुचित होत जाऊन संदिग्ध बुद्धीचें साम्राज्य पसरत चाललें. या गोष्टींचे जे मोठे दोन समूह त्यांपैकीं एक अगदीं नष्ट झाला. चेटुक, भूतबाधा, भूतसंचार, या गोष्टी कल्पित-कथांच्या वर्गांतल्या होऊन बराच काळ झाला. पहिल्यानें असल्या गोष्टीं-वर विश्वास न ठेवणें म्हणजे थोड्याशा विरळा आढळणाऱ्या विचारी लोकांचा विक्षिप्तपणा वाटत असे; पुढें अतिप्रगत राष्ट्रांतल्या सुशिक्षितांची ती एक खूणच झाली. आतां युरोपांतील सर्व देशांतल्या सर्व वर्गांच्या लोकांची ही साधारण मनोवृत्ति झाली. प्रत्येक पवित्र अवशेषाशीं व प्रत्येक ग्रामदेवालयाशीं ज्या असंख्य चमत्कारांचा मागें संबंध जोडलेला असे ते चमत्कार निमूटपणें भराभर नष्ट होत चालले. प्रतिवर्षीं अश्रद्धा अधिकाधिक दृष्टोत्पत्तीस येऊं लागली व ती धर्मज्ञानाचा बाणा पालटला नाहीं तेथें सुद्धां दिसूं लागली. त्यांची संख्या कमी होत होत शेवटीं ते अगदीं बहुतेक बंदच पडले, व त्यांचें पुनरुज्जीवन करण्याचा एखादा प्रयत्न झाल्यास त्याचा उघड उघड जिकडे तिकडे तिटकारा होत गेला.

### कार्यकारण मनूचें माहात्म्य.

धर्मपित्यांचे चमत्कारांची ऐकणारे अश्रद्धात्मक तिरस्कार दाखवून अगर साकूत मौन धारण करून बोळवण करितात. कार्यकारणमनूच्या माहात्म्यानें खुद्द धर्मग्रंथांत दाखल असलेल्या चमत्कारांची तशीच वासलात लावण्याचा प्रयत्नही झाला; व त्यायोगें धर्मज्ञानपद्धतींतल्या त्या चमत्कारांच्या योग्यतेंत बराच फरक पडला. हा कार्यकारणाकडचा कल, सर्व देशांत, सर्व धर्मपंथांत, सर्व पक्षांत निरनिराळ्या स्वभावांच्या व मतांच्या लोकांत आहे, असें आढळतें. प्रत्येक राष्ट्रांत त्याची वाढ म्हणजे बौद्धिक व्यापारक्षमतेचें माप होऊन बसलें आहे, व प्रत्येक राष्ट्रांतल्या समाजाच्या निरनिराळ्या थरांतून ती वाढ आपला सीधा मार्ग काढीत गेली आहे. गेल्या शतकांत या वाढीचा वेग अतीच बळावला. जुनी सरहद्द जिकडे तिकडे अस्पष्ट झाली व कार्यकारणमनु युरोपच्या बुद्धीला उघड उघड आकर्षिणारें महत्वाचें केन्द्र बनला. या चळवळीच्या प्रसृतीचा मुळापासून आतांपर्यंत छडा लाविला तर तिनें धर्माचें सर्व रंगरूप साफ बदललें आहे, असें आढळेल. ही चळवळ सुरू झाली

तेव्हां ख्रिस्ती धर्म म्हणजे मानवी विवेकाच्या आटोक्याच्या व टापूच्या साफ पलीकडची एक संस्था असें मानीत. त्या बाबतींत शंका काढणें म्हणजे अपवित्रता, त्याची चिकित्सा करणें म्हणजे भ्रष्टता, त्यांतून आवडनिवड करणें म्हणजे पाखंडपणा. उलटपक्षीं अलौकिकाचा त्यांत उघड उघड बुजबुजाट असे. त्याच्या सर्व भागांतून हरेक प्रकारचे व प्रत्येक अंशमानाचे चमत्कार स्फुरत होते. त्यामुळें संदिग्धमतित्व अगर विस्मय उत्पन्न होत नसे. सर्व वाङ्मयांत चमत्कारांचें मूलतत्त्व व्यापून राहिलें होतें. सर्व अडचणी या मूलतत्त्वानें उलगडत असत, व त्या मूलतत्त्वानें सर्व मतांना पावित्र्य आलें होतें. कांहीं परिपाठाबाहेरची गोष्ट घडतांच तिचें कर्तृत्व अलौकिक शक्तीकडे दिलें जाई. याचें कारण असंभाव्य गोष्टीबद्दलची उत्कट वृत्ति हें कांहीं नव्हे, तर विश्वास पटण्यास असला उलगडा दुर्बोध शास्त्रीय तत्त्वाहून बराच साधा व सुलभ असतो हें होय. हल्लींच्या काळीं ख्रिस्ती धर्म ही अशी एक संस्था मानली जाते कीं, स्वतःविषयीं अगदीं करड्या नजरेनें शोध व्हावा ही तिची इच्छा आहे; व तिच्या अनेक कार्यांपैकींच सर्वप्रकारचा मानवी उत्साह उत्तेजित करण्याचा उद्देश, त्यांत जीव भरण्याचा उद्देश, हेंही तिचें एक कार्य आहे. मागच्या काळीं वरवर पाहणारास चमत्काराची कल्पना हा ख्रिस्ती धर्माचा अत्यंत प्रमुख विशेष वाटला असता; पण अजूनपर्यंत तिनें त्या धर्माचे जे भाग आक्रांत करून टाकले होते, त्या सर्वांतून तिला आजमितीस पार पळून जावें लागलें आहे व आतां तिची ज्योत अठराशें वर्षांच्या धुक्यांतून टुकटुक करीत लिकलिकत्ये आहे.

## कार्यकारणवादाच्या चळवळीचें जनकत्व.

(क० २०) या महत्त्वाच्या चळवळीचीं कारणें बहुविध आहेत. पुष्कळ काळपर्यंत अलौकिक म्हणून मानलेल्या घटनांचा नीट उलगडा करण्यांत व लहर लागेल तशी व मधून मधून ढवळाढवळ करण्याच्या कल्पनेच्या ऐवजीं संकलित व अभंग नियमाच्या कल्पनेची प्रस्थापना करण्यांत सृष्टपदार्थशास्त्रांस मिळालेल्या यशाकडे या चळवळीचें उत्पादकत्व येईल. अलीकडच्या निरीक्षक मनूच्या अमलाखालीं गरज वाटूं लागलेल्या पुराव्याच्या कडकपणांतल्या वाढीकडे व निरनिराळ्या राष्ट्रांतल्या पुराणांविषयीं व त्यांच्या उत्पत्तीच्या प्रकारांविषयीं अलांकडे झालेल्या शोधांकडेही

बऱ्याच अंशीं या चळवळीचें जनकत्व येईल. पण या योग्य मानतां येण्या-सारख्या कारणांत एका निराळ्या प्रकारच्या कारणाची भर पडते. हट-वादानें प्रतिपादलेल्या धर्मज्ञानाच्या वर्चस्वाचा व प्रचीतीचा ऱ्हास ही प्रपंच-प्रधान काळाची खूण आहे; व या ऱ्हासाबरोबरच मन चमत्कारांचा संबंध असलेल्या विषयसमूहांतून निघून चमत्कारांचा आपोआप तिटकारा करूं लागतें. लोकांच्या जीवनकार्यांत धर्मज्ञानाची जागा जेव्हां अत्यंत प्रमुख असते व जेव्हां त्याच विषयाकडे लोकांचे विचार साहजिकपणें धांव घेत असतात तेव्हां मन सरतेशेवटीं धर्मज्ञानमय होतें व तें धर्मज्ञानाच्या मापानें सर्व व्यावहारिक गोष्टी मोजूं लागतें. म्हणून जेव्हां धर्मज्ञान व बौद्धिक प्रयत्न यांचें आवार बहुतेक समान असतें, जेव्हां वाङ्मय राजनीति व कलाकौशल्य यांचा सर्व विस्तार केवळ धर्मज्ञानाचें हित-साधन करण्याकरितांच असतो व जेव्हां धर्मज्ञानाच्या सतत चिंत-नानें मनुष्याच्या कल्पनाशक्तींत सदा क्षोभ होत असतो त्या काळीं नमूद असलेल्या चमत्कारांविषयींची श्रद्धा सार्वत्रिक असते यांत कांहीं नवल नाहीं. सार्वत्रिक असणाऱ्या मानसिक वातावरणाशीं व रंगरूपाशीं असल्या चमत्कारांचा अगदीं मिलाफ असतो. चमत्कारांच्या गोष्टींकडे कल्पना-शक्तीचा नेहमीं ओढा असतो व ती आपल्या कल्पना विचारशक्तीवर तत्परतेनें लादित असते; तथापि जेव्हां धर्मज्ञानाच्या पदरमोडीनें व्यावहा-रिकाचा प्रांत विस्तृत होतो; जेव्हां समाजीभवनाच्या प्रगतीनें कला, वाङ्मय व शासनपद्धति हीं पुष्कळ अंशीं प्रपंचप्रधान बनतात; जेव्हां हटवादी पणाच्या गोष्टींपासून हजारों बौद्धिक प्रभावांनीं मन माग वळतें व जेव्हां या हटवादीपणाच्या गोष्टींचा माग घोटाळ्याचा होतो व त्याची प्रचीति येत नाहीं; तेव्हां हळूहळू विचाराला नवी सरणी लागते. मनाभों-वतीं प्रापंचिक आवरक बनत. संभाव्यतेचें माप बदलतें. पूर्वीं मनुष्यें जीवनक्रमांतील प्रत्येकगोष्टींत सदा निदिध्यास लागलेल्या धर्मज्ञानविषयक कल्पनां सारखें कांहीं तरी अनुभवावयास मिळेल अशी अटकळ करीत; पण आतां तीं प्रत्येक गोष्ट प्रापंचिक मापानें ठरवितात. पूर्वीं सर्व घडा-मोडींचा चमत्कारांच्या साहाय्यानें उलगडा करण्याकडे त्यांचा स्वाभाविक कल असे. पण आतां तो भौतिक शास्त्राधारें-काव्याकडे आहे. हा केवळ मानवी मनाच्या सामान्य धर्माचा परिणाम होय; हा धर्म सामाजिक

दळणवळणांत असंख्य वेळां प्रत्ययास येते. सैनिक, कायदेपंडित, विद्वान् यांच्या स्वतःच्या विशिष्ट धंद्यामुळें त्यांच्या विचारसरणीला एक प्रकारचें विवक्षित वळण लागतें, त्यांच्या विचारांचा एक प्रकारचा सांचा बनून राहतो.

### तत्कालीन वाङ्मयाचा स्वतंत्र विचारावर प्रभाव पडतो.

हें वळण किंवा हा सांचा कोणत्याही, स्वतःच्या प्रांतापासून अगदीं दूर असणाऱ्याही, विषयावर विचार करतांना दिसावयाचाच. तंतोतंत त्याचप्रमाणें धर्मज्ञानांत मग्न असणाऱ्या युगांत सर्व गोष्टींचा निर्णय धर्म-ज्ञानाच्या म्हणजे चमत्काराच्या मापानें व्हावयाचा, व बहुंशीं प्रपंचप्रधान युगांत तो निर्णय प्रापंचिक म्हणजे कार्यकारणाच्या मापानें व्हावयाचा. म्हणून चमत्कारांवरील विश्वासाच्या ऱ्हासाबरोबर जीवनक्रमाच्या इतक्या शाखांतून हटवादी मतांचें प्राबल्य साफ हद्दपार करणारा व इतर शाखांतून तें प्राबल्य संपुष्टांत आणणारा विचाराचा ओघ सर्वत्र वाहूं लागला हा कांहीं काकतालीय प्रकार नव्हे, असें मनांत येतें. अलीकडे ही वृत्ति इतकी प्रबळ झाली आहे कीं, तिची छाप प्रत्येक कळकळीनें विचार करणाऱ्यावर बसली आहे; मग तो व्यक्तिदृष्ट्या जरी या वृत्तीची आई जी हटवादी मतां-विषयींची बेपरवाई, तिला मान देणारा नसला तरी हरकत नाहीं. प्रथमा-रंभीं आपलीं मतें जीं बनतात तीं शिक्षण व साहचर्य यांनीं बनतात; या दुकलीच्या विशिष्ट प्रभावांतून स्वतःला मुक्त करण्यांत ज्याला म्हणून यश येतें, त्याला स्वकालीन वाङ्मयाची सामान्य गति व ओघ आपल्या मनाला बळकट ओढतो आहे असें आढळेल. या नियमाला थोडेसे अपवाद आहेत खरे. कांहीं बुद्धि अशा अपसारक शीलाच्या असतात कीं, आपल्या शेजारीं अमुक एक प्रकारच्या मतांचें अगर वृत्तींचें प्राबल्य आहे एवढीच केवळ गोष्ट तद्विरुद्ध मतांचें अगर वृत्तींचें अवलंबन करण्याला त्यांना पुरेशी होते; पण हे अपवादच. स्वतंत्र विचारानें मतें बनविण्याचा खरो-खर प्रयत्न करणाऱ्या बहुतेक माणसांची गोष्ट अशी असते कीं, तत्कालीन वाङ्मयाचा त्यांच्यावर आकर्षक व शासक प्रभाव पडतो, व हा प्रभाव अनिवार्य नसला तरी अत्यंत प्रबल असतो. परिस्थितीच्या योगानें ( या परिस्थितींची चिकित्सा करण्यासाठीं थांबण्याची जरूर नाहीं ) स्वकालीन

वाङ्मयाची चमक त्यांच्यावर अशा जोरानें व रोखानें येते कीं, तसा जोर व रोख गतकालीन वाङ्मयाच्या अंगीं नसतो. या स्वकालीन वाङ्मयांत संभिन्न असलेल्या सामान्य विचारसरणीनें त्यांच्या सर्व विचारांचा रंग पालटतो, त्यांच्या सर्व निर्णयांचा झोंक बदलतो व तिच्या परिणामाविषयीं जर कां ते बेभान असले तर तिच्या योगेंच त्यांचे सर्व निर्णय निश्चित होतात. सध्यां ही छाप विशेषेंकरून कार्यकारणात्मक आहे.

### ख्रिस्ती धर्मामध्यें पालट.

(क० २१) ज्या विचारौघाचें प्रस्तुत विवेचन चाललें आहे, त्यावरून सहज सुचलेला फार महत्त्वाचा एक आणखी विषय आहे. या विचारौघानें ख्रिस्ती धर्मपंथांचें रूप किती विलक्षण पालटलें आहे हें आपण पाहिलें. या विचारौघानें फक्त बाह्यस्वरूप व दर्शनी भागच पालटला असें नव्हे; तर आंतील विचारसरणीही पालटली. सर्व गोष्टींच्या चिंतनाचें साधन, विवेकमार्तंडाच्या किरणांचें वक्रीभवन करणारें धार्मिक आवरण पालटलें. हल्लींच्या सनातनपंथी देशांतही या विषयावरील प्रचलित असलेली विचारसरणी बाराव्या शतकांतल्या ख्रिस्त्यापुढें मांडतां आली असती तर तो म्हणाला असता कीं, इतक्या संपूर्ण पालटानें ख्रिस्ती धर्माचा सर्वस्वी नाशच होईल; असें तो म्हणाला असता याबद्दल कोणालाही शंका यावयाची नाहीं. वास्तविक म्हटलें तर यांतील बहुतेक फेरफार ख्रिस्ती धर्माची खुषी नसतां बाहेरून पडलेल्या दाबानें त्याच्यावर लादले आहेत; व धर्मोपाध्यायांनीं बहुतेकांनीं त्यांना विशेष विरोध केला आहे व त्यांचा निषेध केला आहे. यांनीं ख्रिस्ती धर्माची उलथापालथ होणार असें म्हणत धर्माला सुद्धां उत्कर्षाच्या कलापरंपरेंतून जावें लागतें असें नियतीनें ठरविलें असण्याची शक्यता आहे, हें मत ख्रिस्ती धर्माच्या अगदीं विरुद्ध होय असें जाहीर सांगण्यांत येई. आदर्शभूत धर्म सदा गतकाळीं होता; व अपकर्ष नव्हे तरी निदान अविकार्यता ही जीविताची नित्य स्थिति मानली जाई. या विरोधाविषयीं अनुभवाच्या स्वच्छ उजेडांत आतां आपणास बरें वाईट म्हणतां येईल. हटवादीपणाचीं मतें अवलंबणाऱ्या संस्था अत्यंत दुर्बळ झाल्या आहेत हें खरें; जीवनसंबंधी कार्यांच्या ओघावर त्यांची आतां छाप बसत नाहीं व त्याला त्या वळण लावूं शकत नाहींत. हटवादीपणाच्या

प्रश्नांसंबंधीं मागें एकदां आवेशयुक्त कळकळ दाखविणाऱ्या छळ, धर्मयुद्धें, खग्रासी वादविवाद, पवित्रविद्या, धर्मज्ञानाचें वाङ्मय या सर्व गोष्टी चटसाऱ्या नाहींशा झाल्या; किंवा त्यावेळच्या मानानें मोघवीर्य झाल्या; सर्व युरोपभर धर्मसंस्थेची सत्ता सर्वत्र दुर्बळ झाली व प्रत्येक राष्ट्रांत तेथल्या बौद्धिक उत्कर्षाच्या प्रमाणांत ती दुर्बळ झाली.

## ख्रिस्ती धर्माच्या सद्यःस्थितीचें महत्त्व.

ख्रिस्ती धर्माच्या सद्यःस्थितीचें महत्त्व धार्मिक इतिहासाच्या कसानें ठरवूं जातां, गतकाळच्या थोर विद्यामूर्तींच्या पुराणप्रियतेच्या आवेशाच्या मापानें मोजूं जातां, त्या धर्माच्या पुढील स्थितीविषयीं अत्यंत भय व निर्वेदत्व उत्पन्न होईल. धर्मपित्यांचा आवेश निर्विवाद मावळला. आथानेसिअस व आगस्ताईन यांचे दिवस गेले ते गेलेच, आतां ते पुनः यावयाची आशा नको. विचाराचा सर्व ओघ निराळ्याच दिशेनें वाहतो आहे. गतशतकामधल्या वादांचे घणत्कार आतां रित्या डेऱ्यासारखे विलक्षण खटखट आवाजानें कानावर येत आहेत. पण धार्मिक इतिहासलेखकांस सोडून देऊन नव्या करारांत नित्य जोरानें आज्ञापिलेल्या निव्वळ नैतिक कसोटीवर घांसून पहातां ख्रिस्ती धर्मानें प्रीति, उपकार, सत्याची कळकळ, यांचीं प्रत्यक्ष फळें उत्पन्न करण्याचें काम बंद पडलें आहे कीं काय असा प्रश्न करतां, मिळणारें उत्तर, ठरणारा निर्णय, फार निराळा होईल. उपकृतीच्या उत्कट वृत्तीनें दुःखाच्या व दुर्गुणाच्या तमोमय गुहांत उडी घालणें, निस्सीम सदिच्छानदाच्या फलद्रूप करणाऱ्या जलौघाच्या पाटानें पृथ्वीतलाच्या कोनाकोंपऱ्यासमुद्धां पाणी पाजून ओला करणें, मानवी प्राण्यांच्या सर्व जाती–पोटजातींना तीव्र व अमोघ सहानुभूतीच्या परिघांत आणणें, हा जर खरा ख्रिस्ती धर्म असेल; जातीपासून जात, राष्ट्रापासून राष्ट्र वियुक्त करणारे अडथळे नष्ट करणें, निदान कमजोर करणें, युद्धाच्या क्रूर घटकतत्त्वांपासून त्याची मुक्तता करणें, व सर्व प्रकारच्या अनित्य भेदांवर खऱ्या

बंधुत्वाच्या व मौलिक समतेच्या जाणिवेची छाप बसविणें, हा जर खरा ख्रिस्ती धर्म असले; विशेषतः सत्यासाठी सत्यावरच्या प्रीतीचें बीज रुजविणें, ज्यांचा आपला मतभेद असेल त्यांच्यांशीं सहनशील व प्रांजल वागणूक करण्याचा गुण उत्पन्न करणें, हा जर खरा ख्रिस्ती धर्म असेल; जर सत्य व निरोगी ख्रिस्ती धर्मांचीं हीं आतां सांगितलेलींच लक्षणें असतील; तर ख्रिस्ती धर्म सध्यां जितका बलाढ्य आहे तितका प्रेषितांच्या काळापासून अजूनपर्यंत कधींही नव्हता. आणि हटवादी मतांच्या संस्थांचा व धर्मोपाध्यायांच्या प्राबल्याचा ऱ्हास म्हणजे या सत्य व निरोगी ख्रिस्ती धर्माच्या उत्कर्षाचें कारण नव्हे; तरी माप खास होय.

# प्रकरण ३ रें.

## कार्यकारणवादाचा रामणीयक, शास्त्रीय, व नैतिक शाखांतील उत्कर्ष.

### भाग १ ला.

### रामणीयक शाखांतील उत्कर्ष.

उत्कर्षाचे तीन आधार.

(अनुसंधान) मागच्या प्रकरणांवरून पुढील गोष्टी इव्या तितक्या स्पष्ट झाल्या आहेत, अशी खात्री वाटते. युरोपांत चमत्कारांची जाणीव गेल्या तीन शतकांमध्यें एकसारखी उतारावर आहे; हा विचारौघ इतका सार्वत्रिक आहे कीं, त्याच्या तडाख्यांतून कोणताही धर्मपंथ अगर चमत्कारांचा प्रकार सुटलेला नाहीं; व त्याचीं कारणें शोधूं जातां तीं समाजाच्या सामान्य बौद्धिक स्थितींत जशीं आढळतील, तशीं त्या प्रश्नावर थेट मारा करणाऱ्या विशिष्ट वादप्रमाणांत आढळणार नाहींत. इतर थोर थोर ऐतिहासिक उत्कर्षाप्रमाणेंच याही उत्कर्षांत दोन प्रकारच्या कारणांचा विचार करावयाचा आहे. कोणत्याहि काळांतल्या मानवी सुधारणेंत खोल गढलेल्या कारणांपासून उद्भवणाऱ्या पूर्वग्रहांमुळें अगर प्रवृत्तींमुळें चळवळ उपजून जनमतौघाला अनिवार्य सामर्थ्यानें ठराविक दिशेनें वळण लागतें; व फक्त मोठमोठ्या जनसमूहांचाच व दीर्घकाळांचाच विचार केला तर त्या प्रवृत्ती बहुतेक स्वैर अंमल गाजवितात; व आणखी या सामान्य प्रगतीवर विशिष्ट परिस्थितींचा व वैयक्तिक बुद्धि-

सामर्थ्यांचा परिणाम होत असतो; व त्यामुळें प्रगतीला कधीं मागें हटावें लागतें. तर कधीं पुढें जाण्यास मदत होते; निरनिराळ्या देशांत व समाजाच्या निरनिराळ्या कक्षांत प्रगतीचें स्वरूप विशिष्ट बनतें; व जात्या संबंध नसणाऱ्या चळवळींशीं तिचा तात्पुरता संबंध जडतो.

## चमत्कारांच्या ऱ्हासाचीं दोन कारणें.

समाजाच्या संकीर्ण अवस्थेंतून उद्भवणाऱ्या असंख्य परिस्थितींमुळें चमत्कारांच्या ऱ्हासाच्या इतिहासावर कमी अधिक परिणाम झाला आहे, तरीही सर्वांवर ताण करणारीं दोन कारणें आहेत व तीं परस्पर निगडित आहेत असें दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. पैकीं पहिलें कारण म्हणजे भौतिक शास्त्रांमुळें उपजलेली नियंत्रणेची वाढती जाणीव; या जाणिवीनें प्रत्यक्ष जीवनक्रमांतील अगर इतिहासांतील सर्व घडामोडींचें कर्तृत्व अलौकिक शक्तीपेक्षां लौकिक शक्तींच्या हातीं अधिकाधिक देण्याकडे मनुष्याचा कल होतो. दुसरें कारण म्हणजे धर्मज्ञानाच्या वर्चस्वाचा ऱ्हास; हा ऱ्हास अंशतः खुद्द धर्मज्ञानांतर्गत कारणामुळें झाला; व अंशतः इतर विषयांच्या प्रचंड वाढीमुळें झाला; या ऱ्हासामुळें सर्व गोष्टींचें महत्त्व धर्मज्ञानाच्या मापानें ठरविण्यापेक्षां प्रापंचिक मापानें ठरविण्याकडे मनुष्याचा कल होतो.

## विश्वाच्या सृष्टिस्थितिविषयीं कल्पना पालटतात व तदनुरूप इतर विषयांतील विचारसरणी पालटते.

( क. १ ) पण अजूनपर्यंत कांहीं अंशीं आपण पाहिलें आहे व यापुढें आणखी स्पष्टपणें पाहूं तदनुसार चमत्कारांचा हा इतिहास म्हणजे एका अति विस्तृत चळवळीचा एक भाग अगर तिची एक कळा आहे. या विस्तृत चळवळीला अर्वाचीन स्वरूपांत कार्यकारणवाद हें नांव बहुधा देतात. चमत्कारांपासून मनुष्याला परावृत्त करणाऱ्या विचारसरणीनें इतर पुष्कळ विषयांवरचीं त्यांचीं मतें पालटतात. विश्वाचें नित्य शासन, परमेश्वराचें स्वरूप, ईश्वरी सामर्थ्यांचे दाखले याविषयीं जी कांहीं ठराविक कल्पना तीमधून चमत्कारांची अटकळ निघते. व या गोष्टींची कल्पना मानवी सुधारणेच्या वाढीनें थोडी

फार बदलते. कधीं कधीं हा बदल जुन्या मतांच्या उघड उघड त्यागानें नजरेस येतो. कधीं कधीं तो अर्थनिर्णायक पद्धतींत अगर प्रचीतींत पालट झाल्यानें दिसून पडतो; म्हणजे मनुष्यें बहुधा जुन्या शब्दांत नव्या कल्पना भरतात, अगर जुनीं मतें वस्तुतः लुप्त होऊं देतात. मानवी सुधारणेच्या प्रत्येक पृथक् कलेंत विश्वरचना व विश्वधारणा याविषयीं विशिष्ट व अनुकूल मतें असतात व त्यांकडे तत्कालीन लोकांचा ओढा असतो. जरी प्रतिभेमुळें अगर मानवी बुद्धिश्रेष्ठत्वाच्या आटोकाट प्रयत्नामुळें तत्कालीन परिस्थितींतून कांहींची तात्पुरती सुटका झाली, तरी सभोंवतालच्या प्रेरणांच्या दाबाला लवकरच पुन्हा स्वामित्व प्राप्त होऊन त्या काळाला अयोग्य अशा सत्यांचा प्रभाव मानवी सुधारणेची अनुकूल कळा पुनः उगवे तों शून्य राहील.

## या प्रकरणाचा उद्देश.

प्रस्तुत प्रकरणांत या उत्कर्षाच्या निरनिराळ्या कलांचा छडा लावण्याचा प्रयत्न होईल. म्हणजे परमेश्वराचें स्वरूप व विश्वाचें चालन या दोहोंविषयींच्या कल्पना ज्ञानप्रसारानुरोधानें कशा एकसारख्या बदलत आहेत, हें दाखविण्याचा व या होणाऱ्या बदलांच्या आधारभूत कारणांचें पृथक्करण करण्याचा प्रयत्न होईल.

## मानवी सुधारणेच्या आरंभापूर्वी वस्तुपूजा सुलभग्राह्य असते.

( क० २ ) एका अत्यंत थोर प्रमाणभूत माणसानें अशी कल्पना काढली आहे कीं, मानवी सुधारणेच्या अगदीं पहिल्या पायरीवरही न चढलेलीं माणसें सहज स्वीकारतील असा धर्म म्हणजे वस्तुपूजा अगर जडार्चन; आणि धार्मिक श्रद्धेच्या प्राथमिक स्थितीचें सामान्य चिह्न म्हणजे सर्व सम्मान जडाला अर्पण करणें व अंतर्वर्ति सामर्थ्याचा त्या जडावर आरोप करणें हें होय; असें मानण्यास सबल कारण खास दिसतें. जडाची जडता लक्षांत बाळगून त्याची पूजा करणें हा जडार्चनाचा अति हलका प्रकार झाला. कांहीं पवित्र ताईत वगैरे चिह्नें मनुष्यांच्या स्वभावाला धाब्यावर बसवून स्वांतर्वर्ति प्रभाव दाखवितात, अशी समजूत असणें हा जरी कमी तिरस्करणीय व सुधारलेला प्रकार असला तरी सुद्धां तो जडार्चनाचाच प्रकार दिसतो. याच प्रकारांत पेगन धर्मांतली जादूची पद्धत मोडते,

## वस्तूंवर अलौकिक सामर्थ्याचा आरोप.

( क० ३ ) या जादूच्या प्रकारानें कांहीं औषधींच्या अंगीं, कांहीं तंत्रांत, कांहीं शब्दांत अलौकिक सामर्थ्य आहे असें वाटत असे. तसेंच तें सामर्थ्य यांशीं स्पर्धा करणाऱ्या पण यासारख्याच ख्रिस्ती धर्मांत चटदिशीं शिरलेल्या पुष्कळशा भोळसर गोष्टींत आहे, असें वाटत असे. ख्रिस्ती धर्मांत प्रथम शिरलेला भोळा प्रकार म्हणजे सुळाची आकृति हा असावा. याचा स्वीकार ओळख, पवित्र आठवण, आदर वगैरेची खूण म्हणून झाला नाहीं; तर चमत्कार–सामर्थ्याचें शस्त्र म्हणून त्याचा अवलंब केला गेला; व धर्मपित्यांच्या लेखांत त्यानें केलेलीं प्रचंड कार्यें व आणखी त्याच्या वैभवाची प्रतिच्छाया उठविणाऱ्या पुष्कळ प्रतिमा व नमुने या सर्वांची गर्दीच उडून गेलेली आहे.

## शूलाचें सामर्थ्य.

( क० ४ ) उदाहरणार्थ, दुसऱ्या शतकाच्या आरंभींच्या एका लेखकानें स्मरण दिलें आहे कीं, शूलाच्या आकाराची डोलकाठी असल्यावांचून समुद्रावर सफर करतां येत नाहीं. शूलाच्या आकाराचें खोरें घेऊन खोदलें तरच जमीन सुपीक होते. मनुष्याचा देहही खुद्द त्याच पवित्र आकाराचा आहे. तसेंच मानवी चेहरा शूलाच्याच आकाराचा आहे. डोळे व नाक मिळून शूल बनतो. "आमच्या नाकांतून येणारा श्वास प्रभूनें पवित्र केला आहे (१)." असें जेव्हां जेरेमियानें म्हटलें तेव्हां बहुधा जेरेमियाच्या लक्षांत "डोळे व नाक मिळून शूलाची आकृति आहे" हेंच असावें; असें दिसतें.

## शुद्धिसंस्कारोदकाचा गुण.

इतक्याच विलक्षण व असंबद्ध कल्पना शुद्धिसंस्कारोदकाविषयीं झालेल्या आहेत. अर्भकांचा शुद्धिसंस्कार प्रेषितांच्या काळांत सुरू झाला नसला तरी निदान त्यानंतर थोड्याच वेळानें सुरू झाला आहे. या विधीचा गुण संस्कार्य अर्भक अगर त्याच्या जवळ असणारीं माणसें यांतून कोणाच्याही मनांतील सद्गुणांवर अगदीं अवलंबून असत नाहीं, असें मानीत; व कित्येकांच्या मतें केवळ पाण्यानेंच धार्मिक पालट उत्पन्न होतो, त्याला

परमेश्वराचें यावेळीं साहाय्य लागत नाहीं, कारण तें सामर्थ्य परमेश्वरानें जेव्हां पाणी निर्माण केलें तेव्हांच त्यांत घालून ठेविलें आहे (२).

'अप एव ससर्जादौ तासु बीजमवाक्षिपत्'.

विश्वरचनेंत पाण्याच्या पदवीचें अतुल वैभव या विषयावर अत्युत्कृष्ट वाक्चातुर्य प्रकट होत असे. सृष्टि होण्यापूर्वी अस्ताव्यस्ततेच्या तमोमय परिवेष्टनांत जग गुरफटलेलें होतें तेव्हां, आकाशगत तेजाला अस्तित्व प्राप्त झालें नव्हतें तेव्हां, अगर अनादिकाळच्या निर्मक्षिक स्थितीचा कोणाही जीवमान प्राण्यानें भंग केलेला नव्हता तेव्हां, उदक हें अघटिताकार भूगोलास परिवेष्टून परमेश्वराला स्वक्रोडावर धारण करण्यास योजिलेलें असल्यामुळें चिरकालिक प्रतिष्ठा व पावकता पावून संपूर्ण गुणाढ्यतेनें विराजमान झालें होतें. ईश्वरानें भूगोलापासून स्वर्गोल उदकानेंच पृथक केला. भूमि वंध्या व अनुषित असतांच जल आपन्नसत्त्व झालें होतें. मनुष्य निर्माण केला तेव्हां पाण्याचें महत्त्व ईश्वराचे लक्ष्यांतून गेलें होतें कीं काय असें सकृद्दर्शनीं वाटेल; पण या ठिकाणींही पोक्त विचारानें शंका निवारण होते. कारण सर्वशक्तिमान् परमेश्वरानें जेव्हां मृत्तिकेपासून मनुष्य घडविला, तेव्हां त्या मृत्तिकेंत तिचा पूर्वीचा म्हणजे पृथ्वींतला ओलेपणा कांहीं तरी शिल्लक असणें अवश्यच होय; पर्यायानें, त्या मृत्तिकेंत पाण्याचा अंश मिळवलेला होताच (३).

## हें जडार्चन तमोमय मध्ययुगांत ख्रिस्ती धर्मांतही अतिशय आढळतें.

जसजसें अज्ञान व बुद्धिमांद्य जास्त जास्त सार्वत्रिक झालें, तसतसा मानवी मनाचा ओघ नित्य वाढत्या वेगानें अशा दिशेनें वाहत गेला. धर्मज्ञानाच्या प्रत्येक शाखेंत हीच विचारसरणी लवकरच आढळूं लागली, व असंख्य मंत्र, ताईत यांचा उपयोग होऊं लागला. या मंत्रसिद्ध वस्तु नुसत्या अंगावर धारण केल्या असल्या म्हणजे मनुष्याला कोणत्याही जडमय व चैतन्यमय संकटापासून खात्रीनें बाध होणार नाहीं, अशी समजूत असे. जडार्चनाचें हें स्वरूप मध्ययुगांतील ख्रिस्ती धर्मातल्या पेक्षां पेगन धर्मांत कधीं जास्त प्रामुख्यानें आढळत होतें कीं काय असा प्रश्न उद्भवेल खरा.

## सुधारणेची पुढची पायरी: अमानुष आत्म्यांची कल्पना.

( क. ५ ) जेव्हां मानव केवळ जडार्चनाची स्थिति सोडून पुढें जातो, तेव्हां त्याची परमेश्वरस्वरूपाची पुढच्या पायरीवरची कल्पना मानवरूप असते. ही कल्पना गत कल्पनेशीं कित्येक अंशीं अत्यंत निकट संबंधाची असते; आणि थोड्या बहुत फरकानें ती पहिलीप्रमाणेंच बहुतेक सर्व सुधारणेच्या पहिल्या पायरीसही न पोंचलेल्या राष्ट्रांच्या धर्ममतांत भरलेली असते. जडाला सामर्थ्य व गुण आहेत, असें मानण्याचें ज्यांनीं सोडून दिलें ते तंतोतंत स्वतःसारख्याच प्रकृतीच्या अमानुष आत्म्याचें विश्व हें लीलास्थान आहे असें मानतात. कोणतीही असाधारण गोष्ट घडली, कीं ते ती अदृश्यशक्तीचें खास व एकाकी कृत्य मानतात; व या कृत्याचा रोंख अशाच एकाद्या एकाकी गोष्टीकडे असतो व उद्भव एकाद्या विशिष्ट मनोवृत्तीपासून होतो, असें ते समजतात. विद्युत्पात, दुष्काळ, सांथ हीं अमानुष कोपाच्या उकळीचीं फळें समजलीं जातात; व थोर आणि शीघ्र विभवप्राप्ति हें अमानुषप्रसादाचें चिह्न मानलें जातें.

## सुधारणेच्या तळपायरीवरील कल्पनादौर्बल्य.

(क० ६). पण याबरोबरच या स्थितींत मानवांना परमेश्वराच्या स्वरूपाचें चित्र अदृश्य मानवाहून भिन्नप्रकारचें मानण्यास कल्पनादौर्बल्यामुळें जसा प्रत्यवाय होतो, तसाच ह्या कल्पनादौर्बल्यामुळें प्रत्यक्ष प्रतिनिधीवांचून ईश्वरस्वरूपाच्या कल्पनेवर आपले विचार व वृत्ति एकाग्र करण्यासही अडथळा होतो; कारण जरी मानवी सुधारणेच्या प्रभावाखालीं आलेल्या माणसाच्या सहज शक्ति रानटी माणसाच्या शक्तींपेक्षां वरच्या दर्जाच्या असतात कीं नाहीं, हा वादग्रस्त प्रश्न असला तरी प्रत्येक काळांत बौद्धिक आवरणाचा सर्व माणसांवर इतका जलद व जोरानें परिणाम होतो कीं, पक्ववयाप्रत पोंचण्याच्या पुष्कळ अगोदर रानटी व मानवी सुधारणेच्या प्रभावाखालीं आलेल्या माणसांच्या वर्गांमध्यें कमावलेल्या शक्तींसंबंधानें फरक होतो तसाच सहज शक्तींसंबंधानें होतो इतकें तरी खास. रानटी माणसाहून सुधारलेल्या माणसाच्या अंगीं बुद्धिबळ, दीर्घकाळ व धिम्मेपणानें विचार करण्याची ताकद, अदृश्यावर मन एकाग्रतेनें स्थिर करण्याची शक्ति व इंद्रियगम्य पदार्थांच्या प्रतिच्छायांतून कल्पकतेची मुक्तता करण्याचें सामर्थ्य हीं असतात.

## मूर्तिपूजा हाच साधारणपणें रानटी माणसांचा धर्म कां ?

पण रानटी माणसाला त्या गोष्टींची कल्पना सुद्धां करतां येत नाहीं. अदृश्य परमात्म्याची प्रतिनिधीच्या साहाय्यावांचून पूजा करावयाची कल्पना रानटी माणसांपुढें मांडा, त्याला तिचें आकलनच होणार नाहीं. त्याच्या मनाला असल्या कल्पनेची कांहीं प्रत्यक्ष प्रचीति अगर जोर भासणार नाहीं; व त्यामुळें त्या कल्पनेची त्याच्या जीवितावर कांहीं छाप पडणार नाहीं. मूर्तिपूजा हा रानटी माणसांचा सर्वसाधारण धर्म असतो; याचें कारण एवढेंच कीं, त्याच्या बुद्धीला आकलन होण्यासारखी तेवढीच गोष्ट असते. आणि ही त्याच्या बुद्धीची स्थिति पालटेपर्यंत मूर्तिपूजा हाच त्याचा धर्म राहणार.

## मूर्तिपूजेचे दोन प्रकार.

( क॰ ७ ) मूर्तिपूजा दोनप्रकारची असूं शकेल. कधीं कधीं ती प्रगतीची खूण असते. निव्वळ जडपूजेपासून म्हणजे बहुधा पहिल्या पायरीपासून मनुष्य वर चढूं लागला म्हणजे तो जडाला बुद्धिमान् प्राण्याचें रूप जडावर कोरकाम अगर खोदकाम करून देतो. व असें स्वरूप दिल्यां वरच त्या जडाला दैवी धर्म आहे, असें म्हणतो. स्वरूप देण्यापूर्वी तसे दैवी धर्म आहेत, असें मानीत नाहीं. मात्र केवळ जडपूजा मावळून तिच्या जागीं मनुष्यरूप उदय पावतें. आणखी कधीं कधीं असें घडतें कीं, शुद्ध चैतन्यमय आत्म्याच्या कल्पनेला जाऊन पोंचलेला मनुष्य समाजांतील कांहीं क्षोभामुळें मानवी सुधारणेच्या खालच्या पायरीवर उतरतो. अशावेळीं पूजनीयांच्या प्रतिनिधींचें साहाय्य आपल्या कल्पकतेला देण्याचा तो प्रयत्न करितो. व लवकरच या प्रतिनिधींना अंतर्वर्ति-सामर्थ्य आहे, असें तो मानूं लागतो.

## कलांच्या इतिहासांत धर्मज्ञानाचा इतिहास.

( क. ८ ) वर सांगितलेल्या तत्त्वांवरून दिसून येईल कीं, आरंभींच्या मनुष्यरूप मूर्तींच्या पूजेच्या पायऱ्यांवर समाज असतां प्रत्यक्ष दिसणाऱ्या मूर्तींच्या पाटांतून धार्मिकभक्तीचें पाणी वाहतें; व म्हणून जोंपर्यंत त्याच पायऱ्यांवर समाज आहे, तोंपर्यंत धर्मज्ञानाचा खरा इतिहास अथवा निदान

धर्मज्ञानाच्या प्रवृत्तिमय व प्रत्यक्षीभूत भागांचा इतिहास, कलांच्या इतिहासांत सांपडण्यासारखा असतो.

## राष्ट्रीयधर्माचा राष्ट्रीयकलेवर प्रभावः पार्स, मिसर, हिंदुस्थान व ग्रीस.

( क. ९ ) ख्रिस्तीधर्माच्या सीमेपलीकडे सुद्धां असें उदाहरण क्वचितच सांपडेल कीं, राष्ट्रीय धर्मानें राष्ट्रीय कलेवर थोर प्रभाव गाजवला नाहीं. उदाहरणार्थ, सर्वसाधारण मानवी सुधारणेच्या वाढीबरोबर आपलें पाऊल राखण्यांत रामणीयकतेनें जेथें अगदीं विलक्षणपणें हार खाल्ली, अशीं दोन प्राचीन राष्ट्रें पर्शिया व ईजिप्त हीं होत. पहिल्या म्हणजे पार्स लोकांत अग्नीची पूजा असे; हा जसा जडपूजेचा अगदीं साधा तसाच अगदीं उदात्त प्रकार होता. पण तो इतका साधा व उदात्त होता कीं, टंककार्यें अगदीं फुकट झालीं. दुसऱ्या म्हणजे मिसर देशांतल्या लोकांतली कलाप्रवृत्ति जागच्या जागीं थिजून गेली; कारण त्यांच्या धर्मानें नाविन्य म्हणजे गुन्हा असें ठरविलें. शिल्प्याचा धंदा पिढीजाद व जबरदस्तीचा केला. विशसनाची मनाई करून शरीररचनाज्ञानाचें संपादन अशक्य केलें; व आपल्या सांकेतिक संभाराच्या योगानें प्रत्येक सृष्ट पदार्थाकडे तत्तन्निरीक्षणार्थ नव्हे, तर दुसऱ्याच कशाचा तरी प्रतिनिधि या दृष्टीनें पाहण्यास लोकांना शिकविलें. तसेंच आणखी, रामणीयकतेच्या अभिरुचीबद्दल विशेष प्रख्यात असलेल्या राष्ट्रांत ग्रीस व हिंदुस्थान हीं दोन राष्ट्रें शिरोमणीभूत होतीं. पण त्या दोहोंमध्यें महत्त्वाचा फरक आहे तो हाः--हिंदुस्थानांतील धर्म अत्यंत भीषण, अत्यंत निसर्गविरुद्ध व अत्यंत अद्भुत प्रदेशांत नित्य भराऱ्या मारणारा, असल्यामुळें हिंदुस्थानांतील कला सृष्टीपासून इतकी पूर्णपणें पराङ्मुख झाली कीं, सृष्टीचें अनुकरण करण्याची तिची सर्वशक्ति अस्तंगत झालीशी दिसते; व साध्या गोष्टींत हास्यास्पद व कल्पनातरंगनिर्मित गोष्टींची भेसळ झाली. उलट पक्षीं ग्रीस मधला धर्म प्रायः शुद्ध नैसर्गिक होता, व म्हणून ग्रीक कला म्हणजे केवळ निसर्गाला आदर्श बनविणारी झाली; व ती तशी बनल्यामुळें सर्व जगाला कित्ता घेण्यासारखी झाली (४).

## ख्रिस्ती कलेच्या इतिहासावरून धर्माच्या उत्कर्षापकर्षाचा छडा काढतां येतो.

(क० १० ) पण आपला विशेष संबंध सध्यां ख्रिस्ती कलेशीं आहे. व ख्रिस्ती कलेंत सुद्धां धार्मिक उन्नतीच्या निरनिराळ्या पायऱ्यांचें प्रतिबिंब अगदीं हुबेहुब वठलेलें आहे; व त्यामुळें श्रद्धेच्या क्रमिक कलांचाच केवळ नव्हे, तर प्रस्तुत उद्देशाच्या दृष्टीनें फारच जास्त महत्त्वाच्या ज्या धार्मिक प्रचीतीच्या क्रमिक कला, त्यांचाही छडा लावण्यास आपल्यास सामर्थ्य प्राप्त झालें आहे.

## पेगन कलेचा ख्रिस्ती कलेवर परिणाम.

पुन्हा पुन्हा दिलेल्या आज्ञा व अत्यंत भयंकर शिक्षा यांना धाब्यावर बसवून आरंभींच्या यहुदी लोकांच्या मूर्तिपूजेकडच्या नित्याच्या ओढाळपणानें समाजाच्या आरंभींच्या स्थितींत मूर्तिपूजेकडचा कल किती अनिवार असतो हें स्पष्ट दिसतें; व शिवाय त्या ओढाळपणामुळें ख्रिस्ती धर्माला चांगली सूचना मिळाली व या भयसूचनेचा ख्रिस्ती धर्मावर पहिल्यांदां तरी अगदींच पालथ्या घड्यावर पाणी असा प्रकार झाला नाहीं. अजूनपर्यंत कलांचा संबंध पेगनधर्माशीं होता; म्हणजे त्या कलांचे विषय, त्यांची प्रतिनिधिपद्धति व त्यांची प्रत्यक्ष सौंदर्याची धाटणी, सर्व कांहीं जुन्या पुराणांतून आलेलें होतें हें अगदीं खरें; तसेंच बरेच ख्रिस्ती शिल्पकार पूर्वींचे बहुधा पेगन धर्मांतले असल्यामुळें, त्यांनीं आपल्या नव्या क्षेत्रांत पुष्कळ प्राचीन कल्पना प्रविष्ट केल्या हेंही अगदीं खरें. पण जरी ही गोष्ट निर्विवाद असली, व जरी पेगन कल्पकता ख्रिस्ती संकेतपद्धतींत ज्या तत्परतेनें प्रविष्ट झाली त्या तत्परतेचा व बहुतेक धर्मपित्यांनीं पेगन दैवतांसंबंधीं जो रोख धरिला होता त्या रोखाचा अत्यंत विलक्षण व बोधप्रद विरोध असला, तरीही या आत्मसाक्षात्करणाच्या बहुतेक सर्व दाखल्यांत विवेचकता दिसत होती; व मूर्तिपूजेकडे वळवणाऱ्या कोणत्याही गोष्टीपासून परावृत्त होण्याची सर्वसाधारण इच्छा या कामीं फारच स्पष्ट दिसत होती. ख्रिस्ती कलेवर पेगन कलेच्या संप्रदायाचा झालेला अत्यंत महत्त्वाचा व अत्यंत उपयुक्त परिणाम तिच्या सामान्य स्वरूपांत दिसत होता.

## कबरेवरील कारागिरीनें मृत्यूची भयानकता नष्ट होई.

ग्रीक व रोमन लोकांत असा नित्य सक्त नियम असे कीं, कबरेवर काढलेल्या मूर्तिरचनेंत एकही दुःखमय मूर्तीला वाव द्यावयाचा नाहीं. प्राचीनांच्या प्रेतयात्रेच्या समयीं शोकाचें अतिशयोक्त व कृत्रिम प्रदर्शन होत असे खरें; पण एकदां का अस्थि व रक्षा पुरून टाकलीं कीं त्यावर बांधलेल्या कबरेवरून मृत्यूच्या स्वरूपांतली भयानकता साफ घालविण्यांत कारागिरानें आपलें कौशल्य योजणें हेंच त्याचें काम असे. सर्व कबरेभोंवतीं पुष्पहार, मदिरामत्तनर्तन, मृगया अगर रणसंग्राम, आनंदतरंगांत पोहणाऱ्या जीवनाचा प्रफुल्लितपणा, मनोविकारांचीं व उपभोगाचीं सर्व प्रकारचीं चित्रें यांची गर्दी असे; व ऋतुदेवतांच्या चित्रांवरून काळाच्या अपरिहार्य गतीची कल्पना येई; आणि कोपऱ्यांस शोभा देणाऱ्या मुखवासांवरून दिसे कीं, जीवित म्हणजे केवळ नाटकांतील भूमिका आहे; ती कांहीं थोडीं वर्षें नेकीनें दाखवावयाची व अखेरीस दुःख न करतां ती फेंकून द्यावयाची.

## शवदीर्घिकांवरील कारागिरी.

(क० ११) ख्रिस्तीधर्मांत या संप्रदायाची छाप फारच विलक्षण तऱ्हेनें दिसली. पहिल्यांदां ख्रिस्ती कारागिरी म्हणजे सर्व कबरेसंबंधाची होती. सुशोभित केलेल्या जागा म्हणजे शवदीर्घिका. देवालयाभोंवतीं सर्व बाजूंस प्रेतें पुरलेलीं असायचीं. पवित्र गूढांचा जेथें उत्सवसमारंभ होई, ती वेदी म्हणजे एकाद्या धर्मवीराची कबर होय (५). मध्ययुगांतल्या अगर अर्वाचीन कल्पनांनुसार असल्या परिस्थितींत उत्कर्ष पावलेली कारागिरी विलक्षण खिन्न व उग्र धाटणीची असावी अशी आपली कल्पना होईल; व जर छळाच्या प्रसंगोपात्त अत्याचारांचें स्मरण असेल तर ही अटकळ फारच दृढ होईल. ख्रिस्ती चितान्यानें भूषणांची वृष्टि केलेल्या समाधि-वेदीचा संबंध अति भयंकर व विविध दुःखाच्या स्मरणाशीं व तसाच कारागिराच्या बुद्धीला आकर्षण करण्यासारख्या वीरोचित दृढ व्रतांच्या प्रदर्शनांशीं होता. मनोवृत्तींनासुद्धां वारंवार कमालीचा पूर येई; व ख्रिस्ती वैरनिर्यातनाचे मोठाले भयानक देखावे चित्ररूपानें दाखविण्यांत यावे हें केवळ स्वाभाविक दिसतें.

## या कारागिरींत भयानक देखावे नसत.

तथापि असा प्रकार शवदीर्घिकांत यत्किंचित्‌ही नव्हता. धर्मवीर्यांचीं चित्रें बिलकुल कोठें नाहींत (६); पण याला दोन संशयात्मक अपवाद आहेत. पैकीं एक तर फारच अलीकडच्या काळांतला आहे. सभोंवतीं सिंह असून सुखरूप राहिलेला दानिएल, आयझाकचा अपुरा राहिलेला यज्ञ, जळत्या अग्नींत असून न भाजतां राहिलेलीं तीन मुलें व संत पितरला तुरुंगांत नेत आहेत तो देखावा, हीं एवढींच चित्रें प्रचलित असलेल्या छळाचें भयंकर स्वरूप दर्शविणारीं आहेत. क्लेशाचें स्वरूप निरंतर दृष्टीपुढें ठेवण्याकडे कल नव्हता; गाऱ्हाण्यांना अगर दुःखावेगाला उकळी फुटलेली नव्हती; वैरानिर्यातनाची तृष्णा नव्हती. येशूचें शूलारोपण अगर ख्रिस्ताच्या क्लेशांचा एकादा देखावा कधींहि चित्रनिविष्ट झालेला नाहीं, तसेंच न्यायाचा दिवस व नष्टांचे क्लेश हीं पण कधीं आलेख्यार्पित झालीं नाहींत. पेगन धर्माचें मोदस्थान ज्या कुसुममाला व पेगन पुराणांतील अत्यंत आनंददायी चित्रांपैकीं कांहीं चित्रें सुद्धां अद्याप राहिलीं होतीं; व यांचें आणि ख्रिस्ती आशांचीं सर्व अत्यंत मोहक चिह्नें व दयेच्या चमत्कारांपैकीं पुष्कळांचीं चित्रें यांचें संमिश्रण झालेलें होतें.

## ख्रिस्ती धर्मातले उग्र प्रकार कलेंत उमटले नाहींत.

दुःख, क्लेश व सूड यांचीं चित्रें निर्माण होण्यास इतर काळांहून जो अत्यंत योग्य दिसतो त्या काळींही तसल्या चित्रांना पद्धतशीर केलेल्या बंदीवरून प्राथमिक ख्रिस्ती धर्माचें जें स्वरूप प्रकट होतें तें विलक्षण हृदयद्रावक व विलक्षण उदात्त म्हटलें तरीही चालेलसें वाटतें. ही गोष्ट धार्मिक इतिहासांत अत्यंत महत्त्वाचीही आहे; कारण आपल्याला पुढें पहाण्याचा प्रसंग येईलच कीं, प्रथमारंभींच्या ख्रिस्ती धर्मज्ञानपंडितांपैकीं कांहींचा या गोष्टीच्या थेट उलट कल होता; हा कल म्हणजे नरकयातना, न्यायदिनाची शिक्षा, आणि थोडक्यांत बोलावयाचें तर, अखेरीस या धर्मसंस्थेंत वर्चस्व पावलेले व मनुष्यांच्या प्रेमवृत्तींवर अत्यंत हानिकारक परिणाम करणारे ख्रिस्ती धर्मातले सर्व उग्रतर प्रकार, असल्या विषयांवर विस्तृत विवेचन करावयाचें. सुशिक्षित धर्मज्ञानपंडितांची गोष्ट कशी कां असेना, पण जोंपर्यंत

त्यावेळीं लोकांच्या प्रचीतींची व्याहृती जी कला तिला निराळीच दिशा लागलेली होती, तोंपर्यंत हा कल सार्वत्रिक होणें अशक्य होतें. बऱ्याच अलीकडे दहाव्या शतकाच्या अखेरी अखेरीपर्यंत कारागिरींतला पालट पूर्ण-पणें दिसला नाहीं. न्यायदिनाच्या व क्रिस्तक्लेशांच्या चित्रांना त्याचवेळीं प्रथमच लाधलेल्या लोकप्रियतेकडे लक्ष्य वेधण्याचा या पुस्तकांत मागेंच प्रसंग आला आहे. आणखी असें म्हणतां येईल कीं, या काळापासून कारा-गिरांचा एक मुख्य उद्देश असा असे कीं नवे व भयंकर छळाचे प्रकार कल्पावे; व हे प्रकार श्रद्धावन्त लोकांपुढें नित्य विचार करण्यासाठीं धर्म-वीरांच्या इहलोकच्या व नष्टांच्या नरकांतल्या क्लेशांचीं अगण्य चित्रें काढून मांडावे ( ७ ).

## शववापिकेंतल्या कारागिरींतली लाक्षणिक पद्धति.

( क० १२ ) शववापिकांतील कारागिरींतला जो दुसरा मुद्दा विशेष करून आपल्या मनावर ठसा उठवतो तो हा कीं, त्या कारागिरीला संकेत-पद्धतीची मोठी आवड होती असें दिसून येतें. कुमारिका व ख्रिस्त यांचीं चित्रें मधून मधून एकाकी दृष्टीस पडतात खरीं; पण फार मोठा भरणा म्हणजे लाक्षणिक पद्धतीच्या चित्रांचा हें उघड दिसतें; व त्यांचा उद्देश केवळ बोधाचीं साधनें उत्पन्न करण्याचा दिसतो. या लाक्षणिक चित्रांपैकीं पुष्कळ पेगन धर्मांतून बिनधोक उचललेलीं आहेत. उदाहरणार्थ, एक अगदीं साधें चित्र म्हणजे मोराचें, मोर पक्षी ख्रिस्ती धर्मांतल्या लोकांत अगर ख्रिस्ताच्या धर्माच्या बाहेरच्या लोकांत अमरत्वाचें चिह्न म्हणून मानला जाई; कांहीं अंशीं कदाचित् मोर पक्ष्याच्या विशेष सौंदर्यानें व कांहीं अंशीं त्याचें मांस कधींच सडत नाहीं (८), या समजुतीनें ह्या पक्ष्याला प्राचीनांनीं आपल्या फिनिक्सच्या कल्पनेची बहुतेक प्रचीति देणारा म्हणून मानलें होतें व बादशाहिणीच्या प्रेतसंस्काराच्या वेळीं मृताच्या रक्षेंतून त्या पक्ष्याला कधीं कधीं मोकळा सोडीत (९). गायनाच्या नादानें सर्व माणसांस जवळ गोळा करणारा आर्फ्यूस (मुरलीधर) ख्रिस्ती-धर्माच्या आकर्षणशक्तीची सांकेतिक मूर्ति झाला(१०).पेगन धर्मांतले मुखवास आणि विशेषेंकरून आयुःक्षयाचीं चिह्नें म्हणून पेगन लोकांत मानलेले जे चंद्र-सूर्य त्यांचे मुखवास हे ख्रिस्ती पाषाणशवपेटिकांना सुशोभित करीत

होते; व यांपैकीं अखेरच्यांला बहुधा मृतोत्थानाचें निदर्शन मानीत. हीच गोष्ट ऋतुदेवतांची होती(११). देवतांचें प्रतिनिधित्व या एवढ्या एकाच स्वरूपाचें कांहीं नव्हतें. सृष्टीच्या प्रत्येक शाखेवर यांपैकीं कोणाचें तरी आधिपत्य असे, असें प्राचीन मानित; व प्रत्येक माणसाच्या अदृष्टाची पृथक् पृथक् देवता आहे असेंही पुष्कळांस वाटे. अगदीं साहजिकपणें ही कल्पना रक्षक देवदूतांच्या कल्पनेशीं जुळली (१२). देवतांचीं सौम्य व मुदित मुद्रा धारण करणारीं आणि कौमार वयांत असलेलीं, सपक्ष नग्न चित्रें काढण्याची पेगन पद्धत आरंभींच्या ख्रिस्ती कारागिरींत अगदीं साधारण झाली; व तेथून अलीकडच्या काळांत ती आली. हल्लींसुद्धां संत पितर देवळांत चांदणीच्या शिखरावरून पेगन देवता खालीं सनातन पंथी प्रगल्भ धर्मसंस्कारांचें अवलोकन करित आहेत. एक दोन ठिकाणीं ख्रिस्ती पाषाणशवपेटिकांवर ख्रिस्ताचें चित्र काढलेलें आहे; त्यांत एक मनुष्य आपल्या डोक्यावर जवनिका पसरित आहे; व आकाशावर विजयोत्साहानें उभा आहे; येथें आकाशावर म्हणण्यापेक्षां आकाशकटाहावरच्या पाण्यावर म्हणणें कदाचित् जास्त रास्त होईल. हें चित्र पेगन धर्मांतील नेहमींचें जलदेवतेचें चित्र होय (१३).

## केवळ ख्रिस्ती रूपकें.

पेगन धर्मांतून उघड उघड अनुकरणानें घेतलेल्या या रूपकांशिवाय मुख्यत्वें अगर पूर्णपणें स्वतः ख्रिस्ती-धर्माच्या निर्मितीचीं दुसरीं रूपकें होतीं. उदाहरणार्थ, ख्रिस्ताचेंच नित्याचें रूपक मत्स्य असे; कांकीं त्याच्या नांवाच्या व उपपदांच्या आद्याक्षरांनीं जो शब्द होतो (१४) तो ग्रीक-भाषेंतला मत्स्य या अर्थाचा शब्द आहे; व शिवाय ख्रिस्ती लोकांचें जीवित पाण्यानें केलेल्या शुद्धिसंस्कारामुळें सुरू होतें (१५). कधीं कधीं, पण फारच विरळा, काळवीटाची याच कामीं योजना करतात; कारण त्याच्या डोक्यावर शूलाच्या आकाराचीं शिंगें असतात; आणि असा एक जुना समज होता कीं, काळवीट हा सर्पांचा हाडवैरी होय; व तो सर्प शोधून काढून त्यांना ठार करतो (१६). रूपकस्वरूपाचे बायबलांतील पुष्कळ विषय पुन्हा पुन्हा योजीत असत. उदाहरणार्थ, नोहानें प्रार्थनेचें आसन केलें आहे; व आलेल्या कपोताला उराशीं धरलें आहे;

जोनाचा मत्स्यमुखांतून मोक्ष; मोशा पर्वताला ताडण करीत आहे; अधिकारयष्टि हातीं घेतलेला संत पीतर; तीन बालकें; सिंहाच्या गुहेंत शिरलेला दानिएल; सज्जन मेषपाल; शांतिकपोत; आशारूप जहाजाचा नांगर; धर्मवीराचा मुकुट; विजयतालवृन्त; दूरच्या बंदरीं जावयाला निघालेलें समुद्राच्या लाटांत गटंगळ्या खाणारें गलबत; नियुक्त स्थानाकडे भरधांव जाणारा घोडा; उघड उघड हीं सर्व रूपकें होतीं, तीं कधींहीं यत्किंचित् पूजार्ह अगर सम्मानार्ह झालेलीं नव्हतीं.

## रोमी पादशाहीचा भंग व रानटी स्वाऱ्या; त्यांचा कलेवर परिणाम.

( क० १३ ) तथापि जेव्हां ख्रिस्ती–धर्मांतला आरंभींचा पवित्रपणा जरा मलीन झाला, व युरोपांतल्या मानवी सुधारणाप्रगतीवर रोमी पादशाहीच्या पृथक्करणामुळें व रानटी लोकांच्या स्वारीमुळें विपरीत कळा आली, तेव्हां कारागिरीचें स्वरूप झटकन् पालटलें; व जरी पुष्कळ रूपकचित्रें अजून चालू राहिलीं होतीं, तरी कारागिरांत पूजनीयाचें प्रत्यक्ष चित्र तयार करण्याकडे व लोकांत त्या चित्राच्या ठायीं विशेष पावित्र्य मानण्याकडे नित्य वाढता ओढा दिसून येइ.

### दैवतत्रयीचीं चित्रें.

( क० १४ ) सनातन पंथांतल्या कारागिरींत मानवमूर्तींचे जे प्रकार आढळतात, त्यांपैकीं सध्यां सर्वसाधारण झालेल्या दैवतत्रयींतल्या प्रथम दैवताच्या मूर्तीइतका प्रतिरोधी पंथाला तिरस्करणीय वाटण्यासारखा बहुधा एकही प्रकार नाहीं. तथापि ही फार लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे कीं, हीं सर्व चित्रें ह्या मानानें अर्वाचीन आहेत; व हीं चित्रें अस्तित्वांत नव्हतीं (१७), त्याच काळीं युरोपचा भोळसटपणा अत्यंत गाढ होता. ही गोष्ट चालू शतकांतल्या कांहीं फ्रेंच प्राचीनवस्तुशोधकांच्या शोधांनीं मुख्यत्वेंकरून प्रस्थापित झाली आहे. जेव्हां ख्रिस्ती धर्मांतील धार्मिक साक्षात्कार दृश्यरूपकांनीं दर्शविण्याचा प्रघात होता, जेव्हां आत्मस्वरूपाविषयीं इतकी अवास्तव कल्पना होती कीं, कारागीर शुद्ध अमूर्त आत्म्यांना चित्रार्पित करण्यास क्षणभरसुद्धां कधीं कचरले नाहींत, व जेव्हां कांहीं विषय अत्यंत गंभीर व उदात्त म्हणून आपल्या बुद्धीच्या व्यापाराच्या पलीकडचे समजून मनुष्य त्यांपासून ज्या प्रकृतिसिद्ध पूज्यबुद्धीनें परावृत्त

होतात तसली पूज्यबुद्धि साफ अज्ञात होती, त्या काळीं दैवतत्रयींत त्या प्रथम-दैवताची म्हणजे जनक-ईश्वराची मूर्ति बनविण्याकडे यत्किंचित् कल आढळत नाहीं. जनक-ईश्वराचीं कृत्यें वारंवार चित्रार्पित झालीं खरीं; पण नेहमीं प्रथम-दैवताहून द्वितीय-दैवतच, म्हणजे जनक-ईश्वराहून पुत्र-ईश्वरच पुढें सरसावलेला दिसे.

## ख्रिस्ताचें चित्र.

ख्रिस्ताचें चित्र नव्या करारांतून घेतलेल्या प्रसंगांच्या चित्रांत त्याला लेववलेली मुद्रा, व पोशाख लेववूनच काढलें जाई. व त्याच्या चित्राच्या खालच्या बाजूस पुष्कळ वेळां सारभूत लेख असे. या चित्रांचे प्रसंग मानव-निर्मिति, आदाम व ह्व्वा यांना श्रम करण्याची शिक्षा देणें, नोहाशीं संभाषण, एब्राहामचा हात खिळून टाकणें, अगर मोशाला नियम घालून देणें (१८), असे असत. कधीं कधीं मेघांतून बाहेर दिसणारा हात व क्वचित् तो तेजोवलयानें वेष्टिलेला हे अपवाद म्हणून सोडून दिले तर कारागिराच्या कामांत जनक-ईश्वराचा पत्ता ह्या काळांत लागत नाहीं. प्रथमतः आपल्यास सहज कल्पना कारितां येईल कीं, ईश्वराची केवळ चैतन्यमय कल्पना व ज्यूपितरच्या नमुन्यानें उत्पन्न झालेला तिरस्कार हीं कारागिरांना असल्या विषयापासून परावृत्त करण्यास कारणीभूत झालीं असतील; आणि ख्रिस्ती-कारागिरीवर मोठा परिणाम घडविणारा व जुन्या करारांतल्या देवाचें देवत्व जोरानें नाकबूल करणारा ज्ञेयवाद त्याच दिशेकडे झुकला असेल.

## सहाव्या ते बाराव्या शतकांच्या दरम्यानचा कल.

पण सहाव्या व बाराव्या शतकांच्या दरम्यान असल्या कारणांना महत्त्व असण्याचा संभव फार कमी. कारण त्या शतकांचें जसजसें ज्यास्त चिकित्सा-पूर्वक परीक्षग करावें तसतसें ज्यास्त स्पष्ट कळून येतें कीं, त्या वेळचा सार्वत्रिक व अनिवार्य कल प्रत्येक चैतन्यमय कल्पनेला जडस्वरूप देण्याकडे, प्रत्येक सन्माननीय वस्तूची इंद्रियगम्य मूर्ति बनविण्याकडे, सर्व विषय इंद्रियांच्या साम्राज्याच्या चतुःसीमेंत आणण्याकडे होता. हा कल विचित्र-पणा अथवा अवमान यांच्या जाणिवेनें बाध न पावतां पाथरवटी काम, चितारकाम, व दंतकथा यांत सारख्याच जोरानें दिसत होता; व मूर्तिपूजा

आणि चित्रांचे सर्वमान्य सनातन उपयोग यांच्या दरम्यान असणारें अंतर दाखविणाऱ्या सर्व जुन्या विशिष्ट खुणा व चिन्हें प्रत्येक पूजनीयाची मूर्ति बनविण्याच्या व मूर्तीवर मूळच्या पूजनीयाचें थोडेंतरी पावित्र्य लादण्याच्या अनिवार इच्छेनें वस्तुतः साफ धुवून टाकलीं होतीं.

## बाराव्या शतकापर्यंत जनक-ईश्वराची मूर्ति नव्हतीशी वाटतें.

तथापि असल्या परिस्थितींतही सर्वेश्वराची मूर्ति बनविण्याचें कोणाच्या मनांत आलें नाहीं. समाजाच्या त्या स्थितींत मनुष्यांना मानवस्वरूपी देव पाहिजे होता, म्हणून मूर्तित्रितयापैकीं द्वितीय दैवताकडे अगर साधुसंतांकडे त्यांचें सर्व लक्ष्य वेधून राहिलें व त्यांनीं जनक-ईश्वराच्या थोर कल्पनेला वस्तुतः स्मृतिबाह्य होऊं दिलें. धर्मतत्त्वांत व धर्मज्ञानग्रंथांत ती कल्पना अर्थात् चालू होतीच; पण ती केवळ निष्फळ व निःसत्व भावनात्मकच होती. मानवांला घडलेल्या प्रत्ययांत तिला स्थान मिळालें नव्हतें व मानवी वृत्तीवर तिचा कांहीं परिणाम घडत नव्हता. मूर्तित्रितयापैकीं द्वितीय दैवतापासून जर माणसें परावृत्त झालीं असतील तर तीं केवळ संत व धर्मवीर यांची भक्ति करण्याकरितांच होत. आरंभीं आरंभींच्या पाषाण-शवपेटिकांवरील एक दोन चित्रें व नवव्या शतकांतील (१९) एक हस्तलेख हीं अपवादादाखल सोडून देतां, बाराव्या शतकापूर्वी जनक-ईश्वराची मूर्ति बिलकूल नाहींशी वाटते.

## जनक-ईश्वराची मूर्ति.

वाङ्मयाचें पुनरुज्जीवन जेव्हां ठळकपणें नजरेस पडूं लागलें, तेव्हां म्हणजे चवदाव्या शतकांतच काय तो या मूर्तींचा सुळसुळाट झाला (२०). तेव्हांपासून राफेलच्या काळापर्यंत जनक-ईश्वराला वाढतें महत्त्व देण्याकडे कारागिरीचा सारखा कल राहिला. पहिल्यांदां पत्थरकाम व चितारकाम यांत जनक-ईश्वराचें स्थान दुय्यम प्रतीचें असे; व त्याचें चित्र असें काढलेलें असे कीं, तो जें काम करतो आहे असें चित्रांत दाखविलेलें असे, त्याकडे पाहणाराचें लक्ष्य वेधण्या सारखें नसे (२१); व मूर्तित्रितयांतील दैवतांची समवयस्कता दाखविण्याच्या हेतूनें बहुधा त्याच्या पुत्राइतकेंच त्याचें वय दिसावें; असें तें चित्र असे.

## जनक–ईश्वराच्या चित्रांत पालट.

तथापि चवदाव्या शतकानंतर हळूहळू प्रत्येक चित्रांत जनक–ईश्वराची मूर्ति, ज्यास्त वयस्क, ज्यास्त सम्माननीय, व ज्यास्त प्रमुख आढळूं लागली; आणि अखेर तीच मूर्ति मध्यवर्ती, अग्रणी (२२) व स्वतःविषयीं पाहणाराच्या मनांत आदरातिशय उत्पन्न करणारी झाली. ही मूर्ति निरनिराळ्या देशांत तेथल्या पूज्यतेच्या आदर्शानुरूप बहुधा बनविण्यांत येत असे. स्पेनांत, इतालींत व फ्रान्सच्या गिरिपार मठांत जनक–ईश्वराची मूर्ति पोपाचार्यासारखी बनवीत; जर्मनींत बादशहासारखी, व इंग्लंदांत आणि फ्रान्सच्या बहुतेक भागांत राजासारखी बनवीत.

## दैवतांचा बहुसाळपणा.

( क० १५ ) दैवत मानवी स्वरूपानेंच फक्त प्रचीतीस येऊं शकतें, अशी जोंपर्यंत विचाराची अवस्था होती, तोंपर्यंत दैवतांची संख्या वाढत जावी हें अगदीं स्वाभाविक होतें. मानव व ईश्वर यांच्या प्रकृतींतला भेद बिलकूल भासमान होत नसे; व धर्मसंस्थेंतील अत्यंत प्रमुख विभूतींत ईश्वरी प्रकृतीचा अंश सहजगत्या प्रतिबिंबित करण्यांत येत असे. दैवतांच्या बहुसाळपणाचें ठळक उदाहरण म्हणजे कुमारीचें नांव दैवतांच्या यादींत दाखल करण्याकडे असलेला कल होय.

## स्त्रीदैवतांची कल्पना.

( क० १६ ) ईश्वरी पुरुषाची कल्पना अगर स्त्रीजातीचें प्रदर्शन हें पुराण्या यहुदी काबालिस्त ( गूढवादी ) लोकांच्या कल्पनांपैकीं आहे; पहिल्या शतकांत सायमन म्यागस यानें हेलिना नांवाची एक बाई आपल्या बरोबर फिरतीवर नेली होती. सनातनपंथाच्या मतें ही बाई म्हणजे सायमनची रखेली होती; दुसरी कोणी नव्हे. पण तो ती ईश्वरी विवेकितेचा अवतार म्हणून सांगत असे ( २३ ). ज्ञेयवादाच्या बहुतेक सर्व पोट–पंथांतून ही कल्पना निरनिराळ्या स्वरूपानें पसरली होती. सर्वेश्वर हा यहुदी लोकांच्या देवाहून अगदीं भिन्न, प्रायः त्याचा प्रतिरोधी, असें ज्ञेय-वादी ईर्ष्येनें म्हणत (२४); व त्याला ते "अज्ञात–जनक" असें नांव देत. मानवी ज्ञानाच्या आटोक्यांत तो अगदीं नाहीं, असें ते मानीत; पण कांहीं तद्भव अगर अंशावतार यांच्या योगें तो अंशतः

प्रकट होतो, असें ते समजत. तद्भव अगर अंशावतार यांपैकीं खिस्त व देवी सोफाया ( सरस्वती अगर विद्या ) अगर एन्नोइआ [ जिला कधीं कधीं प्रूनिस ( रति ) ( २५ ) हें विचित्र नांव देतात ] अशा दोन प्रमुख होत. कांहीं पंथांच्या मतें ही सोफाया म्हणजे केवळ मानवी आत्मा. हा मानवी आत्मा अगर जीवात्मा म्हणजे प्रथम परमेश्वराचाच अंश, तो परमेश्वराचेंच लेंकरूं, पण तो मूळच्या उगमाला सोडून भडकला; व त्याला भौतिक विषयांची आसक्ति उत्पन्न झाली; आणि तो मायाजालांत गुरफटला. आणि आतां तो मूलप्रकृतीपासून भ्रष्ट न झालेला जो दुसरा तद्भव खिस्त त्याच्या साहाय्यानें आपल्या मूळच्या शुद्ध स्वरूपाप्रत जाण्याची धडपड करीत आहे. पण साधारणपणें एका ईश्वरी गुणाचें मूर्तस्वरूप, एक विशिष्ट तद्भव, असें या सोफायेला समजत. ती खिस्ताची बहीण, इतर कांहींच्या मतें खिस्ताची आई होय, व ती त्याच्या इतकी अगर बहुतेक त्याच्याइतकी पूज्य होय.

## ज्ञेयवादाचें कार्य.

येणेंप्रमाणें सनातन पंथांतील मेरी-पूजा पूर्णत्वास येण्याच्या पुष्कळ अगोदर दोन भक्तिकेंद्रस्थ मूर्तींपैकीं एक मूर्ति जो स्त्रीरूपी आदर्श त्याच्या ठायीं चित्त तल्लीन करण्याचें वळण खिस्ती-जगाच्या मोठ्या भागाला लागलेलें होतें. त्या एका गोष्टीनेंच कांहीं अंशीं कुमारीला पुढें प्राप्त होणाऱ्या महनीयतेची वाट चोखाळली गेली; व हेंही सांगितलें पाहिजे कीं, पुराणाभिमान्यांच्या विचारसरणीवर ज्ञेयवादाचा विशेष व जोराचा परिणाम घडला. ज्ञेयवादाचा इतिहास लिहिणाऱ्या विद्वान् गृहस्थानें जोरानें प्रतिपादिलें आहे तदनुरूप ज्ञेयवाद म्हणजे खिस्ती धर्मांतला एक पाखंडी पंथ असें न मानतां खिस्ती कल्पनांना स्वसंग्रहांत प्रामुख्य देणारी एक स्वतंत्र रहस्योद्ग्राही तत्त्वज्ञान-पद्धति आहे, असें मानावें. बहुतेक सर्व पाखंडी पंथांमुळें पुराणप्रिय समाजांत एक प्रकारची तिरस्कारबुद्धि उद्दीपित झालेली आहे; व या तिरस्कारामुळें त्यांच्यांत पाखंडी-मतांच्या अगदीं उलट मतें उत्पन्न झालीं आहेत. पण ज्ञेयवादानें उलट कार्य केलें आहे. त्यानें जोराचा स्वाहाकारक व आकर्षक परिणाम केला आहे. आरंभींच्या धर्मज्ञानावर गहिरी छटा उमटविणाऱ्या तत्त्वज्ञानाच्या नव-प्लेतो पद्धतीला पुष्कळ

अंशीं ज्ञेयवादाच्या चौकांतून जावें लागलें आहे. रामणीयकसाधनांची दुसऱ्या कोणत्याच पंथानें या पंथाहून चांगल्या तऱ्हेनें किंमत ओळखली नाहीं; अगर अधिक कुशलतेनें त्यांचा उपयोग करून घेतला नाहीं. बार्देसेन्स व हार्मोनियसच्या मधुर गानांनीं त्यांचीं विशिष्ट मतें सीरियांतील पुराणाभिमानाच्या अंतर्दुर्गांत प्रविष्ट केलीं; व लोकांचीं मनें इतकीं मोहून टाकलीं कीं संत एफ्रेम हा सनातनपंथी कवि ज्ञेयवाद्यांच्या गानांना पुराणाभिमानाच्या पद्यांची जोड लावून त्यांचा अंगीकार करीपर्यंत मनाईच्या सर्व हुकमांस लाथ हाणून सीरियन देवळांत लोक तीं गात असत (२६). बहुतांशीं ज्ञेयवादांतून जनन पावलेल्या संदिग्धप्रामाण्य शुभवृत्तामुळें पुराणाभिमानी देवळांत चित्रें रंगविण्यास चिताऱ्यांना पुष्कळ दिवस विषयांचा पुरवठा होत असे ( २७ ). ख्रिस्ताच्या अवयवांची जी ठेवण व मुद्रा एका नमुन्याची ठरवून टाकली होती व जी कित्येक शतकें ख्रिस्ती जगांत पूजेला सत्पात्र मानली जाई, ती ज्ञेयवादी कारागिरांपासून (२८) उचलली होती असें मानण्यासही पुष्कळ आधार आहे. याखेरीज ख्रिस्ती धर्मांतल्या ज्या संघातक प्रभावाच्या मुख्य कल्पना त्यांचें रूपांतर अगर एकीकरण ज्ञेयवादानें उत्तम करून दाखविलें आहे.

## ख्रिस्ती धर्माचा विजय कसा झाला.

ख्रिस्ती धर्म ही जगांतली मध्यवर्ती बौद्धिक शक्ति झाली होती; पण ख्रिस्ती धर्माचा विजय प्रतिस्पर्धी धर्मांना मागें टाकल्यानें झालेला नव्हे, तर त्या धर्मांचा स्वाहाकार व रूपान्तर करण्यानें झालेला आहे. जुन्या संस्था, जुने संस्कार व जुन्या मूर्ति यांचें कलम नव्या धर्मावर केलें गेलें तरी त्यांतला जुनेपणा बराच कायम होता; नांवें व स्वरूप मात्र नवीन झालें. उदाहरणार्थ, ज्ञेयवादी पंथांतल्या रूपकपद्धतीपैकीं पेगन धर्माच्या निरनिराळ्या पंथांतून घेतलेल्या असंख्य कल्पना सोफिया देवतेशीं संलग्न झाल्या व चित्रें आणि सांप्रदायिक रूपकें यांच्या द्वारें त्यांपैकीं थोड्या तरी कुमारिकेकडेही संबद्ध झाल्या. तारकामुकुट मस्तकीं धारण करणारी निशा देवी ही दिवस व सर्व वस्तु यांची जननी होय; अशी जी प्राचीन मिसरी कल्पना ती, तारक अगर ओसिरिस यांची बहीण इसिस; अपालोची आई लातोना; आगामी वसंताची दीप्तिमती देवता फ्लोरा ( सीता,

पुष्पदेवता, वासंतीदेवी, वनश्री )-मे महिना हा एकाकालीं या देवतेला समर्पण केलेला समजत असत, पण आतां तो कुमारिकेला समर्पण केलेला असें समजतात; सिबील म्हणजे देवजननी ( अदिति )-हिच्यासंबंधीं जें भोजन होत असतें तें हल्लीं ज्याला कुमारीदिन म्हणतात त्या दिवशीं होतें;-ह्या सर्व गोष्टी नवीन आदर्शाशीं कमज्यास्त संलग्न होत्या (२९).

## कुमारी मेरीचें चित्र व महत्त्व.

( क० १७ ) पण ज्ञेयवादाला जरी सनातन पंथांतल्या मेरी-पूजेचा मार्ग तयार करणारा अगर तिचा अग्रेसर दूत असें मानतां येईल तरी तिचीं प्रत्यक्ष कारणें प्रस्थापित धर्माच्या परिघांतच आढळण्यासारखीं आहेत. पहिलीं दोन तीन शतकें जर मुख्यत्वें नैतिक रसिकतेचीं होत तर चवथें व पांचवें शतक हीं मुख्यत्वें हटवादी लक्षणांचीं होत. हीं लक्षणें विशेषतः ख्रिस्ताच्या ईश्वरी प्रकृतीला लावलीं जात व ह्या लक्षणांनीं स्वाभाविकपणें व खरोखर आवश्यकपणें पुढें लवकरच जिला अगदीं शब्दशः अर्थ घेऊन ईश्वराची पत्नी मानूं लागले, तिचें महत्त्व एकसारखें वाढवण्याला साहाय्य मिळालें. नेस्तोरिअन वादविवादांत त्या विषयावर आलेल्या भवतिनभवतींला बहुतेक शरीररचनाशास्त्राचें स्वरूप प्राप्त झालें ( ३० ). व लोकांच्या समजुतीनें मेरीचें महत्त्व विनाकारण कमी करणाऱ्या नेस्तोरिअसच्या मतांचा निषेध करतांना प्रस्थापित धर्मानें दाखविलेल्या जोरानें पुराणप्रिय लोकांतला आवेश उलट दिशेनें वाहूं लागला. इ० स० ४३१ त एफेससच्या परिषदेनें कारागिरांनीं कुमारिकेचें चित्र कसें काढावें हें ठरविलें ( ३१ ). कूर्चिका-कर्म व टंककर्म हीं धार्मिक प्रत्यक्षानुभवाचीं साधनें होत; या दृष्टीनें त्यांचें सदा वाढतें राहणारें महत्त्व आदर्शीभूत स्त्रीचे मनोहर गुण स्पष्ट व ठळक करण्यास कारणीभूत झालें.

## कुमारीच्या मातृत्वाचें चिह्न.

( क० १८ ) एकान्तीं ध्यान व ब्रह्मचर्य यांत मग्न असणाऱ्या वैखानसांच्या जीवनयात्रेंत, तसेंच ख्रिस्ती धर्मयुद्धांत अंगभूत असणारें जें भक्ति व उदात्त शौर्य यांचें विलक्षण मिश्रण त्यांतही या गुणांस अनिवार्य मोहकत्व आलें. कौमार्यभंगावांचून गर्भधारणा होते, हें मत या शेवटच्या काळीं प्रमुखत्व पावलें (३२). लवकरच पुण्डरीक ( पांढरें

कमळ ) निर्दोषत्वाचें चिन्ह म्हणून कुमारीच्या चित्रांत सामील झालें; आणि पांढरें कमळ खाल्ल्यानें पुरुषस्पर्शावांचून स्त्रिया गर्भवती होतात, ही समजूत वाढत जाऊन पुण्डरीक कमळांनी सुशोभित केलेला घट कुमारीच्या मातृत्वाचें चिन्ह झाला.

### स्त्रीजातीविषयींची हलकी कल्पना जाऊन उदात्त कल्पना प्रचारांत आली.

( क० १९ ) आदर्शानुरूप जग चालतें, व मध्ययुगांतील कुमारिकेच्या कल्पनादर्शाहून ज्यास्त खोल, एकंदरींत ज्यास्त श्रेयस्कर, ठसा उमटविणारा आदर्श क्वचित्‌च लाभला असेल अगर कधींच लाभला नसेल. स्त्रीजातीची योग्य पायरी तिला प्रथमतःच लाधली. दुःखाचें तसेंच अबलत्वाचें पावित्र्य प्रथमतःच उमजूं लागलें; यापुढें स्त्री म्हणजे पुरुषाच्या हातचें खेळणें अगर त्याच्या मालकीचा गुलाम, असली कल्पना स्त्रीविषयीं उरली नाहीं. यापुढें स्त्री म्हणजे कामपूर्तीचें व नरकपाताचें साधन असली कल्पना राहिली नाहीं. या वेळीं कुमारिका-जननीच्या रूपानें स्त्रीला प्रथमतःच उंच स्थान मिळालें व प्राचीनकाळीं कल्पना नव्हती इतकी पूज्यबुद्धि तिच्याविषयीं तयार झाली. प्रेम आदर्शीभूत झालें. स्त्रीगुणोत्कर्षाचा नैतिक प्रभाव व मोहकपणा यांची पूर्णपणें ओळख पटली. शीलाची नवीन भावना निर्माण झाली. नव्या प्रकारचा आदर वाढला. मागल्या काळच्या अगदीं उंच प्रतीच्या मानवी सुधारणेंतही माहीत नसलेल्या पावित्र्याची व सौम्यतेची कल्पना या आदर्शानें त्या पाषाणहृदयी, अज्ञानी व तमोमय काळांतही भिनली.

### या आदर्शाचा प्रभाव.

या आदर्शाचा प्रभाव आपणांस पुष्कळ प्रकारांनीं दिसतो. आपल्या स्वर्गीय संरक्षक देवतेच्या सन्मानार्थ पुष्कळ मठवासी भक्तांनीं लिहून ठेवलेल्या मूर्तिमती कोमलतेनें भरलेल्या लेखांनीं या आदर्शाचा प्रभाव दिसून पडतो. नाना देशांत व नाना काळांत त्या देवतेच्या चारित्र्यासारखें चारित्र्य तयार करण्याचें काम केवळ निष्फळ न झालेल्या इच्छेनें करणाऱ्या लाखों स्त्रियांच्या रूपानें तो दिसतो. मेरीच्या प्रीत्यर्थ ऐहिक वैभवावर व सुखावर लाथ हाणून मेरीच्या आशीर्वादास पात्र होण्याकरितां

उपासतात्रास, जागरणें, व्रतवैकल्यें व विनयानें दानधर्म करणाऱ्या पवित्र कन्यांच्या रूपानें तो लक्षांत येतो. मानापमानाची नवीन जाणीव, उदात्त धैर्यशाली पूज्यबुद्धि, रीतीभातींत आलेला सौम्यपणा, समाजाच्या सर्व कार्यांत आढळणारी रुचिसंस्कृति, या व इतर अनेक प्रकारांनीं त्या आदर्शाचा प्रभाव दिसून पडतो. सर्व युरोपांत उत्तम म्हणून जें कांहीं होतें तें सर्व त्या आदर्शाच्या सभोंवतीं गोळा झालें होतें; व मानवी सुधारणेच्या पुष्कळ शुद्धतम अंगांचें मूळ ह्या आदर्शांत आहे.

## कुमारीला पूज्यतमत्व प्राप्त झालें.

( क० २० ) पण या सर्वांचा मोबदला, कदाचित् आवश्यक मोबदला, म्हणजे कुमारीच्या कल्पनेचें स्वरूप उन्नत होऊन ती अत्यंत शक्तिमती, दयामयी, व सर्वव्यापी देवता आहे असें समजूं लागले. हरएक प्रकारचा चमत्कार करणारी, दुर्गुणाच्या अगर दुर्गतीच्या गर्तेच्या तळाशीं खिचपत पडलेल्यांचा उद्धार करणारी आणि सदासर्वदा दुःखितांचा कैवार घेण्यांत अत्यंत तत्पर व समर्थ असणारी, असें तिचें प्रतिबिंब दंतकथांत वठविलें गेलें. चितारी तिचें चित्र काढतांना देवतांना असतें तसें तिच्या मुखाभोंवतीं तेजोवलय काढीत; व ती आपल्या पुत्राच्या बरोबरीनें मनुष्याचा इनसाफ करीत बसली आहे, अगर स्वर्गांत आपल्या पुत्रावर आपलें वर्चस्वही राखीत आहे, असें तिचें चित्र रेखीत. लोक प्रार्थना करितांना सर्वशक्तिमान् परमेश्वराला जसें संबोधावें तसें तिला संबोधीत ( ३३ ). इतर संतांना याच प्रकारचा पण जरा कमी मान मिळे; हे संत लवकरच पेगनधर्मांतील दुय्यम प्रतीच्या देवतांच्या जागीं बसले; व पेगनदेवतांप्रमाणेंच जणूंकाय सर्वव्यापी मानून त्यांना मान मिळे व त्यांप्रमाणेंच यांचेंही विशिष्ट शरण्यताक्षेत्र असे.

## मूर्ती पूजासाधन नव्हे, तर पूजाविषय होऊन बसल्या.

आपल्या बौद्धिक स्थितीला आवश्यक असें जें अनेकदैवततत्त्व तें ख्रिस्तीधर्मांतर्गत देशांत याप्रमाणें पुनरुज्जीवित होत असतां त्या बौद्धिक स्थितीला सदा धरून असणारी जी मूर्तिपूजा, तिच्याकडे तितक्याच जोराचा कल आढळे. पूजेला केवळ साहाय्यभूत म्हणून खरोखर मूर्तींचा उपयोग आहे, असें तत्त्व प्रतिपादण्यांत येई; पण व्यवहारांत

व धर्मसंस्थेंतील उंच पदांवरच्या अधिकाऱ्यांच्या साधारण अनुमोदनानें मूर्ती लवकरच पूजेचा विषय होऊन बसल्या.

### पूजेचें साधन म्हणून मूर्तींचा उपयोग.

संबुद्ध पुरुषाच्या प्रत्यक्षीभवनाच्या आपल्या जाणिवेला ज्यास्त ठळकपणा आणण्यासाठींच जेव्हां माणसें दृश्य प्रतिमांचा उपयोग करितात व जेव्हां निरनिराळ्या प्रतिमांमध्यें जो त्यांना भेद वाटतो, तो त्यांच्या कल्पकतेला त्या प्रतिमांपासून मिळणाऱ्या साहाय्यांतील तीव्रतेच्या अगर खरेंपणाच्या न्यूनाधिक्यानें उत्पन्न होतो, तेव्हां तीं माणसें मूर्तिपूजा करीत नाहींत हें खास.

### पूजेचा विषय म्हणून मूर्तींचा उपयोग.

परंतु जेव्हां एखाद्या विशिष्ट मूर्तीच्या आंगीं कांहीं गुण आहेत ही कल्पना त्या मूर्तीवर लादण्यांत येते, जेव्हां एखादी मूर्ति चमत्कार करते व पारमार्थिक कल्याण करते व त्यामुळें इतर मूर्तींहून ती भिन्न होय असें म्हणूं लागतात, जेव्हां तत्प्रीत्यर्थ लांबलांबच्या यात्रा होऊं लागतात; व जेव्हां आपल्या केवळ अस्तित्वानें वेढा पडलेल्या शहराचा ती बचाव करिते अगर रोगाच्या सांथी व दुष्काळ निवारते असें मानूं लागतात; तेव्हां या कल्पनेंत व मूर्तिपूजेंत अंतर काय तें कळत नाहींसें होतें. पूजकाची भक्ति त्या मूर्तीवरच बसण्यास, तिच्याहून इतरांस वेगळें मानण्यास व तिच्या ठायीं अंतर्वर्ति सामर्थ्य आहे असें मानण्यास जें जें जरूर तें तें केलें जातें.

### मृतांचे अवशेष व चित्रें यांच्या महत्त्वाचें मूळ एकच.

( क० २१ ) मागच्याप्रमाणें ह्याही बाबतींतला बदल विशिष्ट परिस्थितीच्या जुळणीच्या साहाय्यानें बौद्धिक स्थितींतून उपजणाऱ्या समाजाच्या सर्वसाधारण कलामुळें झाला. ख्रिस्ती शकाच्या अगदीं आरंभींच्या काळीं छळ चाललेल्या ख्रिस्ती लोकांची अशी रीत असे कीं, धर्मवीरांचे अवशेष गोळा करून ठेवावे. या अवशेषांची त्यांना फार भक्ति असे; त्यांना ते पूज्य वाटत; याचें कारण कांहीं अंशीं कदाचित् मृतांचे आत्मे आपल्या समाधींभोंवतीं ओढाळपणानें घिरट्या घालीत असतात, असा जो लोकसमज तो असावा, व कांहीं अंशीं सज्जनांच्या अवशेषांविषयीं

आसक्ति उत्पन्न करणारी फार स्वाभाविक व स्तुत्य अशी जी आपली मनोवृत्ति ती असावी ( ३४ ). असलीच पूज्यबुद्धि लवकरच चित्रांपर्यंत पोंचली; चित्रेंही मृतांची स्मृति राखणारीं म्हणून अवशेषांशीं त्यांचा संबंध निकट होता.

### अलौकिक सामर्थ्य असणाऱ्या दोन प्रतिमा.

( क० २२ ) त्याकाळीं फार प्रबळ असणाऱ्या चमत्कारांकडच्या लोकांच्या ओढ्यानें लवकरच त्यांपैकीं कांहीं चित्रांचा अलौकिक गोष्टींशीं संबंध जुळला; व हा संबंध म्हणजे त्यांच्या पावित्र्याचा ईश्वरी साक्षात्कारच होय असा समज झाला. या प्रतिमांपैकीं दोन आद्यकाळच्या वादांत विशेष प्रमुख होत्या.

( क० २३ ) दंतकथेवरून कळतें कीं, पहिली प्रतिमा म्हणजे ख्रिस्तानें एदेसाचा ( ३५ ) राजा अब्गारस याच्याकडे पाठविलेली. ह्या प्रतिमेनें इतर कित्येक चमत्कार केले तसाच एकदां एदेसाला वेढा देणाऱ्या इराणच्या सैन्याच्या शहर उडवून देणाऱ्या अग्नियंत्रांचा साफ नाश करण्याचाही चमत्कार केला.

( क० २४ ) या प्रतिमेहूनही प्रख्यात म्हणजे ख्रिस्ताचा पुतळा होय. हा पुतळा फिनिशियांतल्या एका लहानशा शहरांत एका स्त्रीनें उभारला होता, असें म्हणतात; या बाईला रक्तस्राव होत असे तो ख्रिस्तानें बरा केला होता. या पुतळ्याखालीं एक नवीन प्रकारची वनस्पति उगवली व त्या पुतळ्याच्या आंगावरच्या वस्त्राच्या किनारीला येऊन मिळाली; व त्यानंतर त्या वनस्पतीच्या आंगीं कोणताही रोग बरा करण्याचें सामर्थ्य आलें. आणखी असेंही सांगतात कीं, ज्यूलियननें ह्या पुतळ्याचे तुकडे तुकडे करून टाकिले व त्याच आसनावर स्वतःचा पुतळा उभा केला; पण तो झटकन् वज्राघातानें तेथून उडवून दिला गेला ( ३६ ).

### रानटी लोकांच्या स्वाऱ्यांचा परिणाम.

( क० २५ ) लोकप्रवृत्ति अशी असतांनाच रानटी लोकांच्या स्वाऱ्या झाल्या व नंतर अल्पावकाशांतच त्या रानटी लोकांनीं ख्रिस्ती धर्म स्वीकारला. हे रानटी लोक पूर्वीं नेहमीं मूर्तिपूजा करणारे होते. त्यांच्या सुधारणेची

पायरी निकृष्ट असल्यामुळें परमेश्वराची कल्पना मनुष्यरूपावांचून इतर रीतीनें करण्यास अगर अदृश्यावर चित्त स्थिर करण्यास ते असमर्थ होते. व्यक्तिशः मन पालटून त्यांनीं ख्रिस्ती धर्माचा अंगीकार केला नव्हता, तर त्यांच्या नायकांच्या हुकुमांवरून केला होता. अशा या रानटी लोकांचे समूहांचे समूह ख्रिस्ती बनल्यामुळें त्यांच्या मनांला ज्या संवयी होत्या त्याच ख्रिस्ती धर्मांत प्रमुख होऊन बसल्या. या काळापासून मूर्तिपूजेकडचा ओढा अनिवार झाला. जुन्या मूर्तींची नव्या नांवांनीं पूजा होऊं लागली, व प्रेषितांच्या धर्मोपदेशाचें एक अत्यंत प्रमुख अंग व्यवहारांत साफ दृष्टीआड झालें.

## मूर्तिपूजेचा विरोधः चित्रांचा निषेध.

( क० २६ ) पण अर्थातच या सर्व गोष्टी घडून येतांना विरोध झाला नाहीं असें नाहीं. छळाच्या काळांत म्हणजे जेव्हां मूर्तिपूजेची भीति अद्याप प्रबळ होती तेव्हां मूर्तिपूजेच्या आंगाला जें जें झुके तें तें दक्षतेनें टाळलें जाई; व नाइसच्या पहिल्या परिषदेच्या पूर्वी स्पेनमध्यें इलिबेरिस येथें जी परिषद् भरली होती, त्या परिषदेंत एक नियम ठरला; ह्या नियमाचा वारंवार दाखल्यासाठीं उल्लेख झालेला आहे. या नियमानें देवळांत चित्रांचा प्रवेश साफ निषिद्ध मानला गेला; “नाहींतर ज्याची पूजा होते त्याचें भिंतीवर चित्र काढलें जाईल (३७).” ग्रीक लोकांत झालेल्या मानवीसुधारणेचे शेवटचे मंद किरण अजून मधून मधून त्यांमध्यें लिकलिक करीत होते; ते लातिन लोकांहून या बाबतींत कांहींसे वरतीं होते. असें म्हणण्याचें कारण हें कीं प्रतिमांच्या सन्मानाचा बहुधा ते निषेध करीत.

## मूर्तिभंजक पंथ.

( क० २७ ) तरीपण चित्रांचा सन्मान त्यांना मान्य असे (३८). प्रतिमापूजा जेव्हां सर्वसाधारण झाली होती तेव्हां इ० स० च्या आठव्या शतकाच्या आरंभीं मूर्तिभंजकांचा पंथ निघाला. चालू अनर्थाला तोंड देऊन या पंथानें जो पुष्कळ दिवस झगडा चालविला होता, त्यांत अतिशय क्रूरपणा व जुल्म असल्यामुळें जरी त्याला कलंक लागला आहे, तरी त्यावरून त्या काळच्या मूर्तिकरणाला अडथळा करण्यास निष्फळ पण जोराचे प्रयत्न झाले असें दिसतें.

## मूर्तिभंजकत्वाचा निषेध.

( क० २८ ) जिला सनातन पंथी लोक आतां सर्वलोकमान्य म्हणतात त्या नाइसच्या दुसऱ्या परिषदेनें जेव्हां या पाखंडाचा निषेध केला व मूर्तींचा सन्मान करण्याची मर्यादा पूर्वी ठरविल्यापेक्षांही पुढें नेली, तेव्हां शार्लमेन व ग्यालिकन चर्च यांनीं या परिषदेला असा अधिकारच नाहीं असें म्हटलें (३९) व तिच्या ठरावांना तिरस्कारपूर्वक दोष दिला. दोन तीन प्रख्यात फ्रेंच मनुष्यांनींही याच दिशेनें पृथक्पणें प्रयत्न केला ( ४० ).

## संत आगोबार्द व त्याचे ग्रंथ.

( क० २९ ) या प्रयत्नांपैकीं एकाविषयीं क्षणभर ज्यास्त विवेचन करूं; कारण तो प्रयत्न अत्यंत संस्मरणीय व अत्यंत अल्पज्ञात आहे व मध्ययुगांतल्या अत्यंत कार्यकारणविवेचकबुद्धीच्या एका पुरुषाशीं त्यामुळें आपला परिचय होतो. नवव्या शतकांतल्या काबालिस्तांना सोसाव्या लागलेल्या छळाचें वर्णन करितांना त्यांना संत आगोबार्द नांवाच्या लिआन्सच्या धर्माध्यक्षाच्या स्वरूपानें सन्मान्य मंडनकर्ता मिळाला असें सांगण्याचा प्रसंग आला होता. या धर्मोपदेशकाचें नांव सुद्धां आतां विस्मृतिसागरांत गडप झालें आहे ( ४१ ); व जर त्याचें स्मरण उरलेंच असेल तर तें त्याच्या आयुष्यांतल्या अत्यंत लज्जास्पद कृत्याच्या संबंधानें उरलें आहे. हें कृत्य म्हणजे लुइ दि माइल्दला पदच्युत करण्यांत त्यानें अंग घातलें होतें तें होय. तथापि कदाचित् एका स्कोतस एरिजेना खेरीज करून सबंध मध्ययुगांत आपल्या सभोंवतीं चालू असलेल्या भोळसटपणाच्या प्रकारांचा नायनाट करण्याच्या कामीं निरंतर इतक्या कळकळीनें व सामर्थ्यानें झटणारा दुसरा गृहस्थ साऱ्या ख्रिस्ती धर्मसंस्थेंत सांपडेल कीं काय हा प्रश्नच आहे. ज्या धर्माधिकाऱ्यानें नवव्या शतकांत गारांची वृष्टि व मेघांचे गडगडाट होण्याचें कारण आध्यात्मिक मानणाऱ्यांचा मूर्खपणा उघडकीस आणण्यास एक ग्रंथ लिहिला, घुरें वगैरे चमत्कारिक रोगांविषयीं लोकांच्या समजुती थोड्या अंशानें तरी सौम्य करण्याकरितां दुसरा ग्रंथ लिहिला, दिव्यें करण्यांतला वेडेपणा उजेडांत आणण्यासाठीं तिसरा ग्रंथ लिहिला व प्रतिमापूजनांतल्या मूर्तिपूजातत्त्वाचा निषेध करण्यास्तव

च्चवथा ग्रंथ लिहिला, त्याचें बुद्धिसामर्थ्य केवढें अचाट होतें, हें शतकाचें स्वरूप ज्यांना कळलें आहे त्यांना दाखविण्याला फारसें लिहावयाला नको.

## आगोबार्दचें मूर्तिपूजानिषेधक प्रतिपादन.

या क्षेत्रटल्या म्हणजे मूर्तिपूजेसंबंधाच्या ग्रंथाच्या आरंभीं आगोबार्दनें प्रतिमांच्या योग्य उपयोगाविषयींचे धर्मपित्यांचे व प्रारंभींच्या परिषदांचे पुष्कळ उतारे एकत्र करून दिले आहेत. जोंपर्यंत प्रतिमांचा संस्मृतीसाठीं उपयोग करण्यांत येई, तोंपर्यंत त्याबद्दल हरकत नव्हती. पण लोकभक्तीनें ही मर्यादा ओलांडल्याला पुष्कळ काळ लोटला. मूर्तिपूजा व मूर्तिकरण जिकडे तिकडे पुनरुज्जीवित झालीं व दृश्य प्रतिबिंबाच्या ठायीं भक्ति स्थिर झाल्यामुळें अदृश्यावरची निष्ठा कमी होऊं लागली. धर्मातिक्रमी मनुष्यांनीं मूर्खपणा करून कांहीं प्रतिमांना पवित्र हें विशेषण लावण्याचें धाष्टर्य केलें (४२); यांत त्यांनीं केवळ ईश्वरास द्यावयाचा मान आपल्या हातच्या कृतीस दिला व ज्यांत नुसता जीवही नाहीं अशा वस्तूंवर पावित्र्य लादलें. प्रतिमेंत ईश्वरी पावित्र्य भरलेलें आहे असा आपला विश्वास नाहीं (४३) व ज्याची ती प्रतिमा त्या पुरुषाची त्या प्रतिमेच्या द्वारें आपण पूजा करितों असें कधीं कधीं पूजकांनीं सांगण्यानें या प्रघाताचें समर्थन होत नाहीं. कारण जर प्रतिमा ईश्वरी नव्हे तर तिची पूजा होतां नये. ही सबब म्हणजे केवळ सैतानाची एक युक्ति आहे(४४). सैतानाच्या मनांतली नेहमींची इच्छा अशी कीं, मनुष्यांनीं सोडून दिलेल्या मूर्तींकडे त्यांना संतांच्या सन्मानाच्या निमित्तानें माघारें ओढावें. जे स्वतःच पवित्र आत्म्याचीं आलयें अतएव कोणत्याही मूर्तीहून श्रेष्ठ, जे स्वतःच परमेश्वराच्या खऱ्या प्रतिमा, त्यांच्याकडून कोणत्याही मूर्तींचा मान होण्यास ती पात्र नाहीं. चित्र म्हणजे अनाथ व निर्जीव. कल्याण अकल्याण करण्याचें सामर्थ्य त्यांत नाहीं. मनुष्यांतील जो अधम भाग म्हणजे शरीर त्याचें प्रतिबिंब म्हणूनच काय असेल तेवढी चित्राची किंमत; चित्र कांहीं मनुष्याच्या मनाचें प्रतिबिंब नव्हे. मृतांबद्दलची प्रीति आर्द्र राखण्यासाठीं स्मृतिचिन्ह म्हणून होईल तेवढा त्याचा उपयोग. जर याहून जास्त त्याची थोरवी वाढली, तर त्याला मूर्तीचें स्वरूप आलें; व तसें स्वरूप आलें ( म्हणजे तिची पूजा होऊं लागली )

९ तिचा नाश, तिचा भंग, केला पाहिजे. तर मग पितळी सर्पाशीं पवित्र कल्पना संलग्न असतांही त्यांना धाब्यावर बसवून त्या सर्पाचा हेजेकियानें साफ चुराडा केला तें योग्यच केलें; कारण त्याची पूजा होऊं लागली होती. इलिबेरिसच्या परिषदेनें व अलेक्झांद्रियाच्या (४५) ख्रिस्ती लोकांनीं देवळांत मूर्तींचा प्रवेश होऊं देणें मना केलें तेंही योग्यच केलें; कारण असल्या मूर्तींची सरतेशेवटीं पूजा होऊं लागणार असें त्यांना स्वप्नच पडलें होतें व धर्ममतांतर म्हणजे केवळ मूर्त्यंतर होणार असा त्यांनीं पूर्वींच कयास केला होता. जर संतांच्या मूर्तींची पूजा होऊन भोळसटपणाच होत असेल तर त्या मूर्तींचा अवज्ञापूर्वक भंग करण्याहून संतांचा अधिक योग्य मान तो कोणता? (४६)

### या विचारांचें महत्त्व.

हे विचार कोणत्या काळीं व कोणत्या दर्जाच्या माणसानें प्रकट केले हें मनांत आणलें असतां ते अत्यंत संस्मरणीय होत हें कोणीही कबूल करील असें वाटतें. सारागोसाच्या अगर लारेतोच्या देवळांतून नुकत्याच बाहेर आलेल्या कोणत्याही प्रतिरोधी पंथाच्या गृहस्थानें सनातन पंथाच्या पाखरेखालीं झालेल्या मूर्तिपूजेचा निषेध या मध्ययुगांतील संताहून तीक्ष्ण अगर भेदक वक्तृत्वानें कधींही केलेला नाहीं. पण जरी आपल्या काळच्या साधारण स्थितीहून वर चढण्याचा जो प्रख्यात व्यक्तींचा पृथक् प्रयत्न तो उमगून काढणें फार मजेचें असलें, तरी त्या प्रयत्नाचा परिणाम बहुधा केवळ अल्पच असतो. मध्ययुगांतल्या विचारसरणींशीं मूर्तिपूजेचें इतकें तादात्म्य होतें व विश्वचालनाविषयींच्या प्रचलित कल्पनेशीं आणि सर्व विषयांत दिसून येणाऱ्या जडीकरणाच्या संवयींशीं मूर्तिपूजेचें इतकें सारूप्य होतें कीं, सरळ तर्कशास्त्राच्या कोणत्याही पद्धतीनें तिचा उच्छेद होणें शक्य नव्हतें; आणि समाजाच्या बौद्धिक स्थितींत मुळापासून फरक झाला, तेव्हांच शेवटीं तिचें उन्मूलन झालें.

### महंमदी धर्माला मूर्तिपूजानिषेधांत यश आलें हा ऐतिहासिक विकासाला अपवाद दिसतो.

(क० ३०) तथापि मानवी सुधारणेच्या आद्यस्थितीच्या संधिप्रकाशांतून अजून बाहेर न निघालेल्याच लोकांवर बहुशः पगडा चालविणारा असूनही

आपल्या भक्तांना मूर्तिपूजेपासून दूर राखण्यांत यशस्वी झालेला एक मोठा धर्म झाल्याचा दाखला आहे, ही गोष्ट कबूल केलीच पाहिजे. महंमदी धर्माचें वैभवसर्वस्व होऊन बसलेली व त्या धर्माच्या संस्थापकाच्या अलौकिक बुद्धिमत्तेची अतिशय ध्यानांत ठेवण्यासारखी साक्ष पटवणारी ही गोष्ट ऐतिहासिक विकासाच्या सामान्य नियमांच्या इतकी उलट दिसते कीं, क्षणभर तिच्या कारणांची चिकित्सा करणें बरें.

## या यशाचीं कारणें.

(क० ३१) तर मग प्रथमच लक्षांत घेतलें पाहिजे कीं, महंमदी धर्मानें ज्या आवेशामुळें दिग्विजय गाजविला तो आवेश मुख्यत्वें क्षत्रिय कोटींतला होता. त्या धर्माच्या अनुयायांच्या पराक्रमाच्या दीप्तिमुळें लोक त्या धर्माकडे एकदम व बिनशर्त ओढा घेत; व आपल्याशीं संबंध आलेल्या सर्व धर्मांविरुद्ध केवळ लढण्याचें आपलें व्रत त्यानें जाहीर केलें होतें; म्हणून रानटी लोकांशीं घडलेल्या ख्रिस्ती धर्माच्या व्यवहारांत दिसणाऱ्या हळू हळू शोषून घेण्याच्या, मनवळवणीच्या, तोडजोडीच्या व एकीकरणाच्या क्रियेसारखें त्या धर्माच्या इतिहासांत कांहीं दिसत नाहीं. दुसरें, कुराणाचा एक महत्त्वाचा विशेष असा आहे कीं, कुराणानें मनुष्यांना अदृश्याची प्रचीति यावयाला साह्य करण्याची अत्यंत दक्षतेनें व कौशल्यानें खटपट केली आहे. कुराणांत फार तपशीलवार बारकाईचीं व हुबेहुब वर्णनें असून शिवाय कोणत्याही देशांतील व विशेषेंकरून महंमदी धर्माचें मूळ खोल गेलेल्या देशांतील माणसांच्या कल्पकतेवर अति बळकट परिणाम करणाऱ्या इंद्रियविषयक मनोवृत्तींना उद्देशून केलेल्या जोराच्या अभ्यर्थनांची त्यांत भर पडली आहे. मूर्ती मना करणाऱ्या कोणत्याही इतर धर्मांत कल्पकतेला द्यावा लागणारा ताण इतका अल्प नाहीं (४७).

## मूर्तिपूजानिषेधासाठीं मूर्तिकरणाला मनाई.

शेवटीं मूर्तींच्या मनाईची मर्यादा इतकी दूर गेली होती कीं, मनुष्य व इतर प्राणी यांतून कोणाचेंच चित्र करावयाचें नाहीं; मग त्यांचा संबंध धर्माशीं बिलकूल नसला तरी सुद्धां ही मनाई आहेच (४८). महंमदाला स्वच्छ कळून चुकलें होतें कीं, मूर्तिपूजेपासून आपल्या अनुयायांस परावृत्त करणें असेल तर त्यांना मूर्ति तयार करण्याचीच बंदी करणें अगदीं आव-

श्यक आहे; आणि त्यानें हें काम इतक्या अचूक व कडक आज्ञा सांगून केलें आहे कीं, त्या आज्ञांचा भंग किंवा टाळाटाळी करितां येणें क्वचितच शक्य होतें.

## त्यामुळें कलेची अत्यंत हानि झाली.

यापमाणें त्यानें आपल्या धर्माला मूर्तिपूजेपासून अलिप्त राखलें; पण त्याला कलेचा वैरी करुन ठेविलें. या वैरामुळें कलेची केवढी हानि झाली आहे हें सांगणें शक्य नाहीं. खरोखर स्पेनमधल्या मूर लोकांनीं आपणांस कलेचें जें एकच स्वरुप मना केलेलें नव्हतें त्यांत, म्हणजे वास्तुकलेंत, जी विलक्षण निपुणता मिळवली ती व विशेषेंकरुन आल्हम्ब्राची नक्षी व सेविलचा आल्काथार, यांवरुन त्यांच्या आंगीं रामणीयक सामर्थ्य एवढें जबर होतें कीं, त्यावर कोणा क्वचितच कडी केली असेल असें दिसतें. मूर लोकांच्या या कारागिरींत प्राणिप्रतिमा मोठ्या दक्षतेनें टाळल्या असूनही वनस्पति, पुष्पें, कुराणवचनें व भूमितींतल्या आकृति अत्यंत मोहक सौंदर्याच्या नक्षीनें ग्रथित केल्या आहेत ( ४९ ).

## ख्रिस्ती धर्मानेंही कलेला उत्तेजन दिलें नाहीं.

( क० ३२ ) महंमदी धर्मानें कलेची आहुती दिली; पण मध्ययुगांत ख्रिस्ती धर्म तरी तिला अनुकूल होता असें कोठें म्हणतां येतें ? जेव्हां ख्रिस्त व संत यांचीं चित्रें अत्यंत पवित्र मानीत तो काळ म्हणजे तंतोतंत तोच काळ होय कीं, ज्यांत कला या शब्दाच्या अत्युच्च अर्थानें पाहिलें तर कला बिलकुल नव्हतीच, अगर निदान प्रत्यक्ष पूजाविषयक वस्तूंशीं तिचा संबंध नव्हता. मध्ययुगांत मधून मधून फार सुंदर देवळें तयार झालीं खरीं; त्यांना शोभा आणण्यासाठीं बऱ्याच कळकळीनें जाळीदार कामाची कमावणी करण्यांत आली; तशीच पुनः पांचव्या शतकांत व मांत क्यासिनो येथें ग्रीक कारागिरांची शाळा अकराव्या शतकांत स्थापिल्यावर या जाळीदार कामाची कमावणी झाली व त्यांत बरेंच यश आलें ( ५० ). असेंच कौशल्य देवळांतील सोन्याच्या दागिन्यांत ( ५१ ) व हस्तलिखित पुस्तकांतील चित्रांत ( ५२ ) दाखविण्यांत येई; पण प्रतिमा, चित्रें व ताईत यांना सदा मिळणाऱ्या सन्मानानें कलेला सार्वत्रिक उत्तेजन मिळणें दूरच

राहिलें; व ही गोष्ट सकृद्दर्शनीं विचाराचा घोटाळा करणारी दिसली, तरी खरोखर अगदीं स्वाभाविक होती.

भक्ति निराळी व रामणीयक मनोवृत्ति निराळी.

( क० ३३ ) कारण रामणीयक मनोवृत्ति व भक्ति या इतक्या अगदीं भिन्न आहेत कीं, एकाच क्षणीं मनावर दोघींची छाप बसणें अशक्य आहे; व दोघींचा निदिध्यासित विषय एकच असणें फार दुर्घट आहे. चित्र वीथिकेच्या दर्शनानें मनावर होणारा परिणाम व धार्मिक पूज्यबुद्धि हीं एक नव्हत; व कोणत्याही धर्मांत कलाभिरुचीला(५३) पसंत त्याच मूर्ती भक्तप्रिय नसतात. या भक्तप्रिय मूर्ती, त्यांच्या फार जुनाट-पणामुळें, अगर त्यांच्याशीं संलग्न असणाऱ्या दंतकथांमुळें, नाहींतर त्या अगदीं स्थूलमानानें यथातथप्रतिकृतीच्या स्वरूपाच्या असल्यामुळें, पूज्य झालेल्या असतात. मनुष्याच्या पूर्ण आकारांच्या लांकडी रंगीत पुतळ्यांची लोकांना बहुधा फार आवड असते; पण खऱ्या कलाभिरुचीच्या ते इतके विरुद्ध असतात कीं, त्यांत कलेचें चांगलें कसब क्वचित् दिसतें. उत्तम कसब तर कधींच दिसत नाहीं; याला अपवाद एक स्पेनचा आहे; या देशांत धार्मिक बुद्धीला इतर सर्व गोष्टींपेक्षां ज्यास्त महत्त्व होतें. व या देशांत जूनी, ह्र्नान्दिज व मान्तेनिस असे तीन फार कसबी कारागीर झाले व त्यांनीं असले पुतळे तयार केले.

म्हणून मूर्तिपूजेनें कलाभिरुचि वाढतेच असें नाहीं.

( क० ३४ ) म्हणून चित्रें व प्रतिमा यांची पूजा करावयाची ठरली म्हणजे तेवढ्यानेंच कलेला ती गोष्ट अनुकूल न होतां प्रतिकूल होण्याचा संभव ज्यास्त असतो. याशिवाय मूर्तिपूजक काळांत लोकांची भक्ति चट्दिशीं एखादा ठराविक चेहरा, पोषाख अगर अभिनय यांवरही जडते; व त्यामुळें नवीनपणाची व तेणेंकरून सुधारणेची बंदी होते. हे विचार मूर्तिपूजा उघडपणें कबूल असलेल्या अगर प्रचारांत असलेल्या इतर सर्व काळांतल्या कलेप्रमाणेंच मध्ययुगांतल्या कलेलाही लागू आहेत.

ग्रीक लोकांत शरीरसौष्ठवाच महत्त्व विशेष मानीत.

( क० ३५ ) तथापि हाच परिणाम घडविणारा आणखी एक विचार आहे; तो ख्रिस्ती धर्मालाच केवळ लागू आहे. शरीरसौंदर्याचें महत्त्व

निकृष्ट मानण्याची प्रवृत्ति हा जो वैखानसी पंथाचा विशेष, तोच हा विचार होय. ग्रीक लोकांत प्रत्येक प्रकारचें (५४) सौंदर्य अत्यंत पूजार्ह मानीत. विशेषेंकरून कसल्याही प्रकारची कुरूपता धारण करणारी वस्तु कारागिरीचा विषय म्हणून खपत नसे. दुःखसुद्धां साधारणपणें आदर्शास्पदीभूत असे. मानसिक चिंतेची छटा मुद्रेवर अत्यंत कौशल्यानें रेखाटलेली असे; पण एकंदर चित्राच्या स्थायि सौंदर्याला बाध येईल असे मुद्रा विद्रूप करणारे प्रकार रेखाटूं देत नसत (५५). मानवी शरीरसौष्ठव ही कलेची कर्णिकावर्ति कल्पना असे व दिगंबरत्वानें लज्जेची कल्पना मनांत न येतां मान्यतेची येई; ईश्वर दिगंबर आहे असें जोरानें सांगण्यांत येई (५६). बादशहाचा पुतळा नग्न तयार करणें हा स्तुतीचा अत्युच्च प्रकार; कारण तसें करणें म्हणजे त्याचें देवत्व दाखविणें होय. प्राचीनांच्या जीवनक्रमांत बराचसा भाग मल्लक्रीडेचा असे; या मल्लक्रीडांनीं बऱ्याच अंशीं शरीरसामर्थ्याविषयींचा आदर वाढविला व मूर्तिकारांना अतिशय नांवाजण्यासारखे नमुने दिले (५७).

**दैहिक प्रवृत्ति घातुक, या समजुतीनें कलेचा उत्कर्ष झाला नाहीं.**

असली मनःस्थिति कलोत्कर्षाला किती अनुकूल आहे, हें सहज कळेल; तसेंच असली मनःस्थिति ज्या धर्मानें पुष्कळ शतकें शारीरिक वृत्ति दडपून टाकणें ही पावित्र्याची मध्यवर्ति कल्पना म्हणून ठरविली होती, त्या धर्माला किती प्रतिकूल आहे; हें पण तितकेंच सहज कळतें. या बाबतींत तत्त्वज्ञ, पाखंडी व संत या सर्वांचें एकमत होतें. नव-प्लेटोपंथी तत्त्वज्ञांपैकीं प्लोतिनस म्हणून एक महाविख्यात तत्त्वज्ञ होता. त्याला शरीर असणें हें इतकें लज्जास्पद वाटे कीं, आपलें चित्र काढून घेण्याला त्यानें रुकार दिला नाहीं; कारण काय कीं, चित्र काढण्यानें आपला अपमान चिरस्थायी करण्यासारखें होतें. ज्ञेयवादी व म्यानिशिइ पंथांचीं मुळें निरनिराळ्या रूपांनीं इतर कोणत्याही पाखंडी पंथांहून धर्मसंस्थेंत कायमचीं व खोल गेलीं होतीं. या पंथांचें मुख्य धर्ममत म्हणजे जड हा मुख्य अनर्थ होय; व अलीकडल्या ज्ञेयवाद्यांपैकीं कयाथारी म्हणून जे होते त्यांतून कांहींजण शरीराच्या प्रवृत्ति दाबण्याच्या प्रयत्नांत आपली उपासमार करून घेऊन मरत सुद्धां, असें सांगतात (५८). पुराणप्रिय

पंथांतील संतांपैकीं कांहींचा असा विशेष बाणा असे कीं, पुष्कळ वर्षे स्वतःचें शरीर आपण पाहिलें नाहीं. दुसरे कांहीं आपल्या मनोवृत्ति साफ दाबण्यासाठीं आपलीं अंगें व्यंग करीत. इतर त्याच हेतूनें चाबकांचा मार घेत, निरशनें करीत व भयंकर व्रतें पाळीत. शरीर हें अनर्थमय आहे, त्यांत बऱ्याचा अंश बिलकूल नाहीं, अशीच सर्वांची भावना असे. शारीरिक प्रवृत्ति व सौंदर्य हे अत्यंत घातुक मोहपाश आहेत असें सर्वांना वाटे. असल्या मनोवृत्तीच्या पाखरेखालीं कलेचा उत्कर्ष होणें बहुधा शक्य नव्हतें ( ५९ ); व शूलारोपण, धर्मवीरांचे मृत्यु अगर नष्टांच्या यातना यांचीं चित्रें तयार करण्याच्या आसक्तीनें कलेला रामणीयकते-पासून दूरच दूर पिटाळलें.

## कलेला प्रतिकूल दोन गोष्टी.

तर मग असें दिसतें कीं, मध्ययुगांतील बुद्धिवैभवाच्या सर्वसाधारण निकृष्ट स्थितीखेरीज आणखी त्या काळीं प्रचलित असलेल्या धर्मभावनेच्या विशिष्ट स्वरूपानें कलेवर अतिशय प्रतिकूल परिणाम घडला. वाङ्मयोद्धारा-नंतर युरोपांतल्या मनःस्थितीला जें वळण लागलें, त्याचें परीक्षण केलें असतां ही गोष्ट फार महत्त्वाची ठरते.

## मूर्तिपूजेचा त्याग स्वाभाविक होय.

मानवी सुधारणेच्या आरंभींच्या पायरीवर असतां मूर्तिपूजा हा मागें म्हटल्याप्रमाणें पूजेचा स्वाभाविक प्रकार होय; व भौतिक कल्पनांच्या पसाऱ्यांतून हळू हळू मुक्त होणें हा बौद्धिक प्रगतीचा एक अगदीं बिनचूक परिणाम होय. यावरून राष्ट्रें जेव्हां मानवी सुधारणेच्या एका विशिष्ट पायरीवर येतात तेव्हां त्यांनीं मूर्तींचा त्याग करावा हें स्वाभाविक दिसतें; आणि असेंच बहुधा घडलें आहे.

## दोन अपवादक प्रसंग.

( क० ३६ ) तथापि मानवी मनाच्या इतिहासांत दोनदां याहून निराळाच मार्ग धरलेला आहे. मूर्तिकरणाच्या कल्पना दुबळ्या झाल्या असतांना त्या कल्पनांचें दृश्य स्वरूप ज्या प्रतिमा त्यांचा विलक्षण उत्कर्ष झाला; व रामणीयक वृत्तीची धार्मिक वृत्तीवर छाप बसल्यामुळें भोळसटपणाचें रूप मंदमंद होत जाऊन त्याचा कलेंत लय झाला.

## पहिला प्रसंग ग्रीस देशांत.

या दोहोंपैकीं पहिला प्रसंग प्राचीन ग्रीस देशांत घडला. त्या राष्ट्राच्या रामणीयकतेच्या इतिहासाविषयीं इतकी विपुल माहिती आहे कीं, तिच्या उत्कर्षांच्या ( ६० ) पायऱ्यांचा एकामागून एक खुलासेवार छडा लागूं शकतो. केवळ कारागिरीच्या दृष्टीनें मोहक वाटणारे पालट बाजूला सारून धार्मिक प्रचीतींतल्या पालटांचें प्रतिबिंब उमटविणारे तेवढेच कलेंतले पालट पाहूं गेलें असतां ग्रीस देशांतील मूर्तिपूजेच्या इतिहासाच्या चार निरानिराळ्या पायऱ्या करितां येतात.

## चार पायऱ्यांचें वर्णन.

( क० ३७ ) पहिली पायरी जडार्चन काळाची; या काळीं दगडांची पूजा होत असे; या दगडांना आकार वगैरे देण्याची खटपट करीत नसत; व हे दगड म्हणजे बहुधा उल्का असावे; कांहीं असलें तरी ते आकाशांतून पडलेले आहेत असें म्हणत असत. दुसऱ्या पायरीच्या काळीं रंगीत लाकडी मूर्ति ( ६१ ) सर्वसाधारण झाल्या; या मूर्तींना खरेखुरे कपडे लेववीत. यानंतर म्हणजे तिसऱ्या पायरीला, कला याहून उंच पदवीस पोंचली. याचें श्रेय लोकमतानें दिदालसकडे आहे. पण ईजिप्त देशांतल्या अगर नंतरच्या बायझंताईन शहरांतल्या कलेप्रमाणें ग्रीसांतही ती कला पहिल्यांदां निव्वळ धार्मिक होती व नाविन्याचा मनापासून अत्यंत तिटकारा करी. यानंतर चवथ्या पायरीचा काळ आला; या काळांत वाढत्या बौद्धिक शिक्षणाचा व तात्त्विक विचारतरंगांच्या प्राबल्याचा राष्ट्रावर परिणाम घडूं लागला; या काळांत धार्मिक पूज्यबुद्धि स्वस्थानाहून ढळली व देशांतील मूर्तीपेक्षां परमेश्वराच्या तात्त्विक कल्पनेवर स्थिर झाली; आणि या काळांत परिपक्व मानवी सुधारणेनें उत्पन्न केलेल्या सौंदर्याच्या तीक्ष्ण जाणीवेमुळें धर्माच्या सर्व अंगांना ( ६२ ) नवें रंगरूप आलें. या वेळीं मूर्तींचा भंग झाला नाहीं; पण मूर्ति म्हणजे केवळ शरीरधारण केलेलीं रामणीयकतेचीं स्वरूपें होत; असा समज हळूहळू बनला. त्यांवरून धार्मिक भावना यत्किंचितही उपजत नाहींशी झाली. पूज्यबुद्धि अगर शरणागतता वाटत नाहींशी झाली. पण त्यावरून प्रमाणशीर व सुबकपणाची जाणीव उपजली. आदर्शगत पूर्णतेची कल्पना निपजली. ती अशीं कीं, इतर देशांत कदाचित् तिची कधींही बरोबरी झाली नसेल.

## भक्ति जाऊन अभिरुचि वाढली.

ज्याची एका काळीं कळकळीनें प्रार्थना होत होती, त्याच पुतळ्याकडे कारागिराच्या अगर चिकित्सकाच्या दृष्टीनें लोक पाहूं लागले. देवळांत अजून देवांच्या मूर्तींची गर्दी असे; व ते देव या काळीं जितके सुंदर व भव्य असत, तितके इतर केव्हांही नव्हते; पण ते कारागिराच्या कौशल्यानें सुंदर दिसत; ज्या भक्तीमुळें पूर्वीं त्यांस पावित्र्य आलें होतें, ती भक्ति लोपली. सर्व कांहीं रूपक, काव्य व कल्पना बनली. कामुक सौंदर्याचा मासला म्हणजे नग्न वीनस (रति); साध्याभोळ्या लोभनीयतेचा व स्वाभाविक अगर कसास न लाविलेल्या अपांशुलतेचा नमुना म्हणजे दायाना; ईषच्चंडमुद्रा व अधोमुखी मिनर्वा स्त्रीस्वभावोचित लज्जा व आत्मसंयमन दर्शवी. पायघोळ वस्त्रें लेऊन सोनेरी पेंढी हातीं धरलेली सीरीज म्हणजे आनंददायी वसंताचा नमुना. किंवा कधीं कधीं तीच सीरीज केस विखुरलेली व प्रोझरपाइनचा (प्लूतोनें नेऊन बायको केलेल्या आपल्या कन्येचा) विचार मनांत येऊन मुद्रा त्रस्त झालेली आहे अशी रेखलेली असली म्हणजे मातृप्रेमाचें तें रूपक. सौंदर्याचा प्रत्येक घाट व शुद्ध वैभवाच्या अल्प काळानंतर विवशेन्द्रियतेचा प्रत्येक प्रकारही अदृश्य जगांत पाठविण्यांत आला. कुमारीच्या हातानें लालनपालन होत आहे व स्त्रियांसारखे मऊ, नाजुक अवयव आहेत, असा ब्याकस म्हणजे लज्जास्पद स्त्रैणत्वाचा मासला. गायनवादनदेवता अपालो व दायानेचा प्रियकर आदोनिस हे गायनवादनाच्या मर्मज्ञतेमुळें अगर तारुण्यांतल्या अनुपभुक्त प्रथम प्रेमामुळें नरसौंदर्यांत मार्दव भरून स्त्रीसौंदर्याची मोहकता कांहींशी उत्पन्न झाली आहे असें दर्शवीत; हाच प्रकार पुढें बऱ्याच काळानंतर ख्रिस्ती चितार्‍यांनीं संत सेबास्तियन व संत जान यांच्या चित्रांत आणला. हर्क्यूलिस हा उद्यमप्रशंसेस्तव निवडलेला नमुना होता. मानवांच्या सुखासाठीं तो कष्ट करीत आहे व त्यामुळें त्याच्या शरिरांतील शिरा ताणल्या आहेत व त्याच्या मुद्रेवर अतिरिक्त श्रमाचीं सर्व चिन्हें दिसूं लागलीं आहेत; असें त्याचें चित्र कधीं कधीं आढळतें. कधीं कधीं ही उपदेवता आलिंपसच्या देवतामंडळांत बसलेली आहे व तिचे स्नायु गांठदार

व सैल पडलेले आहेत व तिचा विशाल बांधा मृदु व गोंडस झालेला आहे व येणेंप्रमाणें शरीरसामर्थ्य व विश्रांति या दोहोंचें एकवटलेलें हें निदर्शन आहे असें चित्र आढळतें. केवळ धार्मिक मानतां येतील अशा कल्पना फारच थोड्या आढळतात व आढळतात त्याही कांहींशा " ऋणं कृत्वा घृतं पिब " मताच्या आहेत. ज्युपितर, प्लूतो व मिनोस यांचे तोंडवळे एकाच घाटाचे काढलेले असतात; फरक मुख्यत्वें करून मुद्रेंत असतो. प्लूतोच्या ( यमाच्या ) मुद्रेवर राक्षसी वृत्तींची छाया असते ( जशी संहारक शिवमूर्ति ); मिनोसच्या मुद्रेवर न्यायाधिशाच्या कठोर-हृदयी करारीपणानें भ्रुकुटी वक्र झालेल्या असतात; फक्त ज्युपितरच्या मुखावर निर्दोष शांतता खेळत असते; द्यौस्पितर ( स्वर्गाधीश ज्युपितर ) च्या मुखावरील प्रसाद कसल्याही चिंतेनें कलंकित होणार नाहीं कीं शांतता कसल्याही वृत्तीनें भंगणार नाहीं ( ६३ ).

## पुराणकथांचें काव्यप्रदेशांत प्रयाण.

( क० ३८ ) येणेंप्रमाणें ग्रीक पुराणकथांनीं हळूहळू काव्यप्रदेशांत प्रयाण केलें; आणि मुख्यतः पूजाविषय बनलेल्या दृश्य प्रतिमांनीं हें प्रयाण घडविलें अगर सुगम केलें. वाङ्मयोद्धाराच्या काळीं ख्रिस्ती कलेंत अशा-सारखाच बदल घडला, व हा बदल म्हणजे बायझांशिआच्या ऐवजीं इतालीच्या कलेचा प्रवेश झाल्यामुळेंच बहुतेक झालेला परिणाम होय.

## कलोत्कर्षगिरीवरून शेवटीं ग्रीसचा अधःपात.

( क० ३९ ) ग्रीसच्या बुद्धिवैभवानें कलेवर घडलेल्या परिणामाच्या इतिहासांत आढळणाऱ्या विरोधांहून संस्मरणीय विरोध थोडेच. आजपर्यंत रामणीयकतेच्या उत्कर्षगिरीवर मानवी बुद्धि जितकी उंच पोंचली आहे, तेथपर्यंत ग्रीस देश आपल्या इतिहासाच्या आरंभीं पोंचला होता. ग्रीस-पासून आम्हांला बहुतेक सरस सौंदर्याचे असे प्रकार मिळाले कीं जे पुढच्या सर्व काळीं आनंददायक व आश्चर्यकारक झाले व जे प्रत्येक देशांतल्या मूर्तिकारांनीं आपल्या प्रयत्नाचे आदर्श म्हणून मानले. तथापि सरतेशेवटीं बुद्धिनिर्झर शुष्क झाला. निर्माणकल्पकता लय पावली. इतकेंच नव्हे, तर सौंदर्याभिज्ञता व सौंदर्यस्वादरतिही विलयास गेलीसें दिसतें व पुष्कळ शतकेंपर्यंत ग्रीसमधील धर्म, राज्यपद्धति व कारागीर सर्वच राम-

णयिक विकासाच्या मार्गांत अत्यंत भयंकर अडथळा करणारे डोंगर होऊन बसले ( ६४ ).

## कलाविकासाच्या मार्गांत कसकसा अडथळा झाला.

(क० ४०) मूर्तिभंजक पंथ ख्रिस्ती कारागिरीशीं भयंकर युद्ध करण्यास सरसावला, तो या दिशेकडून. (क० ४१) ख्रिस्ताच्या कुरूपतेच्या दंतकथेला फार पुष्टि मिळाली, ती ग्रीसच्या धर्मात. ही दंतकथा धार्मिक वृत्तीला ( ६५ ) जशी चीड आणणारी तशीच धार्मिक कलेचा घात करणारी होती. ( क० ४२ ) कलेची जी विलक्षण दूषित, औपचारिक प्रगतिपराङ्मुख पद्धति पुष्कळ शतकें युरोपांत सार्वत्रिक झाली होती व जिनें सिम्याब्यूच्या विशाल बुद्धिमत्तेलाही शृंखला घातल्या होत्या आणि जी झुगारून देण्याचें काम गिओतो व म्यासासिओ यांच्यांकरितां शिल्लक राहिलें होतें, तीसुद्धां ग्रीसमध्येंच प्रथम सुरू झाली. अर्वाचीन ग्रीसचा नेहमींचा या पद्धतीकडे ओढा होता. मागें जी पद्धति प्रमुख होती तिच्या अगदीं उलट ही होती; आणि ही मोठी ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे कीं, ग्रीसच्या प्राचीन काळच्या सर्वोत्कृष्ट ललामभूत चित्रांमुळें मुख्यतः या पद्धतीचें सरतेशेवटीं दोष-परिमार्जन झालें. ( क० ४३ ) आतां हें सर्वत्र मान्य झालें आहे कीं, सिम्याब्यू पासून तों राफेलपर्यंत इतालीच्या कलेनें आक्रमिलेल्या सदा वाढत्या प्रगतीचें निकटवर्ती कारण बाराव्या शतकाच्या अखेरीस पिसाच्या निकालेसनें आरंभिलेल्या प्राचीन पत्थरकामाच्या नव्यानें सुरू केलेल्या व नंतर रोममधल्या शोधांनीं चालू ठेविलेल्या अभ्यासांत मुख्यतः सांपडेल.

## रोमच्या धर्मसंस्थेनें कलेला उत्तेजन दिलें.

( क० ४४ ) पुनरुज्जीवित कलेचे प्राथमिक प्रयत्न स्वीकारून त्यांना उत्तेजन देण्याचें काम रोमच्या धर्मसंस्थेनें आपल्या नेहमींच्या शहाण-पणानें केलें व कांहीं काळपर्यंत तिनें ती कला मुख्यत्वें ख्रिस्ती बनविली. गिओतो व त्याचे आरंभींचे अनुयायी यांनीं काढलेल्या चित्रांकडे पाहिल्या-बरोबर धार्मिक वृत्ति त्यांना व्यापून राहिली आहे व पवित्रपणा आणीत आहे असें वाटल्यावांचून राहणें अशक्य आहे. खरोखर सौंदर्याची तीक्ष्ण जाणीव त्यांवरून दिसते; पण ती जाणीव नेहमीं धार्मिक कल्पनेच्या

प्रीत्यर्थ वागविली जाते; ती जाणीव नेहमीं दाबांत ठेवून, पवित्र करून, आदर्शीभूत केली जाते. ही गोष्ट केवळ कारागिरांच्या स्वभावामुळें होते असें नाहीं. सर्व धर्मशास्त्रांतील कोणाही साधूशीं ज्याची तुलना करण्यास हरकत नाहीं, असा देवदूतासारखा साधु जो फिएसोल त्याची जोड ख्रिस्ती कलेला लाधली होती खरी. धर्मशास्त्रांतील सर्व जीवनचरित्रांच्या मालिकेंत या साधु पुरुषाचें जीवनचरित्र अत्यंत मनोवेधक आहे; याच्या तोंडून रागाचा अगर दुःखाचा शब्द निघालेला कधीं माहीत नाहीं. फ्लारेन्सच्या धर्माध्यक्षतेचें श्रीमंत पीठ नाकारण्याला याला काडीइतकें वाईट वाटलें नाहीं; यानें जेव्हां आपल्या शूलारोपित प्रभूचें चित्र काढलें, तेव्हां याच्या डोळ्यांतून घळघळां अश्रु वाहतांना लोकांनीं पाहिले होते, व कोणतेंही चित्र काढण्याचें काम हातीं घेण्यापूर्वी प्रार्थना करून संस्कार केल्याशिवाय ( ६६ ) तें हा हातीं घेत नसे. त्याच्या शरीरांतलें स्वच्छ पावित्र्य त्याच्या कामांत प्रतिबिंबित होई. त्याचा शिष्य गोझोली याच्या अंगीं त्याचें सर्व बुद्धिसामर्थ्य उतरलें होतें असें म्हणण्याचें धाडस करण्यास हरकत वाटत नाहीं व या सामर्थ्या-बरोबर त्याचें थोडेंबहुत शीलसत्त्वही उतरलें होतें.

## युरोपांतील वाङ्मयोद्धाराच्या वेळची स्थिति.

( क० ४५ ) पण नेहमींप्रमाणें याही प्रसंगीं मागणीपुरवठ्याच्या नियमानुरूप एकंदरींत श्रेष्ठ बुद्धिमत्तेलाही वळण लागलें. बाहेर जगांत एक प्रकारची धार्मिक कल्पना रूढ होती, त्या कल्पनेला दृश्य प्रतिबिंबाची जरूर होती म्हणून ती जरूर भरून काढण्यास चितारी पुढें सरसावले. युरोपांत वाङ्मयोद्धार सुरू झाला होता. पुराण भाषांच्या अभ्यासानें बुद्धीच्या सर्व शाखांत एक नवीन जोम उत्पन्न झाला होता, पण त्यामुळें अजून जुनी श्रद्धा डळमळावयास पुरेसा समाजस्थितींत पालट झाला नव्हता. बाराव्या शतकापर्यंत ज्या गाढ अज्ञानाचें साम्राज्य होतें त्याला पळ काढावा लागला होता खरा. या गाढ अज्ञानाच्या साहचर्यानें असणारे असंस्कृत अभिरुचि व खऱ्या सौंदर्याचें मर्म समजण्याची असमर्थता हे दोष नाहींसे झाले होते. पण कल्पकतेची वाढ रीतीप्रमाणें विचारशक्तीच्या वाढीच्या अगोदरच झाली होती. ग्रीक वाङ्मयांतला प्राणाधार जो विषयप्रत्याहाराकडील, निर्भय टीके-

कडील व उच्चतत्त्वविवेकाकडील कल, त्यांत मुरून जाण्यापूर्वी त्या वाङ्मयांतल्या पवित्र सौंदर्यानें लोक आनंदातिरेकांत तल्लीन झाले होते. सुसंस्कृत धर्मश्रद्धा अगर बंधनमुक्त तत्त्वविचार यांची अभिरुचि लागण्यापूर्वी मोहक चित्रांचा अगर शुद्ध भाषाशैलीचा आदर करावयास ते शिकले. सर्व युरोपभर वाङ्मयोद्धाराचा पहिला परिणाम म्हणजे सौंदर्याला जिकडे तिकडे आलेलीं फुलें होत. पुढें बराच काळ लोटल्यावर चालू धर्मश्रद्धेच्या प्रकारांनीं जिकडे तिकडे असंतोषवृत्ति उत्पन्न झाली. भौतिक, इंद्रियगम्य, मूर्तिकरणात्मक धर्म अजून त्या काळच्या बौद्धिक स्थितीला साजेसा होता; व म्हणून चित्रकर्म अजूनपर्यंत धार्मिक वृत्तीचें विशिष्ट मुख होतें. त्या काळचे सर्व चितारी कडकडीत धार्मिक वृत्तीचे होते. म्हणजे ते नेहमीं कलेचा विचार धर्माच्या विचाराहून कमी दर्जाचा समजत. सौंदर्याचें जें स्वरूप ते चित्रांत वठवित तें नेहमीं धार्मिक सौंदर्याचें असे; आणि म्हणून जर धार्मिक परिणाम ज्यास्त जोराचा करतां येत असेल, तर तेवढ्यासाठीं किळसवाण्या अगर दुःखकारक प्रतिमांनीं आपलें चितारकाम बिघडविण्यासही ते मागें पुढें पाहत नसत.

## दांतीच्या काव्याचा प्रभाव.

(क० ४६) या सर्वसाधारण विचारांत दांतीच्या महत्त्वाच्या प्रभावाच्या विचाराची भर टाकली तर बरी; जेव्हां पेगन लेखांचा अभ्यास नव्यानें सुरू होऊन धर्मज्ञानाच्या कल्पना सुसंस्कृत व उदात्त झाल्या, पण अजून अधम होऊं लागल्या नव्हत्या, त्या अत्यल्प काळाचा दांती हा मोठा इमानी प्रतिनिधि मानतां येईल. प्राचीन लोक शाहिराला पवित्र कां समजत तें कोणत्याही युरोपांतील इतर कवीला याच्या इतकें पूर्णपणें उमजलेलें नाहीं. ग्रीसच्या व रोमच्या महाकाव्यांत मानवी पात्रें अग्रस्थानीं असत, आणि दैवी अचाट शक्ति जेव्हां प्रवेश करी तेव्हां सुद्धां मर्त्यांचें नैतिक वैभव अग्रभागीं आणण्यास अगर मर्त्यांची शक्ति वृद्धिंगत करण्यास मात्र तिचा उपयोग होई. मिल्तनची भरारी पृथ्वीच्या मर्यादेच्या फार पलीकडे गेली खरी; परंतु जेव्हां मिल्तननें आपलें काव्य लिहिलें, तेव्हां धर्मकल्पनांना इंद्रियगोचर व भौतिक रंगरूप देण्याचा काळ निघून गेला होता; व चैतन्यमय आत्म्यांचीं मानवी पोषाखानें नटवलेलीं भव्य पात्रें सुद्धां विसंवादी व

अवास्तव दिसत. परंतु दांतीचें काव्य शेवटचें भविष्यकथन होतें. जेव्हां धार्मिक कल्पनासृष्टि ही श्रद्धेची सहचारिका नसून वस्तुतः श्रद्धाच असे; जेव्हां प्रत्येक माणसांत बौद्धिक कल्पनांना इंद्रियगोचर स्वरूप देण्याची प्रेरणा स्वभावासिद्ध असे, व जेव्हां चित्रकर्म ही खऱ्या खऱ्या अर्थानें श्रद्धेची साधारण व्याहृती असे, अशा काळांत लोकांच्या कल्पकतेवर दांतीच्या काव्याची बरीच छाप बसली होती. कल्पकता शुद्ध व पुष्ट करून ख्रिस्ती कलेला वैभव व धार्मिक पूर्णता, तसेंच घोर व कृष्ण स्वरूप देण्याचें काम दांतीच्या काव्याच्या प्रभावानें जितकें केलें तितकें इतर कोणत्याही एकाच गोष्टीच्या प्रभावानें क्वचित्‌च केलें असेल. ‘धरणीकंप व ग्रहण यांच्या तिमिरांत बुडवलेली’ या श्रेष्ठ कवीची लेखणी भयानकता व यातना यांचीं चित्रें वठविण्यांत आनंद मानी. हीं चित्रें लवकरच चिताऱ्यांनीं चित्रफलकावर काढलीं. त्या चित्रांमुळें लोकांची कल्पकता मोहून थिजून गेली. आणि बरेच दिवस चालू असलेलें रूपांतराचें काम पुरें झालें. शववापींच्या काळानंतर प्रथमतःच चिताऱ्यांनीं प्रकटीकरणाच्या पुस्तकांतून घेतलेल्या देखाव्यांची बऱ्याच अंशीं अतिशयोक्ति केली; पण बहुधा त्यांनीं असा देखावा निवडावा कीं, त्यावरून भयाविरहित इतर कोणतीही वृत्ति उत्पन्न व्हावी. बरींच शतकें लोकप्रिय होऊन बसलेली पण इ० स० ६९२त (६७) एका परिषदेनें सरतेशेवटीं निषेध केलेली ख्रिस्ताबद्दलची प्रतिमा जी कोंकरूं; तसेंच सात शिक्क्यांचें कागदांचें गूढ बिंडोळें, रत्नखचित प्राकारांचें नवें यरुशलेम; प्रतिमेमध्यें रूपांतर पावलेलें बेथलेहेम; हे देखावे पुनः पुनः चित्रांत येत. पण पुष्कळ गोष्टींनीं फार मोठा पालट झाला; त्यांत दहाव्या शतकाच्या शेवटीं जगाचा अंत होणार या समजानें उत्पन्न झालेलें भय व शहरांत (६८) आपापले समाज स्थापण्याला मठवाश्यांना मिळालेल्या परवानगीनें तापसवृत्तीचें वाढलेलें महत्त्व, या गोष्टी बहुधा मुख्य होत्या. भूषणें, एकंदर स्वरूप व रचना (६९) या बाबतींत देवळें म्हणजे मृत्यूचीं चित्रें बनलीं. व चितारकाम सुद्धां त्याच दिशेकडे झपाझप चाललें होतें. इतक्यांत दांतीच्या इन्फर्नो काव्यानें कारागिरांच्या कल्पक बुद्धीला एक नवीनच भयाची निस्तल गर्ता उघडी करून दाखविली व विलक्षण सौंदर्य, शुद्ध

धार्मिकता, तापसवृत्तिप्रचुरता व भयसंकुलता या सर्व गुणांला एकदम आधार देणाऱ्या कलेचा तें काव्य प्रतिनिधी व कांहीं अंशांनीं उगम झालें.

## पुनरुद्भूत मानसिक सामर्थ्याचे परिणाम.

( क० ४७ ) पुनरुज्जीवित कलेच्या पाहिल्या काळांतले हे विशेष होते; व त्या काळच्या बाद्धिक स्थितीला ते चांगले साजेसे होते. तथापि कांहीं काळानंतर युरोपच्या पुनरुद्भूत मानसिक सामर्थ्यांनें अतिशय महत्त्वाचे परिणाम होऊं लागले. अप्रतिबद्ध टीका करण्याचें वळण, सुसंस्कृत विषय-प्रत्याहाराचें सामर्थ्य, श्रद्धेच्या बाबतींत तापस वृत्तीचा तिरस्कार, थोर थोर ठिकाणच्या ढोंगाचा व अज्ञानाचा उघड उघड थट्टेनें समाचार घेण्याचा स्वभाव, सार्वत्रिक होऊन बसलेल्या असंख्य विधींबद्दल व लुंग्या सुंग्या थोळसटपणाच्या प्रकारांबद्दल असहिष्णुता, व मानवी योग्यतेविषयीं वाढती जाणीव, या गोष्टी सर्वत्र दिसूं लागल्या होत्या व पुढें होणाऱ्या मोठ्या थोरल्या उलथापालथीची पूर्वछटा स्पष्टपणें दाखवीत होत्या.

## या लाटेनें धर्माचें उज्ज्वल स्वरूप लोपलें.

( क० ४८ ) ही लाट वाङ्मयाच्या सबंध धोरणांत व जास्त आध्यात्मिक धर्माप्रत पोंचण्यास धर्मसुधारणेच्या अग्रेसरांनीं पुनः पुनः व कळकळीनें केलेल्या प्रयत्नांत दिसत होती. जुन्या धर्माच्या प्रत्येक मुखाच्या जलद होणाऱ्या भ्रष्टतेंत ती निदान तितक्याच जोरानें दिसत होती. जुन्या धर्माच्या मुखांकडून धार्मिक कळकळ उत्पन्न करण्याचें काम झालें नाहीं; आणि ज्या अर्थी त्यांच्यांत राम उरला नव्हता त्या अर्थी त्यांचा ऱ्हास व नाश झाला. ज्या मठांत पूर्वी तापस वृत्तीचे विलक्षण देखावे दिसत, तेच मठ चैन, इष्क व द्रव्याची हांव यांचीं माहेरघरें झाले. पवित्र अवशेष व चमत्कार करणाऱ्या मूर्ती यांनीं अजूनपर्यंत लाखों लोकांचीं अंतःकरणें सद्गदित केलीं असतां त्याच पदार्थांवर भ्रष्ट व्यवहाराचें व निलाजऱ्या लबाडीचें मूळ होण्याचा प्रसंग आला. निराश झालेल्या अंतःकरणाची टोंचणी शमविण्याचा अगर धार्मिकांची भक्ति जास्त उत्कट करण्याचा उपाय म्हणून योजिलेलीं अनुग्रहपत्रें सर्व खऱ्या धर्माचे ठिकाणीं ‘चट’ बसलीं. खुद्द पोपाचार्यांच्या पीठाला अत्यंत लाजिरवाण्या व्यसनाचा डाग लागला, व आचार्यमठाला

पेगन धर्मासनाचें स्वरूप प्राप्त झालें, मात्र पेगन धर्मासनांत जो कळकळ म्हणून गुण होता तो यांत नव्हता.

### खऱ्या धर्माचा पुनः उदय झाला.

( क० ४९ ) कोणीकडेही दृष्टि गेली तरी तिला अव्यवस्था, भ्रष्टता व ऱ्हास यांचीं चिन्हें दिसत. कारण मध्ययुगाची रात्र आतां संपत आली होती व पुनरुत्थानाच्या अगोदर असणारा गोंधळ फारच जबर होता. प्राचीन ग्रीसांतल्या अस्तमित मनूचा पुनः उदय झाला होता व त्याच्या किरणस्पर्शानें भोळसटपणाची इमारत डळमळून ढांसळली. युगांचीं युगें धुळींत लोळत पडलेलें मानवी मन त्याच्या प्रभावानें उठून आपल्याला अडकविणाऱ्या बेड्या तोडून टाकून पूर्वस्वातंत्र्याच्या पुनःप्राप्तीच्या प्रकाशांत झळकूं लागलें व आपल्या धर्माच्या मंदिराची पुनः नव्या धर्तीवर रचना करूं लागलें. प्राचीन काळच्या विवेकी महात्म्यांच्या प्रेरणेनें उत्पन्न झालेली खऱ्याची आवड, स्वातंत्र्याची हांव व मानवी थोरवीची जाणीव, यांनीं प्रेताप्रमाणें पडलेल्या व पायांखालीं तुडविलेल्या लोकांत जीव आणला; ख्रिस्ती धर्माच्या वैभवभूत व सारभूत मानलेल्या वृद्धिंगतव्याप्तीच्या परोपकारकल्पनांशीं व उदात्त नैतिक मतांशीं मिलाफ करून घेतला; नव्या आकांक्षा, नवी विचारधर्ती व जीवटपणाचे नवे आधार, यांनीं युक्त अशा मानवी प्रगतीचा नवा शक सुरू केला; व गतकाळच्या पडक्या इमारतींतून धार्मिकतेच्या जीवनाला बाहेर काढून शुद्धतर धर्माची प्राणप्रतिष्ठा केली, व अनंत वृद्धीची आशा निर्माण केली.

### धर्माच्या पुनरुदित उज्ज्वलतेचें प्रतिबिंब कलेंत दिसूं लागलें.

( क० ५० ) मानवी बुद्धीचा रोंख असा होता; व कलेच्या इतिहासांत तो जशाचा तसा प्रतिबिंबित झाला होता. जसजशी जुनी सनातन पंथी विचाराची मोड फिक्की पडूं लागली, तसतसा धार्मिक कल्पनेचा चित्रकलेंतून लोप झाला व चित्रकलेचें स्वरूप, इंद्रियोपभोगलोलुप नाहीं तरी, सांसारिक बनलें. धर्म जो पूर्वी कलेचा स्वामी होता तोच आतां किंकर बनला. पूर्वीं चितारी आपलें कौशल्यसर्वस्व केवळ एकाद्या धार्मिक कल्पनेची प्रौढी व शोभा वाढविण्यांत खर्ची. आतां तोच एकाद्या धार्मिक कल्पनेचें निमित्त करून केवळ ऐहिक सौंदर्याचें प्रदर्शन करी. तो बहुधा

आपल्या हृदयस्वामिनीचें चित्र कुमारिकेप्रमाणें काढी. तो तिला उंची वस्त्रें लेववी; व वैभवचिन्हें सभोंवतीं दाखवी. त्याच्या चित्रांत नग्न मूर्तींचा भरणा फार; या दिगंबर आकृतींच्या मुद्रांवरचें सौंदर्य कामव्यंजक; त्यांची प्रत्येक ठेवणे व कला मनुष्याच्या इंद्रियविषयक वृत्ति उत्तेजित करणारी व हीं सर्व चित्रें बहुधा पेगन पुराणांतून घेतलेलीं; अशी एकंदर स्थिति असावयाची. सौंदर्यनिर्मिति हाच त्याच्या कलेचा एकाकी हेतु. त्याचें काम म्हणजे सांसारिक व त्या कामाचें परीक्षण सांसारिक कसोटीनेंच करावयाचें.

## कलेंतली धार्मिक दृष्टि नष्ट होऊन सांसारिक आली.

युरोपांत जो सर्वत्र विचाराचा ओघ तयार झाला होता, त्याच्याचमुळें कलेला सांसारिक स्वरूप प्राप्त झालें हें निःसंशय. कारागिर स्वकालीन कल्पनांना मूर्त स्वरूप देण्याचा प्रयत्न करितो व त्यांत त्यास यश आल्याची कसोटी त्याची लोकप्रियता ही होय. ज्या काळीं धार्मिक श्रद्धा सर्वत्र जोमांत होती व ज्या काळीं आपल्यास प्रकट होण्याला चित्रकला हें स्वाभाविक द्वार समजूनच ती चित्रकलेकडे वळत होती, त्या काळीं असली शैली अशक्य झाली असती. चितान्याच्या भ्रष्टतेनें जिकडे तिकडे त्याची निर्भर्त्सना झाली असती. व तितियनच्या अगर मायकेल आंजेलोच्या बुद्धिसर्वस्वाच्यानेंही त्यांच्या कामाची निंदा टाळवली नसती. सदर्हु शैली लोकप्रिय झाली याचें कारण असें कीं सुशिक्षित लोकांनीं चित्राकडे धार्मिक दृष्टीनें पाहण्याचें सोडलें; हेंच पर्यायानें सांगावयाचें तर आपल्या श्रद्धेच्या विषयांचें मूर्त स्वरूप पाहिजे असें म्हणणाऱ्या विचारौघाला ओहोटी लागली होती असें म्हणावें लागेल. सर्व चळवळीचें मूळ कारण हें होतें.

## या पालटाचीं लहानशीं आणखी दोन कारणें.

तथापि फार महत्त्वाचीं आणखी दोन लहान कारणें होतीं. या कारणांनीं कलेच्या स्वरूपांतील पालटाला बराच हातभार लावला व आणखी तिचा अमूप उत्कर्ष केला. या दोहोंपैकीं एक विशेषेंकरून रंगासंबंधीं आहे व दुसरें रूपासंबंधीं आहे. यापैकीं पहिलें कारण इतालींतल्या समाजाच्या नैतिक स्थितींत आढळून येतें. हा काळ म्हणजे ब्यांका दि क्यापेलो व बोर्जियास यांचा काळ होय. इतालींतलें सारस्वत

व रीतिरिवाज ढिल्या नीतींचे होते व ती गोष्ट म्हणजे लपविली जात असे अगर तिजबद्दल खेद वाटत असे असें कांहीं नाहीं. परंतु इतालीची कुनीति इतरांहून वेगळी दाखविणारी विशिष्ट गोष्ट म्हटली म्हणजे ही कीं, मोहकतेच्या सर्व प्रकारांनीं परिवेष्टित राहून ती वाढत असतांही प्रथमपासूनच तिनें रामणीयकता धारण केली होती. इंद्रियोपभोगवृत्ति उचंबळविणारें असूनही सुसंस्कृत असलेल्या सौंदर्य-रहस्याशीं तिचा मिलाफ होता व कला हें तिनें प्रकट होण्याचें विशिष्ट द्वार केलें होतें. अलीकडच्या इतालींतल्या चित्ररंग (७०) कर्मांची ही एक विशिष्ट खूण आहे. व ती त्या कलेच्या रामणीयकतेंतील उत्कर्षाचें एक मुख्य कारण आहे. कारण; इंद्रियोपभोगासक्ति चित्ररंगकर्माला नेहमीं अत्यंत अनुकूल असते ( ७१ ). कां कीं चित्ररंगकर्मांत कारागिराचा मुख्य हेतु मानवी शरीराचें सौंदर्य व मोहकसामर्थ्य शक्य तितक्या अधिक अंशांनीं प्रकट करण्याचा असतो. कलेच्या इतिहासांत दोन प्रसंगीं असें झालें आहे कीं, राष्ट्रीय विषयलोलुपता राष्ट्रीय कलेंत प्रविष्ट झाली; व प्रत्येक प्रसंगीं सारखाच परिणाम झाला. पहिला प्रसंग प्राचीन ग्रीस देशांत घडला. म्हणजे जेव्हां लेइसच्या संभोगातुर मोहकतेनें अपीलीसला नवी प्रेरणा झाली व जेव्हां फ्राइन अथवा थिओदोता हिच्या अनुपभुक्त लोभनीय सौंदर्यानें द्वीप्तिमती होत्साती सौंदर्यदेवी आथेन्सच्या लोकांच्या मनांत धार्मिकेतर आनंदज्योति प्रज्वालित करती झाली तेव्हांचा एक. दुसरा प्रसंग सोळाव्या शतकांतल्या इतालीच्या कलेंत घडला.

## वेनिसची शाखा.

( क० ५१ ) इतालीच्या कलेच्या बहुतेक सर्व शाखांतल्या इंद्रियोपभोगी स्वरूपाची भराभर भरभराट झाली, ही गोष्ट इतकी उघड आहे कीं, तिच्याविषयीं शंका येणार नाहीं अगर दुर्लक्ष होणार नाहीं; पण एक शाखा अशी आहे कीं, ती विशेषेंकरून या स्वरूपाची जननी व प्रतिच्छाया मानतां येईल. ही शाखा म्हणजे वेनिसच्या चितार्‍यांची. या शाखेंत तिच्या जननस्थानाचे गुण उघड उघड प्रतिबिंबित झालेले दिसत होते. इंद्रियविषयक मनोवृत्ति व कला यांचें एकसमयावच्छेदें करून माहेरघर होण्यासारखें याच्या इतकें स्पष्टपणें

योग्य असें दुसरें कोणतेंही शहर नसेल. आपल्या जनकोर्मिपृष्ठावर प्राचीन वीनसप्रमाणें पहुडणाऱ्या वेनिस शहरांत निदान त्याच्या वैभवकाळीं रामणीयक वृत्तीला उंच शिखरावर चढविणारीं व नैतिक वृत्तीला निद्रावश करणारीं सर्व कांहीं कारणें उपस्थित होतीं. कोणीकडेही दृष्टि वळो तिला सौंदर्याचे विलक्षण, विविध व तल्लीन करणारे प्रकार दिसावयाचे; व कानावर आपटणारा प्रत्येक ध्वनि खालीं असलेल्या पाण्यामुळें कोमल होऊन यावयाचा. संत मार्कच्या देवळाच्या सोनेरी घुमजांसभोंवतीं चमकणारे हजारों दिवे, जलतरंगांत पडलेल्या आपल्या स्वत:च्याच अंधुक छायांवर विश्रांति घेणारीं अनुपम शिल्पकर्मानें सुशोभित मंदिरें, ज्यांत अल्प नौका प्रणयिजनांच्या गीतानें डुलत असतात व ज्यांवर लोंबणाऱ्या वितर्दिकांतून अनुरागोज्ज्वल नील नयन चमकत असतात अशा झुळझुळ वाहणाऱ्या दीर्घ कुल्या, संमिश्रित सौंदर्यभेदांच्या मिलाफाचें आलोकमाधुर्य व सर्वत्र भरून राहिलेली परिम्लान व विषयासक्तिव्यंजक मोहिनी, या सर्वांचा त्या लोकांच्या शीलावर गाढ व घातुक परिणाम झाला होता. त्यांच्या सर्वच इतिहासांत, पण विशेषेंकरून कलेच्या वैभवाच्या काळांत, सौंदर्याचें मर्म जाणण्याच्या तीव्र वैदग्ध्याबद्दल व तशीच सार्वत्रिक, उच्छृंखल व प्रांजल विषयासक्तीबद्दल त्यांची ख्याति होती (७२). असल्या समाजामध्यें इंद्रियोपभोगी कलेची मोठी शाखा उदय पावावी हें फार साहजिक होतें; व त्याच रोंखानें जावयास लावण्यास पुष्कळ गोष्टी जणूं कांहीं कट करून तयार झाल्या होत्या.

### कलेची अध्ययनप्रचुर शाखा वेनिसला अगदींच माहीत नव्हती.

(क० ५९) प्राचीन पुतळ्यांच्या शोधांपासून वेनिस इतकें दूर होतें कीं, जिला कलेची अध्ययनप्रचुर शाखा म्हणतां येईल, व जिनें सौंदर्याच्या अभिज्ञतेची शरीररचनाशास्त्राच्या अध्ययनरूपी कुण्डांत परिणामीं आहुती दिली, त्या शाखेचा वेनिसवर बिलकूल परिणाम झाला नाहीं. तसेंच अनेक उत्कृष्ट कारागिरांचा एकाच काळीं उदय, या कारागिरांना हवे तितके पुरस्कर्ते तयार होण्यासारख्या चैनीच्या संवयी, वेनिसच्या रंजकांच्या कौशल्यामुळें पूर्ण उत्कर्ष पावलेला चित्रकर्मांतील तैल-(७३) रंजनाचा नवीन शोध, कदाचित् आणखी झगझगीत रंगांचा

(७४) दृष्टीस परिचय करून देणारे पौरस्त्यांचे श्रीमंतीचे व्यापाराचे जिन्नस, या सर्वांचा निरनिराळ्या रीतीनें कलेवर अनुकूल परिणाम घडला. ग्रीक कलेंत प्रमुख सूत्रचालक होऊन राहिलेली व ख्रिस्ती धर्मानें अजूनपर्यंत दडपून टाकलेली जी नग्नाकृतिनिरीक्षण-पद्धति ती पुन्हां उदय पावली; व चित्रकर्माची अशी एक शाखा तयार झाली कीं, तिच्यांतील रंजनकलेच्या सूक्ष्म उपभोगसौख्यामुळें जिची कधींच बरोबरी झाली नाहीं, व कोरेजिओखेरीज तिच्या आसमंतात्ही क्वचित्च कोणी गेला असेल.

## पावित्र्याच्या आदर्शाऐवजीं सौंदर्याचा आदर्श तयार झाला.

(क० ५३) इतर बाबींप्रमाणें या बाबींतही या शाखेचा नायक तितियन होता. व प्राक्सितेलिसचा जो प्राचीन कलेशीं तोच तितियनचा अर्वाचीन कलेशीं संबंध आहे. मूर्तिकार व चितारी या दोघांनीं कलेला इंद्रियविषयासक्तिप्रत पोंहचाविलें. दोघांनीं तिच्यांतला धार्मिकपणा नाहींसा केला. दोघांनीं तिला रामणीयकतेच्या उंच पायरीवर चढविलें. पण दोनही कारागिरींत तिला या उंच पायरीवरून लवकर (७५) घसरावें लागलें. वेनिसमध्येंही कलेच्या प्राचीन धार्मिक शाखेचा एक मोठा प्रतिनिधि होता. परंतु त्याच्यानें त्या ओघास बांध पडला नाहीं. बेलिनीच्या कुमारीच्या ऐवजीं लवकर तितियनची कुमारी उपस्थित झाली. स्त्रीपावित्र्याच्या आदर्शाऐवजीं स्त्रीसौंदर्याचा आदर्श उपस्थित झाला.

## सौंदर्याचें संगोपन व संवर्धन ग्रीसनें दक्षतेनें केलें.

(क० ५४) कलेला प्रापंचिक पण उन्नत स्वरूप देण्याच्या कामीं हातभार लावणारें दुसरें कारण म्हणजे पेगन पाथरवटी कामावरच्या पुष्कळ महत्त्वाच्या ग्रंथांची उपलब्धि हें होय. या मागच्या शतकांत हे ग्रंथ अजीबात दृष्टीआड कसे झाले हें कोडें ख्रिस्ती धर्माच्या उत्कर्षानंतर लवकरच अगर उत्कर्ष होत असतां जे धार्मिक व बौद्धिक पालट झाले त्यांच्या साहाय्यानें सहज उलगडतां येईल. धर्मोपाध्याय व विशेषतः वैखानस यांची पक्की खात्री होती कीं, पेगन मूर्तीच्या प्राणस्थानीं भुतें असतात; म्हणून त्यांचा मोडून चुराडा करणें हा कांहीं काळपर्यंत त्यांचा एक मुख्य हेतु होता; व धर्मवेडाहून पिशाच्यांच्या वेडानें नाश कांहीं कमी झाला नाहीं. सध्यांच्या काळांतल्याप्रमाणें प्राचीन काळीं ग्रीक लोकांत संगमरवराला दृश्य मूर्ति-

कर्मांत महत्त्व मिळालें नव्हतें हें सुप्रसिद्ध आहे. पंचरस धातूचेच पुष्कळ पुतळे असत व अति प्रख्यात कारागिरांचीं उत्कृष्ट कामें बहुतेक सोन्याचीं अगर हास्तिदंताचीं असत. सौंदर्याच्या संवर्धनासाठीं खर्च करतां यावा म्हणून इतर सर्व बाबींकडच्या खर्चांतून मोठमोठ्या रकमा काढून, याखातीं जमा करण्यास सरकार तयार असे व राष्ट्राच्या भाग्याच्या उदयास्तांतून म्हणजे युद्धें, बंडें, विजय वगैरे घडामोडींतून-या मौल्यवान् वस्तु अविच्छिन्न राखण्यास तें धार्मिक बाबतींतल्याप्रमाणें दक्ष असे; या दोन गोष्टींपेक्षां ग्रीक संस्थानांच्या इतिहासांत ज्यास्त आश्चर्याची गोष्ट नाहीं. अशा रीतीनें त्या वस्तु जतन करण्यांत आल्या; याचें अंशतः कारण असें कीं, त्या प्राचीन काळांत तीव्र रामणीयक वृत्ति सार्वत्रिक झाली होती. आणखी अंशतः असेंही कारण होतें कीं, दैवतबाहुल्याची बहुधा सहचारी असणारी मनोवृत्ति कळकळीची होती. या वृत्तीनें स्वतःच्या नव्हत, अशाही पूजापद्धतींचे विधी व विषय यांच्याविषयीं मनुष्यांस आदर वाटतो. असा आदर विशेषेंकरून रोमन लोक दाखवीत. ते लोक प्रांत जिंकीत, तेव्हां जित शत्रूंच्या देवालयांचा मान राखीत; कारण हीं देवालयें म्हणजे विश्वनिर्मित्या देवासंबंधीं मानवी आकांक्षांचीं नाना रूपें होत.

### ख्रिस्ती धर्मानें रामणीयक व पूज्यपूजा या वृत्ति नष्ट केल्या.

( क० ५५ ) या दोनही वृत्तींचा ख्रिस्ती धर्मानें नाश केला. प्रस्थापित ख्रिस्ती धर्माबाहेरील कोणत्याही धर्मांत आदरणीय, सन्मानाप्रिय, नुसतें सहनीय तरी, कांहीं असेल ही कल्पनासुद्धां १५०० वर्षेंपर्यंत ख्रिस्ती मुलखांत बिलकूल माहित नव्हती; आणि शिवाय मागें सांगितलेल्या तापसी वृत्तीच्या तत्त्वांमुळें सौंदर्याची, निदान पाषाणमूर्तींसंबंधीं सौंदर्याची कल्पना ठार झाली होती. पंचरसी पुतळ्यांचीं नाणीं झालीं. मौल्यवान् धातूंच्या पुतळ्यांची ( ७६ ) अफरातफर झाली. संगमरवराच्या पुतळ्यांचा चुना झाला, अगर ते छिन्नविच्छिन्न झाले, अथवा त्यांचें विस्मरण पडलें. जेव्हां ख्रिस्ती धर्माचा उदय झाला, तेव्हां ज्युपितराचा हास्तिदंती व सोनेरी विशाल पुतळा आलिंपियामध्यें सुखरूप होता. फिदियसचें सर्वोत्कृष्ट काम व कलेची उत्तमोत्तम जोड अशी या पुतळ्याची ख्याति होती.

ह्या पुतळ्याचें ज्युलियनच्या कारकिर्दीतच लोकांना शेवटचें दर्शन झालें. रोम येथें रानटी लोकांच्या स्वारीनें, रानटी लोकांच्या वर्चस्वानंतरच्या अभिरुचीच्या साफ ऱ्हासानें व अनेकदां अफाट प्रदेश धुळीस मिळवणाऱ्या भयंकर वणव्यांनीं, जुन्या प्रघातांचा साफ नाश केला; आणि कान्स्तांतिनोपल येथें नेलेल्या, वैखानसांच्या रागांतून बचावलेल्या बहुतेक पुतळ्यांचा नाश मूर्तिभंजकांनीं, शूलांकित धर्मयुद्धवीरांनीं अगर मुसलमानांनीं केला.

## कलेंत पेगन नमुने आले.

मागें सांगितल्याप्रमाणें बाराव्या शतकाच्या अखेरीस पिसाच्या निकोलसानें प्राचीन कलेच्या कामांवरून कौशल्य संपादून मध्ययुगांतील निद्रिस्त कलेची पहिल्यांदांच झोंपमोड केली. तथापि त्या वेळीं उत्तम प्रतीचा प्राचीन नमुना माहित नव्हताच. निकोलसनें ज्या कामांवरून मुख्यत: अभ्यास केला तें काम तिसऱ्या किंवा चवथ्या प्रतीचें होतें. हें काम प्रसिद्ध कौन्तेस मातिल्दा इच्या मातुश्रीला पुरण्यासाठीं केलेली जी शव ठेवण्याची पाषाणाची पेटी होती तीवर होतें. ही पेटी त्यावेळीं पिसाच्या धर्मोपाध्यक्षाधिष्ठित मंदिरामध्यें होती व आतां पिसाच्या काम्मो सान्तोमध्यें आहे. गिओतो, मासासिओ व इतर तत्कालीन सर्व कारागिरांनीं उत्तमोत्तम कामें केलीं. पण त्यांस प्राचीन उत्तम नमुन्याचें साहाय्य घेण्यास मिळालें नाहीं. पंधराव्या शतकाच्या आरंभीं लेख लिहिणाऱ्या पोजिओनें रोमच्या तटाआंतील पुतळ्यांची संख्या केवळ सहाच सांगितली आहे. रिएन्झी व पेत्रार्क यांनीं प्राचीन वस्तु-संग्रहाला जरासें उत्तेजन दिलें. व पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धांत मेदीसिच्या व एकामागून एक अशा बऱ्याच पोपाचार्यांच्या खटपटीनें, व या खटपटीस वाङ्मयोद्धारानंतरच्या प्राचीनतेविषयींच्या उत्कट आदरानें मिळालेल्या पुष्टीनें, पुष्कळ ठिकाणीं जमीन उकरण्याचीं मोठीं कामें चाललीं. या कामांचें फळ म्हणजे असंख्य पुतळ्यांचा ( ७७ ) शोध लागला, हें होय. कलेची एकदम अपूर्व भरभराट झाली व बहुतेक जिकडे तिकडे निःसीम उत्साह उत्पन्न झाला. इ० सन १४६८ त दुसऱ्या पालनें रोमच्या कारागिरांचा ( ७८ ) भयंकर छळ सुरू केला खरा. पण

सामान्यपणें त्याच्या मागून येणाऱ्यांनीं कलेचा मनापासून पुरस्कार केला; व त्यांतल्या त्यांत आपल्या उदार काळांत दुसरा ज्युलियस व दहावा लीओ हे अत्यंत उदार म्हणूनही समजण्यास हरकत नाहीं. रोम व फ्लॉरेन्स येथील कारागिरांनीं प्राचीन पेगन अवशेष नमुन्यांदाखल घेतले. मायकेल आंजेलोनें तर तार्सो बेल्वेदीर हा आपला खरा गुरु ( ७९ ) असें स्वतः जाहीर केलें. येणेंप्रमाणें ख्रिस्ती धर्माचें म्हणून विशिष्ट नमुनेदार स्वरूप कलेंत बहुतेक उरलेंच नाहीं; व त्याऐवजीं पेगन नमुने आले.

## धार्मिक पुनरुद्धारासाठीं सावोनारोलाचा जोराचा प्रयत्न.

( क॰ ५६ ) इतालीच्या कलेंत अशा प्रकारचें सार्वत्रिक संचरण चाललें होतें. पण त्याला प्रतिरोध झाला नाहीं असें नाहीं; व एका अत्यंत स्मरणीय प्रतिक्रियेनें त्याची पीछेहाट झाली. प्रत्यक्ष मेदिसीच्या वाड्याखालीं व पेगन कलेच्या कामांच्या उमद्या संग्रहाच्यामध्यें एक थोर धर्मोपदेशक उदय पावला. त्याला हा संकटावह कल कळला व त्यानें आपल्या अलौकिक बुद्धिसामर्थ्याचा या संकटाचा निरोध करण्याकडे उपयोग केला. कलेचा इतिहास ( ८० ) लिहिणाऱ्या एका अजून हयात असलेल्या समर्थ गृहस्थानें चित्रकर्मावरील सावोनारोलाच्या प्रभावाचें नुकतेंच पूर्णपणें वर्णन केलें असल्यामुळें, त्याविषयीं विस्तरशः लिहिण्याची गरज नाहीं.

## सावोनारोलाचें धोरण.

पंधराव्या शतकाच्या अखेरच्या थोड्या वर्षांत तस्कनींत धर्माचा पूर्ण जीर्णोद्धार झाला. व सावोनारोला हा चांगला छाप बसविणारा वक्ता होता, व तो स्पष्ट समजून चुकला होता कीं, या धार्मिक पुनरुद्धाराला कायमचें स्वरूप देण्यास चालत्या काळांतील लोकांच्या कलाची व त्याची सांगड घातली पाहिजे. या विचारानुरूप अर्वाचीन व प्राचीन काळच्या धार्मिक पुनरुद्धाराच्या कामीं यश संपादन केलेल्या सर्व गृहस्थांप्रमाणें धर्माला त्यानें लोकस्वातंत्र्य व लोकसत्ता यांचें स्वरूप देण्याचा उपक्रम केला. या कामाकरितां मेदिसीच्या जुलमांचा त्यानें निषेध आरंभिला व जिकडे तिकडे सावकारांकडून व्याजबट्टयाच्या रूपानें जो जुलूम चालला होता, त्याला आळा घालण्याकरितां मोठमोठ्या सावकारी करणाऱ्या मंडळ्या

उभारल्या. पुढच्या पिढीवर आपल्या मतांची छाप कायम करण्याकरितां मुलांच्या शिक्षणाला वळण लावून व आपल्या उपदेशाचें काम विशेषेंकरून त्यांच्या मध्येंच करून त्यानें प्रयत्न चालविला. विशेषत: पवित्र संगीताचा जीर्णोद्धार करून व चित्रकर्माला त्याचें पुरातन पावित्र्य आणून इतालीच्या राष्ट्रीयजीवनाचे मूळ झरे शुद्ध करण्याची त्यानेंच खटपट केली.

## त्याचीं व्याख्यानें.

ज्यांनीं कुमारीच्या रूपानें पण्यांगनांची चित्रें काढलीं होतीं, धार्मिक कलेच्या निमित्तानें जे स्वकालीन विषयासक्तीच्या विटाचें काम करित होते, व आपण मानवजातीचे शिक्षक हें सन्मान्य नातें आपल्या स्मरणांतून ज्यांनीं घालविलें होतें, अशा कारागिरांच्या निर्भर्त्सनेनें भरलेलीं फार झोंबणारीं भाषणें व्यासपीठावरून तो दर आठवड्यास करित असे. हीं भाषणें मागच्या मूर्तिभंजकांच्या धर्मभ्रमानें प्रेरित नसल्यामुळें, परंतु उलट तस्कनीच्या सौंदर्याभिरुचीची उत्तम प्रकारें ओळख असणाऱ्याच्या तोंडून निघालीं असल्यामुळें, त्यांचा अननुभूत ठसा उमटला.

## त्याचा प्रभाव.

इतालींतले बहुतेक सर्व चितारी फ्लारेन्स येथें गोळा झाले; व सावोना-रोलाच्या प्रभावानें बहुतेक सर्वांनीं कलेचें धार्मिक स्वरूप पुनरुज्जीवित करण्याची खटपट केली. इतालीच्या चित्ररंजनकर्मांत तो फरक लगेच दिसूं लागला; व सावोनारोलानें कारागिरांवर जी छाप बसविली होती, ती त्या प्रसिद्ध सुधारकाला जाळल्यानंतर पुष्कळांच्या वागणुकींत दिसून आली. बोतिसेलीनें तेव्हांपासून आपली कूर्चिका टाकली ती पुन: हातीं घेतली नाहीं. बासिओ देला पोर्ता ( ८१ ) हताश होऊन वैखानस-वृत्तीनें राहूं लागला. पेरूजिनो हा सनातन पंथांतला, कदाचित् केवळ धार्मिक चितान्यांतला, अग्रणी म्हणतां येईल. हा सौकर्यानें झटकन् संदिग्धमतवादी बनला; व त्यानें आसन्नमरण असतां पापांगीकार श्रवण करणाऱ्या उपाध्यायाचें साह्य घेण्याचें तिरस्कारानें नाकारिलें. पेरु-जिनोच्या शिष्यत्वानें ज्याच्या आंगीं त्याच्या आरंभींच्या चित्ररंजनांत दिस-णारी धार्मिक वृत्ति आलेली होती, त्या राफेलनें पहिल्यांदां सावोनारोलाचें सत्यधर्मानुसारित्व लोकांच्या पुढें सिद्ध केलें. हें काम त्यानें धर्मसंस्कारांच्या

वादाच्या मण्डोदक चित्रपटांत प्रस्थापित धर्मसंस्थेंतल्या पंडितांच्या चित्रांमध्यें सावोनारोलाचें चित्र काढून केलें.

### सावोनारोलाच्या मरणानंतर पुनः कला प्रापंचिक स्वरूप पावली.

( क० ५७ ) सावोनारोलाच्या मरणानंतर कलेला प्रापंचिक स्वरूप औत्पातिक वेगानें आलें. स्वकालीनांपेक्षां राफेलच्या आंगीं ही प्रवृत्ति कमी दिसते; तरी तोही अनुचित विसंगत चित्रें काढून आपल्या उत्तरवयांतील कामांची धार्मिक प्रकृति बिघडविण्यास काचावला नाहीं. शारीरिक शक्तीचा भक्त जो मायकेल आंजेलो त्याच्यांत बहुधा हा प्रापंचिक वृत्तीचा पगडा उच्चांशानें दिसला. तो निःसंशय कडक, शुद्ध व भव्य होताच. ख्रीस्ती प्रवृत्तीच्या कोमलपणाचा अभाव याच्यापेक्षां ज्यास्त इतर कोणत्याही थोर कारागिरांत नव्हता; व आरंभींच्या चिताऱ्यांनीं लोकांना ज्या कल्पनांनीं भेडसावलें होतें, त्या सर्वांतल्या अत्यंत भयाण कल्पनेचा नाश करण्याचें काम त्याच्या वांट्याचें म्हणून राखून ठेवल्यासारखेंही होतें. अंतिम न्यायासनाच्या देखाव्याला नग्नाकृतींच्या अध्ययनाचें स्वरूप आणून 'शारन व त्याची नौका' या चित्राची भर त्यांत घालून व त्यांतल्या ख्रिस्ताच्या त्यानें काढलेल्या चित्राचें स्वरूप विशिष्टपणें पेगन करून त्या देखाव्याच्या यथार्थतेची सर्व जाणीव साफ नष्ट केली. हें मण्डोदक चित्र म्हणजे या सर्व चळवळीचें शिरोभूषण मानतां येईल. यानंतरच्या काळांत अर्थात् कांहीं उत्तम चित्रें निर्माण झालीं व कांहीं धार्मिक चितारीही निर्माण झाले. पण सुशिक्षितांच्या धार्मिक वृत्तींचें नेमस्त व रीतसर प्रकाशन म्हणून जी चित्रकर्माची जुनी योग्यता ती त्याला पुनः कधीं प्राप्त झाली नाहीं.

### मध्ययुगांतले चित्रकलेचे तीन भिन्न काळ.

( क० ५८ ) मध्ययुगाच्या पहिल्या काळांत चित्रकर्म म्हणजे केवळ धार्मिक असे व रामणीयकतेच्या कल्पना स्मृतीच्या आड असत. दुसऱ्या काळांत दोन्ही अंगें साहचर्यानें होतीं. शेवटच्या काळांत धार्मिक वृत्तीचा नायनाट झाला व रामणीयकतेची कल्पना निष्कंटक राज्य करूं लागली. चित्ररंगकलेचें चक्र त्यावेळीं पुरें झालें होतें. तिची मानवी मनांवर यापुढें कधींही विशेष मात्रा चालली नाहीं.

### वास्तुकर्मांतही असेंच संक्रमण चाललें होतें.

( क० ५९ ) चित्रकर्मांतल्याप्रमाणें वास्तुकर्मांतही त्याच वेळेच्या सुमारास संक्रमण चाललें होतें, ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. हें खरें कीं, वास्तुकर्मकार प्रत्यक्ष पूजाविषय तयार करित नाहीं, व म्हणून या बाबतींत चित्रकलेपेक्षां वास्तुकलेचा मूर्तिकरणाच्या इतिहासाशीं कमी निकट संबंध आहे; पण उलट पक्षीं ज्या काळीं लोकांना दृश्य अचेतन पूजाविषयाची गरज भासते, त्याच काळांत इंद्रियतर्पक व विस्मयजनक दृग्विषयांवर धार्मिक वृत्ति व तेज अत्यंत अवलंबून असतें.

### खिस्ती धर्मांतलीं धार्मिक वृत्तीचीं तीन प्रकाशनसाधनें.

खिस्ती धर्मानें अशा तीन वस्तु निर्माण केल्या आहेत कीं, ज्या धार्मिक काव्यकलेनें आपल्या धार्मिक प्रवृत्तीचे विशिष्ट नमुने व प्रकाशनसाधनें म्हणून नेहमीं कबूल केल्या आहेत. या तीन वस्तु म्हणजे भजनालयांतील घंटा, सुषिरवाद्य व धर्मोपाध्यक्षाधिष्ठित गाथ पद्धतीनें बांधलेलें भजनमंदिर; ( ८२ ). इ० स० ४००च्या सुमारास कम्पानियामधल्या नोलाच्या पाउलीनस नांवाच्या धर्मोपाध्यक्षानें घंटा सुरू केली असें सांगतात. सुषिर-वाद्याचा आरंभ ग्रीक पंथांत प्रथम झाला व ग्रीस देशांतून तें सातव्या आठव्या शतकांत पश्चिम बादशाहतींत ( ८३ ) आलें असें दिसतें.

### गाथ वास्तुपद्धतीचा उदय.

गाथ वास्तुपद्धति बाराव्या शतकांत जेव्हां सौंदर्याभिरुचीचें पुनरुज्जीवन झालें तेव्हां उदयास आली, व त्यानंतर थोड्याच वेळानें चित्रकलेचें पुनरुत्थान झालें. चित्रांच्या व भजनालयांच्या नवीनपणानें अत्युत्कट भक्तीला ऊत आला. सिमाब्यूनें आपल्या कुमारीच्या प्रसिद्ध चित्रांपैकीं एक पुरें केलें, तेव्हां फ्लारेन्समधले लोक धार्मिक उत्सवांतल्याप्रमाणें त्या चित्राभोंवतीं गोळा झाले; व तें चित्र त्यांनीं ईश्वराच्या प्रार्थना म्हणत व त्याचे आभार मानीत देवालयांत नेलें आणि रस्ते आनंदस्तोत्रांनीं दणाणून टाकले; या सर्वांचें कारण असें कीं, धार्मिक कल्पनेच्या उंच प्रतीच्या प्रचीतीची चमक त्यांच्या मनांत पडली; अगदीं याचप्रमाणें सर्व युरोपभर बहुतेक एकाच काळीं प्रार्थनेचीं भव्य मंदिरें उठलीं. व तद्रूपानें खिस्ती लोकांच्या उत्कट भक्तीचे एकदम पाट वाहूं लागले. हीं मंदिरें उभारण्यास

स्वार्थत्यागाचे अत्युदात्त प्रयत्न झाले. आणि हीं मंदिरें म्हणजे त्या काळच्या धार्मिकतेचें शुद्धाविष्करण, असें त्यांविषयीं सार्वत्रिक मत झालें. हा या मंदिरांविषयीं बांधिलेला अंदाज बरोबर होय; म्हणजे सादर भीति व शांति यांचें मिश्र संवेदन मनांत उत्पन्न करणें; मनोविकारजन्य संतापाचें समीकरण अगर शमन करणें; बुद्धीच्या क्षोभकर प्रवृत्ती निद्रावश करणें; मनाभोंवतीं कृत्रिम, अनैहिक पण अत्यंत हृद्भेदक आवरण उत्पन्न करणें; गंभीर व तादात्म्यकारी सौंदर्ययुक्त प्रतिमांनीं अव्यक्ततेनें कल्पकतेवर परिणाम करणाऱ्या धर्मसत्तेचें प्रतिनिधित्व करणें; हें काम या जगांत ज्या इतर इमारती आहेत, त्यांच्यांकडून या मंदिरांइतकें वाखाणण्याजोगें होण्यासारखें नाहीं; हें कलेचा इतिहास थोडेंतरी जाणणारे अगर कला म्हणजे काय हें थोडेंतरी कळत असणारे सर्वजण कबूल करतील.

### गाथ पद्धति उन्नतावनत होत होती.

( क० ६० ) जेव्हां जेव्हां अशा प्रकारच्या वृत्ती फारच सार्वत्रिक झाल्या, तेव्हां तेव्हां गाथ वास्तुपद्धतीची वाखाणणी अतिशय झाली. जेव्हां जेव्हां या वृत्ती मावळल्या, तेव्हां तेव्हां त्या पद्धतीला कोणी विचारीत नाहींसे झाले व नाकें मुरडूं लागले ( ८४ ).

### ख्रीस्ती वास्तुपद्धतीचा उदय.

( क० ६१ ) वास्तुकलेच्या स्थित्यंतरांची सविस्तर हकीकत देण्याचा; अगर तिला हळूहळू प्रापंचिक स्वरूप कसें येत गेलें, हा छडा लावण्याचा; येथें उद्देश नाहीं. एवढें नमूद केलें म्हणजे पुरे कीं, युरोपभर पसरलेला निबिड अज्ञानांधकार नष्ट झाला, त्याच सुमारास वास्तुकलेची एक पद्धति उदयास आली; ही पद्धति अगदीं केवळ ख्रिस्ती होती; ती मध्ययुगांतल्या धर्माच्या कलाला इतर पद्धतींहून अत्यंत साजेशी होती; असें सर्वत्र मत आहे. व तींत सौंदर्याच्या अभिरुचीचा दर्जा धर्माच्या वृत्तीच्या खालीं लागला होता. धर्मसुधारणेच्या पूर्वीचा नैतिक व बौद्धिक ‘ ब्रह्मघोटाळा ’ सार्वत्रिक होता व चित्ररंजनकलेला प्रापंचिक स्वरूप आलें होतें आणि ती सौंदर्याच्या अगदीं भजनीं लागली होती. तेव्हां वास्तुकलेलाही तशाच प्रकारची अवनति आलेली दिसत होती; जुन्या गाथ वास्तुपद्धतीचा जिकडे तिकडे अव्हेर झाला होता.

### ब्रुनेलेश्चीची पद्धत.

( क० ६२ ) ब्रुनेलेश्चीच्या ( ८५ ) पाखरेखालीं गाथ पद्धतीबद्दल एक नवीच पद्धत चालू झाली. ही पद्धत ज्यास्त मनोहर असें कोणाला वाटेल, पण तींत धार्मिक वृत्तीचा गंध नव्हता, असें सर्वांचें मत आहे. भव्य, नयनाकर्षक, प्रमाणसुंदर अशा ज्या इमारती त्या वेळीं लोकांच्या आवडीनुरूप उठल्या, त्या वस्तुतः बोलून चालून प्राचीन काळच्या मोठमोठ्या देवालयांच्या नमुन्यांप्रमाणें बांधल्या होत्या. ज्या सौंदर्याची बरोबरी करण्याची त्या इमारतींत हांव दिसत होती, तें सौंदर्य म्हणजे प्राचीन सौंदर्य. कलोनचें धर्मोपाध्यक्षाधिष्ठित प्रार्थनामंदिर हें मध्ययुगांतल्या मोठमोठ्या कामांतलें शेवटचें होय.

### सेंत पीतर भजनालयाच्या घटनेचा योजक मायकेल आंजेलो.

हें मंदिर अपुरें राहून युरोपच्या सर्व शक्ती रोम येथील सेंत पीतरच्या भजनालयाकडे लागल्या. मायकेल आंजेलो याजकडे या मंदिराचा घटनासंकल्प तयार करण्याचें काम सोंपाविलें होतें. या कारागिराचें चित्ररंजनाला प्रापंचिक स्वरूप देण्यांत प्रधान अंग होतें, व हें काम त्यानें ज्या संकल्पानें अंगावर घेतलें, तो त्याच्या प्रसिद्ध उद्गारांवरून स्पष्ट दिसतो. ‘ अखिल देवतायतन अंतराळीं लोंबत ठेवीन ’ हे ते उद्गार होत.

### या भजनालयाचें महत्त्व.

( क० ६३ ) सेंत पीतरचें देवायतन मानवी मनाच्या इतिहासलेखकाच्या ठायीं जितकें गाढ कुतूहल उपजवील, तितकें मानवी हस्तानें रचिलेल्या सर्व भवनांतून बहुधा दुसरें कोणतेंही उपजाविणार नाहीं. तसेंच मानवी प्रयत्नाचें वैयर्थ्य व मानवी आशांचें वंध्यात्व ज्यास्त खेदजनक रीतीनें दुसरें कोणतेंही भवन सांगणार नाहीं हें खास. या मंदिराला एवढें थोर ऐश्वर्य प्राप्त होण्यास कोणी एक महत्त्वाकांक्षी व ऐहिकमति उपाचार्य ( ८६ ) कारणभूत झाला; पण या मंदिराच्या घुमजाखालीं त्या उपाचार्याच्या मृत्युलेखाला सुद्धां जागा मिळाली नाहीं. सनातन पंथाच्या सार्वत्रिकतेचा व वैभवाचा चिरंतन स्मारक स्तंभ म्हणून या मंदिराची योजना संकल्पित होती; पण उलट तें त्या पंथाच्या ऱ्हासाचें अत्यंत हृद्भेदक स्मारक होऊन बसलें आहे.

## याच्या पावित्र्याचें कारण.

बुद्धीला अथवा धर्मवृत्तीला अभिमत अशा अत्यंत उदात्त संश्लेषांनीं या मंदिराभोंवतीं दाट गर्दी केलेली आहे; पण कोणाच्या स्वप्नींही नसलेल्या एका संश्लेषानें त्याला पावित्र्य आणलें आहे व तो संश्लेष सतत त्याच्याशीं निगडित राहील. या मंदिराच्या भिंतींच्या आंत सनातन पंथाचे अत्यंत पवित्र अवशेष एकवटले आहेत.

## त्याचें वर्णन.

मायकेल आंजेलो, राफेल, ब्रामान्त, सेलिनि, थोर्वाल्द्‌सेन व कानोवा यांच्या अलौकिक कल्पकतावैभवानें त्यास शोभा आणली आहे. अनुपम सौंदर्ययुक्त जाळीदार कामांनीं ख्रिस्ती चित्रकर्माच्या मोठमोठ्या उत्कृष्ट कामांची प्रतिच्छाया उठविली आहे; व त्यांचे नानाविध रंग एकाद्या राजाचा खजिना रिता पाडण्यासारख्या किंमतीच्या अतिशय भपकेदार संगमरवर दगडांच्या रंगाशीं मिसळून अत्यंत शोभा आली आहे. कालाच्या अनंतत्वाच्या प्रतीकाप्रमाणें उभा असणाऱ्या व जवळच्या उंचपणाचा गर्व वहाणाऱ्या सर्व इमारतींना निंद्य ठरविणाऱ्या या भव्य घुमजाखालीं बहुतकाळ-पर्यंत थोरथोर म्हणून गाजलेल्या मानवपुत्रांचे अवशेष विश्रांति घेत आहेत. ज्या मध्ययुगांतील उपाचार्यांनीं अनर्थकारी व अज्ञानातिमिरावगुंठित काळांत ज्ञानदीप उंच करून प्रकाशित क्षेत्र विस्तृत केलें, राष्ट्रांच्या प्रगतीला हस्त-गत ठेवून वळण लाविलें व ईश्वराचे प्रतिनिधि अशीच बहुधा लोकांत मान्यता संपादन केली, ते सर्व तेथें आहेत. तेथेंही एखादा इंग्रज प्रवाशी इतर पुष्कळ भव्यतर वस्तूंमध्यें एका नक्षीदार शिलाखंडाशीं त्यावर खोदलेल्या स्वभूमीच्या भाग्यचंद्रिकेला सतेज अगर निस्तेज करणाऱ्या एका राजकुळांतील अखेरच्या राजपुत्राच्या नामावलीकडे पहात उभा राहतो. हे संश्लेष तर अवर्णनीय महत्त्वाचे आहेतच; पण धर्मज्ञानपंडितांच्या दृष्टीनें ल्यूथर, अनुग्रहपत्रिका व धर्मसुधारणा यांच्या स्मृतिचिह्नांचें महत्त्व त्या सर्वांहून ज्यास्त आहे.

## धार्मिकतेला रामणीयकतेनें गिळिलें.

आणखी तत्त्वविवेचक इतिहासलेखकास सेंत पीतर मंदिराचें याहू-नही उंच प्रतीचें कुतूहल वाटेल. कारण, या मंदिरावरून आद्यकालीन

मानवी सुधारणेंतल्या मूर्तिकरणाच्या संवयींमुळें उत्पन्न होऊन वाढणाऱ्या प्रेरणेचा शेवट दिसतो. या संवयींमुळेंच इतकीं शतकें ओजास्विता, अव्यक्तता व भयानकता यांनीं युक्त अशा दृष्टिगोचर मूर्ति करून आपल्या धर्मवृत्ति प्रकट करण्याचें काम मनुष्यांनीं चालविलें होतें. या मंदिरावरून धार्मिकतेला रामणीयकतेनें गिळून टाकल्याचें दिसून येतें. म्हणजे ही वास्तुकलेच्या धार्मिक कार्याच्या परिसमाप्तीची पक्की खूणच. धर्मोपाध्यक्षाधिष्ठित प्रार्थनामंदिराचा काळ संपला. मुद्रणयंत्राचा काळ सुरू झाला.

## इतकें विस्तृत विवेचन करण्याचें प्रयोजन.

( क० ६४ ) कलेच्या इतिहासाच्या या अंगाचें बरेंच विस्तृत विवेचन करण्याचीं दोन कारणें आहेत; एक तर तें जात्याच विशेष कुतूहलजनक आहे व दुसरें तें तत्कालीन धार्मिक वृत्तीचा परिपोष वाखाणण्यासारख्या विश्वासूकपणें प्रतिबिंबित करतें. जेव्हां एकाद्या धर्माचीं मुखें साफ पालटून जातात, तेव्हां त्या मुखांनीं प्रकट होणाऱ्या विचारसरणींतही तसाच पालट झाला आहे, हें गृहीत धरण्यास हरकत नाहीं. व मुद्रणकला निघाल्याच्या अगोदर व सर्वच कल्पना जेव्हां साकल्येंकरून मूर्तिकरणविषयक असत, तेव्हां धर्मेतिहासाच्या सत्यप्रवाहाचा शोध, धर्मज्ञानपंडितांच्यापेक्षां कलापटूंच्या कृतींत केला पाहिजे; हें कितीदां सांगितलें, तरी चर्वितचर्वणसें वाटणार नाहीं.

## धर्मसुधारणेचीं कारणें वाङ्मयोद्धारानें झालेल्या पालटांत सांपडतात.

अत्यंत निष्णात तज्ज्ञांना आतां कबूल झालें आहे कीं, वाङ्मयोद्धारामुळें यूरोपच्या बुद्धिक्रमांत जो विलक्षण पालट झाला, त्यांतच धर्मसुधारणेचीं खरीं कारणें सांपडतात. या वाङ्मयोद्धाराला बाराव्या शतकाच्या सुमारास लातिन सारस्वताच्या नव्यानें सुरू झालेल्या अभ्यासानें सुरुवात झाली, व कान्स्तान्तिनोपलच्या ऱ्हासानंतर ग्रीसमधून परागंदा झालेल्या गृहस्थांनीं प्लेतोच्या तत्त्वज्ञानाच्या व ग्रीक भाषेच्या ज्ञानाच्या प्रसारानें हा वाङ्मयोद्धार शिखराला पोंचविला. या वाङ्मयोद्धारानें सरतेशेवटीं धार्मिक वृत्ति अशा पायरीला पोंचली कीं, कांहीं देशांत ती प्रतिरोधी पंथानें दृग्गोचर झाली व इतर देशांत सुशिक्षितवर्गामध्यें वरमलेल्या व कार्यकारणवादी सनातन पंथाच्या प्रचारानें प्रगट झाली; हें नवें स्वरूप मध्य-

युगांतल्या घनदाट व सर्वग्रासक भोळसटपणाहून साफ भिन्न होतें. प्रतिरोधी किंवा संस्कृत सनातन यांपैकीं कोणता पंथ कोणत्या देशांत स्वीकारिला गेला, हें त्या त्या देशाच्या पुष्कळ विशिष्ट, राजकीय, सामाजिक व भूपृष्ठ-रचनात्मकही गोष्टींवर अवलंबून होतें; पण जेथें जेथें ही बौद्धिक चळवळ जोरानें भासूं लागली, तेथें तेथें हा नाहीं तो पंथ दिसूं लागला.

### रामणीयकतेनेंही आपलें पाऊल याच वेळीं पुढें टाकिलें.

ज्या वेळीं प्राचीन वाङ्मयानें येणेंप्रमाणें मध्ययुगांतील विचाराघौवर बहुंशानें परिणाम चालविला होता, त्याच वेळीं प्राचीन प्रतिमाकर्मांचा त्या विचारौघाला दृश्यस्वरूप देणाऱ्या कलेवर तसाच अल्पांशानें परिणाम होत असावा; हा संयोग लक्ष्यांत धरण्याजोगा आहे खास. आणि जरी रामणीयक चळवळ आवश्यकतेनें वरच्या दर्जाच्या लोकांतच व मानवी सुधारणेचें पाऊल प्रामुख्येंकरून पुढें असलेल्या देशांतच होती; तरी याहून जास्त विस्तृत प्रदेशांत नानास्वरूपांनीं दृश्यमान होणाऱ्या एका प्रवृत्तीचें तिनें विश्वासूकपणें प्रतिनिधित्व केलें. प्रत्येक बुद्धिशाखेवर प्रस्थापित धर्मसंस्थेनें एकदां जें वर्चस्व गाजविलें, त्याचा हळू हळू नाश होतो आहे, सुशिक्षित व अज्ञ लोकांच्या प्रचीति देणाऱ्या श्रद्धेंतील अंतर वाढत आहे व सुशिक्षितांमधल्या मूर्तिकरणासंबंधीं अगर प्रतिमापूजनासंबंधीं कल्पना हळू-हळू नष्ट होत आहेत, या गोष्टी त्या रामणीयकतेच्या चळवळीवरून दिसूं लागल्या.

### मागल्या काळच्या धार्मिक कल्पना पुढच्या काळांत काव्यरूप होतात.

( क० ६५ ) तथापि या विषयाचें जें स्वरूप विलक्षणपणें अर्थपूर्ण आहे, तें धार्मिक कलेच्या संक्रमणावस्थेच्या प्रकृतींत आढळणारें आहे असें वाटतें. सौंदर्याभिरुचीनें हळू हळू पूज्यबुद्धीचा प्रदेश आक्रमून साफ घशाखालीं उतरला. हा धार्मिक वृत्तीच्या ऱ्हासाचा प्रकार आहे व तो कलेच्या इतिहासालाच खिळून राहत नाहीं. त्यापासून फार भिन्न आहे. एका काळांतला धर्म म्हणजे पुष्कळदां पुढच्या काळांतलें काव्य होतें. प्रत्येक जिवंत व सचेष्ट धर्माभोंवतीं रूपक व कल्पकता यांचें आवार असतें. या आवारांत मतें वारं-

चार शिरतात; व तेथें तीं नैसर्गिक जीवित संपल्यावर विकृत व कल्पनामय अवस्थेनें बराच काळ राहतात; तीं जणूं काय भ्रष्ट होतात. मानवी कृत्यांवर यापुढें त्यांचा परिणाम प्रत्यक्ष व जोरानें होत नसतो. तीं यापुढें भय उत्पन्न करित नाहींत, आशा लावित नाहींत, मनोवृत्ति चेतवीत नाहींत, मनुष्यांच्या शीलाला वळण देत नाहींत; पण अजूनही त्यांचें एकप्रकारचें अप्रत्यक्ष वजन पडतें, व तीं तत्कालीन भूषणमय व्युत्पन्नतेचें एक अंग होऊन राहतात. त्यांचीं रूपकें बनतात; वाच्याहून वेगळा त्यांचा अर्थ होऊं लागतो. त्यांना काल्पनिक काव्यमय पण अत्यंत चित्ताकर्षक नेपथ्य मिळतो. विचारौघाला ताब्यांत ठेवून त्याला वळण लावण्याऐवजीं तींच त्या विचारौघाबरोबर वाहत जातात; व दूरान्वित आणि युक्तिबाज अर्थ बसविल्यामुळें तीं विकृत होऊन त्यांच्या मूळच्या कलाशीं सर्वथा विसंवादी अशा श्रद्धापद्धतीचीं भूषणें होऊन राहतात. ख्रिस्तीधर्मबाह्य देवता अशा रीतीनें धर्माच्या कक्षेंतून काव्याच्या कक्षेंत आल्या. भोळसर धर्मश्रद्धेंतलि कडक धर्ममतें व विचित्र दंतकथा यांच्या अर्थाची अशी वासलात लावतात कीं, उज्ज्वल काळांतील कल्पनांचे दृष्टांत व पूर्वछाया दाखविणाऱ्या मोहक पौराणिक गोष्टींचें त्यांना स्वरूप येतें. कांहीं काळपर्यंत तीं सुंदर कोमल प्रकाशानें क्षितिजावर लिकलिकत असतात; त्यामुळें कवि मोहून जातो. व ज्या नव्या पद्धतींत तीं मिसळण्याचा प्रयत्न केलेला असतो त्या नव्या पद्धतीला त्यांच्या योगानें मोहकता येते, पण सरतेशेवटीं तींही मंदतेज होऊन मावळतात. धार्मिक कल्पनांची गोष्ट सूर्यासारखी आहे. त्या सूर्याप्रमाणें अस्त पावतात, व अस्तसमयाच्या किरणांची उष्णता अल्प असल्याकारणानें त्या किरणांचा विनियोग सौंदर्य उत्पन्न करण्यांत होतो.

### जडपूजेच्या कल्पनांतून सुटण्याकडे युरोपचा कल आहे.

( क० ६६ ) बाराव्या शतकांत वाङ्मयोद्धाराला आरंभ झाल्यापासून तों तहत धर्मसुधारणेपर्यंतच केवळ नव्हे, तर धर्मसुधारणेपासून सध्यांच्या काळापर्यंत ही युरोपच्या मनाचा जडपूजा किंवा मूर्तिकरण यांशीं संलग्न असलेल्या सर्व कल्पनांतून आपलें आंग अधिकाधिक काढून घेण्याकडे एकसारखा कल आहे; हें निःसंशय होय.

## याचा पुरावा चोहोंबाजूंस भेटतो.

याचा पुरावा आपणांस चोहोंबाजूंस भेटतो. हा कल सनातनपंथी देशांत त्या पंथाच्या अनुयायांत निवळ कार्यकारणवादी लोकमताच्या व ग्रंथांच्या होत असलेल्या एकसारख्या आवाढव्य वाढीनेंच मूर्ति, मंत्रसिद्ध ताइत वगैरेविषयीं पूज्यबुद्धींत घडत असणाऱ्या उत्कृष्ट कळकळीच्या सनातनपंथी लोकांतल्या विलक्षण फरकानेंही दिसतो; आणि तत्कालीन बौद्धिक चळवळीच्या केंद्रीं असणाऱ्या पारिस सारख्या शहरांत, तसेंच बराच काल या बौद्धिक चळवळीच्या कक्षेबाहेर असणाऱ्या सेविल अगर नेपल्स सारख्या शहरांत आपणांस आढळतो; प्रतिरोधीपंथाच्या लोकांत तोच कल तितक्याच जोरानें धर्मसंस्कारतत्त्वाच्या झपाट्यानें होणाऱ्या नाशानें दिसतो. अवाढव्य लूथर पंथाची विशिष्ट खूण म्हणून मागें एकदां फारच जोरानें सांगण्यांत येणारें पण आतां क्वचितच मान्य असलेलें अगर मान्य असलें तरी आग्रहानें (८७) क्वचित्‌च मान्य असलेलें असें जें अभेदाचें तत्त्व, त्याच्या एकसारख्या व बहुतेक निमूटपणें झालेल्या लोपानें तो कल प्रत्ययास येतो. सत्राव्या शतकांत आंग्लिकन धर्मोपदेशक ज्यांत पुष्कळ भरले होते पण एकोणिसाव्या शतकांत विलक्षण बुद्धिसामर्थ्याच्या नायकाच्या प्रयत्नांची व अनुकूल परिस्थितीच्या संगमाची जोड मिळूनही फारच थोडे शिल्लक (८८) उरले होते, त्या हायचर्च पंथाच्या ऱ्हासानें तो कळून येतो. आंग्लिकन व असंमतिपंथी लोक यांच्या संख्येच्या प्रमाणांत सतत पडत जाणाऱ्या आंग्लिकनांना प्रतिकूल फरकानें तोच कल उघड होतो. ग्रेतात्रितन व आयर्लंद शिवाय युरोपाच्या इतर भागांत प्रतिरोधी पंथाला कार्यकारण पंथाच्या जलद येत जाणाऱ्या रूपानेंही तोच कल नजरेस येतो.

# प्रकरण ३ रें.

## भाग २ रा.

## शास्त्रीय शाखेंतील उत्कर्ष.

### या चळवळीचें निराळेंच एक कारण.

( क० १ ) या चळवळीचें प्रमुख कारण मागें म्हटल्याप्रमाणें बुद्धीवर परिणाम करणाऱ्या कारणसमूहानें उत्पन्न होणाऱ्या व जड कल्पना खालीं टाकून वर चढण्यास व श्रद्धेचे सर्व भाग उदात्त करण्यास लागणारी योग्यता व प्रवृत्ति उत्पन्न करणाऱ्या शिक्षणांत मुख्यत्वेंकरून मिळणारें आहे. तथापि या चळवळीवर गाढ पण स्पष्ट परिणाम करणारी एक निराळीच ज्ञानशाखा आहे व ती निराळी नमूद केली पाहिजे. विश्वशासनाविषयींच्या आमच्या कल्पनांत पालट करणारी पदार्थविज्ञानशास्त्राची प्रगति, ही ती शाखा होय.

### शास्त्रीय प्रमेयांची भवतिनभवति पूर्वीं धर्मज्ञानासाठींच असे.

( क० २ ) प्रस्थापित धर्मसंस्थेच्या आरंभींच्या काळांत धर्मज्ञानाविषयींची कळकळ इतकी सर्वभक्षक होती कीं, निव्वळ प्रापंचिक विषयांचा अभ्यास करण्यास बिलकूल फुरसूतच नव्हती. शास्त्रीय प्रमेयांची कधीं भवतिनभवति झालीच तर ती केवळ कांहीं धर्मज्ञानसंबंधीं प्रश्न विशद करण्याच्या उद्देशानें व्हावयाची; आणि या भवतिनभवतीवर अंतःप्रेरणेविषयींच्या चालू कल्पनांचा पूर्ण पगडा असावयाचा.

### धर्मशास्त्रांतील कथेचा वाच्य तसाच व्यंग्य अर्थ असतो.

या विषयावर दोन मतें प्रचालित होतीं; हीं परस्पर अत्यास अगदीं नव्हतीं; पण तीं हल्लीं धारण करण्यांत येतात त्यांहून कांहींशीं भिन्न होतीं. त्यांपैकीं एक रूपकात्मक असून दुसरें अत्यंत मूलार्थक आहे. पहिलें यहुदी टीकाकारांना अतिप्रिय होतें व त्याला आधारभूत पाया म्हणजे

त्यांची अशी श्रद्धा होती कीं, कोणत्याही धर्मशास्त्रांतर्गत कथेचा जो सरळ उघड अर्थ व्याकरण वगैरे नेहमींच्या साधनांनीं कळण्यासारखा वाच्य असतो, त्याशिवाय एक व्यंग्य अगर गूढ अर्थ असतो; हा गूढ अर्थ श्रद्धाळु दृष्टीलाच उमगणारा असतो. कांहीं झालें तरी तो उमगून काढण्यास निदान मनुष्याची बुद्धि चांगली कुशाग्र पाहिजे. यावरून इतिहासकार जेव्हां एखादें साधें वृत्त कथन करित आहेसा दिसतो, अगर एखादें अगदीं साधें सत्य वाचकांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न करतो आहेसा दिसतो, तेव्हां त्याचा खराखरा व मुख्य हेतु एखादें ख्रिस्ती धर्मातलें गूढ उकलून सांगण्याचा असूं शकेल; व त्या गूढाचीं त्यानें सांगितलेले सर्व नैसर्गिक पदार्थ हीं प्रतीकें असतील.

## स्वीदनबोर्ग यानें हें मत संवृद्ध केलें आहे.

हें मत अर्वाचीन कालांत स्वीदनबोर्ग यानें आपल्या 'सादृश्यमत' या पुस्तकांत फार कुशाग्रबुद्धीनें व पद्धतशीर संवृद्ध केलें आहे; अत्यंत दूरान्वित आणि सध्यांच्या काळीं आपणांस असंबद्ध वाटणाऱ्या पुष्कळ शास्त्रार्थांचें मूळ यांतच आहे. असले शास्त्रार्थ धर्मपित्यांच्या काळीं फार होते; व त्यांपैकीं कित्येकांचा उल्लेख करण्याचा प्रसंग मागेंच आला आहे. हें मत बरोबर मानल्यामुळें ऐतिहासिक व धर्मशास्त्रीय अशा दोन अर्थांपैकीं तारतम्येंकरून अधिक प्रामाण्य कोणाचें, हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न उद्भवला.

## ओरिजेन यानें रूपकात्मक पद्धति स्वीकारली.

( क० ३ ) हें सुप्रसिद्धच आहे कीं, ओरिजेन यानें रूपकात्मक अर्थनिर्णयपद्धति हा पाया करून, त्यावर आनिर्बंध विचारपद्धतीची इमारत उठवली; मात्र हा आनिर्बंधपणा कधीं कधीं फारच धिट्टाईचा झाला. मोझेसच्या जगदुत्पत्तीच्या मतावर मानिशि मताचा निकराचा हल्ला झाल्यामुळें ओरिजेन यानें वाच्यार्थापुरता प्रांजलपणें दोष कबूल केला. सर्प, ज्ञानवृक्ष व जीवनतरु यांच्या गोष्टी म्हणजे निव्वळ कुत्र्यामांजरांच्या कल्पित गोष्टी म्हणून त्यांची टेर उडवली, आणि असें प्रतिपादिलें कीं, आध्यात्मिक सत्य ( १ ) सांगणारीं हीं सर्व रूपकें आहेत असें म्हटलें तरच त्यांचें समर्थन करतां येतें; तथापि ओरिजेन हा पाखंडाच्या

सीमेवर इतका पुढें गेला होता कीं, त्याला संस्थापित धर्माचा प्रतिनिधि म्हणतां येणार नाहीं; आणि पुराणप्रिय धर्मानुयायांमध्यें अगदीं स्पष्ट नसलें तरी असें मत प्रचलित आहे कीं, वाच्य तसाच व्यंग्य असे दोनही अर्थ ठेवावे.

### वाच्य व रूपकात्मक अशी दुहेरी पद्धति संत आगस्ताइननें प्रतिपादिली.

(क० ४) या मताचें अगदीं स्पष्ट उदाहरण कदाचित् जगदुत्पत्तीवरील मानिशी पंथाच्या हल्ल्याचें निवारण करण्यास व जगदुत्पत्तीचें मंडन करण्यास संत आगस्ताइननें लिहिलेल्या लहानशा ग्रंथांत आढळणारें आहे. या ग्रंथकाराची विद्वत्तेपेक्षां मनाच्या तर्कानुसारित्वाविषयीं व विचाराच्या नेमकेपणाविषयीं जास्त ख्याति असल्याचें, ध्यानीं आलें म्हणजे हें मंडन फार लक्ष्यांत ठेवण्यासारखें वाटतें. या ग्रंथांत संत आगस्ताइननें जगदुत्पत्तीच्या सहा दिवसांच्या निरनिराळ्या कामांवर मानिशि पंथानुयायांनीं घेतलेल्या आक्षेपांचें विस्तरशः परीक्षण करून खंडन केलें आहे. हें काम करून त्यानें असें तत्त्व प्रतिपादिलें आहे कीं, वाच्यार्थाशिवाय रूपकाच्छादित आध्यात्मिक अर्थही त्यांत आहे.

### जगदुत्पत्तिकथनाचा दुहेरी अर्थ.

येणेंप्रमाणें जगदुत्पत्तीच्या सहा दिवसांच्या हकीकतींत या जड विश्वाच्या प्रथम घटनेचेंच वर्णन आहे, असें नव्हे; तर मानवजातीच्या इतिहासांतील मन्वंतरांचें भविष्य यांत सारांशानें कथन केलें आहे; सहाव्वा दिवस ख्रिस्ती ईश्वरी प्रणयनाचा होता, या दिवशीं नर व नारी म्हणजे ख्रिस्त व धर्मसंस्था या पृथ्वीवर (२) आविर्भूत व्हावयाचीं. त्यांत ख्रिस्ती जीवनाच्या यथानुक्रम पायठण्याचीही पूर्वच्छाया कमी स्पष्टपणें दिसत नव्हती. प्रथमतः पापोदधींत अजून निमग्न असलेल्या मनावर धर्मसूर्याचे किरण पडतात; नंतर दमनाकाशानें वस्तूंचे जड व चिन्मय असे दोन भाग पडतात. नंतर संस्कृत आत्मा पार्थिव वस्तूंपलीकडे जाऊन सत्कार्यक्षम होतो. आध्यात्मिक विचार तारकांप्रमाणें दमननभांत यथानुक्रम उगवतात. समुद्रांत जसे मासे तशी व्यसनोर्मींत सत्कृत्यें तरंगू लागतात. मनाची शुद्धि झाल्यामुळें सद्गुणसंपन्न व शेवटीं आदाम व हव्वा यांच्यांप्रमाणें सद्विचार व

सत्कृति यांचा समागम होऊन ( ३ ) आत्म्याची पुढें मिळणाऱ्या विश्रांती-करतां तयारी होते.

## सर्पाला मिळालेल्या शापांचा रूपकार्थ.

याच प्रमाणें, जेव्हां सर्पाला 'भूमीवर सरपटशील' असा शाप मिळाला, तेव्हां त्याचा अर्थ असा झाला कीं, मोह हा गर्वामुळें व इंद्रियाधीनतेमुळें ( ४ ) उत्पन्न होतो. जेव्हां त्याला 'मृत्तिका भक्षण करशील' असा शाप मिळाला; तेव्हां त्याचा अर्थ बहुधा असा कीं, जिज्ञासातिरेकांच्या दुर्गुणानें मन अदृष्टांत बुडतें.

## आणखी एका वचनाचा रूपकार्थ.

प्रृथ्वीवर पर्जन्य वर्षत नसे, फक्त जमीनींतून धुकें वर येऊन भूपृष्ठ आर्द्र करीत असे; असाही एक काल होता; म्हणून सांगितलेलें आहे. तर त्याचा असा अर्थ समजावयाचा कीं, त्याकाळीं भविष्यवादी व प्रेषित यांची जरूर नव्हती; कारण आविर्भवनाचा झरा प्रत्येक हृदयांत वागत होता.

## वाच्यार्थ नीट जुळत नसला तर वचन गूढ समजून व्यंग्यार्थच घ्यावयाचा.

वाच्य तसाच आध्यात्मिक रूपकमय अर्थही खरा मानावयाचा. परंतु परमेश्वराच्या थोरपणाला व धर्मसंस्थेंतील प्रस्थापित मतांना साजेसा वाच्यार्थ बसवतां येत नाहीं असें झालें, तर तें वचन गूढार्थक मानावयाचें; व त्यांतला भावार्थ आध्यात्मिक अर्थानें घ्यावयाचा. (५) या अर्थाचें धोरण ठेवूनच कांहीं वर्णनवाक्यें घातलेलीं होतीं. उदाहरणार्थ, जगदुत्पत्तीच्या सारांशांत ती खरोखर सहा दिवसांत झाली असतां एका दिवसांत झाली म्हणून म्हटलें आहे; व 'हिरव्या वनस्पती' विशेषेंकरून सृष्ट पदार्थांतून निवडल्या आहेत; तर त्या ठिकाणीं हीं वचनें वाच्यार्थानें घेतलीं असतां उद्देशरहित अथवा चुकीचीं वाटतात, म्हणून तीं रूपकाच्या विशिष्ट भागांकडे लक्ष्य जाण्याकरितांच घातलेलीं आहेत असें समजावयाचें.

## अक्षरशः अर्थाची पद्धति; व तसलें उदाहरण.

( क० ५ ) ख्रिस्ती धर्माच्या आरंभाच्या काळांतल्या या व इतर ग्रंथांत सांगितलेल्या अर्थ बसविण्याच्या रीतींबरोबरच दुसरी एक रीत

चालू होती, ती केवळ अक्षरशः अर्थ करण्याची होय; ही वरच्या रीतीहून निराळी खरी, पण मागें म्हटल्याप्रमाणें अगदीं उलटच होती असें नव्हे. धर्मज्ञानपंडितांची अशी चाल असे कीं, शास्त्रीय प्रमेयांस कशीं तरी लागू पडतील अशीं सहजगत्या घातलीं गेलेलीं वचनें निवडून काढावयाचीं व अधिकारयुक्त वाणीनें कथन केलेलीं वचनें असें मानून केवळ भौतिक शास्त्रांतील सिद्धांतांचें निराकरण करणारीं तीं वाटतील असा त्यांचा अर्थ करावयाचा; मग तीं वचनें काव्य अगर वक्तृत्व यांच्या ओघांतलीं केवळ रूपकें असलीं, अगर प्राकृत संभाषणांतलीं साधारण वाक्यें असलीं, तरी हरकत नाहीं. याचें अति विख्यात उदाहरण म्हटलें म्हणजे ज्यांनीं ग्यालिलियोच्या मतांचा धिक्कार केला, त्यांच्यांत आढळतें. त्या धिक्काराचें कारण असें कीं, "सूर्य आकाशाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकाकडे धांवत असतो" व "पृथ्वीचीं मुळें अशीं घट्ट बसलेलीं आहेत कीं, तीं आपल्या जागेवरून बिलकूल ढळावयाचीं नाहींत;" असें लिहिलेलें होतें. तथापि ही अर्थ बसविण्याची रीत कोणत्या थराला जाऊन पोंचली होती, याचें याहून प्राचीन काळचें उदाहरण देणें बरें.

### याहून प्राचीन उदाहरण.

(क० ६) ख्रिस्ती धर्माच्या आरंभाच्या काळीं जे कांहीं थोडे शास्त्रीय प्रश्न लोकांचें लक्ष्य बरेंच वेधून राहिले होते, त्यांतलाच एक चांगला ध्यानांत घेण्याजोगा प्रश्न असा होता कीं, पृथ्वीच्या पाठीवर विरुद्ध-पाद (आपल्या पायांकडे पाय आहेत असे) लोक आहेत कीं काय? मानिशी पंथाचा पाय चुकून योग्य (६) मताशीं अडखळला व म्हणून धर्मपित्यांनीं त्या मताला विरोध केला. तथापि जरी धर्मसंस्थाग्रणींचें असे लोक असतील याच्या उलट मतैक्य दिसत होतें, तरी साधारण ख्रिस्ती समाजांतील बऱ्याच लोकांचें मत त्याच्या उलट होतेंसें दिसतें. व हें एक नवीनच पाखंड सुरू होतें कीं काय, अशी थोडीशी भीति वाटूं लागली.

### कास्मस वैखानस.

(क० ७) इ० स० ५३५ च्या सुमारास जास्तिनियन बादशहाच्या कारकीर्दींत अलेक्झांद्रियांतल्या एका मठांत कास्मस नांवाचा एक म्हातारा वैखानस राहत होता. या म्हाताऱ्याकडे त्यावेळीं पुष्कळांचे डोळे लागले

होते. तो तरुणपणांत व्यापार करीत असे; व त्या धंद्याकरितां तो पुष्कळ फिरला होता; त्यानें विशेषेंकरून हिंदुस्थान व इथिओपिया या देशांत प्रवास केला होता. त्याची चाणाक्षपणाबद्दल व चोकसपणाबद्दल ख्याति होती; व त्याची शास्त्रीय ज्ञानाविषयींही प्रसिद्धि होती. त्यानें जोग घेतल्यापासून धर्मशास्त्र व भौतिक शास्त्र यांचा संबंध काय हें शोधून काढण्याकडे आपलें मन कळकळीनें गुंतविलें होतें. आपली प्रकृति आतां साफ बिघडली असतां व विशेषेंकरून त्याच्या सांगण्याप्रमाणें आपल्या पोटांत व डोळ्यांत एक प्रकारचा कोरडेपणा असल्यामुळें त्रास होत असतांही, त्या काळच्या कांहीं धर्मज्ञानपडितांच्या कळकळीच्या विनंतीवरून त्यानें आपलें राहिलेलें आयुष्य एक मोठा ग्रंथ लिहिण्यांत घालविण्याचा निश्चय केला. ह्या ग्रंथांत आमच्या पायांकडे पाय असणाऱ्या भूपृष्ठावरील लोकांच्याबद्दल जी आजीबाईची कल्पित गोष्ट आहे, तिचें खंडन करण्यांत यावयाचें होतें. इतकेंच नव्हे, तर आणखी आविर्भवनाच्या उपदेशावर बसविलेली विश्वाच्या संपूर्ण रचनेची व्यवस्था द्यावयाची होती.

## त्याचें पुस्तक: " खिस्ती विश्वरचना. "

या पुस्तकाचें नांव "ख्रिस्ती विश्वरचना" म्हणजे "विश्वाच्या रचनेविषयीं ख्रिस्ती धर्माचें मत " ( ७ ) असें होतें. ख्रिस्ती धर्माच्या आरंभींच्या काळांतून आम्हांकरितां शिल्लक राहिलेलें बैबल व भौतिकशास्त्र यांतील संबंधवराचें चांगले तपशीलवार लिहिलेलें पुस्तक म्हणून जी मुख्यत्वेंकरून त्याची किंमत ती तर आहेच, पण याशिवाय कास्मसनें पाहिलेल्या नाना देशांतील लोकांच्या रीतीभाती व जीवनक्रम यांसंबंधीं विषयांतर करूनही लिहिलेल्या पुष्कळ गोष्टींनीं तें पुस्तक अत्यंत मनोरंजक झालें आहे. त्याचा आरंभ मोठ्या भरंवशानें केलेला आहे. या पुस्तकांत " विश्वाची ख्रिस्ती धर्मानुसार रचना दिलेली आहे, ईश्वरी शास्त्रांतील प्रत्यक्ष प्रमाणांच्या आधारानें ती रचना ठरवलेली आहे. या प्रमाणांबद्दल ख्रिस्ती माणसानें शंका घेणें न्याय्य नव्हे " ( ८ ) असें म्हटलें आहे.

## त्यानें केलेली दुर्बल मनाच्या ख्रिस्त्यांची निर्भर्त्सना.

अशाच तऱ्हेनें या ग्रंथकारानें दुर्बल मनाच्या ख्रिस्ती माणसांची कडकपणानें भर्त्सना केली आहे; कारण हीं माणसें ग्रीक कल्पित गोष्टींतील

चातुर्याला अगर केवळ मानवी शास्त्रांतील फसव्या चमकेला भुलून बहक-तात; व कशाचेंही साहाय्य न घेतां जीं विश्वरचनेचीं इंगितें प्राप्त करून घेतां येतील त्यांहून धर्मशास्त्रांत तीं फार बहुमोल व प्रमाणभूत मिळतील हें विसरतात; व केवळ आपल्या विवेकशक्तीच्या अनुमानांच्या जोरावर आपल्या कल्पना बसविण्याचा प्रयत्न करितात. आपण असल्या मार्गानें जाणार नाहीं असें कास्मसनें अभिवचन दिलें आहे. निर्णयार्थ त्याची धाव ' कायदा व प्रमाण ' यांकडे होती; व पेगन विद्वत्तेला प्राप्त होण्या-सारख्या कोणत्याही पद्धतीहून फारच शुद्ध पद्धत आपण त्यांमधून काढूं याबद्दल त्याला शंका नव्हती.

## कास्मसनें बसवलेली विश्वरचना.

अशा प्रकारच्या वाक्यांची प्रस्तावना असलेल्या या विश्वरचनेचें स्वरूप थोडक्यांत सांगणें बरें. कास्मसच्या मतानें विश्व हा एक सपाट समांतरभुज चौकोन आहे. त्याची लांबी पूर्वपश्चिम मोजावयाची, रुंदी दक्षिणोत्तर मोजा-वयाची आणि ही लांबी रुंदीच्या दुप्पट आहे. याच्या केंद्रीं आम्हीं राहतों ही पृथ्वी आहे, इच्या सभोंवतीं समुद्राचें कडें आहे, समुद्रवलयासभोंवतीं दुसरी एक पृथ्वी आहे; या दुसऱ्या पृथ्वीवर जलप्रयलापूर्वी मनुष्यें राहत होतीं, व तेथूनच नोहाला गलबतांत बसवून आणिलें. जगाच्या उत्तरेस एक शंका-कार उंच पर्वत आहे व त्याच्या सभोंवतीं चंद्रसूर्य नेहमीं प्रदक्षिणा करित असतात. जेव्हां सूर्य त्या पर्वतामागें लोपतो तेव्हां रात्र होते. जेव्हां तो आमच्याकडे असतो तेव्हां दिवस होतो. बाहेरच्या पृथ्वीच्या कडांना आकाश चिकटविलेलें आहे. आकाशाला चार उंच उंच भिंती आहेत व त्यां-वरतीं एकमेकींना मिळून घुमज तयार झाला आहे. म्हणजे आमची पृथ्वी ज्याची भुई असा हा एक मोठा वाडाच आहे. हा वाडा दुमजली आहे. आकाश व पृथ्वी यांच्या मधल्या तारापथानें हे मजले झाले आहेत. तारा-पथाच्या बाजूला एक समुद्र आहे. तो पृथ्वीपासून फार दूर आहे हेंच तारापथावरील पाणी ( आकाशगंगा ). या पाण्यापासून तों आकाशाच्या शिखरापर्यंतचा प्रदेश पुण्यात्म्यांकरितां राखून ठेविलेला आहे. तारापथा-पासून खालीं आमच्या पृथ्वीपर्यंतचा प्रदेश देवदूतांकरितां आहे. हे देवदूत मनुष्यांवर उपकार करित असतात.

हीं मतें म्हणजे शास्त्रविवेचनांतील चातुर्याचे अद्भूत मासले असें बहुधा वाचक समजणार नाहींत; पण हीं मतें कशीं सिद्ध झालीं, तो प्रकार सांगण्याचा मुख्य मुद्दा असल्यामुळें, तीं येथें दिलीं आहेत. तो प्रकार दाखविण्याकरितां कास्मसनें दिलेल्या प्रमाणांचे थोडे मासले देणें अवश्य आहे.

### विरुद्धपादांचें अस्तित्व मानण्यानें अर्थाचा अनर्थ होतो.

षडदिनात्मक सर्गविधीच्या वर्णनांत सर्व क्रिया एका वाक्यांत सारांशानें सांगितली आहे; हें लक्ष्यांत बाळगिलें पाहिजे. तें वाक्य असें:––"द्यावा-पृथ्वी-सर्ग या प्रकरणांत सांगितला आहे." द्यावा-पृथ्वीमध्यें असलेल्या सर्व वस्तूंच्या अर्थानें हे शब्द योजिलेले उघड दिसत आहेत. पण कास्मसचा आक्षेप असा कीं, आमच्या पायांकडे पाय असणारीं माणसें आमच्या उलट बाजूला पृथ्वीतलावर आहेत, हें म्हणणें बरोबर मानलें तर पृथ्वीच्या सभोंवतीं आकाश आहे असें होईल; म्हणजे आकाशाच्या पोटांत पृथ्वी सामावलेली आहे असें होईल. असें असतें तर वरील वाक्यांत 'द्यावा-पृथ्वी-सर्ग' न म्हणतां फक्त 'द्युसर्ग' असें म्हटलेलें (९) असतें. हें अगदीं साधें प्रमाणच खूप लांबवतां येण्यासारखें होतें. कारण पवित्र शास्त्रांतल्या प्रत्येक लेखकानें 'द्यावा-पृथ्वी' असा शब्द संपूर्ण सृष्टि या अर्थानें योजला आहे व तेणेंकरून एक दुसऱ्याच्या पोटांत सामावलेली आहे असें ध्वनित केलें आहे. एब्राहाम, दाविद, होसिआ, इसाया, झेकारिया व आणखी पुष्कळांचीं वचनें दाखविण्यांत आलीं. मेल्किसेदेक यानेंही याप्रमाणें आमच्या पायांकडे पाय असलेल्या लोकांच्या अस्तित्वाविरुद्ध आपली साक्ष दिली होती.

### विरुद्धपादांच्या अस्तित्वाची कल्पना ख्रिस्त्यांस अनुचित होय.

या विषयाचें जर थोडें ज्यास्त परीक्षण करूं लागलों, तर दिसेल कीं ही पृथ्वी मजबूत पायावर घट्ट बसलेली आहे असें वर्णन आहे, यावरून ती हवेंत लटकत नाहीं, इतकें तरी निदान आपणांस म्हणतां येईल; व संत पाल यानें आपणांस सांगितलेंच आहे कीं, सर्व माणसें 'भूतलावर' राहण्यास निर्माण केलेलीं आहेत; यावरून स्पष्ट होतें कीं, एकाहून अधिक तलांवर अगर उलट पृष्ठावर तीं राहत नाहींत; असा लेख दृष्टीसमोर

असतां ' विरुद्धपाद ' माणसांची नुसती कल्पना काढणेंही ख्रिस्ती मनुष्यास उचित नाहीं असें म्हटलें आहे.

## विरुद्धपादांच्या अस्तित्वाच्या उलट संघातक वाक्यें.

म्यानिशी पंथाचें मत साफ खोटें ठरवण्याला असलीं प्रमाणें बस्स आहेत असें समजायला हरकत नाहीं. त्या मताच्या ऐवजीं दुसरें बिनचूक मत सिद्ध करून बसवण्याचें काम मात्र उरलें. या कामीं आम्हांला मार्ग दाखविणारा पहिला व मुख्य दिवा हा कीं, संत पालनें अनेक वेळां पृथ्वीला मंडप ( १० ) म्हटलें आहे. या उपमेवरून कास्मस वगैरे कांहीं धर्मज्ञानपंडितांनीं असा तर्क बांधिला कीं, मोझेसचा मंडप आमच्या जगाची प्रत्यक्ष मूर्ति आहे; हें एकदां मान्य झाल्यावर शास्त्राचा मार्ग पुष्कळ सोपा झाला. ह्या समांतरभुज चौकोनी मंडपाची पूर्वपश्चिम लांबी दक्षिणोत्तर रुंदीच्या दुप्पट होती; व त्यावर घरासारखें छप्पर होतें. इसाया यानें आकाशाला घुमजाची उपमा दिली आहे तें व जाब यानें आकाश पृथ्वीला डकविलेलें आहे असें म्हटलें तें, अशा दोन स्मरणीय वचनांनीं ( आलेक्झांद्रिया येथें सत्तरांनीं केलेल्या, म्हणजे जुन्या कराराच्या ग्रीक भाषांतरांत, या वचनांचें भाषांतर चुकीचें आहे ) सर्व प्रमाणसाहित्याचा ( ११ ) कळस झाला; व तो सिद्धांत श्रद्धावस्तू ( १२ ) प्रमाणें अधिकारवाणीनें सांगण्यास लेखकाला सामर्थ्य आलें.

## भौतिक शास्त्राच्या शोधाच्या खंडनाचा प्रयत्न व्यर्थ होय हें तेव्हां कळलें नव्हतें.

असल्या अर्थनिर्णयाच्या पद्धती शास्त्रीय प्रगतीला कशा मारक आहेत हें सहज लक्षांत येतें. बौद्धिक ऱ्हासाला कास्मसच्या आधींच प्रारंभ झाला होता. कास्मस हा कांहीं मोठा समर्थ लेखक नव्हता. विरुद्धपाद लोकांच्या अस्तित्वाच्या मुद्याचा मोक्षाशीं ( १३ ) संबंध नाहीं. असा आक्षेप घेऊन कांहीं श्रेष्ठ धर्मपित्यांनीं त्याविषयीं बऱ्याच समजूतदारपणानें मत दिलें होतें या सर्व गोष्टी खऱ्या; तथापि पहिल्यापासूनच या कास्मसच्या ग्रंथांत ज्यांचा कळस झाला आहे, तीं तत्त्वें धर्मसिंधूंत अजून तरंगत होतीं. धर्मज्ञान व शास्त्र यांतील भेद अगदीं लक्ष्यांत आलेला नव्हता. शास्त्रकोविदांनीं केलेल्या एखाद्या शोधाच्या खंडनार्थ धर्मग्रंथ धुंडाळणें

म्हणजे अगदीं व्यर्थ कालक्षेप करणें होय; हें जें ढळढळीत दिसणारें सत्य सध्यां बहुधा प्रत्येक पूर्वग्रहविहीन मनावर असकृत् अनुभवानें बिंबलेलें आहे, त्याची त्या वेळीं लोकांच्या मनावर नुसती छायाही पडली नव्हती(१४);आणि युरोपांत भोळसटपणा जसजसा वाढत गेला, तसतसा तंतोतंत आविर्भवन मताचा व्यापकपणा विस्तृत झाला व सरतेशेवटीं त्यानें आपल्या भारानें मानवी बुद्धीची हरेक शाखा चिरडून टाकली.

## विरुद्धपादांचें अस्तित्व मानणाऱ्या संत वर्जिलियसवर मारा.

( क० ८ ) याचें उदाहरण आठव्या शतकाच्या मध्यकाळीं जेव्हां संत वर्जिलियस नांवाच्या आयरिश भक्तानें विरुद्धपाद लोकांच्या अस्तित्वाचें विधान करण्याचें धाडस केलें, तेव्हां दिसून आलें; हा संत भ्रष्ट शास्त्रांचा अभ्यास करणारे जे फार थोडे गृहस्थ होते, त्यांत मोडत असे. त्यानें हें विधान बवेरिया प्रांतांत असतांना केलें. त्याबरोबर सर्व धार्मिक जग क्रोधाविष्ट झालें. संत बानिफेसनें या क्रोधाविष्ट पक्षाचें नायकत्व घेऊन संत वर्जिलीयसवर मुख्य मारा केला; व पोपाचार्य झकारी निदान कांहीं वेळपर्यंत त्या माऱ्याला मदत देत होता. सरतेशेवटीं पृथ्वीच्या आमच्या विरुद्ध तलापर्यंत लोक सफर करून आले व त्यानंतर त्यांनीं धर्मशास्त्रांवरून झालेल्या आपल्या मतांची दुरुस्ती केली.

## तसलेंच भांडणः पुन्हां कोपर्निकसाच्या मताचा निषेध.

( क० ९ ) तथापि तंतोतंत असेंच भांडण पुनः उद्भवलें कोपर्निकस यानें आपली पद्धति जाहीर केली, तेव्हांचें हें भांडण. जरी कोपर्निकसाच्या शोधाची प्रथम निंदा झाली नाहीं, व जरी त्याचा ग्रंथ जो इ० स० १५४३ त प्रसिद्ध झाला तो धर्माचार्य तिसरा पाल थास समर्पण केला होता, तरी त्या ग्रंथांत ग्रथित केलेल्या मतांची विद्वन्मंडळांत थोडी प्रतिष्ठा झाल्याबरोबर रोमच्या धर्मज्ञानपंडितांच्या मनांत अंदेशा येऊन पृथ्वीला गति आहे, ती स्थिर नाहीं, ह्या मताचा अधिकाररवानें निषेध झाला. ( क०. १० ) तो निषेध खुद्द कोपर्निकस व त्याचे दोन शिष्य ( १५ ) यांच्या संबंधांत प्रथम दिसला, व सत्रा वर्षांनंतर पुनः ग्यालिलिओच्या निषेधाच्या व कैदेच्या रूपानें दिसला.

## नवीनपणा म्हणजे महद्पराध होऊन बसला.

( क० ११ ) धर्मज्ञानपंडितांनीं शास्त्राच्या प्रगतीला जे भयंकर अडथळे केले त्यांमधून शास्त्र कधीं तरी पुनरुज्जीवित व्हावें, हें खरोखर आश्चर्यकारक होय. केवळ एकाकी इंद्रियांच्याच निर्णयाशीं व अतएव यहुदी लेखकांच्या परिचित वचनांशीं विसंगत असणाऱ्या हरेक शोधाबरोबर बिनचूक तंटा उपस्थित करण्याइतकी धर्मग्रंथांच्या अर्थनिर्णयाची पद्धत कडकडीत व तशीच लहरी होती ती होतीच; व आणखी तिच्या जोडीला शास्त्रोचित विचारसरणीहून साफ उलट विचारसरणी पैदा होण्यासाठीं हवा तो यत्न केला जात असे. अंधश्रद्धेची सतत होणारी अतोनात स्तुति असंख्य अद्भूत चमत्कार व पोरकट दंतकथा या सर्वांचा परिणाम असा झाला कीं, व्यामोह उत्पन्न करणारें अज्ञान आणि अति नीच स्थितींतल्या रानटी लोकांशिवाय कोठेंही ज्याच्या जोडीचा क्वचित्च सांपडेल असा निकृष्ट व भित्रा श्रद्धाळूपणा निर्माण झाला. कोणत्याही प्रकारचा नवीनपणा म्हणजें महद्पराध. ज्यास्त ज्ञानानें अंदेशा व भय मात्र उत्पन्न व्हावयाचीं. जर तें ज्ञान किंवा तो नवीनपणा विचाराच्या प्रांतांत दिसला; तर त्याला पाखंड हें नांव मिळे. जर सृष्टीच्या निरीक्षणाध्ययनांत असेल तर त्याला इंद्रजाल ह्मणत. गर्बर्तला धर्माचार्य ही पदवी प्राप्त होऊनही त्याचा गारुडी असा दुर्लौकिक होण्याचें चुकलें नाहीं ( १६ ). तसेंच रोजर बेकननें केलेल्या उदात्त श्रमांचें चीज चौदा वर्षांच्या कारागृहवासानें व इतर कमी तापदायक, पण सतत झालेल्या बऱ्याच वर्षांच्या छळानें झालें. यांत आणखी अशी भर पडली कीं, समाजाच्या आणखी कोणत्या स्थितींत जी जी बुद्धि शास्त्रशोधांकडे लागती, ती ती तो मार्ग सोडून धर्मज्ञानाला मिळणाऱ्या अतोनात महत्त्वामुळें तिकडे वळली.

## मध्ययुगाच्या निद्रावशतेचें बेकननें दिलेलें कारण.

( क० १२ ) जेव्हां लार्ड बेकन ज्ञानक्षेत्राचा मोठा नकाशा तयार करित होता, तेव्हां त्याचें चित्त बलात्कारानें मध्ययुगाच्या निद्रेकडे ओढलें गेलें. मानवी मन इतक्या दीर्घकाळपावेतों निद्रावश व निश्चेष्ट रहावें हें सकृद्दर्शनीं त्याच्या आनंदाच्या साफ उलट दिसतें. पण त्यावर बेकनचें

उत्तर नेमकें व ठेवलेलेंच होतें. रतिसुखभोगी पिशाचांप्रमाणें ख्रिस्ती धर्माच्या छातीवर धर्मज्ञानपद्धति बसलीच होती, व सार्वत्रिक निश्चेष्टत्वाचें जनकत्व इतर कोणत्याही एकट्या कारणाहून याच पद्धतीच्या प्रभावाकडे आधिक्यानें द्यावें लागतें (१७).

### वाङ्मयोद्धाराबरोबर शास्त्रोद्धार झाला.

सरते शेवटीं वाङ्मयोद्धाराचा काळ आला; त्याच्या बरोबर भौतिक शास्त्रांचें पुनरुज्जीवन त्वरेनें झालें. व लौकरच आमच्या विचारांत अत्यंत महत्त्वाची एकामागून एक क्रांति घडली.

### पृथ्वी विश्वाचें केंद्र अशी प्राचीन कल्पना.

(क० १३) त्यांपैकीं पहिली क्रांति अशीः विश्वांत मानवाच्या योग्यतेची जुनी कल्पना डळमळली. सुधारणेच्या पायरीस न लागलेल्या माणसास आमचें जग हें सर्व विश्वाच्या केंद्रीं आहे, या सिद्धांताहून दुसरा कोणताही सिद्धांत ज्यास्त स्वयंसिद्ध वाटत नाहीं. त्याच्याभोंवतीं सूर्य व चंद्र दोघेही फिरतात असें त्याला वाटतें. व तारका म्हणजे या जगाच्या नभोवितानाला आपल्या प्रकाशानें सुशोभित करणारे यःकश्चित् दीपक लटकून राहिले आहेत, अशी त्याची कल्पना. या विचारामुळें मानवी सुधारणेच्या आरंभाच्या काळीं सहजींच नाना प्रकारच्या भोळसट कल्पना प्रादुर्भूत होऊन महत्पदास चढल्या. सर्व वस्तूंच्या केंद्रस्थानीं मानव मानला गेल्यामुळें, प्रत्येक चकित करणाऱ्या घटनेचा कांहींना कांहीं परिणाम त्याच्या कृत्यांवर घडावयाचाच; ग्रहण, धूमकेतु, उल्का, झंझावात हीं सर्व त्याच्याचसाठीं निर्माण होतात. विश्वाच्या सर्व इतिहासाचा रोंख मानवाकडे आहे; व त्या इतिहासांत दिसणाऱ्या सर्व घोटाळ्यांचा व संधिभंगांचा संबंध मानवाच्या इतिहासाशीं आहे (१८).

### ज्योतिःशास्त्राचें अध्ययन मानवी अहंतेचा भंग करतें.

(क० १४) असल्या कल्पनांतले दोष दूर करण्याचें काम विशेषेंकरून ज्योतिःशास्त्राकडे आहे. पण बराच काळपावेतों ज्योतिःशास्त्रानें ते दोष दुणावले. याचें कारण असें कीं, शुद्ध ज्योतिष व फलज्योतिष हीं प्रथमतः अभेदभावेंकरून मिश्र होतीं. ज्योतिःशास्त्राचें अध्ययन म्हणजे मानवी कृत्यांच्या दिसण्यांत लहरी घटनांना नियमाच्या साम्राज्यांत

( १९ ) आणून इतिहासतत्त्वविवेचन तयार करण्याचा पहिला पद्धतशीर प्रयत्न होय; असें जें मा. काम्ट यानें म्हटलें आहे, तें अत्यंत चातुर्यदर्शक व वाङ्मयोद्धाराच्या काळापुरतें तरी अत्यंत न्याय्य होय. तथापि कदाचित् विश्वाच्या अनंतत्वानें उत्पन्न होणाऱ्या तुच्छत्वाच्या तेजोभंगकारी जाणिवेशीं मानवी अहंतेचें शेवटचें युद्ध असेंही त्या अध्ययनास म्हणतां येईल.

### विश्वाच्या मानानें पृथ्वी अत्यंत क्षुल्लक या शोधाचें महत्त्व.

सृष्टवस्तुजातामधल्या अत्युच्च दर्जाच्या सर्व पदार्थांचा रोंख ज्या एका केंद्राकडे सतत वळतो (२०), त्या प्रत्येक मानवी व्यक्तीचें जीवन विश्वांतील असंख्य गोलांच्या गतीशीं संबद्ध असतें; असें भासविणाऱ्या कल्पनेहून मनुष्याची योग्यता ज्यास्त उंच प्रतीची दाखविणारी दुसरी कोणतीही कल्पना मनांत येणें खात्रीनें मुष्किलीचें काम होय. पण असें आडमार्गाचें थोडा वेळ अवलंबन झालें, तरी आमची पृथ्वी म्हणजे एकंदर सृष्टीचा फक्त अनंतावा भाग असें सिद्ध करणारें व त्या आमच्या पृथ्वीच्या गतीचें प्रदर्शन करून ती परिमाणानें तशीच स्थितीनें क्षुल्लक होय; असें दाखविणारें जें शास्त्र त्याच्या अखेरच्या रोंखाविषयीं शंका असूं शकणार नाहीं. असल्या शोधाचें आत्मिक महत्त्व अतिरेकानें गणलें जाणें दुरापास्त आहे. जे पृथ्वीला भौतिक विश्वाचें केंद्र मानतात, ते आत्मिक रचनेंतही तिला तसेंच महत्त्व नेहमीं देतील आणि एकदां पहिल्या प्रमेयाचें वैय्यर्थ्य सिद्ध झालें म्हणजे दुसरें विसंगत अथवा मुष्किलीचें वाटतें ( २१ ).

### ज्योतिःशास्त्राला भूस्तरशास्त्राची जोड मिळाली.

( क० १५ ) कोपर्निकस व ग्यालिलियो यांच्या शोधाला जोड लावण्याचें काम या शतकाचा व एका नव्या शास्त्राचा वांटा म्हणून राखून ठेविलेलें आहे. या शोधाचा पूर्ण प्रत्यय अजून आला नाहीं; पण हें खास कीं, त्या शोधाची पहिल्या शोधाप्रमाणेंच सर्व भविष्यत्कालीन धर्मसंस्थांवर जोराची छाप बसेल. हा शोध म्हणजे आदमच्या अगोदरच्या भूरचनेच्या इतिहाससंबंधीं भूस्तर विद्येंतला शोध. अनंतत्वाची उच्चतम कल्पना

म्हणजे अनिश्चितत्व असें मानणाऱ्यांस जसें स्थलाच्या अनंतत्वाचें आविर्भवन तारकांवर लिहिलेलें आढळतें, तसेंच काळाच्या अनंतत्वाचें आविर्भवन शिलोच्चयांवर लिहिलेलें आढळतें.

## भूस्तरविद्येचें महत्त्व.

पण शास्त्रीय संस्कार ज्यास्त घडलेल्या मनाला भूस्तर विद्येचा अति महत्त्वाचा परिणाम वाटतो, तो त्या शास्त्रामुळें विश्वनिर्मितीचें क्षितिज मागें अगण्य अंतरावर सरकलें हा नव्हे, किंवा मोझेसच्या जगदुत्पत्तीचा आरंभींचा अर्थ फिरविला व दुरुस्त केला हाही नव्हे, तर मृत्यूच्या मूळ कारणासंबंधीं ज्या मतांवर एकदां सार्वत्रिक श्रद्धा होती, तें मत भूस्तरविद्येनें साफ खोडून काढलें हा होय. हें मृत्युरूप भयंकर संकट मनुष्यानें त्याला घालून दिलेल्या नियमाचें उल्लंघन केल्यामुळें या विश्वांत प्रादुर्भूत झालें; कोणत्याही सृष्ट प्राण्याच्या शरीरास वेदना देणारें प्रत्येक दुःख, यातना, भोग, भोगावयास लावण्यांत हातभार लावणारा प्रत्येक प्रकारचा मनोविकार, प्रत्येक प्रकारची उपजत बुद्धि, अगर प्रत्येक प्रकारची उणीव हें मानवानें स्वर्गवासांत ईश्वराच्या आज्ञेचा भंग केला त्याचें फळ होय; असा अढळ विश्वास पुष्कळ काळपावेतों होता व अजूनही ज्यांना अगदींच अशिक्षित म्हणतां येणार नाहीं, अशा पुष्कळांचा तोच विश्वास आहे. आणि हा सामान्य सिद्धान्त म्हणजे अति उंच प्रतीचा कित्ता झाला, असंख्य अनुरूप श्रद्धेय मतांच्या मंडलाचा चक्रवर्ती शास्ता झाला, मनुष्यांच्या जिज्ञासातृप्तीच्या सर्व प्रयत्नांत सहजप्रवृत्तींना वळण देणारें आद्यतत्त्व अगर संभाव्यतेचें माप झाला. एकंदर मृत्यु व यातना आदमच्याच पापाचें फळ असें झालें म्हणजे प्रत्येक घडणाऱ्या मृत्यूचा अगर यातनेचा विशिष्ट अर्थ बसविला जावा हें स्वाभाविकच होय. आणि जर भूलोकींच्या फार मोठ्या न्यूनतांचा संबंध मानवाच्या इतिहासाशीं जोडला गेला, तर यांहून कमी दर्जाच्या दुःखांचा संबंध त्या इतिहासाशीं कमी नाहीं असा विश्वास वाटणें साहजिक होय; पण आतां भूस्तरविद्येनें पूर्णपणें सिद्ध केलें आहे कीं, या सिद्धान्तांत घोडचूक आहे; ती कोणाच्या नजरेस आली नाहीं.

## भूस्तरविद्येच्या अध्ययनानें मृत्यूच्या कल्पनेविषयींची घोडचूक दुरुस्त झाली.

या पृथ्वीला मनुष्याचे पाय लागण्यापूर्वी असंख्य युगें पृथ्वीतलनिवासी प्राण्यांत मृत्यूची दंगल व चंगळ चालू होती हें भूस्तरविद्येनें सिद्ध केलें आहे. मास्तोदन ( दंतस्तन ) व दिनोथेरियम ( भीमारण्यक ) यांचें जगावर साम्राज्य चालू असतांही मृत्यूनें ध्वनित होणारी यातना व दौर्बल्य हीं आतांप्रमाणचें ज्ञात होतीं, इतका मृत्यूचा वस्तूंच्या मूल घटकांत अंतर्भाव होता; हेंही त्या विद्येनें सिद्ध केलें आहे. हा सिद्धांत कबूल न करणें हें आतां अशक्यच आहे; व तो मान्य करणें म्हणजे गतकालीं मान्य झालेल्या मूलतत्त्वांपैकीं एकाला फांटा देणें होय.

## शास्त्रीय शोधांनीं सृष्टींतली नियमबद्धता कळली.

( क० १६ ) शास्त्रीय शोधांची श्रद्धाळूपणावर दुसऱ्या एका प्रकारची छाप बसली आहे; ती अशी कीं, अमानुष शक्तींच्या हातून मनुष्याच्या व्यवहारांत ढवळाढवळ होत असते, ही कल्पना जाऊन तिच्या जागीं नियमबद्धतेची कल्पना हळू हळू येत चालली. या अदलाबदलीसंबंधीं अगोदरच अनेकदां उल्लेख झाला आहे; तथापि तिकडे पुनः एकदां क्षणभर वळल्याबद्दल वाचक माफी करतील असा भरंवसा आहे. तिकडे पुनः वळण्यांतला हेतु असा कीं, मागीलपेक्षां अधिक तंतोतंतपणें या पालटाचें स्वरूप व मर्यादा दाखवितां याव्या.

## नियमबद्धतेहून नियमच्यवन रानटी मनांवर जास्त परिणाम करतें.

( क० १७ ) सुधारणेच्या पायरीस न लागलेल्या लोकांचें विशिष्ट चिह्न असें आहे कीं, त्यांच्या मनांत कुतूहल वृत्ति व विशेषेंकरून धार्मिक वृत्ति या निसर्गनियमांच्या आटोक्यांत उघड येणाऱ्या घटनांनीं फारच क्वचित् संक्षुब्ध होतात; पण जें जें म्हणून नियमच्युत दिसेल त्यानें त्यानें यांच्या मनावर तीव्र परिणाम होतो; हें अगदीं खरें कीं, सुधारणेच्या पायरीस न लागलेल्या माणसांच्या मनांत ‘ निसर्गनियम ’ या शब्दानें केवळ अंधुक अनिश्चित कल्पना उद्भवते. निरनिराळ्या जातींच्या घटनांमध्यें

परस्पर राहणाऱ्या निकटसंबंधाची त्याला कल्पना होत नाहीं. व अति नियमितपणें घडणाऱ्या घटना-प्रकारांचेंही जनकत्व तो वारंवार विशिष्ट अधिष्ठात्या अशरीर आत्म्याच्या कर्तृत्वाकडेच लावतो. तथापि कित्येक घटना नियमित क्रमानें घडतात असें त्याच्या लक्षांत येतें. पण दुसऱ्या-कित्येक लहर लागेल तशा घडतात असें त्याला दिसतें; व या दुसऱ्या प्रकारच्या घटनांचा संबंध विशेषेंकरून ईश्वरी व्यवधायकत्वाकडे लावला जातो. उदाहरणार्थ, धूमकेतु, उल्का व वातावरणांतील घटना यांचा संबंध सूर्य, तारका वगैरेंच्या मागून किती तरी काळपावेतों धार्मिक कल्पनांशीं लावला जात असे.

## ईश्वराची अवहेलना होते, म्हणून प्राचीनकाळीं द्यूताला मनाई करीत.

( क० १८ ) तसेंच द्यूत वगैरे नशीबाचे खेळ फार प्राचीन काळा-पासून जे मना केलेले होते, ते त्यांच्या योगानें ओढवणाऱ्या अनेक अनर्थां-मुळेंच केवळ नव्हे, तर तेणेंकरून ईश्वराची अवहेलना होते म्हणूनः हलक्या सलक्या बाबतींत ईश्वराला ( २२ ) मध्यस्थी करावयाला बोलावणें म्हणजे त्याची अवहेलना करणेंच होय. फांसा कसा पडेल याचा अंदाज मनुष्याला गवसत नाहीं म्हणून समज असा असे कीं, त्याचा निर्णय ईश्वरी मध्यस्थीनें होतो; आणि या समजानुरूप नशीबाची परीक्षा करणें हें ईश्वराचें सान्निध्य मिळविण्याचें एक आवडीचें साधन ( २३ ) झालें.

## या संवयीचे दोन महत्त्वाचे परिणाम.

( क० १९ ) धार्मिक वृत्तींचा मुख्यत्वेंकरून नियमोल्लंघक गोष्टींशीं संबंध जोडणाऱ्या या संवयीमुळें दोन फार महत्त्वाचे परिणाम घडून आले; पैकीं एक भौतिक शास्त्रसंबंधीं आहे व दुसरा धर्मज्ञानसंबंधीं आहे. प्रथमतः नियमभंगक व चांचल्यप्रचुर घटना जोंपर्यंत प्रत्यक्ष ईश्वरी लीला मानल्या जातील, तोंपर्यंत शास्त्रीयरीत्या त्यांचा उलगडा करण्याच्या प्रयत्नांतील उत्साहाचा भंग केला जाईल. कारण असले प्रयत्न म्हणजे ईश्वरी लीलांचें अवगाहन करून ईश्वराची अवहेलना करणारे वाटतात; व जर कां ते तडीस जाऊं दिले, तर त्यामुळें धार्मिक मनोवृत्तींचीं मुळें कापून टाकल्यासारखीं होतात ( २४ ).

## प्राक्शास्त्रीय व शास्त्रीय काळांतील ईश्वरविषयक कल्पना.

( क० २० ) पुनः मानवी सुधारणेच्या आद्यकाळीं ईश्वरविषयक कल्पना पुढच्या काळांतल्या कल्पनेहून मूलतः निराळी असावयाची हें उघड आहे. प्राक्शास्त्रीय काळीं ईश्वराच्या उपस्थितीचा अनुभव व नियमोच्छेदक चांचल्यप्रचुर कृत्य यांत अभेद मानतात. तेच शास्त्रीय काळांत तो अनुभव व नियमपालक चांचल्यविहीन कृत्य यांमध्यें संगति मानतात. या दोन्ही काळांतील धार्मिक मनोवृत्तींचीं स्वरूपें अगदीं वेगवेगळीं असल्यामुळें, तीं ज्यांच्याशीं जडलेलीं असतात त्या ईश्वराविषयींच्या कल्पनाही तशाच वेगवेगळ्या असावयाच्या. एका कल्पनेंत मुख्यत्वें ईश्वरी व्यवधायकत्व, अद्भूत चमत्कार, अनियमितता व चांचल्य हीं भरलेलीं असतात; व दुसरींत नियमितपणा, स्थैर्य, भविष्यदर्शन, नैतिक साकल्य हीं असतात.

## ज्योतिःशास्त्राच्या जीर्णोद्धारानें नियमबद्धतेची कल्पना आली.

( क० २१ ) ज्या काळाचा उल्लेख चालला आहे, त्याकाळीं प्रथम जें शास्त्र अभ्युदय पावलें तें ज्योतिःशास्त्र होय. पेगन काळांतले ग्रंथ पुनः पढूं लागल्यामुळें व कदाचित् त्याहीपेक्षां ख्रिस्ती जगावर आरबी बुद्धिमत्तेची त्यावेळीं जोराची छाप बसली असल्यामुळें, चौदाव्या शतकांत झालेल्या फलज्योतिषाच्या जीर्णोद्धारानें ज्योतिःशास्त्राला प्रारंभीं बरेंच महत्त्व आलें. कोपर्निकसाच्या नामांकित ग्रंथाच्या, केप्लर, ग्यालिलियो व तायकोब्राहे यांच्या बहुतेक समकालीन उदयाच्या, दूरदर्शकाच्या शोधाच्या व त्यांत जलद झालेल्या सुधारणेच्या प्रभावानें जेथें पूर्वीं बराच काळपावेतों भोळसटपणाचें निष्कंटक साम्राज्य होतें, तेथें लवकरच निसर्ग नियमाची कल्पना प्रविष्ट झाली.

## देकार्तच्या सिद्धांताचें महत्त्व.

देकार्तच्या आवर्तसिद्धांताला शास्त्रीय दृष्ट्या कांहीं किंमत नाहीं असें जरी सध्यां कळून चुकलें आहे, तरी त्याचें मानसिक महत्त्व उंच प्रतीचें होतें असें म्हणतात तें खरें; कारण निसर्गनियमास अनुसरून व अशरीरकर्तृत्वाच्या व्यवधायकत्वावांचून विश्वरचना बसविण्याचा तो पहिला प्रयत्न होय ( २५ ). पूर्वीं आकाशांतील गोलांच्या पृथक् पृथक् गति

बहुतेक परस्परसंबंधरहित मानीत आणि या गति व वातावरणांतील फेरफार देवदूतांच्या कर्तृत्वानें होतात (२६), असा लोकांचा समज असे. तालमुदांत प्रत्येक तारकेचा व प्रत्येक महाभूताचा एक अधिष्ठाता देवदूत योजलेला आहे व असल्याच कल्पना मध्ययुगभर (२७) प्रचलित होत्या. अलग व लहरी अशा असंख्य घटना चाललेल्या असतात, या समजुतीनें सहजींच त्यांचा उद्भव कशानें होतो, हा उलगडा करण्यासाठीं देवदूतांच्या अस्तित्वाविषयीं कल्पना सुचली; व उलटपक्षीं पुनः पुनः आगंतुकाप्रमाणें मनांत शिरणाऱ्या घटनांशीं देवदूतांचा संबंध जोडल्यानें देवदूतांच्या दर्शनांच्या असंख्य दंतकथांच्या रूपानें ती दिसूं लागली. देकार्तच्या व न्यूतनच्या बुद्धिवैभव–भानूचा उदय झाल्याबरोबर हें सर्व धुकें पार नाहींसें झालें; नियमाचें साम्राज्य शिरसावंद्य झालें; व विश्वरचनेविषयींच्या प्राचीन समजुतीनुरूप उत्पन्न होणाऱ्या कल्पना कमी होत होत निःशेष झाल्या.

## धूमकेतूंच्या अनियमिततेमुळें भोळसटपणाचें आयुष्य वाढलें.

( क० २२ ) तथापि मरणोन्मुख झालेल्या भोळसटपणाला धूमकेतूंच्या मात्रेचा घुटका मिळून त्यांचें आयुष्य बरेंच वाढलें. त्यांचें क्वचित् होणारें आगमन, त्यांच्या कक्षेचा विक्षिप्तपणा, त्यांचें स्वरूप कळण्याची मारामार आणि त्यांच्या दर्शनांचें वैभव व भयानकता,या सर्वांचा मनुष्यांच्या मनावर त्यांच्या अलौकिकतेची विलक्षण जाणीव बिंबविण्यांत हातभार लागला होता. प्राचीन काळापासून धूमकेतूंना अरिष्टाचीं पूर्वचिन्हें समजत व तशी मनुष्यांना संवयच होऊन गेल्यामुळें त्या समजाच्या पुष्ट्यर्थ लवकरच पुराव्याची रास अगडबंब वाढत गेली. सीझर, नामांकित कान्स्टंटाइन, पांचवा चार्लस, असल्या बादशहांच्या मरणाचे अगोदर, धूमकेतूंचें दर्शन झालें होतें; झर्सिस बादशहाच्या ग्रीसवरच्या स्वारीपूर्वीं, पिलापोनिससच्या युद्धापूर्वीं, सीझर व पांपे यांमधील आपसांतील लढायांपूर्वीं, यरुशलेमच्या पाडावापूर्वीं, आतिलाच्या स्वारीपूर्वीं व मनुष्यजातीला त्राहि त्राहि करूं लावणाऱ्या असंख्य घोर दुष्काळांपूर्वीं व सांथींपूर्वीं धूमकेतु उगवले होते, ( २८ ) असें पहाण्यांत आलें होतें. अशा प्रकारचीं शेंकडों उदाहरणें गोळा झालीं व विश्वचालनाविषयींच्या प्रचलित कल्पनांशीं धूमकेतूंच्या अलौकिक शीलाची सुसंगतता असल्यामुळें, पूर्वग्रहानेंच

तें शील सुसंभाव्य वाटत असे. अशा काळीं कांहींशा संदिग्धमतीच्या मनुष्यांच्याही मनाची खात्री पटविण्यास पुरे इतका भक्कम पुरावा त्या उदाहरणांतून मिळाला.

### धूमकेतूंविषयींचा धर्मज्ञानपंडितांचा उलगडा कार्यकारणात्मक होता.

या दुश्चिन्हांचें अनर्थसूचकत्व पूर्णपणें कबूल करूनही कांहीं धर्मज्ञानपंडित खरोखर त्यांचा उलगडा कार्यकारणभावाला धरून करण्याचा प्रयत्न करीत. त्यांचें मत असें असे कीं, प्राणहारक वाफा निघून त्यांजपासून हे धूमकेतु तयार होतात; आणि या वाफांनीं वातावरण बिघडतें व सांथी सुरू होतात; या वाफा कित्येकांच्या मतें पृथ्वीपासून निघतात, पण इतरांच्या मतें आकाशांतून निघतात. या धूमकेतूंचा प्रभाव विशेषतः राजांवर चालतो खरा, पण त्याचें कारण केवळ इतकेंच कीं, राजे अविश्रांत श्रम व चैनबाजी करितात, यामुळें ते इतर माणसांहून अशक्त (२९) होतात; तथापि साधारणपणें असा समज असे कीं, संकटाची सूचना देण्यासच केवळ ह्या धूमकेतूंचा अलौकिक शक्ति उदय करते. दोन तीन थोर गृहस्थांनीं हा समज झुगारून देण्याचा प्रयत्न केला; पण व्यर्थ.

### धूमकेतूंविषयींचा भोळसटपणा घालविण्याचे प्रयत्न.

(क० २३) उदाहरणार्थ, एकदां एक मोठा धूमकेतु दिसूं लागून जिकडे तिकडे लोक भयभीत झाले असतां, पारासेल्ससनें लोकांच्या समजुतींच्या विरुद्ध (३०) जोरानें लिहिलें; या समजुती म्हणजे दैववादाचाच एक प्रकार असून, ईश्वरी योजनेवरील विश्वासाशीं असंबद्ध होत; असें धर्मज्ञानाच्या आधारावर त्यानें म्हटलें. इ० स० १६८० त असेच लोक भयभीत झाले असतां बेल यानें असाच प्रयत्न केला, पण तत्कालीन मतौघानुरूप त्यानें धर्मज्ञानाचा मुद्दा सोडून तत्त्वज्ञानाच्या मुद्द्यावर या प्रश्नाचें विवेचन केलें. काकतालीय न्यायानें घडणाऱ्या गोष्टी वाटतील तशा निवडून घेऊन त्यांवर रचलेल्या तर्कपद्धतींतले दोष त्यानें अत्यंत चातुर्यानें उघडकीस आणले. त्यानें या विषयावर एक ग्रंथ लिहिला व त्यांत भोळसटपणाचें हळूहळू एकीकरण कसें होत गेलें (३१), हें दाखविलें.

### भौतिक शास्त्रानेंच खरा उलगडा केला.

पण शास्त्र मदतीस येईपर्यंत धर्मज्ञान व तत्त्वज्ञान हीं दोन्हीही सारखींच ठरलीं. धूमकेतूंच्या प्रदक्षिणेची अटकळ हेलेनें बसवल्याबरोबर ते नियमांच्या साम्राज्यांत आले व मनुष्याच्या भोळसटपणापैकीं अनादिकालापासून चालत आलेला एक प्रकार नष्ट झाला.

### प्रत्येक भौतिकशास्त्रांत असाच प्रकार घडून नवें वळण सुरू झालें.

( क्र० २४ ) ज्योतिःशास्त्रांत घडलेला हा प्रकार म्हणजे जरी कदाचित् आत्यंतिक म्हणतां येईल, तरी सत्राव्या शतकांत प्रत्येक शास्त्रांत घडलेल्या प्रकारांपैकीं केवळ एक उदाहरण होय. नव्या मतौघाला जलद मिळत गेलेल्या जयांमुळें जिकडे तिकडे अशरीरकर्तृत्वाच्या व्यवधायकत्वाऐवजीं निसर्गनियमाची कल्पना रुजत चालली; व जेथें आपल्याला उमगत नाहीं, तेथें सुद्धां नैसर्गिक कारण असलेंच पाहिजे, असा लोकांचा समज होत चालला. बेकनच्या लेखांचें स्तोम, कांहीं अंशीं राष्ट्राभिमानामुळें व कांहीं अंशीं ( ३२ ) स्वकालीन गृहस्थांविषयींचीं बेकनचीं अन्यायाचीं मतें लोकांना फार तत्परतेनें मानवल्यामुळें, फारच माजलें असें वाटतें; तरी दुसऱ्या कोणत्याही एका कारणापेक्षां या लेखांनीं नव्या मतौघाला ज्यास्त वळण लागलें व हे लेख इंग्लंदांत तरी बहुतेक अत्युच्च ठरले. फलज्योतिषापासून जसें शुद्ध ज्योतिःशास्त्र, तसें किमयापासून रसायनशास्त्र वेगळें निघालें. सिमेन्तोचें विद्वन्मंडळ तस्कनीमध्यें इ० स० १६५७त स्थापन झालें. लंदनमध्यें राजमान्य विद्वन्मंडळ इ० स० १६६० त झालें; व पारीसमध्यें शास्त्रीय विद्वन्मंडळ इ० स० १६६६ त झालें.

### शास्त्रांच्या उत्कर्षाचा प्रभाव.

( क्र० २५ ) एका समयींच नाना प्रकारचीं पुष्कळ शास्त्रें उत्कर्ष पावून त्यांनीं सृष्टीच्या निरनिराळ्या शाखांचा भोळसर कल्पनांच्या गर्तेंतून उद्धार केला; इतकेंच नव्हे, तर आपल्या एकसारख्या एककेंद्राभिगमनानें नियमबद्धतेच्या विश्वव्यापी पद्धतीची कल्पना लोकांत उत्पन्न केली, ईश्वराचें साक्षित्व अद्भूतापेक्षां सुव्यवस्थेशीं नेहमीं निगडित करण्यास लोकांना शिकविलें, व अति सूक्ष्म आणि अत्यल्पायु जीवजंतूंच्या रचनेंत दिसणाऱ्या ईश्वराच्या योजनाचातुर्याची तसेंच अत्यंत दुर्बल सृष्ट जंतु-

मात्रालाही सुखप्रदेश निर्माण करणाऱ्या त्याच्या अपेक्षक चिंतेची साक्ष पटवून, तिजविषयीं आदरयुक्त सन्मानानें विचार करण्याची लोकांना संवय लाविली.

### शास्त्राच्या वरपगड्यानें धर्मज्ञानांतील भयानकता नष्ट झाली.

( क० २६ ) या फेरबदलाचा एक महत्त्वाचा परिणाम असा झाला कीं, धर्मज्ञानपद्धतींतला बराचसा कठोरपणा व खिन्नपणा दूर झाला. जोंपर्यंत नियमभंगक गोष्टींवरून ईश्वराविषयींच्या मनुष्याच्या कल्पना तयार होत असत, तोंपर्यंत त्यांचें लक्ष मुख्यत्वेंकरून संकटाकडे ओढत असे; कारण संकटें बहुधा अपवादासारखीं असतात व सुखाचें मूळ ज्या गोष्टींत असतें, त्या सामान्यपणें घडणाऱ्या असतात. शिवाय माणसाचें शीलच असें विलक्षण तुसडें असतें कीं, त्यावर कृतज्ञतेच्याहून भयाचा ठसा ज्यास्त वठतो. तदनुसार आमच्या पूर्वजांची भक्ति मुख्यतः वावटळी, सांथी, दुष्काळ, मृत्यु यांच्यांशीं फार संलग्न असे; कारण या गोष्टी म्हणजे अपराधाबद्दल शासन म्हणून भोगाव्या लागतात असा समज असे; व म्हणून त्यांचें भय माणसाला बहुतेक वेडें करून सोडी. धर्मज्ञानांतल्या मुख्य कल्पना म्हणजे मनुष्याची कष्टमय स्थिति व त्याला पुढें मिळणारी भयंकर गति याच होत्या, तोंपर्यंत सर्व प्रकारच्या समजुतींना तदनुरूप रंग प्राप्त होई. पण ही जी स्थिति मानवी सुधारणेच्या आद्य कळेंत अगदीं स्वाभाविक होती, ती अर्वाचीन शास्त्रांचा पगडा धर्मज्ञानाच्या वाढीवर बसल्याबरोबर लवकरच लयास गेली. कारण यावेळीं मनुष्याचें लक्ष्य मुख्यतः सृष्टजीवजंतूंच्या कल्याणासाठीं योजिलेल्या असंख्य तरतूदींकडे वेधलें. व इहलोकीं येणाऱ्या आपत्ति ब्रह्मांडाच्या एकंदर रचनेशीं संलग्न अशा सामान्य नियमांमुळेंच घडत असतात, व मनुष्यप्राणी या जगांत निर्माण होण्यापूर्वीही त्यापैकीं पुष्कळ नियम आपलें कार्य करीत होते, असें दिसून आल्यामुळें आपत्तींच्या योगानें मागच्या काळीं उत्पन्न होत असलेली भयानकता निदान बरीच कमी झाली.

### परिणामवादाच्या वाढीचें कार्य.

( क० २७ ) तात्त्विक विचारांवर पगडा बसविल्यामुळें लक्ष्यांत ठेवण्यासारखी शास्त्रीय प्रगतीची दुसरी शाखा म्हटली म्हणजे विश्वाच्या

परिणमनवादमय कल्पनेची जलद झालेली वाढ ही होय. सतराव्या शतकांतल्या थोर थोर तत्त्वज्ञांच्या कल्पनेप्रमाणें हें ब्रह्माण्ड म्हणजे सिसृक्षु परमेश्वराच्या आज्ञेनें ताबडतोब अस्तित्वांत आलेली व तत्क्षणीं सर्वतोपरि परिष्कृत झालेली अवाढव्य व संकीर्ण यंत्ररचना होय. तथापि गेल्या व त्याहूनही या शतकांत रसायन शास्त्राची वाढ, गतिप्रेरणा, अविनाशी व अन्योन्यकार्यकारी असतात हें मत, व भूस्तरविद्येंतील शोध, या गोष्टींनीं वरील कल्पना फार पालटलेली आहे. पोटभेद हे परस्पर विकृतिशील असतात कीं नाहींत, असले जे अजून अनिश्चित आहेत ते प्रश्न सोडविण्याच्या भानगडींत न पडतां, ( व प्रस्तुत लेखकाच्या आंगीं त्यांचें विवेचन करण्याचें यत्किंचित्‌ही सामर्थ्य नाहीं ) एवढें कबूल करतां येईल कीं, शास्त्राच्या बऱ्याचशा शाखांत नित्य रूपविकृतीची, निसर्गनियमवशतेनें साधी स्थिति सदोदित अधिकाधिक संकीर्ण बनत असल्याची, कल्पना अंमल गाजवित आहे. हें जगही स्वतः एका काळीं बाष्पमय होतें; व हळू हळू तें थिजून घट्ट झालें; व त्याच्या सध्यांच्या स्थितीवरून असंख्य युगांत त्याचीं क्रमशः परिणमनें घडून आलेलीं दिसतात; असें मानण्यास पुष्कळ कारण आहे.

### परिणामवादानें विश्वरचनेविषयींची कल्पना बदलते.

या कल्पनेप्रमाणें विश्व हें यांत्रिक रचनाकार्य नव्हे, तर सेंद्रिय रचनाकार्य होय; व त्यांत जें संकीर्णत्व व परिणामगामित्व दिसतें, ती क्रमशः होणारी आभ्यंतरवृद्धि होय, बाह्योपागत उपसर्ग नव्हे; असें होतें. ही कल्पना इतकी अपरिचित व सकृद्दर्शनीं इतकी बुजगवणारी वाटते कीं, आतां पुष्कळ लोक बुजून जाऊन तिच्यापासून पराङ्मुख होत आहेत; कारण त्यांस वाटतें कीं, योजकतेवर बसविलेलें विवेचनप्रमाण या कल्पनेनें नष्ट होतें व परमेश्वरी बुद्धिशक्तीविषयीं नास्तिकता धरल्यासारखी होते.

### जडावर चित्प्रभुत्व चालतें, हा सिद्धांत अबाधित राहणार.

पण बहुतांशीं असली भीति निराधार होय; असें निःसंशय (३३) वाटतें. जडावर चिच्छक्तीचें प्रभुत्व चालतें, विश्वरचनेंतल्या कळी व सूक्ष्म संकीर्ण गोष्टी या बुद्धिचातुर्याचें फळ होत, हे सिद्धांत अगदीं ठाम आहेत.

मग त्या गोष्टी आपण इच्छाशक्तीच्या एका प्रेरणेचीं तत्क्षणीं दिसणारीं फळें मानलीं काय, अगर सुसंबद्ध, नियमित, क्रमशः होणाऱ्या परिणामाचीं फळें मानलीं काय, सारखेंच; त्या सिद्धांतांना बाध नाहीं; व्यापक व संवर्धक बुद्धि आणि संयोजक व संघातक बुद्धि या दोहोंचींही प्रमाणें अबाधित आहेत; व या दिशेनें शास्त्राची जितकी वाढ होणें कल्पनागम्य आहे, तितकी झाली तरी त्या प्रमाणांना मरण नाहीं. सर्व जीवमात्राची व वनस्पतिमात्राची उत्पत्ति एका जीवसाधक बीजापासून परिणमनाच्या नैसर्गिक क्रियेनें झाली आहे, हा जो सुप्रसिद्ध तर्क तो जरी सप्रमाण सिद्ध झालेला सिद्धांत असता, तरीही प्रमाणबद्ध व क्रमशील परिणमनांत, केवळ आंधळ्या काकतालीय न्यायानें उत्पन्न होणाऱ्याहून साफ भिन्न दिसणाऱ्या सर्वांगपरिपूर्ण देहरचनांत, व जंतुमात्र व त्याची परिस्थिति यांमधल्या उघड उघड दिसणाऱ्या अन्योन्य संयोजनीयतेंत, दिसून येणाऱ्या बुद्धिचातुर्याच्या प्रमाणांकडे बोट दाखवितां आलें असतें.

### मात्र मांडणी बदलावी लागेल.

हें मात्र खरें कीं, योजकतेच्या आधारावर बसविलेलें विवेचनप्रमाण बदलावें लागेल. तें नव्या स्वरूपानें मांडावें लागेल; पण तें पूर्वीइतकेंच पूर्णपणें सुसंबद्ध दिसेल. खरोखर असें ह्मणणेंही कदाचित् वाजवीपेक्षां फाजील होणार नाहीं कीं, सार्वत्रिक परिणमनाच्या या कल्पनेचें जसजसें जास्त पूर्णपणें आकलन होईल तसतसें ईश्वरी योजनेसंबंधीं शास्त्रसंमत तत्त्व जास्त जास्त दृढपणें स्थापलें जाईल व भविष्यकाळीं उन्नति होत जाणार हें तत्त्व जास्त जास्त बळकटपणें ग्रहण केलें जाईल.

### इतिहासांत परिणमनशीलता.

( क० २८ ) सध्यां भौतिक शास्त्रांत जो पालट होत चालला आहे, त्याचा परिणाम शास्त्राच्या निकटवर्ती प्रांतांत ह्मणजे इतिहासांत फार स्पष्टपणें दिसत आहे. मतांसंबंधीं परिणमनशीलतेची कल्पना असें त्या पालटांस म्हणतां येईल. म्हणजे काय, तर आमच्या तात्विक विचारांत व्यवस्थितपणें व क्रमपूर्वक रूपांतर होतें असा नियम आहे व त्याचीं कारणें समाजाच्या सामान्य बौद्धिक स्थितींत शोधलीं पाहिजेत; हा समज उत्पन्न झाला; असा परिणाम इतिहासांत स्पष्ट दिसतो. या कल्पनेचें

स्वरूप व प्रगति यांचें विवरण करणें हाच या सर्व ग्रंथाचा मुख्य हेतु असल्यामुळें, या ठिकाणीं तिचें ज्यास्त विवेचन नको आहे; व तिचा येथें उल्लेख करण्याचें कारण केवळ इतकेंच कीं, शास्त्रीय शोधांचा व तिचा संबंध दाखवावा.

## मतांतील पालट ज्ञानाच्या शाखांतील विसंवादाच्या जाणिवीनें होतो.

इतर पुष्कळ बाबतींप्रमाणें याही बाबतींत असें विधान करतां येईल कीं, तात्त्विक विचारांवर भौतिक शास्त्रांचा जो परिणाम घडला, तो एकाद्या जुन्या समजाच्या ऐवजीं कांहीं सरळ तर्कशास्त्रसंमत प्रमाण उभें केलें अशा प्रकारचा कांहीं नाहीं, तर केवळ त्याऐवजीं नव्या सादृश्याचा मनोवेधक प्रभाव घडला. पूर्वीं एकदां उल्लेख केल्याप्रमाणें मोठमोठ्या मतांतरांचें निष्पक्षपातानें निरीक्षण केलें असतां दिसून येईल कीं, मतांमध्यें पालट होतो तो सरळपणें वादविवादांतल्या प्रमाणांच्या जोरानें होत नसतो, विवादकांनीं पुढें केलेल्या व श्रद्धेय वचनांत गोंविलेल्या आधारांनीं होत नसतो, तर जुन्या मतांचा आपल्या ज्ञानाच्या इतर भागांशीं विसंगतपणा अगर बेसूरपणा आहे; या जाणिवीनें होत असतो. प्रत्येक मनुष्य नाना प्रकारच्या विचारांचें परिपचन करित असतो; त्या विचारांमध्यें नेहमीं एक प्रकारचा मेळ, संगति अगर सादृश्य असावें लागतें. संभाव्यतेच्या सामान्य मापानें श्रद्धेयाचा निर्णय ठरतो आणि हें संभाव्यतेचें माप ज्ञानाच्या नानाविध शाखांपासून मिळतें. यामुळेंच असें होतें कीं, जेव्हां जेव्हां चौकसपणा वाढल्यानें मनुष्याच्या व परमेश्वराच्या मधल्या संबंधाचें एक स्वरूप दाखविणाऱ्या भौतिक शास्त्रांत कल्पनांची नवी माळका शिरते, तेव्हां तेव्हां त्याचसंबंधाचें दुसरें स्वरूप दाखविणाऱ्या धर्मज्ञानशास्त्रांत त्याच किंवा निदान कांहींशा त्यांच्यासारख्या कल्पना झटकन् येतात.

## मानवी मनावर खेदजनक पगडा बसविणारीं कारणें असतात.

( क० २९ ) तथापि हें कबूल केलें पाहिजे कीं, ज्याबद्दल फारच खेद वाटला पाहिजे अशीं मानवी मनावर पगडा बसविणारीं कांहीं कारणें भौतिक शास्त्रांतूनच निघतात; खेदाचें कारण असें कीं, तीं तर्कसंमत प्रमाणांमुळें अगर योग्य सादृश्यांमुळें निघत नसून आमच्या श्रद्धेयांत खोल गढ-

लेल्या गैरसमजुतींमुळें अथवा आमचीं मनें फारच सुलभपणें फसून ज्या चुक्या करतात त्यांमुळें निघतात. भौतिक शास्त्रांमुळें उत्पादक व संयोजक चातुर्याच्या असंख्य खुणा दिसतात व त्यांना नैसर्गिक धर्माबद्दल वाढता पुरावा मिळतो; या पुराव्याचें महत्त्व फाजील (३४) मानणें क्वचित्च शक्य होईल; व अलौकिक आत्मिक शक्तीच्या व्यवधायकत्वामुळें होणाऱ्या परस्पर अलग कृत्यांनीं वेळोवेळीं घडणाऱ्या घोटाळ्याच्या आकस्मिक कारणांच्या प्रभावानें जगाचें सर्वतोपारि नियमन होण्यापेक्षां अबाधित नैसर्गिक नियमांच्या परस्पर क्रियेनें तें होण्यांत योजनाचातुर्याचा अंश ज्यास्त दिसतो; याबद्दल योग्य तऱ्हेनें शंकाही घेतां येणार नाहीं.

## भौतिक शास्त्रांतील शोध धर्महानिकर वाटतो.

असें असतांही ईश्वरी कृत्य म्हणजे चमत्कार ही कल्पना इतकी सर्व-सामान्य आहे कीं, विलक्षण वाटणाऱ्या घटनांची सृष्टीच्या प्रमाणबद्ध रचनेंतली योग्य जागा हुडकून रेखून टाकणारा प्रत्येक भौतिक शास्त्रांतील शोध पुष्कळ लोकांना धर्महानिकर वाटतो; व ही कल्पना याहूनही ज्यास्त दृढ होण्याला कारण घडतें. तें असें कीं, नियमज्ञान ही शोधाची परिसमाप्ति असें भौतिक शास्त्राला संमत असून कोणत्याही घटनांतील नियम कळला ह्मणजे त्या घटनांचें कारण समजलें असें होत नाहीं, ही गोष्ट शास्त्रज्ञ सुद्धां कधी कधीं विसरतात.

## ही कल्पना कशी चुकते; त्याचीं उदाहरणें.

आकाशांतील सर्व गोलांना गुरुत्वाकर्षणाच्या नियमाखालीं आणून बसविल्यानंतरही गुरुत्वाकर्षणाचें कोडें उलगडतां येत नाहीं तें नाहींच. जडाला जडानें कां ओढावें हें कांहीं आपणाला कळत नाहीं. कदाचित् कधींही कळावयाचें नाहीं. जीवनाच्या उत्कर्षाचें नियमन करणाऱ्या नियमांविषयीं पुष्कळ माहिती शास्त्र उघडकीस आणील, पण जीवन ह्मणजे काय व त्याचा मूळ उगम कोठून हें कळण्याचें आपणांला सामर्थ्य नाहीं. धूमकेतूच्या कक्षेचा बरोबर माग काढणाऱ्या व तेजःकिरणांचा वेग मापणाऱ्या मानवी मनाला आजतागायत अत्यंत सूक्ष्म जंतूंच्या जीवनाचा अगर अत्यंत क्षुद्र उद्भिज्जांच्या वाढीचा उलगडा करण्याचें सामर्थ्य नाहीं.

## मानवी आटोक्याबाहेरच्या गोष्टी.

घटनांचें वर्गीकरण करणें, त्यांचा अनुक्रम लावणें व त्यांचें साद‍ृश्य ओळखणें, या कामीं मानवी मनाचा पराक्रम तोंडांत बोट घालण्यासारखा; पण मूळ कारणांचा शोध लावण्यांत त्याला अगदीं हात टेकावे लागले आहेत. प्रत्येक अस्तित्ववान् पदार्थाच्या मुळाशीं अभेद्य गूढ आहे. आद्य तत्त्व, गत्युत्पादक प्रेरणा, चिच्छक्ति, अनुक्रमागत घटनांचीं निसर्ग–नियम–संज्ञक अलंकर्मीण कारणें, यांचा शोध लावण्याचे आटोकाट प्रयत्न केले, तरी तीं त्या प्रयत्नांस धूप घालीत नाहींत. वैशसनिकाची कृन्तनिका, व रासायनिकाचें पृथक्करण हींही येथें माग चुकतात. अत्यंत सूक्ष्म गोलकांतील सर्व-व्यापि सर्व-नियामक चित्प्रभावाचा छडा लावणारें व धूलि-कणांत सेंद्रिय व सजीव जंतूंचें नवीन जगच दाखविणारें सूक्ष्म–दर्शकसुद्धां हें कोडें उकलूं शकत नाहीं. खुद्द आपणांमधील अगर सभोंवतालच्या जगामधील चित् व जड या दोहोंच्या परस्पर संबंधाबद्दल आपणांस बिलकुल माहिती नाहीं; किंवा नाहीं म्हणण्यासारखीच आहे.

## शास्त्र धर्महानिकर नाहीं; पण शास्त्रमर्यादा समजण्यांत चूक होते.

तथापि भौतिक शास्त्रांच्या प्रगतीनें सृष्टिनियमांनीं कोणत्याही गोष्टीचा उलगडा पडत असल्यामुळें, सृष्टींतून आदिम कारणाची कल्पनाच तें शास्त्र अजीबात उडवून टाकतें; असें मानणें म्हणजे त्या शास्त्राची व्याप्ति दाखविणारें क्षेत्र व मर्यादा पूर्णपणें दृष्टिआड करणें होय.

## चित्चें अस्तित्व नाहीसें वाटण्याचें कारण एकाच विषयाचा आत्यंतिक नाद.

येथें हेंही कबूल केलें पाहिजे कीं, नियमबद्धतेच्या वाढत्या जाणिवीनें ईश्वरी करणीचें अस्तित्व–निदान तिचें सांतत्य–नाहींसारखें होतें. असें ज्याप्रमाणें पुष्कळांस वाटतें, त्याचप्रमाणें जडाच्या कार्यबाहुल्याच्या वाढत्या जाणिवीनें चित्चें अस्तित्व नाहींसारखें पुष्कळदां वाटतें. दाखल्यांत वारंवार येणारा गणिती प्रतिपादी कीं, आत्मा म्हणजे स्थलविस्तार असला पाहिजे; व सारंगीवादक म्हणे कीं, ‘ आत्मा म्हणजे स्वरसंयोग असला पाहिजे ’ अशी माझी खात्री झालेली आहे; पण एकाच विषयाच्या फार नादीं लागलेल्या बहुधा हरएक माणसांत आपल्या आवडत्या तेवढ्याच

विषयाच्या अनुसंधानानें विश्वांतील सर्व आस्तित्वासंबंधीं घटनांचा उलगडा करण्याचा दिसून येणारा जो कल त्याचे प्रतिनिधि ह्मणून ह्मटलें तर सदरहु गणिती अगर वादक हे दाखले क्वचित्च आतिशयोक्तीचे होतील.

## शास्त्राचे दोन शत्रु.

उदय होतांच बहुधा प्रत्येक शास्त्राला दोन बलाढ्य शत्रूंशीं लढावें लागलें आहे. ज्यांना नाविन्य हा असत्याचा पर्याय शब्दच असला पाहिजे असें वाटतें, त्यांचा विचारशून्य गैरविश्वास हा एक शत्रु; व अजून मर्यादाही रेखाटल्या गेल्या नाहींत, अशा शोधांची नवी माळका मानवी मनाला गोचर होते आहे, असें झुंजुरकें व अंधुक पाहतांच ज्यांचा कल्पनाविहंगम ते शोध ह्मणजे सर्वत्र लागू पडणारा रामबाण उलगडा होत अशी उंच भरारी मारतो; त्यांचा बेलगाम आवेश हा दुसरा शत्रु.

## त्याचीं उदाहरणें.

असें ह्मणतात कीं, हटवादी गैरविश्वासाचीं बरींच वर्षें गेल्यावर हार्वेच्या महत्त्वाच्या शोधाच्या सत्य-रवीचा अरुण, भिषग्वर्गाच्या मनो-गगनाच्या उबरठ्यांत आल्याबरोबर पहिला परिणाम असा झाला कीं, मनुष्यप्राणी ह्मणजे एक केवळ जंगमोदकप्रेरित यंत्र होय असें मानणारा व प्रत्येक रोगाचें बीज रुधिराभिसरणाच्या ( ३५ ) व्यंगांत पाहणारा असा एक भिषक्पंथ निघाला. हाच इतिहास सदोदित पुनः पुनः घडून आला आहे. सर्व घटनांचें मूळ एकाच गोष्टींत पाहणारा उताविळपणा मनुष्याकडून घडविणारी प्रमाणबद्धतेची जी आवड, तीच कांहीं उदात्त शोधांची जन्मदात्री झाली आहे; पण तशीच तीच आवड सव्यंग वर्गीकरण उत्पन्न करण्यामुळें मानवी प्रमादांची एक अत्यंत सुपीक कुसव्याची जननी झाली आहे. सध्यांच्या काळीं जेव्हां जडासंबंधीं नियमांच्या अध्ययनाला विलक्षण ऊत आला आहे व जेव्हां चित् व जड यांमधील परस्परसंबंधाचा शोध मुख्यतः जडकार्यांकडे रोंख ठेवून चालला आहे, तेव्हां विचाराचा जोराचा लोंढा जडवादाकडे वहावा; हा परिणाम आश्चर्यकारक अगर भयोत्पादक नव्हे.

## भौतिक शास्त्ररूपी बौद्धिक प्रगतीचे परिणाम.

परंतु हे विसंगत परिणाम बाजूला सारून पाहिलें तर असें दिसतें कीं, मनुष्यांना अतीतदर्शनाची ज्यास्त तत्परतेनें कल्पना करण्यास समर्थ केलें व त्यामुळें त्यांची मूर्तिपूजेंतून सुटका केली व त्यांना आपलें ध्येय चित्स्वरूपी व उन्नत करण्याचें सामर्थ्य दिलें आणि त्यामुळें मूर्तिकरणांतून त्यांस मुक्त केलें, हे बौद्धिक प्रगतीचेच धर्मज्ञानशास्त्रांतील मतांवरील विजयरूप साधारण परिणाम होत; पण याखेरीज त्या प्रगतीच्या भौतिक शास्त्र या नांवाखालीं मोडणाऱ्या एका विशिष्ट शाखेनें एक स्पष्ट व विशिष्ट परिणाम घडविला आहे. तो अंशत: तर्कसंगत आहे; तरी पण सामान्येंकरून तो सादृश्याचा परिपाचक परिणाम होय. भौतिक शास्त्रानें या आपल्या जगाच्या सर्व विश्वांतील स्थानमहत्त्वाबद्दलची, तसेंच या जगांत आपत्तींच्या मानवी इतिहासाशीं असलेल्या संबंधाची, मनुष्यांची आरंभींची कल्पना पार उडवून दिली आहे. त्यानें चमत्काराकडे असलेल्या पूर्वग्रहाच्या ऐवजीं नियमबद्धतेची जाणीव उत्पन्न करून, नियमभंगकते-ऐवजीं तिची ईश्वराशीं सांगड घातली. त्यानें आपत्तींतून शिक्षेची भावना काढून टाकली, ईश्वराच्या दयाळूपणाचीं उदाहरणें असंख्यपट वाढवलीं, व त्याबरोबरच व्यवस्थेशीर वाढीची कल्पना पुष्ट केली आणि त्या व्यवस्थेशीर वाढीच्या कल्पनेचा जड-कोटीपासून चित्कोटींत प्रवेश झाला.

## भौतिक शास्त्रांच्या प्रगतीमुळें कार्यकारणास धरून बैबलावर टीका झाली.

(क० ३०) हे श्रद्धेवरचे भौतिक शास्त्राचे परिणाम होत. या श्रद्धेचें उच्चारण ज्यांच्या योगानें होतें, त्या बैबलचा अर्थ बसविण्याच्या पद्धतींवरही भौतिक शास्त्राची बरीच छाप बसली. ग्यालिलियोचा शोध व कास्मसच्या तऱ्हेवर प्रतिपादन करणाऱ्या पुष्कळ धर्मज्ञानपंडितांनीं बसविलेला धर्मशास्त्राचा अर्थ, यांजमधील विरोधानें बहुधा कार्यकारणवादास धरून बैबलावर होणाऱ्या टीकेला पहिली मोठी स्फूर्ति आली. नवीन गोष्टींचा शोध लागला होता व म्हणून अर्थनिर्णयाची नवीन पद्धत व्हावयास पाहिजे होती; त्यामुळें लोकांनीं आपल्या विवेचक शक्तीचा प्रयोग पवित्र ग्रंथांवर केला. हेतु असा कीं, विचारशक्तीनें आंगच्या जोरानें ठरविलेल्या मतांशीं

या पवित्र लेखांचा मेळ घालावा. धर्मशास्त्रावर परिणाम करणाऱ्या प्रत्येक नव्या शास्त्रीय शोधानें मानवी सुधारणेच्या प्रगतीमुळें निघालेल्या नव्या प्रकारच्या प्रत्येक कलानें हीच स्थिति पुनः पुनः प्राप्त झाली.

## नवीन अर्थनिर्णायक पद्धतींचें फार जुनें उदाहरण.

(क० ३१) अशा प्रकारच्या अर्थनिर्णायक पद्धतीचें फार जुनें विस्तृत उदाहरण बहुधा लापीरेर नांवाच्या एका फ्रेंच प्रतिरोधीपंथी गृहस्थानें इ० स० १६५५ त केलेल्या एका पुस्तकांत आढळतें (३६). या ग्रंथकाराला चमत्कार पूर्णपणें कबूल आहेत, तरी त्यानें त्यांचें क्षेत्र मर्यादित करण्याचा प्रयत्न केला आहे. आदिम पापाच्या सामान्य मताविषयीं कांहीं अडचणी व जुन्या करारांतील विधानांशीं भौतिक शास्त्रांचा ज्यांत विरोध आहे, असे कांहीं मुद्दे त्याला आढळले; तेव्हां त्यानें मानवी कृत्यांच्या सामान्य ओघापासून बैबलांत दिलेल्या इतिहासाचा संबंध पार तोडून टाकून त्या गोष्टींचें विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यानें असें प्रतिपादन केलें कीं, आदम हा सर्व मानवी जातीचा पिता नव्हे, तर केवळ यहुदी लोकांचा जनक होय व जलप्रलयाच्या अगोदरचा इतिहास हा केवळ एकाच देशांतल्या लोकांविषयींचा इतिहास होय; सर्व मानव जातीचा नव्हे. येणेंप्रमाणें पौरस्त्य राष्ट्रें जुनेपणाचा दावा सांगतात तो कबूल करून आणखी जलप्रलयासंबंधीं मुख्य अडचणी दूर होऊं शकतात. दुःखें, दुखणीं व मरण हे ईश्वरी आज्ञेच्या उल्लंघनाचे परिणाम मानणें साफ चुकीचें होय. आज्ञोल्लंघनानें आत्म्याला झालेली शिक्षा केवळ चिद्विषयक होती व ती यहुद्यांवर आली. 'ज्या दिवशीं तूं खाशील त्या दिवशीं तूं मरशील' या शब्दांचा अर्थ अक्षरशः घ्यावा असा बोलणाराचा हेतु नव्हता, कारण तो तसा प्रत्ययास आला नाहीं; तसेंच सर्पाला मिळालेल्या शापाचा अर्थ अक्षरशः करावयाचा नाहीं, कारण जमिनीवरून सरपटत जाण्याची गति ह्मणजे सर्पाच्या शरीररचनेचा हेतूच तो. आदमच्या वंशांतलीं नव्हेत अशा माणसांच्या अस्तित्वाची अंधुक छाया पुष्कळ वचनांत दिसते, परंतु ती केनच्या हकीकतींत खात्रीनें दिसते; केन इकडे तिकडे जाण्यास भीत असे; गेलों तर आपणास माणसें ठार करतील असें त्यास वाटे, व सर्वसाधारण समजाप्रमाणें तो जेव्हां जगांत

बहुतेक एकटा होता तेव्हां त्यानें एक शहर वसविलें ( ३७ ). ईश्वराच्या पुत्रांचें व मनुष्यांच्या मुलींचें संमिश्रण म्हणजे त्या दोन जातींतील शरीर-संबंध होय. प्रलय जर सार्वत्रिक मानला तर तो साफ असंभवनीय; पण एकदेशीय पूर म्हणून मानला तर कांहीं विलक्षण वाटणार नाहीं.

## जुन्या कराराच्या पंचाध्यायीचें जनकत्व मोशाकडे नाहीं अशी पीरेरची टीका.

जरा पुढील काळच्या इतिहासाकडे वळून पीरेर प्रथमतःच जुन्या कराराच्या पंचाध्यायीचें ( मोझेसच्या नियमांच्या जुन्या करारांतील अध्याय-पंचिकेचें ) कर्तृत्व मोझेसकडे देण्याचें नाकारतो. या आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ मोझेसच्या मरणाची हकीकत पुढें मांडून त्यानें सध्यांच्या काळीं अतिशय महत्त्व पावलेल्या सूक्ष्म टीका-लेखांची आधींच ओळख दिली. 'जार्दनच्या पलीकडे मोझेस बोलला ते शब्द हे,' हें वाक्य, 'आजतागायत जेअर' म्हणून म्हटलेल्या शहराचा उल्लेख, राब्बाथमध्यें अजूनं दाखवतात तो ओगचा लोखंडी पलंग, इद्यूमीन्सना जिंकण्याविषयींच्या अड-चणी, व आणखी थोडीं वचनें पाहिलीं तर दिसतें कीं, या पुस्तकाचें ग्रथन मोझेसच्या काळाच्या पुष्कळ अलीकडचें आहे; शिवाय कालगणना-विषयक घोटाळ्याच्या कांहीं खात्रीच्या खुणा ज्या या पुस्तकांत दिसतात, त्यांवरून हीं पुस्तकें समधर्मी नसण्याचा संभव दिसतो; तर तीं कित्येक निरनिराळ्या लेखांच्या मिश्रणानें तयार झालीं आहेत असें दिसतें.

## ईश्वरी तरतूद म्हणजे चमत्कार मानतात यावर टीका.

हेंही लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे कीं, या पुस्तकांत रूपकें व अतिश-योक्ती आहेत, त्यामुळें कधीं कधीं चुकीचे समज उत्पन्न होतात; व ईश्वरी तरतूद दाखविणारीं विशिष्ट उदाहरणें केवळ चमत्कार होत; असा अर्थ समजतात. याचें उदाहरण असें कीं, यहुदी वनवासांत असतां त्यांच्या कपड्यांना अगदीं पुरे इतकी लोंकर त्यांच्या मेंढ्यांच्या कळपांपासून मिळण्यासारखी होती, म्हणून यहुदी लोकांचे कपडे जीर्ण झाले नाहींत, हें वचन म्हणजे वनांत चाळिस वर्षे कोणत्याही प्रकारची त्यांना उणीव पडूं नये म्हणून ईश्वरानें केलेल्या विलक्षण तरतुदीचें जोरानें उच्चारणच होय. तसेंच लापीरेर यहुद्यांचा इतिहास चमत्कारांनीं भरलेला आहे, ही

गोष्ट नाकबूल करित नाहीं; पण ते चमत्कार केवळ स्थानिक होत व त्यांच्यासाठीं विश्वाच्या सामान्य ओघांत कधींही गडबड झाली नाहीं; असें तो ठांसून प्रतिपादन करतो. जोशुआच्या आज्ञेवरून दिवस वाढला तो कांहीं पृथ्वीच्या अगर सूर्याच्या गतींत बदल होऊन वाढला नाहीं, तर ती एक केवळ वातावरणांतील घटना होय; अशा घटना कधीं कधीं उत्तर-महासागराच्या प्रदेशांत होत असतात. शूलारोपणाच्या वेळचा अंधार सुद्धां स्थानिकच होता. हेजेकियाच्या कारकीर्दींत छायायंत्रांत छाया उलटी वळली, ती कांहीं आकाशगोलांची व्यवस्था भंग पावली म्हणून नव्हे, ख्रिस्ताच्या पाळण्यावर उजेड खेळत होता तो उल्केचा होता, कारण तारकेला बहुधा एकाच घरावर बिनचूक रोंख धरतां येणार नाहीं.

## लापीरेरची अर्थनिर्णयपद्धति आजतागायत चालू आहे.

या विलक्षण पुस्तकाचा कर्ता तें प्रसिद्ध झाल्यावर लवकरच सनातन-पंथी झाला व त्यामुळें त्याचीं मतें पालटलीं; परंतु ज्या धर्मशास्त्रार्थ बसवण्याच्या पद्धतीचा तो बहुधा पहिला स्थापक होता, ती पद्धत आजतागायत जोरांत चालू आहे; या पद्धतीचा इतिहास तपशीलवार पाहणें हें सध्यांच्या पुस्तकाच्या उद्देशाआंतलें काम नाहीं. इतकें सांगितलें म्हणजे बस्स होईल कीं, धर्मांचा उद्भव कसा होतो याचा उलगडा करण्याचा प्रयत्न करणारांनीं दोन स्वाभाविक कल्पना बसविल्या आहेत व या दोहों पैकीं प्रत्येकीचा अंमल विशिष्ट काळांत, देशांत अगर विचारौघांत जोराचा चालला आहे ( ३८ ).

## धर्मोद्भवाच्या दोन कल्पनांपैकीं पहिली.

पहिली कल्पना विशिष्ट व पृथक्स्थित कारणांमुळें धर्म उद्भवतात असें म्हणते. या कल्पनेचा मुख्य प्राचीन प्रतिनिधि यूहेमीरस होता. हा असें म्हणे कीं, पेगन देव हे पूर्वीं प्रख्यात राजे होते; व मेल्यानंतर लोकांच्या त्यांविषयींच्या स्वाभाविक आदरामुळें अगर राजांच्या ( ३९ ) धूर्तपणामुळें ते देवत्व पावले. यूहेमीरसच्या ग्रंथाचें एनिअसनें भाषांतर केलें; व ख्रिस्ती धर्मांच्या उदयापूर्वीं रोममध्यें जो सांदिग्धमतित्वाचा प्रसार झाला होता, तो पुष्कळ अंशीं त्यामुळें झाला होता म्हणतात. लबाडी, दृष्टिभ्रम, नैसर्गिक घटनेबद्दल चुकीची कल्पना अगर दुसऱ्या

एकाद्या पृथक्स्थित गोष्टीमुळें चमत्कार होतात असें म्हणून त्यांची वाट लावणाऱ्यांचे सर्व प्रयत्न सदर्हु कल्पनेच्या वर्गांतील होत.

## दुसरी म्हणजे पुराणकूटवृत्तात्मक कल्पना.

दुसऱ्या कल्पनेला पुराणकूटवृत्तात्मक असें म्हणतात. प्राचीनांत पायथागोरसच्या व नव-प्लेतो पंथाच्या व ज्ञेय वादाच्या अनुयायांनीं ही कल्पना स्वीकारली होती. निरनिराळ्या हटवादी पद्धतींनीं लोकांत सर्वत्र पसरलेल्या धार्मिक वृत्ति अगर उदात्त नैतिक कल्पना तयार होतात अथवा ज्या समाजांत या पद्धती उत्पन्न होतात त्याच्या आकांक्षांना गोचर, व तसेंच म्हटलें तर जड, स्वरूप मिळतें असें ही कल्पना मानते. येणेंप्रमाणें मतोद्भवावर विशिष्ट परिस्थितीचा महत्त्वाचा पगडा असतो; हें पूर्णपणें कबूल करून या दुसऱ्या कल्पनेचे अनुयायी चालू असलेल्या सामान्य बौद्धिक परिस्थितींतच खरें कार्यक्षम कारण शोधतात. निरनिराळ्या चमत्कारांवर लोकांचा विश्वास कसकसा बसला, याचा तपशीलवार उलगडा करण्याचें ढोंग ते करित नाहींत; तर ते म्हणतात कीं, कोणत्याही विशिष्ट बौद्धिक परिस्थितींत अद्भूत वाटणाऱ्या घटना नेहमीं दिसावयाच्याच; व या घटनांचें सामान्य स्वरूप चालू असलेल्या पूर्वग्रहानुरूप ठरावयाचेंच.

## या दोन कल्पना केव्हां व कोठें मान्य होत्या.

वर सांगितलेल्या दोहोंपैकीं पहिली कल्पना सतराव्या व अठराव्या शतकांत चालू होती, व प्राचीन रोमन लोकांच्यासारख्या, अगर नेमक्या व निश्चित निवाड्यांची आवड फार अशी ज्यांची ख्याति त्या अर्वाचीन इंग्रज व फ्रेंच लोकांच्यासारख्या, राष्ट्रांचा विशेष भर पहिल्या कल्पनेकडे आहे; आणि दुसरी कल्पना सध्यांच्या शतकांत व जर्मनींत अतिप्रमुखत्वानें चालू आहे.

## स्पिनोझाच्या टीकेचा उद्देश.

(क० ३२) तथापि हें कबूल केलें पाहिजे कीं, अद्भुत घटनांचे स्वाभाविक उलगडे बसविण्यांत दाखविलेली शक्ति केवळ विध्वंसक व फूट पाडणारी टीका करण्यांत दाखविलेल्या शक्तीच्या पासंगास पुरावयाची नाहीं. स्पिनोझाचें हिब्रू भाषेचेंच केवळ नव्हे तर राबींच्या ( यहुदी धर्मशास्त्र्यांच्या ) संप्रदायांचें व यहुदी विचारौघाचें व उच्चारसरणीचेंही

ज्ञान इतकें अगाध होतें कीं, त्यानें जें काम केलें त्याला तो अत्यंत योग्य होता. या स्पिनोझानें आपल्या ' त्रास्तेतस - थिओलोजिको-पोलितिकस' ( ४० ) नांवाच्या ग्रंथानें तें उदाहरण घालून दिलें; व लवकरच जर्मनीनें फार जोरानें त्याच मार्गाचें अवगाहन केलें. पण निष्पक्षपातानें पाहणाराच्या दृष्टीवर जी विशेष जोरानें आघात करील अशी वाटते ती गोष्ट ही कीं, हे टीकालेख, निदान त्यांतले पुष्कळ, स्वतंत्रपणें तयार झालेल्या कल्पनांशीं बैबलचा ओढून ताणून मेळ घालण्याच्या उघड उघड उद्देशानें लिहिलेले आहेत.

### या चळवळीचीं तत्त्वें; लेसिंगचें ठाम मत.

( क० ३३ ) या चळवळीचीं तत्त्वें नमूद करणारे दोन लेखक, लेसिंग व कांत होत. पैकीं पहिला ठांसून सांगतो कीं, ' विचाराला ' धरून नसणारें कोणतेंही मत धर्मशास्त्राचें अंग मानूं नये. अर्वाचीन जर्मन टीकाकारांच्या लेखांतल्या ' विचार ' शब्दाचा अर्थ अर्वाचीन विचाराचें सामान्य क्षेत्र व ओघ असा घेतला असतां चुकीचा ठरणार नाहीं ( ४१ ).

### कांतचें मत अधिक स्पष्ट आहे.

( क० ३४ ) कांतचें मत याहूनही स्पष्ट आहे. कांतच्या मताप्रमाणें ( ४२ ) प्रत्येक हटवादी मताची पद्धत अगर त्याच्या शब्दांनीं बोलावयाचें तर प्रत्येक धर्मसंस्थेंतलें प्रस्थापित मत शुद्ध धर्माचें म्हणजे पर्यायानें निसर्गधर्मपरिकल्पक मनोवृत्तींच्या व्यापाराचें वाहन अगर बाह्य कवच मानलें पाहिजे. धर्मसंस्थाप्रस्थापित मताची आवश्यकता असण्याचें कारण असें कीं, केवळ नैतिक मत ज्यास्त स्थूल कल्पनांनीं जणूं काय मूर्त व जडस्वरूपी केल्याखेरीज त्याचें बहुतेक लोकांस आकलन करतां येत नाहीं. पण धर्मसंस्थाप्रस्थापित मत शुद्ध धर्माहून अगदीं कमी दर्जाचें असल्यामुळें ओघानेंच आलें कीं, केवळ शुद्ध धर्माला अनुरूपच त्याचा अर्थ केला पाहिजे; म्हणजे धर्मशास्त्रांतील सर्व मतांचा व सर्व वचनांचा कांहीं तरी नीत्युपदेश करण्याचा उद्देश असतो असें मानलें पाहिजे, व आपल्या न्यायबुद्धीच्या विपरीत असा कोणताही अर्थ मग तो किती कां साहजिक दिसेना, बरोबर मानतां कामा नये.

# प्रकरण ३ रें.

## भाग ३ रा.

## नैतिक शाखेंतील उत्कर्ष.

### अनुसंधान. राहिलेली बाजू.

( क॰ १ ). कांतचें मत वाचल्यानें वाचकांच्या लक्षांत येईल कीं, समाजाच्या धार्मिक प्रगतीच्या नियमांचा छडा लावतांना त्या विषयाच्या केवळ एकाच स्वरूपाचें आतांपावेतों उद्घाटन झालें. बौद्धिक पालट करणाऱ्या कित्येक बौद्धिक शक्तींचें परीक्षण झालें; पण आतांपर्यंत नैतिक उन्नतीचे नियम अजीबात राहून गेले. या राहिलेल्या भागाचें पर्यालोचन करितांना आरंभींच एक पंथ आपणास आढळतो; हा पंथ सर्व धर्मांचें खरें सार म्हणजे नीति असें कबूल करितो खरा; पण त्याबरोबरच या बाबतींत प्रगतीचें तत्त्व असूं शकेल हें त्याला कबूल नाहीं.

### नीतीची परिणमनीयता.

त्याचें म्हणणें असें कीं, नीतीच्या इतकें अपरिणमनीय दुसरें कांहींच नाहीं. योग्यायोग्य, पापपुण्य यांतील भेद सदासर्वकाळ माहीत होता, याबद्दलच्या आमच्या कल्पना जास्त उदार होण्याची केव्हांही शक्यता नाहीं. तथापि नीति या शब्दांत निखालस सुकृत व निखालस दुष्कृत यांमधील ढोबळ फरक एवढ्याच अर्थाचा समावेश होतो असें नसेल; पण आणखी प्राशस्त्याचें प्रचलित ध्येय अगर माप हाही अर्थ त्यांत असेल; तर बुद्धीचा जसा उत्कर्ष होतो तसाच नीतीचाही सदा उत्कर्ष होत असतो हें खास; व या उत्कर्षामुळें बुद्ध्युत्कर्षामुळें घडणाऱ्या प्रभावाइतक्याच महत्त्वाचा प्रभाव समाजावर घडलेला आहे हें संभाव्य होय. कांहीं सद्गुण इतरांहून उंच प्रतीचे असतात व त्यांपैकीं पुष्कळ मानवी सुधारणेच्या उत्कृष्ट स्थितींतच आढळणारे असतात ( १ ). ही गोष्ट अगदीं रोजच्या वहिवाटींतली आहे.

## स्पष्टीकरणार्थ उदाहरणें.

उदाहरणार्थ, सत्याची आवड हा सद्गुण होय, हें वचन नुसतें उच्चारलें असतां कोणत्याही काळांत बहुधा सारख्याच तत्परतेनें मान्य झालें असतें, पण त्याचा व्यवहारांत प्रत्यक्ष अनुभव कोठपर्यंत येतो हें पाहूं गेलें असतां गाढ फरक दिसेल. असें आढळतें कीं, तिळभरही तोडजोड न करणाऱ्या करारी पक्षपात्याचे सर्व सद्गुण मनापासून कबूल असूनही पक्ष व पंथ क्रूरपणें सभोंवतीं भांडत असतां मनःपूत चौकशीच्या आवडीनें उद्धारक मार्ग क्रमावयाचा प्रयत्न करण्यास मनुष्यास बांधून टाकणाऱ्या उच्चतर सद्गुणाची प्राथमिक काळीं लोकांना अगदीं किंमत वाटत नसते; इतकेंच नव्हे, तर तो सद्गुण आढळण्याची बहुधा शक्यता नसते. सध्यांही जे थोडे विचारगिरिशिखरावर पोंचलेले असतात, त्यांच्यांतच त्या गुणाची किंमत आढळते; आणि म्हणून लोकसमूहाला त्या थोड्यांची स्थिति जसजशी प्राप्त होईल तसतशी या गुणाची किंमत कळूं लागेल. उदाहरणार्थ, सद्गुणाकरितांच सद्गुणाचा मार्ग आक्रमावयाचा ही गोष्ट बक्षिसाच्या लालचीनें अगर शिक्षा टाळण्यासाठीं सद्गुणाचा मार्ग आक्रमण्यापेक्षां निःसंशय जास्त उत्कृष्ट आहे; तथापि निःस्पृह सद्गुणांची कल्पना अत्यंत उंच प्रतीच्या मानवी सुधारणेच्या काळांत उंच वर्गाच्या लोकांतच बहुतेक आढळते व जसजसे आपण बौद्धिक सोपानाच्या पायऱ्या उतरत येऊं, तसतसें बक्षिसें व शिक्षा यांची विस्तृत व्यवस्था करणें ज्यास्त आवश्यक होतें.

## भूतदयेचें उदाहरण.

( क० २ ) भूतदया हाही गुण कल्पनेंत तरी अपरिणमनीय दिसतो; पण त्याचीं उदाहरणें पाहिलीं, तर तो सदा बदलणारा दिसतो. बैलांच्या टकरा, अस्वलांच्या लढाया, कोंबड्यांचीं झुंजें व अशाच प्रकारचीं असंख्य करमणुकीचीं साधनें, युरोपांत मागच्या काळीं आवडते खेळ असत; व ते सर्व दर्जाच्या लोकांत चालत; अत्यंत सुधारलेले व अत्यंत भूतदयाशील लोकही त्यांनीं आपली करमणूक करून घेत; व सर्वत्र ते अगदीं कायदेशीर मानले जात ( २ ). अत्यंत विख्यात सद्गुणमंडित लोकही अशा करमणुकीचा आनंद अनुभवीत. हे खेळ रानटी

असें जर कोणी म्हणता तर त्याचे विचार नुसते असंबद्धच नव्हत, तर दुर्बोध असें लोकांनीं म्हटलें असतें. या विषयाविषयीं भांडण खास नव्हतें ( ३ ). तथापि हळूहळू मानवीसुधारणेच्या निःशब्द प्रेरणेनें लोकमतांत गाढ फरक पडला. हा फरक ज्ञानाच्या वाढीनें अगर निश्चित विवेकपद्धतीनें पडला असें नाहीं, केवळ नैतिक ध्येय हळूहळू उच्चतर होत गेल्यानें पडला. ज्या करमणुकी एका काळीं सार्वत्रिक होत्या, त्याच स्त्रियांनीं टाकल्या व पुरुषांतच राहिल्या; वरच्या वर्गांतून निघाल्या व खालच्या वर्गांतच चालल्या; सद्गुणी लोकांना आवडत नाहींशा झाल्या व दुष्ट लोकांतच त्यांची चहा होत होती, असें होतां होतां शेवटीं त्या साफ बंद करण्यास कायद्यानें हात घातला; व आतां तशा प्रकारची एखादी करमणूक चालू आहे असें आढळेल, तर आंगावर शहारा उभा रहातो व राग येतो.

### आणखी तसल्याच चालींचीं उदाहरणें.

छळ बंद करण्याचा, शिक्षांचा, लढाईंत जिंकलेल्यांना वागविण्याचा, गुलामगिरीचा वगैरे इतिहास पाहिला, तर एका काळीं ज्या रूढी पूर्णपणें रास्त व स्वाभाविक मानल्या जात, त्याच रूढी पुढच्या काळीं उघड उघड अमानुष व क्रूर मानल्या गेल्याचीं उदाहरणें दिसतात.

### फरक नैतिक विचारांच्या उन्नतीनें पडला.

या प्रत्येक बाबींत जो फरक पडला, तो बौद्धिक उन्नतीहून मनोवृत्ति विशिष्ट प्रकारें जागृत झाल्यामुळें अतएव नैतिक विचाराच्या उन्नतीमुळें जितका पडला, त्याहून बराच कमी बौद्धिक उन्नतीनें पडला; आणि जर एका शतकामागें इंग्लंदांत चालू असलेल्या रूढींसारख्या रूढी कोणत्याही देशांत आहेत असें आपण पाहिलें, तर त्यावरून आपण खात्रीनें सिद्धांत काढितों कीं, त्या देशाला मानवी सुधारणेची ती पायरी अजून लाधली नाहीं.

### मानवी सुधारणेच्या प्रगतीबरोबर नीतिमत्ताही बदलते.

निरनिराळ्या प्रत्येक काळांत त्या काळचें नीतिमत्तेचें ध्येय पहिल्यांदा दर्शविणारे व नंतर या ध्येयावर परिणाम करणारे मानापमानाचे नियम फार निराळे असतात. अडाणी लढवय्ये लोकांतील सद्गुणाचा एकंदर नमुना सुधारलेल्या शांतताभक्त लोकांतील नमुन्याहून साफ निराळा असतो; व

पहिल्या प्रकारच्या लोकांना जें शील तिरस्कार्य वाटतें, तें दुसऱ्या प्रकारचे लोकांस आदरणीय वाटतें. ही गोष्ट इतकी खरी आहे कीं, मानवीसुधारणेच्या प्रत्येक नव्या थराला नीतिमत्तेचा नमुना साफ बदलतो. एका प्रख्यात इतिहासकारानें म्हटल्याप्रमाणें, जर स्तंभाच्या शीर्षरचनेवरून त्याचा काळ पुराणवस्तुशोधकाला निश्चित करतां येतो, तर एखाद्या नीतिविषयक गोष्टीचा, एखाद्या शिरोभूत विकाराचा, अगर एखाद्या विचारसरणीचा काळ कोणता, हें मानसशास्त्रेतिहासकार जास्त निश्चितपणें सांगूं शकेल व मागील अगर पुढील काळांत तशी गोष्ट, तसा विकार, तशी विचारसरणी अशक्य म्हणून ठरवील. कलांच्या इतिहासांत कालानुक्रम लावला, तर कधीं कधीं तेंच स्वरूप पुनः आढळतें; नीतीच्या इतिहासांत तीच गोष्ट पुनः आढळणें संभवत नाहीं. काळाच्या नियत मार्गावर (४) नैतिक कल्पना आपल्या चिरंतन निवासाच्या स्थळीं वतनदारी करीत आहेत.

## याला वैयक्तिक अपवाद आहे.

(क० ३) तथापि या नियमाला एक ठळक अपवाद आहे. तो हा कीं, जिला नैतिक स्फूर्तिजन्य बळ म्हणून म्हणतां येईल अशी गोष्ट कधीं कधीं घडलेली दिसते. जसे बुद्धीच्या कक्षेंत स्फूर्तिजन्य प्रबळ बुद्धीचे लोक कधीं कधीं उद्भवतात व ते तत्कालीन बुद्धिमत्तेच्या परिस्थितीहून फारच उंच दर्जाचे असतात; तद्वतच स्वकालीन नीतिमत्तेच्या परिस्थितीहून बऱ्याच वरच्या पायरीचे स्फूर्तिजन्य उदात्त नीतीचे लोक कधीं कधीं निर्माण होतात. ते आपल्या काळानंतरच्या काळांतील नीतिमत्तेचें ध्येय स्वकाळींच दाखवितात. निस्पृह सुकृत, भूतदया, स्वार्थत्याग, वगैरे तत्कालीन ओघांशीं असंबद्ध दिसणाऱ्या कल्पना चोहींकडे पेरतात व पुष्कळांना अगदीं कूर्मलोमवत् वाटणाऱ्या कर्तव्यांचा व कर्महेतूंचा उपदेश करितात. तथापि तीं माणसें परिपूर्ण गुणांचीं असल्यामुळें, तत्कालीन लोकांवर त्यांची आकर्षक शक्ति फार प्रभाव गाजविते. आवेशाग्नि प्रदीप्त होतो, शिष्यवृंद तयार होतो व तत्कालीन नीतिमत्तेच्या परिस्थितींतून पुष्कळांची सुटका होते.

### पण ह्याचा परिणाम क्षणैक टिकतो.

तथापि असल्या चळवळीचे साकल्येंकरून होणारे परिणाम केवळ क्षणैकजीवि असतात. पहिला आवेशाग्नि विझतो, सभोंवतालच्या परिस्थितींचें पुनः वर्चस्व होतें, शुद्ध श्रद्धेयाला जडस्वरूप प्राप्त होतें, त्या पवित्र श्रद्धेयाच्या प्रकृतीला विरुद्ध अशा कल्पनांचें त्याभोंवतीं कवच तयार होतें, तें श्रद्धेयस्थान भ्रष्ट होतें, त्याला विद्रूप प्राप्त होतें व शेवटीं त्याचें प्रथम स्वरूप बहुतेक साफ नष्ट होतें. तें नैतिक शिक्षण त्या काळाला अनुरूप नसल्यामुळें, अनुकूल मानवी सुधारणेचा अरुणोदय होईपर्यंत कार्य करण्यास असमर्थ होतें; अथवा फारच झालें तर हटवादी मतांच्या थरांतून तें पवित्र नीतिशिक्षणामृत थेंब थेंब पाझरतें व अनुकूल परिस्थितीच्या आगमनाचा वेग कांहीं अंशीं वृद्धिंगत करतें.

### हटवादी मतसंस्था व नीतितत्त्वें यांचा संबंध.

( क० ४ ). सदर्हु विचारांवरून हटवादी मतांच्या संस्थांचा नीतिमत्तेच्या तत्त्वांशीं असलेला संबंध काय हा तर्क बांधणें कठीण वाटत नाहीं. अर्धवट रानटी काळांत जेव्हां नीतिशक्ति अगर न्यायबुद्धि अगदीं इतकी पंगु असते कीं, आचारमार्ग दाखविण्याचें काम तिच्या हातून होत नसतें; तेव्हां हटवादी मतपद्धती पुढें सरसावतात व आंत घुसून लोकांना त्या काळाला अनुरूप व त्यांच्यामध्यें अन्यथा न आढळणाऱ्या आचार-शुद्धीला पुष्टि देण्यास समर्थ असे कर्महेतु सुचवितात. पण नैतिक तत्त्वज्ञान ग्रथित झालें म्हणजे बहुधा धर्माला उतरती कळा लागते. अशा वेळीं नीतीचा अजूनपर्यंत पाया होऊन बसलेलें धर्मज्ञान ती जागा सोडून दुय्यम स्थितीप्रत जातें व तेणेंकरून त्याच्या सत्तेचा मुख्य झरा नष्ट होतो. ग्रीस व रोम येथील धर्मांत धर्मसंस्थेच्या या दोन भागांची फारखत इतकी दूरवर पोहोंचली कीं, नीत्युपदेशाचें काम बोलून चालून केवळ तत्त्वज्ञ लोकांच्या शिरावर पडलें व धर्मोपदेशक भविष्यकथनाच्या व प्रायश्चित्तांच्या भानगडींत गढून राहिले.

### मानवी प्रमादशीलत्वामुळें धर्मांत व्यंगें राहतात.

( क० ५ ). दुसरी गोष्ट अशी कीं, कोणत्याही इतिहासप्रसिद्ध धर्माचा प्रमादशील मनुष्यांनीं अर्थ बसविला असल्यामुळें, त्यांत कांहीं

दंतकथा अगर मतें आपल्या न्यायबुद्धीच्या उलट असणारच. कारण, ईश्वराविषयीं आमची उंच कल्पना म्हणजे नैतिक उत्कर्ष होय; आणि म्हणून मनुष्यें नेहमीं आपलें पूर्णतेचें ध्येय आपल्या धर्ममतांत चितारतात; व ज्या अर्थी हें ध्येय प्राथमिक काळीं अतिशय सव्यंग व अव्यवस्थित असतें, त्या अर्थी प्राथमिक काळच्या धर्ममतांत तशींच व्यंगें राहतात. लोकमान्य विधींत हीं धर्ममतें कायम ठशांनीं बसलेलीं असल्यामुळें, तीं कांहीं काळ समाजाच्या नीतिसंवर्धनाच्या जोरानें आड येतात. पण सरतेशेवटीं त्यांच्यांशीं उत्पन्न झालेला विरोध इतका बळावतो कीं, त्यांना त्या विरोधापुढें मान वांकवावीच लागते. अशा वेळीं एक तर त्यांना जुलमानें स्थानभ्रष्ट करितात; नाहींतर हळू हळू नामशेष होऊं देतात.

## ख्रिस्ती धर्म हा युरोपच्या नैतिक उत्कर्षाचा मुख्य झरा.

( क. ६ ). मानवी सुधारणेच्या तडाक्यानें जो अवश्य स्थानभ्रष्ट झाला नाहीं, असा केवळ एकच धर्म आहे; तो ख्रिस्ती धर्म होय. इतर सर्व धर्मांच्या बाबतींत हटवादी धर्मकल्पनांचा ऱ्हास म्हणजे त्या त्या धर्माचा नाशच होय असें झालें आहे; कारण, त्यांत जरी कांहीं नैतिक सत्याचीं अविनाशी मूल बीजें असलीं, तरी त्यांत कांहीं स्वत्वदर्शक अगर पृथक्पणा दाखविणारें असें कांहीं नाहीं. नव्या संस्थांत तीं अमर नीतितत्त्वें सामील झालीं आहेत. तीं तत्त्वें उपदेशिणारे इतिहासांतल्या पूज्यायतनांत इतरांबरोबर बसले आहेत; व तो धर्म आपलें इहकर्म आटपून क्षीण व विशीर्ण झाला आहे. पण ख्रिस्ती धर्माचा मोठा विशेष व त्याच्या ईश्वरनिर्मितत्वाचा मोठा नैतिक पुरावा हा आहे कीं, युरोपच्या नैतिक उत्कर्षाचा मुख्य झरा तो आहे; व हें उत्कर्षाचें काम त्यानें परिपूर्ण ध्येयाच्या परिपाचक व आकर्षक प्रभावानें जितकें केलें, तितकें नीतिशास्त्रतत्त्वें कितीही शुद्ध असलीं, तरी त्यांच्या उपदेशानें केलेलें नाहीं. मानवजातीची नैतिक प्रगति ख्रिस्ती धर्मसंस्थापकाच्या शीलाकडे जाण्याचा मार्ग हळू हळू आक्रमित आहे, तोंपावेतों ती कैवल्येंकरून व अतिशयेंकरून ख्रिस्ती नमुन्याची नाहीं असें, कधींही होणार नाहीं.

## ख्रिस्ती ध्येयानें केलेलें कालाचें आक्रमण.

या ख्रिस्ती ध्येयानें मानवी सुधारणेच्या प्रत्येक आक्रमणांत नवें बळ व नवें सौंदर्य मिळवून व आचार-विचारांच्या प्रत्येक क्षेत्रांत आपला श्रेयस्कर प्रभाव पाडून कालाचें आक्रमण ज्या रीतीनें केलें, तीहून आश्चर्यकारक मानवी जातीच्या इतिहासांत खरोखर दुसरी कोणतीहि गोष्ट नाहीं. प्रथमतः जें ईश्वरी तत्त्व मनुष्याच्या मनाला गोचर होत होतें, तेंच सूक्ष्म हटवादी मतांच्या व्याख्यांनीं आकलन करण्याचा प्रयत्न झाला. होमूशियन अगर मोनोफिजित, अगर नेस्तोरियन, अगर पात्रिपाशियन व ज्यांचीं केवळ नांवेंही आतां फार प्राचीन व विलक्षण वाटतील असे पुष्कळ दुसरे लोक यांच्या वादांचा तेव्हांच्या काळीं धर्मसंस्थेंत भरणा होता. यामागून प्रत्यक्ष प्रतीकांचा काळ आला. वेरोनिकाचा हातरुमाल, ऐदेसाचा पुतळा, निकोदेमसचें शूलारोपण, संतलूकचीं (५) चित्रें, अद्याप लातेरन येथें पूज्य मानलेली देवदूताच्या हातानें काढलेली तसबीर, संतांनीं सांगितलेले असंख्य दृष्टांत, यांवरून आपल्या ध्येयाचा साक्षात्कार इंद्रियगोचर व सजीव प्रतिमेच्या रूपानें घेण्यास लोक किती उत्कंठित होते हें दिसतें. यानंतर ऐतिहासिक प्रमाणांचा काळ आला. याला सीबांद व त्याचे अनुयायी यांचा काळ म्हणतां येईल; तथापि जसजशीं वर्षें लोटत गेलीं, तसतसें सर्व हटवादी कल्पनांतून नैतिक ध्येयाचें डोकें स्पष्ट वर येऊं लागलें. व मागच्या काळांत केव्हांही तें हल्लींच्या इतकें सामर्थ्यवान् झालें नाहीं; व सर्वत्र मान्य झालें नाहीं; असें म्हटलें तर अतिशयोक्ति होणार नाहीं. ही घटना इतिहासांत अगदीं विलक्षण आहे, व उत्कृष्ट सुकृताच्या अत्युच्च प्रतिकृतीच्या ठायीं ईश्वराचें उत्तम आविर्भवन पाहणाऱ्यास वाटणारें या घटनेचें महत्त्व इतकें उघड आहे कीं, तिकडे दुर्लक्ष करितां येत नाहीं.

## ख्रिस्ती धर्मांतल्या नीतिभागांत स्वत्वदर्शक कांहीं नाहीं हें म्हणणें चुकीचें आहे.

( क० ७ ). हें परीक्षण कमी करितां आलें असतें, तर आनंदानें केलें असतें; पण तें कंटाळवाणें होईपर्यंत लांबलें, याबद्दल वाचक क्षमा करतील असा भरंवसा आहे. हें लांबण्याचें कारण असें कीं, कार्यकारणवादाचा इतिहास हा जसा व जितका बौद्धिक विकासाचा, तसा व तितका नैतिक

उत्कर्षांचाही इतिहास होय; व नैतिक उत्कर्षाच्या इतिहासाला दृष्टीआड करून, कार्यकारणवादाच्या इतिहासाची जी कांहीं कल्पना येईल ती अपुरती व खोटी होय. आणखी जे कोणी ख्रिस्ती धर्मांतल्या नैतिक भागांत स्वत्वदर्शक अगर पृथक्पणा दाखविणारें असें कांहीं नाहीं असें प्रतिपादतात, त्यांच्या विचारसरणीहून चुकीचें अगर वरवर पाहणीचें असें दुसरें कांहीं नाहीं असें वाटतें. असें प्रतिपादणाऱ्या पंथाचा बोलिंगब्रोक हा अध्वर्यु मानतां येईल. या पंथाची रीत अशी कीं, ख्रिस्ती धर्मानें उपदेशिलेलीं तत्त्वें ज्यांत आहेत अशीं कांहीं अलग संदर्भरहित वचनें निरनिराळ्या ख्रिस्तीधर्मबाह्य लेखकांच्या लेखांतून गोळा करावीं; व रास मोठी झाली कीं, यांनीं आपलें काम तडीस गेलेंसें मानावें. पण नीत्युपदेशाच्या कल्पांतली खरी अपूर्वता त्या कल्पांतल्या घटक अंगांवर तितकी अवलंबून नसते; तर तीं अंगें प्रमाणशीर रीतीनें सुसंबद्ध करून एकजीव करण्याच्या रीतीवर, निरनिराळ्या गुणांना द्यावयाच्या प्रमाणशीर महत्त्वावर, अगर हीच गोष्ट थोडक्यांत सांगावयाची तर त्या अंगांनीं बनविलेल्या शीलादर्शावर अवलंबून असते. आतां हा ख्रिस्ती शीलादर्श पेगन शीलादर्शाहून श्रेष्ठतर आहे इतकेंच नव्हे, तर तो निराळ्याच प्रकारचा आहे हें अगदीं खास.

## ख्रिस्ती धर्मातील फेरबदलांचे तीन भिन्न वर्ग.

( क० ८ ). वरचीं तत्त्वें ख्रिस्ती धर्मांतील फेरबदलांच्या इतिहासाला लावून पाहतांना स्वाभाविकपणें फेरबदलांचे तीन परस्पर भिन्न वर्ग आहेत, अशी अटकळ होते. आपल्या नीतिदृष्टीशीं विरोध करणाऱ्या मतांचा हळू हळू झालेला लोप हा पहिला वर्ग; सदसद्विवेकाशीं विरोध करणाऱ्या नव्हेत, तरी निदान सर्वस्वी त्याच्या परिघाबाहेर असणाऱ्या, केवळ तात्त्विक मतांच्या अगर विधींच्या वर्चस्वाचा ऱ्हास हा दुसरा वर्ग; व सुकृत करण्याच्या मुख्य हेतूच्या गादीवरून शिक्षेच्या भीतीला पदच्युत करून तेथें न्यायबुद्धीची स्थापना, हा तिसरा वर्ग.

## दुसऱ्या वर्गाच्या फेरबदलांचें विवेचन.

यापैकीं पहिल्या वर्गाच्या फेरबदलांचा विचार पुढच्या प्रकरणांत होईल. त्या प्रकरणांत धार्मिक छळाच्या कारणांचा विचार होईल; व व्यवहारांतल्या

त्या जबरदस्त नैतिकनियमभंगाचा मार्ग चोखाळणाऱ्या तात्त्विक विचारांतील नैतिक नियमभंगांच्या दीर्घ मालिकेचा इतिहास धुंडाळण्याचा प्रयत्न होईल. दुसऱ्या वर्गांतले फेरबदल इतके उघड आहेत कीं, त्यांचें विवेचन करण्याची जरूर नाहीं. केवळ तात्त्विक मतांना अगर संस्कारविधींना मागें सर्वत्र जो मान मिळे व सध्यां बहुतेक लोकांकडून जो मिळतो, त्यांत काय अंतर आहे, तें इतिहासाची ओळख असणाऱ्या कोणाही मोकळ्या मनाच्या मनुष्याच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. चवथ्या व पांचव्या शतकांतील ख्रिस्ती धर्मसंस्थेचें निरीक्षण केलें असतां कळेल कीं, त्यावेळीं बहुधा कैवल्यानें सर्व लोकांचें लक्ष ख्रिस्ताच्या ठायीं दोन प्रकृतींचें समकालीन आस्तित्व कसें वागतें, याबद्दलच्या सूक्ष्म विचारांनीं व्यापिलें होतें. जर मध्ययुगांतल्या त्या धर्मसंस्थेचें सूक्ष्म रीतीनें परीक्षण केलें, तर आढळेल कीं, सर्व लोकांचें लक्ष विधि व यात्रा यांत गढलेलें होतें. धर्मसुधारणेच्या काळीं तिचें अवलोकन केलें, तर दिसेल कीं, मागच्या काळाच्या स्थितींतून मानवी सुधारणेच्या प्रगतीच्या मानानें तें नुकतें बाहेर येत होतें. तथापि अजूनही मुख्य तात्त्विक कसोटी प्रभुभोजन अगर आभारप्रदर्शनसंस्कारसंबंधीं मताची होती; तिचा नीतिमत्तेशीं कांहीं संबंध नव्हता; व मुख्य व्यावहारिक कसोटी निदान युरोपांतल्या ब्रिटिश बेटांबाहेरील देशांत तरी ( ६ ) शुक्रवारीं मांस खाण्याबद्दलची होती. सद्यःकाळीं धर्माधिकारबाह्य लोकांच्या मोठ्या समाजाला असल्या बाबी केवळ पोरकट वाटतात; कारण, या बाबींचा नीतिमत्तेशीं बिलकूल संबंध नाहीं.

**तिसऱ्या वर्गाच्या फेरबदलांत धार्मिक भयानकतेचा अंतर्भाव होतो.**

( क० ९ ). तिसऱ्या वर्गाच्या फेरबदलांकडे जास्त लक्ष पोंचविण्याची जरूर आहे; कारण धार्मिक भयानकतेच्या इतिहासाचा त्यांत अंतर्भाव होतो. हा इतिहास युरोपच्या बौद्धिक व नैतिक उत्कर्षाचा अभ्यास करणाऱ्या सर्वांना गाढ पण अत्यंत यातनामय कुतूहल देणारा आहे.

## ख्रिस्ती धर्मात उपदेशिलेली मरणोत्तर शिक्षा अत्यंत यातनामय आहे.

( क० १० ). ख्रिस्ती धर्माच्या आद्य पित्यांनीं उपदेशिलेल्या व मध्ययुगांतील धर्मोपदेशकांनीं विस्तृत व पूर्ण केलेल्या मरणोत्तर शिक्षेच्या

मताची प्रत्यक्षानुभूत कल्पना येणें सध्यांच्या काळीं कठीण कदाचित् अगदीं अनिष्ट आहे. तें मत आतां इतकें मागें पडलें आहे, तें इतकें फिरविलें आहे, इतकें नरम केलें आहे, त्याचा इतका उलगडा करून टाकला आहे, कीं त्याच्याबद्दल प्राचीनकाळांतल्या तिटकाऱ्याची आतां छायाही क्वचित् राहिली असेल. इतकें सांगितलें म्हणजे बस्स कीं, आपण निर्मिलेल्या प्राण्यांपैकीं पुष्कळांकरितां सर्वशक्तिमान् परमेश्वरानें चिरंतन नरकवासाचा भोग तयार करून ठेविला आहे; आणि तो भोग म्हणजे कांहीं असामान्य सौख्यांची हानि एवढाच नव्हे, तर अत्यंत वेदना देणाऱ्या यातनांचाही अनुभव त्यांत मिळावयाचा, असें सामान्यपणें प्रतिपादित असत. विस्तवानें जळणें याच्यासारखी मानवी देहास सहन करण्यास अत्यंत तीव्र यातना कदाचित् दुसरी नसेल; व ह्याच यातना मनुष्य जातींतील बहुतेक जिवांना चिरकाळ भोगावयाच्या आहेत, असें आद्य धर्मपिते आम्हांला खात्रीनें सांगतात. हें मत अगदीं अक्षरशः बिनचूक सांगितलें जात असे; ख्रिस्ती धर्माच्या मंडनार्थ लिहिलेल्या पहिल्या दोन्ही पक्षपाती लेखांत हें मत स्पष्टपणें सांगितलें आहे. अल्पकालिक अनिष्टांच्या सारखें यातनांकडे तिरस्कारानें पाहण्यास मनुष्य तात्त्विक विचाराच्या बळावर कधीं कधीं समर्थ होतो, असें म्हणत; पण ख्रिस्ती धर्मानें यातनांचा जो देखावा पुढें मांडला आहे तो पाहून वज्राचेंही हृदय वितळेल; कारण, त्या धर्मानें सांगितलेल्या शिक्षा जशा तीव्र वेदना देणाऱ्या ( ७ ) तशाच चिरकाळ भोगाव्या लागणाऱ्या आहेत.

## यातनामय शिक्षेच्या मताविरुद्ध दोन अपवादक गृहस्थ.

( क० ११ ). हें खरें कीं, ओरिजेन व त्याचा चेला निसाचा ग्रेगरी यांनीं कांहींसें कचरत प्रचालित मताचा त्याग केला व रूपकार्थाकडे व अंतीं सर्वांनाच मुक्ति (८) मिळावयाची आहे या विश्वासाकडे, जोरानें ते वळले; पण या मताचे ते दोघेच होते. या दोन अपवादांखेरीज चट साऱ्या धर्मपित्यांनीं यातना चिरकाल भोगावयाच्या आहेत असें जाहीर केलें व प्रत्यक्ष अग्नीच्या क्रियेनें सचेतन देहाला ( ९ ) घडणाऱ्या, अशी त्या यातनांची व्याख्या केली. प्रत्यक्ष जडस्वरूपी ज्वालेंत ठेविलेला पदार्थ राख झाल्याविना चिरकाल राहणार नाहीं, असें पेगन लोकांनीं प्रतिपादन केलें; तेव्हां त्यांना

उत्तर म्हणून आग्या मगर, आस्बेस्तस व ज्वालामुखी पर्वत यांचीं उदाहरणें पुढें आलीं व ईश्वराच्या कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं सामर्थ्याकडे बोट दाखविण्यांत आलें; हें सामर्थ्य सर्वशक्तिमान् ईश्वर मृतांच्या यातना चिरकालिक करण्याकरितां नेहमीं खर्च करित असतो, अशी समज (१०) असे.

## पण हें मत सर्वस्वी बाणलेलें तर कधींच नव्हतें.

( क० १२ ). ख्रिस्ती धर्माच्या आरंभींच्या काळीं अगर दुसऱ्या केव्हांही हें मत सर्वत्र प्रत्यक्ष बाणलेलें कधींच नव्हतें, याबद्दल आपण अगदीं खात्री बाळगावी. ख्रिस्ती धर्मांत आल्याखेरीज मुक्ति नाहीं व मुक्ति नाहीं म्हणजे पेटलेल्या अग्नीनें भरलेल्या नरकांत पडणें, अशी श्रद्धा बाळगणारे अथवा निदान असें बोलणारे, हजारों लोक असे असले पाहिजेत कीं, ते इतकें होऊनही आपल्या पेगन धर्माच्या आईची आठवण करीत असावेत व म्हणत असावेत कीं, आपली आई मेली तेव्हां तिला अंधुक, अनिश्चित आशा जरी नसली, तरी तिला निदान तीव्र निराशेनें साफ घेरलेलें नव्हतें. तसेंच हजारों लोक असे असावेत कीं, एखाद्या ख्रिस्ती धर्मपित्याजवळ बोलतांना जरी त्यांनीं कबूल करावें कीं, ख्रिस्तीधर्मबाह्य लोकांनीं केलेलीं उदात्त कृत्यें म्हणजे 'भपकेदार दुष्कृत्यें' होत; तरीही स्वदेशाच्या इतिहासलेखकांच्या ग्रंथांचीं पानें तसल्या सिद्धांतांशीं क्वचित्‌च जुळणाऱ्या मनोवृत्तींनीं वाचावीं. आणखी असें म्हणतां येईल कीं, ख्रिस्तीधर्मसंस्थापकाच्या सौजन्यमय व सहनशील स्वभावाचा विचार करून ज्यांची नैतिक दृष्टि थोडी तरी उन्नत झाली आहे, अशीं पण हीं माणसें नव्हत.

## तथापि त्याचा शिक्का धर्मज्ञानावर बसलेला होता.

तथापि या मताचा शिक्का त्या काळच्या धर्मज्ञानावर बसला होता; व जरी त्याचा कलेंत प्रवेश झाला नव्हता, तरी त्याची प्रचीती त्या लोकांना जितक्या अंशानें भासत होती, तितक्या अंशानें आपणांस तरी निदान ती वाटणें कधींही शक्य नाहीं. कारण, छळ व वाद सभोंवतीं चालले असतांना त्या मताचा उपदेश होत असे; व तें मनांत नाविन्याच्या स्पष्टतेनें चमके. यहुदी धर्मांत त्यासारखें कांहीं नव्हतें. मरणोत्तर अस्ति-

त्याचें मत कोणत्याही धर्माचें केंद्रस्थ मत म्हणून वारंवार सांगितलें जातें, हें मत लेवितिकसच्या आविर्भवनांत समाविष्ट नाहीं, निदान इतक्या अंधुक रीतीनें सांगितलें आहे कीं, लोकांना त्याचें आकलन (११) झालें नाहीं; असें आतां सामान्यपणें कबूल आहे असें दिसतें. दास्यांत असतां यहुद्यांना त्यांच्या धन्याकडून एतद्विषयीं कांहीं कल्पना मिळाल्या हें खरें; पण त्यासुद्धां फारच अस्पष्ट कल्पना होत्या; व तें नवीन म्हणून साद्युसी ( पुनरुत्थानविरोध्यां ) नीं अंगीकारलें नाहीं. तरी त्यांचा कोणीही मुळींसुद्धां निषेध केला नाहीं. प्राचीन काळच्या मानवी सुधारणेंत साधारण प्रगति केलेल्या राष्ट्राला परलोकची जितकी माहिती होती, तितकी स्पष्ट व बरोबर माहिती देवाच्या लाडक्या लोकांना नसेल; हें संभवनीय खरें. पेगन लोकांच्या प्राचीन लोकप्रिय सांप्रदायिक कथांत नरकाविषयींच्या मताचा पुसट पुसट मागमूस होता खरा; याच अंधुक कल्पनांवरून पायथागोरासनें ( १२ ), व प्रायश्चित्ताची ( १३ ) कल्पना पूर्णत्वास आणण्यास इतर प्राचीन तत्वज्ञांहून अधिक झटणाऱ्या प्लेतोनें विशेषतः त्या मताचा विस्तार केला.

### ख्रिस्ती धर्माच्या उद्भवाच्या वेळीं हें मत प्रसिद्ध नव्हतें.

पण ख्रिस्ती धर्माच्या उद्भवाच्या वेळीं लोकमनावर त्याची छाप नव्हती; व ख्रिस्ती धर्माच्या मतांसारखे गुणही त्यांनीं कधीं दाखविले नव्हते. कारण, पेगनधर्मांत मरणोत्तर यातना कैवल्यानें पापाकरितांच राखून ठेविलेल्या मानीत; व तें पापही आत्यंतिक व विशिष्ट प्रकारचें होतें. तांतेलस, सिसिफस, अगर इक्झिओन, अशा महापाप्यांचीं उदाहरणें निवडून घेतलेलीं होतीं व मिस्तरी (धर्मकथात्मक) नांवाच्या नाटकांतल्या ( १४ ) खेरीज कोठेंही हा विषय प्रामुख्येंकरून कधींच पुढें आणलेला दिसत नाहीं. ख्रिस्ती धर्मज्ञानपंडितांचें विशिष्ट मत असें होतें कीं, कल्पनातीत तीव्र यातना लाखों लोकांसाठीं राखून ठेविलेल्या आहेत व मानवजातींत अतिशय शूर व अत्यंत परोपकारी जे आहेत, त्यांच्याही वांट्यास त्या यातना भोगणें येईल. धार्मिक प्रमाद हाच अत्यंत घोर अपराध, असें धर्मसुधारणेच्या पूर्वी ख्रिस्ती धर्म सर्वत्र उपदेशीत असे. मग त्याला शुभवर्तमान म्हणून मानण्यास कांहीं लोक तयार झाले नाहींत; यांत आश्चर्य वाटण्याचें काय कारण ?

## मध्ययुगांत हें मत विस्तरशः तयार झालें.

( क० १३ ). या विषयाच्या मागें लागून आपण जर मध्ययुगांत शिरलों, तर प्रत्यक्ष अग्नीनें जाळण्याच्या शिक्षेची कल्पना तपशील देऊन विस्तृत केलेली आढळेल. मुक्तांसाठींही रेचनभूमीची पण कल्पना तयार झाली होती. या मताच्या उद्भवाचें विस्तरशः परीक्षण न करितां इतकें सांगितलें तर पुरे आहे कीं, प्रायश्चित्ताच्या मताचें स्वाभाविकपणें हें शेंपूट होतें. पेगन कवींची अशासारखीच कांहीं कल्पना होती, व वर्जिलनें ती मृतांच्या प्रदेशाच्या आपल्या प्रसिद्ध वर्णनांत गोंविली आहे; म्यानिशी (द्वितत्त्व) पंथी मरणोत्तर शुद्धीचा विलक्षण प्रकार मानीत ( १५ ); व कांहीं धर्मपित्यांचेंही मत होतेंसें दिसतें कीं, अखेरच्या न्यायाच्या दिवशीं सर्व माणसांना शुद्धीकरितां नव्हे, तरी परीक्षेकरितां विस्तवांतून चालण्याचें दिव्य करावें लागणार ! कारण जे पुण्यवान् व धर्मशील ते न भाजतां त्यांतून जातील व जे पापी व पाखंडी, धर्माबद्दल चुकीचीं मतें धारण करणारे, ते ( १६ ) जळून जातील; याशिवाय या मतानें चिरकाल शिक्षा भोगावी लागणाऱ्यांची संख्या कमी केल्यामुळें त्या शिक्षेचें भयंकर स्वरूप जरा सौम्य झालें; पण उलट पक्षीं बहुतेक सर्व माणसांना मरणोत्तर अत्यंत दुःख भोगावें लागणार असें दर्शविलें; या मतापासून धनप्राप्तीचें फळ उघड उघड व नाकबूल न करतां येण्यासारखें आहे; हें आणखी सांगणें बरें.

## नरकाग्निमताचा रूपकार्थ बसविणारा एरिजेना.

( क० १४ ). दहाव्या शतकांत धर्मज्ञानपंडिताचें एक संस्मरणीय उदाहरण आढळतें; हा ओरिजेनचें अनुकरण करणारा होता; व नरकांतील अग्नीचा रूपकानें अर्थ बसवावा असें प्रतिपादणारा मध्ययुगांत हा एकटाच माहीत आहे. याचें नांव जान स्कोतस एरिजेना. हा ध्यानांत भरण्यासारखा मनुष्य होता. हा नांवा ( १७ ) वरून व तत्कालीनांच्या म्हणण्यावरून आयरिश होता. याच्या देशबांधवांची नेहमीं ख्याति आहे. त्याप्रमाणें ह्या विद्वानानेंही आयुष्याचा बहुतेक भाग देशपर्यटनांत घालविलेला दिसतो. विलक्षण चातुर्य, विशाल व नाना विषयांत कुंठित न होणारी अलौकिक बुद्धि, ग्रीक भाषेचें ज्ञान वगैरे त्याच्या गुणांनीं त्यानें लवकरच अपार कीर्ति मिळविली. ग्रीक भाषेचें ज्ञान त्या वेळीं

अत्यंत विरळ झालें होतें; पण युरोपच्या इतर शाळांतून तें निघून गेल्यावर आयरिश मठांत कांहीं काळपर्यंत राखलेलें होतें. ग्रीक तत्त्वज्ञानाच्या दोन्हीही थोर शाखांचें त्यानें इतक्या उत्कट जिज्ञासेनें अवगाहन केलें होतें कीं, कित्येक त्याला मुख्यत्वेंकरून नवप्लेतोदर्शनाचा अखेरचा प्रतिनिधि मानतात व इतर त्याला पंडितंमन्य पंथाचा संस्थापक ( १८ ) गणतात. प्रत्येक प्रश्नावर शब्दप्रामाण्याविषयीं तो विलक्षण तिटकारा दाखवी; व उद्दाम आनिर्बंध विचार प्रकट करी. त्यांचें मंडन ओरिजेन-प्रमाणेंच वाटेल तितकीं रूपकें घेऊन करी. ओरिजेनचे ग्रंथ त्यानें बहुधा वाचून पचविलेले असावेत. त्याची ज्या मतांवर श्रद्धा नसे व म्हणून जीं तो रूपकार्थानें घेई, त्यांपैकींच नरकांतील ( १९ ) अग्नीसंबंधीं मत होय.

### बाराव्या शतकांत ह्या मताचें आपापल्यापरी सर्व विवरण करूं लागले.

( क० १५ ). तथापि स्कोतस स्वकालीन नव्हता; म्हणजे त्याचीं मतें वगैरे त्याच्या काळाच्या फार पुढें होतीं. मध्ययुगांतल्या जड कल्पनांचा व जड मतांचा मिलाफ वाखाणण्याजोगा झाला; व बाराव्या शतकापुढच्या धार्मिक भयाकनकतेनंतर तें मत पूर्ण विस्तृत झालें. नरकयातना त्या काळीं धर्मांतली मुख्य गोष्ट होऊन बसली व लोकांच्या विचारांचा नेहमींचा विषयही तोच झाला. त्या यातनांचें विवरण करण्यांत युरोपचीं सर्व बुद्धिमान् माणसें गुंतलीं होतीं. सर्व लेखक, सव चितारी, सर्व वक्ते हे याच भयंकर विषयावर आपलें सामर्थ्य खर्चींत होते. दांतीची लेखणी, ओर्गन्नाची कुंचली, या श्रमोत्पादक भयानकतेला पुष्टि देत होत्या. प्रत्येक देवळांत हीच भयानकता वाढविणारीं चित्रें गच्च भरलीं होतीं व व्यासपीठा-वरून दणाणणाऱ्या प्रवचनांनीं त्याच भयानकतेचा परिपोष होत होता.

### संताचें तद्विषयक स्वप्न.

संताला पुष्कळदां नष्टात्म्यांच्या यातना स्वप्नांत पहावयास मिळत, व आपण पाहिलेला दृष्टान्त इतरांस कथन करण्यासही त्याला मोकळीक असे. त्या चिरकालिक अग्निज्वालांच्या घोर अंधुक उजेडानें नाना प्रकारच्या भयंकर यातना भोगणारे लाखों जीव आपणांस कसे दिसले; अवर्णनीय दुःखावेगानें त्यांच्या डोळ्यांतील बुबुळें कशीं गरगर फिरत होतीं; त्यांचीं आंगें कशीं फाटत होतीं; तुटत होतीं, दुःखानें थरथरत

होतीं; एकावर एक तीक्ष्णतर वेदना येऊन ते कसे विव्हळत होते; व निष्करुण परमेश्वराची व्यर्थ दया भाकीत कसे किंचाळत होते; वगैरे हकीकत तो मोठ्या आवडीनें सांगे. या यातना भोगणारांच्या सभोंवतीं विचित्र भयंकर हिडिस दिसणारीं भूतें घिरट्या घालीत होतीं. त्यांच्या यातना पाहून त्यांची थट्टा करीत होतीं, उकळणाऱ्या गंधकाच्या कढयांत त्यांना उचलून टाकीत होतीं, अगर जास्त तीक्ष्ण व जास्त परिपूर्ण यातना देण्याचे नवीन मार्ग शोधून काढीत होतीं; हें पण तो सांगे. त्यांतच गंधकाची नदी वहात होती व तिच्या लाटा उकळत होत्या. त्यामुळें अग्निज्वाळा जिवंत रहात व भडकत. त्या जीवांना बिलकूल विश्रांति नसे; यातना क्षणभर कमी होत नसत. त्यांतून निमिषमात्र सुटण्याची आशा नसे. त्या यातनांचें स्वरूप नेहमीं नानाविध असे व त्यांच्या वेदना क्षणभरही जरा सुद्धां शमत नसत. असें सांगत कीं, त्या ज्वाळांचा कधीं कधीं बिलकूल उजेड पडत नसे; पण त्यांची उष्णता कायम असे; अशा वेळीं जिकडे तिकडे गुडुप अंधकार होऊन जाई; पण एकसारख्या ऐकूं येणाऱ्या दुःखावेगाच्या आरोळ्यांनीं आंत असलेल्या जीवांच्या सतत वेदनांची ( २० ) साक्ष पटे.

## धर्मोपदेशक भयानकता वाढवीत होते.

( क० १६ ). या विषयावर आणखी पाल्हाळ करणें व्यर्थ आहे. तत्कालीन दंतकथांत व उपासनांत संकलित असलेली भयाण कल्पनावली सर्व उतरून घेतां येईल. सनातनपंथी धर्मोपदेशक आपल्या मनांतल्या गुप्त गुहांतल्या कल्पना व मानवी जुलमाचीं दुष्टतम कृत्यें धुंडाळून ईश्वराच्या माथीं नवे नवे छळाचे प्रकार लादण्याकरितां जे अविश्रांत श्रम करीत ते कसे काय होते, याचा अंदाज पाहिजे तर करितां येईल. किती तीव्र स्पष्टतेनें या कल्पना प्रचीतीस येत असत तें आपणाला कधींही कळणार नाहीं. तसेंच त्यांनीं उत्पन्न होणारें वेड व दैन्य हेंही कळणार नाहीं.

## सध्यांच्या व त्या काळांतील अंतर.

कारण, तो काळ म्हणजे अविकल्प व अस्खलित श्रद्धेचा होता; तो काळ म्हणजे त्यांत सध्यांच्या सारखें बुद्धिभेदाला कारण नसे, व कल्पना–

शक्ति धर्मज्ञानैकपर होती. तो काळ म्हणजे किळसवाण्या कल्पना सुबक करण्याचा अगर टाळण्याचा सध्यांसारखा काळ नव्हता; त्या काळांत विचारशक्ति पंगु असल्यामुळें कल्पना-शक्ति उत्तेजित करण्याकडेच सर्व प्रयत्न असे. भजकाचें लक्ष कोठेंही जावो, त्याला यातनांचे नवे प्रकार आढळावयाचे व तेही इतक्या सूक्ष्म रीतीनें तपशीलासह वर्णिलेले, व इतक्या जोरानें व स्पष्टपणें अमलांत आलेले दिसावयाचे कीं, ते मनांत सदोदित वागून जगज्जनकाकडील स्वाभाविक ओढा गारठून जिरून जावयाचा. यापेक्षां दुसरें खरोखर काय व कसें होणार ?

## नेहमीं काय कानावर पडे ?

मनुष्याच्या कानावर नेहमीं पडावयाचे विचार ते असे असत कीं, सर्वशक्तिमान् परमेश्वरानें आपल्या अतुल सामर्थ्यानें असंख्य प्राणी जन्मास घातले आहेत व त्यांच्या कपाळीं अनिर्वाच्य चिरकालिक वेदनाकारक यातनाच भोगावयाच्या आहेत, हें तो जाणून आहे; व ह्या कधींही चुकवतां यावयाच्या नाहींत; अशीच लाखों प्राण्यांची स्थिति त्यानें ठेविली आहे. या यातनांचें ठिकाण त्यानेंच निर्माण केलें त्यानेंच त्यांत कधीं न विझणारा अग्नि पेटवून ठेविला आहे, व त्यांचे चिरकाल हाल व्हावेत म्हणून त्यांना चिरकाल आयुष्य दिलें आहे, व अशा रीतीनें त्यांना यातना देण्यांत त्या परमेश्वराचा असा हेतु आहे कीं, या यातनांचा विचार पापमुक्त लोकांच्या सुखाला कारण व्हावा (२१).

## ईश्वराचें उपकारक स्वरूपच त्यामुळें नष्ट झालें.

दुसऱ्या कोणत्याच धर्मोपदेष्टयांनीं असलीं मतें जाहिर केलेलीं नाहींत आणि जोंपर्यंत असलीं मतें तीव्रपणें प्रचीतीला येत होतीं, तोंपर्यंत नव्या कराराचीं उपकारक वचनें व सौम्य व सौजन्यपूर्ण ध्येय यांचा पगडा लोकमनावर बसण्याचा संभव नव्हता. या दोन गोष्टींचा परस्पर मिलाफ होण्याची आशाच नव्हती. ईश्वराच्या उपकारकत्वाची जाणीवच नष्ट झाल्यामुळें, नैसर्गिक धर्माची इमारतच ढांसळून जमीनदोस्त झाली. तेव्हांपासून धर्माचें नैतिक स्वरूप जाऊन त्याला हटवादी मताचें स्वरूप जरूर प्राप्त झालें व तो कृत्रिम होऊन अवशेष व विधी, भोळेपणा व छळ, वैखानस वृत्ति व भयानकता यांचें माहेरघर झाला. त्याचा मुख्य

आधार म्हणजे उपाध्याय; व त्यांचें रक्षण करावयाचें मुख्य शस्त्र म्हणजे लोकांना धास्ती घालणें.

## हें मत कल्पकतेला फार बाधक होतें.

( क० १७ ). मागेंच चेटकाच्या गोष्टींचें विवेचन करीत असतां असल्या मताचा मनुष्याच्या कल्पनेवर काय परिणाम होतो, हें पाहिलें आहे. या मताचा परिणाम कल्पकतेला जितका बाधक होतो, तितका बहुधा इतर सर्व बौद्धिक व नैतिक शक्ति एकवट्नही होत नाहीं. यापुढें, या मताचा युरोपच्या बौद्धिक इतिहासावर, शोधकर्तेतील गैरहुशारीवर व भित्रेपणावर होणाऱ्या परिणामाचा ह्मणजे त्या मतामुळें उत्तेजित झालेल्या बौद्धिक प्रामाणिकपणाबद्दलच्या गैरविश्वासाचा व तिटकाऱ्याचाही थोडक्यांत विचार होईल; तथापि याहूनही दुःखमय असा एक परिणाम सांगावयाचा आहे.

## दुःखाच्या निदिध्यासानें कोमल मनोवृत्ति वठतात.

साधारण निरीक्षणाच्या अत्यंत परिचयांतली एक गोष्ट अशी आहे कीं, दुःखाचा सतत निदिध्यास लागला असतां, विशेषतः त्या निदिध्यासांत प्रबळ मनोविकार नसतां, त्याचा कल अंतःकरणांतील प्रेमांकुर वठविण्याकडे व तेणेंकरून मानवी हृदयांतील मनोवृत्ति नष्ट करण्याकडे असतो. शस्त्रवैद्यासारख्या दुसऱ्यांच्या केवळ बऱ्याकरितांच दुःखाचा सतत विचार करणाऱ्या माणसासही हा नियम लागू पडतो. दुःखाबद्दलच्या पहिल्या तिटकाऱ्याच्या ऐवजीं लवकरच त्याविषयीं बेफिकीरपणा येतो; बेफिकीरपणाचें झपाट्यानें हितसंबंधांत रूपांतर होतें व हितसंबंधाचा दर्जा कधीं कधीं वाढत जाऊन, त्याला निश्चित सौख्याचें स्वरूप येतें. यामुळेंच आपल्या धंद्यांत कराव्या लागणाऱ्या शस्त्रक्रियांनीं खूप आनंद वाटणाऱ्या शस्त्रवैद्यांविषयींच्या व दुःखाच्या विचारानें मिळणारा मुर्दाड आनंद दाबतां न आल्यामुळें आपल्या त्या व्यंगानें फायदा करून घेण्याचा निश्चय करून रुग्णशालांत अगदीं न कचरतां शस्त्रक्रिया करूं लागलेल्या माणसांविषयींच्या आपण गोष्टी ऐकतों.

## परोपकाराची मदार उदात्त मनोवृत्तींवर असते.

आतां मनुष्याच्या उदात्त मनोवृत्तींवरच जगांत होणाऱ्या पुष्कळशा दयेच्या कृत्यांची व विशेषतः माणुसकीच्या प्रचलित ध्येयाची व मापाची मदार असते, ही गोष्ट हवी तितकी उघड आहे. केवळ कर्तव्याच्या जाणिवीमुळें पुष्कळ परोपकार करणारीं पण मनोवृत्ति पाहिल्या तर अगदीं गंभीरखेदी अशीं माणसें आहेत खास. अशींहीं उदाहरणें आहेत कीं, इकडे प्रत्यक्ष परोपकाराचीं कृत्यें जसजशीं जास्तजास्त घडतात, तसतसें हें मनोवृत्तीचें काठिण्य वाढत जातें. कारण काय कीं, दुःख निवारण्याच्या हेतूनें त्याचा निदिध्यास लागल्यामुळें मनुष्याच्या आंगीं गंभीरखेदित्व येतें; व बिशप बतलर यानें दाखविल्याप्रमाणें "इकडे प्रत्यक्ष परोपकाराचीं कृत्यें करण्याची संवय बळकट होत असतांच तिकडे पुनः पुनः आवृत्ति झाल्यामुळें मनोवृत्तींचें संवेदकत्व सत्त्वहीन होत असतें." पण बहुतेक लोकांवर या बाबतींत मनोवृत्तींचा ताबा असतो. त्यांचीं कृत्यें व ध्येय त्यांच्या मनोवृत्तींच्या चापल्याच्या आधारानें असतात.

## मध्ययुगांतील या मताचा परिणाम काय झाला असेल ?

हे विचार जर बरोबर असतील, तर मध्ययुगांतील धार्मिक मतांच्या निदिध्यासाचा परिणाम काय झाला असेल, त्याची कल्पना करणें सोपें आहे. पेवियाच्या प्रख्यात मठांत मंडोदक चित्र आहे, तें त्या काळच्या मतांचें चिन्हच मानतां येईल. त्या चित्रांत एक वैखानस काढलेला आहे. त्यानें हात जोडले आहेत. त्याच्यापुढें एका दरींत नष्टात्मे यातना भोगीत आहेत असें दाखविलें आहे; व त्यामुळें त्याच्या चेहऱ्यावर आवेगोत्पादक भीति पसरलेली आहे. व त्याच्या मनांत व्यापून राहिलेल्या विव्हळ करणाऱ्या विचाराचें ज्ञान त्या चित्राच्या वरच्या अंगास कोरलेल्या शब्दांनीं होतें. ते शब्द हे:-" क्विस् सस्तिनेबित् ने दिसेन्दाम् मोरिएन्स् "

## अशा विचारांनीं लोकमनावर होणारा भयंकर परिणाम.

विचाराच्या अशा स्थितींत आपली सहाजिकपणें अशी अटकळ बसेल कीं, मनुष्याच्या यातनांबद्दल साधारण बेपर्वाई अगर रानटी क्रूर कृत्यें करण्याचा ओढासुद्धां उत्पन्न करण्याकडे या मताचा जोरदार व सरळ कल असावा. पण यानें या मताच्या परिणामांची केवळ अपुरी

कल्पना येते. कारण, या भयाण चित्रांचें सतत विस्तरशः वर्णनच करून मनुष्यें राहत नसत; तर तीं आणखी चित्रांच्या योगानें नेहमीं कृतज्ञता व आनंद वाटल्याचें व्यक्त करीत. आपल्या मानवबंधुजनांपैकीं पुष्कळसा भाग चिरकालिक यातना भोगणारच; हें ख्रिस्तीधर्मांतलें रहस्य होय; व ख्रिस्तीधर्म खोटा अशी नुसती भावना सुद्धां भयंकर पाप होय; असा त्यांचा विश्वास असे. आपल्या मताशीं ज्याचा संबंध जुळवतां येण्यासारखा असेल, असें प्रत्येक अलंकारिक वचन त्यांनीं इतक्या परिश्रमानें निवडून काढून संग्रह करून ठेविलें व त्याचा अर्थ इतक्या वीट येण्यासारख्या शब्दशः पद्धतीनें बसविला कीं, आपल्या धर्माचें मध्यवर्ती सत्य म्हणजे जडस्वरूपी चिरंतन अग्नि हेंच होय व जगांतल्या सध्यांच्या अगर या अगोदरच्या कोणत्याही इतर धर्मांत ख्रिस्ती शुभवर्तमानांत वर्णिलेल्या नरकाप्रमाणें विशिष्ट गोष्टींनीं युक्त असा नरक सांगितलेला नाहीं, असें जें एका आंग्लिकन पंथी ( २२ ) धर्मोपदेशकाचें म्हणणें आहे तेंच खरें; असा त्यांनीं आपला पक्का ग्रह करून घेतला होता.

### आराध्यदेवतेचें सारूप्य प्राप्त होणें हें धर्माचें अंतिम साध्य.

दृष्टांताच्या भाषेला इतिहासाची भाषा समजण्याची संवय लागल्यानें सदा एब्राहामच्या मांडीवर डोकें ठेवून खुशाल विश्रांति घेणें व आपल्या बंधुवर्गाला नरकांत सोसाव्या लागणाऱ्या यातनांचा विचार करीत रहाणें हेंच खरोखर आपलें सौख्याचें ध्येय असें त्यांना वाटूं लागलें. संत आगस्ताइनच्या मताप्रमाणें त्यांचेंही मत होतें कीं, आराध्य देवतेचें सारूप्य प्राप्त होणें हें धर्माचें अंतिम साध्य होय; व ते परमेश्वराचें वर्णन करितांना त्याची स्वनिर्मित प्राणिजातीपैकीं फारच थोड्यांवर कृपा आहे, इतर सर्वांना अति भयंकर चिरकालिक यातना भोगावयाची शिक्षा तो देतो, असें वर्णन करीत.

### असल्या मतांनीं कचित् धार्मिक बेपर्वाई नाहींशी होते खरी.

आतां हें निःसंशय खरें आहे कीं, अशा प्रकारचीं मतें तीव्रपणें प्रचीतीस येत असतात, तेव्हां मानवी जातीची सामान्य स्थिति जी धार्मिक विषयांसंबंधीं बेपर्वाई, ती घालविण्यास तीं मतें अत्यंत समर्थ होतात, त्यांच्या योगानें अतिशय कळकळ, अतिशय स्वार्थत्याग, अतिशय एकहेतु-

## परोपकाराची मदार उदात्त मनोवृत्तींवर असते.

आतां मनुष्याच्या उदात्त मनोवृत्तींवरच जगांत होणाऱ्या पुष्कळशा दयेच्या कृत्यांची व विशेषतः माणुसकीच्या प्रचलित ध्येयाची व मापाची मदार असते, ही गोष्ट हवी तितकी उघड आहे. केवळ कर्तव्याच्या जाणिवीमुळें पुष्कळ परोपकार करणारीं पण मनोवृत्ति पाहिल्या तर अगदीं गंभीरखेदी अशीं माणसें आहेत खास. अशींहीं उदाहरणें आहेत कीं, इकडे प्रत्यक्ष परोपकाराचीं कृत्यें जसजशीं जास्तजास्त घडतात, तसतसें हें मनोवृत्तीचें काठिण्य वाढत जातें. कारण काय कीं, दुःख निवारण्याच्या हेतूनें त्याचा निदिध्यास लागल्यामुळें मनुष्याच्या आंगीं गंभीरखेदित्व येतें; व बिशप बतलर यानें दाखविल्याप्रमाणें "इकडे प्रत्यक्ष परोपकाराचीं कृत्यें करण्याची संवय बळकट होत असतांच तिकडे पुनः पुनः आवृत्ति झाल्यामुळें मनोवृत्तींचें संवेदकत्व सत्त्वहीन होत असतें." पण बहुतेक लोकांवर या बाबतींत मनोवृत्तींचा ताबा असतो. त्यांचीं कृत्यें व ध्येय त्यांच्या मनोवृत्तींच्या चापल्याच्या आधारानें असतात.

## मध्ययुगांतील या मताचा परिणाम काय झाला असेल ?

हे विचार जर बरोबर असतील, तर मध्ययुगांतील धार्मिक मतांच्या निदिध्यासाचा परिणाम काय झाला असेल, त्याची कल्पना करणें सोपें आहे. पेवियाच्या प्रख्यात मठांत मंडोदक चित्र आहे, तें त्या काळच्या मतांचें चिन्हच मानतां येईल. त्या चित्रांत एक वैखानस काढलेला आहे. त्यानें हात जोडले आहेत. त्याच्यापुढें एका दरींत नष्टात्मे यातना भोगीत आहेत असें दाखविलें आहे; व त्यामुळें त्याच्या चेहऱ्यावर आवेगोत्पादक भीति पसरलेली आहे. व त्याच्या मनांत व्यापून राहिलेल्या विव्हळ करणाऱ्या विचाराचें ज्ञान त्या चित्राच्या वरच्या अंगास कोरलेल्या शब्दांनीं होतें. ते शब्द हे:-" किस् सस्तिनेबित् ने दिसेन्दाम् मोरिएन्स् "

## अशा विचारांनीं लोकमनावर होणारा भयंकर परिणाम.

विचाराच्या अशा स्थितींत आपली सहाजिकपणें अशी अटकळ बसेल कीं, मनुष्याच्या यातनांबद्दल साधारण बेपर्वाई अगर रानटी क्रूर कृत्यें करण्याचा ओढासुद्धां उत्पन्न करण्याकडे या मताचा जोरदार व सरळ कल असावा. पण यानें या मताच्या परिणामांची केवळ अपुरी

कल्पना येते. कारण, या भयाण चित्रांचें सतत विस्तरशः वर्णनच करून मनुष्यें राहत नसत; तर तीं आणखी चित्रांच्या योगानें नेहमीं कृतज्ञता व आनंद वाटल्याचें व्यक्त करीत. आपल्या मानवबंधुजनांपैकीं पुष्कळसा भाग चिरकालिक यातना भोगणारच; हें खिस्तीधर्मांतलें रहस्य होय; व खिस्तीधर्म खोटा अशी नुसती भावना सुद्धां भयंकर पाप होय; असा त्यांचा विश्वास असे. आपल्या मताशीं ज्याचा संबंध जुळवतां येण्यासारखा असेल, असें प्रत्येक अलंकारिक वचन त्यांनीं इतक्या परिश्रमानें निवडून काढून संग्रह करून ठेविलें व त्याचा अर्थ इतक्या वीट येण्यासारख्या शब्दशः पद्धतीनें बसविला कीं, आपल्या धर्माचें मध्यवर्ती सत्य म्हणजे जडस्वरूपी चिरंतन अग्नि हेंच होय व जगांतल्या सध्यांच्या अगर या अगोदरच्या कोणत्याही इतर धर्मांत खिस्ती शुभवर्तमानांत वर्णिलेल्या नरकाप्रमाणें विशिष्ट गोष्टींनीं युक्त असा नरक सांगितलेला नाहीं, असें जें एका आंग्लिकन पंथी ( २२ ) धर्मोपदेशकाचें म्हणणें आहे तेंच खरें; असा त्यांनीं आपला पक्का ग्रह करून घेतला होता.

### आराध्यदेवतेचें सारूप्य प्राप्त होणें हें धर्माचें अंतिम साध्य.

दृष्टांताच्या भाषेला इतिहासाची भाषा समजण्याची संवय लागल्यानें सदा एब्राहामच्या मांडीवर डोकें ठेवून खुशाल विश्रांति घेणें व आपल्या बंधुवर्गाला नरकांत सोसाव्या लागणाऱ्या यातनांचा विचार करीत रहाणें हेंच खरोखर आपलें सौख्याचें ध्येय असें त्यांना वाटूं लागलें. संत आगस्ता-इनच्या मताप्रमाणें त्यांचेंही मत होतें कीं, आराध्य देवतेचें सारूप्य प्राप्त होणें हें धर्माचें अंतिम साध्य होय; व ते परमेश्वराचें वर्णन करितांना त्याची स्वनिर्मित प्राणिजातीपैकीं फारच थोड्यांवर कृपा आहे, इतर सर्वांना अति भयंकर चिरकालिक यातना भोगावयाची शिक्षा तो देतो, असें वर्णन करीत.

### असल्या मतांनीं क्वचित् धार्मिक बेपर्वाई नाहींशी होते खरी.

आतां हें निःसंशय खरें आहे कीं, अशा प्रकारचीं मतें तीव्रपणें प्रचीतीस येत असतात, तेव्हां मानवी जातीची सामान्य स्थिति जी धार्मिक विषयांसंबंधीं बेपर्वाई, ती घालविण्यास तीं मतें अत्यंत समर्थ होतात, त्यांच्या योगानें अतिशय कळकळ, अतिशय स्वार्थत्याग, अतिशय एकहेतु-

निष्ठता उत्पन्न होते. कळकळीचीं बीजें कशांत आहेत, याविषयींचा मोठ्या चतुराईनें ज्यानें अभ्यास केला होता, त्या लायोलानें आपल्या धार्मिक अभ्यासक्रमांत एक दिवस चिरकालिक विनाशाचा विचार करण्याकरितां नेमून ठेविला होता. व या मताला पुष्कळ मोठाल्या धार्मिक पुनरुज्जीवनांत प्रमुख जागा मिळाली आहे. या मताच्या तीव्र प्रचीतीमुळें असा परिणाम झाला कीं, कांहीं थोडीं तरी वाखाणण्यासारखीं धर्मप्रचारकांचीं उदाहरणें तयार झालीं व त्यांनीं आपलें धर्मप्रचाराचें काम इतक्या शौर्यानें व निःस्पृह कळकळीनें केलें कीं, त्यांचीं चरित्रें म्हणजे एकंदर चरित्रसंग्रहांत अत्यंत उदात्त झालीं आहेत. ही गोष्ट निःसंशय खरी.

## परंतु बहुजनसमाजावर उलट परिणाम होतो.

परंतु थोड्याशा विलक्षण उदारचरित व्यक्तींवर जरी हा परिणाम झाला असला, तरी बहुतेक सर्व लोकांवर त्या मताच्या परिणामाचा कल मानवी स्वभाव निर्द्रव करण्याकडे, माणुसकीला रसातळीं पोंचविणारें परदुःखाविषयीं निःसंवेदकत्व व गंभीरवेदित्व सर्वत्र पसरण्याकडे असतो. मनुष्यांच्या विचाराचा व कल्पकतेचा नेहमींचा विषय जर असंख्य जनसमूहाच्या घोर व तपशिलवार वर्णिलेल्या यातना हाच करून दिला, तर त्या जनसमूहांपैकीं, बहुतेकांच्या मनांत हळूहळू मानवी दुःखाविषयीं बेपर्वाई जरूर उपजेल व कांहींच्या मनाला तर त्या यातना म्हणजे खरोखर आनंद देणाऱ्याच वाटूं लागतील. आणखी जर या यातना म्हणजे आविर्भवनापैकींच एक भाग आहे व आविर्भवन तर शुभवर्तमानाचा निरोप मानणें जरूर आहे, अशी मनुष्यांची खात्री होईल, तर आपल्या मनांतील दयेचा प्रत्येक अंकुर चुरडून टाकावयाला व गंभीरवेदित्व हा सद्गुण म्हणून तो पोसावयाला त्यांचें मन तयार होईल.

## स्वधर्मबाह्यांचा छळ करण्याची प्रवृत्ति होते.

आणखी शेवटीं जर त्यांना असें वाटूं लागेल कीं, ज्याचें चरित आपल्या पुढें ध्येय म्हणून घ्यावयाचें, तो परमात्मा एकाच धर्मसंस्थेंतल्या लोकांवर प्रेम करतो; त्या धर्माच्या बाहेर असणाऱ्या सर्वांस तो चिरकाल यातना भोगावयास लावील; व त्याचीं लेंकरें शुद्ध सुखाच्या स्थितींत राहून त्या यातनांचें नेहमीं चिंतन करित राहतील; तर त्या धर्मसंस्थेच्या बाहेर

असणाऱ्या सर्वांचा ज्या ज्या प्रकारचा म्हणून छळ करितां येईल, तो तो करावयाला मार्ग तयार होईल.

## भूतदयावंताची स्थिति काय होईल.

ज्याला या मताची प्रचीती मिळाली, तो मानवी जातींत एक तर अत्यंत दुःखी प्राणी असावा, नाहींतर अत्यंत पाषाणहृदयी असावा. जो आपल्या हृदयांतील भूतदयेच्या प्रेरणेला मान देतो, अशा कोणत्याही भूतदयावंत माणसाला त्याच्या स्वतःच्या वैयक्तिक सुखाची केवढी जरी आशा असली तरी तिच्यामुळें आपल्या धर्माच्या बाहेर असणाऱ्यांच्या कपाळीं चिरकालिक अग्नींत जळत राहण्याच्या यातना भोगावयाच्या आहेत; हा विचार त्याला सहन व्हावयाचा नाहीं. अशा यातना भोगाव्या लागण्यापेक्षां आपण व इतर सर्व जग यांना एकदम काळझोंप लागून सर्वांचा नाश व्हावा अशी इच्छा कोणत्याही खऱ्याखऱ्या भूतदयाशील माणसाला झाल्यावांचून राहावयाची नाहीं. या मताची तीव्र प्रचीती आली असतां व त्यावर सर्वतोपरी श्रद्धा बसली असतां दोन परिणामांतून एक अवश्य झाला पाहिजे. त्यायोगें तीव्र भूतदया उत्पन्न होऊन मनाला एकसारखी तळमळ लागून राहील व मनुष्याच्या हातून परहितार्थ शौर्याचीं कामें होतील; अथवा अभेद्य निःसंवेदकत्व उत्पन्न होऊन पाखंड्यांचा छळ करण्याची त्याला प्रत्यक्ष बुद्धि उत्पन्न होईल. मानवी स्वभावाचें फारसें ज्ञान नसतांही कळेल कीं, क्झेविअरच्या बाण्यापेक्षां तार्किमेदाच्या बाण्याचीं उदाहरणें साधारणतः पुष्कळ आढळावयाचीं.

## तार्किमेदासारखींच माणसें फार झालीं.

( क० १८ ) हीच गोष्ट खरोखर घडली हें ख्रिस्ती धर्माच्या इतिहासाकडे मुद्दाम डोळेझांक न करितां जो पाहील त्याला उघड दिसेल. ज्या लेखकानें दुसऱ्या शतकांत अग्नीनें चिरकाळ शिक्षा देण्याचें मत लोकांना दहशत बसविण्याचें एक साधन आहे, असें फार जोरानें पाल्हाळिक विवेचन केलें आहे, त्याचा उल्लेख केलाच आहे. त्या लेखकानें दुसऱ्या एका आपल्या ग्रंथांत आपल्या स्वतःच्या शीलावर त्या मताचा काय परिणाम झाला हें फार स्पष्टपणें दाखविलें आहे. स्वकालीन ख्रिस्तीधर्मी लोकांस सार्वजनिक प्रेक्ष्यांपासून परावृत्त करण्यास त्यानें एक पुस्तक

लिहिलें होतें. त्या विषयावर त्यानें पुष्कळ वादप्रमाणें गोळा केलीं होतीं; पैकीं कांहीं फार जोरदार होतीं व कांहीं अतिशय विलक्षण होतीं; तथापि बहुतेक वाचकांना आपला उपदेश जोरदार वाटण्यास त्यांच्या मनाला उलट प्रकारचा कांहीं तरी ओढा लाविला पाहिजे, असें त्याच्या लक्षांत आलें.

## एक प्रेक्ष्य.

त्यामुळें त्यांना पाहवयास मिळण्यासारखें एक प्रेक्ष्य आहे म्हणून तो सांगूं लागला. हें प्रेक्ष्य इतकें मोहक व आकर्षक आहे कीं, त्याच्याशीं लावून पाहतां इहलोकींचे अत्यानंदाचे उत्सवही निरर्थक वाटतील. या आपल्या मनाच्या ओढ्याच्या विषयावर लिहीत असतां, त्याची भाषा फारच खुलली व विशेष जोरदार झाली. सदर्हु प्रेक्ष्य म्हणजे स्वबांधव नरकयातना भोगतांना कसे विव्हळत असतात तें पाहणें. या लेखकाचे उद्गार असे आहेत:—"त्या प्रेक्ष्याचा महिमा काय सांगावा ? जेव्हां ज्यांनीं स्वर्गारोहण केलें असें सांगतात असे पुष्कळ प्रख्यात राजे आपल्या ज्युपितर देवाबरोबर रसातळीं नरकांधकारांत कण्हत असतांना पाहीन तेव्हां मला केवढा हर्ष होईल, केवढें आश्चर्य वाटेल, किती हसें लोटेल, किती धन्यता वाटेल ! तेव्हां ख्रिस्ताच्या नांवाचा छळ मांडणारे शिपाई त्यांनीं स्वत: संतांना जाळण्यासाठीं पेटविलेल्या अग्नीपेक्षांही तीव्र जाचक अग्नींत माझ्या दृष्टीसमोर जळत असतील. × × × × × × × × कारुण्योत्पादक नटांनीं नाटकगृहें जशा दीन स्वरांनीं दुमदुमविलीं असतील, त्याहूनही जास्त करुणवाणीनें आपल्या दुःखावेगांत त्यावेळीं ते आरोळ्या ठोकतील; व हास्योत्पादक नटांचीं अंगें जेव्हां त्या अग्निदाहानें जास्त लवचिक होतील, तेव्हां त्यांच्या आंगांतील हास्योत्पादक गुण विशेष खुलून दिसतील; त्यावेळीं पशुक्रीडेंतील रंगपती आपल्या ज्वलद्रथांत बसून लालबुंद झालेला दिसेल; मल्लांना भाल्यांच्या ऐवजीं अग्निशरांच्या जखमा होतील. × × × × या असल्या प्रेक्ष्यांशीं तोलून पहातां, या असल्या विजयानंददायी विषयांशीं ताडून पहातां, राजपुरुष अगर लोकनायक, धर्माध्यक्ष अगर धर्माचार्य आणखी काय देऊं शकणार ! आणि सध्यांही ते देखावे श्रद्धेमुळें अगदीं आपल्या जवळ आणतां येण्यासारखे आहेत. कल्पकतेमुळें तें सध्या घडत आहेत असे दिसूं शकतात." ( २३ )

## हा उतारा येथें घेण्याचें कारण.

(क० १९). हाच फार हृदयद्रावक उतारा येथें घेतला आहे, त्यांतला हेतु मूळच्याच विकृत स्वभावांत छळामुळें तिरसटपणा येऊन काय आतिक्रम होतो, त्याचें उदाहरण दाखविण्याचा फारसा नाहीं. तर कांहीं एक प्रकारच्या आत्मप्रत्ययांचा मनोवृत्तींवर होणारा जो परिणाम त्याचें ठसण्यासारखें उदाहरण या उताऱ्यांत आहे, म्हणून तो घेतला आहे. कारण ज्याला युरोपचा मानस-शास्त्राचा इतिहास म्हणतां येईल, त्याचें अवलोकन करीत असतां सतत आपणांस एक असंबद्ध प्रकार दिसतो व त्याचा उलगडा केवळ असल्या विचारांनींच करितां येतो.

## ख्रिस्ती धर्माचें विरुद.

ख्रिस्ती धर्म हा भूतदयावान् धर्म व्हावा अशी योजना होती हें सर्व पक्षांस कबूल आहे. व त्या धर्माचे जे खरे अभिमानी त्यांचें प्रीती हें विशिष्ट चिन्ह किंवा बिरुद मानलें जात असे. खरें पाहिलें तर जगावर अजूनपर्यंत प्रभाव गाजविलेल्या कोणत्याही गोष्टींहून ख्रिस्ती धर्मानेंच बहुधा मानवी मनोवृत्ती अधिक उत्तेजित केल्या आहेत, दीनबंधुत्व जास्त वाढविलें आहे, शुद्ध व कृपामय ध्येय उत्पन्न केलें आहे.

## धर्माधिकाऱ्यांचें धोरण.

तथापि इतिहासाचें सार ज्यांनीं खरोखर ग्रहण केलें आहे त्यांनीं या बाबतींतील ख्रिस्ती धर्माचा विलक्षण प्रभाव कबूल केला असतांही; व प्रत्येक देशांतील व प्रत्येक पंथांतील धार्मिक लोकांच्या मनाला ख्रिस्ती धर्म-संस्थापक म्हणजे पावित्र्याची तशीच दयेची मूर्ति-पावित्र्याचें तसेंच दयेचें मनोगम्य उच्चतम ध्येय-होय ही गोष्ट पटली असतांही; असें म्हटलें पाहिजे कीं ख्रिस्ती धर्मोपाध्यायांनीं निदान आपल्या मतांहून भिन्न मतें धारण करणाऱ्यांसंबंधानें तरी, ज्याला क्वचित्च जोड आढळेल व ज्यावर ताण तर कदाचित् कधींच होणार नाहीं असें, मानवी उच्च मनोवृत्तींचा गंध नसलेलें व संवेदना-शून्य, धोरण पुष्कळ शतकेंपावेतों चालू ठेविलें होतें; ही गोष्ट तितकीच निर्विवाद खरी आहे. रागीट धर्मज्ञ पंडितांइतके रानटी पशूही भयंकर व उग्र नाहींत, असें म्हणणाऱ्या ज्युलियनपासून तों

तहत वैखानसांची अमानुष वृत्ति म्हणजे मानसशास्त्रांतील एक विलक्षण घटना असें समजून तिचें विवेचन करणाऱ्या मान्तेस्क्यू-पर्यंत सतत सर्वांना वरील तथ्य पटलेलें आहे.

## या धोरणाचें वर्णन.

वैखानस, पाखंडशोधक न्यायाधीश व सामान्यपणें माध्ययौगिक धर्मोपदेशक या सर्वांचा एकच नमुना दिसतो व तो विलक्षण स्पष्ट रेखांकित व पुष्कळ बाबतींत अतिशय उदात्त दिसतो; तरी केवळ प्रकृतिसिद्ध मनोवृत्तींचा त्यांत संपूर्ण अभाव नेहमीं प्रत्ययास येतो. कळकळ, धैर्य, सततोद्यम, स्वार्थत्याग या गुणांत साधारण मनुष्यांहून ते अत्यंत उंच पायरीवर उभे असत. परंतु दुःखें सोसण्यास जसे ते तत्पर, तसे लोकांस दुःख देण्यास ते नेहमीं एका पायावर उभे असत. संत बार्थालेम्यू व अल्बिजेन्सिस ( याज्ञिकी-विरोधी लोक ) यांचा संहार झाल्यावर 'ते दियम' स्तोत्र म्हणणारे हेच; शूलसंगर व धर्मसंग्राम प्रज्वलित करणारे हेच; रक्तस्रावानें आनंदणारे व कलह लांबविणारे हेच; तसेंच वीरांचा आवेश शिथिल होऊं लागतांच श्रद्धाशैथिल्याबद्दल विव्हळणारे हेच; व स्वतः कारणभूत होऊन दुसऱ्यास भोगूं लावलेल्या दुःखांच्या चिंतनानें जितकें निःस्वार्थ तितकेंच निरुपम समाधान मानणारे हेच; ज्या भयंकर व बारीक सारीक गोष्टींतल्याही धर्मच्छळानें युरोपांतील बहुधा प्रत्येक प्रांतास यहुदी व पाखंडी लोकांच्या रक्ताचें स्नान मिळालें आहे; व ज्यामुळें मानवी इतिहासांत अद्वितीय होऊन बसलेलीं पुष्कळ, करुणाविहीन, पाषाणहृदयी, जाणून बुजून व विचारपूर्वक केलेलीं क्रूरपणाचीं कृत्यें घडलीं आहेत, तो हस्तें परहस्तें करणारे व लोकांस करण्यास चिथविणारे हेच (२४).

## अशा स्थितींत असल्या प्रवृत्तीला असणारीं पूर्वकारणें.

आतां अत्यंत बळकट कर्तव्यबुद्धीनें निःसंशय प्रेरित झालेल्या लोकांत जव्हां अशा प्रकारची प्रवृत्ति निरंतर दिसते, तेव्हां त्यांना मान्य असलेल्या एखाद्या तत्त्वाशीं अगर त्यांच्या सभोंवतालच्या नैतिक वातावरणाशीं त्या प्रवृत्तीचा संबंध असावा, असें धरून चालतां येईल. त्या प्रवृत्तीला बौद्धिक अगर तर्कसंमत व मनोवृत्तिमयही पूर्वकारण असलें पाहिजे. पैकीं पहिलें

म्हणजे छळ करणें आपलें कर्तव्य आहे अशी श्रद्धा उत्पन्न करणारीं कांहीं तत्त्वें अगर विचार-परंपरा; व दुसरें म्हणजे छळाशीं मिलाफ बाळगणारी, तद्विषयक स्वाभाविक निवृत्ति घालवून छळ करावा असा निर्णय देणारी कोणतीहि विचारसरणी मनुष्यांस मान्य करण्यास लावणारी मनोवृत्तीची प्रणवणता, अगर प्रकृति.

## मनोवृत्तिमय कारण.

तर्कसंमत पूर्वकारणांचें विवेचन पुढच्या प्रकरणांत येईल. मनोवृत्ति-प्रेरित अत्यंत महत्त्वाचें पूर्वकारण हें परलोकाविषयींच्या धार्मिक कल्पनेंत आढळावें असें वाटतें. धर्मांच्या या परलोककल्पनेचा साहजिक परिणाम असा झाला कीं, ज्या माणसांचीं चरित्रें बव्हंशीं अत्यंत उदात्त सद्गुणांचीं निदर्शनें आहेत, तींच माणसें क्रौर्याचे पुतळे म्हणून दीर्घकाळ विख्यात होतीं व स्वमतांहून भिन्न मतें धारण करणाऱ्या सर्व लोकांस भोगाव्या लागणाऱ्या यातनांविषयीं साफ बेफिकिर होतीं.

## छळाचें प्रतिबिंब एकंदर दण्डनपद्धतींत आढळतें.

(क्र० २०). हा अमानुषपणा जे पाखंडी असत, त्यांच्याच पुरता करीत असें नाहीं; त्याचें प्रतिबिंब तत्कालीन दंडनपद्धतींत सर्वत्र पडलें होतें. हाल करण्याच्या रीतींचा इतिहास पहिला तर या गोष्टींचा ठळक दाखला सांपडतो. प्राचीन ग्रीक देशांत राजद्रोहाच्या खटल्यांशिवाय इतरत्र हाल कधींही करीत नसत. प्राचीन रोमच्या भरभराटीच्या दिवसांत लोकांची अमानुषपणाबद्दल ख्याति असतांही हाल वगैरे गोष्टी गुलामां-संबंधानेंच केवळ होत.

## माध्ययौगिक ख्रिस्ती धर्मांत छळ सार्वत्रिक होता.

माध्ययौगिक ख्रिस्ती धर्मांतर्गत प्रदेशांत पूर्वींच्या काळीं बहुधा तोंड मिळणार नाहीं इतका हा प्रघात पसरला होता व धर्मोपदेशकांच्या अमलांतल्या खटल्यांत कोणत्याही दर्जाच्या लोकांस हाल सोसावे लागत (२५). माध्ययौगिक हाल करण्याच्या पद्धतीचा विचार करीत असतां जी फार ठळकपणें नजरेस येते ती गोष्ट म्हणजे ह्यांतला राक्षसी व अति-शयोक्ति होण्यास अशक्य असा क्रूरपणा ही कांहीं नव्हे, तर तिच्याहून

त्यांत दिसणारी विलक्षण विविधता व कारागिराची म्हणतां येईल अशी कुशलता ही होय.

### यातना देण्याच्या पद्धतींवरून कल्पकाचें नैपुण्य दिसतें.

माध्ययौगिक यातनादानपद्धतीवरून लोकांच्या विचारांची तत्कालीन दशा अशी दिसते कीं, यातनेच्या सर्व स्वरूपांचें नीट पुष्कळ वेळ लोकांनीं मनन केलें होतें; निरनिराळ्या यातनाप्रकारांची परस्पर तुलना करून त्यांची अशी कांहीं जुळणी केली होती कीं, तेणेंकरून आपल्या कलेंत ते अगदीं निष्णात झाले होते; अत्यंत तीव्र कल्पकतेची सर्व शक्ति तदर्थ त्यांनीं खर्ची घातली होती; व एखाद्या जालिम मनोविकाराच्या आवेशानें त्या विषयाची त्यांनीं पाठ पुरविली होती. या पद्धतीचा परिपोष माध्ययौगिक विचारौघाच्या पाखरेखालीं झाला. पाखंड न्यायाधिशांनीं तिचा अंगीकार केला, व त्यांच्या थोर कल्पकतेनें तिला शेवटचा सफाईचा हात मिळाला ( २६ ).

### छळ सर्वत्र होई. इंग्लंदांत मात्र तो बेकायदेशीर मानीत.

प्रत्येक तुरुंगांत शूळ व दांताळें हीं जवळ जवळ ठेविलेलीं असत; व बहुतेक प्रत्येक देशांत यातनाप्रवृत्तीचा सरते शेवटीं जो नायनाट झाला, तो धर्मसंस्थेनें निंद्य ठरविलेल्या अभिशप्त लोकांच्या चळवळीमुळें झाला व धर्मसंस्थेनें त्याला जबरदस्त विरोध केला. हें खरें कीं, इंग्लंदांत छळ जरी वारंवार व विशेषेंकरून धर्मसंबंधीं खटल्यांत होत असे, तथापि तो बेकायदेशीर मानला जात असे ( २७ ); पण बहुतेक देशांत वर वर्णिलेलीच स्थिति असे.

### निरनिराळ्या देशांतील छळाला विरोध.

( क॰ २१ ). फ्रान्सांत छळाला विरोध करणारा पहिला प्रख्यात शत्रु म्हणजे मान्तेग हा होय. हाच पहिला फ्रेंच संधिग्धमति माणूस होय. याच्या पाठीमागून लवकरच शारन व बेल यांनीं तें विरोधाचें काम उचललें; याच्यानंतर वाल्तेर, मान्तेस्कू व विश्वकोशसंपादक यांनीं तें काम अंगीकारलें व शेवटीं जेव्हां राज्यक्रांतीमुळें धर्मसंस्था विशीर्ण झाली, तेव्हां या कामाचा जय झाला ( २८ ). स्पेनांत सरकार व धर्मसंस्था यांमध्यें थेट विरोध ( २९ ) येण्याचे जे थोडे प्रसंग आले त्यांतून एका प्रसंगीं तिसऱ्या चार्लसच्या कारकीर्दींत छळाचा उपयोग होत

नाहींसा होण्यास आरंभ झाला. इतालींत हेलवेशियस व हालब्याक यांचा मित्र व रूसोचीं तत्त्वें प्रकाशित करण्याचें कंकण बांधलेला जो बेक्यारिया (३०) तो छळाचा प्रख्यात शत्रु होता. बेक्यारियाच्या ग्रंथाचें भाषांतर मोरेलेतनें केलें; वाल्तेर व दिदरो यांनीं त्यावर टीका लिहिली व फ्रेंच तत्त्वज्ञांचें सगळ्यांचें त्याला पाठबळ होतें. यामुळें त्या ग्रंथाचा सर्व युरोपभर जयजयकार झाला; व आपल्या जन्मदात्र्या चळवळीचा त्या ग्रंथानें जोरानें फैलाव केला. या चळवळीच्या प्रभावानें रशियाच्या बादशाहिणीनें आपल्या मुलखांत छळ बंद केला; व या बंदीच्या हुकमाबरोबरच परम सहिष्णुत्वासंबंधीं एक आज्ञापत्र प्रसिद्ध केलें. तत्त्वज्ञानमताला चिकटून राहण्याच्या अतिरेकाबद्दल प्रख्यात जो प्रशियाचा फ्रेदारिक त्यानेंही याच चळवळीच्या छापेनें छळाची बंदी केली; व लवकरच त्याचें अनुकरण तस्कनीचा ड्यूक लिओपोल्द यानें केलें; विचार केला असतां यांत अचंबा वाटावयासारखें कांहीं नाहीं.

### छळाचा नायनाट करण्याची चळवळ वृत्तिविशिष्ट होती.

छळाचा नायनाट करणारी चळवळ जितकी मनोवृत्तिविशिष्ट होती, तितकी बुद्धिविशिष्ट नव्हती. त्या चळवळीवरून सहानुभूतीची तीक्ष्णता वाढलेली जितकी दिसली, तितकी विवेकिता वाढलेली दिसली नाहीं. या विषयीं खास प्रमाणें कोणतीं पुढें मांडितां येतील असें जर विचारलें, तर मध्य युगांतल्या (३१) वाटेल त्या काळीं सर्व दर्जाच्या लोकांस पूर्णपणें परिचित नव्हतें असें एकही प्रमाण सांगणें मुष्कील होतें. कधीं कधीं कशाचीही क्षिती न करणारे अपराधी सुटून जातात व भित्रे लोक आपल्यावरचा आळ उगाच कबूल करितात; निरपराध मनुष्याला पुष्कळदां भयंकर शिक्षा भोगावी लागते व न्यायासनाच्या निकालांचें नैतिक सामर्थ्य अतिशय (३२) कमी होतें, यावर असल्या प्रमाणांची सत्यता सध्यांइतकीच अकराव्या व बाराव्या शतकांत स्वतःसिद्ध होती; आणि हा पालट जो घडून आला तो कांहीं असल्या उपायांनीं नव्हे.

### छळ बंद होण्याचें कारण, मानवी सुधारणेची प्रगति.

छळ बंद होण्याचें कारण असें कीं, मानवी सुधारणेच्या प्रगतीनें लोकांची सहानुभूति जास्त विस्तृत झाली, परदुःखसंवेदन जास्त तीव्र

झालें, दोषादोषपरीक्षण जास्त कारुणिक झालें व वागणूक जास्त सौम्य झाली. अपराधी झाला म्हणून काय झालें ? त्याला दांताळ्याच्या भयंकर वेदना भोगावयास लावणें म्हणजे क्रूरपणा, रानटीपणा, असें वाटूं लागलें; व म्हणून दांताळ्याचा नायनाट झाला; रानटी करमणुकीचे प्रकार बंद झाले, सर्व दर्जांच्या लोकांच्या स्वाभावांतला कडवेपणा सौम्य झाला, त्यांच्या रीतीभाती संस्कृत झाल्या, हें या मोठ्या चळवळीचेंच एक अंग होय. आतां हें अगदीं खास कीं, ज्यांना चिरकालिक यातना म्हणजे लेंकराच्या चिरडखोरपणाला अगदीं योग्य शिक्षा असें वाटे, त्यांना त्यांच्याहून कमी पुराणप्रिय अशा त्यांच्या बंधूंना छळाचा जशा प्रकारचा व जितक्या अंशानें तिटकारा येई, तितक्या अंशानें व तशा प्रकारचा तिटकारा न वाटण्याचा संभव होता; तसें हें पण अगदीं खास कीं, ज्याकाळीं धर्मानें विनष्ट पापात्म्यांच्या यातनांचा व धर्मवीरांच्या दंतकथांचा एकसारखा खल करून, मानवी कल्पकतेला यातनांचे नवे नवे भयंकर प्रकार एकत्र जुळविण्याच्या कामीं नित्य गर्क ठेविलें, तो काळ म्हणजे ज्यांत छळाची पद्धत अत्यंत क्रूरपणाची असण्याचा संभव तोच होय; इतर कोणताही नव्हे.

## छळ व मरणोत्तर दंडाचें मत यांचा उद्भव, उत्कर्ष व ऱ्हास समकालीन होय.

असेंही आणखी म्हणतां येईल कीं, लोकांनीं छळाच्या चालीवर तुटून पडण्याला जी त्यांची मनःस्थिति कारण झाली, त्याच मनःस्थितीनें मरणोत्तर दंडाविषयींच्या माध्ययौगिक मतावरही त्यांनीं हल्ला केला. त्या दोन्ही गोष्टी समाजाच्या एकाच स्थितींतून उद्भवल्या; त्या समकाळीं वाढल्या व भरभराटीस चढल्या व त्यांचा ऱ्हासही समकाळींच झाला.

## दंडपद्धतीच्या रचनेंतलें धोरण.

( क० २२ ). खरी गोष्ट अशी आहे कीं, प्रत्येक काळीं अपराधदंडनाची पद्धत पुष्कळ अंशीं अपराधाच्या महत्त्वाविषयींच्या लोकमताच्या धोरणानें बदलावयाची. कायद्यानें दिल्या जाणाऱ्या शिक्षांचें स्वरूप निव्वळ प्रतिबंधक असतें, अशाबद्दल तत्त्वज्ञांनीं पुष्कळ लिहिलेलें आहे. तथापि केवळ याच धोरणानें दंडपद्धति रचणें साफ अशक्य होय; हें समजण्यास

इतिहासाचा अगर मानवी प्रकृतीचाही केवळ अल्प परिचय पुरे आहे. नीतिदृष्ट्या जें जें गर्ह्य, तें तें सर्व वर्तन शासननियम करणाऱ्याच्या प्रांतांत सांपडत नाहीं व ही गोष्ट मानवी सुधारणेची जसजशी वाढ होते (३३), तशतशी जास्त पूर्णपणें लोकांना मानवते; हें अगदीं खरें आहे. हेंपण खरें आहे कीं, मानवी सुधारणेच्या प्राथमिक काळीं परपीडनाविषयीं कोणाला क्षिती वाटत नसल्यामुळें बहुतांशीं अपराधाबद्दल त्याकाळीं कडक शिक्षा देण्यांत येतात. आणखी हें सुद्धां खरें आहे कीं, कोणत्याही एका विशिष्ट अपराधाच्या महत्त्वामुळें अगर संकटावहकतेमुळें, कांहीं काळपर्यंत तशा अपराधाबद्दल द्यावयाची शिक्षा इतकी कडक असावी असें लोकांस वाटेल कीं, तो कडकपणा अपराधाच्या नैतिक महत्त्वाच्या मानानें बेसुमार असेल.

### दंडनपद्धतीचें कार्यक्षमत्व.

तथापि दंडनाच्या पद्धतींचें परीक्षण करूं गेलें असतां त्या पद्धती अपराधाच्या लोकमतानें ठरलेल्या महत्त्वाशीं एकंदरींत जेव्हां जुळत्या असतात, तेव्हांच त्या बराच काळपर्यंत कार्यक्षम असूं शकतात, नाहींतर नाहीं; ही गोष्ट लक्षांत आल्यावांचून राहणें अशक्य वाटतें. ही गोष्ट प्रत्येक दंडपद्धतींतून ध्वनित होते. कारण, प्रत्येक दंडपद्धतींत अपराध हलका करणाऱ्या गोष्टींचा व शिक्षेच्या अंशानुक्रमाचा समावेश असतो, व लोक जो दोषादोषनिर्णय करितात, तो वस्तुतः ध्येयाकडे लक्ष ठेवून केलेला असतो. जेव्हां एकाद्या अपराध्याला दिलेली शिक्षा कडक झाली असा लोकवाद असतो, तेव्हां त्याचा अर्थ असा कीं, वाजवीपेक्षां ती जास्त झाली; जेव्हां शिक्षा सौम्य झाली असा लोकाभिप्राय असतो, तेव्हां त्याचा अर्थ असा कीं, वाजवीहून ती कमी झाली; कायदा म्हणजे केवळ अपराधप्रतिबंधक उपाय असें मानिलें, तरीसुद्धां अपराधाच्या महत्त्वाबद्दल लोकांच्या नित्याच्या अंदाजाचें त्यांत प्रतिबिंब असलें पाहिजे; कारण, नाहींतर कायद्याच्या अम्मलबजावणीला जरूर जें लोकमत त्याशीं त्या कायद्याची टक्कर होईल.

### वरचें तत्त्व समजण्यासाठीं उदाहरण.

उदाहरणार्थ, गेल्या शतकाच्या अखेरीस खुनाबद्दल व घोडा चोरल्याबद्दल देहान्तशासनाची शिक्षा ठरविलेली होती. खुनाच्या खटल्यांत पंच

ताबडतोब निर्णय देत; लोकमताला तो निर्णय मानवे; व कायदा कार्यक्षम राही. घोडा चोरल्याच्या खटल्यांत अपराधी बहुतकरून नेहमीं सुटून जाई; पण अपराध्याला जेव्हां देहान्तशासन होई, तेव्हां लोकमत संक्षुब्ध व असंतुष्ट होई. याचें कारण असें कीं, खुनाच्या अपराधाच्या मानानें देहान्तशासन अयोग्य नाहीं असें लोकांना वाटे; पण तेंच चोरीच्या मानानें अत्यंत अयोग्य वाटे. मानवसुधारणेच्या वृद्धीबरोबर अपराधदंडनाच्या पद्धतींतील कडकपणा कमी करण्याकडे सतत प्रवृत्ति दिसून येते. कारण, दुसऱ्याला दिलेल्या पीडेच्या यातनांची यथार्थ कल्पना लोकांना जास्त तीव्रतेनें करतां येऊं लागते; व तसेंच अपराध हलका वाटण्यास कारणीभूत होणाऱ्या गोष्टींचा त्यांना जास्त उमज पडूं लागतो. तथापि, अपराधाच्या योग्य मोबदल्यासंबंधीं आतां वर सांगितलेल्या मतावर जेव्हां लोकांचा विश्वास बसतो व त्याची यथार्थ कल्पना त्यांच्या मनांत येते, तेव्हां त्याचा परिणाम प्रगतीवर अवश्य होऊन तिची पिछेहाट होणें अनिवार्य असतें.

## अलीकडचा मरणोत्तर दंडाबद्दलचा धर्मोपदेश पूर्वींहून सौम्य झाला.

तेव्हां मरणोत्तर दंडाबद्दल मध्ययुगांत, सोळाव्या शतकांत व सतराव्या शतकाच्या बऱ्याच भागांत जो लोकांना सर्वत्र धर्मोपदेश होई, त्याचे साहजिक परिणाम असेच झाले. तो धर्मोपदेश कसा साफ मागें पडला हें जो कोणी जुन्या धर्मशानाच्या वाङ्मयाची अर्वाचीन धर्मोपदेशाशीं तुलना करून पहाण्याचे श्रम घेईल त्याला सहज कळेल. एकाकाळीं अनंत यातनांचीं व जडस्वरूप अग्नीचीं जीं अक्राळ विक्राळ चित्रें मोठ्या काळजीनें विस्तरशः रेखीत व नेहमीं मनावर बिंबवीत त्यांच्या ऐवजीं ‘ दुर्गति ’ संबंधीं चार अस्पष्ट वाक्यें अगर ऐहिक जीवनांतील विषमतेचें निरसन होण्यासारखी मरणोत्तर व्यवस्था होईल, असें सामान्य विधान काय तें बाकी राहिलें आहे; व अशा रीतीनें नैतिक व मानसिक शक्तींतून उद्भवणारें व प्रत्येक खऱ्याखऱ्या नीतिविशिष्ट धर्माचें अंग असणारें मत नीतिदृष्ट्या एक अत्यंत घोर संकट वाटणाऱ्या मतांऐवजीं गाजावाजा न करतां आणून बसविलें गेलें आहे.

## मरणोत्तर दण्डाच्या अनंतत्वाचें मण्डन.

मरणोत्तर मिळणाऱ्या शिक्षेच्या अनंतत्वाचें पुष्कळ जोरानें अजून मण्डन करितात; पण या विषयावरील प्रत्येक वादविवादांत मागच्या काळीं जो एक अत्यंत प्रमुख मुद्दा त्या शिक्षेच्या स्वरूपाबद्दल असे, तो आतां तसल्या वादविवादांतून अजीबात गळून गेला आहे. थोर थोर धर्मज्ञानपंडितांना एका काळीं वाटे कीं, आपलें मत मंडनयोग्य आहे; पण तें प्रथमदर्शनींच मनोवृत्तींचा क्षोभ करणार नाहीं, अशा रीतीनें मांडतां येणें बहुधा शक्य नाहीं. लिंब्निझ प्रतिपादी कीं, अनंत परमेश्वराविरुद्ध केलेल्या अपराधांचा दोष अनंत होय व म्हणून त्याबद्दल शिक्षा पण अनंत असणें योग्य होय. बट्लर म्हणे कीं, अपराधांच्या दोषाची जी आपली कल्पना तिच्याशीं त्या अपराधाबद्दलची शिक्षा ताडून पाहतां बेसुमार असते, असा वहीम घेण्यास निसर्गदेवतेच्या शासनपद्धतीचें साम्य लक्षांत आणतां कारण सांपडतें. या दोघांनीं केलेल्या मंडनावरून ध्वनित होतें कीं, हें मत म्हणजे एक घोर संकटच होतें. तथापि सध्यां तें मत साधारणपणें जसें मांडलें जातें, तसें पाहिलें तर तें संकट वाटण्याचें दूरच राहो; पण ज्या संस्थेंत तें मत नाहीं, ती संस्था उघडपणें अपूर्ण होय असें वाटेल. यामुळें, तें पुष्कळ दिवसांपासून ख्रिस्ती धर्माचें एक नैतिक प्रमाण होऊन बसलें आहे.

## या पालटाचें कारण.

(क० २३ ). लोकमतांत या निमूटपणें व हळू हळू झालेल्या पालटाचें मुख्य कारण निःसंशय असें आहे कीं, सांप्रदायिक उपदेशाच्या आधारास फांटा देऊन स्वतःच्या न्याय्यान्याय्य निर्णायक शक्तीवर भार ठेवून बौद्धिक व नैतिक सत्यें स्थापण्याची मनुष्यांना संवय लागली; या संवयीबरोबर हटवादी धर्मज्ञानाचा ऱ्हास होत गेला; ही संवय प्रथमतः सतराव्या शतकांत स्पष्ट निदर्शनास आली.

## देकार्त हा सत्यान्वेषणाच्या या नव्या संवयीचा जनक.

नैतिक तत्त्वज्ञानाचा मुख्य पुनरुज्जीवनकर्ता जो देकार्त तो अशा रीतीनें सत्यान्वेषण करण्याच्या संवयीचा मुख्य जनक मानतां येईल. कारण अतींद्रिय विषयांत सत्यान्वेषणाची जी पद्धत त्यानें घातली, ती कळत वा न कळत नैतिक विषयांत लवकरच लागू करण्यांत आली. न्याय्यान्याय्यसंबंधीं

योग्य कल्पना शोधतांना धर्मज्ञान पंडितांच्या पुस्तकांचा अभिप्राय पाहण्यापेक्षां लोक स्वतःच्या न्याय्यान्याय्य संवेदक इंद्रियाचा अभिप्राय काय पडतो तें पाहूं लागले. व ह्याच इंद्रियाला अगर शक्तीला लवकरच सरपंच करूं लागले; आणि सर्व धर्मज्ञानाचा त्या शक्तीच्या आज्ञांशीं मेळ बसवूं लागले. त्याच वेळीं प्रापंचिक प्रभावक्षम कारणें पुष्कळ उत्पन्न झाल्यामुळें व नवीन शोध एकावर एक भराभर होऊं लागल्यामुळें, स्वकालच्या अनिवार्य प्रेरणांपुढें मान वांकवणें धर्मज्ञानपंडितांना त्या मानानें सुलभ गेलें.

## देकार्तच्या आणखी एका नव्या कल्पनेचा प्रभाव या चळवळीवर झाला.

पण या कार्यकारणवादात्मक सामान्य चलवळीशिवाय आणखी एक त्याच चळवळीवर अल्प पण सत्य प्रभाव गाजविणारी प्रवृत्ति होती, असें वाटतें, व या प्रवृत्तीचाही संबंध देकार्तच्या नांवाशीं आहे. ही प्रवृत्ति म्हणजे आत्मा निव्वळ चैतन्यमय होय; या कल्पनेची वाढ. तात्त्विक विचारांच्या नाना प्रदेशांवर चैतन्यमय अगर जडमय तत्त्वज्ञानाचे जे निरनिराळे परिणाम घडतात, त्यांची हकीकत वाचणें हें इतिहासाच्या अभ्यासांत अत्यंत मनोरंजक होय.

## आत्म्याचें सूक्ष्मत्व अगर चिन्मयत्व.

प्राचीन लोक, निदान त्यांपैकीं अत्यंत आध्यात्मिकपंथी तरी, आत्मा अत्यंत सूक्ष्म द्रव्याचा अगर देहघटकांहून अगदीं भिन्न द्रव्याचा बनला आहे, असें सामान्यपणें मानतातसें दिसतें; व त्यांच्या मतांप्रमाणें व त्यांच्या पाठीमागून पुष्कळ वर्षें प्रचलित असलेल्या मतांप्रमाणें ही द्रव्याची अत्यंत सूक्ष्मता म्हणजेच अजडत्व होय; कारण, बाह्य पदार्थांहून आत्म्याचें स्वरूप अगदीं भिन्न व तो प्राकृतिक, अविच्छेद्य व जडाच्या उपाधींपासून निर्मुक्त असें मानलें जाई. आत्म्याचें घटकद्रव्य केवळ बौद्धिक होय.

## प्राचीनांचें मत आत्म्याचें अजडत्व मानण्याकडे होतें.

या आत्म्याविषयींच्या अर्वाचीन कल्पनेच्या जवळ जवळ प्लेटोपंथी कांहीं तत्त्वज्ञ आले होते आणि ती त्यांस कदाचित् लाधली होती. तथापि

साधारण मत वर वर्णिल्याप्रमाणेंच होतें असें वाटतें; आत्म्याच्या अमरत्वाचें प्रमाण म्हणून त्याचें स्वरूप भिन्न व अजड असें म्हणतात; तसें मानण्याचा प्राचीनांचा जोराचा आग्रह असे. जर मनोव्यापार हा केवळ जडधर्म असेल, जर विचार हा 'मेंदूचा जड कार्य भाग' असेल, तर देहाच्या नाशाबरोबर व्यक्तीचा नाश व्हावा, हें साहाजिक दिसतें;

## देहपतनानंतरची स्थिति अंतर्यामीं असणारा कोणी तरी सुचवितो.

मरणोत्तर, देह पतनानंतर, कांहीं तरी असें ठिकाण मिळणार आहे कीं, जेथें ऐहिक जीवनांतील विषमता काढून टाकण्यांत येईल व जेथें मृत्यूनें तोडलेली प्रेमशृंखला पुनः सांधली जाईल, असें कोणी तरी मनुष्याच्या अंतर्यामीं सुचवीत असतें खरें; व या सूचकाचा आमच्या नैतिक प्रकृतीशीं इतका निकट संबंध आहे कीं, जडतत्त्वज्ञानाचे भयंकर आघात सोसूनही तो सूचक शिल्लक उरेल.

## मानसशास्त्रांतलें प्रमाण. साक्रेतिस, सिसरो व प्लेतो.

पण ज्या मनांत तर्कसंमत अंग प्रधान असतें, त्यांना मानसशास्त्रांतील प्रमाण नेहमीं अत्यंत समाधानकारक वाटेल. मनुष्यांत देहाहून मुख्यत्वेंकरून भिन्न पण देहाशीं संलग्न व अविच्छेद्य असा कोणी तरी आहे, हीच गोष्ट आपल्या आशेचा एक मुख्य आधार आहे, या विषयावर साक्रेतिसानें आपल्या आयुष्याच्या अखेरच्या थोड्याशा तासांत व सिसरोनें म्हातारपणाच्या छायेंत विवेचन केलेलें आहे. हाच भेद आधारभूत धरून प्लेतोपंथाचें सर्व तत्त्वदर्शन उभारलेलें आहे. त्यांच्या उदात्त कल्पाप्रमाणें मानव ही जडमय जगाची चिन्मय जगाशीं भेट करविणारी स्पर्शरेखा होय.

## आत्म्याची नियति.

आत्म्याच्या पंखांनीं उडून जाऊन देवाशीं संवाद करणें अगर देहाच्या स्थौल्यानें अधोगती पावून पशूंच्या स्थितीप्रत पोंहोंचणें ह्या दोन्हीही गोष्टी मनुष्याच्या ताब्यांतील आहेत. एक स्थिती टाकून दुसरी धारण करणें ही आत्म्याची नियति होय. त्याचें ज्ञान ह्मणजे केवळ स्मृति. त्याच्या भविष्यस्थितीचें अनुमान त्याच्या सद्यःप्रवृत्तीवरून ठरतें व केवळ सद्गुणाच्या कृत्यांकडे ज्याची ओढ असते व ऐहिक मनोविकारांचा व सौख्यांचा ज्याला कंटाळा आहे त्या मनुष्याचा आत्मा जडाच्या पाशांतून शेवटीं

मुक्त होईल व बंधनमुक्त आणि अदृष्टस्वरूप होऊन ज्ञानाच्या पूर्ण परिपाकाच्या स्वादुरसाचें यथेच्छ पान करून पूर्ण सुखानुभव घेत राहील.

### देहात्मबुद्धीचा परिणाम.

( क. २४ ). या देहाच्या सुखसोहळ्यांत निमग्न राहण्यांतच ज्याला मौज वाटत असेल, त्या माणसाचा आत्मा देहपातानंतर पुनः नवा देह धारण करून बंधनांत पडेल व जड यातना सोसण्याची शिक्षा भोगील; अगर मनुष्याच्या चर्मचक्षूंस गोचर होण्यासारखें रूप घेऊन पिशाचयोनींत शिरेल व आपल्या पाठीमागें पृथ्वीतलावर शिल्लक राहिलेल्या माणसांच्या सौख्याचा विघात करण्यास भूतलावर संचार करील ( ३४ ).

### प्लेतो, आंरिस्तातल व पुनः प्लेतो, असा ख्रिस्ती दर्शनांचा अनुक्रम.

( क० २५ ). प्राचीन तत्त्वज्ञानांत अत्यंत आध्यात्मिक जो प्लेतोपंथ त्याचीं मतें अशा प्रकारचीं होतीं. जगांत जेव्हां ख्रिस्ती धर्माचा उदय झाला; तेव्हां त्याचा पहिला कल या कल्पनांना फार अनुकूल होता. कारण दैहिक वासनांतून काढून मनुष्यांना वरच्या पायरीवर नेणें, अतीन्द्रिय ध्येय मनापुढें ठेवणें, व मानवी प्रकृती प्रक्षुब्ध करणारा विरोध जोराचा करणें हे प्रत्येक मोठ्या नैतिक औत्सुक्याचे परिणाम घडतात. म्हणून प्राथमिक व चांगल्या काळांत ख्रिस्ती-धर्मानें मुख्यत्वें प्लेतोच्या तत्त्वज्ञानाचा अंगिकार केला आणि मध्ययुगांत अरिस्तातलला अग्रगण्यत्व मिळालें, असें आपणांला आढळतें; आणखी आपणांस असें दिसतें कीं, धर्मसुधारणेच्या अगोदर जी आध्यात्मिक चळवळ चालली होती, तिच्या बरोबर प्लेतोच्या मतांचा जीर्णोद्धार झाला.

### दोन विरुद्धपरिणामी मतें.

(क० २६). तथापि दोन मतें विरुद्ध कल उत्पन्न करणारीं होतीं. पेगन मत आत्म्याचें जडत्व प्रतिपादी; कारण देह हा सदा नाशवंत आहे, अशी त्यांची श्रद्धा असे; आणि ख्रिस्त्यांपैकीं कांहीं जणांचा हा सिद्धान्त नाकबूल करून त्यावर बसविलेल्या भेदाला फांटा देण्याकडे कल होता. पण विशेषतः अग्नीनें जाळण्याच्या शिक्षेवरचा दृढ विश्वास व त्या मताला लवकरच प्राप्त झालेलें मोठें महत्त्व, ह्या जडवादाच्या आधारभूत गोष्टी झाल्या. आरंभीं धर्मपित्यांमध्यें या विषयावर मतभेद होता. ( ३५ )

एका पक्षांत उत्तमोत्तम व समर्थ लोक होते; यापक्षाचें म्हणणें असें कीं, मनुष्याला अंडज असा आत्मा आहे, पण त्याचा नित्य संबंध सूक्ष्म, लवचीक, पण सुलभसंवेदन व चर्मचक्षुगोचर अशा शरीराशीं असतो. ओरिजेन हा आणखी असें प्रतिपादी कीं, जडसंबंधरहित केवळ चैतन्यरूप फक्त परमेश्वरच असूं शकतो. (३६)

### दुसरें मत तर्तुलियनचें.

दुसऱ्या पंथाचा अग्रणी तर्तुलियन मानतां येईल; या पंथाच्या मतें मनुष्यांत चैतन्यमय असें बिलकूल कांहीं नाहीं; व ज्याला आत्मा ह्मणतात, तो केवळ द्वितीय शरीर होय; या मताला ते देहपतनानंतरच्या शिक्षेचा आधार मुख्यत्वें सांगत (३७), त्यावेळीं दृष्टांत वारंवार होत, असें समजतात. एका स्त्रीनें आत्मा पाहिला होता अशी गोष्ट तर्तुलियन सांगतो. तो आत्मा 'पारदर्शक, स्वच्छ व पूर्ण मनुष्याकृती' दिसत होता असें ती वर्णन करी ( ३८ ). संत आन्तनीनें आमोनचा आत्मा वर स्वर्गीं नेतांना पाहिला. मार्क नांवाच्या लिबियांतल्या साधूचा आत्मा एका वरकांत ( फडक्यांत ) घालून स्वर्गास नेला गेला. देवदूतही वारंवार दर्शन देत व जलप्रलयापूर्वींच्या लोकांच्या मुलींशीं रतिसुख भोगीत, असा सार्वत्रिक विश्वास असे.

### मध्ययुगांत आध्यात्मिक कल्पनांना आधिभौतिकत्व मिळालें.

( क० २७ ) माध्ययौगिक विचारसरणीच्या प्रभावानें प्रत्येक आध्यात्मिक कल्पनेला आधिभौतिक स्वरूप आलें व माध्ययौगिक काळाच्या पूर्वीं व नंतर जी भाषा रूपकात्मक समजली जाई, ती त्या काळीं सामान्येंकरून वास्तविक खरी मानीत. या माध्ययौगिक काळीं लोकांना पटावयाच्या गोष्टी म्हणजे चित्रकर्म, टंककर्म अगर विधिकर्म यांनीं इंद्रियांना ग्रहण होण्याजोग्या गोष्टी होत; व म्हणून प्रत्येक विषयाला इंद्रियग्रहणयोग्य मूर्तस्वरूप प्राप्त झालें ( ३९ ).

### याचीं उदाहरणें.

अन्तिम न्यायदिवशीं देवदूत एका खरोखरीच्या तराजूंत आत्म्यांचें वजन करीत आहे व त्या तराजूंच्या पारड्यांना ओळकंबणारीं पिशाचें समतोल बिघडविण्याचा प्रयत्न करीत आहेत, अशीं चित्रें नेहमीं काढ-

ण्यांत येत. कधीं कधीं प्रेताच्या तोंडांतून बाहेर पडणारें लिंगविहीन मूल चित्रांत काढून आत्मा शरीरांतून कसा जातो तें दाखवीत (४०). परंतु अघमर्षण स्थानाविषयींच्या मताचीं तर सर्वांवर ताण आहे; त्या मतानें कल्पकता थिजून निगाडित होते. नुकत्याच मेलेल्या मनुष्यांचे आत्मे प्रत्यक्ष जड देहाकृतींनीं प्रत्यक्ष जडस्वरूप अग्नींत जळत असल्यामुळें आळेपिळे पडून भयंकर विकट मुखचर्या करीत आहेत, अशा चित्रांची प्रत्येक देवळांत गर्दी असे. दोनही मतें अगदीं बरोबर एकसारखीं व परस्पर पोषक होतीं. ज्यांचा जड आत्म्यावर विश्वास त्यांचा जडस्वरूप शिक्षेवर पण विश्वास बसे, ज्यांचें शिक्षेविषयींचें मत जडस्वरूपी झालें असेल, त्यांचें शिक्षा भोगणाऱ्या विषयींचें मतही जडस्वरूप होईल.

## धर्मसुधारणेच्या जरा अगोदर आत्म्याविषयींची शुद्धतर कल्पना आली.

(क०२८) तथापि धर्म-सुधारणेपूर्वीं कांहीं वेळ थोड्या लोकांच्या आत्म्याविषयीं शुद्धतर कल्पना करण्याच्या इच्छेचीं उघड उघड चिन्हें दिसतात. आवेरोजच्या पंथांतून विराट्-मतवादी लेख बाहेर पडूं लागले व त्यांनीं सृष्टीच्या आत्म्याची जुनी स्तोइक पंथी कल्पना पुनरुज्जीवित करून चित् व जड जगताच्या परस्पर संबंधाच्या महत्त्वाच्या प्रश्नाकडे लोकांचीं मनें लाविलीं. ' पाषाणांत प्रसुप्त, पशुपक्ष्यांदिकांत अर्धनिद्रित, मनुष्यांत पूर्ण जागृत, अवस्था भोगणाऱ्या विश्वव्यापी आत्म्याची कल्पना (४१); सेंद्रिय रचनेचे नानाविध प्रकार उत्पन्न करणारें गूढ चिन्मय तत्त्व ह्मणजे त्या सर्वांत भरून राहिलेल्या परमेश्वरी सत्त्वाचें केवळ प्रस्फुरण होय; ही श्रद्धा, ही कल्पना प्राचीन तात्त्विक विचारांत उच्चस्थान व्यापून राहिली होती; ती पुनरुज्जीवित झाली; व गूढवादाच्या झपाट्याच्या प्रसारानें कदाचित् तीं बळकट झाली, गूढवाद म्हणजे विराट्-मताचें ख्रिस्ती स्वरूप मानतां येईल. ज्ञेय-वादाच्या रेंगाळत राहिलेल्या कांहीं संप्रदायांशीं प्रथमतः ऐक्य करून गूढवाद तेराव्या शतकांत बेगार्डोंच्या पंथांत उत्पन्न झाला व तो विशेषतः दाविद दिदियानन्त, ओर्तलिएब व अमारी दबीन यांच्या उपदेशांत झळकूं लागला; व पुढच्या शतकांत एकार्त, तालर, सुसो व रायस्ब्रोएक यांच्या धुरीणत्वाखालीं जर्मनींत विलक्षण लोकप्रिय झाला. ही लोकप्रियता मिळ-

विण्यास 'कृष्णकुष्ठरोगानें' उतास आलेल्या बळकट धार्मिक प्रवृत्तीनें व पंडितंमन्य पंथाच्या अमर्याद शुष्कतेविरुद्ध सुरू झालेल्या प्रतिगामित्वानें हातभार लाविला ( ४२ ).

## जडांत चैतन्य कसें आलें याचा शोध झाला.

( क० २९ ). एरिओपजाइत ( एरिस-गिरि-मंडळ-सभासद ) दायोनिसीयस याचे म्हणून म्हटलेले जे लेख प्रसिद्ध आहेत व ज्यांना नेहमीं गूढवादाचें पवित्र धर्मशास्त्र म्हणतात व ज्यांच्या कांहीं भागांचें स्कोतस एरिजिनानें भाषांतर केलें होतें; ते व स्वतः स्कोतसचे कांहीं ग्रंथ एकाएकीं लोकप्रिय झाले व बहुतेक सर्व वर्गांच्या धर्मज्ञानविवेचकांना एक नवीनच वळण लागलें. या विचारसरणीचें तत्त्वविवेचक स्वरूप म्हणून एक शोधकलाप तयार झाला. जडांत चैतन्य कसें आलें, निर्जीवांत जीवाचा उद्भव कसा झाला, याविषयीं विलक्षण शोध केल्यावरून तो नजरेस आला.

## यदृच्छोद्भव.

यदृच्छोद्भवाचा सिद्धांत जोरानें सांगण्यांत येऊं लागला. याच सिद्धांताच्या पायावर ल्युक्रेशियसनें आपल्या तत्त्वविवेचनपद्धतीचा बराचसा भाग रचला आहे; व त्याच सिद्धांतावर अठराव्या शतकांतील तत्त्वविवेचकांचा मोठा भर आहे. या सिद्धांताच्या बळावर जननाविषयींच्या सर्व गूढांची इतक्या खात्रीपूर्वक वाट लावण्यांत येईल कीं ( ४३ ), त्याकडे पाहून हसूं आल्याशिवाय राहत नाहीं ( ४४ ). मात्र या हंसण्यांत खेदाची जोड नसते असें नाहीं.

## चैतन्योत्पत्तीच्या प्रश्नापुढें शोधक–सामर्थ्यानें हात टेंकले.

कारण असा विचार मनांत येतो कीं, जीवन अगर चैतन्य याचा उद्भव कसा झाला व त्याचें स्वरूप काय ? हे महत्त्वाचे प्रश्न सर्व सत्यज्ञानाच्या बहुधा मुळाशीं आहेत, असें म्हणतां येतें व त्याच प्रश्नांपुढें आमच्या चौकसपणानें, शोधकसामर्थ्यानें, साफ हात टेंकले आहेत व गत शतकाच्या आशाजनक वचनाची या बाबतींत पूर्तता होण्याचें साफ राहिलें आहे. आत्मोत्पत्तीच्या शोधास्तव प्रयत्न होत असतां आत्मस्वरू-

पाचें विवेचन करण्याकडे प्रयत्न व्हावे, हें स्वाभाविक आहे. अर्थात् हे प्रयत्न फार कळकळीनें झाले; त्याला पेगन-लेखकांचें साहाय्य मिळालें; व या बाबतींत निरानिराळ्या पंथांचे जे निर्णय ठरले, त्या त्याप्रमाणें त्यांच्या त्यांच्या धर्मज्ञानकल्पनांवर जबरदस्त परिणाम घडला, हें साहजिक होय.

## चैतन्याच्या स्वरूपाविषयीं कार्तेझियन मत.

( क्र० ३० ) सरतेशेवटीं आत्म्याचें सर्वस्व विवेक होय; व अतएव हें विवेकी तत्त्व जड देहाहून सर्वस्वी व मूलतः इतकें भिन्न आहे कीं, त्याच्या स्वरूपाची यत्किंचित्ही कल्पना जड पदार्थाच्या कोणत्याही स्वरूपावरून अगर गुणधर्मावरून येत नाहीं, असें देकार्तनें जेव्हां प्रतिपादिलें तेव्हां भुतेंखेतें, दृश्य स्वरूप राक्षस व पापशुद्धिस्थानिक अग्नी (४५), यांजकडून तिटकाऱ्यानें स्वाभाविकपणें मुरडण्यासारखी स्थिति मानवी मनाला येण्यास तें प्रतिपादन बऱ्याच अंशीं कारण झालें, यांत संशय नाहीं. हें कार्तेझियन ( म्हणजे देकार्तचें ) मत लवकरच कांहींसें लुप्तप्राय झालें खरें; पण त्या मतानें निदान लिंगदेहाच्या जुन्या कल्पनेचा अजीबात नायनाट झाला ( ४६ ).

## जडाग्निविषयक मत देकार्तच्या वेळेपासून लोपलें.

( क्र० ३१ ) देकार्तच्या वेळेपासून जडाग्निविषयक मत संथपणें ऱ्हास पावत गेलें, ( ४७ ), असें म्हणावयाला खरोखर हरकत नाहीं. सतराव्या व अठराव्या शतकांतले संदिग्धमती पंथांतले लोक त्याजकडे मोठ्या तिरस्कारबुद्धीनें पहात; व निदान इंग्लंदांत तरी जडाग्नीसंबंधीं जो शेवटचा वाद धर्मसंस्थेंत झाला, तो अठराव्या शतकाच्या पहिल्या अर्धांत झाला असें दिसतें. स्विंदन, व्हिस्तन, हार्वरी व दाद्वेल व अमेरिकेंत जोनाथन एड्वर्ड्स यांनीं या जडाग्नीचें निरनिराळ्या दृष्टीनें विवेचन करून संदेहवादाच्या झपाट्याच्या प्रसाराची साक्ष पटविली आहे ( ४८ ). अठराव्या शतकाच्या अखेरीस तें मत लुप्त झालें. कारण जरी मतांचा पालट झाला, असा प्रत्यक्ष उल्लेख कोणी केलेला नाहीं, तरी लोकांना मिळणाऱ्या धर्मोपदेशांतून त्याची वस्तुतः बोळवणच झाली होती. तरी सुद्धां

आजमितीलाही अल्पशिक्षित असंमतिपंथाच्या लोकांत व गरिबांकरितां केलेल्या सनातनपंथी हस्तपुस्तकांत त्या मताचा अवशेष आढळतो.

## या मताविषयीं इतका पाल्हाळ करण्याचें कारण.

(क० ३२). या उद्वेगजनक मताविषयीं इतकें पाल्हाळिक लिहिण्याचें कारण असें कीं, गतकाळच्या नमुनेदार शीलाच्या माणसांवर व विचारसरणींवर अत्यंत महत्त्वाचा परिणाम त्यानें केला होता असें वाटतें. त्या मताच्या अवश्यंभावी परिणामानें मनुष्यांच्या सहानुभूती गारठून ठार कशा केल्या, इतरांस यातना देण्यास त्यांस कसें प्रवण केलें, व मानवी सुधारणेच्या प्रगतीला जोरानें अडथळा करून मागें कसें हटविलें, हें दाखविण्याचा या लिहिण्यांत प्रयत्न झालेला आहे.

## तें मत व तसलें शीलही नाहींसें झालें.

पण तें मत आतां वस्तुतः नाहींसें झालें आहे; व त्याबरोबरच त्याच्यायोगानें बनलेल्या शीलाचा नमुनाही नाहींसा झाला आहे. पूर्वीं जे कडक पाखंडाधिकराणिक होते; त्यांचें जें अढळ वैखानस व्रत होतें; त्यांचें अवाढव्य व धाडसाचीं कामें आंगावर घेऊन तीं पार पाडण्यांत जें शौर्य होतें; छळ करण्यांत दिक्कत न वाटतां जो पटाईतपणा होता; तसेंच ज्यांनीं अत्यंत भयंकर व आंगावर शहारे उभे करणाऱ्या यातना देण्याचे प्रकार नवीन नवीन शोध करून वाढविले, त्या यातना कशा द्याव्या यासंबंधानें ज्यांनीं मोठमोठे निर्घृण ग्रंथ लिहिले; ज्यांनीं अत्यंत भयंकर घोर वैरें उत्पन्न करून युद्धांना उत्तेजन दिलें व; ज्यांनीं निरपराध रक्ताचा प्रत्येक देशांतल्या भूमीस सडा घातला; त्या सर्वांबद्दल, त्या शीलाच्या धार्मिक नमुन्याऐवजीं, हल्लीं आपणांस बहुतेक स्त्रीजातिसुगम कनवाळूपणा आढळतो, क्लेश देण्याविषयीं बहुतेक निःसत्त्व पराङ्मुखता आढळते.

## अर्वाचीन ख्रिस्तीधर्माचें स्वरूप निःसीम भूतदया होय.

(क० ३३). अर्वाचीन ख्रिस्ती धर्माचें विशिष्ट महत्त्वाचें स्वरूप ह्मणजे त्यांत दिसणारी निःसीम भूतदया हें होय. मध्ययुगांत जें वैखानसवृत्तीचें व सोळाव्या व सतराव्या शतकांत जें धार्मिक वादविवादाचें महत्त्व होतें, तेंच आमच्या काळीं भूतदयेचें आहे. भूतदयेच्या मनोवृत्त्यात्मक अंगाचें, संवेदनात्मक भूतदयेचें, अजूनपर्यंत कधींही इतकें पोषण झालें नव्हतें; आणि

हें पोषण या भूतदयेच्या तीर्थाचें अत्यंत संस्मरणीय दर्शन करून देणाऱ्या प्रतिरोधी पंथांत तरी निदान नेहमीं धर्मोपाध्यायांच्या रूपानें व त्यांच्या देखरेखीखालीं झालें आहे. खरोखर यांच्या भक्तांप्रमाणेंच वैऱ्यांनीं सुद्धां ही गोष्ट ओळखून सारखीच मान्य केली आहे. एकप्रकारची निरोज व स्त्रीसुलभ बौद्धिक व नैतिक प्रवृत्तिमयता हाच गुण धर्मोपाध्यायांच्या शीलांत अत्यंत प्रमुख मानून प्रत्येक छद्मी लेखकानें त्यावर पाल्हाळ केला आहे. हा गुण कधीं कधीं मानला जातो तितका, नीट पृथक्करण करून पाहतांही, तिरस्कारास पात्र आहे कीं काय हा प्रश्नच आहे; असें ह्मणतां येईल. कांहीं झालें तरी तार्किमेदा, काल्विन अगर नाक्स यांच्या पुढ्यांतील धर्मोपाध्यायांच्या माथीं हा गुण लादण्याचें कोणीही मनांत आणणार नाहीं.

## अपराध-दंडनांतील भिन्नता उदाहरणादाखल दर्शविली आहे.

वेळोवेळीं निरनिराळ्या धंद्यांतील माणसांच्या शीलांच्या नमुन्यांत जे पालट होत जातात, ते जरी पुष्कळदां फार उघड दिसत असतात व इतिहासाची एक अत्यंत सूचक शाखा बनविण्यास कारणीभूत होत असतात, तरी केवळ तार्किकरीत्या सिद्ध करून दाखवितां येण्यासारखे ते अर्थात् नसतात. दोन निरनिराळ्या काळांच्या इतिहासाच्या अभ्यासानें ज्या गोष्टींचा साधारण ठसा मनावर उमटतो, तेवढ्याच काय त्या गोष्टी लेखक समानपरिशीलन लोकांच्या मनापुढें निर्णयार्थ मांडूं शकतो; ह्मणून शेवटीं धर्मज्ञानाच्या उत्कर्षाच्या दोन काळांतील जी मनावर ठसा उमटविणारी भिन्नता अपराध-दंडनाच्या इतिहासावरून दिसते, तिचा जो येथें उल्लेख होईल तो केवळ उदाहरणादाखलच होईल; पुराव्यादाखल नव्हे. निरनिराळ्या अपराधांबद्दल ठरविलेल्या शिक्षांच्या योग्यायोग्यतेचें लोकांचें अनुमान लोकांच्या अपराधप्रचीतीप्रमाणें पुष्कळ अंशीं बदललें पाहिजे, हें आपण पाहिलेंच आहे. छळाचा नायनाट करण्याकरितां जी चळवळ झाली ती बहुतेक पूर्णपणें धर्मसंस्थेच्या विरोधकांमुळें झाली व ती मानवी सुधारणेनें उत्पन्न झालेल्या प्रवृत्तींच्या विशिष्ट सरणींच्या प्रभावानें जितकी झाली, तितकी पद्धतशीर विचाराच्या प्राबल्यानें झाली नाहीं; हेंही आपण पाहिलेंच आहे. वाल्तेर, बेक्यारिया, व फ्रान्सांतली राजक्रांत्ति यांनीं जी प्रेरणा उत्पन्न केली, ती पुराणाभिमान्यांत शिरली व तेव्हांच त्या प्रेरणेला पुरा जोम आला. नरकांत प्रत्यक्ष जड अग्नि असतो, असें जें मत तें प्रचीतीस येण्याचें

बहुतेक बंद पडल्यामुळें अपराधाबद्दलच्या शिक्षांतील नाहक कडपणाची वाढती जाणीव सर्वत्र दिसूं लागली. आणि बहुतेक देशांत व विशेषतः इंग्लंदांत याच्याहून दुसऱ्या कोणत्याही विषयासंबंधीं जास्त कळकळ दिसत नव्हती.

## हावर्डचे प्रयत्न.

यासंबंधांत हावर्डनें पाऊल पुढें टाकलें. या असंमतिपंथांतल्या थोर गृहस्थाच्या चरित्रावरून जितका निष्कलंक व फलदायी परोपकार मूर्तिमंत दिसतो, त्याहून जास्त बहुधा भूतदयेच्या इतिहासांत कोठेंही सांपडणार नाहीं. हा गृहस्थ परोपकाराच्या कृत्यांत निमग्न राहून, ४० हजार मैल प्रवास करून, परदेशांत आपण अंगीकार केलेल्या व्रताला बळी पडला व आपलें परोकारवीर असें नांव मागें ठेवून गेला. केवळ इंग्लंदांतच नव्हे, तर सर्व युरोपभर त्याच्याच परिश्रमानें लोकांचीं मनें कारागृहांतील स्थितीकडे वळलीं; व त्यामुळें तत्संबंधीं जी क्रांति घडली, तिच्या परिणामांचें महत्त्व कधींच अजमावतां यावयाचें नाहीं. नंतर लवकरच अपराधदंडननियमांत सौम्यपणा आला.

## इंग्लंदांत दंडनपद्धतीचा कडकपणा.

या अपराध-दंडन नियमांचा कडकपणा इंग्लंदांत बऱ्याच पूर्वीपासून अद्वितीय होता; व नियमभंगाचे गुन्हे विशेषेंकरून असंख्य झाल्यामुळें, या देशांतल्या देहान्तशासनांच्या संख्येइतकी संख्या साऱ्या युरोपांत कोठेंही बहुधा सांपडावयाची नाहीं. सहाव्या हेन्रीच्या कारकीर्दींत फार्तेस्क्यू म्हणून मुख्य न्यायाधीश होता. आपल्या देशबांधवांच्या थोरवीबद्दल सरळ पुरावा म्हणून आपल्या देशांतील देहान्तशासनांची संख्या मोठी आहे, या गोष्टीची त्यानें खरोखर मोठ्या विलक्षण प्रौढीनें उल्लेख केला आहे. तो म्हणतो कीं, ‘ फ्रान्सांत सात वर्षांत जितक्या माणसांस देहान्त-शासन मिळालें, त्याहून जास्त माणसांस इंग्लंदांत एका वर्षांत मिळालें; कारण, इंग्रजांचीं अंतःकरणें थोर आहेत. तसेंच स्कॉतलंदांतील लोक कधींही दरवडे घालण्यास अगर लूटफाट करण्यास धजत नाहींत, फक्त घरफोड्या अगर साध्या चोऱ्या करतात (४९). आठव्या हेन्रीच्या कारकीर्दींत जेव्हां इंग्लंदांतील जमिनीचा बराच भाग गायरानें (५०) करून

टाकण्याचा प्रयत्न चालला होता; आणि जेव्हां मठ उध्वस्त केल्यामुळें मुख्य दाननिर्झर साफ शुष्क पडला होता व असंख्य लोक अनाथ होऊन दोम दोम करीत फिरत होते; तेव्हां देहान्त शासनें किती माणसांना झालीं, याचा अजमास हॉलिंगशेद ह्यानें केला आहे; ही संख्या विस्मयोत्पादक म्हणजे ७२ हजार त्यानें दिली आहे. म्हणजे दरसाल २ हजार सरासरी पडली ( ५१ ); हा होलिंगशेदचा अजमास भरंवसा बसण्यासारखा अगदीं वाटत नाहीं. तथापि एलिझाबेथच्या कारकीर्दीच्या अखेरीस व दीनरक्षण कायदा मंजूर झालेला असतांही दरसाल सुमारें ४०० लोकांस देहान्त शासन मिळे ( ५२ ). तथापि अठराव्या शतकाच्या मध्यभागीं लोकसंख्येंत बरीच वाढ झालेली असूनही तीच संख्या दरसाल शंभराहूनही कमी झाली होती ( ५३ ). या काळच्या जरा पूर्वीं बिशप बर्केले यानें मोरनें आपल्या युतोपियां ( यक्षनगरीं ) त प्रतिपादिल्याप्रमाणें व क्रामवेलनें आपल्या एका भाषणांत म्हटल्याप्रमाणें देहान्त शासनाऐवजीं दुसरी कांहीं शिक्षा द्यावी ( ५४ ), अशा मताचा पुरस्कार केला होता. पण तिसऱ्या जॉर्जच्या सर्व कारकीर्दीभर अपराधदंडनियम अधिकच कडक झाले, व तो कडकपणा इतक्या थराला जाऊन पोहोंचला कीं, जेव्हां रोमिलीची कारकीर्द सुरू झाली, तेव्हां देहान्तशासनालायक गुन्ह्यांची संख्या २३० हून कमी नव्हती ( ५५ ). गेल्या शतकाच्या अखेरीस व चालू शतकाच्या आरंभीं काय ती ही वस्तुस्थिति पालटली.

## ह्या सुधारणेचें मूळ वाल्तेर-पंथांत आहे.

( क० ३४ ). इंग्लंदांत काय अगर युरोपच्या इतर भागांत काय, ही जी सुधारणा झाली तिचा उगम शोधूं जातां, ज्या पंथाचा बेक्यारिया हा प्रतिनिधि होता, त्या वाल्तेर पंथांत तो शेवटीं सांपडेल; कारण ' गुन्हे व शिक्षा ' नांवाच्या ग्रंथानें उत्पन्न केलेली शेवटची प्रेरणा सार्वत्रिक झाली; आणि यातना जितक्या कमी देतां येतील, तितक्या कमी द्याव्या असा शासननियमांचा मुख्य हेतु ठेवून अपराधदंडन-नियमांत भूतदयेचा शिरकाव करण्याचा पहिला जोराचा प्रयत्न तोच झाला; देहान्त शासन बंद करण्याच्या चळवळीशीं बेक्यारियाचें नांव विशेषेंकरून निगडित आहे;

व ही चळवळ दमादमानें कां होईना, पण पक्केपणें पाऊल पुढें टाकून अढळ सिद्धि संपादन करित आहे.

### बेन्थामचें काम.

( क० ३५ ). या चळवळीच्या तात्त्विक अंगाचें प्रतिनिधित्व इंग्लंदांत बेन्थामनें उमदेपणानें केलें. या बेन्थामचें बुद्धिवैभव बेक्यारियाच्याहून खात्रीनें थोर होतें व बेक्यारियाच्या इतकें जरी कदाचित् नसलें, तरी त्याचें वजन युरोपभर होतें.

### धर्माधिकाऱ्यांच्या कार्याचें महत्त्व.

( क० ३६ ). या सर्व थोर विवेकी पुरुषांकडे द्यावयाचें तेवढें सर्व श्रेय पूर्णपणें देऊनही असें म्हणावें लागेल कीं, इंग्लंदच्या राजसभेंत आपल्या इष्ट सुधारणा एकावर एक मंजूर करून घेण्यास रोमिली, म्याकिन्ताश, विल्बर्फोर्स, ब्रोघ्याम यांस सामर्थ्य येण्याला जी कळकळ व जें प्रोत्साहन हवें होतें, तें मिळावयाला धर्माधिकाऱ्यांचे अविश्रांत श्रम कारणीभूत झाले; यांत काडीइतकाही संशय नाहीं. कशाही आशाविघातानें शिथिल न होणारी परहिततत्परता व कधीं कधीं दोषाच्याही पायरीस पोंचणारी अपराधाविषयीं कृपादृष्टि ठेवून, त्यांनीं आपलें सर्व वजन भूतदयेच्या कारणीं खर्ची घातलें.

### हा परिणाम मानवी सुधारणेनें उत्पन्न झालेल्या नवीन विचारौघाचा.

प्राचीन अपराधदंडन-पद्धतींचें निंद्य स्वरूप नष्ट करण्यांत दिसणारी या धर्माधिकाऱ्यांची स्थिति व माध्ययौगिक धर्माधिकाऱ्यांची थेट उलटी स्थिति यांतलें अंतर ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. पंथाभिमान्यांना यांत फक्त प्रतिस्पर्धी धर्मसंस्थेंतलाच भेद दिसेल; पण प्रांजळ मनाच्या इतिहास-ज्ञांस त्यांत मानवी सुधारणेमुळें उत्पन्न झालेल्या नवीन वळणाच्या शीलांची ओळख पटेल असें वाटतें; आणि सनातन व प्रतिरोधी पंथांमध्यें या बाबतींत निःसंशय असणारा जो भेद त्यांत, मनाचा अधःपात करणाऱ्या व त्यास पाषाण बनविणाऱ्या ज्या कल्पनांचें अजूनपर्यंत उद्घाटन झालें, त्यांकडे त्या त्या पंथांतील लोकांचें मन ज्या अगदीं भिन्न तीव्रतेनें पहातें, त्या तीव्रतेचा एक परिणाम त्या इतिहासज्ञांस आढळेल.

## बैबल व सदसद्विवेकबुद्धि यांचें सारूप्य ठरविण्याकडे सध्यां कल आहे.

सध्यांच्या काळीं धार्मिक विचारांचा सर्व कल एका विवक्षित दिशेकडे आहे, म्हणजे पवित्र शास्त्र जें बैबल तें व सदसद्विवेक बुद्धि यांचें सारूप्य ठरविण्याकडे तो कल आहे; असा उल्लेख मागें आलाच आहे. असा विचारौघ चालू आहे म्हणून दिलगिरी वाटेल तर वाटो. पण त्याकडे काणाडोळा क्वचित्च करतां येईल; अगर तसा ओघ वहात नाहीं, असें क्वचितच म्हणतां येईल. पिढीपिढीला नैतिकवृत्तीचें सामर्थ्य जास्त जास्त निरपेक्ष होत जातें; त्या वृत्तीशीं विरोध करणारीं मतें क्षीण होत होत लय पावतात व धर्मज्ञानाचीं नानाविध अंगें तदन्तर्लीन होऊन तिच्या सामर्थ्यानें रूपांतर पावतात. हटवादीपणाच्या धर्मज्ञानमतांबद्दल बहुतेक लोकांस उदासीनता वाटते. ही गोष्ट आतां इतकी ठळकपणें नजरेस येते व साधारण लोकांच्या प्रचीतीच्या आधारानें नसणाऱ्या विधींत तोडमोड होण्याची भीति कित्येक लोकांना इतकी तीव्र वाटत आहे कीं, धर्ममतांची साधारण संशुद्धि करण्याचें काम फारच क्वचित् घडूं लागलें आहे.

## शब्द जुनेच, पण अर्थ नवा.

तथापि मतांतर झालें आहे, तें कांहीं अल्पस्वल्प नाहीं, फार गंभीर आहे. शब्द पाहिले तर अजून जुनेच आहेत; पण त्या शब्दांनीं मनावर उमटणारीं बिंबें जुनीं राहिलीं नाहींत, अगर त्यांचा जीवितावर पूर्वीच्यासारखाच प्रभाव पडत नाहीं. विचाराचे ओघ व त्या विचारौघांनीं उत्पन्न होणारे शीलांचे नमुने सर्वत्र प्राधान्येंकरून बदललेले आहेत. बुद्धिभोंवतालचें सर्व आसमंत, जीविताचा सर्व भर, प्रचलित आवेश, कल्पनेचे तरंग, सारे पार बदलून गेले आहेत. तालबद्ध नियमांच्या प्रभावानें आंखलेल्या दिशेनें मानवी बुद्धीचा ओघ पुढें पसरत जातो व कोणत्याही काळीं प्रचीतीस येणारीं व कार्यकर अशीं जीं मतें असतात तीं त्या काळच्या बौद्धिक स्थितीशीं मिलाफ पावणारीं तेवढींच असतात. या प्रकरणांत सदहू नियमांपैकीं कांहींचें स्वरूप व क्रमशः होत जाणाऱ्या फेरबदलांपैकीं कांहींची दिशा दर्शविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## होत जाणाऱ्या पालटानें जुनें बुडालेंसें वाटणाऱ्या मनाला उत्तेजन देणारा विचार.

असल्या विवेचनानें दिसूं लागणाऱ्या सतत घडत राहणाऱ्या रूपांतराच्या हगाभोगानें कोणाला गतकाळच्या भूचिन्हांचा नायनाट झाल्यासारखें वाटत असेल, तर त्यांच्या मनाला थोडा बहुत आधार देण्यास एक विचार उपयोगीं पडेल. परहितप्रीति, कारुण्य व सहानुभूति हीं उत्पन्न करावीं, हाच ख्रिस्तीधर्माच्या अवताराचा मूळ हेतु आहे; ही गोष्ट सर्वमान्य असल्यामुळें ती अनंतत्वेंकरून खात्रीची आहे; त्या धर्माच्या अस्तित्वाला एखादें हटवादीपणाचें मत प्राधान्येंकरून अवश्य आहे, ही गोष्ट तितकी खात्रीची नाहीं; व म्हणून ह्या नैतिक वृत्ती वाढत्या प्रमाणांत आहेत, हीच गोष्ट त्या धर्माच्या संस्थापकाच्या कल्पनांच्या विजयाचा भक्कम पुरावा होय.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ..........
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

घालविला व शत्रुपक्षाकडील लोकांनीं डोळ्यांत तेल घालून दोष शोधिला असतांही त्यांचीं शीलें शुद्ध निष्कलंक आढळलीं. छळ करणाऱ्यांनीं जेव्हां अत्यंत दुष्ट कृत्यें केलीं तेव्हांही समाजाच्या एका मोठ्या भागाच्या इच्छांचे प्रतिनिधि व निदर्शक म्हणूनच त्यांनीं तीं केलीं, व हा समाजाचा भाग साधारणपणें अगदीं निस्पृह व कळकळ बाळगणारा होता. निर्विकार निर्णयेच्छेनें या विषयाचा शोध झाल्यापासून असें अवलोकनांत आलें आहे कीं, छळ हा सदा एखाद्या विशिष्ट प्रकारच्या मतांच्या प्रचीतींच्या सांगातीं आढळावयाचा व त्या मतांच्या लाटेच्या हेलकाव्यांप्रमाणें हेलकावे खावयाचा, यावरून मानवी मनावर होणाऱ्या त्या मतांच्या परिणामाचा तो प्रतिनिधि मानण्यास हरकत नाहीं.

## या प्रकरणाचा उद्देश.

या अडचणींतून पार पडतां यावें, असा गेल्या प्रकरणांत थोडाबहुत प्रयत्न झाला आहे, असा भरंसा आहे. विशिष्टप्रकारच्या प्रचीतींचा मानवी शीलावर वाजवी परिणाम असा होतो कीं, स्वधर्मबाह्य माणसांच्या यातनांविषयीं पूर्ण औदासिन्य उत्पन्न होतें व तेणेंकरून समाजाच्या जोपासनेस मुख्यतः कारणभूत असणारीं जी परपीडनपराङ्मुखता ती नष्ट होते, असें तेथें दाखविलें आहे. छळ करणें आपलें कर्तव्य आहे, असें मनुष्यांस वाटूं लागण्यास कोणत्या कल्पना कारणीभूत झाल्या, त्यांचा आतां तलास लावावयाचा आहे, व त्या कल्पना कशा लुप्त झाल्या, ती क्रिया दाखवावयाची आहे. काम मोठें कष्टाचें आहे; कारण ज्या मतांचा उल्लेख करावा लागेल, तीं आपल्या नैतिक जाणिवेला अत्यंत चिळस उत्पन्न करणारीं आहेत व त्यांच्याबद्दल प्रचीती अगर श्रद्धा नाहीं, अशा काळांत त्यांचें नुसतें विधान करणेंहीं पुष्कळांच्या मनाला धक्का बसण्यास पुरेसें होईल. असें आहे तरी गतकाळाचा उमज पडण्याकरितां त्या मतांचें स्वरूप व प्रभाव यांचें स्पष्ट आकलन होणें अगदीं अवश्य आहे.

## दोन नैतिक वृत्ति.

( क० २ ) सर्व मानव जातींत सर्वत्र पसरलेल्या दोन नैतिक वृत्ति दिसतात; व या वृत्ति म्हणजे ज्यांसभोंवतीं सर्व धर्मसंस्थाचा विस्तार झाला आहे, असे मूलकंद होत असें मानतां येतें. त्यांपैकीं पहिली वृत्ति

म्हणजे सद्गुणाची जाणीव; या जाणीवेमुळें आपण केलेल्या कांहीं कृत्यांशीं पुण्याचा संबंध मनुष्यें जोडतात. दुसरी वृत्ति म्हणजे पापाची जाणीव; या जाणीवेमुळें देव आपला रिणको नव्हे, तर आपण त्याच्या दाराशीं जाणारे भिकारी आहोंत, अशी उमज मनुष्यांस पडते. या दोन वृत्ति कांहीं अंशीं परस्परविरुद्ध असूनही ज्यांत त्या साहचर्यानें वास करीत नाहींत असें बहुधा एकही धार्मिक मन मिळावयाचें नाहीं; आणि तलास लावतां त्या प्रत्येक काळांत व प्रत्येक धर्मांत नैतिक परिपोषाचीं प्रधान अंगें म्हणून सांपडतील; तथापि त्यांचें सापेक्ष महत्त्व सारखेंच नाहीं. कित्येक युगांत सद्गुणाची जाणीव हा धर्माचा आधारस्तंभ झालेला आहे, तर दुसऱ्या कित्येक युगांत ती जागा पापाच्या जाणिवेनें पटकावली आहे. निरनिराळ्या मानवी जातींच्या मूलप्रकृतींतला भेद अगर मनुष्याच्या मनावर फार लहानपणापासूनच परिणाम घडवीत असल्यामुळें सहज प्रवृत्तींहून निराळा करण्यास अवघड असा जो परिस्थितिप्रभाव तो याचें अंशतः कारण असेल.

### परिस्थितीनें त्यांच्या सापेक्ष महत्त्वांत भेद पडतो.

( क० ३ ) तथापि राजकीय व बौद्धिक परिस्थिति जी वेळीं प्रभावशाली असेल, तीच बहुतांशीं कारण असते, हें खास. जेव्हां वैभव, विजय व सत्ता यांची धुंदी बराच काळ टिकते व जेव्हां राजकीय वैभवाची बहुतांशीं जोड करून देणारे धैर्यस्वावलंबनादि सद्गुण कुळवले जातात तेव्हां मानवपदाभिमानाची जाणीव हेंच मुख्य नैतिक तत्त्व होऊन बसतें व तद्विरोधी प्रत्येक संस्था नीरस ठरते. परंतु उलट पक्षीं जेव्हां हाल सोसणाऱ्या अगर धर्मवृत्तिभूयिष्ठ लोकांतून एखाद्या धर्माचा उगम होतो, तेव्हां त्याचें स्वरूप पार निराळें असतें. त्यांत त्याच्या जनक परिस्थितीचें प्रतिबिंब थोडें तरी उमटतेंच; त्यांत कारुण्य, लीनता, वृत्तिमयता पूर्णपणें भरलेली असावयाची; त्यायोगें मनुष्याच्या मनांत अत्युच्च ध्येयाची आकांक्षा उपजावयाची; प्रकंपमान चिंतातुरतेनें आत्मनिरीक्षण होऊं लागावयाचें; कार्यप्रेरक हेतूंचें काळजीपूर्वक मनन व्हावयाचें; स्वसामर्थ्याविषयीं मन अप्रत्यय व्हावयाचें; व आपला सर्व भार बहिःस्थित सामर्थ्यावर टाकण्याची इच्छा व्हावयाची.

## ग्रीक व रोमन तत्त्वज्ञान सद्गुणाच्या व ख्रिस्ती पापाच्या जाणिवांकडे झुकलें.

आतां जगांत आजपर्यंत ज्या धर्मसंस्था निर्माण झाल्या, त्यांपैकीं प्राचीन ग्रीक व रोमन तत्त्वज्ञान सद्गुणाच्या जाणिवेकडे शरण गेलें व ख्रिस्ती धर्माचें तत्त्वज्ञान पापाच्या जाणिवेकडे गेलें. पहिल्याचें ध्येय स्वावलंबी मानवप्रभुता, दुसऱ्याचें ध्येय परमेश्वराच्या ठायीं मानवतेचा लय. उत्तमत्वाच्या कल्पनेंत अभिमानाचें मिश्रण किती पूर्णपणें झालेलें आहे, हें लक्ष्यांत आल्यावांचून प्लुतार्कच एकहि पान वाचणें अगर कोणत्याही ग्रीक पुतळ्याचें भीमकांत सौंदर्य पहाणें अशक्य होय; तसेंच आत्मसामर्थ्याविषयीं अप्रत्यय व आत्मविलय या कल्पना प्रमुखतेनें मनांत आल्यावांचून कोणत्याही ख्रिस्ती संताचें चरित्र वाचणें अगर ख्रिस्ती धर्मांतल्या आरंभींच्या कारागिरानें काढलेलें चित्र पाहणें अशक्य होय. ख्रिस्ती धर्माच्या अगदीं आरंभींच्या व पवित्रतम दिवसांत या कल्पना तेव्हां नित्य आढळणाऱ्या भक्तिपूर्ण मनोरचनेंत व तदनुषंगिक उच्चतर व कोमलतर नैतिक आकलनांत मुख्यत्वें दिसत. त्यावेळीं ख्रिस्ती धर्म बुद्धिग्राह्य सिद्धांतांपेक्षां मनोवृत्तींच्या तरंगांनीं भरलेला होता.

## मनोवृत्ती थिजून साफ उलट झाल्या.

(क० ४). ज्या नैतिक मनोवृत्तींनीं हा धर्म प्रथमतः बनला होता, त्या थिजून त्यांचें विस्तृत धर्मज्ञानपांडित्य बनलें व परिणामीं त्या अवश्यमेव साफ उलट झाल्या, ही गोष्ट सुमारें तिसऱ्या शतकापर्यंत झाली नव्हती. येथें ‘अवश्यमेव उलट झाल्या’ असें म्हटलें; याचें कारण असें कीं हटवादी मत हें कांहीं मनोवृत्तीच्या तरंगांचें योग्य अगर हुबेहुब प्रतिबिंब नव्हे. उदाहरणार्थ, सद्गुणाची जाणीव व पापाची जाणीव प्रत्येक धार्मिक मनांत विषमांशानें कां होईना, पण सदा साहचर्यानें वास करितात, आणि असें असूनही त्यांना हटवादी मतांचें स्वरूप येऊन ‘भावानें मंडन’ व ‘कर्मानें मंडन’ अशीं नांवें प्राप्त झालीं; तेव्हां त्या परस्परांच्या अगदीं विरुद्ध बनल्या.

## प्रत्येक मत नैतिक मनोवृत्तींतूत निघूनही शेवटीं तिरस्करणीय होतें.

( क्र० ५ ). प्रत्येक मत प्रथमारंभीं नैतिक वृत्तींतूनच निघालें असलें, तरी शेवटीं त्याचें परिपुष्ट स्वरूप इतकें विलक्षण होतें कीं, त्याच नैतिक वृत्तीला त्याचा रोष येऊन तिरस्कार उत्पन्न होतो. एका मताचा परिणाम असा झाला कीं, मनुष्यांनीं एक सिद्धांत रचला, व त्यायोगें सर्व धर्मसंस्था म्हणजे विनिमयाची विस्तृत संस्था झाली; आणि स्वसामर्थ्याविषयीं अप्रत्यय व लीनता अशा ज्या जागरूक सदसद्विचाराच्या सूक्ष्म संवेदनामुळें उत्पन्न होणाऱ्या वृत्ती त्या पालटल्या व त्यांच्या ऐवजीं असा सिद्धांत येऊन बसला कीं, ख्रिस्तीधर्मबाह्य लोकांच्या भक्तींत अगर सद्गुणांत सर्वशक्तिमान् परमेश्वरास प्रसन्न करील अगर चिरकालिक निरयगति चुकवील असें कांहींच नाहीं.

## आनुवंशिक पापाचा विचार अवश्य करावा लागतो.

( क्र० ६ ). तथापि ख्रिस्तीधर्माच्या आरंभींच्या धर्मज्ञानांत सर्वशक्तिमान् परमेश्वराशीं मानव प्राण्याचा संबंध कशा प्रकारचा सांगितलेला आहे, याचा विचार करित असतां दुसऱ्या एका प्रधान अंगाचें परीक्षण करावें लागतें; तें अंग म्हणजे आनुवंशिक पाप हें होय.

## ज्याचा दोष त्याला हें स्वयंसिद्ध आहे.

( क्र० ७ ). मानवी सुधारणा झालेल्या समाजांतील मनुष्यानें केवळ तात्त्विकदृष्ट्या विचार केला, तर त्याला जें कार्य करण्यांत आपलें अंग असतें, त्या कार्याबद्दलच काय तो आपणांस दोष लागतो; याहून कोणतेंही विधान जास्त प्रत्यक्षप्रमाण वाटणार नाहीं. एकाच्या संकटाचा वांटा दुसऱ्यास भोगावा लागेल; पण दोष स्वतःलाच लागतो.

## तथापि उलट कल्पना प्रचलित आहे.

तथापि उलट पक्षीं आनुवंशिक पाप व आनुवंशिक पुण्य या कल्पना सर्व राष्ट्रांतील संस्थांत व श्रद्धेंत व्यापून राहिल्या आहेत; व पुष्कळ निरनिराळ्या परिस्थितींत मानवी मनांत इतकी चिकाटी धरून आहेत कीं, ती चिकाटी नुकती आतांशां ढिली पडत चालली आहे; या गोष्टीहून जास्त खात्रीलायक दुसरी गोष्टच नाहीं. अपराधी आई-बापांच्या नाशांत

त्यांच्या मुलांचाही नाश करणाऱ्या आद्यकाळांतील प्रत्येक अपराधदंडन-पद्धतींत, विशिष्ट कुटुंबांला अगर विशिष्ट राष्ट्रांला वंशपरंपरा लागलेल्या शापांच्या प्रत्येक हकीकतींत, प्रत्येक वंशपरंपरा चालणाऱ्या महत्सत्तेंत, व आद्यकालीं घडलेल्या अधोगतीच्या प्रत्येक दंतकथेंत या कल्पना आपणांस आढळतात. या सर्व गोष्टींच्या मुळाशीं एक कल्पना आहे; ती अशी कीं, कोणाहि मनुष्याचें पाप अगर पुण्य त्याच्या वंशजांत प्रतिबिंबित होतें, मग त्या वंशजांचीं कृत्यें कशींही असोत. ख्रिस्तीधर्माच्या इतिहासावरून समाजाच्या निरनिराळ्या स्थितींशीं या कल्पनेचा संबंध काय असतो, याविषयीं खात्रीनें नियम बांधणें कदाचित् धाडसाचें होईल; पण जेव्हां मानवी सुधारणा हलक्या प्रतीची असते, त्याकाळीं ही कल्पना जोरांत असते; व बौद्धिक प्रगतीबरोबर, सारखी सतत नव्हे तरी, एकंदरींत ऱ्हास पावत जाते; असें आमच्या बुद्धीप्रमाणें दिसतें.

### स्वयंसिद्ध व तद्विरुद्ध दोन्ही प्रकार प्रत्येक राष्ट्रांत केव्हांना केव्हां दिसतात.

प्रत्येक राष्ट्राच्या इतिहासांत असा एक काळ आलेला दिसतो कीं, जेव्हां सापराध आई–बापांचा दंड निरपराध मुलांस भोगावा लागणें अगदीं स्वाभाविक असें लोकांस वाटतें; व असाही एक काळ असतो कीं, जेव्हां तो दंड मुलांना भोगावा लागणें म्हणजे उघड उघड अन्याय होय असें वाटतें.

### महत्सत्ता, तिचें सत्त्व व परिणाम.

तथापि आपणांस असें आढळून येतें कीं, रानटीपणाच्या अंधाराचा जेव्हां थोडाबहुत निरास झाला होता, अशा मध्ययुगांतल्या कांहीं काळांत अवाढव्य महत्सत्तापद्धति तयार झाली होती; व आनुवंशिक गुणावगुणाचें मत दृढ होण्याला या पद्धतीमुळें इतर कोणत्याही एका कारणाहून जास्त मदत झाली. कारण महत्सत्तेचें सत्त्व इतकेंच कीं, सन्मानाचें मूळ कारण विद्यमान लोकांकडून काढून मृतपूर्वजांकडे सोंपविणें, विद्यमान लोकांचे गुण त्यांच्या स्वतःच्या शीलावर व आचरणावर अवलंबून न राखतां त्यांच्या पूर्वजांच्या योग्यतेवर व आचरणावर अवलंबून राखणें; आणि कोणतीही अवाढव्य महत्सत्ता केवळ एकटी अलिप्त राहूं शकत नाहीं, तर तिचें

फारोर इतर पुष्कळ कक्षांत शिरतात व तिच्या सामाजिक प्रभावानें समाजाच्या सर्व संबंधांत फरक पडतो, या कारणांमुळें लोकांच्या मनाला अशा कांहीं ठराविक निर्णयाच्या कसोटीची नकळत संवय लागते कीं, या कारणांच्या अभावीं त्या कसोटीपासून तीं मागें मुरडलीं असतीं.

## लोकसत्ताक तत्त्वांच्या विजयानें आनुवंशिकता पदच्युत होईल.

(क्र० ८). जर कधीं काळीं धार्मिक कक्षेत गुणावगुणांचें अधिष्ठान स्वतः कृत्यें करणाऱ्या व्यक्तीवर मानणारें कार्यकारणवादसंमत मत धर्मज्ञानसंमत गुणावगुणाच्या आनुवंशिक मताला पूर्णपणें पदच्युत करणारें असेल तर तो पालट घडून येण्यास राजकारणाच्या कक्षेंतला सर्व लोकसत्ताक तत्त्वांचा विजय विशेष कारणीभूत होईल असें वाटतें.

## आनुवंशिकतेचें मूळ काय?

(क्र० ९). मनुष्याच्या गुणावगुणाचा निर्णय त्याच्या पूर्वजांच्या कृत्यांवरून करण्याच्या दूरवर पसरलेल्या संवयीचें मूळ काय, हा तत्त्वविवेचनांतील एक अत्यंत गूढ व वादग्रस्त मुद्दा आहे. कांहींना त्यांत मानवी अधःपाताचा अंधुक व विकलित संप्रदाय दिसतो; तर इतरांना दोष व दुःखभोग या दोन कल्पनांचा प्राचीन धर्ममतांत प्रमुखपणें दिसणारा घोटाळा हें त्याचें कारण असावें असें वाटतें. कांहीं अंशीं दोषाला शिक्षा मिळणें रास्त आहे; या सार्वत्रिक खात्रीमुळें व कांहीं अंशीं मनुष्यावर पडणारे प्रसंग सामान्य नियमांचे परिणाम नसून, विशिष्ट हेतूंसाठीं घडलेलीं विशिष्ट कृत्यें होत; या कल्पनेमुळें जेथें जेथें दुःखभोग आढळेल, तेथें तेथें मुळाशीं दोष असला पाहिजे; असा तर्क करण्यास हरकत नाहीं अशी मनुष्यांची बुद्धि झाली. त्यांना आढळून आलें कीं, पापमूलक युद्धाचे परिणाम तें युद्ध उपस्थित करणाऱ्यांचा जगांतून नायनाट झाल्यावरही पुष्कळ काळपर्यंत भोगावे लागतात; आई-बापांच्या सदाचरणानें अगर दुराचरणानें, शहाणपणानें अगर मूर्खपणानें पुष्कळदां मुलांचें नशीब उघडतें अगर पंगु होतें; व प्रत्येक पिढीची सत्ता स्वतःच्या नशिबावर असते तीहून पुढच्या पिढीच्या नशिबावर जास्त असते. त्यांनीं पाहिलें कीं, एकाचें दुःख दुसऱ्यास भोगावें लागतें; व तेणेंकरून त्यांनीं तर्क बांधिला कीं, एकाचा दोषही

दुसऱ्यास लागतो. याखेरीज देशाभिमान, धर्माभिमान व कोणतेंही एकजूट करणारें कारण त्यांचें जीवित कांहीं अंशीं गतकाळांत नेतें व मृत पूर्वजांच्या कृत्यांशीं त्यांचा एकजीव करतें. देशाभिमान्याला स्वतःच्या कृत्यांबद्दल वाटतात तशींच आपल्या बापदाद्यांच्या कृत्यांबद्दल अभिमान व लज्जा वाटतात. याच संबंधांत असेंही अवलोकनांत आलें आहे कीं, मानवी जातीविषयीं बोलतांना आपण रूपकानें बोलतों आहों, हें विसरून जाऊन विद्यमान व्यक्तींच्या अस्तित्वाहून वेगळ्या इंद्रियग्राह्य अस्तित्वाचा तिच्यावर आरोप करण्याकडे लोकांचा नेहमीं कल असतो. आणखी असेंही म्हणतां येईल कीं, कित्येक राष्ट्रांत प्रबल व प्रत्येक राष्ट्रांत थोडीबहुत असणारी पूर्वदर्शी कल्पकता भूतकाळाला काव्यमोहिनीकडून नटवून तो सुवर्णकाळ होय, वर्तमानाहून तो निस्तूळतेनें श्रेष्ठ होय; असें दाखविते व त्या भूतकाळाचा महिमा नष्ट होण्याला कांहीं भयंकर आपत्ति कारण झाली असावी, असें भासविते.

### आनुवंशिकतेचा उल्लेख ख्रिस्ती धर्मांत उघड व जोराचा आहे.

( क० १० ). हे व असले विचार वंशपरंपरा लागणाऱ्या दोषाच्या कल्पनेच्या उगमावर लिहिणाऱ्यांनीं वारंवार पुढें मांडले आहेत. तथापि सुदैवानें सध्यां त्यांचें परीक्षण करण्याची गरज नाहीं; कारण प्रस्तुत फक्त हटवादी मतांच्या उपदेशांत या साधारण कल्पनेचा उल्लेख आहे कीं नाहीं हें पाहून व्यवहारांत त्या कल्पनेची छाप किती बसली आहे, तो छडा काढण्याचा हेतु आहे. हा उल्लेख उघड व जोरानें केलेला आहे. ख्रिस्ती धर्माच्या आद्य काळच्या लोकांचा सार्वत्रिक विश्वास असा होता कीं, ख्रिस्तीधर्मबाह्य जो जो जीव तो तो केवळ स्वतःच्या क्रियमाण पापामुळेंच नव्हे, तर आणखी मानवजातीचा आद्य पिता जो आदम त्यानें केलेल्या व वंशपरंपरा त्या जीवांत उतरलेल्या पापानें चिरकाल नरकयातना भोगण्यास योग्य होय; आणि तेणेंकरून अगदीं सद्योजात अर्भकही शुद्धिसंस्कारानें शुद्ध होऊन धर्मांत प्रविष्ट होईपर्यंत त्याच्या त्या चिरकालिक नरकयातना चुकत नाहींत.

### जन्मतांच मेलेल्यासही नरकयातना होतात.

एका धर्मज्ञानपंडिताचें जें चित्रानिविष्टवत् वर्णिलेलें मत कीं 'नरकांतल्या भुईवर टीचभरही लांब नाहींत, अशीं पोरें रांगत असतात; यांत

बिलकुल संशय नाहीं.' त्यावर पाल्हाळानें लिहिण्यांत मजा नाहीं. तथापि ख्रिस्ती धर्माच्या आद्यकाळीं या मतावर अत्यंत दृढ श्रद्धा होती; व शांततेच्या काळांत जर कधीं कांहीं अंशीं तें प्रत्ययास आलें नसलें, तर जेव्हां जेव्हां एखादा पाखंडी तें झुगारून देण्यास धजे, तेव्हां तेव्हां त्याचा अंमल खास होत असे. ज्याविषयीं स्पष्टपणें कांहीं बोलतां येत नाहीं; इतक्या प्राचीन काळीं ख्रिस्ती धर्मांत शिशुशुद्धिसंस्कार सुरू झाला. सर्व पुराणाभिमान्यांनीं व तसाच सर्व पाखंड्यांनीं त्याचा स्वीकार केला; 'तापविमोचनार्थ' तो करावयाचा अशी सार्वत्रिक भाषा असे; व कोणीही अपवाद न होतां व कांकूं न करतां येथूत तेथून सर्व धर्मपिते स्पष्टपणें म्हणत कीं, शुद्धिसंस्कार न होतां मेलेलीं अर्भकें स्वर्गांत जाऊं शकत नाहींत. शुद्धि-संस्कार न झालेल्या कांहीं तरुणांस अपवाद म्हणून स्वर्ग (१) मिळे; पण अर्भकांबद्दल बिलकूल अपवाद न होतां निष्ठुरपणें नियमाची अंमलबजावणी होई.

## शिशुशुद्धिसंस्कार सर्वमान्य होता.

(क० ११). शिशुशुद्धिसंस्काराचा इतिहास लिहिणाऱ्या विद्वान् इंग्रज गृहस्थानें म्हटलें आहे कीं, नवव्या शतकांतल्या रीम्स येथल्या हिंक्मर नांवाच्या धर्माध्यक्षापूर्वीं शिशुशुद्धिसंस्काराच्या उलट मत देणारा आपणांस एकही पुराणाभिमानी आढळला नाहीं (२); याला फक्त एकच अपवाद आहे; तो संत आगस्ताइनचा समकालीन विन्सेन्शियस होय; पण यानेंही आपलें मत पाखंडी म्हणून लागलेंच माघारें घेतलें. हिंक्मरच्या काळीं एका धर्मोपाध्यक्षाचें त्याच्या हाताखालच्या धर्माधिकाऱ्यांशीं व लोकांशीं भांडण झालें होतें; म्हणून त्या धर्मोपाध्यक्षानें आपल्या वृत्तिप्रदेशांत शुद्धिसंस्कार बंद करण्याचें धाडस केलें होतें, तेव्हां हिंक्मर यानें त्या कृत्याचा कडकपणें निषेध केला पण अशी आशा व्यक्त केली कीं, ती बंदी कायम राहील तोंपर्यंत मरणाऱ्या अर्भकांवर त्या बंदीचा परिणाम जो स्वर्गच्युति तो होणार नाहीं. या अपवादाखेरीज अखंड एकमत राहिलें होतें असें दिसतें.

## आनुवंशिकतेसंबंधीं अर्भकांविषयीं धर्मपित्यांचीं मतें.

(क० १२). कांहीं ग्रीक धर्मपित्यांची कल्पना अशी होती कीं, जेथें सुखाचे अगर दुःखाचे भोग कांहींच नाहींत, असें एक विशिष्ट स्थल मुलां-

करितां राखून ठेविलेलें आहे. (क० १३). पण लातिन धर्मपित्यांचा तर्क असा होता कीं, आनुवंशिक दोषामुळें मुलेंसुद्धां दुःखयातना भोगण्याच्या ठिकाणीं पडलीं पाहिजेत; तथापि दोन्ही म्हणजे ग्रीक व लातिन धर्मपित्यांची एका बाबतींत एकवाक्यताच होती; ते दोघेही असंस्कृत अर्भकांस मुक्ति नाहीं असेंच म्हणत. हें मत धर्मांत इतकें दृढतेनें बद्धमूल झालें होतें कीं, आपल्या काळीं कार्यकारणवादी बुद्धीच्या माणसांत अग्रेसरत्व पावलेला व दोषाचें आनुवंशिकत्व बिलकुल झूट मानणारा जो पेलेजियस त्यानें सुद्धां शिशुशुद्धिसंस्कार कायम ठेविला; तो संस्कार पापविमोचनार्थ करावयाचा असतो, असें कबूल केलें; व त्या संस्काराची जरूर नाहीं, असें म्हणण्यास त्याची छाती झाली नाहीं. संस्काराच्या जरूरीच्या मुद्यावर त्याच्या प्रतिपक्षीयांनीं त्यास फार छेडलें; व संत आगस्ताइन म्हणतो कीं, त्याला शेवटीं कांहींशा निराशेच्या मार्गाचा अवलंब करून लेंकरांतला किरकिऱ्या स्वभावाचा दोष दूर करण्याकरितां शुद्धिसंस्काराची जरुरी प्रतिपादावी लागली ( ३ ).

### आगस्ताइनचें मत.

( क० १४ ). या मताच्या परिणामांविषयीं संत आगस्ताइनला जेव्हां छेडलें, तेव्हां त्याला कबूल करावें लागलें कीं, हीं मुलें मुळीं जन्मलींच नसतीं तर बरें होतें, असें हटवादीपणानें म्हणण्यास आपली तयारी नाहीं; तथापि त्यांच्यांसाठीं निराळें ठिकाण राखून ठेविलेलें आहे, हा तर्क त्यासरसा त्यानें जोरानें नाकारला व पेलेजियसच्या अनुयायांविरुद्ध एका निरूपणांत त्यानें असंस्कृत अर्भकें 'चिरंतनाग्नींत' पडतात असें स्पष्ट विधान केलें (४).

### ' दफायदे ' ग्रंथांतील मत.

( क० १५ ). ओरिजेन व पुष्कळ मिसरी गृहस्थ पूर्वजन्माच्या सिद्धान्तानें या मताचा उलगडा (५) करीत. आगस्ताइन आरोपित पुण्याशीं त्याचा संबंध लावी व प्रतिपादी कीं, पुण्य व पाप दोन्ही सारखींच आरोपतां येतात ( ६ ); आणि हें आगस्ताइनचें म्हणणें साधारणपणें सर्वमान्य होतें; असें दिसतें. ' दफायदे ' म्हणजे ' श्रद्धेविषयीं ' या नांवाचा लहानसा एक ग्रंथ आहे. इराझ्मसच्या काळापर्यंत या ग्रंथाचें जनकत्व संत आगस्ताइनवर लादण्यांत येई. आतां मात्र संत फुल्जेन्तियसनें (७) साहाव्या शतकाच्या आरंभीं तो लिहिला; असें प्रसिद्ध आहे. या

ग्रंथाचें प्रामाण्य बराच काळ जितकें मानलें जात असे, त्याहून जास्त प्रामाण्य धर्मपित्यांच्या लेखांपैकीं थोड्यांचेंच असेल. या ग्रंथांत धर्म-पित्यांच्या धर्माचें अत्यंत स्पष्ट व जोराचें सार शिल्लक राहिलें आहे. या ग्रंथांत त्या मताचा स्पष्ट उल्लेख पुढें दिल्याप्रमाणें आहे. तो संत म्हणतो, "ज्यांना विवेकशक्ति प्राप्त झाली आहे, अशा मोठ्या माणसांनाच नव्हे, तर आणखी आईच्या पोटांत ज्यांच्या जीवनास आरंभ होऊन तेथेंच त्याची समाप्ति झाली आहे, अथवा जीं जन्म झाल्याबरोबर मेलीं आहेत, अशा लहान अर्भकांनाही पिता, पुत्र व पवित्र आत्मा यांच्या नांवानें शुद्धिसंस्कार झाला नसेल, तर कधींही न विझणाऱ्या अग्नींत चिरंतन यातना भोगण्याची शिक्षा झालीच पाहिजे; कारण या अर्भकांनीं स्वत:च्या इच्छेनें जरी पाप केलेलें नाहीं, तरी ज्या अर्थी या नरदेहाच्या रूपानें त्यांचा गर्भ-संभव व जन्म झाला, त्या अर्थी आद्यपापाचा दोष त्यांनीं आपल्याबरोबर आणलाच आहे" (८). यासंबंधांत हेंही ध्यानांत ठेवण्यासारखें आहे कीं, आपल्या जन्मापूर्वी चार हजार वर्षांमागें कोणी एकानें एक फळ खाल्लें; त्यामुळें या जगांत केवळ एक क्षणभरही जीं जिवंत राहिलीं नाहींत, अशा अर्भकांना चिरंतन अग्नींत पडावें लागतें; असें प्रतिपादणारे हे संत त्या अर्भकांची उत्पत्ति व मृत्यु हीं परमेश्वराचीं स्वतःचीं, वैयक्तिक, स्वतंत्र कृत्यें होत; असेंही प्रतिपादीत.

## मध्ययुगांत या मताचा माग सांपडतो.

( क० १६ ). या मताच्या प्रभावाचा छडा सर्व मध्ययुगभर लावतां येतो. प्रत्यक्ष शुद्धिसंस्काराच्या ऐवजीं जे भोळसट असंख्य पर्याय निघाले होते, त्यांत हा प्रभाव दिसतो. धर्मांत सांगि-तलेल्या शिक्षेमुळें भयभीत झालेल्या आयांनीं आपल्या अर्भकांना असा भयंकर दंड भोगावा लागू नये म्हणून ज्या असंख्य प्रकारच्या युक्त्या योजिल्या, त्यांहून विलक्षण, त्यांहून कारुण्यपूर्ण, अशी दुसरी कोणतीही गोष्ट निःसंशय असूं शकणार नाहीं.

## शुद्धिसंस्काराऐवजीं योजिलेलीं तंत्रें.

कधीं कधीं शुद्धिसंस्काराचें पाणी गरोदर बायको आपल्या पोटावर शिंपडी. कधीं कधीं मूल मृत जन्मलें असतां तेव्हांच त्याला शुद्धिसंस्कार करित;

मनांत आशा ही कीं, परमेश्वराच्या घरीं हा शुद्धिसंस्कार मागेंच झाला असें धरिलें जाईल; कधीं कधीं गर्भांतलें मूल जगांत येण्यापूर्वींच आपल्या सद्यःफलदायी सामर्थ्यानें पवित्र आत्म्यानें त्या अर्भकाची शुद्धि करावी म्हणून पवित्र आत्म्याचें आई आवाहन करी. कधीं कधीं प्रभुभोजनांतील रोटीचा स्वतः अंगीकार करून अथवा मोक्ष संपादन करून आपल्या अर्भकासाठीं, त्याची योजना करी. हे व असले प्रकार ( ९ ) सर्व मध्ययुगभर चालू होते.

## या तंत्रांचें निर्मूलन करण्याचे प्रयत्न फुकट कां गेले ?

त्यांचें निर्मूलन करण्याचा प्रत्येक प्रयत्न फुकट गेला. हे प्रकार बिलकूल निष्फळ होत; असा लोकग्रह उत्पन्न करण्यासाठीं केलेले कडक निषेधही व्यर्थ गेले. याचें कारण काय ? तर धर्मांत सांगितलेल्या या भयंकर शिक्षेनें आयांचीं अंतःकरणें दुःखानें पिळून जात; व तें दुःख त्या सोशिक काळांतही आयांना सोसण्यास भारी होतें. निर्बळ मनाच्या व भोळसट अबला ज्या कधींही स्वप्नांतसुद्धां धर्मोपदेशकांच्या उपदेशाविरुद्ध बंड करण्याचें मनांत आणणाऱ्या नव्हत, त्यांनाही आपल्या अर्भकांनीं चिरंतन यातना भोगल्यावांचून सुटका नाहीं हें मत बरें वाटेना; व या अडचणींतून पार पडण्यासाठीं भोळसट गोष्टींत आणखी नानाप्रकारची भर घालून अगर त्या भोळसट प्रकारांच्या अंगीं खऱ्या धार्मिक गोष्टींहून गुण आणण्याचें सामर्थ्य अधिक आहे, असें मानून व्यर्थ खटपट करीत. पण धर्मज्ञानपंडितांची दक्षता अविश्रांत असे. आपल्या अर्भकांचें तारण झालें अशी मनाची निश्चिंती करून घेण्यास आया जे जे प्रकार योजीत, ते ते त्यांचा निषेध करणाऱ्या धर्मपरिषदांच्या ठरावांत नमूद आहेत.

## धर्मसुधारणेचे अंतिम परिणाम.

( क० १७ ). शेवटीं धर्मसुधारणेचा समय येऊन ठेपला. या प्रचंड चळवळीचें स्वरूप अजमावतांना तिचे तात्कालिक उद्देश व अंतिम परिणाम यांत काय भेद होता, तो काळजीपूर्वक समजून घेतला पाहिजे; ही प्रचंड चळवळ ज्या प्रवृत्तीचें अंशतः कारण व अंशतः परिणाम होय, ती प्रवृत्ती सरते शेवटीं कार्यकारणवादी विचारौघाच्या प्रसारानें दृग्गोचर झाली व ह्या ओघाला अटकाव करण्याचें सामर्थ्य कोणत्याही

धर्मपंथांत नव्हतें; मग तो पंथ कितीही प्रतिगामी अगर हटवादी मतांचा असो. या विचारौघाचें सार असें कीं, विशिष्ट श्रद्धेच्या वचनांचा अर्थ विश्वधर्मांच्या तत्त्वांनीं बसवावयाचा; म्हणजे मानवी प्रकृतींत सहजात दिसणाऱ्या ज्या वासना, आकांक्षा, व नैतिक वृत्ती, तदनुरोधानें बसवावयाचा; पर्यायानें तेंच असें मांडतां येईल कीं, खरें-खोटें, बरें-वाईट, ठरवावयाचें तें संप्रदायावरून ठरवावयाचें नाहीं; तर आपल्या विवेकाच्या व सदसद्बुद्धीच्या प्रकाशानें ठरवावयाचें असा लोकांच्या मनाचा कल या विचारौघानें झाला. व जेथें या विचारौघामुळें धर्मांत उघड उघड पालट झाला नाहीं, तेथें निदान धर्ममतांच्या प्रचीतींत पालट झाला आहे. आमच्या न्यायाच्या जाणिवेला धक्का पोंचविणारीं मतें हळूहळू प्रचारांतून जाऊं दिलीं गेलीं आहेत; अथवा तीं मतें कोणीं पुढें आणलींच तर तीं इतक्या मिळमिळीत व संदिग्ध भाषेंत सांगितलीं जातात व त्यांना इतके अपवाद व वैशिष्ट्यावहक शब्द जोडतात कीं, त्यांतला मूळचा जोर बहुतेक नाहींसा होतो. तथापि धर्मसुधारणेचा हा अंतिम परिणाम होय; तात्कालिक नव्हे, व बहुतेक सुधारकांना त्याचें स्वप्नसुद्धां पडलें नसावें.

### धर्मसुधारणेचे तात्कालिक उद्देश.

त्यांचा बेत इतकाच होता कीं, ख्रिस्ती धर्माच्या पहिल्या चार शतकांत त्याचें जें स्वरूप होतें, तें तसेंच्या तसेंच जास्त प्रचारांत आणावयाचें व ज्याशीं आपण विरोध करितों, त्या धर्माइतकाच हटवादी मर्यादाविशिष्ट व बहिष्कारात्मक धर्म तयार करावयाचा.

### शिशुशुद्धिसंस्कारवीरोधी पंथ.

शिशुशुद्धिसंस्कारविरोधी पंथानें इतके अत्याचार केले व इतकी एकसारखी झोटिंग बादशाहीपर्यंत अवनति करून घेतली कीं, त्या पंथाला धार्मिक पंथ क्वचितच मानतां येईल. तथापि धर्मज्ञानपंडितांचें लक्ष अर्भकांच्या शुद्धिसंस्काराच्या विषयाकडे खेंचलें, एवढा तरी त्याचा चांगला परिणाम झाला. रोमचें मत त्रेंत येथील परिषदेनें स्पष्टपणें सांगितलें. तारणासाठीं शुद्धिसंस्काराची कैवल्येंकरून जरूर आहे, असें त्या परिषदेनें विधान केलें; व कुश्चितपणाच्या तर्कास जागा न रहावी म्हणून तिनें आणखी असें सांगितलें कीं, प्रत्यक्ष पाण्यानें (१०) शुद्धिसंस्कार झाला पाहिजे; आणि शेवटीं नेहमींच्या नियमानुरूप शापही सांगितला.

## प्रतिरोधी पंथांतले दोन विरोधी कल.

प्रतिरोधी पंथांत दोन विरोधी कल उघड दिसत होते. विधी व संस्कार यांत आंगचाच कांहीं गुण असतो, पूजकाच्या मनाचा त्यांत कांहीं संबंध नाहीं, असें जें मत प्रचलित होतें त्याला विरोध करावा; त्याचा जोर-मोड तरी करावा, असा धर्मसुधारकांचा एक प्रथमचा उद्देश होता; या मताला अर्भकाच्या शुद्धिसंस्काराचें आनुकूल्य इतर कोणत्याही एका गोष्टीहून जास्त होतें, हें कळणें कठिण नव्हतें. उलटपक्षीं सनातन पंथाहून जास्तच स्पष्टपणें प्रतिरोधी-पंथ आरोपित पुण्याचें मत उपदेशित असे, व त्यामुळें आरोपित पापाच्या मतावरही पाल्हाळ करण्याकडे त्या पंथाचा जास्त कल असे.

## लूथरपंथी लोकांस शुद्धिसंस्काराची जरूर वाटे.

( क० १८ ). आग्सबर्ग याच्या कबुलायतीनुरूप लूथरपंथी लोकांचें त्रायदंताइन धर्मज्ञानपंडितांच्या ( ११ ) इतकेंच अगदीं जोराचें म्हणणें असे कीं, शुद्धिसंस्काराची कैवल्येंकरून जरूर आहे; व एका बाबींत तर पुष्कळ प्रतिरोधी लोक सनातन्यांच्याही पलीकडे गेले होते; कारण प्रतिरोधीपंथाचा उपदेश स्पष्ट असा आहे कीं, आद्यपापासाठीं ‘ चिरंतन अग्नीची शिक्षा आहे; पण सनातन पंथानें तृतीय स्थलाच्या कल्पनेचा कधींही स्पष्ट निषेध केलेला नाहीं; ही तृतीय स्थलाची कल्पना प्रथम ग्रीक धर्मपित्यांनीं काढली, पंडितंमन्य पंथाच्या लोकांनीं पुनरुज्जीवित केली व धर्मसुधारणेच्या सुमारास सनातन पंथांत फार सामान्य झाली होती ( १२ ).

## काल्विनचें मत.

लूथरच्या अनुयायांपेक्षां काल्विन हा कांहीं अंशीं शुद्धिसंस्कार न झालेल्या अर्भकांस जास्त अनुकूल होता; कारण, त्याचा उपदेश असा असे कीं, श्रद्धावान् माणसांच्या मुलांना निःसंशय तारण मिळालें पाहिजे; शुद्धिसंस्कार करण्याच्या हेतूनेंही तो संस्कार केल्याइतकाच गुण येतो; आणि जरी शुद्धिसंस्कार राखला पाहिजे, तरी निकोदिमसशीं झालेल्या संभाषणांतलि वचनांचा अर्थ याच्या पूर्वीं सर्वत्र जसा शुद्धिसंस्कारपर होत असे, त्याहून निराळा होण्यासारखा ( १३ ) आहे. पण काल्विन व

तदनुयायी हे संस्काराच्या अंगीं विलक्षण गुण असतो, असें मानण्यास राजी नव्हते म्हणूनच केवळ त्यांचीं मतें वरच्यासारखीं होतीं; आनुवंशिक दोष मानण्यास त्यांना कांहीं नैतिक तिटकारा वाटत होता, म्हणून तीं तशीं झालीं होतीं, असें नव्हे. मानवी प्रकृतिच अगदीं अधम, अशा प्रकृतीला नरकवास हीच शिक्षा, व पुष्कळ अर्भकांना चिरकाल नरकवासाची प्राप्ति, या गोष्टी दुसऱ्या कोणत्याही पंथानें जास्त सतत व जोरानें सांगितल्या नाहींत.

## शिक्षेंत बहिष्काराचें तत्त्व असतें, असें मानणाऱ्याचें अर्भकशुद्धिसंस्काराविषयीं मत.

शुद्धिसंस्कार झालेल्या अर्भकांना सर्वांनाच तारण मिळेल, ही गोष्टही चिरकाल बहिष्काराचें तत्त्व शिक्षेंत असतें, अशा मतांचे थोडेसे जे कळकळीचे पुरस्कर्ते आहेत ते मान्य करीत नाहींत; ते प्रतिपादतात कीं, कांहीं मुलांच्या नशिबीं सर्वशक्तिमान् ईश्वरानें नरकवासच लिहिला असेल. ते सर्व असें म्हणत कीं, ज्यांना तारण प्राप्त होतें, त्या अर्भकांस तें ख्रिस्ती धर्माशीं त्यांचा संबंध असतो म्हणून होतें; तीं स्वतः निष्पाप असतात म्हणून होत नसतें. ते सर्व असेंही म्हणत कीं, मूल जेव्हां या जगांत येतें तेव्हां तें दोषलिप्त असतें व त्याला चिरकालिक नरकवास ही शिक्षा ठरलेलीच असते.

## जोनाथन एद्वर्द्स.

( क० १९ ). काल्विनच्या पंथाचें बहुधा अत्यंत सामर्थ्यानें व तसेंच अगदींच कच न खातां मंडन करणारा जो जोनाथन एद्वर्द्स त्यानें आपल्या युक्तिवैभवाचें सर्व बळ या विषयाला अर्पण केलें आहे. अर्भकांच्या मृत्यूवरून व त्या मृत्यूच्या वेळीं त्या अर्भकांना सोसाव्या लागणाऱ्या यातनांवरून संत आगस्ताइननें काढलेल्या प्रमाणांचें जास्त स्पष्टपणें याच्यापूर्वी कोणत्याही लेखकानें संवर्धन केलें नाहीं; पण परमेश्वरानें उत्पन्न केलेल्या जिवांशीं परमेश्वराचा संबंध काय असतो, याचीं या लेखकानें दिलेलीं मुख्य उदाहरणें कानानचे रस्ते प्रेतांनीं भरून टाकणाऱ्या व यहुद्यांची तरवार शिशुरुधिरानें चिरलांछित करणाऱ्या कत्तलीच्या देखाव्यांवरून घेतलेलीं आहेत ( १४ ).

## धर्मसुधारणेनें काय केलें.

(क० २०). तर मग येथपर्यंत धर्मसुधारणेनें मुळींच पालट केला नाहीं अगर फारच अल्प केला आहे असें दिसतें. सनातनपंथी मत जरी पाषाणहृदयी व तिरस्करणीय दिसतें, तरी तें हटवादी मतांच्या व पुराणप्रिय प्रतिरोधी पंथाच्या दोन मोठ्या संस्थापकांच्या मतांशीं तुलून पहातां हार खाईल असें नाहीं. ज्या काळीं मनोवृत्तींच्या लाटा उंच उसळत होत्या, ज्या काळीं सनातन व सुधारलेला पंथ यांत पडलेली फूट वाढविण्याकडे सर्व कल होता, म्हणजे ज्या काळीं आनुवंशिक पापाच्या सनातनपंथी मताविरुद्ध बंड माजवण्याचा कल स्पष्ट उघड झाला असता, त्या काळीं त्या मताचीं मुख्य तत्त्वें सर्वस्वी मान्य झालीं. संस्कारांचें स्वरूप, धर्मसत्तेचे प्रकार, पवित्र शास्त्रांतील विशिष्ट वचनांचा अर्थ, धर्मज्ञानपद्धतींतील निरनिराळ्या भागांचा योग्य अनुक्रम व उंचनिंचपणा ह्या प्रश्नांचा अत्यंत अशांत व कडव्या आवेशानें खल झाला. त्या वादानें सर्व युरोप हादरलें होतें; व अत्यंत उत्कट कळकळ दिसूं लागली होती. पण या कळकळीचा सर्व जोर व सामर्थ्य हटवादीमतांच्या पात्रांतून वाहत होतें. विचाराच्या प्रदेशांत सार्वभौमत्वप्राप्तीस्तव तर्कसंमत कार्यकारणाभिज्ञतेचें तें बंड नव्हतें; आपल्या उपदेशाच्या आड येणाऱ्या मतांविरुद्ध नीतिवृत्तीची ती पुंडाई नव्हती; अगर अशीं बीजें त्यांत असलीं, तर तीं त्यावेळीं अनुद्दिष्ट व गुप्तरूपानें होतीं व प्रतिरोधीपंथाच्या पहिल्या उकळ्यांतली त्यांची जागा साफ खालच्या दर्जाची होती. कार्यकारणवादाचें बीज पेरलें होतें खरें, पण त्याला अंकुर फुटण्यास एका शतकाहून जास्त वर्षे लागलीं. नीतीच्या थोर थोर प्रश्नांहून विलक्षण महत्त्व ज्यामुळें उत्पन्न झालें नाहीं, अशा प्रभुभोजन-संस्कारांतल्या विधींच्या अर्थासंबंधीं बारकाई नव्हती, आपल्या श्रद्धेसंबंधीं अत्युत्तम प्रमाण समजून लोकांनीं ज्या शेवटच्या न्यायासनापुढें आपले खटले मांडिले असते, तें न्यायासन म्हणजे सदसद्विवेक होय. कोणते ऐतिहासिक प्रमाणग्रंथ अत्यंत योग्य, याविषयीं बराच संशय होता; पण धर्मज्ञानाचा शेवटचा आधार ऐतिहासिक असला पाहिजे याबद्दल संशय नव्हता.

## वरील विधानाला दोन अपवादक सुधारक.

( क्र० २१ ). तथापि या विधानाला दोन प्रमुख अपवाद आहेत. या दोन धर्मज्ञानपंडितांच्या मतांमध्यें व परिस्थितीमध्यें महदंतर होतें; तथापि त्या दोहोंच्या मनांत प्रेरणा करणारें तत्त्व कार्यकारणवादात्मकच होतें. सत्यासत्य व भलेंबुरें याविषयींच्या आपल्या कल्पना सदसद्विचारशक्ति व कार्यकारणाभिज्ञता यांच्या निकालांवरून बसविण्याची व संप्रदायानुरूप बसविलेल्या अर्थाकडे दुर्लक्ष करून आपल्या श्रद्धेला आपल्या ध्येयाचें वळण लावून त्या ध्येयाशीं तिचा मेळ बसेल असें करण्याची त्या उभयतांस संवय होती. या पंडितांचीं नांवें सोसिनस व झ्विंग्लियस होत. प्रतिरोधी पंथाच्या पहिल्या काळांतील कार्यकारणवादाचे हे दोन्ही पंडित प्रतिनिधि समजतां येतील.

## सोसिनसचा पंथः इतालींतली अनुकूल परिस्थिति.

( क्र० २२ ). लिलियस सोसिनस यानें विसेंझा येथें जो तत्त्वज्ञानपंथ स्थापण्यास साहाय्य केलें व ज्याचा प्रसार युरोपच्या बऱ्याच मोठ्या भागांत सोसिनसच्या विशेष प्रख्यात भाच्यानें इतर इतालियनांच्या मदतीनें केला, तो पंथ म्हणजे इतालींत कित्येक शतकें जी परिस्थितिपरंपरा लागली होती, तिचें स्वाभाविक फळ होय. इतालींतल्या लोकसत्ताक संस्थानांची थोर संपत्ति, नाना देशांतील व धर्मांतील लोकांशीं त्यांचा व्यापारामुळें जडलेला संबंध, त्या सर्व देशभर पसरलेलीं पेगन धर्माचीं असंख्य स्मारकें व रामणीयकतेचा त्या देशांत सामान्येंकरून झालेला थोर उत्कर्ष, या सर्व गोष्टींनीं नाना अंशांनीं व नानाप्रकारांनीं इताली देशांत बौद्धिक कामांची विलक्षण आवड व त्यांचें संवर्धन करण्याची विलक्षण सोय तयार होण्यास मदत झाली होती. कान्स्तान्तिनोपलच्या ऱ्हासानंतर जेव्हां ग्रीक विद्वानांना बौद्धिक पुनरुज्जीवनाचीं बीजें बरोबर घेऊन परदेशवास पत्करावा लागला, तेव्हां इतर कोणत्याही देशापेक्षां इतालींत ते ज्यास्त आले. इतालींतले राजे हे त्यांना अत्यंत उदार व गुणाभिज्ञ पुरस्कर्ते मिळाले व इतालींतलीं विद्यापीठें हीं अत्यंत अनुकूल निवासस्थानें मिळालीं. पादुआ व बोलोना त्यावेळीं अनिर्बंध विचाराचीं केंद्रें होतीं. या विद्यापीठांत पुष्कळ विद्यागुरूंनीं तत्त्व-

विचारांत अठराव्या शतकांतल्या इतकी निर्भीडपणें मजल मारली होती व लहानशाच परंतु समर्थ विद्वन्मंडळाला धर्मज्ञानसंबंधीं प्रश्नांचें परीक्षण अत्यंत निःस्पृह चिकित्सेनें करण्याची संवय लाविली होती; या गुरूंत पाम्पोनेशियस सर्वांत प्रमुख दिसतो.

## विचाराचीं दोन मंडळें.

हे गुरु प्रतिपादीत कीं, विचाराचीं दोन मंडळें आहेत; एक कार्यकारणाभिज्ञतेचें मंडळ व दुसरें श्रद्धेचें मंडळ; हीं दोन मंडळें परस्पर अगदीं भिन्न आहेत. ते तत्त्वविवेचक असल्यामुळें व कार्यकारणाभिज्ञतेची कास धरून चालत असल्यामुळें, बिलकूल कच न खाणाऱ्या अत्यंत धाडशी संदेहवादाचीं प्रमेयें त्यांनीं विस्तरशः प्रतिपादिलीं. ते सनातनपंथी असल्यामुळें व श्रद्धेच्या प्रेरणेनें चालत असल्यामुळें, आपल्या पंथाच्या सर्व मतांना त्यांनीं निमूटपणें मान्यता ( १५ ) दिली. कोणतींही मतें श्रद्धा म्हणून स्वीकारलीं, एवढ्यानेंच त्या मतांचा कार्यकारणाभिज्ञतेच्या आधारानें प्रत्यादेश करण्यास त्यांना बिलकूल अडथळा वाटत नसे. या दोन विचारमंडळांची पूर्ण फारकत केल्यामुळें केवळ सांसारिकरीत्या व अनन्यसाधारण धैर्यानें आपल्या बुद्धिप्रदेशांतील तात्त्विक विचारांची पाठ पुरवण्याची त्यांना ताकद आली; सनातन पंथांतही हा दुटप्पीपणा फार वेळ टिकूं शकला नाहीं.

## त्याचा प्रतिरोधी पंथाशीं बेबनाव.

पण प्रतिरोधी पंथाशीं तर त्याचा उघड उघड बेबनाव होता. कारण, प्रतिरोधी पंथाचें निदान ब्रीद तरी असें होतें कीं, मनुष्याचें जें स्वमनःपूत मत तोच त्यानें आपल्या श्रद्धेचा आधार करावा. विवेकविहीन मान्यता म्हणून जो श्रद्धेचा प्रकार धर्मज्ञानांत होता तो नष्ट झाला; व कार्यकारणाभिमत जेवढे विचार तेवढेच कायम राहिले. या सर्वांचा परिणाम असा झाला कीं, इतालींतल्या धर्मसुधारणेची मर्यादा लहानशा विद्वन्मंडळापुरतीच बहुतेक राहिली; या विद्वानांनीं मात्र आपल्या तत्त्वांची सीमा करितां येईल तितकी विस्तीर्ण केली; व असें करितांना विवेकशास्त्राचा कच न खातां उपयोग केला, संप्रदाय व परिणाम यांची मुरवत ठेविली नाहीं, व विशेषतः अन्यत्र न आढळणारी

सांसारिक दृष्टि वापरली. सोसिनसच्या नांवाशीं संलग्न जीं विशिष्ट मतें त्यांच्याशीं सध्यां आपणास यत्किंचित् कर्तव्य नाहीं; कारण, धर्मज्ञानाचीं मतें व धर्मज्ञानांतली रीत हे दोन अगदीं वेगळे प्रश्न आहेत.

### सांप्रदायिक मतांना कमी दर्जाचीं मानण्याची सोसिनसची इच्छा.

( क० २३ ). तथापि हें हवें तितकें उघड आहे कीं, सोसिनस यानें आपल्या अनुयायांहून आविर्भवनाच्या प्रामाण्यावर जरी जास्त जोर दिला होता, तरी त्याला अंतःप्रेरणा करणारी नित्याची प्रवृत्ति म्हटली म्हणजे सांप्रदायिक मतांना सदसद्विवेकबुद्धीच्या व कार्यकारणाभिज्ञतेच्या आदेशांच्या खालीं लेखण्याची त्याची इच्छा होय; व त्याची अर्थनिर्णयपद्धति याच इच्छेचें फळ होय. आणखी हेंही उघड आहे कीं, प्रमादाची पापमयता व दोषाची आनुवंशिकता हीं जीं दोन पुराणप्रिय पंथाचीं मतें त्यांचा पूर्ण कडकपणें अव्हेर करण्यास तो प्रवृत्त झाला, त्याचेंही कारण ही त्याची इच्छा (१६).

### झ्विंग्लियस व सोसिनस यांच्यांतील विरोध व साम्य.

( क० २४ ). झ्विंग्लियस व सोसिनस यांच्या चरित्रांत अल्पांशीं तरी साम्य आहे, असें दर्शविणें म्हणजे सकृद्दर्शनीं एक विलक्षण विरोधाभास वाटेल. लोकप्रियतेची धग व वादविवादाची वावटळ न डगमगणाऱ्या शांततेनें सोसणारा व सरते शेवटीं रणभूमीवर देह ठेवणारा झूरिचचा सरळ मनाचा व धीट धर्मोपदेशक कोठें ! व एका दरबाराहून दुसऱ्या दरबारास व एका विद्यापीठाहून दुसऱ्या विद्यापीठास असा फिरत राहून जन्म घालविणारा, विरोध व कुप्रसिद्धि यांच्या भयानें कांपणारा व धार्मिक सहनशीलतेचीं थोर तत्त्वें आपल्या सौम्य रीतिभातींनीं मोहनी पडलेल्या थोड्याशा मित्रांच्या मनांत बहुतेक घाबरटपणानें भरवून देणारा भित्रा इतालियन कोठें ? त्यांच्या चरित्रांत खरोखर बहुधा झगझगीत विरोधच आहे. ज्यांना सोसिनियनपंथाची म्हणून म्हणतात त्या मतांना झ्विंग्लियस अगदीं पारखा होता, व या दोन सुधारकांच्या पूर्वचरित्रांत बिलकुल साम्य नाहीं; हेंही खास. तथापि झ्विंग्लियसचा मुख्य पूर्ण कलही सर्व मतांचा अर्थ सदसद्विचार व कार्यकारणाभिज्ञता यांच्या पूर्वकृत कल्पनांप्रमाणें बसविण्याकडे होता; यांत संशय असूं शकणार नाहीं असें वाटतें. सामान्याहून वरच्या पायरीचें बुद्धिसामर्थ्य असूनही विद्वत्तेचा गर्व वाहण्या-

सारखें त्याच्या आंगीं कांहीं नव्हतें; आणि ज्याकाळीं संप्रदायाच्या तडाक्यांतून सुटण्याचा माणसें प्रयत्न करित असतात, त्याकाळीं हा गाढ विद्वत्तेचा अभाव म्हणजे कधीं कधीं अत्यंत महत्त्वाचा व खास फायदा देणारा ठरतो.

### झ्विंग्लियसच्या मनाचा कल लहानपणींच दिसून आला.

त्याच्या मनाचा कल लहानपणींच त्यानें प्रभुभोजनसंबंधाच्या वादविवादांत जो पक्ष अंगीकारला होता, त्यावरून दिसून येतो. प्रमुख धर्मसुधारकांच्या मनाची इतकी डळमळ करणारा, आपल्या जुन्या श्रद्धेशीं फारखत करण्यांत त्यांना इतकी अडचण भासविणारा, याच्या इतका दुसरा कोणताही एकाकी विषय नव्हता. कार्यकारणाभिज्ञतेचें म्हणणें स्पष्टपणें एका तर्फेचें होतें; संप्रदायाचा सर्व भार दुसऱ्या तर्फेला होता; व पवित्र शास्त्राच्या भाषेचा अर्थ दोन्ही तर्फांस अनुकूल होण्यासारखा होता. लूथर एकपदार्थत्वापलीकडे कधींही गेला नाहीं; काल्विन दोन्ही बाजूंस खूप झोके खात खात एकदांचा ठाम मताला येऊन पोंचला; इंग्लंदांतील सुधारक कधीं तरी निश्चित विषयाशीं येऊन ठेपले असें क्वचित् म्हणतां येईल.

### प्रभुभोजनाविषयीं झ्विंग्लियसचें मत.

( क० २५ ). एकट्या झ्विंग्लियसनें काय तें इंद्रियांच्या साक्षीशीं मेळ बसणारें तेवढेंच मत पहिल्यापासून पूर्ण खात्रीनें प्रतिपादिलें, तें पारदर्शक निश्चिततेच्या भाषेनें मांडलें, व त्याची अढळ चिकाटी धरली होती. जेथें जेथें संप्रदाय व सदसद्विचार यांच्यांत लढा पडतो, त्या त्या मुद्यांसंबंधीं त्याच्या निर्णयांत याहून जास्त स्पष्टपणें हाच कल दिसे. लूथर, काल्विन, मेलांक्थान, इराझ्मस वगैरेंच्या काळीं कित्येक स्वकालीनांच्यांहून बुद्धिसामर्थ्यांत बराच कमी असूनही झ्विंग्लियसनें बहुतेक एकट्यानें प्रमादाची निष्पापता व तत्संबंधीं दाखवावयाची सहनशीलता यांविषयीं सतराव्या शतकांतल्या कार्यकारणात्मक मताची पूर्वावृत्ति करावी ही गोष्ट खात्रीनें विशेष ध्यानांत बाळगण्यासारखी आहे. आद्यपापाच्या प्रश्नासंबंधीं धर्मसुधारणेच्या इतर म्होरक्यांहून अशाच धिटाईनें त्यानें निराळें मत दिलें; तो असें प्रतिपादी कीं, आद्यपाप म्हणजे विकर्मप्रवृत्ति अगर रोग आहे, त्याहून जास्त कांहीं नाहीं; व त्यानें अल्पांशानेंही दोष लागत नाहीं ( १७ ).

## आनुवंशिक पाप व शिशुशुद्धिसंस्कार यांत कार्यकारणाभिज्ञतेचा निर्णय.

( क० २६ ). धर्मसुधारणेचे दोन म्होरके याप्रमाणें आपल्या कार्यकारणाभिज्ञ मन:प्रकृतीमुळें आनुवंशिक पापाची कल्पना व तत्संलग्न शुद्धिसंस्कारविहीन अर्भकांविषयींचें मत सोडून देण्यास प्रवृत्त झाले. तेव्हांपासून मतांचा ओघ त्याच दिशेनें वाहत असेल तर कार्यकारणाभिज्ञतेच्या प्रवृत्तीचा प्रसार वाढला हें त्याचें सर्वस्वी कारण होय; त्या मतांचा प्रसार करण्यास मुद्दाम कोणीं खटपट केली अगर कांहीं निश्चित प्रमाणें पुढें आणलीं म्हणून त्या दिशेनें ओघ वाहत राहिला असें नव्हे. मनुष्यांच्या आंगीं बऱ्या–वाइटाची जी स्फूर्तिमय जाणीव असते, तिच्या आधारानें प्रत्येक मताचा निकाल मनुष्यें सहजगत्या व नकळत करूं लागलीं व या कसोटीस न उतरणारीं सर्व मतें झुगारून देऊं लागलीं, दृष्टीआड करूं लागलीं, अगर त्यांची कशी तरी वाट लावूं लागलीं; मग त्यांच्या सत्यतेबद्दलचें प्रमाण केवढें कां भारदस्त असेना.

### ही निर्णयपद्धति विजयी होत चालली.

निर्णयाची ही पद्धत मागें एकदां जी विरळ होती ती आतां सर्वसाधारण झाली. दर पिढींत या पद्धतीचा विजय जास्तच दिसतो; व धर्मज्ञानाच्या शाखांच्या शाखा त्या पद्धतीच्या प्रभावानें एक तर नजरेआड जाऊन गडप झाल्या आहेत; नाहीं तर उजेडांत येऊन झळकूं लागल्या आहेत ( १८ ). शुद्धिसंस्कारहीन मुलांविषयींच्या मतांत केवढा पालट झाला आहे हें जो कोणी लौकिक उपदेशांतून जुनें मत कसें साफ निघून गेलें व त्याच्या नुसत्या विधानानें कसा तीव्र व सार्वत्रिक तिरस्कार उत्पन्न होतो याचा विचार करील त्याच्या नजरेस येईल. एकदां हें मत म्हणजे केवळ स्वयंसिद्ध सत्य होतें; पण आतां त्याच्यायोगें राग व कंप उत्पन्न होतो. हा पालट किती जबरदस्त आहे, हें पहावयाची इच्छा असेल तर क्वेकर ( परपीडापराङ्मुख ) व बाप्तिस्त ( शुद्धिसंस्कार ) पंथांची सर्व ख्रिस्ती धर्मांत जी स्थिति आहे, तीवरून दिसेल.

### या दोन पंथांची बहुमान्यता.

ख्रिस्ती धर्माच्या आरंभींच्या काळीं या पंथांहून ज्या विषयींचा तिरस्कार जास्त निव्वळ वाटता अथवा तारणक्षेत्रबाह्यता जास्त निर्विवाद वाटती,

पात्र होत; व या शिक्षेचें स्वरूप म्हणजे जडात्मक जिवंत अग्नींत चिरकाल जळत रहावयाचें; असें ते नित्य सांगत.

### ख्रिस्ती धर्मांत नवीन येणाऱ्याची या मतानें होणारी स्थिति.

असलें मत कोणत्याही काळीं व कोणत्याही परिस्थितींत मनाला अवर्णनीय धक्का देणारें वाटावयाचें; परंतु या धर्मात ज्या नवीन येणाऱ्यानें या मताचा अंगीकार केला व आपल्या स्वतःच्या सुगतीसाठीं हें मत ज्यांत आहे ती धर्मपद्धति म्हणजे शुभवार्ता होय असें जगजाहीर केलें, त्यानें आपल्यास जन्म देणाऱ्या आईला, आपल्यास स्वतःच्या मांडीवर लडिवाळपणें खेळविणाऱ्या बापाला, लहानपणच्या व तरुणपणच्या आपल्या सौंगड्यांना, आपल्या सर्व देशबांधवांना, व आपल्या अंतःकरणांत स्वतःच्या चरित्रानें व बोधवचनांनीं प्रथम नीतीची ज्योत पाजळणाऱ्या धर्मवीरांना व साधुसंतांना चिरंतन नरकवास भोगावा लागेल हें मान्य केलें पाहिजे; असा विचार मनांत आला म्हणजे तें मत अत्यंत विलक्षणपणें मनाला धक्का देणारें वाटतें. या सर्वांना एकसारखीच शिक्षा चिरकाल भोगावयाची होती.

### ख्रिस्ती धर्मपित्यांची एक आवडती उपमा.

( क० २८ ). एवढ्याच लोकांना ती भोगावयाची होती असें नव्हे. पाखंड्यांकरितां सुद्धां तीच शिक्षा राखून ठेविली होती; मग त्यांचा प्रमाद अत्यंत तुच्छ कां असेना ? धर्मपित्यांची ख्रिस्ती धर्मसंस्थेसंबंधीं एक आवडती उपमा असे; ती संस्था म्हणजे नाशरूपी अमर्याद महासागरावर तरंगणारी नौका होय. त्या नौकेच्या आंत तारण आहे; तिच्या बाहेर तारण अशक्य. ‘ नोहाच्या नौकेबाहेर राहिलेला कोणी जलप्रलयांतून वांचला असेल, तर ख्रिस्तीधर्मबाह्य मनुष्यास तारण मिळणें शक्य’ असें संत सिप्रियननें लिहिलें आहे. ओरिजेन म्हणतो कीं, ‘ या घराबाहेर, म्हणजे या ख्रिस्ती धर्माबाहेर, कोणाला तारण नाहीं. ’ संत आगस्ताइन म्हणतो, ‘ ख्रिस्ताला ज्यानें गुरु केला नाहीं त्याला तारण व चिरकालिक जीवन लाधणार नाहीं; पण जो त्याच्या मंडळींत म्हणजे ( १९ ) धर्मसंस्थेंत सामील झाला नाहीं त्याला ख्रिस्त गुरु मिळणार नाहीं.’ संत फुल्जेंतियस आणखी म्हणतो ‘ बळकट विश्वास धरा, व नुसते पेगनच नव्हत तर जे सर्व यहुदी, पाखंडी व दुफळी करणारे सनातन धर्माच्या बाहेर

राहूनच या जगांतून प्रयाण करतात ते चिरंतन अग्नींत जाण्याकरितां निघतात, सैतान व तदनुयायी देवदूत ( २० ) यांना बळी म्हणून तयार राहतात, याबद्दल शंका बाळगूं नका. ' हें मत इतकें प्रमुख व निर्विवाद मानलें जात असे कीं, चवथ्या शतकांतल्या कार्थेज येथील धर्मपरिषदेनें प्रत्येक धर्मोपाध्यक्षाला दीक्षा देण्यापूर्वी विचारण्याचे जे परीक्षेचे प्रश्न त्यांत याची गणना केली होती (२१).

## या मताचें इतर तात्त्विक मतांहून भिन्नत्व.

कदाचित् इतर कोणत्याही तात्त्विक मताहून या मताचा प्रभाव मानवी इतिहासावर जास्त झाला आहे. प्राचीन काळच्या प्रख्यात उपदेशकांच्या ज्या कल्पना ठरल्या होत्या, त्यांहून हें किती भिन्न आहे तें, त्या उपदेशकांना ' आत्मा नित्य आहे ' हें मत किती प्रिय असे, मृत्यूच्या आगमनाची किती शांततेनें ते वाट पहात असत, ( २२ ) व मरणोत्तर काळाकडे ते किती साभिलाष बघत असत, याची ज्याला ज्याला माहिती आहे त्याच्या त्याच्या उघडपणें लक्षांत येईल. अन्यायानें शिक्षा देऊन चुरडून टाकला असतां ज्यानें आपल्या पट्टशिष्यांस सभोंवतीं जमवून त्यांच्यांशीं आत्म्याच्या अमरत्वाविषयीं, सदाचरणाच्या उत्तम फळाविषयीं, व देवांच्या चांगुलपणाविषयीं बुद्धिवाद केला, व मग स्मितपूर्वक मृत्युदायक विषचषक प्राशन करून आपल्यास ऐहिक जीवनाच्या रोगांतून मुक्त केल्याबद्दल भिषग्देवतेचे आभार मानीत इहलोकांतून प्रयाण केलें, त्या ग्रीक महात्म्याचें लोकांना कधींही विस्मरण होणें शक्य नाहीं. ' न्यायानें वागणारास मरणाची भीति नको ' ( २३ ), मनापासून स्वकर्तव्य करण्याचा प्रयत्न जरी अर्थात् अपूर्ण असणार यांत संशय नाहीं, तरी तो करणाऱ्यास मरणोत्तर कशाचीही भीति नाहीं; ही मनाला शांति देणारी श्रद्धा प्राचीन काळच्या थोर माणसांत असे. सत्याचा निष्पक्षपाती, अंधुकरहित व धीट मनानें शोध करणें हें मनुष्यांचें एक अत्यंत उदात्त अतएव अत्यंत निष्पाप कर्तव्य आहे. या श्रद्धेच्या प्रेरणेनें प्राचीन काळच्या सर्व तात्त्विक विचारांचा उद्भव झाला.

## ही ज्योत सर्वत्र पेटलेली आहे.

ही ज्योत केवळ अथवा मुख्यत्वें आथेन्सच्या उपवनिकांत प्रकाशमान झालेली आढळते, असें नाहीं. सर्वशक्तिमान परमेश्वराला प्रिय अशी

त्याची सेवा कोणती ? तर मनुष्यानें आपलें चरित्र न्यायमय, दयामय व नम्रतामय, करावें असा उपदेश करणाऱ्या धर्मसंस्थापकाच्या बोलण्यांत; मनुष्याच्या सर्व कर्तव्याचें सार देवाची भीति बाळगावी व त्याच्या आज्ञा पाळाव्या असें थोडक्यांत सांगणाऱ्या सुज्ञ माणसाच्या शब्दांत; खऱ्या धर्माची व्याख्या दया व पावित्र्य या दोन शब्दांनीं करणाऱ्या प्रेषिताच्या सांगण्यांत; खरी ईश्वरपूजा म्हणजे केवळ मानसिक, व अंतींचा न्याय म्हणजे मनुष्यांचें त्यांनीं अवलंबिलेल्या पंथाच्या मतांवरून नव्हे, तर त्यांच्या आचरणावरून, वर्गीकरण होय असा घोष करणाऱ्या वरच्या पायरीच्या सर्वांहून श्रेष्ठ उपदेशकाच्या वाणींत; कार्यकारणभावाला आपल्या श्रद्धेची उदात्त व्याहृति नेहमीं सांपडते हें विसरतां कामा नये.

## तारण एकट्या खिस्ती धर्मांतच आहे, हें मत सर्वसंमत होतें.

( क० २९ ). हें कसेंही असो; तथापि जेव्हां नैतिक स्थिति सोडून ख्रिस्ती धर्मानें हटवादी मताची प्रथमची स्थिति अंगिकारली, तेव्हां एकट्या ख्रिस्ती धर्मांत असल्यानेंच तारण आहे, हें मत सर्वसंमत होतें; व दोन प्रसंगीं मानवी जातीवर त्यानें अवर्णनीय उपकार केले आहेत. अत्यंत भयंकर व स्वस्तःच्या फार उंच प्रतीच्या पावित्र्याची केवळ अंधुक कल्पनाच ज्या काळीं होत असेल अशा काळच्या अत्यंत प्राकृत विचारांशीं जेव्हां ख्रिस्ती धर्म झगडत होता तेव्हां या मताची भयानकता हा त्याला एक मदतगार लाधला. हा मदतगार परोपकारी धर्माच्या ब्रीदाला खरोखर थोडाच जुळता पण त्या काळाला नांवाजण्यासारखा उचित होता; व तो कच न खाणारें धैर्य धर्मवीरांच्या रक्तांत खेळविण्यास आणि अनिश्चित मनाचा झटदिशीं ख्रिस्ती धर्मसंस्थेंत प्रवेश करविण्यास समर्थ होता.

## या धर्माचें एकीकरणाचें व सत्तासूत्रचालनाचें सामर्थ्य नष्ट झालेंसें वाटलें.

( क० ३० ). पुनः जेव्हां या नवीन धर्माचें वर्चस्व उघडपणें प्रस्थापित झालें, तेव्हां कांहीं काळपर्यंत जणूं काय या धर्माचें एकीकरणाचें व सत्तासूत्रचालनाचें सामर्थ्य त्यांत उत्पन्न झालेल्या नानापंथांनीं नष्ट झालें आहे, असें वाटूं लागलें. रूपकाची हांव, या धर्मांत नवीन येणाऱ्या पूर्वेकडील लोकांच्या आंगचें तर्क-

टाचें ब्रीद, ग्रीक मनाचें स्वाभाविक सूक्ष्मदर्शन, व विशेषेंकरून ग्रीक पाखंड्यांनीं ख्रिस्ती धर्मांत सुरू केलेली व नेस्तर पंथानें एदिसा (२४) येथील मोठ्या विद्यालयांत रुजत घातलेली अरिस्तातलाची विवादक तत्त्वविवेचनपद्धति यांनीं इतके पुष्कळ व विषदिग्ध कलह माजले कीं, धर्मसंस्थेच्या सर्व देहांतील हाडें खिळखिळीं झालींशीं दिसलीं व बौद्धिक अनवस्थाप्रसंग ओढवला; हटवादी मतांचें महत्त्व लोकांस तीव्रतेनें जाणवूं लागलें होतें, तरी अजून प्रमाणभूत धर्मसंस्थेची कल्पना बनली नव्हती. तीन (२५) शतकांत सुमारें नव्वद पाखंडें उद्भवलीं, असें गणित कोणीं केलें आहे. पवित्र आत्म्याची दुहेरी मिरवणूक, ईस्तर सण पाळण्याचा योग्य दिवस कोणता, ताबोर पर्वतावरील प्रकाशाचें स्वरूप, अथवा क्रिस्ताच्या आंगीं असलेल्या दोन प्रकारच्या स्वतंत्र पण पूर्णपणें परस्परव्यापक इच्छा, असल्या प्रश्नांवर इतकीं भयंकर रणें माजलीं कीं, व्यक्तींप्रमाणें समाजांसही वेड लागत असावें; ही बत्लरची सूचना बहुतेक ग्राह्य वाटूं लागते.

## पुढच्या पायरीची तयारी झाली.

पण येथें पुनः तारणसीमासंकोचन मताची छाप निश्चितपणें बसली. जोंपर्यंत हें मत चालू होतें व प्रतीतीस येत होतें, तोंपर्यंत खासगी वैयक्तिक मताच्या भिन्नतेचा प्रामाण्याच्या एकत्वाशीं अत्यंत विषम कलह चालू राहिला असला पाहिजे. विरुद्ध वादप्रमाणांचा झगडा चालू असतां लोकांच्या मनाला बरेच दिवस स्वास्थ्य असूं शकलें नाहीं. विवादाची आवश्यक सहचरी म्हणून जेवढी संदेहाची मात्रा लागते, तेवढी मनुष्यांना सोसली नाहीं. ख्रिस्ती धर्माचे सर्व तुकडे एक दोन मध्यवर्ती बिंदूंकडे ओढले गेले व धार्मिक अनिर्बंध सत्तेचें साम्राज्य झालें; या अनिर्बंध सत्तेच्याच केवळ सामर्थ्यामुळें माध्ययौगिक समाजांतील कलहप्रिय बीजांवर दाब राहून त्यांची प्रकृति सौम्य झाली, अत्यंत घोरकर्म्या जुलमी लोकांच्या मानेवर नैतिक जूं लादलें गेलें, युरोपांत दास्यविमोचनाचें भारी काम तडीस जाऊं शकलें, व ख्रिस्ती धर्माच्या उन्नतीची जी पायरी पुढें याव-याची होती, ती चढण्यास लोकांची तयारी होण्याला शुद्ध व आध्यात्मिक सत्याची जेवढी मात्रा लागली, तेवढी त्या धर्माला मिळूं शकली.

## धर्मसुधारणेलाही हें मत मान्य होतें.

( क० ३१ ). हें सर्व काम तारणसीमासंकोचन मतानें केलें. धर्मसुधारणेच्या वेळीं जेव्हां जुन्या धर्मांत यूरोपच्या बौद्धिक स्थित्तीशीं जास्त वेळ मेळ ठेवण्याचें सामर्थ्य उरलें नाहीं व जेव्हां क्रांतीची बुद्धि सर्व देशांत व सर्व विषयांसंबंधानें दिसूं लागली, तेव्हां त्या मताची सत्ता बहुतेक अबाधित होती. आणि जरी त्यामुळें मानसिक दुःखाचा अकल्प्य पूर नि:संशय लोटला, तरी त्यानें निदान संक्रमणकाळच्या बेबंदशाहीचा चटादिशीं नायनाट केला. धर्मसुधारक त्या मताला चिकटून राहिले याचें कारण अर्थात् अंशत: असें आहे कीं, जुन्या धर्मज्ञानपद्धतींतील विचारसरणींतून मन चटकन सुटून बाहेर पडणें कठिण असतें; पण मनुष्याचा स्वभाव व त्यानें केलेलीं कामें यांचें महत्त्व कमी लेखण्याची जी प्रवृत्ति व ज्या या प्रवृत्तीच्या योगानें स्वाभाविकपणें ते हटवादी मतांच्या पद्धतींकडे वळले, त्या प्रवृत्तीचा हा विशेषेंकरून परिणाम होय, असें वाटतें.

## या मतावर ऐकमत्य.

या मतासंबंधानें त्यांच्यांत जितकें ऐकमत्य होतें, तितकें इतर थोडक्याच प्रश्नांसंबंधानें होतें. एक विद्वान् जीवमान ग्रंथकार लिहितो कीं, " तारणसीमासंकोचन मत सर्व लूथरपंथी लोकांस व धर्मसुधारकांस मान्य होतें. तसेंच तें त्यांच्यांहून भिन्नपंथीयांस आणि रोमी व इतर पंथांच्या लोकांस ग्राह्य होतें. पापाची क्षमा व पापापासून शुद्धि फक्त ख्रिस्ती धर्मांतच मिळतात. " काल्विन म्हणतो कीं, ' ख्रिस्ती धर्मसंस्थेच्या पाखरेपलीकडे पापाच्या क्षमेची आशा नको, व तारणाचीही नको. इ० स० १५५१ त त्रेंतच्या धर्मपारिषदेस सादर केलेल्या साक्सन मतांगीकारांत, हेल्वेतिक मतांगीकारांत, बेलजिक व स्कातिश मतांगीकारांत, सर्वांत निश्चयानें म्हटलें आहे कीं, तारण फक्त ख्रिस्ती धर्मांतच आहे. वृद्धपंचसत्ताक धर्मोपदेशकांची इ० स० १६४७ त वेस्तमिनिस्तर येथें सभा भरली होती, त्यावेळीं त्यांनीं ' धर्ममतांगीकाराबद्दल नम्र सूचना ' यांतील कमल २५ त म्हटलें आहे कीं, शुभवार्तेच्या अमलाखालील ( पूर्वीप्रमाणें कायद्याच्या अमलाखालीं असणारी एका राष्ट्रालाच लागू असणारी नव्हे) सत्य व सार्वत्रिक

अशी दृश्य धर्मसंस्था म्हणजे सर्व जगांत खऱ्या धर्माचा बाणा बाळगणाऱ्या सर्व लोकांची संस्था होय.....या संस्थेबाहेर साधारणपणें तारणाची शक्यता नाहीं. स्वतंत्रतापंथाला तेंच मान्य आहे (२६). आंग्लिकन पंथाचें मत याहून भिन्न नाहीं. या पंथाच्या संस्कारविधींत अथानेशियन श्रद्धावचनांस फार सन्मान्य स्थान मिळालेलें आहे; तें धर्मसंस्थेच्या कित्येक उपासनांत गार्भित अर्थानें आहे व त्या संस्थेच्या धर्मोपदेशकांच्या ( २७ ) कित्येक पिढ्यांनीं तें दृढपणें प्रतिपादिलें आहे.

## झिंविग्लियसनें हें मत झिटकारलें.

( क० ३२ ). प्रमुख धर्मसुधारकांपैकीं झिंविग्लियसनें एकट्यानेंच उघडपणें व मुळींच दुटप्पीपणा न करितां तें मत झिडकारलें. मरावयापूर्वी नुकताच मानवी मनाच्या इतिहासांत महत्त्वाचा काल सुरू करणारा जो मतांगीकार त्यानें लिहिला, त्यांत त्यानें उदात्त भाषेनें पुढें होणाऱ्या ‘ सर्व संत, वीर, भक्त व सदाचरणी लोकांच्या परिषदेचें ’ वर्णन केलें आहे. या परिषदेंत एबेल व एनाक, नोहा व एब्राहाम, ऐझाक व जाकोब हे साक्रेतिस, आरिस्तीदीस व आंतिगोनस, न्यूमा व कामिलस, हर्क्युलीस व थेज्यूस, आणि सीपिओ व केतो या सर्वांशा मिळून मिसळून वागतील व प्रत्येक प्रामाणिक व पवित्र मनुष्य जो जो या पृथ्वीतलावर होऊन गेला, तो तो आपल्या ईश्वरापुढें ( २८ ) हजर असेल. जेव्हां तारणसीमा-संकोचन मत उच्चारल्यानें फार झालें तर तोंड थोडें सस्मित होतें, जास्त कांहीं नाहीं; अशा या सध्यांच्याकाळीं असली भाषा म्हणजे केवळ स्वाभाविक वाटते; पण जेव्हां ती प्रथम लेखणींतून उतरली, तेव्हां जिकडे तिकडे विस्मय व क्रोध उत्पन्न झाला. तो मतांगीकार वाचून लूथर म्हणाला. “ आपल्याला झिंविग्लियसच्या तारणाबद्दल निराशा वाटते. ” बोस्वेनें या या लेखाचें अवतरण या स्विस धर्मसुधारकाविषयीं आपण घेतलेल्या आक्षेपांचा कळस दाखविण्याकरितां केलें आहे; व तें अवतरण घेतल्यानें टीका करण्याची जरूर राहणार नाहीं; पण तें वाचल्याबरोबर त्या लेखका-बद्दल पुढील पिढीच्या मनांत तिरस्कार व क्रोधच उत्पन्न होईल म्हणून जणूं काय तें घेतलें आहे.

## या मताचे परंपरेचे परिणाम.

( क० ३३ ). आतां तारणसीमासंकोचन मताच्या परंपरया होणाऱ्या परिणामांचें विवेचन करण्याच्या कामास आरंभ करावयाचा आहे; यांतील उद्देश असा कीं, त्या मताचा ऱ्हास व कार्यकारणवादात्मक चळवळीचे कांहीं ध्यानांत ठेण्यासारखे स्वरूपभेद यांमधील संबंधाचा छडा लागावा. प्रथमत: हें उघड आहे कीं, अजूनपर्यंत ज्या कल्पनांचें परीक्षण झालें त्या न्याय व अन्याय, योग्य व अयोग्य, याबद्दलच्या आपल्या स्वाभाविक जाणिवेच्या व आपल्या नैतिक प्रकृतीच्या अनुरोधानें आपलीं मतें बनविणाऱ्या महात्म्या उपदेशकांनीं निश्चित केलेल्या सिद्धांतांच्या इतक्या साफ उलट आहेत कीं, हटवादी मताच्या धर्मज्ञानाशीं नैसर्गिक धर्माचा कायमचा विरोध त्यांवरून प्रस्थापित होईल. जेव्हां धर्मसंस्थेंतली शांतता पुष्कळ काळपर्यंत अभंग राहिली असते व जेव्हां हटवादी मताच्या प्रश्नांकडे मनुष्यांचीं मनें फार ओढाळपणानें वळलेलीं नसतात, तेव्हां सदसद्विचारशक्तीचा श्रद्धेवर नकळत परिणाम होतो व त्यामुळें श्रद्धेचें खरें स्वरूप अस्पष्ट किंवा साफ अदृश्य होतें. त्या श्रद्धेची कशी तरी विल्हेवाट लावण्याचा अथवा तिचा जोरमोड करण्याचा अगर तिचें महत्त्व कमी करण्याचा मनुष्यांचा स्वाभाविक प्रयत्न राहील. परंतु वादविवादाच्या खळखळीनें जेव्हां तें श्रद्धेय मत मनापुढें स्पष्ट उभें राहतें व जेव्हां वादाच्या आवेशानें सदसद्विचाराचें बंड दबून जातें, तेव्हां धर्मज्ञानाची वृद्धि त्याच दिशेनें अधिकाधिक होत जाईल; व सरते शेवटीं नैसर्गिक धर्माच्या बाह्य रेखाही पुसल्या जातील.

## काल्विनच्या पूर्वसंकल्पप्रमेयांविरुद्ध एकच नैतिक आरोप आहे.

( क० ३४ ). येणेंप्रमाणें असें आढळून येतें कीं, वस्तुत: संत आगस्ताइनचीं दिसत असतां, साधारणपणें काल्विनचीं अशीं जीं ईश्वरी पूर्वसंकल्पाचीं प्रमेयें त्यांचा आदर होण्याचें मुख्य कारण मनावर तारणपरिघसंकोचन मताचा पूर्वीं झालेला परिणाम होय. कारण काल्विनच्या अनुयायांला अतींद्रिय व इतर जीं वादप्रमाणें पुढें आणतां येतील, त्यांविरुद्ध जो एक आक्षेप आहे व जो बहुतेक मनुष्यांना नेहमीं निर्णयकारक वाटेल, तो फक्त नैतिक आक्षेप होय. हा आक्षेप व हा एकच असा आहे कीं, इच्छा-

स्वातंत्र्य, भविष्यज्ञान व पूर्वसंकल्प यांच्यांसंबंधीं गुंतागुंतीच्या वादप्रमाणांच्या ज्या चक्रव्यूहांत प्राचीन व अर्वाचीन थोर बुद्धिमान् माणसें कोंडून निराश झालीं आहेत व समर्थ अतींद्रियवाद्यांनीं ज्याला अभेद्य म्हटलें आहे, तो फोडून बाहेर पडण्यास मनुष्यांस तो सामर्थ्य देतो.

## हें नैतिक प्रमाण दूर करण्यानें ओढवणारा अनर्थ.

हें नैतिक प्रमाण दूर करा; म्हणजे जेव्हां आपण ईश्वरासंबंधानें न्याय व दया हे शब्द वापरतों, तेव्हां मानवी जातींत असणाऱ्या त्या नांवांच्या गुणांहून मुळांतच भिन्न अशा गुणांविषयीं आपण बोलतों, ज्याविषयीं आपणांस अगदीं कल्पनाही करतां येत नाहीं असल्या गुणांचीं आपण नांवें घेतों, व ज्यांना आपण माणसें अगदीं अन्यायाचीं व निर्दयपणाचीं म्हणूं असल्या कृत्यांशीं ज्यांचा मेळ बसेल अशा गुणांचीं आपण नांवें उच्चारतों, असा मनुष्यांच्या मनाला बोध करा; त्यांना सांगा कीं, वैयक्तिक कृत्याशीं दोषाचा बिलकूलही संबंध नसूं शकेल; त्यांना म्हणा कीं, लाखों अर्भकें यातनामय नरकांत पडण्याकरितांच या जगांत क्षणभर आयुष्य देऊन जन्मास घालण्यांत येतात; त्यांना बोला कीं अफाट राष्ट्रें अस्तित्वांत येऊन मरून जाऊं शकतात; व नंतर त्यांनीं कधींही न ऐकिलेल्या धर्मावर त्यांची श्रद्धा नव्हती म्हणून अथवा त्यांच्या अस्तित्वाच्या हजारों वर्षें पूर्वीं एक महापराध केला गेला होता म्हणून चिरकालिक शिक्षा भोगण्यास त्यांचें आत्मे उत्थान पावतात; त्यांची खात्री करा कीं, हा सर्व प्रकार म्हणजे अत्यंत परिपूर्ण व पुण्यशील नैतिक पद्धतीचाच एक भाग आहे; म्हणजे मग असल्या मताच्या धाग्यानें कोणत्याही कल्पनागम्य निस्तल गर्तेंत मनुष्य उतरणार नाहीं असें नाहीं. मग न्याय व अन्याय यांविषयींच्या ज्या मूळ आधारभूत कल्पना आपणांस निर्माण करणाऱ्या परमेश्वरानें प्रत्येक हृदयावर खोदून ठेविल्या आहेत, त्या तुम्हीं खरवडून काढून टाकल्याशा होतील; सदसद्विचाराचा दिवा विझविलासा होईल; अंतरींचा शब्द खोटा म्हणून दाबून टाकण्यास व त्याची अवज्ञा करणें हाच सद्गुण मानण्यास मनुष्यांना तुम्हीं शिकविलेंसें होईल. पण एवढ्यानेंच अनर्थाची शेवटची मर्यादा लागते असें नाहीं.

## या मतानें मनुष्यें दैववादी बनतात.

( क० ३५ ). आगस्ताइन व काल्विन यांनीं रचलेल्या धार्मिक दैववादाच्या भयंकर पद्धतीवर आणतां येण्यासारख्या या नैतिक आक्षेपाचा हें तारणसीमासंकोचनमत नाशच करितें असें नव्हे, तर आणखी मानवी जातींतील बहुतेकांचा शेवट काय व्हावयाचा तो प्रत्येकाच्या इच्छाशक्तीचा बिलकूल विचार न करितां व्हावयाचा ठरलेलाच आहे असें शिकवून मनुष्याला सरळ दैववादी बनवितें. लाखों माणसें तान्हीं असतांच मरतात; लाखों माणसें ख्रिस्तीधर्म जेथें माहित नाहीं अशा ठिकाणीं जन्मास येऊन मरतात; लाखों माणसें समाजांत अशा स्थितींत असतात कीं तेथें त्यांना धर्मज्ञानांतील शोधांच्या भानगडींत गुंतण्याची संधीही मिळत नाहीं; लाखों माणसांचीं मनें त्यांना मिळालेल्या शिक्षणामुळें उत्पन्न झालेल्या पूर्वग्रहांनीं इतकीं व्याप्त असतात कीं, आपल्या त्या बिड्या तोडून टाकून त्यांतून मोकळें होण्यास त्यांनीं कितीही प्रयत्न केला तरी व्यर्थ होतो. यावरून आढळतें कीं, पूर्वसंकल्प हें तारणसीमासंकोचनमताच्या धष्टपुष्ट स्वरूपाहून प्रथमतः फारसें भिन्न नव्हतें. संत आगस्ताइननें त्याचें विवरण करावयाला दोन लेंकरें झालेल्या आईचा एक दाखला योजला आहे; प्रत्येक लेंकरूं नरकवासांतला गोळाच होतें. एकानेंही कांहीं नीतिकक्षेंतील कृत्य केलें नाहीं. एक आईच्या आंगाखालीं सांपडून शुद्धिसंस्कार न होतां मेलें; व दुसऱ्यास शुद्धिसंस्कार झाल्यामुळें तारण मिळालें.

## इच्छास्वातंत्र्यावर इराझ्मसचा ग्रंथ.

( क० ३६ ). पण आगस्ताईन व आंब्रोस यांचें मत अलीकडे धर्मसुधारकांनीं ( २९ ) शेवटच्या थरास पोंचविलें व अत्यंत निश्चितपणें सांगितलें, तसें ख्रिस्ती धर्माच्या आरंभींच्या काळीं कधींही झालेलें नाहीं. सौम्य व हुशार इराझ्मसला त्यांत धर्मसुधारणेंतला एक मुख्य अनर्थ दिसला व त्यानें इच्छास्वातंत्र्याच्या मंडनार्थ एक ग्रंथ लिहिला; यामुळें लूथरकडून सर्व धर्मज्ञानक्षेत्रांत खरोखर एक अत्यंत किळसवाणें व अत्यंत निश्चित दैववादी विधान बाहेर पडलें. लूथरनें म्हटलें कीं, "मानवी इच्छा म्हणजे ओझ्याचें जनावर; जर त्यावर ईश्वर स्वार झाला, तर ईश्वरी इच्छेनुरूप त्याची इच्छा होऊन तें तसें चालतें; पण जर सैतान त्यावर बसला,

तर सैतानाच्या इच्छेनुरूप त्याची इच्छा होऊन तें तसें चालतें. अीणखा आपला आवडता स्वार त्याला निवडतां येत नाहीं; अथवा आवडत्या स्वाराचा आश्रय करतां येत नाहीं. त्याच्या मालकीसाठीं स्वार होऊं इच्छिणारे आपसांत ( ३० ) भांडतात.

## ईश्वराविषयींच्या विषमतेच्या कल्पनेनें इच्छा-स्वातंत्र्य नष्ट होतें.

" जो इतक्या थोड्यांना तारण देतो व इतक्या पुष्कळांना नरक-यातनांत ढकलतो तो दयाळु, जो आपल्या लीलेनें आम्हांस नरकवासांत राहण्यास अवश्य भाग पाडतो तो न्यायी, असा विश्वास धरणें म्हणजे श्रद्धेचा कळस होय. म्हणजे इराझ्मसच्या म्हणण्याप्रमाणें दुःखितांच्या यातना पाहून त्याला आनंद होतो व प्रेमापेक्षां तो तिरस्कारास अधिक पात्र होतो असें दिसतें. जो ईश्वर इतका राग व असमता दाखवितो तो न्यायी व दयाळु कसा, याची मला जर कार्यकारणात्मक विचारशक्तीच्या एखाद्या झटक्यासरशी कल्पना करतां आली, तर श्रद्धेची गरज उरणार ( ३१ ) नाहीं. " " भविष्य ईश्वरास पूर्वी माहित असतें; पण तें कांहीं संकेतार्थी नसतें; म्हणजे तो निश्चित, त्रिकालिक व कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं समर्थ अशा इच्छेनें भविष्यकाळाच्या सर्व कांहीं गोष्टी पूर्वीच पाहतो, ठरवितो व तडीस नेतो. या ( ३२ ) वज्राघातानें इच्छास्वातंत्र्यागिरीचें चूर्ण होतें. "

## पूर्वसंकल्पाविषयीं काल्विनचें मत.

( क० ३७ ). मोठमोठ्या धर्मसुधारकांचीं मतें अशीं होतीं. काल्विन व तदनुयायी यांचें मत असेंच स्पष्ट होतें. त्यांच्या मताप्रमाणें मानवी अधःपतन व त्याचे परिणाम हें सर्व सृष्टिनिर्मितीपूर्वी अनेक युगें ठरलेलेंच होतें; व त्या पूर्वसंकल्पाचा हा सर्व अवश्यंभावी परिणाम होय. त्यांचा उपदेश असा होता कीं, प्रत्येकाला जन्मास घालण्या-पूर्वी कित्येक वर्षें त्याचा शेवट काय व्हावयाचा तो सर्व शक्तिमान् परमेश्वरानें ठरविलेला आहे; व त्याला बाध म्हणून यावयाचाच नाहीं; आणि अशा रीतीनें लाखों आत्मे आपल्या द्वेषास पात्र होऊन चिरकाल नरकवास भोगतील, असें त्यांच्या नशिबीं त्यानें लिहिलें आहे. याच हेतूनें त्यानें त्यांस

जन्मास घातलें; व त्यांस जन्मास घालतांना त्यांना जो विकृत स्वभाव दिला, तो बदलण्यास जो एकच उपाय कीं त्यांना साह्य मिळावें तें त्यांना मिळूं नये असें याच हेतूनें केलें. ते जिवंत असतां ईश्वर त्यांचा तिरस्कार करणार व ते मेल्यावर निरंतर जळत राहणाऱ्या अग्नींत कासाविस करणाऱ्या यातना भोगण्यास त्यांना ढकलणार; व मग अनंत काळाच्या असंख्य युगांत, त्यांच्या त्या यातनांकडे द्रव न येतां पहात बसणार (३३).

## पूर्वसंकल्पमतावर टीका.

असल्या उपदेशासंबंधीं टीका करण्याची जरूर नाहीं. या मतानें ईश्वर पापाचा प्रत्यक्ष जनक होतो ( ३४ ), या मतानें आमच्या न्याय व दया यांबद्दलच्या सर्व कल्पना उलथ्या पालथ्या होतात, या मताच्या नुसत्या विधानानें मनाला जो धक्का बसतो व जी चीड उत्पन्न होते ती बोलून दाखवितां येत नाहीं; या गोष्टी या मताच्या कळकळीच्या पुरस्कर्त्यांसही क्वचितच नाकबूल करतां येतील. या भागांत विवेचन केलेल्या इतर मतांत या उपदेशाची भर घातली म्हणजे खरोखर असा एक भाग तयार झालासें मानतां येईल कीं, त्याला मानवी धर्माच्या इतिहासांत कोठेंही जोड मिळणार नाहीं. आपल्या या काळीं असलीं मतें दिवाभीताप्रमाणें झगझगित प्रकाशांतून पळून जाऊन अंधारांतल्या लेखकांच्या अंधाऱ्या लेखांत मात्र लपून बसलेलीं आढळतात.

## या मताला सध्यां कोणी पुरस्कर्ता मिळत नाहीं.

जोनाथन एद्वर्ड्सपासून ज्याच्या बुद्धिवैभवाबद्दल शंका नको, असा एकही पुरस्कर्ता त्यांना मिळाला नाहीं; व उघडपणें हीं मतें बोलून दाखविण्यास कोणीही प्रख्यात लेखक धजला नाहीं; कारण, धजला असता तर कीर्तीची भयंकर हानि झाली असती. ल्यूथर, काल्विन व बेझासारख्या लोकांनीं लोकप्रियतेच्या शिखरावर बसून या विषयासंबंधीं लिहितांना जी भाषा वापरली तशी भाषा सध्यांच्या काळीं थोड्याशा साधारण लोकांच्या मंडळीबाहेर क्षणभर खपावयाची नाहीं. आमच्या सर्व विचारसरणींत कार्यकारणात्मक दृष्टि इतकी व्यापून राहिली आहे कीं, आमच्या नैतिक जाणिवेला किळस आणणाऱ्या प्रत्येक मतानें तीव्र व वाढता तिटकारा उत्पन्न होतो; व ज्याअर्थी चिरबहिष्कारात्मक दंडाचें मत ग्रहण करण्यास मनाची तयारी

करणारें तारणसीमासंकोचनाच मत आतां प्रचीतीस येण्याचें बंद झालें त्याअर्थी चिरबाहिष्कारात्मक दंडाचें मतही विलक्षण तिरस्करणीय वाटतें.

## धर्मसंस्थांचें महत्त्व कशावर अवलंबून आहे.

( क० ३८ ). तारणा भोगसंकोचनाची छाप ज्यावर बरीच पडली आहे, असा दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा म्हटला म्हणजे हटवादी मतें व नीतिकल्पना यांमधील संबंध होय. जुने धर्मज्ञानपंडित मानीत कीं, हटवादी मतांत जात्याच असा कांहीं एक गुण आहे कीं, त्याचा व त्या मतांच्या मानवी जीवितावर होणाऱ्या परिणामाचा बिलकूल संबंध नाहीं. उदाहरणार्थ, मागें म्हटलेंच आहे कीं, ख्रिस्ती धर्माच्या आरंभींच्या काळीं क्रिस्ताच्या दोन प्रकृतींतल्या परस्पर संबंधावरच्या वादविवादांइतका महत्त्वाचा दुसरा कोणताही वादविवाद मानला जात नसे; व धर्मसुधारणेच्या काळीं प्रभुभोजनांतील पदार्थरूपांतराच्या मताचा स्वीकार अगर त्याग ही खऱ्या धर्माची नेहमींची कसोटी झाली होती. उलटपक्षीं सांसारिक काळांत राजकारणी पुरुषाचा कल धर्मसंस्थांचें महत्त्व फक्त मनुष्याच्या व्यवहारावर त्या संस्थांमुळें होणाऱ्या परिणामांवरूनच ठरविण्याकडे असतो. राजकारणी पुरुषाच्या लक्षांत येऊन चुकतें कीं, धार्मिक वादांनीं समाजाच्या देहांतील हाडें पुष्कळदां खिळखिळीं झालीं आहेत; राष्ट्रांतील निरनिराळ्या अंगांचें एकीकरण होण्यास अनिवार्य अडथळा झाला आहे; दीर्घकाळपर्यंत चालणारीं व पुष्कळ रक्तपात करणारीं युद्धें झालीं आहेत; व समाज-सौख्योत्पादक साहसाच्या धंद्यास लागणारें बुद्धिवैभव व उत्साही सामर्थ्य बरेंचसें भलत्याच दिशेनें फुकट वाहून गेलें आहे. त्याच्या मतें धर्मज्ञानाचे हे अनर्थ आहेत व या अनर्थांचा वचपा मनुष्यजातीच्या मनोवृत्तींवर धर्मज्ञानाचा जो दाब राहतो त्यानें, धर्मज्ञानानें कर्तव्याची जी उत्तम जाणीव पसरते तिनें, वार्धक्यांत व शरीरकष्टांत व मानसिक दुःखांत त्या ज्ञानामुळें जें सांत्वन मिळतें त्यानें, व त्या ज्ञानाच्या योगानें परोपकाराची जी प्रेरणा होते तिच्या तीव्रतेनें, निघतो. म्हणून ज्या धर्मसंस्थेंत नैतिक बंधन होईल तितकें बळकट राहील व हटवादी अंगें होतील तितकीं थोडीं व निद्रावश राहतील, अशा संस्थेला उत्तेजन देण्याचा त्याचा उद्देश असतो.

## कार्यकारणात्मक बुद्धीच्या माणसांची स्थिति.

कार्यकारणात्मक बुद्धीच्या माणसाची स्थिति या दोहोंच्या बरोबर मध्यें असते. आरंभींच्या काळच्या धर्मज्ञानपंडितांसारखा कार्यकारणावादीही धर्मज्ञानाचें महत्त्व केवळ त्याच्या उपयोगित्वावर आहे, हें नाकारतो व राजकारणी पुरुषासारखा कार्यकारणवादीही हटवादी मतें जात्याच गुणावह सामर्थ्यानें पूर्ण असतात हें नाकारतो. त्याची श्रद्धा असते कीं, मानवी प्रकृतींतील विकारशीलत्वावर अगर मनोवृत्तींवर परिणाम घडून त्या पोसल्या जाव्या हा त्या हटवादी मतांचा उद्देश आहे. कांहीं विशिष्ट तत्त्वें एरवीं मनुष्यांच्या मनांत बिंबावयाचीं नाहींत म्हणून तीं बिंबवण्यासाठीं हीं साधनें आहेत; व त्यांचें उद्दिष्ट कार्य संपल्याबरोबर त्यांचें महत्त्व नाहींसें झालें पाहिजे. समाजाच्या आद्यस्वरूपांत ईश्वराविषयीं केवळ आध्यात्मिक व नैतिक कल्पना करण्यांत मनुष्याला यश मिळालेलें नाहीं, म्हणून ते मूर्ति करून तिची पूजा करितात. यामुळें ईश्वरविषयक कल्पना अन्यथा व हलकी होते; पण पूजेचा नैतिक प्रभाव कायम राहतो. अमूल्य अर्थ साधण्यासाठीं मोठा अनर्थ करून घ्यावा लागतो. तथापि ज्याअर्थी मानवी सुधारणेच्या वाढीबरोबर शुद्धतर व नैतिकतर कल्पना करण्याचें सामर्थ्य मनुष्यांला येतें, त्याअर्थी मूर्तिपूजा हा शुद्ध अनर्थ होऊन बसतो; व त्यामुळें शेवटीं तिचा त्याग केला जातो. त्याचप्रमाणें कर्तव्याची निःस्वार्थ जाणीव व उत्कृष्टत्वाची गुणज्ञ दृष्टि यांना पटणारा शुद्ध नीतिधर्म समाजाच्या आद्य स्थितींत सुपरिणामावह कधींही होऊं शकत नाहीं. यामुळें त्याला भौतिक स्वरूप येतें. त्यांत अनेक संस्कार, अनेक विस्तृत श्रद्धावचनें, नैतिकवृत्तींशीं संबंध नसलेलीं कर्तव्यें, धर्मसंस्थेची रचना व पुष्कळशा दंतकथा शिरतात. या बाह्योपाधिक गोष्टींतून नैतिक सारसर्वस्व झिरपून जात जात लोकांना प्राप्त होतें व त्यांना उत्कर्षाच्या उच्चतर स्वरूपाच्या प्राप्तीस योग्य करितें. हळु हळु संस्कारांचा लोप होतो, मतांची संख्या कमी होते, जीवन व शील यांचीं अंतिम साध्यें जीं धर्मसंस्थेंतील असतात तीं जाऊन त्यांऐवजीं नैतिक येतात, हटवादी कल्पनांत लवचिकपणा वाढलेला दिसतो; आणि सरतेशेवटीं धर्माचें रूपान्तर व पुनरुजीवन होतें; व ज्या शुद्धतम चेतनेनें तो उत्पन्न झाला तीच त्याच्या सर्वभागांत प्रदीप्त होऊन राहते.

### धर्मसंस्थेंतील हटवादी मतें व नैतिक अंगें यांमधील विरोध.

ह्या दृष्टीनें पहातां हें उघड होतें कीं, धर्मसंस्थेंतील हटवादाचीं व नैतिक अंगें यांत विशिष्ट तऱ्हेचा परस्परविरोध असतो; व त्यांचा अन्योन्यापेक्ष प्रभाव मुख्यतः मानवी सुधारणेच्या प्रगतीच्या अंशावर अवलंबून असतो. हटवादी मतांचा जबरदस्त दाब एका काळीं जो एवढा कल्याणावह तोच दुसऱ्या काळीं फारच अनर्थावह होतो.

### तारणाभोगसंकोचनाचा एक परिणाम.

आतां तारणाभोगसंकोचनाच्या मताच्या अत्यंत उघड परिणामांतला एक परिणाम असा असतो कीं, धर्मसंस्थेंतील नैतिक अंगाला हटवादी अंगाखालीं कायमचें दबून बसावें लागतें. 'ज्यावर श्रद्धा ठेविल्याशिवाय तारण नाहीं' असा जर सत्य धर्म असेल तर 'सर्वांअगोदर तो धर्म स्वीकारणें अवश्य आहे, असें लोकांनीं मानणें अगदीं साहजिक आहे. जर नीतिदृष्ट्या अत्यंत पवित्र जीवनक्रमानें प्रमादाचें प्रक्षालन होत नसेल व खऱ्या धर्माच्या हातीं दोषविमोचनाचीं अनेक साधनें असतील, तर मनुष्याचें मन कृत्याभिमानाकडून मुरडून मताभिमानाकडे वळेल. रोमच्या धर्मसंस्थेंत हा कल किती अंशानें दिसतो, तें सुप्रसिद्धच आहे. प्रतिरोधीपंथाच्या विवादकांनीं वारंवार प्रख्यात व्यक्तींच्या लांबचलांब अगदीं खऱ्या याद्या तयार केलेल्या आहेत; या व्यक्तींना प्रत्येक पापाचा डाग लागला असूनही धर्मसंस्थेंतील मान्यतेचे गृहस्थ म्हणून यांची गणना आहे; यांची पूर्ण श्रद्धावानांप्रमाणें नेमधर्माची चिकाटी बळकट आहे; त्यांनीं आपल्या सदसद्विवेकांतला प्रत्येक खड्डा धर्मसंस्थेकडून मिळणाऱ्या माफीनें भरून काढला आहे; आणखी अखेर त्यांनीं एखाद्या मठसंस्थानाच्या खर्चासाठीं पैसा पुरवून अगर प्रायश्चित्त घेऊन अथवा पाखंड्यांचा छळ सुरू करवून आपल्या आयुष्यांतील सर्व पापांचा निरास झाला अशी आपली समजूत केली आहे.

### भक्ति व अनीति यांचें साहचर्य.

ज्याला ढोंग म्हणतां येणार नाहीं, असें हें भक्ति व अनीति यांचें साहचर्य प्रतिरोधीपंथांत फार विरळ आढळतें. बेन्वेनूतो सेलिनीच्या चरित्रासारखीं घनघोर पातकें व अत्यंत उदात्त आणि विजयशाली भक्ति

यांचीं एकावर एक पुटें बसलेलीं चरित्रें क्वचित् आढळतील; तथापि हा अनर्थ अश्रुत आहे, असें म्हणणें धाडसाचें होईल. धर्मसुधारणेचीं सत्य तत्त्वें उराशीं बांधून ठेवण्यांत प्रतिरोधीपंथी राष्ट्रांच्या आंगीं दिसून येणाऱ्या चिकाटीचें राष्ट्रीय नीतीशीं ठराविक गुणोत्तर असतें, असें क्वचित्च म्हणतां येईल असें वाटतें; आणि मिथ्यावादींविरुद्ध पुष्कळ वर्षें कायदे करीत राहिल्याबद्दल प्रतिरोधीपंथी राष्ट्रांपैकीं ज्यांची अत्यंत ख्याति आहे, त्या स्वीदन देशांतील लोकांत बेकायदा आचरण ओतप्रोत आहे ( ३५ ), अशाबद्दलही त्या देशाची तितकीच ख्याति आहे.

## कांहीं लबाडया, लबाड्या मानतां येत नाहींत.

ज्यांचें पावित्र्य उंच प्रतीचें नाहीं व जे दीर्घोद्योगानें आपल्या धर्माचें जास्त महत्त्वाचें वाढणारें अंग पुष्ट करून आपल्या विषय-वासना तृप्त करण्याची मुभा आनंदानें विकत घेतात, अशा लोकांमध्यें तारणप्रांतसंकोचनाच्या मताचा परिणाम म्हणजे हे विरोध होत. ज्यांच्या कळकळीला स्वार्थाचा बिलकूल सुद्धां वास येत नाहीं, अशा लोकांत फारच साधारणपणें एक कल आढळतो व त्याच्यामुळें मानवी इतिहासावर फारच हानिकारक परिणाम झाला आहे. पाखंडाइतकी मोठी आपत्ति इतर कोणतीही नाहीं व पाखंडी माणसाला चिरकालिक दुःख भोगावें लागतें; अशी खात्री असल्यामुळें त्यांनीं ढोंग व खोटेपणा यांनीं आपल्या श्रद्धावचनांचा नेहमीं पुरस्कार केलेला आहे. त्यांनीं असें करावें हें अगदीं स्वाभाविक आहे. नैतिक नियमांचा पाया कोणताही असो; इतकें खास कीं, बहुतेक मानवी प्राण्यांच्या दृष्टीनें त्या नियमांचें उल्लंघन करणें योग्य होय, असें वाटण्याला कांहीं जबरदस्त कारणें असतात.

### उदाहरणें.

( क० ३९ ). आंथरुणाला खिळलेल्या, आतां मरतो, घटकेनें मरतो, अशा अत्यवस्थ असलेल्या, मनुष्यावर एकादें संकट येणार असलें व तें आजाऱ्याला कळलें, तर तो खात्रीनें मरेल असें वैद्यानें सांगितलें; व तें त्या आजाऱ्यापासून चोरून ठेवणें म्हणजे लबाडी केलीच पाहिजे; अशी स्थिति असेल तर ही लबाडी दोषास्पद मानतील असे नीतिज्ञ थोडेच सांपडतील. 'धार्मिक लबाड्या' निंद्य मानणारा कट्टा सत्याभि-

मानी एकाद्या निरपराध मनुष्याच्या जीवितावर घाला घालण्यासाठीं त्याचा पाठलाग करणारा मारेकरी पाहील व त्याला भलत्याच वाटेला लावून देऊन त्या निरपराध मनुष्याचा जीव वांचविणें शक्य असेल, तर तो सत्याभिमानी निःशंक मनानें लबाडी सांगेल; असा तर्क करण्यास हरकत नाहीं.

## याचा परिणाम.

कांहीं प्रमाण दाखवून या गोष्टींची न्याय्यता स्थापणें अगर निर्दोष व सदोष लबाडी यांच्यांमधील हद्द ठरविणें सोपें काम नव्हे; परंतु लबाडी करणें न्याय्य आहे असें वाटण्यासारखे प्रसंग असतात, ही गोष्ट मनुष्यजातीच्या सर्वसामान्य मनोवृत्तीला नेहमीं कबूल आहे; व अत्यंत थोर नीतिज्ञांनीं स्पष्टपणें असें विधान केलें आहे ( ३६ ). म्हणून जेव्हां एकाद्याला श्रद्धापूर्वक वाटतें कीं, चुकीचीं मतें अंगीकारणाऱ्यांस नरकवास भोगावा लागेल; जेव्हां हें नुसतें त्याला वाटतें इतकेंच नव्हे तर हें जीवंत व कार्यक्षम सत्य होय अशी त्याला प्रचीति वाटते; व जेव्हां थेट लबाडी करून अगर सत्य लपवून अगर सत्याचा अपलाप करून आपल्या धर्माचा पुरावा बळकट करणें शक्य आहे असें त्याला आढळून येतें; तेव्हां तो मोह त्याच्यानें बहुधा दूर सारवत नाहीं.

## वरील उदाहरणें व धार्मिक लबाडया यांत भेद आहे.

( क० ४० ) पण वर दृष्टांतादाखल घेतलेल्या गोष्टी व धर्मज्ञानपंडितांच्या ' धार्मिक लबाड्या ' यांमध्यें दोन फार ठळक भेद आहेत. वरील गोष्टी क्वचित् क्वचित् आढळणाऱ्या नैतिक निर्णयांचीं फळें होत; पण ' धार्मिक लबाड्या ' पद्धतशीर तयार होतात; व त्यांना खऱ्याखुऱ्या धर्ममतांची जागा मिळते. पुनः पहिल्या गोष्टी इतक्या अत्यंत विरळ व अपवादात्मक प्रसंगीं उद्भवतात कीं, तसल्या गोष्टींनीं त्या लबाड्या करणाऱ्या मनुष्याच्या सामान्य सत्याभिमानावर दृश्यमान परिणाम क्वचित् होऊं शकतो; पण ' धार्मिक लबडयां'पासून सदोदित खोटेपणा करण्याची संवय उत्पन्न होते. ' धार्मिक लबाडया ' मंडनीय व स्तुत्यही आहेत ( ३७ ). असा स्पष्ट सिद्धांत धर्मपित्यांनीं घालून ठेविला; व जरी त्यांनीं तो घालून ठेविला नसता, तरी तारणसंकोचनाच्या मतांचा अवश्यंभावि परिणाम म्हणून तो त्यांच्या आचरणांत आलाच असता.

## धार्मिक लबाडयांचे मासले.

लगेच धार्मिक सारस्वत अत्यंत निर्लज्ज मिथ्या भाषणाच्या चेतनेनें अनुलिप्त झालें. मूर्तिपूजक धर्माशीं झगडावयाचें होतें म्हणून ख्रिस्ताविषयींचीं सिबिल व आर्फ्यूज यांचीं बनावट भाविष्यें करविलीं गेलीं, असत्य चमत्कार वाढले, व ज्यूलियनसारखा ज्यांनीं या धर्मास विरोध केला, त्यांच्यावर कुभांडांचा एकसारखा भडिमार झाला. पाखंड्यांची खात्री करावयाची होती म्हणून जुन्या लेखांत प्रक्षिप्त लेख घुसडून अगर सबंध बनावट लेख करून बनावट शुभवर्तमानांच्या तोडीस तोड लावून दिली. साधुसंतांच्या अवशेषांबद्दल पूज्यबुद्धि व मठवासपद्धति नवीन सुरू झाल्या. त्यायोगें संतांच्या अस्थींमुळें व वैखानसांच्या प्रार्थनांमुळें नाना चमत्कार घडतात असें लोक म्हणूं लागले, व थोरथोर धर्मपितेही तसें गंभीरपणें विधान करूं लागले ( ३८ ). सत्याच्या जाणिवेचा नेहमीं बहुतेक बिलकूल गंध नसलेल्या ( यूरोपांतल्या ) पूर्वेकडील राष्ट्रांच्या आंगींच कायतो हा कल होता असें नव्हे; जेथें जेथें हटवादी मतांचें आत्यंतिक महत्त्व मानीत तेथें तेथें त्याचा विजय असे. पिढ्यानुपिढ्या तो जास्त सार्वत्रिक होत गेला; इतका कीं, सरतेशेवटीं सत्याची जाणीव व आवड लोकांच्या मनांतून पार निघून गेली.

## मध्ययुगांत ही स्थिति फारच वाईट झाली होती.

( क० ४१ ). ज्याला म्हणून माध्ययौगिक सारस्वताची ओळख आहे, त्याला त्या युगास प्राप्त झालेल्या स्थितीचें हें चित्र अतिशयोक्तीचें नव्हे, हें माहित आहे. कारण, त्या भयाण काळांत युरोपांत विद्वान् कायते उपाध्ये व मठवासी; व त्यांना मन:पूर्वक वाटत असे कीं, सत्यापलाप लोकशिक्षणावह असला म्हणजे तो केवढा असला तरी तिरस्कार्य नव्हे. त्यांनीं आपल्या धर्माच्या प्रत्येक शत्रूबद्दल वाटेल तशीं निंद्य कुभांडें रचून त्याचा छळ केला, प्रत्येक संताच्या भोंवतीं ढळढळीत कपोलकल्पित गोष्टींचें वलय तयार केलें, भक्तीला पूर आणण्यासाठीं शेंकडोंशें चमत्कार नवे बनविले.

## हें सत्यौदासीन्य इतर बाबतींतही शिरलें.

इतकेंच करून ते राहिले नाहींत, तर आणखी धर्मज्ञानांत संपादन केलेलें हें सत्यौदासीन्य यांनीं स्वाभाविकपणें इतर सर्व विषयांत शिरविलें.

त्यांनीं लिहिलेले सर्व लेख, व विशेषत: इतिहास म्हटले म्हणजे विलक्षण कल्पित गोष्टींची कंथाच ती; या गोष्टी इतक्या हास्यास्पद व त्यांची कल्पना इतकी धिट्टाईची होती कीं, पुढच्या काळीं त्याबद्दल लोकांना मोठें आश्चर्य वाटे आणि ज्यांनीं या कल्पित कथा सर्व ख्रिस्ती प्रांतांत वाटेल तशा पसरल्या, त्यांनींच भोळसटपणा हा सद्गुण व संदिग्धमतित्व हा गुन्हा असें लोकांना शिकविलें.

## लबाड्यांचें पीक कसें आलें.

जोंपर्यंत तारणाभोगसंकोचनाच्या मताबद्दल विश्वास व प्रचीती वाटत होती, तोंपर्यंत मनुष्यजातीच्या स्वास्थ्यासाठीं त्यांची आपल्या श्रद्धाविषयक सत्याबद्दल निखालस खात्री असणें जरूर होतें. इतकी निखालस खात्री पटण्याला उलट बाजूचीं प्रमाणें दाबून टाकलीं पाहिजेत; व हा हेतु साधण्याकरितां युरोपांत कोठेंही टीकोन्मुख अगर संदेहात्मक चेतना असतां कामा नये. यावरून नि:सीम भोळसटपणाची संवय तारणाभोगसंकोचनाच्या मताचा अवश्यंभावी परिणाम होय; व या संवयीमुळें सहजगत्या लबाडीचें पीक अठरा आणे आलें, इतकेंच नव्हे, तर ही संवय म्हणजेच सत्याभिमानाच्या चेतनेचा केवळ अभाव.

## सत्याभिमानाचें कार्य.

कारण, ज्याला खरोखर सत्याची आवड आहे, तो संतुष्ट भोळसटपणाच्या स्थितींत कधींही निजून राहणें शक्य नाहीं. कोणतेंही संदेहात्मक विधान स्वीकारण्यापूर्वीं तो फार वेळ विचार करीत राहील; परस्पर विरुद्ध प्रमाणें काळजीपूर्वक तोलून पाहील; कांक्षाखोर मनानें जपून प्रत्येक गोष्टीची शहानिशहा करील; प्रत्येक पूर्वग्रह मनांतून हांकून लावण्यास झटेल; संभवनीयतेवर सत्यतेच्या प्रामाण्याचा आरोप करण्यापासून सावधगिरीनें अलिप्त राहील. सत्याभिमानाच्या चेतनेच्या मुख्य खुणा या होत; व या खुणा दाबून टाकण्याचा अगर त्यांना उजेडांत आणण्याचा प्रयत्न जितक्या मानानें होईल, तितक्यावरून कोणत्याही प्रकारच्या मतांच्या संस्थेचा सत्याभिमानाच्या चेतनेशीं किती मिलाफ आहे हें आपण ठरवूं शकूं.

## सत्यौदासीन्य व भोळेपण तीन रीतींनीं वाढलें.

( क० ४२ ). आपण पाहिलें कीं, एखाद्या विशिष्ट श्रद्धाप्रकाराशीं तारणाच्या अभेद्य संबंधानें धर्मज्ञानाच्या वर्चस्वाच्या काळीं दृष्टोत्पत्तीस येणारें सत्याविषयीं साफ औदासीन्य व निःसीम भोळेपण तीन रीतींनीं उत्पन्न झालें अगर वाढलें. या अभेद्य संबंधामुळें ‘ धार्मिक लबाडयां ’ चा भरणा मर्यादेबाहेर वाढला. या लबाडया निःशंकपणें केल्या जात; कारण त्यांच्या योगानें मनुष्यजातीचें अलोट कल्याण होतें, असा समज असे. त्या संबंधामुळें ज्याला विपर्यास म्हणतात व ज्यांत मुख्यत्वेंकरून विरुद्ध बाजूच्या सर्व वास्तविक गोष्टी दाबून टाकतात, तो लबाडीचा प्रकार सार्वत्रिक झाला; त्यासंबंधानें सत्याच्या आवडीची मुख्य खूण व प्रमादाच्या प्रसाराला अटकाव करण्याचें एकाकी साधन जी चौकस बुद्धीची कळकळ ती चिरडून गेली. तथापि याची आणखीही एक रीत आहे. हिचा मागें सांगितलेल्या रीतींशीं जरी फार जवळचा संबंध आहे, तरी निराळें विवेचन होण्याचा हक्क सांगण्यापुरती ती वरील तिन्ही रीतींहून भिन्न आहे.

## सत्याची आवड म्हणजे काय ?

( क० ४३ ). ‘ सत्याची आवड ’ या शब्दांची नुसती व्याख्याच पाहिली तरी त्यांचा असा अर्थ निघतो कीं, कोणत्याही परिस्थितींत असतां सत्याच्या प्राप्तीच्या जाववेल तितकें जवळ जावयाचा कृतसंकल्प; अथवा पर्यायानें बोलावयाचें तर जेव्हां प्रत्यक्ष पुरावा मिळणें अशक्य असतें तेव्हां सर्वांत अत्यंत संभवनीय जें मत तें मान्य करावयाचें. या बाबतींत तात्त्विक व व्यावहारिक जीवनांत महत्त्वाचा फरक आहे. जो सत्याचा शोध चालवितो, त्याला संभवनीयतांचा एकवटलेला जोर ज्यांत दिसेल तो मार्ग अनुसरणें नेहमीं भाग असतें; परंतु आचरणांत कधीं कधीं अत्यल्प संभवनीयतेकडे दृष्टि देऊन आपला मार्ग आंखणें शहाणपणाचें असतें. कारण निरनिराळ्या मार्गांनीं मिळणाऱ्या सिद्धीच्या संभवनीयतांच्या तुलनेचाच आपणांस विचार करावयाचा नसतो, तर आणखी होणाऱ्या परिणामांच्या मोठेपणाचाही विचार करावयाचा असतो.

## सत्यौदासीन्य व भोळेपण तीन रीतींनीं वाढलें.

( क्र० ४२ ). आपण पाहिलें कीं, एखाद्या विशिष्ट श्रद्धाप्रकाराशीं तारणाच्या अभेद्य संबंधानें धर्मज्ञानाच्या वर्चस्वाच्या काळीं दृष्टोत्पत्तीस येणारें सत्याविषयीं साफ औदासीन्य व निःसीम भोळेपण तीन रीतींनीं उत्पन्न झालें अगर वाढलें. या अभेद्य संबंधामुळें ' धार्मिक लबाडयां ' चा भरणा मर्यादेबाहेर वाढला. या लबाडया निःशंकपणें केल्या जात; कारण त्यांच्या योगानें मनुष्यजातीचें अलोट कल्याण होतें, असा समज असे. त्या संबंधामुळें ज्याला विपर्यास म्हणतात व ज्यांत मुख्यत्वेंकरून विरुद्ध बाजूच्या सर्व वास्तविक गोष्टी दाबून टाकतात, तो लबाडीचा प्रकार सार्वत्रिक झाला; त्यासंबंधानें सत्याच्या आवडीची मुख्य खूण व प्रमादाच्या प्रसाराला अटकाव करण्याचें एकाकी साधन जी चौकस बुद्धीची कळकळ ती चिरडून गेली. तथापि याची आणखीही एक रीत आहे. हिचा मागें सांगितलेल्या रीतींशीं जरी फार जवळचा संबंध आहे, तरी निराळें विवेचन होण्याचा हक्क सांगण्यापुरती ती वरील तिन्ही रीतींहून भिन्न आहे.

## सत्याची आवड म्हणजे काय ?

( क्र० ४३ ). ' सत्याची आवड ' या शब्दांची नुसती व्याख्याच पाहिली तरी त्यांचा असा अर्थ निघतो कीं, कोणत्याही परिस्थितींत असतां सत्याच्या प्राप्तीच्या जाववेल तितकें जवळ जावयाचा कृतसंकल्प; अथवा पर्यायानें बोलावयाचें तर जेव्हां प्रत्यक्ष पुरावा मिळणें अशक्य असतें तेव्हां सर्वांत अत्यंत संभवनीय जें मत तें मान्य करावयाचें. या बाबतींत तात्त्विक व व्यावहारिक जीवनांत महत्त्वाचा फरक आहे. जो सत्याचा शोध चालवितो, त्याला संभवनीयतांचा एकवटलेला जोर ज्यांत दिसेल तो मार्ग अनुसरणें नेहमीं भाग असतें; परंतु आचरणांत कधीं कधीं अत्यल्प संभवनीयतेकडे दृष्टि देऊन आपला मार्ग आंखणें शहाणपणाचें असतें. कारण निरनिराळ्या मार्गांनीं मिळणाऱ्या सिद्धीच्या संभवनीयतांच्या तुलनेचाच आपणांस विचार करावयाचा नसतो, तर आणखी होणाऱ्या परिणामांच्या मोठेपणाचाही विचार करावयाचा असतो.

## अत्यल्प संभवनीयतेकडील दृष्टीचें उदाहरण.

उदाहरणः-आपल्या घराचा आगीपासून बचाव होण्याकरितां जो गृहस्थ त्याचा विमा उतरतो त्याच्या कृत्याचा अत्यंत संभवनीय परिणाम म्हणजे अजीबात व भरपाई न होणारें नुकसान होय; असें जरी आहे तरी त्याला आपण दूरदर्शी म्हणतों व तें वाजवी आहे. कारण त्याहून कमी संभवनीय गोष्टीनें त्याचें जें नुकसान होईल तें मनांत आणण्याची सोय नाहीं, व त्यामुळें ही कमी संभवनीय गोष्ट घडली असतां विम्यापासून होणारा लाभ फार मोठा आहे. संभवनीयतांचें शास्त्रीय विवेचन ज्यास म्हणतां येईल, त्याची प्रस्थापना करणारा फर्मातचा जोडीदार जो पास्कल त्यानें सदर्हु विचारसरणीवरून आपल्या धर्मज्ञानांतील मतांच्या मंडनार्थ एक फार चातुर्यदर्शक प्रमाण काढलें; हें प्रमाण नंतर एका क्रेग नांवाच्या इंग्रज गणितज्ञानें घेतलें ( ३९ ).

### पास्कलचें प्रमाण.

ते प्रतिपादित कीं, जेव्हां एकाद्या धर्मसंस्थेंत असंख्य कल्याणप्रद फळांचें आश्वासन असतें व असंख्य दंडांची भीति असते, तेव्हां स्वतःचा सांप्रतचा धर्म टाकून तो अंगीकारणें हें शहाणपणाला शोभण्यासारखें आहे; जर संभवनीयतांचें प्रमाण त्या धर्माला विशेष अनुकूल आहे असें मनुष्याला वाटत असेल, तरच केवळ हें त्याचें करणें चांगलें असें नव्हे, तर आणखी जरी त्याला त्या धर्मांतलें सत्य अत्यंत असंभवनीय ( म्हणजे अत्यल्प संभवनीय ) वाटत असेल तरीही हें करणें योग्य होईल; मात्र त्या सत्याच्या विरुद्ध संभवनीयता अनंत नसल्या पाहिजेत. आतां जोंपर्यंत असलें प्रमाण मनुष्यांना एकादा ठराविक व्यवहारमार्ग स्वीकारण्यास लावण्याकरितांच केवळ पुढें मांडण्यांत येत असतें, तोंपर्यंत त्याचा नीतिमत्तेशीं अवश्य संबंध असेलच असें नाहीं; व म्हणून त्याची किंमत दूरदर्शित्वाच्या मुद्यावरच ठरविणें बरें (४०). परंतु जेव्हां अत्यल्प संभवनीय मार्गाचा अवलंब करणें म्हणजे अंगीकाराची खूण म्हणून स्वोपदिष्ट सत्याविषयीं निरपेक्ष व मनःपूर्वक श्रद्धा बाळगण्याची अट प्रथमतः घालणाऱ्या धर्माचा अंगीकार करणें असा अर्थ होतो, तेव्हां तेथें जमीन-अस्मानाचा फरक पडतो.

## पास्कलच्या म्हणण्याचा अर्थ.

अशा प्रसंगीं पास्कलच्या म्हणण्याचा अर्थ मनुष्यांनीं कार्यकारणाभिज्ञतेच्या जोरावर जो विश्वास पटत नाहीं, तो इच्छाशक्तीच्या जोरावर ग्रहण करण्यास आपणांस भाग पडावें व एका बाजूकडून लक्ष्य काढून दुसऱ्या बाजूवर स्थिर करून व मनोवृत्तींच्या विक्षेपक प्रभावांचा उपयोग करून आपल्या निर्णयशक्तीच्या निकालांत ढवळाढवळ करण्याचा हर प्रयत्न करावा असाच होतो; दुसरा कांहीं होऊं शकत नाहीं. हा केवळ कांहीं गणितज्ञांचा तात्त्विक विचार नव्हे. प्रस्तुत विवेचनार्थ घेतलेल्या मताचा ज्यावर अंमल सुरू आहे, अशा प्रत्येक समाजांत याच तत्त्वानें लोक नेहमीं व्यवहार करितात (४१). मनुष्याच्या प्रमादाच्या इतिहासांत केवळ पांडित्य अगर अपूर्ण विचार यांना तुलनादृष्टीनें थोडी जागा असते; फसवणुकीचें नेहमींचें मुख्य कारण म्हटलें तर इच्छाशक्तीचें तट्टू आंत शिरतें हेंच. या इच्छाशक्तीचा प्रवेश न व्हावा म्हणून उत्तम परिस्थितींतही केलेली खटपट अपुरी पडते; पण जेथें जेथें तारणाभोगसंकोचाचें मत मान्य आहे, तेथें तेथें ही पद्धतच होऊन बसते; व तो सद्गुण मानला जातो.

## सत्याभिमानाचा प्रसार.

(क० ४४). गेल्या तीन शतकांतील सामान्य मनःप्रवृत्तींबद्दल जें काय वाटत असेल तें वाटो; पण लबाडीबद्दल वाढत्या असह्यतेच्या व संदेहात्मक गोष्टींबद्दल वाढत्या शंकेच्या रूपानें दिसणाऱ्या सत्याभिमानाच्या चेतनेचा या शतकांत झालेला विलक्षण प्रसार नाकबूल करणें अशक्य आहे, हें खास. वाढत्या मानवी सुधारणेचा हा एक सामान्य परिणाम आहे व सर्वप्रकारच्या बौद्धिक शक्तींचा संमीलनोन्मुख रोंख त्यावरच आहे; परंतु या सुधारणेचा आरंभ विशेषतः सतराव्या शतकांतील थोर सांसारिक तत्त्वज्ञांच्या लेखांपासून झाला म्हणतां येईल. या तत्त्वज्ञांनीं जुनी विचारसरणी नष्ट केली; पण ती केवळ वादविवादानें नाहींशीं केली नाहीं, तर त्या विचारसरणीशीं खटका उडेल अशी नवीन मीमांसापद्धति व उत्कृष्टतेचें मान सुरू करून ती नाहींशी केली. त्यांनीं लोकांना भोळेपणा लज्जास्पद मानण्यास, पूर्वग्रहांशीं निर्दय-

पणें झगडण्यास, गतकाळच्या निर्णयांविषयीं साशंक राहण्यास, व आपल्या श्रद्धेच्या आधाराची सावधगिरीनें छाननी करण्यास शिकविलें. केवळ सत्यासाठीं सत्याच्या आवडीची कोळपणी करण्यास त्यांनीं लोकांना मुख्यतः शिकविलें; सत्याची आवड हें मानवी जातीला बहुधा अत्यंत श्रेष्ठ भूषण होय; या एकटीच्याच आंगीं मनाला गुलाम करणाऱ्या अगणित बंधांतून त्याची सुटका करण्याची ताकद आहे व मानवी संस्थांच्या निस्तल गर्तेंत मार्ग दाखविण्याचें सामर्थ्य आहे. कोणत्याही लोभ जडलेल्या मताचा अगर कोणत्याही पुरातन वेदाचा होम करण्याची वेळ आली असतांही ही डगमगत नाहीं; व आपण स्वतः ईश्वराचें प्रतिबिंब आहों हें ओळखून स्वतःच्या ठायींच स्वतःचें फळ अनुभवून समाधान पावते.

## बेकन, देकार्त व लाक यांच्या प्रमुखत्वाचें कारण.

( क० ४५ ). बेकन, देकार्त व लाक यांना मानवी मताच्या इतिहासांत जी प्रमुख जागा मिळाली, ती त्यांनीं आपलीं मतें किंवा विवेचनरीती यांचा ज्या चातुर्यानें पोष व प्रसार केला त्यावर जितकी अवलंबून आहे, तितकी कांहीं त्या मतांच्या व रीतींच्या अपूर्वपणावर नाहीं. देकार्तच्या पुष्कळ अगोदर संत आगस्ताइननें ‘ कोजितो एर्गो सम् ’ मला विवेचकत्व आहे म्हणून अस्तित्व आहे हें तत्त्व प्रतिपादिलें होतें; पण संत आगस्ताइननें जें केवळ स्वयंसिद्ध म्हणून अगर फार झालें तर सहजगत्या केलेली सूचना म्हणून सांगितलें, त्याच पायावर देकार्तनें एक मोठी तत्त्वपद्धति रचली. बेकनच्या पन्नास वर्षें अगोदर लिओनार्दो द विन्सि यानें सामान्यानुमितीचें ( तर्काच्या विगमनपद्धतीचें ) वर्चस्व दाखविलें होतें; व तिचीं तत्त्वेंही स्पष्ट नमूद केलीं होतीं. परंतु जरी लिओनार्दोनें आपला ग्रंथ प्रसिद्ध केला असता तरीही बेकननें केलेला उदात्त परिपोष ती पद्धती शास्त्रीय विवेचनांत उत्तम ठरण्यास जरूर होता असें निर्बाधपणें म्हणतां येईल. या थोर गृहस्थांपैकीं प्रत्येकानें जुन्या विचारसरणीच्या मुळाशीं असलेल्या कोणत्या तरी बौद्धिक दोषावर मोठ्या सामर्थ्यानें हल्ला करून विस्मयकारक सिद्धि मिळविली. देकार्तचा उपदेश असा होता कीं, कोणत्याही ज्ञानाचा आरंभ म्हणजे प्रत्येक पूर्वग्रहाचा त्याग व प्रत्येक मत वैयक्तिक निर्णयशक्तीच्या कसोटीवर घांसून पहाण्याचा दृढनिश्चय होय.

## लाकनें काय केलें ?

लाकनें मनुष्याच्या मानसिक शक्तींच्या बाह्यरेषा रेखून ठेवण्याची आवश्यकता शिकविली; व आपल्या जन्मसिद्ध कल्पनांच्या मतानें व विशेषतः आवेशाच्या सर्वोत्कृष्ट पृथक्करणानें कार्यकारणविचाराच्या (४२) प्रांतांतून एका विशिष्ट वर्गाच्या मानसिक संघटना अजीबात काढून टाकण्याची इच्छा करणाऱ्यांच्या मतांवर प्राणघातक टोला लगावला. आपल्या राक्षसी बुद्धीनें ज्ञानाच्या प्रत्येक क्षेत्रांत संचार करणाऱ्या बेकनची मनावर छाप बसविणाऱ्या विक्षेपक कारणांचें वर्गीकरण केल्याबद्दल व प्रमेयाशीं वास्तविक गोष्टी ताडून पाहून प्रमेय दुरुस्त करावयाला एकसारखी ताकीद दिल्याबद्दल ख्याति आहे.

## देकार्तचें काम.

देकार्तनेंही जात्या बहुमूल्य ग्रंथ लिहून खेरीज तत्त्वज्ञानाची विद्वत्तेपासून काडीमोड करून त्याला प्राकृतजनांच्या विचारशक्तीकडे केलेल्या अभ्यर्थनेचें स्वरूप देण्यास आपल्या अगोदरच्या कोणत्याही लेखकाहून जास्त खटपट केल्याचें मोठें श्रेय मिळविलें. पंडितंमन्य पंथाच्या तत्त्वविवेचकांनीं तत्त्वज्ञानसंबंधीं मर्यादानिश्चय बहुतेक पूर्णतेच्या कल्पनागम्य शिखरास नेऊन पोंचाविला होता तरी त्यांनीं वादाची धाटणी इतकी पांडित्यानें, सूक्ष्मभेदांनीं व अनंत चर्वितचर्वणानें परिपूर्ण व कंटाळवाणी स्वीकारली होती कीं, अत्यंत धिम्मे विद्वान् खेरीज करून सर्व लोक त्यांच्या ग्रंथांना कंटाळत; आणि त्यांनीं प्रमाणवचनांकडे निरंतर केलेल्या अभ्यर्थनेमुळें व ते फक्त लातिन भाषेंतच लिहित असल्यामुळें जे केवळ थोडें शिकलेले असत त्यांना वादविवादांत शिरतां येत नसे. धर्मसुधारणाकाळाच्या सुमारास विद्वन्मंडळाच्या सार्वजनिक व्याख्यानांना जें विशेष महत्त्व आलें त्यानें जास्त साधी व सामान्य जगसमूहाला समजेल अशी धाटणी सुरू होण्यास साहाय्य झालें असा तर्क आहे.

## देशी भाषांतच लिहिलेले ग्रंथ.

देकार्तच्या ‘ पद्धति ’ नांवाच्या पुस्तकाच्या साठांहून जास्त वर्षांपूर्वीं रामसनें आपल्या ‘ भवति न भवति ’ या पुस्तकाच्या रूपानें फ्रेंचभाषेंत तत्त्वविवेचनाचा ग्रंथ प्रसिद्ध करण्याचें उदाहरण घातलें होतें;

व ब्रूनोनें आपले कांहीं स्वप्नतरंग इतालियन भाषेंत लिहिले होते. परंतु या दोहोंपैकीं तत्त्वविवेचनाच्या इतिहासांत नवा मनु सुरू करण्याइतकें एकाचेंही सामर्थ्य नव्हतें; व त्यांच्या झालेल्या अखेरीनें त्याचें अनुकरण करण्यास कोणालाही उत्तेजन येण्यासारखें नव्हतें; कारण संत ब्रार्थालोम्यूच्या रात्रीं सनातन्यांनीं रामसचा खून केला व ब्रूनोला धोगाचार्यांनीं रोम येथें जिवंत जाळलें, देकार्त हा दुसऱ्या कोणाहून ज्याला जनसमूहग्राह्य म्हणतां येईल अशा तत्त्वज्ञानाचा संस्थापक होय व हा त्याचा लहानसहान गुण नव्हे. पुनः लाक व बेकन यांचा प्रभाव जुन्यांचा कपोलकल्पिततेकडचा कल फिरवण्यास विशेष समर्थ होता; याचें कारण दोघांच्या तत्त्वविवेचनांतली खुबी अशी होती कीं, त्यांत कपोलकल्पिकतेला वाव नव्हता. ह्या विशेषाचा लाकच्या बुद्धीशीं मेळ होता; पण बेकनच्या संबंधानें तो संस्मरणीय होय; कारण त्याच्या थोर मानसिक शक्तींत कल्पकतेचें मान बहुतेक बेताल होतें. बेकनच्या तत्त्वविवेचनाच्या या स्वरूपाचा सध्या इंग्रज बुद्धीवर निःसंशय हानिकारक परिणाम होत आहे, कारण त्या योगानें त्यांना उंच प्रतीच्या सामान्य तत्त्वांचा व थेट व्यावहारिक फळ न देणाऱ्या तात्त्विक विचारांचा अमूप वीट आलेला आहे; ही गोष्ट युरोपांतील ब्रितिश बेटांखेरीज इतर देशांतल्या पुष्कळ लेखकांनीं प्रतिपादिली आहे; व निदान तीन अत्यंत प्रमुख इंग्रज ग्रंथकारांनीं (४३) तरी तेंच म्हटलें आहे.

## बेकनचे कांहीं चेले.

या बाबतींत बेकनचे कांहीं चेले जितके दूर गेले आहेत, तितका तो स्वतः कधींही गेला नाहीं, हें अगदीं निःसंशय खरें. उपयोगित्व हा शास्त्राचा एकुलता हेतु असें त्यानें कधींही म्हटलें नाहीं; किंवा निदान उपयोगित्व म्हणजे केवळ जडात्मक फायदे असेंही त्यानें कधीं म्हटलें नाहीं. शोधांच्या सर्व फळांहून(४४) तात्त्विक सत्याची महती उदात्त भाषेनें त्यानें प्रतिपादिली आहे; व त्यानें कोणत्याही काळचें बौद्धिक स्वरूप बनविणारे तात्त्विक विचार निरुपयोगी कधींही म्हटले नसते. तथापि उलटपक्षीं कबूल केलें पाहिजे कीं, त्याच्या लेखांचा सामान्य रोख, प्रयोगांच्या महत्त्वावर त्यानें टाकलेला विलक्षण भार, व विशेषेंकरून जड सौख्यांवर होणारा त्याच्या तत्त्वविवेचनाचा

प्रभाव, यांत अशी कांहीं प्रवृत्ती दिसते कीं, तिचा परिपोष फार स्वाभाविकपणें संकुचित उपयोगित्व वादांत झाला. ज्यांना सृष्टपदार्थशास्त्रांचा मानवी जातीच्या जड सौख्यांच्या वृद्धीकडेच केवळ उपयोग आहे, असें वाटे ते बेकनचे चेले म्हणण्यांतला अर्थ व कांडिल्याक व तदनुयायी हे लाकचे चेले म्हणतात त्यांतला अर्थ एकच. त्यांनीं आपल्या गुरूचीं मतें जशींच्या तशींच स्वीकारलीं नाहींत; तर त्यांच्या म्हणण्याचा सामान्य रोंख स्वीकारला.

## लाकची पद्धति माध्ययौगिक विचारसरणीला प्राणघातक.

परंतु सामान्यानुमितिमूलक (विगमनतर्कमूलक) तत्त्वविवेचनाचा सध्या इंग्रज मनावर जो परिणाम झालेला आहे, त्या विषयीं कांहींही वाटो; इतकें निःसंशय कीं, तें तत्त्वज्ञान व लाकचा निबंध या दोहोंत जें कांहींसें भराऱ्या न मारतां रंरं करीत जाणारें स्वरूप दिसतें तेंच माध्ययौगिक विचारसरणीला विलक्षण प्राणघातक झालें. इंद्रियांचें राज्य वाढवून, अनुभव ही सत्याची शेवटची कसोटी मानून व प्रमेयवाद्यांच्या भराऱ्यांची खूब कंबर मोडून त्यांनीं युरोपच्या कल्पकतेला थोपाविलें, त्यावेळपर्यंत मान्य असलेल्या बेताल कपोलकल्पित गोष्टींना हास्योत्पादक स्वरूप आणलें, व लोकांना आपल्या सांप्रदायिक गोष्टींस व मनोवृत्तींस अशा कसोटीवर घांसावयास शिकविलें कीं, त्यामुळें त्यांतलें आभासरूप गूढ पार निघून गेलें. वाल्तेर व तदनुयायी यांनीं ज्या तत्त्वांनीं फार उंच उंच धर्मसंस्थारूप प्रासाद ढांसळून जमीनदोस्त केले, तीं तत्त्वें लाक व बेकन यांच्या लेखांतून काढलीं होतीं; व माध्ययौगिक धर्मज्ञानाचें मंडन करणाऱ्या समर्थ गृहस्थांचें कट्टें वैर तें याच तत्त्वज्ञांविरुद्ध होय. (४५)

## सतराव्या शतकांतील महद्गुरूंनीं केलेलें कार्य.

(क० ४६) येणेंप्रमाणें, स्वकालीन प्रवृत्तींचे जे स्वतः केवळ थोर प्रतिनिधी अशा त्या सतराव्या शतकांतील महद्गुरूंनीं लोकांच्या मनांला निःपक्षपात शोधाची तालीम दिली व तो काळपावेतों त्यांस बद्धवीर्य करून टाकणाऱ्या मंत्रशक्तीचें खंडन करून त्यांच्या ठायीं सत्याची अशी निःसीम भक्ति उत्पन्न केली कीं तिच्या योगानें ज्ञानाच्या प्रत्येक शाखेंत

क्रांति घडून आली. जुने पूर्वग्रह नष्ट करून, भ्रमांचा निरास करून, आमच्या ज्ञानाच्या नानाविध भागांची नवीन व्यवस्था लावून व आमच्या सहानुभूतींची सर्व कक्षा व स्वरूप बदलून, अंधारांत साफ गडप झालेल्या भेगाफटींत शिरणाऱ्या, सर्व इतिहास, सर्व शास्त्र, सर्व धर्मज्ञान यांना नव्यानें तारुण्य देणाऱ्या, मोठ्या टीकापटु चळवळीचें जनकत्व त्यावेळीं लोकमनाला जी प्रेरणा मिळाली तिच्याकडेच देतां येईल.

## कार्यकारणाभिज्ञतेच्या चेतनेच्या साहाय्यावांचून तें कार्य अशक्य झालें असतें.

पण प्रमाददोषाच्या कल्पनेला ग्रहण लावणाऱ्या अगर तिचा साफ नायनाट करणाऱ्या कार्यकारणाभिज्ञतेच्या चेतनेचा प्रसार झाला नसता तर हें सर्व अशक्य झालें असतें. कारण आपण पाहिलेंच आहे कीं, जेव्हां जेव्हां तारणाभोगसंकोचनमताबद्दल सामान्यपणें श्रद्धा व प्रचीति वाटत असते, तेव्हां तेव्हां त्या भोंवतीं शोधक बुद्धीच्या थेट उलट व मानवी प्रगतीशीं मेळ न बसणाऱ्या विचारसरणीचें आळें तयार होतें. सत्याविषयीं औदासीन्य, अंध असून स्वेच्छ अशा श्रद्धासुलभतेची चेतना, यांस उत्तेजन मिळतें; व त्यामुळें हर एक प्रकारच्या कपोलकल्पित गोष्टींचा भरणा होतो, शोधकपणाचा संबंध संकट व दोष यांच्याशीं जडतो, सत्याचा आत्माच असा जो निर्णय व परिशीलन यांतील निःपक्षपात त्याला लोक अमंगळ मानावयास शिकतात, व लोकांच्या मानसिक शक्ती इतक्या पुंस्त्वहीन होतात कीं, दरएक विषयासंबंधी जिकडे तिकडे निद्राशैथिल्य उपजतें. कारण आपल्या ज्ञानाचीं निरनिराळीं मूळ अंगें परस्पर इतकीं संलग्न आहेत कीं, त्यांना विभक्त करून निराळ्या शाखा बनविणें व इतरांत शोधकबुद्धीची प्रेरणा जिवंत असतां एकीवर श्रद्धालुत्वाचें अधिष्ठान राखणें अशक्य होय. मध्ययुगांत धर्मज्ञानाला वर्चस्व होतें; व निव्वळ भोळेपणा ही कायती त्या धर्मज्ञानांतली मख्खी; तेव्हां विचाराच्या सर्व प्रकारांत तोच भोळेपणा चटदिशीं पसरला.

## निष्पक्षपाती व निर्बंधरहित शोधाची आवड.

पुढें सतराव्या शतकांत धर्मज्ञानाचें प्रामुख्य निश्चित राहिलें नाहीं, आणि थोर थोर धर्माधिकारकक्षाबाह्य लेखकांनीं निष्पक्षपाताची व निर्बंधरहित शोधाची आवड उत्पन्न केली; तीच सृष्टपदार्थशास्त्र व अतींद्रियशास्त्र यांतून झपाट्यानें धर्मज्ञानांत शिरली, आणि तिनें स्वतःस न रुचणारीं सर्व मतें नष्ट अगर निःसत्त्व केलीं. चिलिंग्वर्थनें इंग्लंदांत प्रथमतःच अगर बहुतेक प्रथमतःच प्रामाणिक प्रमाद साफ निर्दोष होय, असा जो उपदेश केला तो बेकन व लाक यांच्याच लेखांच्या मध्यंतरीं; टेलर, ग्लान्विल व हेल्स यांच्या बुद्धिवैभवानें ज्याचा प्रकाश फांकला. व जो धर्मस्वातंत्र्याचें केवळ केंद्र व बीजसंवर्धक क्षेत्र झाला, तो उदारप्रस्थ पंथ बेकन व लाक यांच्याच लेखांच्या मध्यंतरीं बनला. दंडपद्धतीच्या नियमावलींतून ‘ द हेरितीको काम्ब्यूरेंदो ’ गळाला व इंग्लंदच्या भूमीला पाखंडयाच्या रक्ताचा शेवटला डाग लागला तो त्याच लेखांच्या मध्यंतरीं होय.

सं. ... 90655

# परिशिष्ट.

## ग्रंथकाराच्या टीपा.

## प्रकरण १ लें.

१. या विधानांतील सामान्य सत्याबद्दल शंका क्वचितूच घेतां येईल असें वाटतें; मात्र त्याला थोडेसे ठळक अपवाद निःसंशय आहेत. उदाहरणार्थ, जेव्हां सुंदर फिलिपाला टेम्प्लरांची संपत्ति जप्त करण्याची इच्छा झाली, तेव्हां त्यांवर चेटुक करण्याचा आरोप आणला होता. वादायच्या पाखंडी मतांचा इ. स. १४५९ तल्या आरास येथील खटल्याशीं थोडाबहुत संबंध असावा व खरोखर वादेरी हें चेटकाचें एकदां पर्यायनाम होतें. आणखी या आरोपावरून त्रास देऊन राजकारणी पुरुष व बडे गृहस्थ नष्ट केल्याचीं कांहीं उदाहरणें आहेत; व इंग्लंदांत लोकसत्ताक अमलांत चेटक्यांचा तपास लावण्याचा धंदा करणारे एक दोन इसम होते. तसेंच मठांतल्या गाफ्रिदि, ग्रांदियर, व लाकादियर यांच्यासारख्यांच्या कांहीं लोकवादाच्या गोष्टी हिशेबांत धरल्या पाहिजेत. पण या सर्व गोष्टी वजा केल्यावर चेटकाचे खटले बहुधा इतर कोणत्याही सांगण्यासारख्या खटल्यांहून जास्त बिनचूकपणें शुद्ध भोळसटपणा दाखविणारे होत. चेटक्यांपैकीं बहुतेक अत्यंत दरिद्री असत. तत्कालीन धार्मिक व प्रापंचिक वरिष्ठ व शुद्ध न्यायासनांतून त्यांना शिक्षा दिल्या जात; आणि ज्यापक्षीं त्या काळीं पाखंड्यांना त्यांच्या मतांबद्दल बिनअडचण जाळतां येत असे, त्यापक्षीं त्यांवर चेटकाचा आरोप आणण्याचा मोह थोडा पडला असता आणि खेरीज या छळांत सर्व पक्षांचें अंग असे. पंधराव्या शतकांतला एक इतालीयन पाखंडन्यायाधीश ग्रिलांदस याचें म्हणणें पहा ( द सार्तीलेजीई ' भाग ३ ). यापुढें दिसून येईल कीं, निरनिराळ्या वर्गांच्या माणसांवर चेटुक व पाखंड या रूपांनीं परिणाम करणारी चेतना एकच होती; व म्हणून हे दोन्ही प्रकार साहचर्यानें असत.

३. फ्रान्सच्या सर्व दक्षिण भागांत छळाचें काम अत्यंत अत्याचारानें चाललें. बोर्दो येथील चेटकाचा संबंध तेथें असलेल्या अनेक फळबागांशीं असावा, कारण फळांवर सैतानाचें विशेष प्राबल्य चालतें, हें सुप्रसिद्धच आहे. ही दलांकरनें केलेली सूचना चातुर्यदर्शक होती ( गारिनेत पृ. १७६

उतारा वाचा). हा भोळसटपणा अजून चालू आहे व या शतकांत पिरीनीसच्या आसमंतात् तदर्थ रक्तस्राव झाला; हें त्या विश्वासाच्या चिकाटीचें भयंकर उदाहरण आहे. मेयेनच्या लोकांनीं इ. स. १८०७ त चेटकाच्या आरोपावर एका भिकाऱ्याला पकडून हालहाल करून जाळलें. इ. स. १८५० त तार्बे येथील दिवाणी न्यायासनानें बेदुरे नांवाच्या स्त्रीला मारल्याबद्दल सुबेर्वी नांवाच्या एका पुरुषाची व स्त्रीची चौकशी केली. या दोघांना बेदुरे ही चेटकी आहे असें वाटत होतें. सुबेर्वी बाईला जो रोग झाला होता, त्याचें कारण ती चेटकी होय; असें उपाध्यानें आपणाला सांगितल्याचें सुबेर्वींनीं न्यायाधिशापुढें सांगितलें. तसेंच त्यांनीं कबूल केलें कीं बेदुरे बाईला आपण एका आडखोलींत नेलें, तेथें जळत्या गवतांत तिला दाबून ठेविलें व लाल तापवलेला लोखंडाचा तुकडा तिच्या तोंडावर दाबून धरिला. ती दुर्दैवी स्त्री लगेच त्या यातनांनीं प्राणांस मुकली. सुबेर्वींनीं ही गोष्ट कबूल केली व आपल्या कृत्याबद्दल फुशारकी मारली. या खटल्यांत त्यांचें शील उत्तम म्हणून ठरलें; फक्त भोळसटपणानें त्यांनीं हें काम केलें असें दाखविण्यांत आलें; व यालाही उंची उंची धार्मिक दाखले आहेत, असें त्यांच्या वतीनें प्रतिपादिलें गेलें. पंचांनीं दया दाखविण्याची शिफारस केली. आरोपितांनीं चार महिन्यांची कैद भोगावी व मयत बाईच्या नवऱ्यास दरसाल २६ फ्रांक द्यावे, ही शिक्षा न्यायासनानें त्यांस दिली. (कोर्दिअरचें 'लिजेंदिस द हातांस पिरेनेइस' लूर्द पृ. ७९ ते ८८).

४ लारेन्तचा 'पाखंड न्यायासनाचा इतिहास' (इं. भा.) पृ. १२९ ते १४२. इ. स. १५०७ त काल्हाहोरा येथें पुष्कळ खटले झाले; त्यांत तिसांवर बायकांना जिवें जाळलें. इ. स. १५२९ इतक्या जुन्या काळीं कास्तानागा नांवाच्या स्पानिश मठवाशानें या देहान्त शिक्षेच्या न्याय्यतेविषयीं शंका घेतली होती (पृ. १३१). गारिनेत पृ. १७६, मादन खं. १ पृ. ३११ ते ३१५ सुद्धां पहा. तोलेदो हें जादूगारांचें मुख्य ठाणें मानीत; याचें कारण बहुधा असें कीं, गणिताचा व जादूचा नेहमीं घोटाळा करीत; आणि बाराव्या व तेराव्या शतकांत युरोपांतील इतर कोणत्याही भागापेक्षां तोलेदो येथें गणिताची भरभराट होती.

६ लीतीयननें ज्याचें नांव अमर करून ठेविलें आहे तो धर्मवीर पीतर छळ करण्यांत अत्यंत जोरदार होता. स्मिना 'अपालो.' कलम ९.

७ मादन खं. १ पृ. ३०३, ३०४; मिचेलेत 'लासार्सिएर' पृ. २०६. तलच्या गोळीला सैतानाचें साह्य मिळालें असें स्प्रेंजर म्हणतो. 'मालमल.' (भा. २ क. १६) वेडाच्या सांथी चेटकामुळें येत असें मानीत. सन्हाय

येथें तसल्या सांथी विशेषेंकरून येत. आपण जाळलेले मुख्य मुख्य चेटके त्या प्रांतांतले होते, हें बोगेच्या लक्ष्यांत आलें होतें. प. कान्स्तन्स यानें एक पुस्तक १८६३ त लिहिलें आहे. त्यांत मोर्झिनिस नांवाच्या लहानशा खेड्यां तल्या असल्या नुकत्याच झालेल्या सांथीची विलक्षण हकीकत आहे. आलन कार्देक व मिर्विल हे दोन फ्रेंच लेखक या सांथीला अमानुष कर्तृत्वाचा परिणाम म्हणतात.

१० या विषयावरील सनातनपंथी उपदेशाचा भरपुर पुरावा मादन द मोसो व थिअर्स यांच्या ग्रंथांत मिळेल. शेवटचे दोन ग्रंथकार उत्कट सनातनी होते. थिअर्स हा विद्वान् व नेमस्त धर्मज्ञानपंडित असून, पारिसच्या पंडितांच्या अनुमतानें त्यानें ग्रंथ लिहिला. आठव्या इन्नोसेंतचें आज्ञापत्र 'माल्यूस मालीफिकारम' च्या आरंभीं जोडलें आहे.

११ काल्विननेंही जिनेवाचे कायद्यांची दुरुस्ती करितांना चेटकासंबंधीं कायदे तसेच ठेवून दिले.

१२ हें पहिल्यांदां वियरनें प्रतिपादिलें असें वाटतें. इंग्लंदांत दुसऱ्या चार्लसच्या वेळीं हें फार प्रतिपादिले जाई. या प्रश्नाची दुसरी बाजू इंग्लंदांत ग्लान्विल, मोर, कासाबों वगैरेनीं व इतर देशांत बोदिननें उचलली होती.

१५. या विषयाच्या फार गूढ बाबींचें पूर्ण विवेचन मारीनें फार नांवाजण्यासारखें केलें आहे.; याचा ग्रंथ विद्वत्तापूर्ण व जोरदार आहे, व त्याचें प्रस्तुत ग्रंथाला पुष्कळ साह्य झालें आहे.

१७. ख्रिस्तीधर्मबाह्य लोकांच्या पूजेअर्चेशीं या मताच्या संबंधावर मारीचा नव-प्लेतो पंथावरील भाग वाचा. तसेंच प्लेतोच्या प्रमेयावर रचलेलें विलक्षण प्रमाण पहा.

१८. ही चमत्कारिक कल्पना देण्याला प्रमाण हूनाकच्या भविष्याचें आढळलें. हें प्रमाण धर्मशास्त्रांत आहे असें कित्येकांस वाटे. तर्तुलियनचें मत असेंच दिसतें. सन्त आगस्ताइन सुचवितो कीं, जलप्रलयापूर्वीच्या लोकांवर प्रेम करणारे देवदूत हे बहुतकरून पिशाच असावे; त्यांना इन्क्युबी म्हणजे रतिसुखभोक्ते म्हणत, व हूनाकचे म्हणून म्हणतात त्या लेखांत व धर्मशास्त्रांत जिकडे तिकडे जो 'एन्जल' शब्द फक्त दूत या अर्थीच आला आहे, तो चांगल्या व वाईट दोन्ही प्रकारच्या आत्म्यांस लागतो चेटकासंबंधीं पुढील काळच्या धर्मज्ञानावर ह्या अर्थनिर्णयपद्धतीच्या नियमाचा महत्त्वाचा परिणाम झाला असें पुढें दिसेल.

१९. बहुतेक अशाच प्रकारच्या कल्पना फेरी ( म्ह. यक्षिणी ) विषयीं पुढें बऱ्याच काळपावेतों होत्या. एक फ्रेंच लेखक लिहितो कीं, अठराव्या शतकाच्या सुमारें मध्यापर्यंत पायझीच्या मठांत मठवासिनींवर यक्षि-

र्णीचा प्रताप चालूं नये म्हणून वर्षांतून एक प्रार्थनादिवस पाळला जाई. ( दमोसो 'प्रातिक्स द दीमन्स' पृष्ठ ८१ ).

२० मेसालियन नांवाच्या चौथ्या शतकांतील पाखंडी पंथाचे लोक तर या बाबतींत इतके पुढें गेले होते कीं, त्यांनीं थुंकणें हें सुद्धां धार्मिक कृत्य मानलें होतें. श्वासाबरोबर पोटांत गेलेले पिशाचात्मे थुंकीबरोबर बाहेर टाकावयाचे असा त्यांचा हेतु. ( मारी पृ० ३१७ ).

२१. हीच कल्पना पुढच्या काळांतही चालू होती; व चेटकाच्या खटल्यांत पिशाचांबरोबर लग्न लावल्याचा एक आरोप पुष्कळ दिवस आणीत असत. स्त्रीदेहधारी पिशाचांना बहुधा 'सक्युबी' म्ह० रतिसुखदायिनी म्हणत व पुरुष देहधाऱ्यांस 'इन्क्युबी' म्ह० रतिसुखभोक्ते म्हणत. ( हा फरक नेहमींच राखीत नसत. ) रतिसुखभोक्त्यांपेक्षां रतिसुखदायिनी विरळा असत. पण एका धर्मोपाध्यायाचा एका रतिसुखदेशीं चाळीस वर्षें समागम होता. व दुसऱ्या एका धर्मोपाध्यायाला एक रतिसुखदा पन्नास वर्षें गृहिणीसुख देत होती; असें बोदिन सांगतो. या दोघां उपाध्यायांना जिवें जाळलें. ( दिमोनोमानी द सार्सिअर्स ' पृ० १०७ ) ल्यूथरचा या पिशाचमनुष्यव्यवहारावर दृढ भरंवसा होता ( कित्ता ). रतिसुखभोक्ते पिशाच ज्यास्त होते. शेंकडों कदाचित् हजारों बायकांना त्यांवर भरंवसा ठेवल्यावरून जळावें लागलें आहे. सुकेशी स्त्रियांना ते विलक्षण मोहून जात असें पहाण्यांत आलें होतें. सन्त पालनें 'दूतांसाठीं मस्तकांवर आच्छादन घ्या असा स्त्रियांना ज्यांत उपदेश केला आहे, त्या कांहींशा विलक्षण वचनांत त्यानें याच गोष्टीकडे रोंख ठेविला होता; असा सनातनपंथाचा विश्वास होता. ( स्प्रेंजर माल. मालि. भा. १ प्रश्न ४ आणि भा. २ प्र. २ ) रतिसुखभोक्त्यांस बहुधा मूल होत नसे; पण या नियमाला कांहीं अपवाद होते. कारण नायदर नांवाचा एक पाखंडन्यायाधीश खात्रीनें सांगतो कीं, स्वायंप्रस बेट या रतिसुखभोक्त्यांच्या मुलांनीं संपूर्ण भरून गेलेलें आहे. ( 'माल. मालि.' पृ. ५२२ ) हूण लोकांची पूर्वपीठिका अशीच लावतात. 'नाइटमेअर' ( झोपेंत छाती दडपल्याचा भास ) या नांवावरूनच त्याचा संबंध याचप्रकारच्या विश्वासाकडे लावतात. ( यांत 'नाइट' व 'मारा' असे दोन शब्द आहेत. 'मारा' म्ह० 'इन्क्युबस.' त्याचा 'मेअर' असा शब्द राहिला ) ( बोदिन पृ. १०९ मधील चमत्कारिक उतारा पहा ) 'ड्युसिआय्' यांचे पराक्रम सन्त आगस्ताइननें वर्णिले आहेत. हे सेल्तिक पिशाच होत. यावरूनच इंग्रजी 'ड्यूस' म्ह० पिशाच हा शब्द झाला. ( मारी पृ. १८९ ) काबालिस्त व इतर मध्य-

युगांतल्या गूढ समाजांचे 'सिल्फ' (वनदेवता) 'सालामांदर' वगैरेशीं तत्वज्ञांच्या संबंधाबद्दलचे वरच्याहून बरे विचार 'ल काम्त द गाबाली ओ एन्त्रेतियन सुर ल सायेरस सिक्रेत' या पुस्तकांत पहावे. आदामची पहिली बायको लिलिथ इच्याबद्दल राबिनी संप्रदायाच्या बऱ्याच गोष्टी आहेत. ही मुलांचें रक्त शोषते असें म्हणत, व हिच्या नांवावरून 'ललाबाय' म्ह० अंगाई हा इंग्रजी शब्द निघाला (लिली आबाय). अशी कांहींची कल्पना आहे; ही लिलिथ रतिसुखदा पिशाचिकांची राणी असें बऱ्याच काळपावेतों मानीत. (फ्रान्सी 'डिक्शन—इन्फ' क. लिलिथ) ग्रीक लोकांचा असा विश्वास असे कीं, एफियाल्तिस नांवाच्या पिशाचाच्या येण्यामुळें 'नाईटमेअर' होत असे.

२२. तर्तुलियनचें 'दस्पेक्ताक्यूली' भा २६ पहा. या लेखकानें दुसऱ्या एका बाईविषयीं खात्रीनें लिहिलें आहे कीं, ती एकदां एका नटाला भेटावयाला गेली होती. भेट् नआल्यावर रात्रीं एकसारखें कफनाचें वस्त्र स्वप्नांत दिसत होतें; व त्या नटाचें नांव भयंकर शिव्याशापांसह तिच्या कानांत दुमदुमत होतें. याहून अलीकडच्या काळीं नामांकित सन्त ग्रेगरी सहाव्या शतकांतील एक गोष्ट सांगतो कीं एक मठवाशीण बागेंत फिरत होती; तिनें शूळाची खूण केल्याखेरीज लेत्यूसचा पाला खाल्ला. लागलीच तिला अत्यंत पश्चात्तापाला कारण घडलें. या तिच्या मूर्खपणाच्या घाईनें एक पिशाच त्या पाल्यांतून तिच्या पोटांत गेलें ('डायालोगी' पुस्तक १ भा. ४) सर्व गोष्ट मजेदार आहे. पण येथें घेण्यास स्थलावकाश नाहीं.

२४ हा इतिहास मारीनें व ब्यूमोतनेंही उत्तम लिहिला आहे.

२५. 'कोदेक्स थिओदोसिआनस' खं. ९ प्रकरण १६, कल. १ पो.क. २, पेगन इतिहासकार झोसिमस म्हणतो कीं, जेव्हां कान्स्तन्ताइननें स्वदेशींच्या देवांचा त्याग केला; तेव्हां भविष्यकथनकलेचा त्यानें तिटकारा दाखविला. असा त्यानें अधर्म आरंभिला (खं. २ क. २९) कान्स्तन्ताइनच्या भविष्यकथनाच्या बंदीला युझेबियस पेगनी धर्माविरुद्ध उघडपणें केलेल्या योजनांच्या माळेंतच गोंवतो. ('विता कान्स्त.' खं. १, कल.१६).

२९. 'विता सांक्तीहिलारीओनिस.' ब्यूमोतनें हा चमत्कार वर्णिला आहे. सन्त हिलारीओनचें सर्वच चरित्र अद्भुत कथानकांनीं भरलेलें आहे. त्यावरून वर दिलेलें मत सिद्ध होतें. २०० लोकांना सुमारें दोन महिन्यांच्या अवधींत बरें केलें, सर्वांना पळवून लावलें, वगैरे वगैरे. शिवाय पुढील काळांतल्या चेटक्यांप्रमाणें लीलेनें हा सन्त पाऊस आणीत असे.

४२. ज्या रोमी कायद्याचें परीक्षण केलें आहे त्याचें हें नांव. 'म्याथेम्यातिकस' म्ह० गणिती अगर गणक असें फलज्योतिषांना म्हणत.

४४. गारिनेत पृ.४५ कांहीं काबालिस्तांचे प्राणही यानें वांचविले.

४५. गारिनेत पृ. ३५. तथापि या बद्दल शंका आहे. हर्दर म्हणतो कीं, 'आरोरा' म्ह० ध्रुवांकडील उषस्तेज' हें पिशाचें नाच खेळतात त्यामुळें होतें असा ग्रीनलंदमधील लोकांचा विश्वास आहे.

४६. हिब्रू काबालाविषयीं मा. फ्रांकचें विद्वत्ताप्रचुर पुस्तक पहा. व मध्ययुगांतील आणि सोळाव्या व सतराव्या शतकांतील विचाराविषयीं 'लकाम्त दगाबालिस्त' पहा. फ्रान्सी 'डिक्शन. इन्फ' कलम 'काबेल' पहा. मूर्तिपूजक लोकांच्या सर्व देवांस हवेंतलें इतर पिशाच अगर सिल्फ म्ह० वायुदेवता मानीत. वेस्ता ही नोव्हाची बायको, झोरोस्तर तिचा मुलगा, याचें दुसरें नांव जाफेत. आदामचें पाप म्हणजे आपल्या स्त्रीसाठीं सिल्फचा त्याग. फळाची गोष्ट रूपक होय वगैरे ही शेवटली कल्पना मानिशी(द्वितत्व) पंथाचा अवशेष होय; ती दहाव्या व अकराव्या शतकांतल्या पाखंड्यांत फार आढळे. ( मातर 'हास्त दुग्नास्ति सिझम' खं. ३ पृ. २५९।२६०) पारासेल्सस हा सिल्फ वगैरे आहेत म्हणणाऱ्यांत प्रमुख होता.

४७. ही फार जुनी कल्पना होती. सन्त बासील ती जोरानें प्रतिपादि कद्वर्थचें 'इन्त. सिस्तम.' खं. २ पृ. ६४८

४९. इ. स. १७८२ त स्वित्झर्लंदांत दिलेली देहान्त शिक्षा यूरोपांतली शेवटली वाटते ( मिचेलेतचें 'सार्सिएर' पृ. ४१५ ). या विषयावरील शेवटचा घडलेला कायदा म्हणजे आयरिश स्तात्यूत. तो इ.स. १८२१ पर्यंत रद्द झाला नव्हता.

५०. या फार संस्मरणीय चळवळीचा इतिहास आव्हेरोजवरच्या रेनानच्या निबंधांत पहावा. महंमदीयांत भयानकता इतकी वाढली कीं, धर्मज्ञानपंडितांनीं तर्कशास्त्र व तत्त्वज्ञान हे आपल्या धंद्याचे दोन मोठे शत्रु असें जाहीर केलें; व त्या विषयावरचीं सर्व पुस्तकें जाळून टाकण्याचा हुकूम केला. ख्रिस्ती लोकांत सन्त थामस एक्विनास यानें आपलें बुद्धिसर्वस्व या वादांत खर्च केलें; व दोन तीन शतकेंपर्यंत ख्रिस्तीधर्मांतील बहुतेक मोठ्या ग्रंथांत आव्हेरोजच्या कांहीं तरी खुणा असत. आव्हेरोजला लोकमान्यता किती मिळाली होती, याचा कांहीं विलक्षण पुरावा चौदाव्या शतकांतील इतालियन चित्रकारांवरून मा. रेनाननें गोळा केला आहे. पिसा येथील काम्पोसान्तो मध्यें आर्गग्नानें काढलेलें नरकलोकाचें चित्र आहे. त्यांत तीन मुख्य चित्रें आहेत. तीं

महंमद, आन्ति-क्राईस्त व आन्हेरोज यांचीं होत.

५१. दिद्रोनचें 'आयकानोग्राफी क्रेनिएन, हिस्तायर द दिउ' पृ.२६२ पहा. तथापि या फार संस्मरणीय क्रांतीच्या सर्व इतिहासासाठीं पृ.२५५ ते २७३ वाचा. आणखी असें म्हणतां येईल कीं तेराव्या शतकाच्या सुमारास सैतानाच्या चित्रांत असाच फरक होऊन तें ज्यास्त भयानक व विद्रूप झालें ( मारी 'लिजेन्दिस प्यूसिस' पृ. १३६ ). या विषयाचा जसजसा अधिक तपास करावा तसतसें अधिक स्पष्ट होतें कीं, छापण्याच्या शोधापूर्वी चित्रकर्म हा लोकमनाचा अगदीं बिनचूक आरसा होता. त्यांत प्रतिबिंबित नाहीं अशी बौद्धिक चळवळ क्वचित् होती. या काळच्या सर्वसाधारण भयानकतेविषयीं मिचेलेतचें 'हिस्तायर द फ्रान्स' खं. ७ पृ.१४० १४१ पहा.

५५. हेकरचें 'मध्ययुगांतील सांथी' पृ. २९. बुकाशिओनें ही सांथ स्वतः पाहिली आहे व त्यानें तिचें वर्णन केलें आहे.

५६. हेकर पृ. ८२. नाचणाऱ्यांना आपणांस कोणी रक्ताच्या नदींत बुडविलें असें वारंवार वाटे. बहुधा त्यांच्या अंगांतलें भूत काढून टाकीत असत.

५७. त्रेव्जजवळ अझून त्या सांथीप्रीत्यर्थ वार्षिक उत्सव होत असतो. मादन खं. १ पृ. ४२०.

५९. एनेमोझर 'जादूचा इतिहास' खं. २ पृ. १५०. येथें उदाहरणादाखल कलेच्या इतिहासांतील दोन गोष्टी देतों. पहिली गोष्ट अशी कीं, जीं चित्रें पुढें इतकीं लोकप्रिय झालीं, व ज्यांवरून कल्पकतेचा भयंकर व रोगट कल दिसतो, तीं मृत्यूच्या नाचाचीं भयाण चित्रें चौदाव्या शतकांत सुरू झालीं. ( पिन्नोत 'सुर ल दान्से द मोर्त' पृ. २६ ते ३१ ). दुसरी गोष्ट अशी कीं, त्याच शतकांत धर्मोपाध्यक्षाधिष्ठित देवळावरील अल्प उठावाच्या कामांत वारंवार सैतानापुढें गुडघे टेंकणाऱ्या व त्याचे दास म्हणून त्याची भक्ति करणाऱ्या माणसांचीं चित्रें आढळतात. ( मार्तोन 'पायेते दु मोयेन एज' पृ. १३७ ).

६०. 'कलोक्विया मेन्सालिया' इराज्मस ह्याचाही असाच चेटकावर दृढ विश्वास होता ( स्त्युअर्तचें 'दिझर्तेशन' पृ. ५७ ).

६१. हें साहचर्य पुष्कळ लेखकांनीं दाखविलें आहे; व नादे ( अपालजि. पृ. ११०,१११ ) मध्यें म्हणतो कीं, धर्मसुधारणेपूर्वीच्या बहुतेक सर्व पाखंडाबरोबर चेटकाची उचल झालेली होती.

६४. असल्या प्रसंगीं योजिलेल्या हालअपेष्टांची भयंकर यादी पाहिजे असेल तर स्काातचें 'चेटकाचा शोध' पृ ११,१२ पहा. सर्व जुन्या ग्रंथांत या गोष्टी भरलेल्या आहेत. स्प्रेंजरनें

सारखे दोन तीन दिवस हाल चालू ठेवावे, अशी शिफारस केली आहे. 'दि सेन्तर केश्विओनेतस' भा. ३ प्रश्न १४, १५ पहा. या हालाचे अंगावर होणारे परिणाम मंत्रसामर्थ्यानें नष्ट करण्याची चेटक्यांना ताकद असे, असा लोकांचा भाव असल्यामुळे ते हाल फारच भयंकर असत.

६६ 'फिमिना' हा शब्द 'फि' व 'मायनस' या शब्दांपासून निघालेला आहे; कारण बायकांत पुरुषापेक्षा भक्तिभाव कमी असतो, असें तो खात्रीनें सांगतो (पृ. ६५). अशा आणखी पुष्कळ व्युत्पत्ति आहेत. बोदिन 'देमन' पृ. ४० यांत शब्दांवर बऱ्याच कोट्या आहेत. त्या येथें घेतल्या नाहींत. हव्या तर वाचकांनीं पहाव्या.

६७ याविषयीं मुख्य आधार म्हणजे पुष्कळशा लातिन ग्रंथांचा संग्रह. हे ग्रंथ बहुतेक पाखंड न्यायाधीशांनीं लिहिलेले आहेत ते सुमारें दोन शतकांतले आहेत; व 'माल्यूस मालिफिकेरम' नांवानें प्रसिद्ध आहेत. हें नांव स्प्रेंजरच्या पुस्तकाचें आहे. या संग्रहांत स्प्रेंजर, नायदर, बेसीन, मोलीतोर, गर्सन, मर्नर, स्पिना, हारेन्तियस, बर्नार्दस, ग्रिलांदस इत्यादिकांचें ग्रंथ आहेत. यांच्याऐवजी इतर पुष्कळ ग्रंथ पहाण्यांत आले आहेत; व मानद आणि ग्लान्सी यांचीं आणखी कित्येक ग्रंथांचीं परीक्षणें वाचकांस सांपडतील.

६८ मानवी सुधारणेच्या आद्यकाळीं हा विश्वास सार्वत्रिक असल्याबद्दल बकलचा इतिहास खं. १ पृ. २८६.

६९ चेटक्यांच्या खटल्यांत विषप्रयोगाचे आक्षेप अनेकदां सामील असत यांत शंका नाहीं. जेव्हां वैद्यकाची माहिती थोडी होती व मरणोत्तर वैद्यकीय चिकित्सा माहित नव्हती तेव्हां विषप्रयोगाच्या गुन्ह्याची लोकांस विलक्षण भीति व गूढ वाटे. उलट पक्षीं चेटक्यांना वनस्पतींची माहिती असे व तिचा उपयोग रोग बरे करण्याकडे त्या करीत; व या कामीं वैद्यकीचा धंदा करणाऱ्या गृहस्थांहूनही त्यांचें चातुर्य विशेष दिसे हें खास.

७१ निद्राभ्रमणाच्या सर्व गोष्टींची यांत भेसळ आहे. उदा० स्पिना भा. १०, ११ पहा. निद्राभ्रमणाविषयीं विलक्षण कल्पना असत. पैकीं एक अशीः निद्राभ्रमणकर्त्याला शुद्धिसंस्कार झालेला नव्हता व झाला असलाच तर तो करणारा उपाध्या त्या वेळीं दारू प्यालेला होता.

७२ ख्रिस्तीधर्मांत नैतिक गुणांऐवजीं प्राण्यांच्या नांवाचा सांकेतिक उपयोग करीत असल्यामुळें बहुधा हा विश्वास टिकून राहिला. निरनिराळ्या प्रांतीं निरनिराळ्या प्राण्यांचा पिशाचाशीं संबंध मानीत. देल्रीओ सांगतो कीं, प्राचीन आयरिश

लोकांना लांडग्याबद्दल इतकी पूज्य बुद्धि असे कीं, त्यांच्या तारणासाठीं ते प्रार्थना करीत व लांडग्यास आपल्या मुलांचे देव-पिते करीत (थिअर्सचें 'भोळसटपणा' खं. २ पृ. १९८) बील्झबिब हा मक्षिकांचा देव होता हें प्रसिद्ध आहे. (बोदिन 'देमन' पृ. १५) नाचणारीं आस्वलें व दुसरे बुद्धिमान् प्राणी यांचाही सैतानाशीं संबंध असे, असें दिसतें. एका प्राचीन धर्मपरिषदेनें जादूगार, भविष्यवादी, व आस्वल वगैरे प्राणी या सर्वांस ईश्वरास टाकल्याबद्दल एकदम शाप दिला आहे. कारण क्राइस्त व बेलियल यांची मैत्री व्हावी कशी? (वियर 'द प्रिस्त दिम' पृ. ५५७). मध्ययुगांत प्राण्यांच्या माथीं बुद्धि लादण्याची सार्वत्रिक चाल असे, पण ती सेल्तिक लोकांत विशेष दाखयेलच्या 'स्कातलंदचे भोळसट प्रकार' या पुस्तकांतील 'गूढाभिप्रायक प्राणी' हा विलक्षण भाग व रेनानचा 'सेल्तिक कवितेवरचा निबंध पहावा. इयूरेतोरी ('अन्तिके. इताली. दिस.' २९) यानें अकराव्या शतकांतल्या एका लेखकाचा एक उतारा घेतला आहे त्यांत 'पिथोच्या पिशाचानें द्रव आलेल्या' एका कुत्र्याची गोष्ट आहे.

७४ फ्रान्सी 'दिक्शन. इन्फ. लायक्यान्थ्रोपी.' बोदिननें वृकरूप धारणावरील भागांत व सध्याच्या काळीं मादननें (खं. १ पृ. ३३४ ते ३५८) आणखी पुष्कळ आधार गोळा केले आहेत. सन्त आगस्ताइननें नाहीं होय करीत या विषयावर अश्रद्धेकडे मत दिलें आहे ('सिव्ह. देई.' खं. १८ क. १७,१८) आगस्ताइन सांगतो कीं, त्याच्या काळीं कांहीं भटारखान्यांचे मालक जेवणारांस चक्क्यांतून कांहीं वनस्पति देऊन पशु बनवीत (किता) पंधराव्या शतकांतील 'सालिक' कायद्यांत एक विलक्षण कानू आहे, तो असा. ज्या चेटकीनें मनुष्य गिळंकृत केला असेल तिच्यावर तशी शाबिदी झाल्यावर तिला दोनशें 'सू' (फ्रान्सांतील एक अगदीं हलक्या प्रतीचें नाणें) दंड करावा. (गारिनेत पृ. ६) अलीकडच्या काळीं आढळतें कीं चौथ्या हेनरीचा मुख्य वैद्य वृकरूप धारणावर भरंसा ठेवीत असे, असें बोदिन, पारासेलसस व फर्नेल म्हणतात. हा भोळसटपणा कोणत्याना कोणत्यातरी रूपानें यूरोपांतील, किंबहुना जगांतील, प्रत्येक देशांत नाहीं असें नाही. तथापि तो लांडगे फार असलेल्या देशांत विशेष चालू असे. ज्यूरालोकांत, नार्वेत, रशियांत, आयर्लंदांत, पिरिनीसांत व ग्रीसांत तो फार. (आयर्लंदांतील आसोरी येथील लोक दर सात वर्षांनीं एकदां लांडगे होत असें काम्देन म्हणतो.) इतालियन बायका बहुधा मांजरें होत. 'आरबी भाषेंतील सु. व च. गोष्टी' वरून सम-

जतें कीं पूर्वेकडील देशांत पुष्कळ प्रकारचीं रूपें घेत असत. बोगे नांवाच्या एका फ्रेंच न्यायाधीशानें सोळाव्या शतकाच्या अखेरीस या विषयांत विशेष मन घातलें. वृकरूप धारण करणाऱ्या व करूं लावणाऱ्या असंख्य माणसांस जाळलें; त्याविषयीं त्यानें एक पुस्तक लिहिलें; एक कायदेबंदी तयार केली. या कायद्यांत साधारण चेटक्यास पहिल्यानें गळा दाबून मारून मग जाळावें असें म्हटलें आहे. पण वृकरूप धारण करणाऱ्या अगर करविणाऱ्या चेटक्यांस अगदीं जिवें जाळावें असें लिहिलें आहे ( गारिनेत पृ. २९८ ते ३०२ ). या रूपांतराच्या सत्यतेविषयीं जो वाद झाला त्यांत बोदिननें अस्तिपक्षाचें व बिन्स्फेल्दियसनें नास्तिपक्षाचें समर्थन केलें. एकतानभ्रमाचा एक प्रकार आहे त्यांत मनुष्य आपल्यास पशु समजून तद्वत् आचरण करितो. या मूळ कंदाभोंवतीं हें सर्व जाळें पसरलें. हा एक चमत्कारांच्या परिपोषाचा ठळक दाखलाच. बुर्केलोचें 'ला लायकान्थ्रोपी' हें पुस्तक पहा. आबिसीनीयांतल्या लोकांत पुष्कळ वेडया समजुती आहेत, पण त्यांत अति वेडेपणाची अशी एक आहे कीं, लोहार व कुंभार तरसाचें रूप घेतात व म्हणून त्यांना प्रभुभोजनांतून वगळावें ( हेकर 'सांथीं पृ. १२० ).

७६ स्प्रेंजर भा. १ प्रश्न ७. सन्त सेरिनस व सन्त एक्वितीयस यांच्या विनंतीवरून देवदूतांनीं एक उलट परिणामी शस्त्र प्रयोग त्यांच्यावर केला ( नायदर 'फार्मिक द माल.' कलम ५ )

७७ नाझारेथचा धर्मोपाध्यक्ष सन्त सिल्व्हानस याची विलक्षण गोष्ट स्प्रेंजर ( भा. २ प्रश्न १ क. ११ ) मध्यें पहा. सैतानानें या धर्मोपाध्यक्षाचें रूप घेऊन एका स्त्रीची मनधरणी केली, इतकेंच नव्हे तर, त्याचें कृत्य उघडकीस येऊं लागलें तेव्हां तो पलंगाखालीं लपून बसला. तेथून त्याला ओढून काढलें तेव्हां मी हा धर्मोपाध्यक्षच असें त्यानें सांगितलें. पण इतक्यांत दैवयोगानें एक चमत्कार घडला त्यानें या आळ आलेल्या धर्मोपाध्यक्षाची अब्रू बचावली.

७८ अप्रमादित्वाचा दावा सांगणाऱ्या धर्मसंस्थेनें या भोळसट प्रकारांना किती उत्तेजन दिलें तें थोड्यांच्या प्रचीतीस येतें. त्या अर्थीं या विशिष्ठ गुन्ह्याचा खरेपणा गर्भित रीतीनें कसा मानला गेला व तो करणाऱ्यांना कसा शाप दिला गेला हें सांगणें बरें. त्रायेस, लियान्स, मिलान, तूर्स, बूर्जीस, नार्बोन, फेरारा, सेन्त मालो, मान्त क्यासीन, आर्लियन्स व ग्रेनोबल येथील प्रांतिक धर्मपरिषदांनीं; ओतून, चार्त्रेस, पेरिग्वो, आतूनो, एव्हरो, पारिस, आंजर्स, आरास, शालान्स, बोलोना, त्रायेस

ब्रूर्जीस, आलेत, बोव्हे,मो, ऱ्हीम्स, वगैरे ठिकाणच्या संस्कारविधींनीं; व पुष्कळ धर्मोपाध्यक्षांच्या हुकुमनाम्यांनीं हा गुन्हा खरा मानला व शाप दिले ( थिअर्सचें ' सुपरप्रोप. ' खं. ४ भा. ७ ) चेटकाचे खटले तोडणाऱ्या न्यायासनांतल्या सर्व पाखंडन्यायाधीशांचें हेच मत होतें, त्याला एकही अपवाद नव्हता. या आरोपावरून चेटक्यांना गुन्हेगार ठरविण्याच्या पद्धतींची लांबचलांब हकीकत स्प्रेंजरनें दिली आहे. ही गोष्ट न मानणारा पहिला गृहस्थ मान्तेन. पुराणाभिमानी जिला सैतानाची करणी म्हणत ती नुस्ती मनुष्याच्या कल्पनेची होय असें तो म्हणे. हें म्हणणें फ्रान्सांतील अनिर्बंध विचार करणाऱ्यांची खूणच होऊन बसलें. थिअर्स म्हणतो कीं, थिओदोसिअसच्या वेळीं धर्मसंस्थेंत हा विश्वास चालू होता ( पृ. ५६८ ). ज्या शेवटल्या चेटक्याला फ्रान्समध्यें जिवें जाळलें त्यावर हाच आरोप होता ( गारिनेत पृ. २५६ ).

७९ या विधानाला एक अपवाद करणें बरें, तो अबानोचा पीतर हा होय. हा पादुआ येथील फार प्रख्यात वैद्य व तत्त्वज्ञ होता. हा इ. स. १३०५ त मेला. त्यानें भुतें, पिशाचें वगैरे नाहींत, चमत्कार होत नाहींत, असें म्हटलें आहे असें दिसतें. यानें फलज्योतिषाच्या साह्यानें धर्माचें एक सामान्य तत्त्वविवेचन बनविण्याचा प्रयत्न केला. त्यानें प्रत्येक धर्माची एक जन्मपत्रिका तयार केली व ग्रहांच्या बळाबळानें त्याचा उदय आणि शेवट ठरविला. तो आव्हेरोजचा शिष्य होता. कदाचित् याला इतालींतील आव्हेरोज पंथाचा उत्पादक म्हणतां येईल. यानें पादुआ येथें एक पंथच स्थापिला असें दिसतें. जेव्हां तो ८० वर्षांचा झाला, तेव्हां त्यावर जादू केल्याचा आरोप आला. असें म्हणत कीं, त्यानें सात उदार कलाचा [ व्याकरण, वक्तृत्व आणि तर्क हें त्रिकुट व अंकगणित, भूमीति, ज्योतिष आणि गायन-वादन ही चौकडी मिळून या सात उदार कला होत. ] अभ्यास एका स्फटिकांत बंदींत ठेवलेल्या आपल्या घरोब्याच्या झालेल्या सात पिशाचांपाशीं केला, पण त्याच्यावरच्या या खटल्याचा निकाल होण्यापूर्वीच तो मेल्यामुळें पाखंडन्यायाधिशांना त्याचा पुतळा जाळूनच आपलें समाधान करून घ्यावें लागलें. हा जबर जादूगार होता असें मानीत. नादचें ' अपोलो. ' पृ ३८० ते ३९१ व रेनानचें ' आव्हेरोज ' पृ. २५८, २५९ पहा.

८३ ' स्यूदोमानार्किया दिमोनम ' हें या विषयावरील माहितीचें मुख्य आगर होय. त्यानें ७२ राजांचीं नांवें दिलीं आहेत व त्यांच्या प्रजेची संख्या ७४०५९२६ दिली आहे. हीं सर्व पिशाचें होतीं. या संबंधीं त्याचा

स्वतःचा विश्वास कसा काय होता तें स्पष्ट होत नाहीं.

८४ बोदिन हा स्वकालीं सदसद्विचाराच्या स्वातंत्र्याचा एक मुख्य पुरस्कर्ता होता असें बेलनें म्हटलें आहे. ( ' डिक्शन. फिल. ' ) सध्यांच्या काळीं बकलनें ( खं. १ पृ. २९९ ) त्याला इतिहासकार या नात्यानें कोमिनिसच्यावर व मॉकिआवेलीच्या जोडीला बसविलें आहे. लोकसत्तेवर लिहितांना हालाम म्हणतो बोदिनचें मन फार तत्त्वविवेचक होतें; व त्याला इतिहास आणि कायदा यांची उत्तम माहिती होती. राजकीय तत्त्वविवेचनावर लिहिणारा या अगोदरचा कोणता ही लेखक याच्या इतका कार्यघटनेंत पृथुदर्शन अगर ज्ञानांत विपुल संग्रही नव्हता. शोधांत याच्या इतका निर्भय, स्वतंत्र व नवून कल्पक कोणीही नव्हता. अरिस्तातल व माकिआवेल यांची काय ती खरोखर त्याच्याशीं तुलना करता येईल. ( ' सारस्वतेतिहास ' खं. २ पृ. ६८ ). द्युगलद स्तूअर्तनें अशीच स्तुति केली आहे. ( ' दिझर्तेशन ' पृ. ५२ ते ५४. )

८५ कार्नेलियस आग्रिपा. हा वीयरचा गुरु होता. तो मेत्झ येथें ' अडव्होकेट जनरल ' होता. हा याच्या चेटकाचे खटले बंद करण्याच्या खटपटीनें व पाखंडन्यायाधीश सेवियन याच्या मनांत जिला जाळावयाचें होतें अशा एका खेडवळ स्त्रीचा जीव बचावण्यानें प्रख्यातीस आला होता. म्हणून त्यास सामान्यपणें सैतानाच्या कटांतला मानीत आणि असें सांगतात कीं मरावयाचे वेळीं अंथरुणावर असतां त्यानें आपल्या मानेंतून एक काळा कुत्रा काढला. हा कुत्रा पिशाच होता; व हा माझ्या नरकवासाचें कारण असें तो उद्गारला. ( ग्यारितेन पृ. १२१, १२२ ). लहानपणीं तो जादू शिकला होता; व जादूचा आधार एकतर ढोंग नाहींतर सृष्टीविषयीं उंच प्रतीच्या नियमांचें ज्ञान असा त्याचा ग्रह झाला असावा असें दिसतें. ' शास्त्राचा पोकळ गर्व ' या विषयावर एक पुस्तक लिहून त्यांत हा आपला ग्रह वाचकांच्या मनावर बिंबवण्याचा त्यानें प्रयत्न केला. जादूच्या आरोपावरून एक वर्ष त्याला ब्रुसेल्स येथें कैद भोगावी लागली. व मरणोत्तर त्याची सतत निंदा होत असे. वियरच्या पूर्वीं या छळाच्या आड येण्याचे इतके प्रयत्न कोणीही बहुधा केले नाहींत; व या कामीं त्यानें मिळविलेली कीर्ती खर्चीं पडली (प्लान्सीचे ' दिक्शनरी इन्फर्नल ' कलम आग्रिपा; व वियर्सचे ' सुपर्स्तिशन्स ' खं. १ पृ. १४२।१४३ पहा. ) नादनें आग्रिपा बद्दल एक मोठा भाग लिहिला आहे. कोणत्याही वर्गाच्या धर्मज्ञान—पंडितांला खूष ठेवण्याचें आग्रिपाच्या

नशिबीं नव्हतें. सनातन पंथांत त्याच्याविषयीं अत्यंत भीति वाटे. काल्विननें आपल्या 'द स्कांदालिस' पुस्तकांत याला शुभवर्तमानाची निंदा करणारांपैकीं मुख्य मानला आहे.

९० मारी पृ. २२१,२२२ त्या लेखकांतला मुख्य नाद हा होय. याच्या 'आपालजी' पुस्तकांत पुष्कळ विलक्षण ऐतिहासिक माहिती आहे, तिनें कंटाळा येतो. नाद यानें 'रोझि-क्रूशियनांचा' स्फोट लिहिला व 'कूप्स दीतात' वर राजकीय ग्रंथ लिहिला. या ग्रंथांत स्याकिया-वेलीचीं तत्त्वें गोंविलीं आहेत. माझ-रीन ग्रंथालयाचा हा पहिला व्यवस्था-पक होता व यानें तें स्थापण्यांत बरीच खटपट केली होती. बेल 'पेन्सेइस दि वर्सेस क. २४१' यांत हा त्याचा उल्लेख आहे. प्राचीनांच्या कांहीं नाचांची यानें पुनर्घटना केली व स्वीदनांत ख्रिश्चियाना राणीसमोर ते स्वतः करून दाखविले असें म्हण-तात. [स्याम्नि 'ओरिजिनिस युथिएतर' खं. १, पृ. ११३] 'अपा-लोजी' चें दोतुन नांवाच्या एका काप्युसिननें आपल्या 'लिंक्रेयुलित शाव्हांते' या नांवाच्या बऱ्या पुस्त-कांत खंडन केलें आहे.

९५ 'दिक्श. फिला.' कल. 'सुप-र्स्तिशन' यांत त्यानें जें म्हटलें आहे तें अगदीं खरें असें वाटतें; पण जादूच्या विरोधी पक्षाचा मनुष्य असें बोलूं शकला व आपल्या कार्याची त्यानें हानी करून घेतली नाहीं; ही त्या कालच्या जागृतीची खूणच होय.

९९ या विषयावर अगदीं पूर्ण आधार म्हणजे हचिन्सनचा 'चेटका-वरील निबंध' यांतील कालानुक्रम-गोष्टींचें कोष्टक. हचिन्सन दिकत-खोर लेखक असल्यामुळें ज्याबद्दल पूर्ण तपशीलवार माहिती होती तेव-ढ्याच गोष्टी त्यानें मुख्यतः दिल्या आहेत व आपल्या म्हणण्याला त्यानें काळजीपूर्वक आधार दिले आहेत. अडीचशें वर्षांत ज्या देहान्त शिक्षा झाल्या त्या कित्येक हजार होत्या असें तो म्हणतो. यांपैकीं इंग्लंदांतल्या फक्त १४० होत्या. यांत अर्थात् पाण्यांत बुडवून मारले त्यांची अगर चौकशी चालू असतां बाजार-बुणग्यानें ठार केलेल्यांची व देहान्ताखेरीज इतर शिक्षा दिलेल्यांची संख्या धरलेली नाहीं. इतर सर्व लेखकांनी ही इंग्लं-दांतली संख्या फारच मोठी दिली आहे. कांहींकडे हचिनसनचें लक्ष गेलें नसेल असें वाटतें खरें, तथापि हचिनसनचा अजमास इतरांपेक्षां सत्याला धरून आहे. राइटचें 'सार्सेरी' पहा; व 'चेटकावरील चमत्कारिक पत्रकांचा संग्रह' यांतील 'फॉरेन रिव्ह्यूंतील घेतलेला लेख पहा. या विषयाचा निश्चय होण्या-सारखी कांहीं शक्यता दिसत नाहीं.

१०० चेटूक व शूळ मोडणें या दोन्ही गोष्टी एकत्र घातल्या असल्या-मुळें बहुधा हा कायदा रद्द झाला.

म्हणून कायदा पोपाचार्यांच्या अमकांतल्यासारखा दिसे.

१०१ ('पार्कर सोसायटी' चीं) सर्मन्स पृ.१०२८. पुढल्या वर्षी घडलेला कायदा या 'सर्मन' मुळें झाला असा स्ट्राइपचा आरोप आहे. (धर्मसुधारणेचा इतिहास खं. १ पृ. १८) स्ट्राइपच्या अवलोकनांत आलेली इलिझाबेथच्या कारकीर्दीच्या आरंभीं चेटक्यांची एवढी मोठी संख्या असण्याचें कारण मागच्या कारकीर्दीतील भयानकता व पूर्वी वर्णन केल्याप्रमाणें परिणाम करणारे धर्मांतील पालट होत.

१०२ कांहीं साथींच्या वेडाचे प्रकार आहेत त्यांत बधिरता अगर मूर्च्छा हें सर्वमान्य लक्षण आहे, हें लक्षांत घेण्याजोगें आहे.

१०३ नमूद केलेल्या अत्यंत भयंकर स्कॉच खटल्यांपैकीं एका खटल्याचें कारण हें वादळ होय. डॉक्तर फियन नांवाच्या एका माणसानें तें उठविलें असा वहिम होता. त्याचे हाल करून त्याच्या कडून कबूली जबाब घेतला. तथापि हा जबरदस्तीचा जबाब नंतर लगेच त्यानें माघारा घेतला. त्याचा हट्ट मोडण्यास सर्व प्रकारचे हाल करून पाहिले; पण व्यर्थ. त्याचे पाय खोड्यांत घालून हाडांचे मोडून तुकडे तुकडे केले. स्कातलंदांतल्या कायद्याला जे जे हाल करण्याचे प्रकार ठाऊक होते, ते ते योजिले. सरते शेवटीं राजानें [ हा या हाल करण्याचें कामीं मुख्य होता ] एक नवी व जास्त भयंकर युक्ती सुचविली. कैद्याला या खलबताच्या वेळीं दूर ठेविलें होतें. मग त्याला] आणलें. ( तत्कालीन कथानकावरून पुढचा उतारा घेतला आहे ) 'त्याच्या प्रत्येक बोटाचें नख फोडलें व त्या जागेंत दोन दोन सुया नेढ्यापर्यंत खुपसल्या' तथापि इतकें झालें तरी त्याच्यांत पिशाच इतकें संचरलें होतें कीं, पूर्वी कबूल केलेल्या सर्व गोष्टी त्यानें साफ नाकबूल केल्या आणि गुन्हा कबूल न करितांच त्याला जाळलें ( पितकेर्नचे 'स्कातलंदांतले फौजदारी खटले' खं. १ भा. २ पृ. २१३।२२३ यांत काळ्या अक्षरांनीं पुनः छापलेलें विरळा मिळणारें पत्रक पहा. )

१०५ माझा नेहमींचा विश्वास आहे व मला सध्यां माहित आहे कीं चेटक्या आहेत. जे याबद्दल साशंक असतात ते चेटक्या नाहींत म्हणतात इतकेंच नव्हे तर पिशाच नाहीं म्हणतात; व त्यामुळें पर्यायानें ते ख्रिस्तीशास्त्राविश्वासी नव्हत, तर एकप्रकारचे अनीश्वरवादी होत. (रिलिजियो मेदिसी पृ. २४ ) तथापि सर टॉ. ब्राऊनचा 'इन्क्यूबी' ऊर्फ रतिसुखभोक्ते अगर वृकरूपधारक यावर विश्वास नव्हता.

१०६ इलिझाबेथ व पहिला जेम्स यांच्या वेळच्या नाट्यवाङ्मयांत हा विश्वास किती प्रतिबिंबित होता तें पहावयाचें तर राइटचें 'सार्सरी' खं. १ पृ.२८६।२९६ पहा. शेक्सपियरच्या

बुद्धिवैभवाची निर्भर्त्सना करावयाची असतां पुढें वाल्तेरची ‘ म्याकबेथ ’ मधील चेटक्यासारख्या पात्रांवर टीका करावयाची संवय होती. परंतु अर्वाचीन काळीं असल्या प्रवेशांचें स्वरूप जरी मिथ्या व वेडेंविद्रें दिसेल तरी ज्या वेळीं ते लिहिले त्यावेळीं बिलकूल असंभाव्यता दिसली नाहीं. शेक्सपियरच्या काळच्या मोठमोठ्या सुशिक्षित व प्रतिभावान् गृहस्थांपैकीं बहुतेकांचा चेटकाच्या सत्यतेबद्दल अढळ विश्वास होता खास व शेक्सपीयरचाही असण्याचा संभव आहे. म्हणून प्रेक्षकांच्या विश्वासाचें हुबेहूब प्रतिबिंब जर त्यांत आहे; तर आपल्या शोकावसानी नाटकांचें गांभीर्य व वैभव वाढविण्यास इतरांहून जास्त योग्य अशीं पात्रें आपल्या नाटकांत शेक्सपीयरनें घालणें अगदीं योग्य होतें.

१०७ ‘ आदव्हान्समेंत आफ लर्नींग ’ २५–२२ हें खरें कीं, हें पुस्तक त्या विषयावरचें ज्याचे लेख वाखाणले गेले होते त्या राजास अर्पण केलें होतें.

११० याचा उल्लेख थ्यूदिद्रास भा० २ सर्ग ३ मध्यें आहे.

१११ सर्व गोष्ट ब्याक्स्तरनें उघड उघड आनंदानें सांगितली आहे. तो म्हणतो ‘ बाकीच्या बरोबर लोई नांवाच्या एका म्हाताऱ्या वाचणाऱ्या धर्मोपदेशकाला फ्राम्लींगह्यामच्या जवळच फांशीं दिलें. त्यानें असें कबूल केलें कीं आपल्या जवळ २ भुतें आहेत. त्यांपैकीं एक आपल्याला कांहीं तरी वाईट काम करावयाला रोज लावीत असतें. एकदां समुद्राच्या जवळ असतां एक गलबत येतांना मीं पाहिलें. त्या भुतानें तें गलबत जाऊन बुडविण्यास मलों प्रेरणा केली. मी गेलों व गलबत बुडविलें. ( ‘ वर्ल्ड ऑफ स्पिरित्स ’ [ भूतयोनि ] पृ० ५३ ) याच्या विषयीं दुसऱ्या मतासाठीं हचिनसन पृ० ८८ ते ९० पहा.

११२ या विषयावरील हाक्सच्या मतांसाठीं व या भोळसट प्रकारांसंबंधीं विश्वास उडविण्यांत त्याच्या वजनाचा केवढा परिणाम झाला तो पाहण्यासाठीं कद्वर्थचें ‘ इन्तेलेक्चूअल सिस्तीम ( बौद्धिक पद्धती ) , खं. १ पृ० ११६ पहा.

११३ या विषयासंबंधीं राजमान्य विद्वन्मंडळाच्या वजनाचा ( पर्यायानें झालेला ) परिणाम हचिनसननें व इतर बहुतेक चेटकाविषयीं लिहिणाऱ्या लेखकांनीं दाखविला आहे. ल्यासाबांचें ‘ विश्वासोन्मुखतेविषयीं आन क्रेद्युलिती पृ० १९१ पहा.

११४ या खटल्याची हकीकत ‘ चेटकांसंबंधीं विरळा आढळणाऱ्या व विलक्षण पत्रकांचा संग्रह ’ या पुस्तकांत पुनः छापिली आहे.

११६ या पुस्तकाचें उत्तम परीक्षण ह्यालामच्या ‘सारस्वतेतिहासांत’ ( खं. ३ पृ० ३५८–३६२ ) आहे.

ग्लान्विलच्या लेखांतला हा उत्तम लेख आहे असें वाटतें. तो सर्वांगसंपूर्ण करण्यास त्यानें विलक्षण मेहनत केली. पहिल्यानें एक लहानसा निबंध त्यानें लिहिला, नंतर चांगला ग्रंथ केला व शेवटीं तो सुधारून विस्तृत केला; व ' स्केप्सिस सायेंतिफिका ' या नांवानें प्रसिद्ध केला. ही शेवटची आवृत्ति दुर्मिळ झाली आहे ! कारण लंदन शहरास लागलेल्या मोठ्या आगींत बहुतेक प्रती जळून गेल्या असें म्हणतात (पण याला आधार माहीत नाहीं. ) याचें खंडन थामस व्हाईत नांवाच्या मागें सुप्रसिद्ध असलेल्या सनातन पंथी विवादकानें केलें आहे. पेलेला ग्लान्विलच्या लेखांची ओळख होतीशी वाटते. कारण पुष्कळ विषयांच्या ऊहापोहाची त्यांची मोड विलक्षण सारखीच आहे. पेलेची घड्याळाची उपमा ग्लान्विलनें पांचव्या भागांत पूर्णतेस आणली आहे.

११८ त्यानें स्वकालीन प्रमुख विद्वानांची, दुरून जें आलेलें असतें तें अवश्य बहुमोल असतें या समजुतीनें भराभर साधे दगड वेंचून आणणाऱ्या खलाशांशीं तुलना केली आहे व बेझाचा आधार दाखवून बायकांना दाढी नसते व संत आगस्ताइनचा आधार दाखवून शांतता सुखावह होय अशीं विधानें केल्याचा त्या विद्वानांवर दोष ठेविला. विश्वविद्यालयीन विशेषेंकरून आक्सफोर्ड एथील शिक्षण बहुतेक निष्फळ होय असें त्यानें म्हटलें. असल्या अभिप्रायांनीं आक्सफोर्ड येथें जो क्रोध उत्पन्न झाला तो वूडच्या ' अथेनी ' पुस्तकांत ग्लान्विल ' व ' क्रास ' या लेखांत फार गमतीनें दाखविला आहे. 'क्रास' हा आक्सफोर्ड येथील ' फेलो ' ( पांक्तेय ) होता. ( डाक्टर आफ दिविनिती ). यानें ग्लान्विलवर प्रथम गद्यांत हल्ला केला होता पण शेवटीं ती पद्धति सोडून तो हास्यप्रधान पोवाडे लिहूं लागला. त्यामुळें ग्लान्विल व त्याची मंडळी यांची बरीच टवाळी झाली असें वूड खात्रीनें म्हणतो.

१२० ' साधुसि पंथांत वादाचा आरंभ झाला व ज्यांना निर्भीडपणें ईश्वर नाहीं असें म्हणण्याचें धाडस होत नाहीं, ते भुतेंखेतें किंवा चेटुकजादू सब झूट आहे. असें प्रथम म्हणूं लागून नास्तिकतेला प्रारंभ करतात व तेवढ्यानेंच आपण बरेंच काम केलें म्हणून समाधान मानतात. असे हे शास्त्रावर श्रद्धा न बाळगणारे केवळ प्राकृत अज्ञजनांत साधारण असतात असें नव्हे, तर समजुतीनें जरा वरच्या पायरीच्या लोकांत यांचा भरणा पुष्कळ. ज्यांना जगाची कांहीं माहिती आहे त्यांस ठाऊक आहे कीं, जरा ढिल्या आचरणाची गृहस्थ मंडळी व तत्वज्ञान व चातुर्य यांविषयीं उगाच आढयता बाळगणारे पिशाच चेटुक असल्या कल्पना-

वरील विश्वासाची टर उडविणारेच बहुधा असतात ' ग्लान्विलच्या काळीं अनीश्वरवाद हा शब्द फारच ढिलाइनें वापरीत हें सांगवयास पाहिजे असें नाहीं. वुगल्तस्तूअर्तनें खरेंच दाखविलें आहे कीं एका काळीं प्रेषितांच्या परंपरेवर श्रद्धा न ठेवणाऱ्यांनाही सामान्यपणें अनीश्वरवादी म्हणून नांवें ठेवीत. ( 'रिझ. पृ. ३७८ )

१२१ पृ. ३ व ४ मधला हा विलक्षण उतारा पहा. ' आरंभीं मला हें सांगितलें पाहिजे कीं, ही वास्तविक स्थिति असल्यामुळें तिला प्रमाण म्हणजे एक प्राचीन वचनें व दुसरें स्वतःचें इंद्रियज्ञान; व या दोहोंवरून चेटक्या असतात व त्यांचे सैतानाशीं करारमदार झालेले असतात याबद्दल खात्री होण्याला विपुल पुरावा आहे. या तमःसाधनांच्या पराक्रमांनीं सर्व इतिहास भरलेले आहेत व केवळ अडाणी व रानटी लोकांतीलच नव्हे, तर अत्यंत समाजीभूत व सुसंस्कृत लोकांतील व सर्व काळांतील पुराव्यावरून त्यांच्या विलक्षण कृत्यांचीच कथा ऐकूं येतें. हजारों पाहत्या ऐकत्यांची तशीच साक्ष आपणांस मिळते व हे लोक म्हणजे केवळ पटकन फसणाऱ्यांपैकींच नसून हुशार व मोठ्या शोधक लोकांपैकींही आहेत. आणखी एखादी गोष्ट खोटी सांगण्यांत या सर्वांचा एक विचार होण्याला तसें कांहीं कारणही म्हणावें तर नाहीं. म्हणून मी म्हणतों कीं, ही एकंदर परिस्थिति पाहिल्यानें या तुच्छ सामर्थ्य व ज्ञान असलेल्या माणसांकडून कलेच्या व साधारण प्रकृतीच्या आटोक्याबाहेरील कामें होतात, असा आपला विश्वास दृढ होतो. या चांगल्या पुराव्यानें सिद्ध झालेल्या कथानकांचे लेख सार्वजनिक संग्रहांत जय्यत ठेविलेले आहेत व या असामान्य गोष्टींचे कालविभाग केलेले आहेत. पुष्कळ राष्ट्रांनीं या नीच कृत्याविरुद्ध कायदे केलेले आहेत त्यांत आमच्या व यहुदी राष्ट्रांतील कायदे प्रख्यात आहेत. आमच्यामध्यें असल्या खटल्यांचे निकाल स्पष्ट व आनुमानिक पुराव्यावरून हुशार व सामान्य न्यायाधिशांनीं पुष्कळदां केलेले आहेत; व आमच्या राष्ट्रांत हजारों लोकांना स्वपदभ्रष्ट पिशाचात्म्यांशीं नीच संबंध ठेविल्या बद्दल देहान्त शिक्षा भोगावी लागली आहे हें सर्व मी हवातितका पुरावा देऊन त्यांच्या स्वतःच्या संबंधानें सिद्ध करून देईन; पण त्याची जरूरी नाहीं. कारण जे चेटक्याचें अस्तित्व कबूल करीत नाहींत ते, त्यांच्या अस्तित्वाबद्दल प्रमाणें त्यांना माहीत नाहींत म्हणून, तसें करतात असें नव्हे. त्यांनीं कदाचित् तीं हजारदां ऐकिलीं असतील; तर ते नाकबूल करतात याचें कारण इतकेंच कीं, असला विश्वास म्हणजे वेडसरपणाचा व असल्या

गोष्टी म्हणजे अशक्य अशी त्यांना शंका वाटते.

१२२ 'सर्व इतिहास म्हणजे चमत्कृतिपूर्ण कादंबऱ्या, जगांतील सर्व शहाण्या लोकांनीं मानवी जातीस फसवून निराधार कल्पित कथांवर विश्वास ठेवण्याची भुरळ पाडण्याचा कटच केला आहे, असंख्य लोकांच्या शाबूद इंद्रियांनीं त्यांना सगळयांनाच चकविलें असेल, कायदे केवळ असंभाव्य कल्पनेच्या आधारावर रचले, भारदस्त व चतुर न्यायाधीश म्हणजे खुनी, शहाणे लोक मूर्ख अगर ढोंगी, असें ज्यांला वाटत असेल, या असंबद्ध गोष्टी ज्यांला खऱ्या वाटत असतील, ते स्वतः ज्यांची ते भोळे म्हणून निर्भर्त्सना करतात त्यांच्याहून भोळे तरी असले पाहिजेत हें एक, अगर त्यांच्या जवळ त्यांच्या म्हणण्याला भरपूर विलक्षण पुरावा तरी असला पाहिजे–म्हणजे चेटकी किंवा पिशाच असणें हेंच असंबद्ध अथवा अशक्य याबद्दल त्यांच्या जवळ विलक्षण पुरावा असला पाहिजे-हें दुसरें; या शिवाय तिसरी गोष्ट संभवत नाहीं असें वाटतें.' (पृ. ४ ).

१२६ 'चेटके व जादुगार म्हणजे जे आपल्या सूड, इंद्रियासक्ति, महत्वाकांक्षा, वगैरे मनोवृत्तींच्या शांततेकरितां दुरात्म्यांशीं संबंध ठेवितात व त्यांच्या गोटांत शिरतात, त्यांच्या विषयीं म्हणाल तर धर्मशास्त्राखेरीज आणखी ज्यांचा कांहीं असल्या गोष्टींशीं अर्थाअर्थी संबंध नाहीं असल्या लोकांनीं सुद्धां सर्व काळांत इतका पूर्ण पुरावा दिला आहे कीं, या कल्पना पोकळ ठरवूं इच्छिणाऱ्या सध्याच्या लोकांत निरीश्वर वादाकडे कांहीं तरी विलक्षण ओढा असल्याचा संशय आल्यावांचून रहात नाहीं. (इन्त. सिस्त. खं. २ पृ. ६५० ) खं. १ पृ. ११६ पण पहा.

१२७ 'चेटक्यांवर' चा बेक्स्तरचा लेख. डाव्सनेसुद्धां धर्मशास्त्रांतील भुतानें पछाडलेल्यांची व वेड्यांची एकरूपता ठरविली होती.

१२८ आक्सफोर्ड येथें वाग्स्ताफ हा एक कुरूप ठेंगू विद्वान् होता. तेथल्या सर्व लोकांचें तो विनोदस्थान होता. (असला विनोद सतराव्या शतकांत फार उज्वल होता असें दिसत नाहीं. व्हिस्कीपंच पिऊन गरीब बिचारा वाग्स्ताफ आपलें शांतवन करून घेई. पुष्कळ पिऊन पिऊनच तो मेला. ( वूडचें आथिनी)

१३१ मि. बकलनें संदिग्धमतित्वाचा काळ जरा अगोदरचा मानला आहे. तो म्हणतो "आमच्या मतें सुशिक्षित वर्गापुरती तरी महत्त्वाची क्रांती राजक्रांती व राजपरावर्तन यांच्या दरम्यान झाली. म्हणजे इ. स. १६६०त बहुतेक सुशिक्षितांचा चेटकावर विश्वास होता व इ. स. १६८८ त तो नाहींसा झाला" ( खं. १ पृ. ३३३ ) तथापि इ. स. १७१८ च्या

सुमारास अल्पसंख्याकांत राम राहिला नाहीं.

१३३ हचिन्सन पृ. ५७ व बकल खं. १ पृ. ३३४ पहा. येथें न्यायासनाकडून असें म्हटलें आहे. कारण इ. स. १८६३ च्या सप्टेंबरच्या २४तारखेच्या, 'टाईम्स्'च्या अंकांत एसेक्स परगण्यांत एका म्हाताऱ्याला चेटक्या म्हणून बाजार बुणग्यानें ठार केल्याची हकीगत आहे.

१३५ (लार्ड कार्टेरेतचा उपाध्याय व बराच समर्थ लेखक) एक आर्यलंदांतील धर्माधिकारी स्याक्सवेल नांवाचा होता. यानें मूर्तिपूजकांची नीतिमत्ता म्हणून निबंध लिहिला आहे. हा निबंध कंबर्लँडाच्या सृष्टिनियमाच्या भाषांतराला प्रस्तावनेदाखल जोडलेला आहे. हें भाषांतर इ. स. १७२७त प्रकाशित झालें. या निबंधांत स्याक्सवेल चेटकाविषयीं म्हणतो कीं 'बहुतेक सर्व मनुष्यें एकदां सैतानाच्या अमलाखालीं होतीं म्हणजे सैतानाच्या संस्थेचे सभासद होऊन त्यांनीं धार्मिक गुन्हेगारी केली होती. सैतानी धर्माच्या लोकांपैकीं चेटक्यांत जादुगार हा एक वर्ग होय. याच्या अस्तित्वाबद्दल अनुभव सिद्ध पुरावा असून शिवाय अनिर्विवाद सत्यवचनी गृहस्थांचीही त्याबद्दल साक्ष आहे. मूर्तिपूजकांस तें अस्तित्व मान्य आहे व शहाण्या कायदे करणाऱ्या मंडळांस व सरकारांस मान्य आहे; पवित्र शास्त्राला मान्य आहे. निरपवादपणें विचारसंमत तत्व त्यांत आढळतें; व तद्विरुद्ध आक्षेप निरर्थक आहेत. तेव्हां हें अस्तित्व असें आहे कीं या प्रकारच्या खोट्या गोष्टी व ढोंगें पाहूनही जो तीं सर्व झिडकारून त्या अस्तित्वार विश्वास ठेविल त्याची श्रद्धा उत्तमोत्तम होय. (पृ. १५९)

१३६ 'जर्नल' इ. स. १७६८. चेटकाच्या अस्तित्वाविषयीं डा. जान्सन विशिष्ट डळमळितपणानें बोले (बास्वेल आगस्ट १६, १७७३)

१४१ या पेक्षां दुसरी गोष्ट निदान आढळली तरी नाहीं. पण मागें सर थामस ब्राउन मधून घेतलेल्या उताऱ्यावर सर केनेल डिग्बी यानें टिपण लिहिलें आहे त्यांत या विश्वासासंबंधानें तो म्हणतो 'प्रख्यात धर्माधिकारी यांच्या विरुद्ध नाहींत व हे धर्मभ्रष्ट असत असा संशय घेण्यास जागा नाहीं.' डा. हार्सनेतचें पुस्तक फारसें उपलब्ध नाहींसें वाटतें. हचिन्सननें त्यांतून पुष्कळ उतारे घेतल्यावरूनच काय तें माहित आहे. नीलच्या विशुद्धमताभिमानी पंथाच्या इतिहासांत या पुस्तकाच्या कर्त्याची माहिती आहे.

१४२ इंग्लंदांतील चेटकावर विशुद्धमताभिमानीं पंथाचा झालेला परिणाम सर वल्यू स्कातनें चांगला वर्णिला आहे. धर्मसंस्थेंतील निरनिराळ्या पक्षांची तुलना करितांना तो म्हणतोः—"सामान्यपणें म्हटलें

तर एकंदरींत सर्व विवादक पक्षांहून कालिवन पक्षाला चेटकाच्या अस्तित्वाविषयीं दृढ विश्वास असे; त्यांना चेटकाचा फार वहीम येई; व सर्व गुन्ह्यांत अतिभयंकर गुन्ह्याला योग्य जी शिक्षा असावी असें त्यांस वाटे ती देऊन त्याचा पाठलाग करण्यास ते फार उत्सुक असत." ('पिशाचशास्त्र व चेटुक' पत्र ८).

१४४ बकलच्या इतिहासांतील स्काचकर्कच्या उदात्त वर्णनाचा येथें उल्लेख करण्याची फारशी जरूर नाहीं स्कातलंदांतील चेडकाचा इतिहास माहित असलेल्यास त्या वर्णनाच्या सामान्य न्याय्यतेबद्दल शंका येणार नाहीं. सैतानाचें दर्शन व असंख्य चमत्कार यांवर जो तेथें विश्वास होता त्याच्या माहितीसाठीं पृ. ३४९ते ३६९ पहा.

१४५ स्कातलंदांतील चेटकाच्या खटल्यांत ढोंगाच्या गोष्टी आढळल्या नाहींत अशी फार ध्यानांत ठेवण्यालायक गोष्ट बकलनें नमूद केली आहे. (खं. २ पृ. १८९।१९०)

१४९ या विषयीं पिटकेर्नचें 'स्कातलंदांतील फौजदारी खटले' पहा. मूळ कागदांचा हा मोठा संग्रह आहे. पिटकेर्न या कबूल जबाबांचे आंकडे देतो; व म्हणतो कीं "हे कबूल जबाब सामान्यपणें प्रेस्बितरी पुढें घेत अथवा मुद्दाम नेमलेल्या पंचांपुढें घेत. ज्यांवर खटले करावयाचे ते दुर्दैवी लोक ज्या प्रांतांत राहत त्याच प्रांतांतील मुख्य मुख्य धर्मोपदेशक या पंचांत बहुतकरून असत. (खं. ३ पृ. ५९८)

१५० कबूल जाबब देण्याची आरोपिताला इच्छा उत्पन्न करण्याच्या साधनांपैकीं एक अत्यंत प्रबळ साधन असें होतें कीं आरोपिताला मुद्दाम झोंप बिलकूल घेऊं द्यावयाची नाहीं या अन्यायाच्या कामासाठीं उपयोगांत आणलेल्या लोखंडी गळपट्ट्या अगर चेटक्यांच्या लगामा स्कातलंदांतील निरनिराळ्या भागांत अजून राखून ठेविलेल्या आहेत. या गळपट्ट्यांची रचना अशी असे कीं डोक्यांत अडकावण्यासारखें एक लोखंडी कडें असे; तें गळ्यांत अडकविलें म्हणजे त्याच्या एका बाजूला चार कांटे असलेला लोखंडाचा एक तुकडा तोंडांत कोंबला जाई. या चार कांट्यापैकीं एक कांटा वर टाळूकडे, दुसरा खालीं जिभेकडे व एक एक प्रत्येक गालफडाकडे वळलेला असे. या यमराजाकडच्या यंत्राला एक कुलुप असे. या गळपट्ट्याच्या मागच्या बाजूला एक कडी असे, तिच्या योगानें आरोपिताला कोठडीच्या भिंतींतल्या खांबाशीं चांगलें अडकवून टाकतां येई. अशा रीतीनें शृंगारलें म्हणजे न्यायाधिशांनीं नेमलेला चतुर पहारेकरी त्या आरोपितास रात्रंदिवस जागवी. मग थोड्याच दिवसांत या हालांनीं दीन लाचार होऊन

वाटेल तें कबूल करून आपलें इहलोकींचें त्रासमय जिणें संपविण्यास आरोपित तयार होई. मधून मधून रग जिरली कीं नाहीं ती पहाण्यास अधिकारी येत; व रग जिरेपर्यंत हा त्रास त्याला सोसावा लागे. धर्मोपदेशक व धर्मसंस्थेचीं न्यायासनें अशीं चेटकाच्या हात धुवून पाठीस लागलीं होतीं, व त्यांच्याकडेच सर्व बातम्या प्रथमतः येत व सर्व फिर्यादी दाखल होत. ( पित्केर्न खं. १ भा. २ पृ. ५० )

१५१ सुया टोंचण्याचा एक धंदाच होऊन बसला होता. दाल्येल पृ. ६४५

१६० याच्या विलक्षण उदाहरणासाठीं आबरफाइलचा धर्माधिकारी राबर्त कर्क यानें इ० स० १६९१ त प्रसिद्ध केलेलें 'गुप्त लोकसत्ता' हें चमत्कारिक पुस्तक पहा. डोंगरी लोकांत नेहमीं मनुष्यरूपानें वास करणारे दुरात्मे तो दाखवितो. रतिसुखदा सर्व साधारण होत्या असें दिसतें. त्यांना स्काच लोक 'लीन्नैन सिथ' म्हणत. व मि. कर्कनें पुष्कळ स्काच तरुणांच्या या हवेंतील सुंदरींवरच्या प्रीतीविषयीं दिलगिरीनें गाऱ्हाणें केलें आहे. ( पृ. ३५ ). ( युतरानामीचे "घरोब्याचे दुरात्मे" व ह्या एकच असें कर्क म्हणतो. ) म्हाताऱ्या बाया मांजराचीं रूपें घेतात. यावर एका धर्माधिकाऱ्याचा व आपला झालेला विवाद क्यासन बर्तनें दिला आहे. तो धर्माधिकारी म्हणाला. एका मांजरानें एका मनुष्यावर हल्ला केला म्हणून मनुष्यानें त्याचा पाय तोडला; तर तो पाय लगेच म्हातारीच्या पायासारखा झाला; आणि चार धर्माधिकाऱ्यांनीं आपण ही गोष्ट प्रत्यक्ष पाहिल्याबद्दल सह्या केल्या आहेत. ( खं १ पृ. २७१ ते २७७). अशा विषयांवर लिहिणारा एक प्रमुख स्काच लेखक सिंक्लेर नांवाचा होता. हा ग्लासगो येथें नीतितत्त्वविवेचनाचा 'प्रोफेसर' होता.

१६१ राइटचें 'चेटुक' खं. १ पृ. १६५।१६६. चेटकीला कांहीं प्रश्न विचारणें हाही देहान्तशिक्षेयोग्य गुन्हा मानीत.

१६२ पित्केर्न खं. ३ पृ. ५९८. तिसऱ्या जेम्स राजाला लवकर मरण कसें येईल असा चेटक्यांना प्रश्न विचारल्याच्या आरोपावरून मारच्या दुसऱ्या एका अर्लला जिवें मारलें होतें. ( स्काातचें 'पिशाचशास्त्र' पत्र ९ ).

१६३ छळाची पहिली लाट सहावा जेम्स डेन्मार्कला बायको आणण्याकरितां गेला तेव्हां आली असें स्तर वाल्तर स्काातला वाटतेंसें दिसतें. जाण्यापूर्वी जेम्सनें धर्माधिकाऱ्यांना फौजदारी अमलदारास मदत देण्याविषयीं उपदेश केला होता; ती त्यांनीं दिली व विशेषतः चेटकाच्या बाबतींत स्वतः राजाला या विषयाचें जसें कांहीं पूर्ण वेडच लागलें होतें; व ही एक धर्माधिकाऱ्यांशीं त्याचें सख्य होण्यास अनकूल बाब होती; आणि

सर वाल्तर स्कात म्हणतो त्याप्रमाणें राजा व धर्माधिकारी यांच्या ऐक्य होण्याच्या अमृतुल्य वेळांत चेटकाच्या बाबतींत उभयतांचें पूर्ण मनःपूर्वक संगनमत असल्यामुळें चेटकाचा नुसतां जेथें वास येई त्या त्या माणसांना छळून जाळण्यापोळण्याच्या कामास ऊत आला. ('पिशाचशास्त्र' पत्र ९) लिंतनच्या 'चेटक्यांच्या गोष्टी' पृ० ५ ही पहा.

१६४ बोदिनचें धर्मज्ञानही अगदीं बहुतेक जुन्या करारावरून झालेलें होतें; व त्याची जुन्या कराराबद्दलची पूज्यबुद्धि इतकी थोर होती कीं, कांहींनीं (इतरांबरोबर ग्रोतियस व ह्यालम यांनींही) बोदिनचा नव्या करारावर विश्वास होता कीं नाहीं याबद्दल शंका दर्शविली आहे हें कांहींसें लक्षांत ठेवण्यासारखें होय.

१६५ स्कातलंदांतील चेटकाचा न बोलतां न सवरतां, न वादविवाद करतां ऱ्हास झाला, ही गोष्ट ब्रूगल्त स्त्युअर्टनें टिपून ठेविली आहे. 'दिझर्तेशन' पृ० ५०८.

## प्रकरण दुसरें.

१ पाल धि हर्मित. याचें सन्त जेरोमनें लिहिलेलें चरित्र पहा. वैखानसांतला पहिला संत जो आंतोनी तो पालकडे आला होता.

४ सारागोझा येथील देवळांत मूर्तीसमोर या चमत्काराचें चित्र आहे. या चित्राविषयीं अतिशय लेख आहेत व स्पेनमधील धर्मज्ञानपंडितांस हा चमत्कार विलक्षण उत्तमतऱ्हेनें प्रस्थापित झालेला वाटतो असें म्हणतात. चमत्कारांवरील आपल्या निबंधांत ह्यूमनेंही त्याचा उल्लेख केला आहे.

५ 'हिस्तोरी दला सिविलिसोशिआं,' लेकान १७. इ. स. १६४३ त बोलंद नांवाच्या जेसूतनें आंत्वर्प येथें बोलांदिस्त संग्रह सुरु केला; तो फ्रेंच राज्यक्रांतीमुळें बंद पडला होता; पण पुनः बेल्जियम राजसभांच्या पुरस्कारानें पुनः सुरू झाला. या विषयावरील मूळ कागदपत्र सर्व गोळा करण्याचा त्यांतला हेतु होता. दिनसगणनेच्या यादीवरून संतांची व्यवस्था लाविली आहे. पंचावन मोठीं द्विपत्रीं सांच्याचीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत पण त्यांत आक्टोबरच्या अखेरपर्यंतच हकीकत आली आहे. रेनानचा या विषयावरील फार सुंदर निबंध पहा.

६ धर्मोपाध्यक्ष स्प्रातनें मोठ्या चातुर्यानें याचा उल्लेख केला आहे ईश्वरानें] आपलें साक्षित्व जगांत

ठेविलेंच आहे. चमत्कार करण्याकरितां अज्ञानतिमिरावगुंठित काळच त्यानें पसंत केला. सृष्टपदार्थज्ञान फैलावलेल्या काळांत चमत्कार करण्याचें त्यानें मनांत आणलें नाहीं. याचें कारण असें कीं आपण निर्मिलेल्या प्राण्यांत आपलीं जीं कृत्यें दिसतात व वस्तुजातांत जें आपलें हस्तकौशल्य भरलें आहे त्याजकडे मनुष्यांचें लक्ष्य वेधून तीं दक्ष राहिल्यावर अलौकिक चिन्हांचा उपयोग करण्याची गरजच उरली नाहीं हें त्याला कळतें. ('राजमान्य विद्वन्मंडळाचा इतिहास' पृ. ३५० ).

७ एका अल्पप्रसिद्ध मुझरेली नांवाच्या रोमच्या धर्मज्ञानपंडितानें हेंच वादप्रमाण स्वरूप पालटून आपल्या 'पाखंड न्यायासनावरील पुस्तकांत' घातलें आहे. अनानियास, साफिरा व सायमन म्यागस यांच्या नाशाचीं उदाहरणें त्यानें दिलीं आहेत. अशा प्रकारचे चमत्कार बंद पडले असें तो म्हणतो; व म्हणून पाखंडन्यायासनाची गरज पडली. हेत्रियनच्या पांचव्या खंडांत हेंच विलक्षण पुस्तक भाषांतररूपानें असलेलें माहित आहे. ('हिस्तोरी द लेग्लिस.')

१२ तिष्ठद्रूपद्रव्यांतराविरुद्ध तिलोत्सननें आणलेल्या वादप्रमाणाचा (खरा अगर चुकीचा) ह्यूमनें या निबंधांत बोलून चालून उपयोग केला होता. ह्यूमची विचारपद्धति पूर्वी लाकनें योजिलेलीच होती हें तितकें सार्वत्रिक माहित नाहीं. लाकनें आपल्या 'बाडांत' एका फार नांवाजण्यासारख्या लेखछेदांत प्रतिपादिलें आहे कीं केवळ प्रतिभेच्या अगर चमत्काराच्या जोरावर विवेचक शक्तीस न पटणारा सिद्धांत कोणी खरा मानूं नये; कारण प्रतिभेचा अगर चमत्काराचा खरेपणा फक्त विवेचकशक्तीनेंच स्थापितां येतो. तो म्हणतो कीं 'ईश्वर या अफाट विश्वांतील एखादी संघटना एखाद्या वेळीं मानवी मतानें नेहमीं तसें करावें म्हणून बद्लील अगर नित्यनियमाच्या बाहेर ढकलील व बुध्द्या नित्यनियमाविरुद्ध गोष्टी घडूं लावील असा विश्वास ठेवणें ज्यास्त दुष्कर आहे; त्याहून एखाद्या गोष्टींत आपल्या विचाराची कांहीं चूक होत आहे अथवा आपल्यास माहित नाहीं अशा कारणाचा तो नैसर्गिक परिणाम आहे असें मानणें सुकर.' (किंगनें केलेलें 'लाकचें चरित्र' खं. १ पृ. २३०, २३१ ) 'मानवी समजूती' वरील निबंधांतला 'विवेचकशक्ति व भाव' हा भाग सुद्धां पहा.

१३ फार्मर हा असंमतिपंथांतला धर्मोपाध्याय होता. त्यानें सत्य व प्रमाद या दोहोंला पुष्टि देण्यास चमत्कार होत असें सामान्येंकरून दाखविण्याच्या प्रघातामुळें उद्भवणारी अडचण नाहींशी करण्याच्या हेतूनें सैतानकृत म्हणून

कांहीं चमत्कार नाहींतच असें दाखविण्याचा प्रयत्न केला.

१५ उदाहरणः वादविवादाच्या प्रश्नांतला एक प्रश्न 'अवशेषसन्मान' हा होता. आतां सर्व धर्मपित्यांतला अत्यंत समर्थ व तीक्ष्ण बुद्धीचा व अशंक्य धर्मबुद्धीचा संत आगस्ताइन गंभीरपणें विधान करतो कीं आपल्या स्वतःच्या धर्माधिकाराच्या हिपो प्रांतांत संत स्तीफनच्या शरीरावशेषानें दोन वर्षांत केलेल्या चमत्कारांची संख्या सत्तरांहून कमी नाहीं, व शेजारच्या कलामा प्रांतांत म्हणजे त्या अवशेषाच्या पूर्व ठिकाणीं ही संख्या फारच मोठी होती. त्याला अशंक्य वाटलेल्या चमत्कारांची त्यानें यादी दिली आहे व तो म्हणतो कीं ते नुसते निवडक आहेत; बाकी इतर इतके असंख्य आहेत कीं सगळे सांगूं जातां ग्रंथावर ग्रंथ पुरणार नाहींत. या यादींत मेलेल्या माणसांस पुनः उठवल्याच्या गोष्टी पांचांहून कमी नाहींत. ('दसिविक देइ.' खं. २२ क. ८) हें विधान गिबन व मिदलतनच्या वाचकांस चांगलें अवगत आहे; पण ज्या हायचर्चपंथीयानें त्याचा उल्लेख केलेला माहित आहे तो एकटा मि. वार्ड होय ('ख्रिस्ती धर्मपंथाचें ध्येय' पृ. १३८ ते १४०) यानें त्याचा उल्लेख सध्यां आपण चमत्काराविषयीं ज्या दृष्टीनें बोलतों ती भिन्न होय म्हणून केवळ दुःखप्रदर्शनार्थ केला आहे. आयझाक तेलरच्या 'प्राचीन ख्रिस्ती धर्म' या पुस्तकांत धर्मपित्यांच्या लेखांचें हें स्वरूप फार स्पष्टपणें व प्रामाणिकपणें उघड केलेलें आहे.

१६ (फ्ल्यूरीच्या 'इतिहासाच्या' आरंभीं जोडलेला) दा. न्युमनचा फारच समर्थ निबंध म्हणजे मुख्यत्वेंकरून धर्मसंस्थेतील चमत्कारांबद्दल दोषनिवारक विनंती होय; व आपण नुकताच ऊहापोह केलेल्या इंग्रजी संतांच्या चमत्कारांस कधींहीं प्रमाणभूत मानलेलें दिसत नाहीं.

१७ जर्मन धर्मज्ञानपंडितांपैकीं बरेच चमत्कारवृत्तांतांची असंभाव्यता, निदान असत्यता, स्वतःसिद्ध्धी मानतात हें सुप्रसिद्धच आहे. याला उदाहरण, स्त्रास शांतपणें शेरा देतो कीं "चमत्कार, भविष्यें, देवदूत आणि पिशाचें यांचे वृत्तांत व अशाच तऱ्हेच्या गोष्टी केवळ अशक्य व संघटनौघनियामक जे सुप्रसिद्ध व सार्वत्रिक कायदे त्यांशीं न जुळणाऱ्या म्हणून एकदम झिडकारल्या तरी चालतील" ('येशू ख्रिस्ताचें चरित्र' प्रस्तावना.)

१८ नुकत्याच घडलेल्या राजकीय घडामोडींपासून व त्या घडामोडींमुळें राष्ट्रीय प्रवृत्तींना लागलेल्या वळणाचा परिणाम म्हणून इताली, या म्हणण्याला कदाचित् थोडा अपवादक ठरतो. परंतु तेथें सुद्धां अनिर्बंध विचार पंथास मिळालेल्या यशाशीं

सुद्धां पहातां प्रतिरोधी पंथाची सिद्धि पासंगास पुरावयाची नाहीं; व असें सांगतात कीं, प्लायमाऊथ भ्रातृगण म्हणून जो प्रतिरोधी पंथांत पोट भेद आहे व ज्याची अत्यंत हटवादी मताभिमान्यांत गणना आहे त्याला सर्वांहून ज्यास्त यश आलें आहे.

१९ लेकालेनें 'रांकच्या इतिहासा' वरील आपल्या निबंधांत हा मुद्दा किती जोरानें व वाक्चातुर्यानें उघड केला आहे याची वाचकांस आठवण देण्याची जरूर क्वचित्‌च वाटते.

२० मा. द. मांतालेंबर्तनें आपल्या 'लाकार्देरच्या चरित्रां'त लामेनेविषयीं शेरा मारला आहे कीं, पाखंडधुरीणत्वाचीं इतकीं अत्युच्च गुणभूषणें धारण करणारा असून प्रस्थापित धर्मापासून प्रविचलन केल्यानें लोकमतावर इतका अत्यल्प ठसा उमटविणारा व एखाद्या पंथाचा कंद होण्याच्या कामीं इतका साफ फसणारा इतिहासांत बहुधा दुसरा मिळणार नाहीं. तथापि एकंदरींत हें अगदीं स्वभाविक होय. लामेनेनें पत्करिलेल्या मार्गानें मोठी बौद्धिक चळवळ चेतली पण तिचा पंथ व्हावा असा कधीं उद्देशच नव्हता.

२४ या मताच्या विवरणार्थ इ. स. १८६२ च्या आक्तोबरच्या 'एदिंबरो रिव्ह्यू'च्या अंकांतील अर्गाईलच्या ड्यूकनें लिहिलेल्या व त्यानेंच त्यानंतर आपल्या 'कायद्याचें राज्य' यांत पुनः छापलेल्या 'अमानुष' संबंधी लेखाचा उल्लेख करण्याहून अधिक बरें असें कांहीं करतां येत नाहीं. तेथल्या वादप्रमाणाचें सार ज्यांत आहे, अशीं थोडीं वाक्यें येथें निवडून घेतलीं आहेत. "सृष्टींतील कायद्याचें राज्य आमच्या अवलोकनाप्रमाणें खरोखर सार्वत्रिक होय. पण अमानुषतेची साधारण कल्पना अशी आहे कीं ती सृष्टिनियमाच्या विरुद्ध आहे; ती सृष्टिनियम मोडते अगर त्यावर अमल चालविते ...... म्हणून यावरून असा तर्क निघूं पहातो कीं सृष्टिनियमांच्या सार्वत्रिकतेची कल्पना पूर्ण बिंबली असल्यावर मनुष्याला अलौकिक असें कांहीं मान्य व्हावयाचें नाहीं......पण मग सृष्टी या शब्दांत जगन्निर्मितीला कारणीभूत होणारी अगर तत्समतेमुळें होण्यास समर्थ वाटणारी प्रत्येक कर्तृकशक्ती समाविष्ट आहे असें समजलें पाहिजे......सृष्टिनियमासंबंधीं मानवी बळाची सीमा फक्त प्रथम त्या नियमांचा शोध व निश्चय व नंतर त्यांचा उपयोग करण्यापर्यंत आहे......सर्व सृष्टिनियमांच्या पूर्ण ज्ञानानें जरी मानवी बलाची परमावधी होणार नाहीं तरी निदान सध्याच्याहून पुष्कळच अधिक तें वाढेल ......ज्यांना कायदे असें म्हणतात त्या ईश्वराच्या शासनपद्धतीच्या नियमांशीं ईश्वराचा संबंध कसा काय आहे, तें अर्थात् न उकलणारें कोडेंच आहे.

परंतु त्याच्या इच्छामात्रेंकरून हें विश्व चाललें आहे, असा ज्यांचा विश्वास असेल त्यांचा असाही विश्वास असला पाहिजे कीं निदान साधारणपणें साधनांची निवड व उपयोग करून तो जगच्छासन करीत असतो. त्याच्या उलट कधीं तरी तो वागतो असें मानण्यास कांहीं निश्चित कारण आपणापाशीं नाहीं. अशाच साधनांनीं म्हणजे मनुष्यांस बिलकुल ज्ञात नाहींत अशा विषयाची निवड व उपयोग करून आमच्या समजाप्रमाणें, सूचक चिन्हें व चमत्कार घडतील.'' केवळ अज्ञात सृष्टिनियम योजिल्यानें चमत्कार घडत असें प्रतिपादन बऱ्याच काळापूर्वीं मेलब्रांश व बटलरनेंसुद्धां वाटतें केलें आहे.

---

# प्रकरण तिसरें.

## भाग १ ला.

१ जस्टिन मार्तर 'अपालोजी' १. जलप्रलयाच्या वेळीं पाण्याच्या पृष्ठभागावर तरणारी लाकडी नौका म्हणजे शूळाचें सांकेतिक चिन्ह होय. व शुद्धिसंस्कारार्थ घ्यावयाचें पाणी यामुळें पवित्र झालें असें आगस्ताइनला वाटे. मोझेसचा दंड तांबड्या समुद्रावर पसरला तेव्हां तें शूळाचें सांकेतिक चिन्ह होय असें बीदला वाटे, आणखी एका चतुर टीकाकारानें सुचविलें आहे कीं पेझाक मृत्यूपासून बचावला याचें कारण असें कीं पर्वतावर चढतांना यज्ञाचीं लाकडें (समिधा) त्यानें शूळासारखीं खांद्यावर घेतलीं होतीं तथापि कान्स्टंटाईनच्या स्वप्नापूर्वीं कलेंत शूळ क्वचित् दिसे किंवा कधींही दिसत नसे. पहिल्यांदा त्याचें चित्र काढतांना त्यावर रत्नें अगर फुलें काढून तो सुशोभित करीत थीटा' हें थेनाटॉस् (मृत्यु) या शब्दाचें आद्याक्षर म्हणून अमंगळ मानीत व 'टा' हें अक्षर शूळाच्या आकाराचें असल्यामुळें पूज्य मानीत.

३ पाण्याच्या या पावित्र्याच्या कल्पनेवरून चेटक्यांना पोहूं लावण्याची चाल पडली. कारण समज असा असे कीं पाण्यांत जर अमंगळ पदार्थ पडला तर तो आंत जाऊं शकत नाहीं, पाणी त्याला बाहेर ढकलतें. (बिन्स्फेल्दियस 'द कन्फे माल- पृ. ३१५) रूपान्तर झालेलीं माणसें जर पाण्यांतून जातील तर, त्यांचें पूर्वरूप त्यांना मिळतें, अशा दंतकथाही बहुधा या कल्पनेवरूनच निघाल्या, प्राचीन तत्त्वज्ञान्यांपैकीं थेल्स

ह्या सर्ववस्तूंचें मूळ पाणी मानतो, या म्हणण्याला पुष्कळ धर्मपितें एक प्रकारची प्रतिभा मानीत. पाण्याच्या पापशोधनशक्तीच्या कल्पनेची ओविद्‌नें जोरानें निर्भर्त्सना केली आहे.

४. विंकलमनचें 'कलेचा इतिहास' रूल रोशेचें 'कुर दार्चिओलजी;' व ब्यारी व फ्युसेलीचीं व्याख्यानें पहा. हिंदी कलेचा हा विशिष्ट गुण रस्किननें आपल्या एडिंबरोच्या व्याख्यानांतील एका व्याख्यानांत जोरानें दाखविला आहे. पर्शियन कलेंतल्या उणिवांचा संबंध त्या देशांत ती कला केवळ युद्धकलेच्या विषयांत योजीत या गोष्टीकडे लेसिंगनें लाविला आहे. परंतु हा स्वतः धर्मानें कलेला थोडें उत्तेजन दिल्याचा परिणाम आहे. निरनिराळ्या राष्ट्रांतील सौंदर्यध्येयांतील तफावतीनें कलेवर निरनिराळा परिणाम होतो. याविषयीं विलक्षण माहिती च्या. क्वाम्तनें गोळा केली आहे ती पहा.' त्रेत दलेजिस्लेशिआ ' खंड ३ भाग ४.

५ देवळांतील वेदीखालीं धर्मवीरांचे अवशेष ठेवण्याची सनातनपंथांत चाल आहे तिचें मूळ हेंच. ईश्वराच्या वेदीखालीं असलेल्या आत्म्यांसंबंधीं आविर्भवनांतील वचनांशीं ही त्याचा संबंध लावीत. अगदीं प्राचीन देवळांत उंच वेदीखालीं जमिनीच्या पोटांत शववापिकांचें स्मारक म्हणून एक देऊळ असे. ज्या देवळांत अवशेष नाहींत त्यांचा संस्कार करावयाची इ. स. ७८७ च्या नाइस येथील धर्मपरिषदेच्या दुसऱ्या हुकुमनाम्यानें मनाई केली आहे.

६ मा. रूल रोशेला वाटतें कीं धर्मवीर्याचें सरळ वास्तविक चित्र केवळ एकच आहे. तें कुमारी सालोमचें होय; व हें ऱ्हासाच्या काळांतलें बरेंच आलीकडचें आहे. ('ताब्लो द काताकोम्ब' पृ. १८७) याच लेखकानें (पृ. १९१;१९२) धर्मपित्यांतलीं थोडींशीं उदाहरणें गोळा करून दिलीं आहेत. त्यांत प्राचीन देवळांत धर्मवीर्यांचीं चित्रें होतीं असें सांगितलें आहे; पण हीं उदाहरणें फारच थोडीं आहेत. प्राचीन खिस्तीकलेची दहाव्या व पुढच्या शतकांतील कलेशीं या बाबतींत पुष्कळ तफावत आहे यांत शंका नाहीं.

८ संत आगस्ताइन म्हणाला कीं प्रयोग करून वस्तुस्थिति तशीच आहे, अशी आपण आपली खातरी केली आहे; व हा चमत्कार होय असें त्याला वाटत असावें असें दिसतें. ('द सिव्ह देइ' खं. २१ क. ४).

९ सियाम्पिनी 'वेतरा मान्युमेंता' भा. १ पृ. ११५; व मेतूलंद 'काताकोम्बाविषयीं' पहा. तथापि मोर हा प्रथमतः एका राणीच्या देवपदोन्नतीचें व पुढें सामान्येंकरून देवपदोन्नतीचें चिन्ह होय; कारण मोर हा स्वर्गाची राणी जी ज्यूनो

तिचा पक्षी आहे; असें रूल रोशेला वाटत होतेंसें दिसतें.

१० युझेबियसनें आर्फ्यूस हा क्रिस्ताचें सांकेतिक रूप होय असें म्हटलें आहे. धर्मसंस्थेत क्रिस्ताविषयींचीं जीं अनिश्चितप्रामाण्याचीं पुष्कळशीं भविष्यें पसरलीं होतीं त्यापैकीं कांहीं अत्यंत ठळकठळक आर्फ्यूसकडे लावीत यामुळें आर्फ्यूसबद्दलची पूज्य बुद्धी बहुधा उपजली असावी. या संकेतचिन्हांसाठीं मेतूलंद 'काताकोंबविषयीं' पृ. ११०; रूलरोशे 'ताब्लो द काताकोंब' पृ. १३८ पहा. या विषयाच्या पूर्ण मीमांसेसाठीं बोल्देतीचा मोठा ग्रंथ 'आसर्विझिओनी सोप्रा इ सिमितेरी दसांती मार्तिरी' भा. १ पृ. २७ ते २९ पहा. मा. रियो ('आर्त क्रेतियेन'ची प्रस्तावना पृ, ३६) स्वकल्पनेनें त्याचा संबंध आर्फ्यूसच्या एका आत्म्याच्या तारणासाठीं नरकांत उतरण्याकडे लावतो. पेगनी देवांचा ख्रिस्ती कलेंत शिरकाव झाल्याचीं आणखी उदाहरणें म्हणून एका शव वापिकेंत असलेलें एक अप्रसिद्ध चित्र सांगावयास हरकत नाहीं. म्यार. रोशे या चित्राला मर्क्युरी मृतांच्या आत्म्यांस न्यायासनांकडे नेत आहे असें दाखविणारें चित्र समजतो. ('ताब्लो द काता' पृ. १४८ ते १५१). दुसरें उदाहरण हर्क्यूलिसच्या चित्राचें. हें शववापिकांत कोठेंही नाहींसें वाटतें. पण तें जुन्या देवळांत पुष्कळदां दिसतें. संत आगस्ताइन तें साम्सनचेंच मानतो. (या चित्राबद्दल व सामान्यैकरून पेगनी व ख्रिस्ती कलांच्या संबंधाबद्दल वाचावयाचें तर मारांगोनीचें विलक्षण व विद्वत्ताप्रचुर पुस्तक (देली कोझे जेंतिलेश्चे इ प्रोफेन त्रान्स्पोर्तेत आद यूसो देली शियेज' पृ. ५० व ५१) वाचावें. कांहीं प्राथमिक ख्रिस्तांच्या मतें (उदा० आलेक्झांद्रियाचा क्लेमेन (स्फिंक्सचा मुद्दा) त्यांच्या धर्माशीं थोडा फार संबंध होता. कारण त्यांना वाटे कीं चेरुबिमच्या यहुदी चित्रावरून अनुकृत केलेलें तें चित्र असावें. पण त्याची त्यांनीं प्रतिकृति कधींही केली नाहीं. सिंह व कन्या यांचें हें विलक्षण साहचर्य कांहीं अलीकडच्या प्राचीन वस्तुसंशोधकांनीं इजिप्तांतील लोकांना या राशींतून सूर्य जात असतां नीलनदीला पूर येऊन जो फायदा मिळतो त्याकडे लाविलें आहे. (कायलस 'रेक्यूइल दांतिक्विते' खं. १ पृ. ४५)

१४ एरिथ्राच्या सिबिलच्या भविष्यकथनाच्या कवितेंतली आद्य अक्षरें घेऊन जो इक्थुस शब्द होतो त्याचा अर्थ मासा असा होतो. (संत आगस्ताइन 'द सिव्ह देइ' खं. १८ भा. २०) 'इक्थुस' या ग्रीक शब्दांत (इ, क्, थ्, उ, आणि स्, अशीं) पांच अक्षरें आहेत. ज्या पांच शब्दांचीं हीं आद्य अक्षरें आहेत ते असेः १ इसस=जीजस, २ क्रिस्तास=

क्राइस्त, ३ थीओस=ईश्वराचा. ४ उइओस=पुत्र, व ५ सोतर=तारक. दालफिन माशाला पिलांची ममता फार असल्यामुळें त्याची निवड केलेली दिसते.

१६ मारी 'लिजेंदिस प्यूसिस, पृ. १७३ते १७८ प्लिनी 'हिस्त. नेति ८।५० ; जोसेफस 'आंतिकि.' २।१० पहा. व्हॅातिकनांत ( पोपाचार्यांच्या मंदिरांत ) अल्प उठावाचें एक काळविटाचें चित्र आहे. हा काळविट सर्पावर हल्ला करतो आहे असा काढलेला आहे. स्तोत्रांतील 'तृषार्त हरिणा'विषयींचा उतारा ( हा उतारा शुद्धिसंस्कारोदकांत उतरतांना संस्कार्य मनुष्यानें गावयाची चाल असे. ) या संकेतचिन्हाशीं संबद्ध मानीत. मध्ययुगांत हरिणांना एक प्रकारचें भविष्यज्ञान आहे असें मानीत. सियांपिती 'द साक्रिस इदिफिसिइस' पृ. ४४ पहा. आरिंघीमधला फार विलक्षण भाग 'रोमा सब्तेरेनिया' खं. २ पृ. ६०२ ते ६०६ पहा. हरिणाला वज्रपाताची इतकी भीति वाटते असें मानीत कीं हरिणीचा त्याच्या योगानें गर्भपात होतो असें म्हणत. याचा संबंध तुझ्या वज्राच्या आवाजानें मी भेदरून गेलों आहें ' या उताऱ्याशीं लावीत.

१७ या विषयाचा थोडक्यांत ऊहापोह केलेला रूल रोशेच्या ' दिस्कोर्स सुर लार्त दु क्रिश्चियानिझम ' पृ. ७ व मारीच्या लिजेंदिस प्युसिस मध्यें आढळतो. पण त्याचें पूर्ण परीक्षण मा. दिद्रोननें आपल्या ' आयकोनोग्राफी क्रितियेन, हिस्त. द दिऊ ' या मोठ्या ग्रंथांत केलें आहे. या पुस्तकानें ख्रिस्ती प्राचीनज्ञानांत मोठी महत्त्वाची भर पडली आहे. एमेरिक देविदचें ' हिस्तदला पीन्तूर ओ मोयेन एज ' पृ. १९ ते २१ सुद्धां पहा.

२३. या विषयावर फ्रांकचें 'सुर ला काबेल' मारीचें ' क्रोयान्से एत लिजेंदिस दलान्तिाक्किते ' पृ. ३२८; व विशेषेंकरून बोसोबरचें ' हिस्त. दु मानिशिइझम ' खं. १ पृ. ३५ ते ३७ पहा. जस्तिन मार्तिर, तर्तुलियन, इरिनियस, एपिफेनियस, व दुसरे पुष्कळ धर्मपिते हेलिनेच्या पूजेचा उल्लेख करितात. त्यांच्या मताप्रमाणें हेलिनेच्या सौंदर्यामुळें स्वर्गातील देवदूतांशीं युद्ध सुरू केलें व सैतानानें तिला बंदींत ठेविलें व जेथून ती घसरली, त्या स्वर्गांत तिला परत जाऊं देईना असें सायमननें जाहीर केलें. हें सर्व आत्म्यावर रूपक आहे असें मानण्यास थोडें कारण आहे.

२४. बहुतेक ज्ञेयवादी यहुद्यांच्या देवाला अगर देमिअर्ज (विश्वकर्म्या) ला अपूर्णनीतिमत्ताधिष्ठित अपूर्ण चिदात्मा मानीत तथापि पुष्कळांना यहुदी धर्म म्हणजे पापात्म्याचें, जडशासक देवाचें, कार्य वाटे. ज्यानें ज्यानें यहुदी धर्माशीं विरोध केला तो तो पूज्य असें कैना-

इत म्हणत. पण ओफाइत प्रत्यक्ष सर्पाची पूजा करीत. पुष्कळ ज्ञेयवाद्यांना सर्पाबद्दल पूज्यभाव वाटण्याचें अंशतः कारण असें आहे कीं ख्रिस्ती धर्मांत सर्प जरी पापतत्व मानतात तरी प्राचीन सांकेतिक संज्ञांत त्याची निराळीच योग्यता होती. सर्प कात टाकतो म्हणून त्याला रोगघ्नतेचें चिन्ह मानीत; व या दृष्टीनें त्याला एस्क्युलेपियस व हूसिस यांच्या पुतळ्यांशीं स्थान मिळे; व नेहेमीं त्याला इतर प्राण्यांचा प्रतिनिधी मानीत. उदा. जरा अलीकडील रोमच्या शिष्यांत मिथ्रेक वृंद वारंवार आढळतात; त्या वृंदांत सर्प व कुत्रा यांनीं इतर सर्व प्राण्यांचा निर्देश झालेला असतो. श्येनशीर्ष सर्प हें प्राचीन इजिप्तांत उत्तम बुद्धीचें सांकेतिक चिन्ह होतें.

२५ प्रूनिसचा खरा अर्थ कामुकता होय. सोफियेच्या भ्रष्ट स्थितींत म्हणजे ती जडाच्या कारागृहांत पडलेली असतां तिला हा शब्द लाविलेला दिसतो. पण हा विषय अत्यंत दुर्गम आहे व तो अजून सुबोध झालेला नाहीं असें वाटतें. प्रूनिस व बेरोनिस या नांवांचा गोंधळ दिसतो. एका प्राचीन ख्रिस्ती संप्रदायाप्रमाणें बेरोनिस हें नांव एका शोणितस्राव दोषमुक्त स्त्रीचें आहे. ही स्त्री म्हणजे ज्ञेयवाद्यांत एक नमुनेदार मुख्य माणूस होतें. व्हालेंतिनियनांच्या मताप्रमाणें तिच्या दुःखाच्या बारावर्षांनीं प्रत्येकीं एकेक निःस्राव दर्शित होतो व शोणितप्रवाहानें अधःस्थ लोकीं वाहत जाणारी सोफियेची शक्ति दार्शित होते. या विषयावर मारीचा ‘ क्रोयान्सिस एत् लिजेन्दिस ’. व्हेरोनिका व सामान्यपणें सोफिया यावर मातरचे ‘ हिस्त. दु ग्नास्तिसिझम ’ खं. १ पृ. २७५ ते २७८ पहा. मा. फ्रांक ( ‘ ला काबेल ’ पृ. ४३ ) म्हणतो कीं कांहीं ज्ञेयवादी पवित्रात्म्याचें चित्र स्त्रीचें काढीत; पण याचा संबंध फक्त सोफियेकडे आहे असें वाटतें.

२७ हिप्रोन पृ. १९७,१९८. तथापि अनिश्चितप्रामाण्य शुभवर्तमान बहुधा निकोदिमसचें होतें; याचा कलेवर फार प्रभाव झाला. हें दिसण्यांत सत्यधर्मांतून निघालेलें आहे; व तें बहुधा आपोलिनेरियनांविरुद्ध लिहिलें होतें, निदान त्याचा दुसरा भाग तरी तसा लिहिला होता. आरंभींच्या बाथझांशियांतल्या कलेंत सर्व साधारण दिसणारीं यमसदनांगणपतनाचीं चित्रें यांतून निघालीं. याच उगमापासून निघालेला हाच विषय माध्ययौगिक पवित्र नाटकांत प्रमुख होता. (मालोनचें ‘ इंग्रजी रंगभूमीचा इतिहास ’ पृ. १९ ).

२८ या मुद्याच्या पूर्ण विवेचनासाठीं रूल रोशेचें ‘ताइप्स द लार्त पृ. ९ ते २६ व त्याचेंच ‘ ताब्लो द काताकोंब्स ’ पृ. २६५ पहा. क्रिस्ताचा नमुना ज्ञेयवाद्यांकडून घेतला, ( रूल रोशे म्हणतो बहुतेक रोमन प्राचीन

संशोधकांनीं तेंच मत घेतलें आहे. ) असें जें मत त्याला मुख्य आधार पुढें दिल्याप्रमाणें आहेतः ( १ ) ख्रिस्ती धर्माच्या आद्य स्थितींत चित्ररंगकर्म व टंककर्म यांचा धर्मसंस्थेंत फार तिटकारा करित, व कान्स्तन्ताइनच्या वेळे इतक्या उशिरापर्यंत क्रिस्ताचीं चित्रें विरळा आढळत. ( २ ) ज्ञेयवाद्यांत कलेचा परिपोष प्रथम पासून झाला; व ख्रिस्ताच्या चिमुकल्या मूर्ती म्हणजे त्यांच्या नित्याच्या पूजाविषयक वस्तू होत्या. ( ३ ) ज्ञेयवाद्यांचा रोम येथें फार भरणा होता. ( ४ ) ज्ञेयवादाचा ख्रिस्ती धर्मावर व विशेषतः त्यांतील रामणीयोत्कर्षावर फार परिणाम झाला. आणखी असें सांगता येईल कीं ख्रिस्ती लोक ख्रिस्ताची जी शरिराची ठेवण होती असें म्हणत ती पेगन धर्मांतून उचलून घेण्याच्या ते अगदीं उलट होते; आणि थिओदोरे सांगतो कीं, एका चित्ररंगकर्म करणाऱ्यानें क्रिस्ताच्या तसबिरीला ज्यूपितरचा नमुना घेतला म्हणून त्याचा हात लुला झाला; पण कान्स्तान्तिनोपलचा धर्माध्यक्ष संत जेनादियस यानें चमत्कार करून तो बरा केला. यानंतरच्या काळीं पेगन पुतळ्यांना पुष्कळदां संतमालिकेंत सामील करून घेण्यांत आलें. संत आगस्ताइन म्हणतो कीं, आपल्या वेळीं क्रिस्ताची खरी विश्वसनीय तसबीर नव्हती; व त्याच्या अवयवांची ठेवण अजून निश्चित झालेली नव्हती; म्हणून क्रिस्ताच्या मुद्रेविषयीं आपणांस अगदीं कांहींएक माहीत नव्हतें. ( 'द त्रिनितेत' खंड ८ भाग ४१५ ). तथापि नमुना पुढें लवकरच तयार झाला.

२९ ज्ञेयवादाशीं याचा जो संबंध त्यासाठीं मातर 'हिस्त. यू नास्तिसिझम' खंड १ पृ० ८८, ८९ ते ९८ पहा.

३० मध्ययुगाला स्वाभाविक अशी जी अवतारासंबंधीं गूढाला इंद्रियगोचर रूप देण्याची बळकट इच्छा ती कर्णद्वारा गर्भसंभवाच्या विलक्षण कल्पनेनें दिसूं लागली. संत थामस ए बेकेतच्या नांवावर मोडणाऱ्या एका सूक्तांत ख्रिस्ताची आई कुमारी असतां कर्णद्वारें तिच्या पोटीं गर्भसंभव झाला, असें गेब्रियल सांगतो', अशा अर्थाच्या ओळी आहेत. आणि सध्या पारिस येथील एका अजायबखान्यांतील जुन्या तावदानी खिडकींत पवित्र आत्मा कबूतराच्या रूपानें कुमारीच्या डोकीवर घिरट्या घालीत आहे व त्याच्या चोंचींतून एक तेजःकिरण तिच्या कानांत शिरत आहे व त्या किरणावाटे शिशुरूप धारण केलेला क्रिस्त उतरत आहे, असें चित्र काढलेलें आहे असें वाटतें.—लांग्लाय, 'पेन्त्यूर सुर वेरे' पृ. १४७. मारोन पंथी लोकांच्या सत्प्रार्थना पुस्तकांत वगैरे अशाच अर्थाचीं वाक्यें आहेत. संत आगोबार्द, आगस्ताइन व

एफ्रेम यांनींही असेंच म्हटलें आहे. लोगास या नांवावरून अर्थात् हें सुचलें. लोगास म्हणजे शब्द, ईश्वरी शब्द, क्रिस्त असा अर्थ आहे. ( मारी. 'लिजेंदिस प्यूसिस' पृ. १७९,१८० ).

३१ संत आगस्ताइननें नमूद केलें आहे कीं ('द त्रिनितेत') त्याच्या काळीं मेरीची भरंशालायक तसबीर नव्हती. तिचें चित्र बाळासह काढावें असा एफीससच्या परिषदेचा विचार झाला; व असेंच चित्र ख्रिस्ती धर्माच्या आरंभीच्या काळीं काढीत. बायझान्शियांतील कांहीं चित्रांत, होरसला पाजीत आहे असें जें ईसिसचें चित्र इजिप्तांत काढीत त्याचा प्रभाव होता असें म्हणतात. असें अवलोकनांत आलें आहे कीं, मेरी व क्रिस्त या उभयतांच्याही चित्रांत जसजशीं तामस युगें लोटत गेलीं तसतशीं विषाद व दुःख त्यांच्या मुखांवर अधिकाधिक दिसूं लागलीं; व सालोमनाच्या गीतांत वर्णिल्याप्रमाणें त्यांत काळेपणाची झांक माध्ययौगिक कारागिरांनीं जास्त आणली. आईशीं क्रिस्ताचें साम्य आहे. असा पहिला उल्लेख निसिफोरसमध्यें आहेसा वाटतोः--रूल रोशे 'ताइप्स द लार्त क्रीतियेन' पृ. ३०ते३९ व पास्कल 'इन्स्तित्यूशन्स द लार्त क्रीतियेन' पहा.

३२ हीरेन 'इन्फ्ल्युएन्सीस दि क्रायसेदस' पृ. २०४, २०५ ही कल्पना प्रथमतः महंमदीयांत दृढ झाली व नंतर कांहीं शतकांनीं ख्रिस्त्यांनीं ती घेतली, असें गिबन म्हणतो. संत बर्नार्दनें हा प्रकार नवीन ह्मणून झिडकारला. ('उतरती कळा व नाश' भा. १ टी. )

३३ सध्यासुद्धां संत बोनाव्हेन्चुरा याचें 'प्सात्तर' (म्ह० मुख्यत्वेंकरून 'दोमिनस' बद्दल 'दोमिना' हा शब्द घालून कुमारीच्या पूजेला योग्य केलेली 'प्साम'ची म्ह० स्तोत्रांची आवृत्ति) हें रोम येथें भक्तिमार्गांतलें एक लोकप्रिय पुस्तक आहे. कुमारी मानवजातीचा न्याय करीत आहे, असें व क्रिस्ताच्या दर्जाला शोभेसें तिचें चित्र पिसा येथील आर्कझाच्या भिंतीवर काढलें आहे. माध्ययौगिक कलेचा परिचय असलेल्या प्रत्येक इसमाला असलीं उदाहरणें आढळलीं आहेत. गिल्बर्त तेसियस नांवाच्या एका म्हताऱ्या धर्मोपाध्यक्षाची तसबीर, कुमारिका क्रिस्ताला पाजीत आहे असें चित्र एका अंगास व क्रिस्ताला शूळावर चढविलें आहे असें चित्र दुसऱ्या अंगास, काढून मध्यें रंगविलेली आहे. पास्कल 'आर्त क्रितिएन' खं. १ पृ. १५०

३४ येणेंप्रमाणें इलिबेरिसच्या परिषदेनें आपल्या ३४ व्या कलमांत श्मशानांत दिवसा दिवे लावण्याची संतांच्या आत्म्यांना त्रास होईल या भीतीनें मनाई केली. संत जेरोमनें विजिलांतियसचें एक

विलक्षण वचन उतरून घेतलें आहे, तें पहा. 'कांत्र विजिलांति' ८. धर्मवीराच्या थडग्याच्या बाजूला आपलें प्रेत पुरावें ही लोकांना अत्युत्कट इच्छा व मानास्पद गोष्ट वाटे. लेव्लांतचें 'इस्क्रिप. क्रेतियेनी द गाल' खं.२ पृ. २१९ ते २२९ पहा.

३५ ही तसबीर एका पत्रासोबत पाठविली होती. हें पत्र युझेबियसनें कांकूं न करितां मान्य केलें व तें खरें मानून आदिसननें ख्रिस्तीधर्माबद्दलच्या पुराण्याविषयींच्या आपल्या एका ग्रंथांत उतरून घेतलें. अर्थात् सध्या तें अनिश्चितप्रामाण्यापैकीं साधारणपणें मानतात. ही तसबीर एका हातरुमालावर ( संत बेरोनिकानें मिळवलेल्यासारखी ) चमत्कारानें उठवलेली मानीत. ती बराच काळपर्यंत कान्स्तांतिनोपल येथें होती परंतु रोम येथें बहुधा इ. स. ११९८ च्या सुमारास आणली; व कपाइतांतील संत सिल्वेस्तरच्या देवळांत ठेविली. ती अजूनपर्यंत तेथेंच आहे. मारांगोनींचें 'इस्तोरिया देला कापेला दि सांक्ता सांक्तोरम दि रोमा पृ. २३५ ते २६९ पहा. हें पुस्तक जरी दिसण्यांत आकरोपिता अगर लातरन येथील पवित्र मूर्ती इचाच केवळ इतिहास आहे तरी ख्रिस्ताच्या प्राथमिक काळच्या चमत्कारजनक चित्रांचा संपूर्ण इतिहास याच्यापेक्षां दुसऱ्या कोठेंही चांगला पहावयास मिळण्यासारखा नाहीं.

३६ या चित्रांविषयीं, त्यांनीं केलेल्या चमत्कारांविषयीं, व मूर्तिभंजनाविषयींच्या ऊहापोहांत त्यांना आलेल्या विशेष महत्त्वाविषयीं मेम्बूर्गचें 'हिस्तायर द आयकोनोक्लास्ते' पृ. ४४ ते ४७ पहा. व मूर्तीवर लादलेल्या इतर प्राथमिक काळांतील चमत्काराविषयीं स्पान्हीमचें 'हिस्तोरिया इमाजिनम्' पृ. ४१७ ते ४२० पहा. यांपैकीं मेम्बूर्गचें पुस्तक सनातनपंथी असून स्पान्हीमचें प्रतिरोधी पंथाचें त्यावर उत्तर आहे. मारांगोनीचें 'सांक्ता सांक्तोरम' व आरिंघीचें 'रोमा सब्तरेनिया' खं. २ पृ. ४५२ ते ४६० सुद्धां पहा.

३७ सनातनपंथी प्रतिपादितात कीं हा हुकुमनामा छळामुळें निघाला व त्यांतला उद्देश पेगन लोकांनीं ख्रिस्ती मूर्ती भ्रष्ट करूं नयेत हा होता.

३८ याचें कारण बहुधा असें कीं प्राचीन रोमी अगर ग्रीक लोकांनीं चित्रांचा उपयोग मूर्तीसारखा कधीं तरी केला होता असें वाटण्यास बिलकुल आधार नाहीं.

४० पैकीं अत्यंत प्रसिद्ध न्हीम्सचा धर्माध्यक्ष हिंक्मर हा होय. यानें पवित्र मूर्तींना बाहुल्या म्हटल्यावरून ब्यारोनियसनें याची चांगली निर्भर्त्सना केली. पण बाहुल्या हा शब्द हिंक्मरच्या ग्रंथांत कोठेंही आढळत नाहीं असें मेम्बूर्ग प्रतिपादितो ( 'हिस्तायर द आयकानोक्ला.' ची प्रस्तावना ).

४७ सेल प्रतिपादितो त्याप्रमाणें महंमदनें अनेकपत्नीत्व सुरू केलें नाहीं, व त्यामुळें, त्यानें अनेकपत्नीत्व चालू दिलें एवढ्यानें आशियेंतल्या लोकांचीं मनें त्या नव्या धर्माच्या अंगिकार करण्याकडे ओढलीं जाण्याला कारण नाहीं हें अगदीं खरें, परंतु महंमद व त्याचे शिष्य यांनीं इतर कोणत्याही धर्मप्रवर्तकांहून जास्त चातुर्यानें इंद्रियविषयक वृत्तींचें धर्माशीं संमिश्रण केलें, पुढें मिळणाऱ्या उत्तम फळांशीं त्यांचा संबंध जोडला, व त्यांना भक्तिप्रेरक कारणांचें स्वरूप दिलें.

८ हा मार्ग स्वीकारण्याची कांहीं आद्य काळच्या ख्रिस्त्यांची इच्छा होती असें दिसतें. हाच मार्ग काय तो मूर्तिपूजा नष्ट करण्याला पूर्णपणें समर्थ झाला असता. ‘ सन्त जानचे नौकाप्रवास ’ या नांवाच्या अनिश्चित प्रामाण्याच्या व सर्व लोकांत पसरलेल्या एका ग्रंथांत एक दंतकथा होती कीं जानला एकदां एका ख्रिस्त्याच्या घरांत एक तसबीर आढळली ती जानची स्वतःची होती. ती मूर्ती असें त्याला प्रथमतः वाटलें, व जरी तिचें स्वरूप त्याच्या लक्ष्यांत आणून दिलें गेलें तरी ही ह्या चित्रकाराला त्यानें फार कडकपणें दोष दिला. ( बोसोबर ‘ हिस्तो. दू मानिशिइझम ’ ) अशाच अर्थाचा हर्मोजिनिस विरुद्ध तर्तुलियनाचा निर्भर्त्सनाप्रचुर उतारा आहे. क्लिमेन्स अलेक्झांद्रिनचें असें मत होतें कीं आरशांचा उपयोग करण्यानें बायकांनीं दुसरी आज्ञा मोडली; कारण आरशाचा उपयोग केल्यानें त्या स्वतःच्या मूर्ती बनवितात. बार्बेराक ‘ मोरेल द पेरीस ’ भा. ५ क. १८.

४९ या विषयावरील ओवेन जोन्समधून फोर्डनें आपल्या ‘स्पेन’ खं. १ पृ. ३०४ वर घेतलेला स्मरणीय उतारा पहा. ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे कीं आल्हम्ब्रा ( मूर लोकांच्या रक्तवर्ण राजवाड्या ) मधील वनस्पतिकोटीवरून घेतलेला नक्षीच्या कामानें शोभा आणण्याचा प्रकार सौंदर्याच्या दृष्टीनें अद्वितीय असतां धर्मसंस्थापकाच्या आज्ञेच्या भंगाचें एकाकी उदाहरण वाटणारे असे एका कारंजाचे सिंह हे पिसाच्या निकोलसच्या वेळच्या कारागिरींत अत्यंत हलक्या दर्जाचे वाटतील.

५० दंतकथेवरून दिसतें कीं ख्रिस्ती रंगीबेरंगी जडाव कामाचा फार जुना नमुना म्हणजे ख्रिस्ताचें एक चित्र होय. हें रोमच्या सन्त प्राक्सीदच्या देवळांत राखून ठेविलेलें आहे. तें चित्र संत पीतरच्या गळ्यांत असे व त्यानें तें रोम येथें आपल्या यजमानाला म्हणजे संत प्राक्सीदचा बाप प्यूदेन्स याला दिलें. पांचव्या व सहाव्या शतकांतील रंगीबेरंगी जडावकामाचे उत्तम मासले रावेन्ना येथें आहेत, विशेषेंकरून ते या कलेंतील निष्णात कारागिर जे

ग्रीक त्यांनीं बांधलेल्या सन्त व्हिते-लच्या देवळांत आढळतात. या विषयावरील मुख्य प्रमाण जो सियांपिनी त्याला वाटतें कीं ('वेतेरा मान्युमेंता' भाग, पृ. ८४) इ. स. १०६६ त मांत क्यासिनो ही शाळा स्थापन झाली त्याच्या पूर्वी तीनशें वर्षें रोम येथें या कलेचा साफ विसर पडला होता. पण मारांगोनी या काळांत थोडीशीं मिकार कामें झालीं असें म्हणतो. ('इस्त. सांक्त.' पृ. १८० ते १८२). रोम येथल्या असल्या कामांची वर्णनात्मक यादी नुकतीच बार्बेत दी जाय यानें प्रसिद्ध केली आहे, व मा. चितेत यानें त्याच्या इतिहासाचें विलक्षण मनो-वेधक परीक्षण ('एतुदिस सुर ल हिस्तायर दलार्त' खं. १) केलें आहे. कलेच्या ऱ्हासाच्या साधारण आलोकासाठीं दाजिंकोर्टचा मोठा इतिहास पहा.

५१ मध्ययुगांत सोन्याचांदी-वरच्या नाजुक कोरीव कामाच्या कलेचें रक्षण होण्याचें मुख्य कारण अवशेषांविषयींची पूज्यबुद्धि होय; कारण अवशेष ठेवण्यासाठीं अत्यंत सुंदर कोरीव काम केलेलीं पात्रें तयार करीत. देवळांतील असलीं भूषणावह कामें करण्याबद्दल रूआन शहरची बराच काळ मोठी ख्याति होती. पण इ. स. १५६२ त प्रतिरोधी पंथानें जेव्हां तें काबीज केलें तेव्हां हे दागिने लुटले व बहुतेक नष्ट केले. इतालींतील संस्थानांच्या ऐषारा-माच्या संवयी सोनारांना अनुकूल होत्या; व वेनिसचे सोनार फारच प्रख्यात होते. त्यांपैकीं बरेच यहुदी होते म्हणतात. फ्रांशिया, वेरोशियो, पेरूजिनो, दोनातेलो, ब्रुनेलेश्चि, व घिबर्ति हे सगळे मूळचे सोनार होते. मा. द्दिद्रोननें या कलेचें एक हात-चोपडें प्रसिद्ध केलें आहे. लिमोजि-सच्या सोनारांतून एक सन्त निर्माण झाला, त्याचें नांव सन्त इलाय, हा त्या कलेचा पुरस्कर्ता झाला. मध्ययुगांत व विशेषेंकरून आठव्या शतकांत हस्तिदंती कोरीव लेखपुटेंही बरींच सर्वसाधारण झालीं होतीं.

५२ लिब्रारियोच्या 'एकानोमिया पोलितिका देल मेदियो इ० हो' खं. २ पृ. ३३७ ते ३४६ वर झग-झगीत रंगांच्या व सूक्ष्म तसबिरा करण्याच्या इतिहासाविषयीं बरीच विलक्षण हकीकत दिलेली आहे. पिझ्राट म्हणतो कीं, पांचव्या शतका-पासून दहाव्या शतकापर्यंत हस्त-लेखांतील सूक्ष्म चित्रें रेखाकर्म व रंगकर्म या दोहोंतही अत्यंत पूर्णतेला गेलेलीं दिसत; व दहाव्यापासून चवदाव्या शतकापर्यंत रेखाकर्माचा ऱ्हास झाला, पण पुनः रंगकर्माच्या पुनरुज्जीवनाबरोबर त्याचा पुनः उदय झाला. ('एसे सर ल इस्तायर दू पार्सेमीं' पृ ७६) काचेवर रंगविणें व सूक्ष्म चित्रें काढणें हीं दोन्हीं सिमाब्यूच्या पुष्कळ वेळ अगोदर

सर्वसाधारण होतीं व आयकाळच्या कारागिरांवर त्यांनीं बहुधा चांगली छाप बसविली होती.

५३ या विषयासंबंधीं व सामान्य-पणें माध्ययौगिक विचारसरणीच्या कलेवरील छापेसंबंधीं रूल रोशेचें 'कूर दार्चिआलजी' पहा. हें पुस्तक कलेवरील अजूनपर्यंतच्या उत्तम पुस्तकांपैकीं एक आहे. मि. वेस्त्रापनें त्याचें भाषांतर केलें आहे. चमत्कारांच्या इतिहासावरून वरील आलोकाचें विलक्षण दृढीकरण होतें. 'इस्तोरिया देला कापेला दि सांक्ता सांक्तोरम' पृ. ७७ वर मारांगोनी असेंच म्हणतो.

५४. मनुष्येतर प्राण्यांतलें सौंदर्य-सुद्धां मुखचर्यांचे आदर्श मनुष्येतर प्राण्यांतील उंच प्रतीचें सौंदर्य आंत घालून पूर्णतेस नेण्याची चाल ग्रीक लोकांत होती, अशी जी विंकलह्यामची टीका ती फारच सूक्ष्म व अगदीं न्याय्य होती. ही गोष्ट विशेषेंकरून ज्युपितर संबंधानें दिसते. ज्युपितरच्या मुखचर्येचा वरील भाग उघड उघड सिंहाच्या चेहऱ्यावरून घेतलेला आहे, व हें साम्य वाटेल अशा रीतीनेंच बहुतेक नेहमीं केसांची रचना केलेली असते. ज्युपितराचे असे पुष्कळ मुखवास आहेत कीं, जर त्याचें कपाळ व केस शिवाय-करून बाकी सर्व भाग झांकून टाकिले तर पाहणारे या सिंहाच्या मूर्ती आहेत असें म्हणतील. तसेंच हर्क्युलिस-मध्यें बैलाचा कांहीं झोंक दिसतो; आणि पानच्या (मुरलीधर नरछाग) मूर्तींत मानवी चर्या करतां येईल तितकी पशूच्या चर्येसमान नेहमीं केलेली असते; यांत तालबद्धतेचा जितका उद्देश तितका सौंदर्याचा नसतो हें मात्र खरें. मा. रूल रोशेनें टीका केल्याप्रमाणें ही ग्रीक शिल्पाची एक मोठी विशिष्ट खूण आहे. इजिप्तचे लोक मनुष्याचे धडावर मनुष्येतर प्राण्याचें डोकें बसवीत व ही विषमता कमी करण्याचा बिलकूल प्रयत्न करीत नसत. पण ग्रीक लोकांचा त्यांच्या सर्व जोडपुतळ्यांत मुख्य उद्देश सौंदर्याचा असल्यामुळें जोडलेल्या दोन्ही स्वरूपांचें असें संमिश्रण व एकीकरण करीत कीं, तो पुतळा समप्रमाण निर्मित व्हावा. असे पुतळे म्हणजे पानचा, सेंतारचा, व हर्माफ्रोदाईतचा (मुरलीधर नरछागाचा, नरतुरंगाचा व स्त्रीपुंसांचा) हे होत.

५५ लेसिंगचे 'लाओकून' पहा. इफिजेनियाच्या यज्ञांत तिमांथिसनें योजिलेली आगामेम्नानच्या तोंडावर बुरखा घालण्याची सुप्रसिद्ध युक्ती, जिचें प्लिनीनें इतक्या काव्यचातुर्यानें विवरण केलें आहे, ती याच हेतूनें योजिली असावी असें लेसिंग म्हणतो.

५६ कुरूपतेचें वैखानसी ध्येय कलेंत उच्चपदारूढ होतें. तो काल सहाव्या व दहाव्या शतकांच्या दरम्यानचा. या काळांतले पुष्कळ

रंगीबेरंगी नक्षीचे नमुने फारच किळसवाणे दिसतात; व कारागिरांच्या आंगीं तरबेजपणाचा अभाव होता, एवढ्यानें त्याचा उलगडा होत नाहीं. आत्यंतिक वैखानस वृत्तींतल्या कृशतेचें हें अनुकरण होय, हें उघड दिसतें. वितेतचें ('एतूदिस सुर लिस्तायर द लार्त.') खं. १ पृ २६८ व २७९ पहा. माध्ययौगिक कलेसंबंधी जे ग्रंथ आजपर्यंत शिल्लक राहिले आहेत, त्यांशिवाय ड्युरांदस नांवाच्या तेराव्या शतकांतल्या एका धर्मोपाध्यक्षानें लिहिलेल्या 'राशनेल दिविनोरम आफिसिओरम' नांवाच्या ग्रंथांत विपुल पुरावा आहे. मठपति पास्कलनें आपल्या 'इन्स्टित्यूशन्स दलार्त क्रेतिएन' मध्यें माध्ययौगिक कलेसंबंधीं विपुल बिलक्षण माहिती गोळा केली आहे. पण सर्वांहून जास्त दिद्रोनच्या 'आयकानोग्राफी क्रेतिएन' मध्यें आहे.

६० या चळवळीचा फार चातुर्यानें दिलेला संक्षिप्त इतिहास रूल रोशेच्या 'कूर दार्किआलजी'त व विंकलमनच्या 'हिस्तरी आफ आर्त' मध्यें पहा.

६१ विंकलमनप्रमाणें 'आक्रानिताय' नांवाचे संगमरवरी दगडाचे मुखवटे बसविलेले लाकडी पुतळे फिदियसच्या काळापर्यंत चालू होते. लाकडी पुतळ्यांना रंग देण्याच्या चालीवरून संगमरवरी दगडाच्या व पंचरशी धातूच्या पुतळ्यांस रंग देण्याची चाल पडली. ग्रीक शिल्पावर एक विद्वत्तापूर्ण निबंध लिहिणाऱ्या हीनला वाटतें कीं दिदालसचे पुतळे लांकडी होते, ('आप्यूस्क्यूला आकादेमिका' खं. ५ पृ. ३३९) पण याबद्दल बराच संशय आहे. पाउझानियस म्हणतो कीं, आपण एक दिदालसचा म्हणून म्हटलेला पुतळा पाहिला व व तो दगडी होता.

६२. प्लिनीच्या मतें मिरोन नांवाचा शिल्पज्ञ प्रथम प्राचीन नमुने सोडून देऊं लागला ('हिस्त. नेशि' ३४-१९)

६४. मा. रिओनें या प्रभावाचा 'ख्रिस्ती कलेंतलें काव्य' नांवाच्या पुस्तकांत नीट उल्लेख केला आहे. तथापि ग्रीक वास्तु--कारागिरांच्या वतीनें अपवाद केला पाहिजे. धर्मसंस्थेंतली पहिली मोठी इमारत जें रावेन्ना येथलें सन्त वितेलचें देऊळ त्याच्याबद्दल इताली देश या ग्रीक कारागिरांचा ऋणी आहे. या इमारतीची नक्कल शार्लमेननें एलाशापेल येथें करविली. व यानंतरच्या काळांतील वेनिस येथील सन्त मार्कचें देऊळ व आणखी कित्येक सुंदर इमारती ग्रीक कारागिरांच्याच हातच्या आहेत. मूर्तिभंजक छळामुळें झालेली ग्रीक कारागिरांची हद्दपारी व वेनिस, पिसा व जिनोआ येथील व्यापारी संबंध यामुळें मध्ययुगांत इतालीवर एकसारखी ग्रीसची छाप बसत होती. बायझन्शिया

येथील कारागिरांच्या रंगीबेरंगी नक्षी कामांतल्या चतुराइचा मागेंच उल्लेख आला आहे.

६५ याचे जस्तिन मार्तिर, तर्तूलियन व अलेक्झांद्रियाचा सिरिल हे मुख्य पुरस्कर्ते होते. यांपैकीं शेवटचा जो सिरिल त्यानें असें विधान केलें कीं क्रिस्त हा 'मानवपुत्रांत अत्यंत कुरूप' होता. या कल्पनेनें झेलससला खिस्तीधर्माविरुद्ध एक प्रमाण मिळालें. जेरोम, आंब्रोज, क्रिसास्तोम व जान दमासिन यांनीं विरुद्ध बाजू घेतली. ही विरुद्ध बाजू उचलून धरण्याकरितां एक विलक्षण सुंदर पत्र बनावट तयार केलें. हें पत्र हीरोदच्या पूर्वींचा ज्यूडियांतील प्रतिराजपुरुष जो लेंतूलस त्यानें रोमच्या शासनसभेला लिहिलें होतें, असें बनविलें होतें. या पत्रांत पुढील मजकूर आहे. 'यावेळीं एक मनुष्य पुढें आला; तो अद्याप जिवंत आहे. त्याचें सामर्थ्य विलक्षण आहे. त्याचें नांव जिजस क्राइस्त. लोक म्हणतात कीं तो समर्थ धर्मसंस्थापक आहे; परंतु त्याचे शिष्य त्याला ईश्वराचा पुत्र म्हणतात. तो मेलेल्यास जिवंत करतो व लोकांचे वाटतील ते रोग बरे करतो. त्याचा बांधा उंच आहे. त्याची मुद्रा गोड व तेजस्वी आहे. त्यामुळें जो जो त्याच्याकडे पाहील त्याला त्याला त्याच्या बद्दल वचक व प्रेम वाटेल. त्याच्या डोक्याचे केसांचा रंग मदिरेसारखा आहे. ते कानांपर्यंत सडक असून चमकत नाहींत. कानांपासून खांद्यापर्यंत ते कुरळे व तकतकीत आहेत; व खांद्यांपासून खालीं पाठीवर लोळत असतात व त्याचे नाजारिनींच्या परिपाठाप्रमाणें दोन भाग केलेले असतात. त्याचें कपाळ स्वच्छ व सपाट आहे. त्याच्या तोंडावर डाग नाहीं, पण सौम्य तेज आहे. त्याची मुद्रा निर्भिड व मोकळी दिसते. त्याचें नाक सुंदर व जेवणी सुरेख आहे. त्याची दाढी जंगी व आंकडीबाज आहे व तिचा रंग डोक्याच्या केसांच्या रंगासारखा आहे. त्याचे डोळे निळे व पाणीदार आहेत. जेव्हां तो दटावतो व निर्भर्त्सना करितो तेव्हां त्याचें भय वाटतें. जेव्हां तो शिकवतो तेव्हां सौम्य व प्रेमळ दिसतो. त्याची भव्य व मोहक मुद्रा पाहणारास थक्क करिते' कोणी त्याला कधींही हसतांना पाहिलें नाहीं; पण सर्वांनीं खिन्नच पाहिलें असेल. त्याची चालण्याची ढब सरळ व उमट आहे. त्याचे हात गोंडस व सरळ आहेत. त्याचे बाहू फारच सुबक आहेत. त्याचें भाषण मित पण भारदस्त व गंभीर असतें. तो मानवपुत्रांत अत्यंत देखणा होय.' चवथ्या शतकांतील चित्रांवरून बहुतेक पुराणवस्तुसंशोधकांनीं असें अनुमान बांधलें आहे कीं, त्यावेळीं हें वर्णन अस्तित्वांत असावें. तथापि संत जान दमासीन व नाइसच्या दुसऱ्या धर्म-

परिषदेंतले विवादक यांच्या या बाबतींतील स्तब्धतेवरून धर्मोपाध्यक्ष मिल्मन प्रतिपादितो कीं, हें वर्णन फार नंतर जन्मास आलें. या सर्व विषयासंबंधानें एमेरिक देविद 'हिस्त. दलापीनूतूर' पृ. २४ ते २६ व दिद्रोन 'आयकानोग्राफी क्रेतिएन पृ. २५१ते २७६ पहा. आणखी येथें असें सांगतां येईल कीं इ. स. १६४९ इतक्या अलीकडे या विषयावर 'द फार्मा-क्रिस्ती' नांवाचें एक विलक्षण पुस्तक वावासोर नांवाच्या जेसूतनें पारिस येथें प्रसिद्ध केलें आहे त्यावरून हा वादविवाद त्या वेळेपर्यंत चालू होता, असें दिसतें.

६६ स्पेनचा पाथरवट हेरेदेज व चित्रकार जानेस यांविषयीं अशीच गोष्ट सांगतात. फोर्देचें 'स्पेन' खं. २ पृ. २७१.

६७ या (कान्स्तान्तिनोपल येथें 'ट्रुन्त्रिलो' नांवानें नांवाजलेल्या) धर्मपरिषदेचा उद्देश सार्वत्रिक झालेली रूपकभक्ति नष्ट करण्याचा होता; व कलेच्या एका विद्वान् इतिहासकारास वाटतें कीं, या सभेनें प्रथमतः शूलरोपणाचें चित्र तयार केलें. (एमेरिक देविद 'हिस्त दलापिनूतूर' पृ. ५९ ते ६१) या सभेचा हा हुकुमनामा पुढें एक तर रद्द झाला असावा अगर तिकडे काणाडोळा झाला असावा; कारण लवकरच कोंकरें दिसूं लागलीं; मात्र कलेंत यांना पूर्वीच्या इतकें वर्चस्व मिळालें नाहीं. पण कान्स्ताईननंतर सुमार तीन शतकेंपर्यंत इतर प्रत्येक सांकेतिक चिन्हाला त्यानें मागें टाकलें. (रियो 'आर्त क्रेतिएन' प्रस्ता. पृ. ४९) सियांपिनी म्हणतो कीं ही निषिद्ध करणारी धर्मपरिषद तोतयी होती, तिला धर्माचार्यांचें आज्ञापत्र नव्हतें. ('वेतेरा मान्युमेन्ता' खं. १ पृ. २८ मारांगोनी 'इस्तोरिया देला कापेला द सांक्ता सांक्टोरम' पृ. १५९ सुद्धां पहा.)

६८ पहिल्यांदां शहरांत राहण्याची त्यांना सक्त मनाई केली होती. धर्मोपाध्यायांना डोईवर नाचूं देणाऱ्या थिओदोसिअसनें सुद्धां कायदा करून असा हुकूम फर्माविला कीं वैखानस व्रताचें अवलंबन करणाऱ्या सर्वांनीं अफाट अरण्यांत व निर्जनप्रदेशांत जाऊन राहिलें पाहिजे. ('कोद. थिओदो.' खं. १६ प्र. ३ क. १) तथापि हा कायदा पुढें त्यानें रद्द केला.

६९ म्हणजे शूळाच्या चित्राची सुरवात झाल्यामुळें; (जुन्या बासिलिका वास्तुकलापद्धतींत ही पहिली सुधारणा.) आणि पुष्कळ देवळांत सरळ रेघेपासून त्याचें टोंक जरा वांकवण्याची सुरवात झाल्यामुळें; या सुधारणेंमुळें 'जिजसनें मस्तक अवनत केलें व आत्म्याचा त्याग केला,' या वाक्यांत वर्णिलेलें चित्र तयार झालें.

७० जर्मन चित्रें पुष्कळदां असभ्य असतात पण विषयी नसतात. स्विफ्त व द्रान जुआनमध्यें जी तफावत

तीच सगळी यांत आहे. वांदर व्हेर्फनें केलेला नग्न पुतळा म्हणजे केवळ हस्तिदंतच असतो. तोच तितियननें अगर कोरेजियोनें केलेला जणूं काय सजीव प्राणीच असतो. स्पेनच्या कलेनें धार्मिकता व भारदस्तपणा राखण्याचा बराच प्रयत्न केला, व पिसाच्या वेर्गोझोप्रमाणें सभोंवतालीं माजलेल्या दुष्कर्मांच्या गोंधळांत डोळ्यांवर हात घेऊन आपली शुद्धता कायम राखण्याचा तिनें प्रयत्न केला. तथापि कधीं कधीं बोटांमधल्या फटींतून ती हळूच पहात असे, अशी शंका येते. इतालियन कलेचें हें स्वरूप स्तेंधलच्या लेखांत अतिशय हुबेहुब वठलें आहे. ( एच. बेल. ).

७१ अर्वाचीन टीकाकार म्हणतात त्या प्रमाणें फिदियसपासून प्राक्झितेलीसपर्यंत ग्रीक कलेचें गमन अधोमुख होतें, हें कदाचित् खरें असेल. इतकें खात्रीनें खरें कीं तें गमन पुंस्त्व व तत्सदृश सौंदर्य यांच्या प्रदर्शनाकडून स्त्रैणसौंदर्य यांच्या प्रदर्शनाकडे झालें. मिनेर्वा ( महासेन ) धिष्ठिततेपासून मदनाधिष्ठिततेपर्यंत अथवा जर्मन टीकाकार म्हणतात त्याप्रमाणें डोरिक अंगाच्या प्रधानतेपर्यंत हें गमन झालें. पण हा ऱ्हास जर खरोखर झाला असला तर तो वर दर्शविलेल्या स्थितीशीं विसंवादी नाहीं, असें वाटतें. कारण दृश्यकर्म व रंगकर्म यांचा प्रत्येकाचा विशिष्ट उत्कर्ष आहे; कारागिराला येणारें यश त्यानें हातीं घेतलेल्या कलेंतील विशिष्ट तत्त्वांचें रहस्य ओळखण्यावर पुष्कळ अंशीं अवलंबून असतें. आतां पुंस्त्व व तत्सदृश सौंदर्य प्रदर्शित करण्याच्या सामर्थ्यांत कूर्चिकाकर्माहून टंककर्म जितकें उत्तम ठरेल तितकेंच कुर्चिकाकर्म टंककर्माहून हृदयार्द्रता व स्त्रैण सौंदर्य प्रकट करण्याच्या शैलींत उत्तम ठरेल. ग्रीक टंकानें वाटेल ती धडपड केली तरी तितियनच्या कूर्चिकेच्या कामोत्तेजक सामर्थ्यांत त्याच्यानें बरोबरी होणार नाहीं; व उलट पक्षीं ओज व जोम उत्पन्न करण्याकरितां टंकाशीं कूर्चिकेनें स्पर्धा करणें अगदीं फुकट. या शेवटच्या विधानाला जर कांहीं अपवाद असेल तर तो एकच व म्हणून त्यानें सामान्य विधानांची सिद्धताच होते. हा अपवाद अर्वाचीन उत्कृष्ट टंककर्मा जो मायकेल आंजेलो तो होय. जगांतील अत्यंत टंककर्मसदृश भित्तिगत चित्रांच्या रूपानें तो अपवाद दिसत आहे; तथापि आणखी सांगितलें पाहिजे कीं, भूप्रदेश-कूर्चिकाकर्म कोणत्याही प्रकारें कामोत्पादित नव्हे; व रस्किननें तें ख्रिस्ती धर्माचें फळ असा अभियोग केला आहे व त्यांत बराच अर्थ आहे.

७२ व्हेनिसच्या विस्मयकारक दुष्कर्मांसंबंधीं व तीं बंद करण्यासाठीं फौजदारी अधिकाऱ्यांच्या आवेशयुक्त पण निष्फळ प्रयत्नांविषयीं सॉबातियरमध्यें ('हिस्त.दला लेजिस्लेसिया सुरल

केमिस पब्लिक्स ') पुष्कळ विलक्षण पुरावा आहे तो पहा.

७३ तैलरंगकला पंधराव्या शतकाच्या आरंभीं वान एयिक यानें काढली असें सामान्यपणें म्हणतात. हा इ. स. १४४०त मेला. पण वान एयिकचा हा अभियोग अविवाद्य नाहीं. आन्तोनेलो नांवाच्या एका सिसिलीच्या रंगकर्म्यानें ती इ. स. १४५२च्या सुमारास इतालींत सुरू केली. ( रियो 'आर्त क्रेतिएन' खं. १ पृ. ३५४ )

७४ पहिल्या पहिल्या काळीं पौरस्त्य नेपथ्याचा कलेवर निराळाच परिणाम झाला. तेराव्या शतकांत जेव्हां ह्याचा लोंढा फ्रान्सांत शिरला तेव्हां पुष्कळ फ्रेंच देवळांतील खिडक्यांतील अलंकार व विशेषतः त्यांतील वरच्या बाजूचें जाळीदार अगर उठावाचें काम पौरस्त्य नमुन्यावरुन बिनचूक उतरलेलें असे, असें म्हणतात. थेवेनतटचा 'चित्रित काचपटा ' वरील विलक्षण निबंध पहा. आणखी असेंही सांगतां येईल कीं हिंदुस्थानांतील नेपथ्य आगस्तसच्या काळीं युरोपांत आल्यामुळें रोमच्या कलेवर त्याचा जोरदार परिणाम झाला होता; व आरबी थोड्या उठावाची नक्षीची पद्धत त्यामुळें सुरू झाली व ( वित्रुवियसच्या तक्रारीप्रमाणें ) ग्रीक नमुन्याच्या अभ्यासावरुन कारागिरांचें मन उडालें. मध्ययुगांत व्हेनिस व फ्लारेन्स या शहरांची रंगाऱ्यांबद्दल ख्याति होती.

७५ प्राक्झितेलिसनें विनसला विषयलांपट्याचें शील निश्चितपणें दिलें असें म्हणतात; यापूर्वीं विनसचें चित्र निरनिराळ्या सौंदर्याच्या दरम्यान हेलकावे खात होतें; व अपालोच्या स्त्रैण नमुन्याचा विशिष्ट कर्ता सुद्धां प्राक्झितेलिसच म्हणतात. जिला विलासी सौंदर्याचा त्या वेळचा मोठा नमुना मानीत व जिला देहान्त शिक्षा झाली असून केवळ अंगीं सन्नद्ध असलेल्या अत्यंत विलोभनीय सौंदर्यामुळेंच माफी मिळाली ती फ्राइन या प्राक्झितेलिसची रखेली होती. कलेंत पुंस्त्रीचें चित्र सुरू करून त्याच्या समकालीन पालिक्लीसनें विषयलांपट्याला फार जोर आणला. रियो 'आर्त क्रेतिएन' प्रस्ता. पृ. १७-२१ आणि ओ. म्यूलर 'म्यान्युएल दार्किआलजि.' खं. १ पृ. १५६ ते १५७ पहा.

७६ या बाबतींत स्वतः कान्स्तन्ताइननें उदाहरण घालून दिलें. युझेबियसचा आदरणीय शेरा पहा. 'वितोकान्स्तं' खं. ३ क. ५,६.

७७ जेव्हां ही प्रेरणा इतालींत बंद पडली होती तेव्हां ती कांहीं अंशीं फ्रेंच लोकांच्या शोधांनीं ग्रीस मध्यें चालू राहिली होती. ग्रीसमध्यें फ्रेंच वकलात सुमारें इ. स. १६३० त तयार झाली होती. वितेत,

'एत्यूदस सुर दिस्तायर दलार्त, खं. १ पृ. ९४ पहा.

७९ ज्याप्रमाणें कूर्चिकाकर्मांत त्यासारखाच टंककर्मांत धर्मशास्त्रीय विषयांचें नैतिक स्वरूप उकलण्यांत विलक्षण दुर्दैवी होता. त्याचा मोझेस 'सर्व जगांतला अत्यंत सौम्य-दर्शन मनुष्य' नसून खात्रीनें त्याच्या साफ उलट आहे; कारण तो 'अर्धवट बक्षिसाकरितां लढणारा मल्ल' व अर्धवट ज्युपितर तोनान्स आहे. गोलियाथचा पराभव केल्यावरचा डाविदाचा त्यानें केलेला भव्य पुतळा (एखाद्या लिलिपुतियनचा भव्य पुतळा करणेंही इतकेंच शहाणपणाचें होईल) आकिलिस म्हणून पूर्ण शोभेल.

८१ फ्रा बार्तोलोमिओ म्हणून ज्यास्त प्रसिद्ध असलेला.

८२ अदर्सन 'वाणिज्येतिहास' खं. २ पृ. ३६ सतांच्या कृत्यांतून घेतलेल्या उताऱ्यांचा एक फार विलक्षण संग्रह आहे. त्यांत घंटांचा उल्लेख भलत्याच ठिकाणीं आहे. (पण या उताऱ्यांपैकीं एकही सतराव्या शतकाच्या आरंभापूर्वींचा दिसत नाहीं.) (सारेझ 'दफायदे' खं. २ भा. १६) कोलनचें 'आक्ता सांक्तोरम हिबर्निर' खं. १ पृ. १४९ सुद्धां पहा.

८३ अंदर्सन खं. १ पृ. ३० हायद्रालिकान नांवाचें जलवाद्य पूर्वी माहित असे, तसेंच एक वायुवाद्य असे तें कोणी सध्याच्या वाद्याचें पूर्वरूप मानितात; पण तें व स्काच ब्याग पाईप' बहुतेक एकच होतें. ज्यूलियननें आपल्या एका सुभाषितांत त्याची स्तुती करून आपली अरसिकता दाखविली आहे, असें म्हणण्यास वाईट वाटतें. (बर्नेचें 'वादनेतिहास' खं. २ पृ. ६५ ते ६७ पहा.) कुझेमेकरचे मध्ययुगांतील वाद्यें यावर बरेच विलक्षण निबंध आहेत, ते (दिद्रोननें संपादन केलेल्या) 'आनेल्स आर्किआलाजिक्स' खं. ४ मध्यें आहेत. ते त्या नंतर निराळेच प्रसिद्ध केलेले आहेत असें वाटतें.

८४ अठराव्या शतकांतल्या इमारतींत व टीकांत दोहोंत फार ध्यानांत ठेवण्यासारखें उदाहरण आपल्यापाशीं आहे. (उदाहृणार्थ) जर एखाद्या कल्पक लेखकानें यार्क मिनिस्तरविषयीं बोलतांना स्मालेटप्रमाणें आम्हांस खात्रीपूर्वक सांगितलें कीं 'एकाद्या जुन्या देवळाच्या बाह्य दर्शनीभागानें औचित्याची व आनुपूर्वतेची कल्पना असलेल्या मनुष्यास खिन्नता वाटल्यावांचून राहणार नाहीं'; दर्ह्याम काथिद्रलचें वर्णन 'एक अवाढव्य खेदजनक डोल्हारा' असें जर त्यानें केलें; आणि जर त्यानें कबूल केलें कीं शिखर असलेल्या देवळानें आपल्या मनांत शूळावर चढवलेल्या मनुष्याची कल्पना विशेषेंकरून येते, (हम्फ्रे क्लिंकर पहा) तर त्याला

आपण आतां काय म्हणणार? याप्रमाणेंच हचेसन आपल्या सौंदर्यमीमांसेवरील इंग्रजी भाषेंतील एका समर्थ ग्रंथांत पाल्हाळानें लिहून असें सिद्ध करण्याची खटपट करितो कीं रोमच्या वास्तु कलेहून गाथिक वास्तुकला प्राचीनांस पसंत असे, हें सौंदर्याच्या सार्वत्रिक जाणिवेशीं विसंवादी नसून केवळ ऐतिहासिक अनुबंधनांनीं झालेलें विचलन आहे. 'शिक्षणामुळें एखाद्या असावध गाथ मनुष्याला असें वाटेल कीं, वास्तुकलेंत आपले देशबांधव निष्णात झाले आहेत; व त्यांचे शत्रू जे रोमन त्यांच्याविषयीं वाटत असलेल्या तिटकाऱ्यानें रोमनांच्या प्रत्यक्ष इमारतींबद्दलही भलत्या कल्पना त्याचे मनांत आल्या असतील व त्या इमारती जमीनदोस्त करावयाला ते तयार झाले असतील. ('सौंदर्याची मीमांसा' कलम ६ व ७) अठराव्या शतकांतील सारस्वताशीं बराच परिचय असलेल्या प्रत्येकाला त्यांतील सर्वत्र भरून राहिलेल्या गाथांच्या वास्तुपद्धतीबद्दलच्या तिटकाऱ्यानें आश्चर्य वाटलें असलें पाहिजे असें वाटतें; पण मठपति कार्ब्लेतचें 'लार्कितेक्चर दू मोयेन एज ज्यूजि पारले एकीवेन्स द युक्स दर्निएर्स सिएकल्स' नांवाचें फारच विलक्षण पुस्तक थोड्यावर्षांमागें प्रसिद्ध होईपर्यंत त्या तिटकाऱ्याची मजल कोठपर्यंत गेली आहे, हें पूर्णपणें कधींही दिसलें नव्हतें. या विद्वान् प्राचीनवस्तुसंशोधकानें असें दाखविलें आहे कीं, सतराव्या शतकाच्या उत्तरार्धांत व सगळ्या अठराव्या शतकांत असा एकही लेखक क्वचित्च सांपडेल कीं त्याचीं धार्मिकमतें कशीं कां असतात त्यानें गाथांच्या वास्तुपद्धतीविषयीं केवळ रहस्याभिज्ञतेवांचूनच नव्हे तर अत्यंत कमालीच्या व अनिर्बंध तिरस्कारानें उल्लेख केला नाहीं. या लेखकांच्या यादींत इतरांबरोबर फ्नेलान, बोस्वे, मोलियेर, फल्यूरी, रोलीन, मांतेस्कु लाब्रुयेर, हेल्वेशिअस, रूसो, मॅग्ज व वाल्तेर यांचीं नांवें आहेत. गाथेनें या ओघाला पहिल्यांदा विरोध केला पण पुढें त्यानेंही त्या ओघापुढें मान वांकविली. मिलन क्याथेड्रल थट्टेचा विशिष्ट विषय असे. गाथांची वास्तुकलापद्धत म्हणजे पांचव्या शतकांतील गाथांची असें बहुतेक सर्वत्र मानीत. व बिशप वार्बर्टनें असें सुचविलें कीं स्वदेशांच्या अरण्यांतील झाडांच्या फांद्यांनीं झालेल्या तोरणांवरून त्यांना ही कला सुचली असावी. तथापि बारिप्रभृति कित्येकांना गाथांची पद्धत म्हणजे ग्रीकांच्या पद्धतीचें अपुरतें अनुकरण असें वाटे. या संबंधीं झालेल्या टिकेंत कांहीं फारच विलक्षण होती. उदाहरणार्थ ड्युपुईचें म्हणणें असे कीं देवळावरील राशीचक्र मिथ्र (मित्र?) पूजेचा अवशेष होय. दुसऱ्या एका टीकाकाराला इसिसच्या अंड्यांत व

कटाहाकृती वितानाच्या कर्णाच्या आकारांत संबंध आढळला. मान्त-लुईसान्त नामक तिसऱ्या एकानें पारिसच्या नातर देमच्या देवळाच्या दर्शनीभागावरील टंककर्मांचा उलगडा स्पर्शमणिशास्त्रानें केला आहे. पिता ईश्वर ज्यानें प्रत्येक हातांत एक देवदूत घेतलेला आहे, असा परमेश्वर तो जीवितरूप पारा व अदाह्य गंधक अस्तित्वांत आणित आहे. उडणारा ड्रागन ( मगर ) राक्षस आपलीच शेपटी खात आहे असा काढलेला आहे तो तो स्पर्शमणि; तो स्थिर व वायुपरिणामी पदार्थांचा केलेला आहे. त्यांपैकीं स्थिर पदार्थ वायुपरिणामी पदार्थाला खाऊन टाकतो. इ. इ. ( युग्हर्स दसंत फाय ' खं. ३ पृ. २४५।२४६ ). गाथपद्धतीचें पुनरुज्जीवन मुख्यतः या शतकांतल्या सनातनपंथाच्या पुनरुज्जीवनामुळें झालें आहे.

८५ हें खरें कीं ग्रीक संप्रदाय नेहेमीं इतालींत रेंगाळत राहिले होते. व इतर देशांतल्याप्रमाणें इतालींत निवळ गाथपद्धतीचा वरपगडा कधींही झाला नाहीं. पिसाच्या निकोलसनें योजना केलेल्या तेथील संत मेरिया देला स्पिनाच्या लहानशा देवळाचा बाह्यभाग निव्वळ इतालीयन पद्धतीचा बहुतकरून उत्तम नमुना आहे; कारण मिलन देवळाची रचना जर्मन कारागिरांनीं केली असें म्हणतात. परंतु गाथपद्धतीवर इतालीनें विजय मिळविला याचा उलगडा वरील गोष्टीनें होतो; पण तेणेंकरून गाथ पद्धतीचा पगडा जगभर होता ही गोष्ट टळत नाहीं.

८७ खरोखर प्रशियांत व जर्मनीच्या इतर कांहीं भागांत काल्विन व ल्यूथर यांच्या अनुयायाची एकवाक्यता झाली. एकवाक्यतेकडचा कल सतराव्या शतकाच्या मध्यापासून जोराचा दिसूं लागला व बिशप ब्रेदेलनें तो वाढवण्याचा जोरानें यत्न केला. ( त्याच्या अशरनें केलेल्या चारित्रांतील कांहीं मजेच्या गोष्टी पहा. ) काल्विन व ल्यूथर यांच्या अनुयायांच्या नुकत्याच झालेल्या एकवाक्यतेवर व कार्यकारणाभिज्ञतेशीं तिच्या संबंधावर वाचण्यासारखे कांहीं शेरे आमंद सेंतिसच्या ' हिस्त द्रू राशनालिझम एन आलेमान्ने ' यांत आहेत.

८८ कोणत्याही पक्षांच्या नांवांत फरक होण्यापेक्षां त्यांच्या मनांत इतका लवकर फरक होतो कीं, निरनिराळ्या काळीं त्यांच्या बळाची बिनचुक कल्पना होणें सोपें काम नाहीं. तिसरा वुइल्यम गादीवर आल्यानंतर लवकरच लोचर्च पंथांतील धर्माधिकाऱ्यांची संख्या एकंदर धर्मोपाध्यायांच्या संख्येच्या दशांश क्वचित्च होती, असें मेकाले ( ' इंग्लंदचा इतिहास ' खं. ३ पृ. ७४१ ) वरून कळतें. सध्यांच्या वादविवादांत त्यांचें बळ

किती या विषयींचे विलक्षण आंकडे 'धर्मपंथा' वरील कानिबियरच्या निबंधांत पहा. या चळवळींत आर-ल्यास हार आली असें त्यांच्या पुढाऱ्यानें आपल्या 'आंग्लिकन अडचणींत' स्पष्टपणें कबूल केलें आहे.

---

# प्रकरण तिसरें.

## भाग २ रा.

१ बोसोवरचें 'हिस्त दू मानिशीइझम' खं. १ पृ. २८६ ते २८८ पहा. बार्बेराक यानें आपल्या 'मारेल दे पेरेस' भाग ७ मध्यें रूपकाच्या आवडीनें ओरिजेनला अर्थनिर्णयांत चमत्कारिक अद्वातद्वा अर्थ करावा लागला असल्याचीं अनेक उदाहरणें गोळा केलीं आहेत. या विषयाशीं संबंध असलेल्या पुष्कळ विलक्षण प्राचीन लेखांपैकीं एक नुकताच 'स्पिसिलेजियम सोलेस्मेन्स' (कुरांते द्वाम. जे. बी. पित्रा) यांत छापला आहे. दुसऱ्या शतकाच्या आरंभीं जो सार्दिसचा धर्मोपाध्यक्ष होता म्हणतात, त्या संत मेलितोचा 'क्लेविस' म्हणून तो लेख होय. यांत शेंकडों पशु, पक्षी, वनस्पती व खनिज द्रव्यांची यादी दिलेली आहे. हे पदार्थ व प्राणी ख्रिस्तीधर्मांतील सद्गुण, मतें व माणसें यांचीं सांकेतिक चिन्हें होतीं.

एका अर्वाचीन हायचर्च पंथांतल्या गृहस्थानें लिहिलें आहे कीं 'शुद्धिसंस्काराच्या गूढाचा ठसा जर खोल उमटेल तर कोणीही भूस्तरशास्त्रज्ञ या भूगोलाच्या घटनेसंबंधीं मूर्खपणाच्या घोटाळ्यांत पडणार नाहीं. शुद्धिसंस्कारातलें गूढ असें आहे कीं, जल व अग्नि यांच्या योगानें नवा प्राणी बनतो. मग पृथ्वी केवळ अग्नीनें अगर केवळ जलानें झाली हा घोटाळा राहिलाच नाहीं. अग्निप्रमेय अगर जलप्रमेय प्रतिपादित बसण्याची कांहीं गरज नाहीं; अग्नि व जल यांच्या संयोगानें तें कार्य झालें. हें सत्य त्याला सहज उमगलें असतें. सेवेल '*ख्रिश्चन मोरेल्स*' पृ. ३२३.

२ धर्मसंस्थेचा व ख्रिस्ताचा संबंध 'हाडाला हाड व मांसाला मांस' असा निकट जुळला असल्यामुळें म्हणजे धर्मसंस्थेंत ख्रिस्ताच्या आंगचें पावित्र्य व सामर्थ्य असल्यामुळें ('द जेनेसि कान्ता म्यानिशिओस खं. १११ व ११३)

३ खं. ५ भाग २५ जीविताच्या मुख्य दोन आंगांमधील संयोग दाखविणाऱ्या या लग्नाच्या कल्पनेचा परिपोष स्वीदनबोर्गनें 'वैवाहिक

प्रीति ' या पुस्तकांत फारच सुंदर रीतीनें केला आहे.

४ छातीनें गर्व समजतो व पोटानें विषयीपणा समजतो.

७ ग्रीक धर्मपित्यांच्या बेनिदिक्ताईन आवृत्तींत हा ग्रंथ खं. २ मध्यें प्रसिद्ध झाला आहे. बेनिदिक्ताईन ल्यातीन भाषांतरांतून हा उतारा घेतला आहे. मांतफोकाननें आपल्या प्रस्तावनेंत विरुद्धपादांचें अस्तित्व नाहीं म्हणणाऱ्या धर्मपित्यांच्या वचनांची एक लांबलचक माळकाच दिली आहे.

१० हिब्रू ८।१,२;९।१,२,११,१२,२४ च्या मनसोक्त अर्थावरून कास्मसनें हा तर्क बांधिला.

१३ हेंच उदार मत बासिल व आंब्रोझ यांनीं दर्शविलें होतें.

१४ हीं मतें कोपर्निकस संबंधीं वादविवादांत थोड्या लोकांच्या मनांत उदय पावूं लागलीं. या वादविवादाच्या इतिहासाचा तपास करूं इच्छिणाऱ्यांना ग्यालिलियो व धर्मसंस्था यांमधील प्रश्नावर लिहिणाऱ्या एका तत्कालीन लेखकानें गोळा करून खंडन केलेलीं या विषयावरील कांहीं मतें वाचण्यास मौज वाटेल. ( लिबर्तस फ्रोमंदस, 'बेस्ता, सिव्ह आन्ति. आरिस्तार्कि विंदेक्स ') फ्रोमंदसमधून उतारा घेणें पुनः जरूर पडेल. येथें सांगून ठेवणें बरें कीं, तो लूव्हेन येथें धर्मज्ञानपंडित व प्रोफेसर होता; व उल्काशास्त्रावरील एका ग्रंथाचा कर्ता होता. या ग्रंथांत वातावरणांतील पालट म्हणजे आध्यात्मिक हस्तप्रवेशाचे परिणाम या कल्पनेचें बोदिन नुकतेंच मंडन करीत होता. तिचें यानें जोरानें खंडन केलें, आणि धूमकेतुसंबंधीं धर्मभोळेपणाखेरीज इतर भोळसटपणा एकंदरींत त्याच्या आंगीं बिलकुल नव्हता. धूमकेतूच्या भविष्यसूचक प्रवृत्तीविषयीं तो आवेशानें पुरस्कार करी. त्यानें फिएनी नांवाच्या एका धर्मज्ञानपंडिताच्या सहकारित्वानें धूमकेतुसंबंधीं एक पुस्तक लिहिलें. पण तें वाचायला मिळण्याइतकें सुदैव नाहीं. पृथ्वीच्या स्थिरतेचें मंडन करण्यांत हा एक प्रमुख होता व एतद्विषयक धर्मज्ञानाच्या आलोकाविषयीं विलक्षण माहितीनें ह्याचे ग्रंथ भरले आहेत. तो इ. स. १६५३त वारला.

१५ फास्कारिनी नांवाच्या एका कार्मेलाइतानें कोपर्निकसच्या मताच्या मंडनार्थ लिहिलेल्या पुस्तकानें चेतून इ. स. १६१६त पहिल्यांदा निषेध झाला. इंदेक्सच्या कांग्रिगेशनच्या अध्यक्षाचें काम धर्मसंस्थेच्या वतीनें नव्या पुस्तकांच्या सत्यधर्मत्वाबद्दल अधिकारयुक्त वाणीनें मत जाहिर करण्याचें होतें; त्यांनीं एक हुकुमनामा त्यावेळीं काढला. त्यांतील मुख्य भागासाठीं फ्रोमंदसचें ' आंति आरिस्तार्कस, सिव्ह आर्बिस तेरी इम्मोबिलिस. इन को दिकेतम एस. कांग्रिगेशिओनिस एस. आर. इ. कार्दिनल

१६१६ आडवर्सस पिथागोरिको कोपर्निकानोझ एरितम दिफॅदितुर. पृ. १८ पहा.

१६ दुसरा सिल्वेस्तर. पितरच्या गादीवर बसणारा हा पहिलाच फ्रॅंच मनुष्य. ग्यालिकन मतांचा हा प्रख्यात उत्पादक; हा स्वकालीनांतील मोठा समर्थ गणिती व यंत्राभिज्ञ होता म्हणतात. तो इ० स० १००३त मेला. इतर बऱ्याच शोधांप्रमाणें एका प्रकारचें घड्याळ त्यानें शोधून काढलें. रोजर बेकनच्या सारखा यालाही सर्व प्रश्नांचीं उत्तरें देणारा एक पुतळा लाधला होता. लोकांतील दंतकथेप्रमाणें त्याला एक पिशाच प्रसन्न असे. त्यानें याला रीम्स, रावेना व रोम येथील धर्माधिकाऱ्यांच्या एकावर एक बढतीच्या जागांवर चढविलें व यरुशलेम येथें गेल्याविना तूं मरणार नाहींस, असें वचन दिलें होतें. या वचनाचा अर्थ तूं अमर होशील असा गर्वतेनें केला; पण इंग्लंदच्या चवथ्या हेनरीला दिलेल्या वचनाप्रमाणें ती लबाडी ठरली. व संत क्रॉसच्या बासिलिकेंत यरुशलेमच्या देवळांत काम करीत असतां त्याच्यावर मृत्यूचा हल्ला झाला. दंतकथा अशी आहे कीं, खेद पावून त्यानें असा हुकूम केला होता कीं, आपल्या शरीराचे तुकडे तुकडे करून बैलांच्या एका गाडींत घालून ते न्यावे व जेथें ते बैल आपोआप थांबतील तेथें ते तुकडे पुरावे. कारण ईश्वराच्या देवळांत विश्रांति घेण्यास आपण पात्र नाहीं. पण अत्यंत पापी माणसालासुद्धां क्षमा होऊं शकेल हें दाखविण्यासाठीं लातेरन देवळाच्या दरवाजाशींच बैल थांबले. असें म्हणतात कीं, जेव्हां जेव्हां एखाद्या पोपाचार्याचें देहावसान होण्याचा समय येतो, तेव्हां तेव्हां सिल्वेस्तरची समाधी ओली होते व आंत या प्राचीन जादुगाराची हाडें खुळखुळ वाजतात. ( ग्रेगोरोवियस. पोपाचार्यांच्या समाधींविषयीं व वेस्तमिनिस्तरच्या माथ्थ्यू वर्ष ९९८ मधली मूळ हकीकत पहा. )

१८ मानवपतनापासून सूर्य, चंद्र व तारे यांचा सुद्धां प्रकाश कमी पडूं लागला. (संत इसिदोर. द आर्दिन क्रीचुरेरम भा. ५ ) मनुष्याच्या पातकाचा उद्भिज्ज कोटीवर झालेला परिणाम पहावयाचा असेल तर संत आगस्ताइनचें 'द जेनेसी' खं. १ भा. १३ पहा.

१९ फलज्योतिषाच्या मदतीनें धर्माचें तत्त्वविवेचन रचण्याचा चवदाव्या शतकाच्या आरंभीं आबानोच्या पितरनें केलेल्या धिटाईच्या प्रयत्नांचा उल्लेख आगोदरच आला आहे. कार्दननें सुद्धां क्रिस्ताची जन्मपत्रिका तयार करून सांगितलें कीं, ख्रिस्ती धर्माचे जयापजय ताऱ्यांनीं आगाऊच सुचविले होते. वानिनीचा कांहींसा या सारखाच आलोक होता. ( दुरंद 'वाय द वानिनी' पृ. ९३ ते ९९ )

पाम्पोनाझी यानें ताऱ्यांच्या बलाबलानें जादूच्या गोष्टींचा उलगडा करण्याचा प्रयत्न केला. ('वायाग्रफी युनिव्ह. लेख 'पाम्पोनाझी') व बोदिननें सोळाव्या शतकांतल्या अत्यंत नामांकित राजकीय ग्रंथांतच समाजांच्या परिपोषांतील व्यवस्थातत्त्व शोधून काढणें शक्य आहे काय असा प्रश्न काढून फक्त फलज्योतिषानें तें कळेल असें त्यानें प्रतिपादन केलें आहे. (रिपब्लिक खं. ४ भा. २)

२० जसें एक कवि म्हणतो 'वीराचें मरण आकाशांत दर्शविलें जातें, वीर मरतो तेव्हां जगावर अंधार पडतो.'

२१ त्याच्या न्याय्यतेविषयीं कांहीं ही वाटो; तथापि डा. चामर्सनें ही अडचण दूर करण्यास जी युक्ति सुचविली तिच्या अत्युत्कृष्ट सुरेखपणाबद्दल वाद नाहीं. शंभरावी मेंढी चुकून कोणीकडे गेली म्हणून तिला शोधण्यास आपल्या नव्याण्णव मेंढ्या सोडून जाणाऱ्या धनगराच्या कृत्याचा दाखला म्हणजे एका जगानें बंड केलें म्हणून त्याला ताळ्यावर आणण्यास खटपट करण्याच्या परमेश्वराच्या कृत्याचें वर्णनच आहे. जणुं काय हें जग म्हणजे बाकीचीं जीं इमानी राहिलीं त्याहून महत्वाचें होय. असें ही म्हणतां येईल कीं, वस्तूंच्या औचित्याविषयींच्या आमच्या कल्पनांवर फारच अंधश्रद्धा ठेवणें हें धोक्याचें काम होय. याबद्दल संस्मरणीय दाखला स्वतः ज्योतिःशास्त्रांतून मिळतो. प्राचीन ज्योतिःशास्त्री एकमतानें असें प्रतिपादित कीं, स्वःस्थ गोलकांची गती अवश्य वर्तुल व नियमित असावी. कारण ही गती म्हणजे अत्यंत बिनचुक अशी त्यांस वाटे. व केप्लर खंडन करीपर्यंत ह्या कल्पनेच्या चिकाटीनें ज्योतिःशास्त्राच्या प्रगतीला अत्यंत जबरदस्त अडथळा झाला.

२२ या विषयावरील जुन्या मतांच्या स्पष्ट आलोकासाठीं बार्बेराक 'दला नेचर इ सार्त' पहा. बार्बेराकनें एका डच धर्मगुरूबरोबर या विषयावर मोठा कडाक्याचा वादविवाद चालविला होता. निव्वळ नैसर्गिक नियमांनीं नशीब नियमित होत असतें, असें स्पष्टपणें व पद्धतशीरपणें पहिल्यांदाच प्रतिपादणारा लेखक म्हणजे इंग्रज शुद्धमताभिमानी पंथाचा धर्मोपाध्यक्ष गतेकर होय. 'निरनिराळ्या शकुनांचें स्वरूप व उपयोग या विषयीं' या आपल्या पुस्तकांत त्यानें हें प्रतिपादन केलेलें आहे. ह्या पुस्तकाची विचारपद्धति शुद्ध असून चमत्कारिक आहे, व त्यांत विलक्षण माहिती भरलेली आहे.

२३ म्हणूनच 'सोर्तिस' हा शब्द देवांचे जे कौल घेतात त्यांस लाविण्यांत आला. यावरूनच 'सार्तिलेजी' 'सार्सरर्स' हेही शब्द झाले.

२४ भोळसटपणातलें इंगित कायतें हें. प्राचीनांविषयीं लिहितांना द मेस्तर व भूकंपांविषयीं बोलतांना क्रास्मस असेंच म्हणतात.

२५ हा मूळचा संत सायमनचा शेरा होता. पण तो मा. काम्तनें व त्याच्या अनुयायांनीं घेऊन बराच उपयोगांत आणिला होता. लितरचें 'व्हाय द काम्त' हेंच समर्थ पुस्तक पहा.

२७ मारि, 'लिजेंदिस प्युसिस' पृ. १७ व १८. प्राचीन ख्रिस्ती कूर्चिकाकर्मांत व टंककर्मांत देवदूतांचीं चित्रें कधीं कधीं हातांत तारे घेतलेलीं (व विशेषेंकरून बेथ्लेहेमचा तारा घेतलेलीं) काढीत. उदाहरणार्थ पारिसच्या 'नातर दॅम' च्या देवळांतील संगीत पीठासभोंवतीं अल्पउठावाचीं फार विलक्षण चित्रें आहेत तीं पहा.

२८ धूमकेतूच्या भविष्यसूचकतेच्या प्रमाणाचें पूर्ण विधान आढळलें तें राक्सोच्या 'द कामेतिस' मध्यें. ग्रंथकार स्पेनमधला वैद्य होता.

३० आणि धर्मनीति यांमधील संबंधावर एक आदरणीय प्रबंध रचण्यास आपला मुख्य विषय सोडून एकदम वळला. 'क्रितिकल दिक्शनरी' या पुस्तकाबद्दल अगदीं शक्य तितका आदर आहे. कारण एका विद्वानानें एकट्यानेंच लिहून ठेविलेलें व विद्वत्तेचें आणि चिकित्सक कुशाग्र बुद्धीचें विशाल स्मारक म्हणून सदा गणलेलें असें हें पुस्तक आहे. तथापि बेलची अपूर्व कल्पक बुद्धि 'कान्त्रेन्स ले देन्त्रेर' या पुस्तकांत, कांहीं 'पेन्सेइस दायवार्सिस सुर ल कामेतिस' मध्यें व त्याच्या दोनतीन 'नूवेलिस लेतर्स' मध्यें स्वच्छ प्रकाशलेली दिसते.

३१ बेकननें जितका नेहमीं दाखविला आहे तितका कांहीं त्याच्या काळीं शास्त्रविषयक आज्ञानांधकार पसरलेला नव्हता हें खास. उलट तो काळ म्हणजे कोपर्निकस, ग्यालिलियो, तायकोब्राहे केप्ल व गिल्बर्त यांचा काळ हें लक्षांत आलें म्हणजे या काळाहून श्रेष्ठतर काळ कोणता हें सांगणें मुष्कील आहे. युरोपच्या शास्त्रीय पुनरुज्जीवनाचें बरेंचसें श्रेय या थोर माणसांकडे देणें योग्य आहे. व बेकननें केलेल्या वस्तुनिदर्शनाबद्दल प्रांजलपणें चूक पदरांत घेऊन माफीची विनंती करितां येईल ती इतकीच कीं, तो इतका बुद्धिमान् होता तरीही या थोर लोकांच्या नव्या शोधांतलें वर्म समजण्यास अगदीं असमर्थ होता. तत्कालीन अत्यंत उंच प्रतीचा नवीन शोध जी कोपर्निकसाची पद्धती तिची त्यानें अखेरपर्यंत अवधीरणा केली. चुंबकाविषयींचे गिलबर्तचे महत्त्वाचे शोध तो मानीना इतकेंच नव्हे तर त्यांबद्दल तोऱ्यानें तिटकारा दाखवी. बेकनच्या प्रभावाचा अंदाज कर-

तांना आपण ध्यानांत ठेविलें पाहिजे, तें हें कीं फ्रान्सच्या राज्यक्रांतीच्या जरा अगोदर इंग्लंद व फ्रान्स यांच्या बुद्धीचा संयोग होईपर्यंत इंग्लंदच्या बाहेर बेकनचा प्रभाव खास जबर झाला नव्हता, तेव्हां मात्र खरोखर त्याच्या तत्त्वज्ञानाचा ब्रिटिश बेटांखेरीज युरोपच्या देशांत मोठा पथ्यकर परिणाम झाला. पण तेथपर्यंत युरोप कांहीं झोंपेंत नव्हतें. खुद्द ग्रेटब्रिटनांत शास्त्र व वाङ्मय यावर त्वीद नदी ओलांडून जाण्याइतका दृश्य बेकनचा प्रभाव झाला नाहीं, व जेथें तो सर्वेश्वर बनला होता त्या इंग्लंदांत तर त्याच्या अनुयायांपासून दोन थोर गृहस्थ साफ अलिप्त राहिले होते. न्यूतनची सर्व पद्धत व मानसिक प्रकृती बेकनच्या अगदीं उलट होती वत्याचें चरित्र लिहिणारा सर देविद ब्र्यूस्तर जोरानें प्रतिपादतो त्याप्रमाणें आपल्या पूर्वीच्या गृहस्थाचें ( बेकनचें ) न्यूतननें कांहीं तरी घेतलें होतें असें ( बेकनच्या बुद्धिवैभवाचा थोडा तरी फायदा न्यूतनला मिळाला होता असें ) मानण्यास अल्पही कारण नाहीं व ज्याला बेकननें वंध्यत्वाचा डाग लाविला आहे व ज्याला त्यानें ईश्वरास अर्पण केलेल्या फलवती न होणाऱ्या कुमारिकेची उपमा दिली आहे, त्या अंतिम कारणाच्या मतामुळेंच हार्वेनें आपला मोठा शोध लाविला.

३४ संभाव्यतेवरून प्रमाणें काढून तीं पद्धतशीरपणें मांडण्यास इतर कोणाहून जास्त कारणीभूत झालेला व धर्मज्ञानाहून भौतिक शास्त्राचा दर्जा कमी केल्याचा आरोप ज्याच्यावर खात्रीनें येणार नाहीं तो लाप्लेस ग्रहांच्या गतींवरून काढलेलें निश्चित पूर्व संकल्पाला अनुकूल असें प्रमाण बहुतेक थक्क करून सोडणाऱ्या शब्दांनीं सांगतो. ‘ सिस्तम दु मांदे ’ खं. ५ भा. ६.

३७ ला पीरेरचीं या मुद्यावरील कांहीं प्रमाणें विलक्षणपणें दूरान्वित आहेत. उदाहरणार्थ, तो विचारतो कीं, जर चोरांची भीति नव्हती तर एबेल मेंढ्या राखण्याची खटपट कां करी व आपल्या भावाला केननें ज्या शस्त्रानें मारलें तें आणलें कोठून ? आयरिश पार्लमेंताच्या एका ड्राव्स नांवाच्या विक्षिप्त सभासदानें ‘ भविष्याचें थोडेसें परीक्षण’ या चमत्कारिक पुस्तकांत गेल्या शतकाच्या अखेरीस आदमपासून उत्पन्न न झालेल्या एका मनुष्य ज्ञातीच्या अस्तित्वाचें प्रतिपादन फार आवेशानें चालविलें होतें. नीग्रो गुलामांच्या गुलामगिरीबद्दल मंडन करण्याच्या इराद्यानें या मंत्राचा अमेरिकेंतही पुरस्कार झाला. ड्राव्सचें असें मत होतें कीं ईव्हच्या सैतानाशीं झालेल्या सलोख्यामुळें उत्पन्न झालेलीही एक जात होती.

३९ लाक आपल्या 'शासनपद्धतीवरील पुस्तकांत पेगनी देवतांच्या मूळाविषयींचें यहेमिरसचें प्रमेय पूर्णपणें मान्य करितो.

४०. चुकीचीं स्वरचिन्हें घालून जुन्या करारांतील कांहीं भाग बनावट केल्याचा संशय किंवा संभव या मुद्यावर बऱ्याच पाल्हाळानें प्रथमतः ज्यानें लिहिलें तो स्पिनोझाच असें माहित आहे. या विषयाविषयीं पुढें थोड्या वर्षांनीं दब्लीन विश्वविद्यालयाच्या दा. वालनें 'हिब्रू प्रक्षेप' यावरील एका पुस्तकांत चांगलें विवेचन केलें आहे. स्वतःच्या मनांत सुचलेल्या गोष्टीला ईश्वरी प्रेरणा म्हणावयाची यहुदी लोकांस सवय होती अशाबद्दल स्पिनोझाचें कांहीं शेरे अजून वाचण्यालायक आहेत; पण या अपवादांशिवायकरून 'त्राक्तस थिओलोजिको–पोलितिकस' पुस्तकाचें महत्त्व मुख्यत्वेंकरून ऐतिहासिक आहे असें वाटतें.

४१ लेसींगच्या मतावर आमंद सेंतिसच्या 'हिस्त. क्रितिक दू राशनालिझम एन आलेमाग्ने' पुस्तकांतील स्पष्ट विधान पहा. स्त्रासनें जीजसचें चरित्र लिहिलें आहे, त्याच्या प्रस्तावनेंत जर्मनींतील कार्यकारणवादाच्या प्रगतीचें स्वच्छ ऐतिह्य दिलेलें आहे व त्याठिकाणीं अद्भुत चमत्कारांच्या मुद्यावर विवेचन त्यानें केलें आहे. त्याच्या पद्धतीवरून जर्मन टीका लेखांत विवेचकशक्ति या शब्दाचा किती उदार अर्थ केलेला आहे तें स्पष्टपणें दिसतें.

## प्रकरण ३ रें.

### भाग ३ रा.

२ हीं करमणुकीचीं साधनें इंग्लंदमध्यें किती नानातऱ्हांचीं होतीं व त्यांची मजल कोठपर्यंत गेली होती तें पूर्णपणें पहावयाचें असेल तर स्त्रुकातचें 'इंग्रजलोकांचे खेळ व करमणुकी' हें पुस्तक पहा. सर थामस मोर याला कोंबड्यापुढें डाळींब फेंकण्यांतल्या आपल्या कौशल्याची घमेंड मारण्याची संवय असे. व क्यानिंगनें शेवटपर्यंत बैल झुंजविण्याच्या खेळाचें मोठ्या आवेशानें मंडन केलें. व विंडह्यामनेंही फारच अत्यंत कळकळीनें तसेंच मंडन केलें.

३ ड्याप्रमाणें मेकालनें प्राकृतिक विरोधाभासानें म्हटलें आहे कीं "जर विशुद्ध मताभिमान्यांनीं बैलांचीं झुंजें बंद केलीं असतील तर तीं बैलांना त्यामुळें दुःख होतें म्हणून नव्हे तर प्रेक्षकांना त्यामुळें आनंद होतो म्हणून." स्पेनमधल्या बैलांच्या

झुंजाविरुद्ध पोपाचार्यांनीं बरेच दिवस निष्फळ झगडा चालू ठेविला होता, ही गोष्ट धार्मिक इतिहासांतलें एक विलक्षण उपाख्यान होय. पण त्या झगड्याचें मूळ कारण कशांत होतें ? तर त्या झुंजांत बरींच माणसें मेलीं होतीं. यांत एक जुना धर्मज्ञानपंडित सांगतो कीं, कोंचा शहरांत सात मनुष्यांना मारणाऱ्या एका बैलाला अत्यंत मान मिळाला आणि लोकांना इतका आनंद झाला कीं त्या बैलाच्या या करणीचें लागलेंच चित्र करून सार्वजनिक चौकांत ठेविलें (कान्सिना, 'द स्पेक्ताक्युलिस' पृ. २८३) स्पेनमधील बैलांच्या झुंजांचा निषेध करणाऱ्या लेखकांनीं विशेषेंकरून इतालींतील बैलझुंजाशीं त्याची तुलना केलेली आहे. इतालींतील झुंजांत बैलाला रशीनें बांधीत म्हणून तें झुंज निरुपद्रवी असे. (कित्ता पृ. २८५) इ. स. १५६७ त पांचव्या पायसनें बैलझुंजांची मनाई केली; व तें करणाऱ्यांना बहिष्काराची शिक्षा सांगितली. इ. स. १५७५ त तेराव्या ग्रेगरीनें ही मनाई रद्द केली; मात्र धर्मसंस्थेंतील लोकांनीं बैलझुंजें पाहूं नयेत व उत्सवदिवशीं तीं होऊं नयेत एवढी मनाई कायम ठेविली. कांहीं स्पानीश धर्मज्ञानपंडितांनीं या विषयावर पुष्कळ चळवळ केल्यामुळें पांचव्या सिक्स्तसनें पहिला हुकूम पुनः कायम केला. सरते शेवटीं इ. स. १५९६ त आठव्या क्लेमंतनें स्पेनच्या राजानें कानउघाडणी केल्यामुळें व स्पेनच्या लोकांच्या असंतोषामुळें मनावर घेऊन स्पेनमधील सर्व मनाई दूर केली व फक्त सावधगिरी बाळगावी असा उपदेश केला. तथापि मठवाशांना मनाई कायमच ठेविली होती. सांप्रत बैलझुंजें बहुधा उत्सवदिवशीं होत असतात; व अत्यंत धार्मिक उत्सवांचा तो एक भागच होऊन बसला आहे. विशेषतः कुमारीप्रीत्यर्थ होणाऱ्या उत्सवांत तीं असतात. या चमत्कारिक विषयावरील पूर्ण तपशीलवार हकीकत थेसारोच्या 'फीनिस एक्लिझियास्तिसिस' मध्यें व कौन्सिनाच्या 'द स्पेक्तात्कुलिस'मध्यें आहे. बैलझुंजांविरुद्ध स्पेनमध्यें जे लोक होते त्यांत नामांकित जेसूत मेरिआना होता. हें फारच विलक्षण आहे कीं सर्व बैलझुंजांत अत्यंत रक्तस्राव झाला तो रोमच्या कोलिझियममध्यें इ. स. १३३३ त झालेल्या झुंजांत होय. तेव्हां रोमचे बडे लोक रंगणांत उतरले. व १८ आसामी मारले गेले; (लिब्रारियो 'इकानोमिया पोलितिका' खं. १ पृ. १९६–१९७) पण यावेळीं पोपाचार्य अविग्नान येथें होता. मिचेलेतनें अशी नोंद केली आहे कीं, रोममध्यें, रोमाग्नांत व स्पोलेतो येथें बैलझुंज पुष्कळ काळ अत्यंत लोकप्रिय झालेलें असतां नेपल्स येथें स्पानिश लोकांचें बराच

काळ पावेतों वर्चस्व असूनही तेथें बैलझुंजाची डाळ शिजली नाहीं.

५ लामी व लांजि यांनीं दाखविल्याप्रमाणें ही दंतकथा बहुधा नांवांच्या घोटाळ्यामुळें निघाली. 'संत लूकनें काढलेलीं चित्रें' यांचा मुख्य कर्ता अकराव्या शतकांतील लूका नांवाचा फ्लारेन्स येथील एक मठवासी होता, असें मानण्यास बरेंच कारण आहे. तथापि तीं सर्व चित्रें त्याच्या हातचीं नाहींत, अगर अगदीं त्याच काळचीं नाहींत. मात्र तीं सर्व एकाच नमुन्यावरून रेखलेलीं आहेत. इतरांचें म्हणणें असें आहे कीं, तीं बायझन्शियांतील चित्रें असून, इतालींत त्यांचा प्रवेश शूलयुद्धांच्या व मूर्तिभंजकांच्या वेळीं झाला.

६. विशेषेंकरून फ्रान्सांत या मुद्यावर झालेली छळणूक भयंकर होती. उदाहरणार्थ, बोंदिन सांगतो कीं, इ. स. १५३९ त आंजर्सच्या फौजदारी न्यायाधीशांनीं जे शुक्रवारीं मांस खाल्ल्याची शाबिदी होऊन अनुताप व्यक्त करीत नसत त्यांना जिवंत जाळलें व अनुताप व्यक्त करीत त्यांना फांशीं दिलें. ('दे मोन, द सार्सियर्स' पृ. २१६) इंग्लंदांत या विषयाचा चमत्कारिक दृष्टीनें विचार झाला. कांहीं अंशीं धर्मपित्यांवर आंग्लिकन पंथाच्या मतांची बिडी घट्ट बसली असल्यामुळें व कांहीं अंशीं इंग्लंद देश समुद्रवेष्टित असल्यामुळें तेथें उपासांना उत्तेजन मिळे इतकेंच नव्हें, तर उपास करावे असा कडक नियम होता; व त्यामुळें इ. स. १५४८ आणि राजपरावर्तन यांच्या दरम्यान कायद्यांची व जाहिरनाम्यांची एक लांब माळकाच लागली होती; आणि त्यांत बुधवारीं व शुक्रवारीं आणि सर्व लेन्टभर निर्मांस उपास करावा अशी ताकीद दिलेली असे. 'योग्यपणें व ईश्वरस्मरणपूर्वक मांसवर्जन केल्यामुळें मनाची शुद्धता होण्यास व आपलें मन व वृत्ती जिंकण्यास साधन मिळतें याचा विचार केला असतां व विशेषतः समुद्रांत मासे पकडण्याचा धंदा करणारे मच्छीमार व इतर लोक यांना त्यामुळें काम मिळतें याचा विचार केला असतां मांस खाऊं नये हें चांगलें असें त्या कायद्यांत व जाहिरनाम्यांत मांसवर्जनाचें कारण दाखविलेलें असे. हालामच्या 'सनदी शासन पद्धतीचा इतिहास' खं. १ यांत या कायद्यांची यादी आहे ती पहावी. याच कारणविविधतेनें उपास करावे असें एका पद्यांतही म्हटलें आहे. अनीतिपेक्षां प्रमादांचा विशेष कडकपणें व त्यांतल्यात्यांत निव्वळ तात्त्विक प्रमादांचा अत्यंत कडकपणें निषेध करण्याच्या धर्मज्ञानपंडितांच्या प्रवृत्तीवर बेलच्या 'पेन्सइस दायव्हार्सिस' १९९ यांत कांहीं चांगली टीका आहे.

११ ही गोष्ट कित्येक आरंभींच्या इंग्रज धर्माधिकाऱ्यांनीं नमूद केली होती ( ब्यारो व बर्कले हे त्यांपैकीं दोन होत ) परंतु वार्बर्तन यानें त्या गोष्टीस विशेष ठळकपणा आणिला. या बार्बर्तननें आपल्या ' दिवाईन लिगेशन'मध्यें लेविटिकल धर्माच्या दैवी मुळाला अनुकूल असें एक विलक्षण प्रमाण त्यांत पुढील जगाबद्दल आविष्करण नाहीं या गोष्टीवर रचलें, हें सुप्रसिद्धच आहे. धर्माध्यक्ष व्हेतले यानें बार्बर्तन याच्या या गोष्टीविषयींच्या आलोकाचा बळकटपणें स्वीकार केला व ' ख्रिस्ती धर्माच्या विशेषांवर निबंध ' या पुस्तकांत ज्युदेझमच्या तर नव्हे, पण ख्रिस्तीधर्माच्या दैवी मूळाच्या प्रस्थापनेकडे त्याचा फार चातुर्यानें उपयोग केला. कारण ख्रिस्ती धर्मात पुढील जगाबद्दल आविष्करण आहे. हे दोन्ही लेखक प्रतिपादितात कीं जाबमधील सुप्रसिद्ध वचनाचा पुनरुत्थानाशीं संबंध नाहीं. चब, वाल्तेर, ग्यास व आणखी कित्येक लेखकांनीं निगळ्याच आलोकानें या विषयाचें विवेचन केलें आहे. या मताच्या यहूदी लोकांतील वाढीसंबंधानें माकेच्या ' हिब्रू व ग्रीक यांचा धार्मिक परिपोष ' पुस्तकांत खं. २ पृ. २८६, २९७ पहा.

१५ म्यानिशीइपंथी लोकांची अशी श्रद्धा असे म्हणतात कीं मृतांचे आत्मे सूर्यप्रकाशांत शुद्ध होतात व नंतर ते चंद्रांतून देवदूतांकडे नेले जातात व या ओझ्याच्या कमी ज्यास्ती प्रमाणानें चंद्राला कळा लागतात. ( बोसोबर ' हिस्त. क्रितिक दू मानिशिईझम ' खंड १ पृ. २४३। २४४ )

१६ दालियस ' द पिनिस एत सातिसाफाक्शिओनिबस ' खंड ४ क. ९. कांहीं प्राचिनांचा असा समज असे कीं अग्नी हा अदृश्य जगताचा दरवाजा होय. हिरोदोतस ( खं ५ क ९२ ) पेरियांदर नामक कोरिंथच्या राजाची गोष्ट सांगतात कीं या राजानें आपल्या स्त्रीच्या पिशाचाला आवाहन केलें तेव्हां तिनें त्याच्या प्रश्नास जबाब देण्याचें नाकारिलें व अशी सबब सांगितली कीं आपण थंडीनें कुडकुडलों आहों; कारण जरी थडग्यांत कपडे ठेविलेले होते तरी ते जाळलें नसल्यामुळें आपणाला त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं.

१७ स्कोती हें पहिल्यांदा आयरिश लोकाचें नांव होतें. पुढें तें स्कातलंदाच्या लोकांनीं घेऊन आपलेंसें केलें. एरिजेनाचा अर्थ एरिनमध्यें जन्मलेले. एरिन हें आयर्लंदाचें विशिष्ट नाम होय. वेस्तमिनिस्तरच्या ग्याथ्यूंत स्कोतस एरिजिनाचा मौजेचा उल्लेख आहे.

१८ मा गिझो यानें आपला ' मानवी सुधारणेचा इतिहास ' यांत पहिल्या अर्थानें त्याचा आदर केला

आहे; व मा. संत रेनी तेलांदियरनें आपल्या समर्थ व विद्वत्तप्रचुर स्कोतसवरील ग्रंथांत दुसऱ्या अर्थानें त्याचा आदर केला आहे.

१९ आलेक्झांद्री या लेखकाच्या मतें स्कोतसला प्रत्यक्ष यातना सैतानासाठीं आहेत हें मान्य असे; पण त्या मनुष्यासाठीं नाहींत असें तो म्हणे.

२० यांपैकीं, पुष्कळ देखाव्यांचा तपशील पूर्ण जोमानें स्विदनमध्यें दिलेला आहे; व फ्लान्सीच्या ' दिक्शिआनेर इन्फर्नेल.' क. एन्फरमध्येंही आहे. दशपती मिल्सन यानें ' लातिन ख्रिस्ती धर्माचा इतिहास ' या पुस्तकांत आपल्या नित्याच्या न्यायी व आवेशी परिपाठानें (नामांकित संत ग्रेगरीच्या वेळेपासून सुरू झालीशी दिसणाऱ्या) नरकाच्या तपशीलवार चित्रांच्या या हांवेचा उल्लेख केला आहे.

२४ पुढच्या प्रकरणांत याविषयीं विपुल पुरावा मिळेल. सध्या इतकें सांगितलें कीं पुरे कीं पाखंड्यांना जाळण्यासाठीं मंदाग्नीचा उपयोग करण्याचा पुष्कळ प्रांतांत परिपाठ पडला होता. ' स्कालिजेराना ' ( जोसेफ स्कालिजेरच्या संभाषणाची त्याच्याच घरीं राहणाऱ्या त्याच्या एका जिवलग मित्रानें केलेली नोंद. ) नांवाच्या विलक्षण पुस्तकांत ग्रेनीनमधल्या या देहान्त शासनापैकीं, एकाचें भयंकर वर्णन आहे. ( कलम. ' हेरितिसि. ' आणखी कल. ' सार्सिएर्स ' , व कझिनचें ' वानिनीच्या देहान्त शिक्षेची हकीकत ' पहा ).

२५ स्वामीद्रोह व पाखंड या दोन्ही प्रकारच्या खटल्यांत; पण पाखंडाचे खटले फारच सार्वत्रिक होते. या विषयीं एका जुन्या प्रमाणभूत ग्रंथकारानें असेंच म्हटलें आहे. ( सारेज द पाज ' प्राक्सिस इक्लेझियास्तिका एत सीक्युलारिस ' पृ. १५८.)

२६ माध्ययौगिक यातनांतील विलक्षण चतुराई व धर्माधिकाऱ्यांनीं केलेल्या त्यांच्या निस्ताराची मजल या गोष्टी व्हिहलेजिलनें यातनांवरील एका कलमांत चांगल्या दाखविल्या आहेत. ' हाक्राइक्स ' मध्यें ' इ मोयेन एज एत ला रेनाझेन्स ' खं. ३ या विषयावरील मूळ ग्रंथ असंख्य आहेत व ते वाचतांना गोडी लागते; पण ती गोडी खेदकारक असते. कदाचित् मार्सिडियस ( बोलोना येथील कायदेपंडित ) चा ग्रंथ 'त्राक्ततस द क्वेश्चिआनिबस ' परिपूर्ण असावा. कैद्याला बिल्कुल झोंप घेऊं द्यावयाची नाहीं, हा यातनेचा प्रकार आपण शोधून काढला अशी मार्सिलियस घमेंड मारी. या यातनेचा उपयोग धर्माचार्यांच्या संस्थानांत विशेषेंकरून होई ( कार्तेरिया ' प्राक्सिस इन्तरोगान्दोरम रिओरम ' पृ. १९८ ). या ग्रंथांखेरीज यातनांच्या स्वरूपाची पूर्ण हकिगत सिमान्कासच्या ' द काथोलिसिस

इन्स्तित्युशिआनिबस ' मध्यें इमेरिकसच्या ' दि रेक्तोरियम इन्किझितोरम ' मध्यें व आणखी इतर वरील ग्रंथांत उल्लेख असलेल्या पुष्कळ ग्रंथांत दिली आहे.

२७ मेरी राणीच्या कारकीर्दीत प्रतिरोधीपंथाच्या लोकांच्या खटल्यांत सनातनपंथाच्या लोकांनीं त्यांचा किती उपयोग केला या विषयीं स्त्रा.नचें ' इंग्रजांच्या रितिभाती ' यांतलें खं. ३ पृ. ४६ पहा. तसेंच सनातन पंथाच्या धर्मोपाध्यायांच्या खटल्यांत प्रतिरोधी पंथाच्या लोकांनीं त्यांचा किती उपयोग केला हें हालामच्या सनदशीर शासनपद्धतीच्या इतिहासांत खं. १ पृ. १५९ पहा. व 'वृत्तंशी उपाध्यायाला पत्रें ' यांत मिलनरनें गोळा केलेला पुरावा पहा. सनातन पंथाच्या उपाध्यायांना यातना भोगावयास लावावें असें ग्रिन्दल व कोक्स या धर्मोपाध्यक्षांनीं सुचविलें. फूदचा ' इतिहास ' खं. ७ पृ. ४१८, ४१९. बारिंग्तनचें ' कायद्याविषयीं ' पृ. ८०, ४४०, ४४१ सुद्धां पहा.

२८ फ्रान्समध्यें इ. स. १७८० इतक्या लवकर यातना देण्याचा एक प्रकार मोडून टाकला. व राज्यक्रांतीच्या पक्षाला सवलत म्हणून ही सुधारणा केली होती. तथापि राज्यक्रांतीचा प्रत्यक्ष जय होईपर्यंत यातना देण्याचे सगळे प्रकार बंद झाले नाहींत आणि लोकपक्षाच्या धुरिणांनीं प्रथमच केलेल्या गोष्टींपैकीं, यातनांची बंदी ही एक होय. ( लाइस ल्यूरचें ' सुरले पिनिस ' पहा. ) मान्तेनच्या निबंधाखेरीज शारनच्या ' सागेसे ' मध्यें, बलच्या ' कान्त्रेन्स हेदेन्येर ' मध्यें व बाल्तेरच्या ( उदाहरणार्थ ' फिला. दिक्श. ' तील कलम ' यातना ' पहा. ) व तत्कालीनांच्या लेखांत पुष्कळ ठिकाणीं यातना देण्याच्या चालीचा निषेध केला आहे.

२९ बकलचा ' इतिहास ' खं. २ पृ. १४० टीप. लुइ व्हाइव्हस या नांवाचा कांहींसा प्रसिद्ध स्पेनमधला तत्वज्ञ होता. त्यानें संत आगस्ताईनाच्या लेखांवर स्पष्टीकरणार्थ टीका लिहिलेली आहे. तींत त्यानें सोळाव्या शतकाच्या पूर्वार्धी इतक्या लवकर यातनांविरुद्ध तक्रार केली आहे. यातनांच्या चालीबद्दलच्या याच्या मतांचा सिमान्कास नांवाच्या धर्मोपाध्यक्षानें ' द क्याथालिसिस इन्स्तित्यूशिआनिबस आद प्रिकावेंदस एत एक्स्तरपांदस हीरेसेस नांवाच्या फार चमत्कारिक पुस्तकांत मोठ्या आवेशानें निषेध केला आहे, या पुस्तकाविषयीं पुढें उल्लेख करावा लागेल. सिमान्कास या चालीचें फार जोरानें धर्मज्ञानपंडितांचे आधार घेऊन मंडन करितो व पाखंड्यांचा समाचार घेतांना पाखंडन्यायाधिशांनीं योजिलेल्या निरनिराळया यातना. प्रकारांचें तो फारच हुबेहूब वर्णन करितो. ( पृ. २९७ ते ३०९ ) या

भयानक विषयासंबंधानें लारेन्तचा 'पाखंडन्यायासनाचा इतिहास' ही पहा. सिमान्कासनें अशी नोंद केली आहे कीं त्याच्या कालीं इतर देशांत आरोपांचा छळ जाहिरपणें करीत पण स्पेनमध्यें तो गुप्तपणें करीत..

३१ याला कदाचित् एक अपवाद आहे सामाजिक कराराच्या मतावर बेकेरियानें आपल्या बऱ्याच विवेचनाचा पाया रचला. तथापि हा पालट होण्याला हें वादप्रमाण बरेंचसें कारणीभूत झालें असेलसें वाटत नाहीं.

३२ यातना देण्याची चाल अनर्थकर आहे, असें संत आगस्ताइनला फार स्पष्टपणें वाटलें. व त्यानें आपल्या नित्याच्या मित पण जोरदार भाषेंत या चालीच्या विरुद्ध मत नमूद केलें ही गोष्ट संस्मरणीय आहे. ('द. सिव्ह दिइ' खं. १९ भा. ६) पण शेवटीं ती चाल अवश्यक होय असें त्यानें म्हटलें.

३३ धर्माधिकाऱ्यांच्या वजनानें तयार झालेल्या सर्व दंडनपद्धतीचा रोंख शासननियमावली व नैतिक नियमावली यांचा परिघ सारखा करण्याकडे व शिक्षांना होईल तितकें प्रायश्चित्ताचें स्वरूप आणण्याकडे असतें, हें सुप्रसिद्ध आहे. याचें अर्वाचीन उदाहरण म्हणून कदाचित् स्वीदन फार संस्मरणीय आहे. त्याच्या सध्याच्या स्थितीवरचें लैंगचें हृदयंगम पुस्तक पहा.

३४. 'स्वीदन' मध्यें या प्रमेयाचा परिपोष आहे. ग्रीक लोकांना मृतांचें अत्यंत भय वाटे; व म्हणून पिशाचदर्शनाकडे त्यांची बळकट प्रवणता असे.

३५. सध्याच्या ख्रिस्ती लोकांपैकीं बहुसंख्याकांचें जसें आत्मा अगदीं साधा आहे, त्याला शरीर, आकार, आकृति व परिणाह बिलकुल नाहीं, असें मत झालेलें आहे; तसें त्या (आरंभींच्या धर्मपित्यां) पैकीं एकाचेंही नव्हतें. उलट त्यांत या मर्त्यकक्षेंतील शरीराहून अन्यस्वरूपी व भिन्न प्रकारचें असलें तरी जडात्मक असें कांहीं तरी आहे असें ते सर्व मानीत; तरी पण त्यामध्यें दोन पक्ष आहेत. कारण कांहीं प्रतिपादितात कीं, आत्म्यांत दोन वस्तू आहेत. चैतन्य व त्याला वेष्टणारें फार पातळ सूक्ष्म शरीर. जे प्लेतोचे व प्लेतोपंथी. यांचे अनुयायी आहेत ते (म्हणजे क्लेमेंत, आरिजेन, व त्याचे शिष्य) आत्म्याविषयींसुद्धां प्लेतोचें मत मान्य करितात व म्हणतात कीं, आत्मा अगदीं साधा आहे; पण तो सदा सूक्ष्म देहानें वेष्टित असतो, परंतु इतर प्लेतोच्या मताहून अगदीं अलिप्त असतात व त्यांना प्लेतोचें तत्त्वज्ञान ख्रिस्ती तत्त्वाला बाधक वाटतें. ते प्लेतोच्या आत्म्याविषयींच्या मतांचाही अव्हेर करतात. ते असें प्रतिपादतात कीं, आत्मा म्हणजे अत्यंत सूक्ष्म शरीर होय त्याहून जास्त कांहीं

एक नाहीं. ते प्लेतोपंथीयांवर फार झणझणित टीका करितात, कारण त्यांच्या मतें प्लेतोपंथी लोक आत्मा अत्यंत साधा व जडत्वरहित होय असें शिकवतात. कद्वर्थच्या 'बौद्धिक पद्धति' वरील मोशीमची टीप खं ३ पृ० ३२५ मि. हालाम म्हणतो कीं कदाचित् एकट्या आगस्ताइनला वगळून बाकी सर्व धर्मपित्यांनीं चिच्छक्तीला जडत्व आहे असें शिकविलें होतें. ( वाङ्मयेतिहास )

३६ कद्वर्थ खं.३ पृ. ३१८. त्याच धर्मपित्यानें आत्म्याविषयींच्या आपल्या मतालीं पुष्कळ अंशीं पिशाचदर्शनाचाच आधार घेतला. ( कित्ता पृ. ३३० )

३८ तर्तुलियन मान्तनचा अनुयायी झाल्यावर त्यानें हें पुस्तक लिहिलें हें सांगितलें पाहिजे. पण या गोष्टीचा त्याच्या मानसिक शास्त्रांतल्या मतांशीं कांहीं संबंध होता असें मानण्यास कांहीं कारण नाहीं.

४० मारी 'लिजेंदिस प्युसिस' पृ. १२४. पिसा येथें आर्गमानें काढलेल्या 'मृत्यूचा विजय' या चित्रांत हा मासला आहे. ग्रीक देवळांत पापमुक्तांचे आत्मे चित्रांत कधीं कधीं ईश्वराच्या प्रचंड हातांत धरलेल्या अर्भकाप्रमाणें दाखविलले असत. ( द्रिद्रोनचें 'आयकानोग्राफी पृ. २१६ )

४३ स्वभावसिद्ध उत्पत्तीविषयींच्या प्रचलित कल्पनांचा थोडक्यांत गोषवारा देणारा म्हणून व उंदरांविषयीं एक विलक्षण कल्पना त्यांत आहे म्हणून फार मनोरंजक असा एक उतारा व्हाइव्हसच्या 'द आनिमा' खं १ यांतून वाचण्याजोगा आहे. व्हान हेल्मान्त यानें उंदीर उत्पन्न करण्याला एक औषध दिलें आहे, हें सुप्रसिद्धच आहे. ईश्वराच्या तरतुदीच्या चांगुलपणावर घेतलेल्या निरनिराळ्या आक्षेपांना उत्तर देण्याची आटोकाट खटपट करून संत आगस्ताईननें उंदरांच्या अस्तित्वाचा आक्षेप अभेद्य आहे, भाव असेल तरच केवळ त्याचें आकलन होईल, असें म्हटलें आहे. हें फारच विलक्षण वाटतें ( 'दजेनेसि कान्त्रा म्यानिशिओस' क. १६ ).

४४ उदाहरणार्थ, लिंगभेदाच्या कारणाच्या मोठ्या प्रश्नाचा विचार मेलांक्थाननें अत्यंत खात्रीलायक रीतीनें केला आहे. ( मेलांक्थान 'द आनिमा' पृ. ४२० ) हें प्रमेय अरिस्तातलनें पहिल्यांदा दिलें व नंतर असंख्य लेखकांनीं त्याचा पुनरुल्लेख केला असें वाटतें.

४५ शरीर व आत्मा यांच्या मधल्या भेदाची जी सूक्ष्म सीमा ठरविण्याचा देकार्तनें प्रयत्न केला, तीवरून प्राण्यांविषयींचें त्याचें मत स्पष्ट होतें. या मताबद्दल पुष्कळदा फारच गैरसमज झालेला आहे. तो असें प्रतिपादी कीं, चिच्छक्ती ही आत्म्याची प्रकृति आहे; व जें चित् नव्हतें म्हणजे

इंद्रियज्ञानशक्ति व जीवमानता ही देहाची प्रकृति आहे. पशूंना आत्मा नाहीं. असें म्हणण्यानें पशूंना चिच्छक्ति नाहीं, पण बाकी सर्व आहे, असें त्यानें म्हटलें आहे. हा फरक पूर्ण कडकपणें आतां फारच थोडे प्रतिपादतील. आणि स्ताह्लनें अरिस्तातलचेंच मत म्हणजे आत्म्यांत जीवमानता–सजीवांत निर्जिवाहून जें जें कांहीं जास्त आहे तें तें सर्व–आहे हें मत प्रतिपादून मानसशास्त्रास एका अगदीं निराळ्याच दिशेने प्रेरणा दिली. येणेंप्रमाणें त्यानें पशू वगैरे मनुष्येतर प्राण्यांचें मानसशास्त्र सुरू केलें. व वैद्यक आणि मानसशास्त्र यांचें पुष्कळ अंशीं एकीकरण केलें. या मुद्यावर मेन द बिरनच्या 'नुव्हो रापोर्त्स फिझिक्स एतू मोरोक्स' यांत स्पष्ट विधान आहे. सध्या फ्रान्सांत तिसो, बुलिएर, चार्लस व लेमोईन यांच्या लेखांत स्ताह्लच्या मताचें संस्मरणीय पुनरुज्जीवन झालेलें आहे.

४६ तथापि प्राचीन धर्मपित्यांच्याच कांहींसें मतासारखें पण पापमुक्तांच्या देहांकडे लाविलेलें असें मत नुकतेंच दोन फार कुशाग्रबुद्धिदर्शक अमेरिकन ग्रंथांत पुरस्कृत झालें आहे. हीं पुस्तकें म्हणजे ह्चिकाकचीं 'भूस्तरविद्याधिष्ठित धर्म' व 'ऋतूंवर व्याख्यानें' हीं होत. या ग्रंथकारानें रीखेनबाकच्या 'ओदिक लाईत' वगैरे प्रमेयांचा फायदा घेतला आहे.

४८ नरक आहे कोठें? या प्रश्नाकडे एकदां लोकांचें लक्ष फार वेधलें होतें. या प्रश्नावरील मोठ्या वादविवादांतला हा शेवटचा होय असें वाटतें. सर्व साधारण मत असें होतें कीं, नरक पृथ्वीच्या मध्यांशीं आहे; व या मताला संत थामसनेंही अनुकूलता दाखविली होती. तथापि अपराधदंडनाची चिरकालिकता अमान्य करणाऱ्या व्हिस्तननें तो धूमकेतूच्या पुच्छांत आहे, असें प्रतिपादन केलें. याच्या पुस्तकानें बरीच धूम मचली व त्याचें फ्रेंच भाषेंत भाषांतर झालें. फ्लान्सीवरून कळतें कीं, 'दिक्श. इन्फर्नल' कलम 'एन्फर') कांहीं आद्यधर्मज्ञानपंडित असेंच मानित होते इतकेंच नव्हे,तर सूर्यावर जे डाग दिसतात ते आत्म्यांचे पुंज होत असें म्हणत.

५० या पालटामुळें जरूर झालेल्या निर्गमनांच्या योगानें झालेल्या गुन्ह्यांचें व हालअपेष्टांचें भयोत्पादक वर्णन सर थामस मोरनें आपल्या 'युतोपियां' (यक्षनगरीं) त (पु. १) दिलें आहे. तो एका सुळावर वीस माणसांना चढविल्याचें सांगतो.

५१ बारिंग्तन पृ. ४६१–४६२ मि. फ्रूद यानें हा अंदाज साफ झिडकारला आहे हें आणखी सांगितलें पाहिजे.

५३ बारिंग्तन म्हणतो कीं आपण पुस्तक लिहिलें तेव्हां म्हणजे इ. १७६६ ही स्थिति होती.

५४ तो विचारतो कीं 'इतर राष्ट्रांप्रमाणें आपणही आपल्या गुन्हेगारांस कामें करावयास लावण्यास काम काढलें पाहिजे नव्हे का? व घोर अपराध करणाऱ्यास बंदिवास, बिड्या, कष्टाचें काम कित्येक वर्षें सोसावयास लावणें ही शिक्षा प्रत्यक्ष मरणाच्या शिक्षेहूनही उचित व निराशाजनक होणार नाहीं काय! ('केरिस्त' नं. ५४).

---

## प्रकरण चौथें.

१ धर्मवीरता अगर ज्याला रुधिरशुद्धिसंस्कार म्हणत तो मुख्य होता. पण जेव्हां उदकशुद्धि संस्कार होणें शक्य नसेल तेव्हां अव्यभिचारी भक्तीनें शुद्धिसंस्कार होतो असें 'अनुतापी तस्करा'च्या गोष्टीच्या आधारावर कांहींजण कबूल करीत. अर्थात् हा भक्तिशुद्धिसंस्कार म्हणजे भक्तिभावाचीं विलक्षण कृत्यें करण्यानें होणारा खरा. प्रश्नावलीपाठकसुद्धां जर शुद्धिसंस्कारार्थ सिद्ध होत असतां मेले तर पापमुक्त होतात असें कांहींचें मत असे. लामेत एत फ्रामागो 'डिक्श. दकास द कान्शिएन्स' खं. १ पृ. २०८ पहा.

२ वालचें 'अर्भकशुद्धिसंस्काराचा इतिहास' खं. २ पृ. २११. संत थामस आकिनास यानें पुढें सुचविलें कीं गर्भांत असतां मृत्यु पावलेलें अर्भकसुद्धां पापमुक्त होण्याची शक्यता आहे. आम्हांला देवासंबंधानें जी काय कल्पना आहे तीवरून गर्भांत मेलेल्या अर्भकालासुद्धां तारण्याचे मार्ग त्याच्याजवळ असतील असें वाटतें.

३ वाल खं. १ पृ. २८२–२८३. या वादप्रमाणाला उत्तर देतांना संत आगस्ताइननें स्पष्टपणें विधान केलें आहे कीं मुलाचा किरकिर कांहीं पाप नव्हे व म्हणून चिरकालिक दंडास तें पात्र होत नाहीं, हें पाहून समाधान वाटतें.

७ याचा जन्म सुमारें इ. स. ४६७ त झाला. ('बायाग्र. युनिव्ह.')

८ 'द फायदे' क. ७०. तसेंच संत इसिदोरचीं 'द सेन्तेन्त' खं. ३ क. २२ पहा. संत आवितसनें कान्येनांदांमुळें तेंच मत कवितेंत लिहिलें आहे. त्याचें 'आद फयुसिनम सोरोरेम' पहा. नंतरच्या धर्मपित्यांच्या तशाच आणखी कित्येक मतांसाठीं नातालिस अलेक्झांदरचें 'हिस्तोरिया

एक्लेझियास्तिका' खं. ५, पृ. १३०–१३१ पहा.

९. या चमत्कारिक भोळसट प्रकारांच्या संपूर्ण हकीकतीसाठीं थियर्सच्या 'भोळसटपणाचे प्रकार' यांतील शुद्धिसंस्कार हें प्रकरण पहा. तसेंच 'ल मोयेन ज एज' च्या पहिल्या खंडांतील 'पार लाक्राईक्स' हें मनोवेधक चरित्र वाचा. जन्मास येण्याअगोदर गर्भांत असलेल्या अर्भकाकडे मन इतकें बळकटपणें ओढावें अशा मानसिक स्थितीची सध्या आपल्याला क्वचित्च प्रचीती येते; पण आपण हें लक्षांत बाळगिलें पाहिजे कीं, शुद्धिसंस्कारमताखेरीज धर्मसंस्थेच्या आद्यकाळीं आपणांस अपरिचित अशी प्रचीतीची परंपरा उत्पन्न करण्यास शक्तिमान् असलेल्या दोन विषयांचा फारच ऊहापोह होत असे. कांहीं आद्यकाळचे लेखक व विशेषेंकरून नेस्तरपंथी लेखक यांनीं गर्भांतील अर्भकाला ख्रिस्ताच्या देवत्वाचा समागम केव्हां घडतो याविषयींचा प्रश्न उपस्थित करून, वाद माजविला होता व त्यामुळें सर्व धर्मसंस्थेंत शरीररचनाशास्त्रांतील विलक्षण कल्पनांचा बुजबुजाट झाला होता. याशिवाय ख्रिस्ती धर्मसंस्थेच्या आद्यकाळीं तिला एक झगडा करावा लागला. तो भ्रूणहत्येच्या चालीचा बीमोड करण्याकरितां होय. ही चाल पेगन धर्माच्या लोकांत अत्यंत साधारण झाली होती व हा म्हणजे गुन्हा आहे, असें त्यांस बिलकुल वाटत नव्हतें असें दिसतें. तर्तुलियन ('अपालो' क. ९) व संत बार्नेबसच्या नांवावर विकणाऱ्या पत्राचा लेखक या उभयतांनीं या पेगन चालीचा प्रथम निषेध केला असें दिसतें. शुद्धिसंस्काराचें महत्त्व किती मानलें जात असे, याचें आणखी एक उदाहरण शुद्धिसंस्कारांत कांहीं न्यून राहिलें तर शारीरिक व्याधी जडतात अशी समजूत असे. यावरून मिळतें. निद्राभ्रमिष्टांचा शुद्धिसंस्कार मद्यप्राशनप्रमत्त उपाध्यायानें केलेला असतो अशा समजुतीबद्दल मागें उल्लेख आलाच आहे. परंतु कदाचित् अत्यंत विलक्षण उदाहरण म्हणजे 'संत व्हायतसचा नाच' या रोगाच्या साथीचें होय. ही सांथ नेदरलंदसमध्यें इ. स. १३७५ त उद्भवली होती. त्या वेळीं प्राकृत लोकांची अशी समजूत झाली होती कीं, मुलांचा शुद्धिसंस्कार पत्नीव्रत भंग करणाऱ्या उपाध्यायांकडून झाला असतां हा रोग उद्भवतो व त्यांना इतकी चीड आली होती कीं धर्माधिकाऱ्यांचे जीव मोठ्या शर्थीनें बचावले (हेकरचें 'माध्ययौगिक रोगांच्या सांथी पृ. १५३।१५४).

१० मध्ययुगांत मोठा वाद माजला होता. हा वाद एका यहुद्याच्या शुद्धिसंस्काराविषयीं होता. हा यहूदी रानांत अगदीं मरणोन्मुख

पडला असतां पाणी नव्हतें म्हणून वाळूनें त्याचा शुद्धिसंस्कार करून त्याला ख्रिस्ती धर्मांत घेतलें होतें. कांहीं बायकांनीं आपल्या मुलांचा शुद्धिसंस्कार पाण्याऐवजीं दारूनें केल्याचीं उदाहरणें आहेत. याविषयीं पूर्ण तपशील पाहिजे असेल तर, थियर्सचें 'त्रेत द सुपर्स्ते शिआन्स' पहा.

१२ वाल. नरकांगणाची कल्पना इतकी तिकडे पसरली होती कीं शुद्धिसंस्कार न झालेलीं मुलें चिरकालिक अग्नींत जातात हा जो लूथरचा सिद्धांत तो पाखंडी होय. असें म्हणून त्याचा निषेध करावा कीं नाहीं, या विषयीं त्रायदेन्ताइन धर्मपिते एकेकाळीं साशंक होते, असें सर्पी म्हणतो. तथापि पास्कलनें तें मत फार किळसवाण्या रीतीनें सांगितलेलें आढळतें. ('पेन्सेइस' भाग ३ क. ८) तथापि धर्मसुधारणेच्या काळीं धर्मसंस्थेंत ह्या मताचें जास्त उद्वेगकर स्वरूप बहुतेक स्मृतिशेष होतें याबद्दल शंका नाहीं. बाराव्या शतकांत संत बर्नार्दनें याविषयीं मत दिलें आहे.

१३ वालच्या मतावरून 'मनुष्याला उदकानें व चैतन्यानें जन्म मिळाल्या खेरीज' वगैरे, हें वचन शुद्धिसंस्कारासंबंधी नव्हे, असें म्हणणारा पहिला धर्मज्ञानपंडित काल्विन होय. (खं. २ पृ. २८०). जेरेमी तेलरनें काल्विनच्या मताला जोरानें पुष्टि दिली. "या वचनांत उदक व चैतन्य दोहोंचा अर्थ एकच; व चैतन्यानें आत्म्याला शुद्ध व पवित्र करण्याचा परिणाम हा उदकाचा अर्थ येथें घ्यावयाचा. ख्रिस्त चैतन्यानें व अग्नीनें शुद्धिसंस्कार करतो. या तत्सदृश वचनात ज्याप्रमाणें अर्थ दिसतो त्याप्रमाणेंच वरचा अर्थ आहे." ('भविष्यकथनाची स्वतंत्रता' क. १८).

१४ 'मूळपापाविषयीं' हें जोनाथन एद्वर्ड्सचें पुस्तक पहा. मनुष्याच्या लेखणींतून उतरलेलें अत्यंत चीड आणणारें हे पुस्तक आहे.

१५ पाम्पोनेशिअसच्या कारकीर्दीसाठीं मातरचें 'हिस्तायर द दाक्त्रिन्स मोरेल्स द त्राय दर्निएर्स सिएकल्स' खं १ पृ. ६१ ते ६७ पहा. पाम्पोनेशिअस मांच्युआ येथें इ. स. १४६२ त जन्मला व इ. स. १५२४ त मेला. त्याचा मुख्य ग्रंथ आत्म्याचें अमरत्व हा आहे. दहाव्या लिओनें त्याचें रक्षण केलें. (बायाग्रयुनिव्ह.) वानिनी म्हणे कीं आव्हेरोजचा आत्मा पाम्पोनेशिअसमध्यें शिरला. तत्वविवेचनाच्या व धर्मज्ञानाच्या आलोकस्थानांची अशी फारकत झाल्याचीं कांहीं मनोवेधक उदाहरणें सतराव्या शतकांत मिळतात. उदाहरणार्थ, शारननें तत्वविवेचक या नात्यानें स्वकालीन ग्रंथापैकीं एक अत्यंत संदिग्धवादी ग्रंथ लिहिला. हा शारन उपाध्याय होता व ख्रिस्तीधर्माचे पुरावे या नांवाच्या ग्रंथाचा

कर्ता होता. पास्कलनेंसुद्धां सर्व जन्म धर्ममंडनार्थ अर्पण करून इकडे मान्तेनचें पिऱ्होन-मत आमंदानें स्वीकारलें, तत्त्वविवेचनाचा अभिमान साफ पोकळ आहे, असें अत्यंत जोरदार भाषेंत प्रतिपादिलें, व विवेचकशक्तीनें नीतीच्या सीमान्तरेषाही ठरवितां यणें शक्य नाहीं असें म्हटलें. आव्हांशेसचा नामांकित धर्मोपाध्यक्ष ह्युएत यानें आपल्या मरणोत्तर प्रसिद्ध झालेल्या 'त्रेत फिलासाफिक द ला फायब्लेस द लेस्प्रित ह्यूमेन' ग्रंथांत त्याच आलोकस्थानाचें मंडन केलें आहे. बेलनें आपल्या 'रेस्पान्सेस ओ प्राविन्शियल' मध्यें व ल्लिब्रिझनें आपल्या 'ला फाय एत ला रेझन' मध्यें या विचारपंथाविषयीं बरीच माहिती गोळा केली आहे. पास्कलवरील कझिनचा ग्रंथही पहा. आपल्या सध्याच्या काळीं अशाच प्रकारचीं मतें लामेनेनें आपल्या 'एसे सुर लिन्दिफेरन्स' मध्यें व द्राक्टर न्यूमननें जरा कमी अंशानें प्रतिपादिलीं आहेत. स्वतः ल्यूथरनें प्रतिपादिलें आहे कीं, एखादा सिद्धांत धर्मज्ञानदृष्ट्या बरोबर असेल, पण तोच तत्वविवेचनदृष्टया चुकीचा ठरेल; या मताचा सोरबोन (पारिसच्या विश्वविद्यालयांतील धर्मज्ञान विद्यालय) नें निषेध केला आहे. (आमंद सेंतिस 'हिस्त दु राशिआनालिझम एन आलेमाग्ने' पृ २९).

१७ निआन्दर 'इटवादीमताचा इतिहास' खं. २ पृ. ६५८, ६५९. झ्विंग्लियसच्या या समजुतीवर बोस्वेनें आवेशाचा हल्ला केलेला आहे. कारण ही समजूत त्याला अत्यंत आंगावर कांटे आणणारी वाटली; जर ती खरी मानली तर काय निष्कर्ष निघेल याजबद्दल त्यानें करुणस्वरानें सांगितलें आहे. ('व्हेरिएशिआन्स प्रातेस्तान्तिस' खं. २ क. २१) बोस्वेचे शेरे विशेषेंकरून लक्ष देण्याजोगे आहेत, कारण ख्रिस्ती धर्मांतील सर्व पोटभेदांत मूलपापाचें स्वरूप नरकास पोंचविणारें असें सर्वत्र मानतात असें त्यानें फार स्पष्ट प्रतिपादन केलें आहे. तथापि झ्विंग्लियसचें मत त्यानें जरासें फुगवून सांगितलें आहे. या सुधारकानें मूलपापाला पाप म्हणणें उचित नाहीं, तो केवळ रोग होय असें स्पष्ट विधान केलें आहे. शुद्धिसंस्कारावरील पुस्तकांत त्यानें वापरलेल्या भाषेवरून पेगन अर्भकांना तारण मिळेल असें त्यानें म्हटलें असा तर्क काढण्यांत आला. तथापि इ. स. १५२६ त त्यानें 'मूलपापाविषयीं' म्हणून एक लहानसा ग्रंथ लिहिला व त्यांत त्यानें म्हटलें आहे कीं, आपल्या मागच्या ग्रंथाचा विपर्यास झालेला आहे. 'पाप' हा शब्द अलंकारिक रीतीनें आमच्या मूल रोगाला लाविलेला होता व त्या रोगामुळेंच केवळ ख्रिस्ती मुलांना नरकप्राप्ति

होणार नाहीं, याबद्दल आपल्याला खात्री वाटते. तथापि पेगन धर्मांतील मुलांना नरकप्राप्ति होणार नाहीं याबद्दल आपल्याला तितकी खात्री वाटत नाहीं असें खरोखर आपण प्रतिपादिलें होतें असें तो म्हणतो. तथापि पेगन मुलांलाही नरकप्राप्ति होणार अशाकडेच त्याचा बळकट कल होता.

१८ चिलिंग्वर्थनें या विषयाचें विवेचन आपल्या नित्याच्या वाखाणण्याजोग्या सद्भावानें केलें आहे. 'शुद्धिसंस्कार न झालेल्या मुलांला ईश्वर अन्यायानें वागविणार नाहीं, हें खास; पण त्यांना तो कोणत्या विशिष्ट रीतीनें वागवील याचा आपणाशीं कांहीं संबंध नाहीं व म्हणून त्याविषयीं फारसा विचार करण्याची आपणाला गरज नाहीं'. ('प्रतिरोधिपंथीयांचा धर्म' भा. ७) मूलपापानें आनुवंशिक दोष उत्पन्न होतो व तेणेंकरून अर्भकांना नरकगती मिळते. या दोन्ही मतांचें जेरेमी तेलरनें जोरानें प्रत्याख्यान केलें आहे.

१९ पामरच्या 'धर्मसंस्थेविषयीं' या ग्रंथांतून ( खं. १ पृ. ११ ते १३ ) हे उतारे घेतलेले आहेत. या ठिकाणीं या विषयावर पुष्कळ पुरावा गोळा केलेला आहे. मि. पामर प्रतिपादितो कीं, या विषयासंबंधीं धर्मपित्यांचें एकमत आहे; पण बार्बेराक दाखवितो कीं, निदान दोघे व तेही अगदीं आद्यांपैकीं, म्हणजे जस्तिन मार्तिर व क्लेमेन्स अलेक्झांद्रिनस यांनीं पेगन लोकांचें तारण शक्य मानलें आहे. ('मोरेल द पेरिस' भा. ११, क. ११ ) व यांपैकीं पहिल्यानें म्हणजे जस्तिन मार्तिरनें तर साक्रेतिस व हेराक्लितस ईश्वराच्या दृष्टीनें ख्रिस्ती होते, असें स्पष्ट म्हटलें आहे. तेनेमनचें 'म्यान्युएल द लहिस्तायर द ला फिलासफि' खं. १, पृ. ३१४, ३१५ सुद्धां पहा. तथापि धर्मपित्यांपैकीं बहुसंख्याकांचें मत उलट होतें यांत शंका नाहीं अशी भीति वाटते. मिन्युसियस फेलिक्सला साक्रेतिसाचें दीमन म्हणजे पिशाच होतें असें वाटे ('आक्तेवियस' भा. २६).

२१. पामर 'धर्मसंस्थेविषयीं' खं. १, पृ. १३ आणि पुनः इ. स. ४१२ मधली झर्ता येथील धर्मपरिषद. 'सनातनधर्मापासून जो वेगळा आहे तो आपल्या मतें कितीही सदाचरणी असो; तरी तो क्रिस्ताच्या समागमापासून दूर राहिला एवढ्या एकाच अपराधावरून त्याला चिरकालिक जीवन मिळणार नाहीं; तर त्यावर ईश्वराचा रोष राहील.' हें विधान संत आगस्तायननें प्रथम लिहिलें असें म्हणतात. हवार्देनचें 'दान व सत्य' पृ. ३९, ४० पहा.

२२. या बाबतींत लूथरच्या एका वचनाहून खेदकारक असें जगांत दुसरें कांहींच माहित नाहीं. 'दिवाणखान्यांतील गप्पा' या बेलच्या

ग्रंथाच्या जुन्या सुंदर भाषांतरांतून तें येथें उतरून घेतलें आहे. 'मरण म्हणजे देवाचा रोष असें जर ख्रिस्तो माणसाला माहित नसतें तर तें सोसणें व जिंकणें त्याला कितीतरी हलकें व सोपें वाटलें असतें. पण देवाचा तो रोष एवढ्यानेंच मरण आम्हांला किती कडू वाटतें. पण ख्रिस्ती धर्मा-बाहेरच्या माणसाला जेव्हां मरण येतें तेव्हां किती स्वस्थ चित्तनें बिनघोर तो निघून जातो. मरण म्हणजे ईश्व-राचा रोष असें त्याला वाटत नाहीं, भासत नाहीं; पण त्याच्या मनांत असा भाव असतो कीं, मरण या सृष्टीचा शेवट व स्वाभाविक गोष्ट होय. खुशालचंदपंथी म्हणतो कीं मरण हें केवळ एक अभद्र घडी भर टिकणारें आहे. एका प्रख्यात जीव-मान प्राचीनसंशोधकानें मरणाच्या माध्ययौगिक व ख्रिस्ती धर्मबाह्य देखाव्यांची तुलना केली आहे (ज्युबि नल 'सुर ल दान्से द मोर्त' पृ. ८ )

२३ प्लेतो.

२४ पंडितंमन्यपंथाच्या लोकांनीं ज्या आरिस्तातलला धर्मपित्यांच्या बहुतेक पंक्तीस बसविलें त्याचें, एवढें महत्व वाढण्याचें कारण आद्यकालचे पाखंडी होत; तसेंच त्याच्या तत्व-विवेचनाच्या प्रवेशाबरोबर प्रथमतः नेहमीं पाखंडाची वाढ बिनचुक व्हावयाचीच व धर्मपित्यांनीं सगळ्यांनींच (क्वचित् एखादा अपवाद निघाला तर निषे) या गोष्टीचा स्पष्टपणें निषेध करावयाचा, हें लक्षांत ठेवण्या-सारखें आहे. या बद्दल बराच विल-क्षण पुरावा, आलेमान्द-लाविजेरीच्या 'एकोलक्रेतिएन देदीसे' यांत पहा.

२९ तथापि नवव्या शतकांत गातेश्चाक नांवाच्या एका मठवाशानें दुहेरी पूर्वसंकल्पाचें मत प्रतिपादन केलें. त्याला रीम्सचा धर्माध्यक्ष हिंक्मर यानें धर्मज्ञानाच्या दृष्टीनें व स्कोतस एरिजिनानें अनिर्बंध विवेचकाच्या दृष्टीनें उत्तर दिलें. या एकंदर प्रसिद्ध असलेल्या वादवि-वादाच्या हकीगतीसाठीं मां संत रेनी तेलान्दियरचें 'स्कोत एरिजेने एत ला फिलासफी स्कोलास्तिक' नांवाचें विद्वत्ताप्रचुर पुस्तक ( पृ. ५१ ते ५८ पहा. व गातेश्चाकच्या मताबद्दल तत्कालीन आलोकासाठीं लियान्सच्या आगोबार्दच्या लगेच मागून झालेला धर्माध्यक्ष आम्यूलो यानें लिहिलेलें व आगोबार्दच्या ग्रंथाबरोबर छापलेलें पत्र वाचा. आम्यूलोच्या मतें गातेश्चाक ह बहिष्कार व विशिष्ट तारण या मतां-चा पुरस्कर्ता होता इतकेंच नाहीं तर, पूर्वसंकल्पानें नरकप्राप्ति ज्यांना व्हाव-याची त्यांच्या नाशानें सर्वशक्तिमान् ईश्वराला आनंद होतो असें त्यानें विधान केलें. गातेश्चाकला धर्माधि-कार्‍यांच्या मंडळींतून दूर केलें, कैदेंत टाकिलें व फटके मारले. ( लारेन्ते हिस्त. द लिंक्विझिशिअन' खं.१पृ.२०)

३२ (कित्ता क. १०) हीं कलमें वाघनच्या भाषांतरावरून दिलीं आहेत; कारण मूळ ग्रंथांत भाग नाहींत व पृष्ठांकही नाहींत. मेलां-क्याननें आपल्या 'कामन प्लेसिस' (साधारण गोष्टी) नांवाच्या पुस्त-काच्या पहिल्या आवृत्तींत आत्यंतिक पूर्वसंकल्पमतें प्रसिद्ध केलीं होतीं. पण पुढच्या आवृत्त्यांतून तीं वगळलीं. ल्यूथरनें म्हातारपणीं उद्गार काढले कीं, आपल्या ग्रंथांपैकीं 'प्रश्नोत्तरावली' व 'द सर्वो आर्बित्रियो' शिवाय कोणत्याही पुस्तकाचें पुनरावलोकन करण्याचें काम पूर्ण समाधानानें आपल्या हातून होत नाहीं. (बाघनची 'प्रस्तावना' पृ. ५७) सर दब्ल्यू ह्यामिल्तनच्या एका निबंधांत या पुस्तकाचा पूर्ण उल्लेख आहे.

३३ काल्विनच्या मतासाठीं विशेषें-करून त्याचें 'द इतर्ना देइ प्रीदेस्तिनेशिआन' व 'इन्स्तित्यू क्रिस्त' खं. ३ क. २१ ते २३ पहा. पण स्पष्टपणें व जोरानें केलेलें या मताचें विधान कदाचित् बेझा याच्या एका 'द इतर्ना देइ प्रीदेस्तिनेशिआन कांत्रा सेबास्तिआनम कास्तेलियोनेम' ('बझाच्या 'आपुस्क्युला' त प्रसिद्ध केलेलें) नांवाच्या पुस्तकांत आढळेल. काल्विनच्या मतांतील निःसीम दुष्टपणा त्याच्या कार्यकारण-वादी प्रतिपक्षानें नैतिक ऋजुतेविषयीं घेतलेल्या खोंचदार आक्षेपांनीं पूर्ण उठावानें दिसला. 'पोपाचार्यांच्या कृत्याचें बेझानें केलेलें प्रदर्शन' अगर 'ठिगळलेलें पेलाजियसचें मत' या नांवानें दब्ल्यू ह्यापकिन्सननें केलेल्या ग्रंथाचें एक जुनें विलक्षण भाषांतर आहे. ईश्वर कांहीं माणसांचा असा द्वेष करी कीं, त्यांचा नाश होईल असा पूर्ण संकल्प त्यानें केला असें मत धारण करण्याचा आरोप काल्विनपंथी लोकांवर आहे, तो अन्यायाचा आहे असें बेझानें विशेषेंकरून दृढ निश्चयानें म्हटलें आहे. खरी गोष्ट अशी आहे कीं, अखिल विश्वाचें निष्कंटक सार्व-भौमत्व ईश्वराकडे असल्यामुळें त्यानें कांहीं माणसांचा नाश होणार असा पूर्वसंकल्प केला व त्यामुळें त्याच्या द्वेषास तीं माणसें पात्र झालीं. येणेंप्रमाणें ईश्वराचा कोणाविषयींचा असा द्वेष नाहीं कीं, त्याला त्यानें नाशाप्रत पोंचवावें. पण ज्यांचा नाश होणार असा त्यानें पूर्वसंकल्प केला त्यांचा द्वेष त्याला उत्पन्न झाला.' जोनाथन एड्वर्ड्स यानें आपल्या 'इच्छास्वातंत्र्य' या पुस्तकांत दुसऱ्या एका मुद्याचें दृढतेनें विवेचन केलें आहे. तो मुद्दा असाः स्वेच्छेनें सन्मार्गोल्लंघन करणा-ऱ्याला शिक्षा करण्यांत कांहीं अन्याय होत नाहीं. आणि बहिष्कृतांचें सन्मा-र्गोल्लंघन स्वेच्छ असतें; कारण आद-मच्या वेळेपासून ज्या मनुष्यांची उत्पत्ती केलेली आहे त्यांच्या आंगीं इच्छाशक्ति इतकी निराशाकारक-

रीतीनें विकृत ठेविली आहे कीं, ईश्वरी साह्यावांचून त्यांचा अटळपणें नाश झालाच पाहिजे; व ईश्वरानें तर बहुतेक मणसास साह्य द्यावयाचें नाहीं असें ठरविलें आहे. म्हणून भवितव्यता तें काय ? तर मनुष्याची इच्छा असो नसो, त्याला कांहीं गोष्टी कराव्याच लागतात ही भवितव्यता नव्हे; पण त्याची इच्छा अवश्यमेव अमुक दिशेनेंच जायची अशी प्रकृति देऊन त्याला या जगांत पाठविलेलें असतें, ही भवितव्यता होय.

३४ काल्विनपंथीयांची या असल्या सिद्धांताविरुद्ध खरोखर वारंवार तक्रार असते. पण तो बहुतेक स्वयंसिद्ध आहे; व त्या पंथांतील अत्यंत समर्थ लेखकाला एका दृष्टीनें तो मान्य आहे. मात्र ही दृष्टी त्याच्या प्रतिपक्षांना फार विशाल वाटण्यासारखी आहे. 'पापाचा उत्पादक या शब्दांचा अर्थ पाप होऊं देणारा अगर पाप होत असतां प्रतिबंध न करणारा, व आणखी होऊं दिलें, अडथळा केला नाहीं तर पाप अगदीं खात्रीनें व बिनचुक व्हावयाचेंच अशी वस्तुस्थिति शहाणपणाच्या, पवित्र व अत्युत्तम हेतूंनीं तयार करणारा, इतकाच असेल तर ईश्वर पापाचा उत्पादक होय मी नाहीं म्हणत नाहीं.' (जोनाथन एड्वर्ड्स 'इच्छास्वातंत्र्य' पृ. ३६९.) आदमची इच्छा निराशाजनक रीतीनें विकृत झालेली नव्हती व म्हणून त्याच्या पतनाच्या पूर्व संकल्पांत अर्थात् विशिष्ट अडचणी आहेत.

३५ लेंगचें 'स्वीदन' पृ. १०८ ते १४१ पहा. या ठिकाणीं या प्रश्नाचें सूक्ष्म परीक्षण केलेलें आहे. हा केवळ आंकड्यांचा प्रश्न आहे. पुढील उतारा त्या लेखकाच्या दुसऱ्या एका ग्रंथांतून घेतलेला आहे. तो निर्णायक पुराव्यानें सिद्ध व्हावयाला कठीण आहे व जरा अतिशयोक्त आहे असें म्हणावेंसें वाटतें. तथापि तो फार सूचक आहे. 'राजकारण तत्वविवेचकाला स्विस लोक आचरणांत अत्यंत नीतिमान् पण अत्यंत अधार्मिक असे दिसतात व ही एक अनपेक्षित व अत्यंत संस्मरणीय संघटना वाटते. केवळ गुन्हे फार होत नाहींत, अगर ते घोर नसतात, अगर न्याय्य गोष्टींची अवहेलना होत नाहीं. एवढ्याच बाबतींत नव्हे, तर आणखी राजशासनें पाळण्याच्या तत्परतेंत, प्रामाणिकपणांत, वचन पाळण्यांत, व्यवहाराच्या चोखपणांत, पानोन्मादराहित्यांत, उद्यमशीलतेंत, व्यवस्थित आचरणांत, सच्छासनांत, उपयोगी सार्वजनिक संस्थांत, व सामान्य सुखवस्तुपणांत, या सर्व बाबतींत युरोपांत नीतिमत्तेंत परमपदावर असूनही हे लोक धार्मिक वृत्तींत, धार्मिकव्रतपालनांत, धार्मिक ज्ञानांत, युरोपांतील देशांत अधम पदावर आहेत. व ही स्थिति प्रतिरोधीपंथाच्या परगण्यांत विशेषें-

करून दृष्टीस पडते. सनातन पंथी परगण्यांशीं तुलून पहातां या प्रतिरोधीपंथी परगण्यांत भरभराट, सुखसोय, व नीतिमत्ता हीं लोकांवरील धर्माच्या वर्चस्वाशीं व्यस्त प्रमाणांत आहेत असें दिसतें. ही समाजिक स्थिति संस्मरणीय आहे. हिच्यासारखी स्थिति कदाचित् प्राचीन रोमन समाजाची असेल. कारण रोमन लोकांतही धर्माच्या वर्चस्वाच्या साहाय्यावांचून नीतिमत्ता व सामाजिक सद्गुण पोसले जात! (लँगचें 'एका प्रवाशाचीं टिपणें' पृ. १४६, १४७) डा. आर्नोल्द म्हणे कीं सनातन पंथी परगण्याहून प्रतिरोधीपंथी परगण्यांची भरभराट जास्त होती, ही लौकिक समजूत फारच अतिशयोक्तीची आहे. तशी भरभराट कांहीं ठिकाणीं आहे व कांहीं ठिकाणीं नाहीं असें मला खरोखर वाटतें.

३७ या विषयावावर मिदल्तनच्या 'अनिर्बंध मीमांसे'त गोळा केलेला पुरावा पहा. संत क्रिसास्तोमच्या 'उपाध्यायगणाविषयीं' यांतली असत्य बोलण्याच्या संवयींची विलक्षण स्तुति, व 'मित्र' या पुस्तकांतील काकेरिजचे व मारीच्या 'क्रोयन्सिस एत् लिजेंदिस' (पृ. २६) यांतील शेरे पहा. तथापि या बाबतींत संत आगस्ताइन अपवाद होय. 'कोंत्रा मेंदाचियम' या आपल्या ग्रंथांत या प्रवृत्तीचा त्यानें जोरानें निषेध केला आहे. विशेषेंकरून तो प्रिसीलियानिस्तांचा निषेध करतो; कारण त्या पंथांत ही प्रवृत्ति फारच सर्वसाधारण होती असें दिसतें. आणखी कांहीं सनातनपंथी लोकांचाही तो निषेध करतो, कीं, प्रिसिलीयन पंथांतलें गूढ काय तें चोरून आणण्यासाठीं आपण त्या पंथाचे आहोंत असें ढोंग करणें ते मंडनाई समजत. या विषयाचें अत्यंत चीड येण्यासारखें स्वरूप म्हटलें म्हणजे पाखंडी लोकांना नैतिक हक्क असूं नयेत इतके ते अघोरकर्मी होत ही समजूत. हें मत जेथें प्रतिरोधी पंथांचें अगर संदिग्धवादी पंथाचें लोकमत नसतें अशा सनातनपंथी देशांत फार लोकप्रिय असतें. स्पेनमधला धर्मोपाध्यक्ष सिमान्कास याचें 'द क्याथोलिसिस इन्स्तित्युशिओनिबस' पृ. ३६५ पहा.

३८ डा. न्यूमन म्हणतोः 'ग्रीक धर्मपित्यांना वाटे कीं जेव्हां योग्य कारण असेल तेव्हां असत्य बोलणें ही लबाडी नव्हे. संत आगस्ताइनचा आलोक निराळा होता. पण त्याच्याबद्दल त्याला बराच संशय होता. आणि त्याच्या म्हणण्याचा अर्थ बरोबर कळलेला असो कीं नसो संत आगस्ताइन यानें जें जें म्हणून असत्य ती ती लबाडीच, व असत्य सांगण्याला योग्य कारण बिलकूल असूं शकणार नाहीं हें थोर व सर्व साधारण मत उपदेशिलें...आतां योग्य

कारणाचा विचार केला तर ग्रीक धर्मपिते स्वसंरक्षण, दान, ईश्वराच्या वैभवाची कळकळ वगैरे योग्य कारणें मानीत ' ह्या शेवटच्या म्हणजे ईश्वराच्या वैभवाची कळकळ ह्या कारणांत ज्याला साधारणपणें ' धार्मिक लबाड्या म्हणतात त्या सर्व सामावतात हें फारच उघड आहे.

४० या मुद्याच्या आधारानें परीक्षण केलेलें वाचकांनां ल प्लेसच्या ' थिओरि द प्रोबाबिलितिस ' मध्यें आढळेल. हें उघड आहे कीं जर हें बरोबर असेल तर ईश्वराचा निरोप आणण्याबद्दल आपणास दृष्टांत झाला आहे, असें सांगणाऱ्या कोणाही तोतयाची आज्ञा शिरसा वंद्य मानणें योग्य होईल; मात्र त्यानें सांगितलेल्या फलश्रुतींत उत्तमोत्तम पारितोषिकें व अत्यंत भयंकर शिक्षा असल्या पाहिजेत.

४१ याप्रमाणें सतराव्या शतकांत सनातनपंथी लोकमान्य वादप्रमाण असें होतें कीं, सनातन पंथाला तारण मिळूं शकेल, हें प्रतिरोधी पंथाला मान्य आहे, पण प्रतिरोधी पंथाला तारण मिळूं शकेल असें सनातन पंथाला मान्य नाहीं, म्हणून सनातनपंथी होणें बरें. भोळसट भेकडपणावर परिणाम करून व ईश्वरी चांगुलपणाची जाणीव बधिर करून लोकांचें मन सत्याच्या जाणिवेला धाब्यावर बसवायला तयार करण्याच्या इराद्यानें हें वादप्रमाण योजिलेलें आहे; व त्याची डाळ शिजणें हें ज्याला तें सांगावयाचें त्या माणसाच्या आंगच्या भेकडपणावर, आत्मप्रत्ययाभावावर व मर्यादशीलतेवर, मुख्यत्वेंकरून अवलंबून आहे. या गोष्टी ध्यानांत घेतां तें कल्पकतेला कल्पना करण्यास नुसतें शक्य अशा अत्यंत नीचतम कोटींतील व अधोगतीस पोचविणारें असेंच बहुधा मानलें जाईल; तथापि तें निःसंशय फार परिणामकारक झालें; व प्रस्तुत विविच्यमान मताशीं पूर्ण मिलाफ ठेवणारें निघालें. सेलदनचा प्रश्न असा होता कीं, ' त्यांच्या पंथांत आमच्यापेक्षां औदार्यबुद्धि कमी म्हणून त्याचा पंथ आमच्यापेक्षां बरा कीं काय? बेदेलनें एकेठिकाणीं या दोन्ही पंथांची या बाबतींत सालोमनपुढें न्यायाकरितां आलेल्या आयांशीं तुलना केली आहे. हें ठिकाण इंग्रजी गद्य वाङ्मयांत अत्युत्कृष्ट म्हणून कालेरिजनें जो शेरा मारला आहे तो योग्यच होय.

४२ मां. लित्रे नांवाच्या एका समर्थ फ्रेंच टीकाकारानें असा शेरा मारला आहे कीं मानवी सुधारणेच्या प्रगतीबरोबर अद्भुत चमत्कारांनीं उलगडे करून घेण्याएवजीं केवळ मानसशास्त्रसंमत उलगड्यांस मान्यता देण्याची प्रवृत्ति वाढत जाते याचें ठळक उदाहरण ' ओरिस्तिस ' व ' ह्याम्लेत ' या पुस्तकांच्या तुलनेनें दिसतें. राजाचा खून, राणीचा गुन्हा, एका बाजूला मृत

पित्याविषयींचें ऋण व दुसऱ्या बाजूला जीवमान जननीविषयींचें कर्तव्य, अशी ‘ इकडे आड तिकडे विहीर ’ सारखी स्थिति होऊन मनाचा गोंधळ उडून वेडा झालेला राजपुत्र, अशा दोन्ही नाटकांतील मुख्य कथा एकच; पण ओरिस्तिसच्या मनाच्या झटक्यांचा उलगडा करण्यास ग्रीक नाटककाराला ‘ फ्यूरीज ’ चा प्रवेश घालणें जरूर वाटलें; व ह्याम्लेतच्या मनःसंतापाचा उलगडा मनोवृत्तींच्या स्वभावसिद्ध व्यापारानें व झगड्यानें हवा तसा होऊन जाईल असें इंग्रज नाटककाराला वाटलें.

४४ ‘ आणि तथापि ( पूर्ण सत्य सांगावयाचें तर ) जसें आपणावर जरी प्रकाशानें आभारांचें मोठें ओझें लादलें आहे, कारण प्रकाशानें आम्हांला आमच्या योग्य मार्गावर येतां येतें, कलांचा उपयोग करतां येतो, वाचतां येतें, परस्परांस ओळखतां येतें; तरीही त्या प्रकाशाच्या या नानाविध उपयोगांहून स्वतः प्रकाश दिसणें हीच गोष्ट जास्त उत्कृष्ट, जास्त सुंदर होय; तसेंच यथास्थित वस्तूंचें मनन भोळसटपणाला, ढोंगाला, चुकीला, अगर घोंटाळयाला, अवसर न देतां करणें हेंच नवीन शोधांनीं मिळालेल्या सर्व फळांहून उचिततर होय, हें खास. ( नोवम आर्गानम ).

४५ अर्वाचीन अल्त्रामान्तेनिझम (पैलगिरिपंथा) चा नामांकित प्रेषित जो द मेस्तर यानें लाक व बेकनसंबंधानें टीका केली आहे. तशीच पण फार निराळ्या तऱ्हेनें पत्रकपंथीयांनीं व विशेषतः दा. न्यूमन यानें ( मतांतरापूर्वी व नंतरही ) लाकच्या मानसशास्त्रीय मताविरुद्ध व बेकनच्या सामान्यानुमितिविशिष्ट तत्त्वज्ञानमताविरुद्ध एकसारखी कडक टीका चालविली आहे.

दा. क.
REFBK-0000986

# परिशिष्ट ३ रें—शुद्धिपत्र.

सूचनाः—( १ ) लेखखंडा ( paragraph ) च्या मथळ्याची ओळ धरून ओळी मोजल्या आहेत. पृष्ठ व ओळ यांचे आंकडे देऊन प्रथम अशुद्ध देऊन लगेच पुढें त्याचें शुद्ध दिलें आहे.

( २ ) हें शुद्धिपत्र न लांबावें म्हणून पुष्कळ अशुद्धें शुद्ध केलीं नाहींत. पण तीं सहज समजतील अशीं आहेत. तथापि अशुद्धें इतकीं आहेत कीं कित्येक नजर चुकवून राहिलीं असतील.

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १ | प्रकरणाच्या नांवाचीं | अद्भूत | अद्भुत |
| | | ( हें अशुद्ध पुष्कळ ठिकाणीं आहे. म्हणून तें पुनः दिलें नाहीं. ) | |
| ४ | ११ | राबेन्सवर्ग | राबेन्स्बर्ग |
| ,, | २० | अस्ति०त आला आहे | अस्ति० त आहे |
| ,, | २४ | पछाडलें | पछाडले |
| ७ | २३ | पश्नाबद्दल | प्रश्नाबद्दल |
| ९ | ४ | लेखही | लेख ही |
| ९ | १२ | लक्ष | लक्ष |
| ११ | १६ | कळण्थास | कळण्यास |
| १३ | १९ | होणाऱ्या- | होणाऱ्या |
| १५ | १२ | त्याच्याशी | त्यांच्याशीं |
| ,, | १५ | दुसऱ्यांचा | दुरात्म्यांचा |
| १६ | १३ | राह० णींत कृ० ळें | राह० णींत कृत्रिमपणा येतो. कृ० ळें |
| १९ | ५ | साम्राज्य. | साम्राज्य |
| २० | १२ | ख्रिस्त्यांनींही | ख्रिस्त्यांनीं ही |

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २२ | २७ | ध० च्या अभावाच्या का० | ध० च्या का० |
| २४ | ९ | बाद० च्या | बादशाही |
| ,, | १४ | मेध्यां० नें | मेध्यां० नें— |
| ,, | १५ | पाहून | पाहून— |
| ,, | १७ | ( २५ ) | ( २५ ). |
| २६ | १८ | तीर्थोदकांचे | तीर्थोदकाचे |
| ,, | ,, | संस्काराचे | संस्कारांचे |
| २७ | ९ | संलम्न | संलग्न |
| २९ | २० | असेल. | असेल, |
| ,, | २६ | अप० द्धि | अप० द्धि; |
| ३१ | १९ | संल्लग्न | संलग्न |
| ३६ | २६ | ( ४२ ). | ( ४२ ) |
| ४० | २६ | असे | असें |
| ४४ | १६ | खिस्ती | ख्रिस्ती |
| ४८ | २६ | त्रेञ्ज | त्रेञ्ज |
| ५९ | १२ | करून-- | करून |
| ,, | १३ | वाद | बाद |
| ,, | ,, | पडतील. | पडतील— |
| ,, | १७ | सुध्दा | सुद्धां |
| ६२ | ७ | आढळतें | आढळते |

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ६७ | १३ | शिरलीं(७३); | शिरलीं |
| ,, | १७ | (७४) | (७३) |
| ,, | १८ | कांळीं | काळीं |
| ,, | २० | नेव्यूक्याडनें झारची | नेव्यूक्याडने-झारची |
| ,, | २७ | पाखांडन्या० | पाखंडन्या० |
| ६८ | ६ | (७५). | (७४). |
| ,, | १५ | सुंदरींच्या | सुंदरींच्या |
| ,, | २१ | गंभीरपण | गंभीरपणें |
| ,, | २२ | वगैरे | वगैरेवर |
| ६९ | २ | करतात; | करतात. |
| ,, | ७ | (७६). | (७५). |
| ७० | ८ | (७७). | (७६). |
| ,, | १३ | (७८). | (७७). |
| ,, | १७ | (७९). | (७८). |
| ७३ | १३ | व्हावयालाही | व्हावयाला ही |
| ,, | २८ | (८०). | (७९). |
| ७४ | १० | (८१). | (८०). |
| ,, | १६ | (८२). | (८१). |
| ,, | २५ | (८३) | (८२) |
| ७५ | १५ | क्लीवज | क्लीव्ज |
| ७७ | १४ | (८४). | (८३). |
| ,, | १९ | बोदिनचची | बोदिनची |
| ,, | २२ | (८५). | (८४). |
| ७८ | १७ | ज०च्या– | जा०च्या |
| ७८ | १९ | तथ्थ | तथ्य |
| ७८ | २१ | शद्बच | शब्दच |
| ७९ | २ | उ०लें' | उ०लें' |
| ,, | ४ | बाटतो | वाटतो |
| ,, | ८ | मंत्र शिकून | शिकून |
| ७९ | ९ | प्रसिद्ध | मंत्र प्रसिद्ध |
| ,, | ,, | (८६) | (८५) |

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ,, | २५ | .(८७) | ,(८६) |
| ,, | २७ | त्राथ | त्राय |
| ८० | ७. | (८८)' | ,(८७) |
| ,, | २१ | क०च आहे. | क०च शक्य आहे. |
| ,, | २५ | सर्व स्वाहा | सर्वस्वाहा |
| ,, | २७ | धर्मेतर | धर्म्येतर |
| ८१ | १५ | (८९) | (८८) |
| ८२ | ४ | धर्मेतर | धर्म्येतर |
| ,, | १३ | (९०) | (८९) |
| ८३ | २४ | धर्मेतर | धर्म्येतर |
| ८५ | ८ | (९१); | (९०); |
| ,, | २४ | (९२). | (९१). |
| ८६ | ७ | (९३). | (९२). |
| ,, | ८ | (९४). | (९३). |
| ,, | २० | (९५), | (९४), |
| ८६ | २६ | (९६). | (९५), |
| ८७ | ५ | एब्रोच्या | एब्रांच्या |
| ,, | ७ | (९७). | (९६). |
| ,, | १७ | (९८). | (९७). |
| ,, | २६ | वाल्तेर तारा | वाल्तेर-तारा |
| ८८ | २ | आठव्या | अठराव्या |
| ,, | २९ | (९९). | (९८). |
| ८९ | २३ | (१००). | (९९). |
| ,, | २८ | कारणामुळें | कारणांमुळें |
| ९० | ११ | ०जोगे | ०जोगें |
| ,, | ,, | (१०१). | (१००). |
| ,, | २३ | (१०२). | (१०१). |
| ९१ | ९ | (१०३); | (१०२); |
| ,, | ,, | तरंगू | तरंगूं |
| ,, | १५ | थोरमनानें | थोर मनानें |
| ,, | २६ | दु० पणा | दु० पणा, |

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ९२ | २१ | ( १०४ ) | ( १०३ ) |
| ९३ | १ | ( १०५ ). | ( १०४ ). |
| ,, | २ | देशभर | देशभर, |
| ,, | ,, | त्यां०रांत | त्यां० रांत, |
| ,, | ६ | ( १०६ ). | ( १०५ ). |
| ,, | १० | ( १०७ ). | ( १०६ ). |
| ,, | १३ | ( १०८ ). | ( १०७ ). |
| ,, | १९ | ( १०९ ). | ( १०८ ). |
| ,, | २९ | ( ११० ). | ( १०९ ). |
| ९४ | १७ | ( १११ ). | ( ११० ). |
| ,, | १८ | पंथाचीं | पंथाची |
| ,, | २४ | शेवटपर्यंत, | शेवटपर्यंत |
| ९५ | २ | ( ११२ ). | ( १११ ). |
| ९६ | ११ | ( ११३ ) | ( ११२ ) |
| ,, | १३ | ( ११४ ). | ( ११३ ). |
| ९७ | १० | ( ११५)." | ."( ११४) |
| ९८ | १० | ( ११६ ) | ( ११५ ) |
| ,, | १९ | ( ११७ ) | ( ११६ ) |
| ९९ | ८ | ( ११८ ) | ( ११७ ) |
| १०० | २० | ( ११९ ) | ( ११८ ) |
| १०१ | २५ | ( १२० ) | ( ११९ ) |
| १०२ | १ | ( १२१ ) | ( १२० ) |
| ,, | २३ | ( १२२ ) | ( १२१ ) |
| १०३ | २ | ( १२३ ) | ( १२२ ) |
| ,, | २१ | ( १२४ ) | ( १२३ ) |
| ,, | २३ | ( १२५ ) | ( १२४ ) |
| ,, | २७ | ( १२६ ) | ( १२५ ) |
| १०४ | ३ | ( १२७ ) | ( १२६ ) |
| ,, | ७ | मोर | मोर, |
| ,, | २२ | ( १२८ ) | ( १२७ ) |
| ,, | २४ | ( १२९ ) | ( १२८ ) |

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | क्रद्ध |
|---|---|---|---|
| १०५ | १ | ज्यासमयीं | ज्या समयीं |
| ,, | २० | ( १३० ) | ( १२९ ) |
| १०६ | ८ | ( १३१ ) | ( १३० ) |
| ,, | १९ | ( १३२ ) | ( १३१ ) |
| १०६ | २४ | ( १३३ ) | ( १३२ ) |
| १०७ | ५ | ( १३४ ) | ( १३३ ) |
| ,, | १२ | निर्भत्सना | निर्भर्त्सना |
| ,, | १९ | ( १३५ ) | ( १३४ ) |
| ,, | २३ | ( १३६ ) | ( १३५ ) |
| १०८ | १३ | देशभभर | देशभर |
| ,, | १६ | ( १३७ ) | ( १३६ ) |
| १०९ | ७ | करून इतर | इतर |
| ,, | २१ | ( १३८ ) | ( १३७ ) |
| ,, | २५ | कळकळ ही | कळकळही |
| ,, | २९ | ( १३९ ) | ( १३८ ) |
| ११० | ३ | ( १४० ) | ( १३९ ) |
| ,, | ७ | ( १४१ ) | ( १४० ) |
| ,, | १४ | ( १४२ ) | ( १४१ ) |
| ,, | २७ | ( १४३ ) | ( १४२ ) |
| १११ | २ | ( १४४ ) | ( १४३ ) |
| ,, | १२ | जुलम | जुलूम |
| १११ | १४ | उलटमताचा | उलट मताचा |
| ,, | २० | लोकमतांवर | लोकमनावर |
| ११२ | ३ | ( १४५ ) | ( १४४ ) |
| ,, | ४ | मोळसट. | भोळसट. |
| ,, | १४ | ( १४६ ) | ( १४५ ) |
| ,, | २२ | ( १४७ ) | ( १४६ ) |
| ,, | २३ | ( १४८ ) | ( १४७ ) |
| ,, | २६ | ( १४९ ) | ( १४८ ) |
| ,, | २७ | व्यबस्थेनें | व्यवस्थेनें |
| ११३ | ५ | ( १५० ) | ( १४९ ) |

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ,, | २० | (१५१) | (१५०) |
| ,, | २१ | (१५२) | (१५१) |
| ,, | २५ | (१५३) | (१५२) |
| ,, | २८ | (१५४) | (१५३) |
| ११४ | ११ | (१५५) | (१५४) |
| ,, | १२ | (१५६) | (१५५) |
| ,, | १७ | (१५७) | (१५६) |
| ११४ | २६ | (१५८) | (१५७) |
| ,, | २८ | (१५९) | (१५८) |
| ११५ | २ | (१६०) | (१५९) |
| ,, | ६ | (१६१) | (१६०) |
| ,, | १० | (१६२) | (१६१) |
| ,, | १९ | (१६३) | (१६२) |
| ११६ | १२ | (१६४) | (१६३) |
| ११७ | २४ | करारांच्या | कराराच्या |
| ,, | २७ | (१६५) | (१६४) |
| ११८ | ४ | (१६६) | (१६५) |
| ,, | ११ | (१६७) | (१६६) |
| ,, | १७ | (१६८) | (१६७) |
| १२३ | ७ | देवदूत | देवदूत यांचा |
| १२५ | ३ | त्यांना | त्यांनीं |
| ,, | ४ | संक०खे | संक०खे, |
| १२८ | १८ | परङ्मुख | पराङ्मुख |
| ,, | २४ | च°रा° | च°रां° |
| १२९ | १२ | संल्ग्न | संलग्न |
| १३१ | १७ | त्यांची | त्याची |
| १३५ | ७ | अडचण,– | अडचण, |
| ,, | २७ | वागलेही | वागलेही. |
| १३६ | २१ | आ°त ज्यो° | आ°तज्यो° |
| ,, | २२ | व्यवहारां | व्याहारां |
| ,, | २९ | एकाएकी | एकाकी |

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १३७ | १८ | कोणाची | कोणची |
| ,, | २७ | मिदस्तनच्या | मिदलतनच्या. |
| १३८ | १६ | बार्बर्तन | वार्बर्तन |
| १४० | १३ | पद्धति, | पद्धति |
| ,, | १४ | असला, | असला |
| ,, | ,, | तर. | तर– |
| १४१ | १८ | नाहीं; | नाहीं, |
| १४१ | १९ | नाहीं; | नाहीं, |
| १४१ | २४ | देवदूतां° | धर्मदूतां° |
| १४२ | १६ | लीला | लीला, |
| १४२ | १९ | धर्माधिकां | धर्माधिका- |
| ,, | २० | त्याच्या | त्यांच्या |
| १४४ | १३ | होतें | होतें. |
| १४६ | १० | घर्मपथ | धर्मपंथ |
| ,, | १५ | पंथांच्या | पंथाच्या |
| ,, | १८ | वर्षेप° | वर्षेप° |
| १४८ | १६ | विशाष | विशेष |
| १५२ | १३ | रा°त्वांचे | रा°त्वाचे |
| १५३ | २० | लादेनर | लार्देनर |
| १५४ | ११ | बोलींग ब्रो° | बोलिंगब्रो° |
| १५५ | ५ | एकानें ही | एकानेंही |
| ,, | १० | ठ°ली होती | ठ°लें होतें |
| १५७ | २४ | आह | आहे |
| ,, | २५ | आल | आलें |
| १५९ | २९ | वाढाकडे | वाढीकडे |
| १६० | १० | वाङ्मय | वाङ्मय, |
| १६० | २४ | आ°रक ब°त. | आ°रण ब°तें. |
| ,, | २९ | काण्याकडे | करण्याकडे |
| १६१ | १ | येते. | येतो. |
| १६२ | १२ | पालटली. | पालटली; |
| १६४ | २ | असले; | असेल; |
| ,, | ,, | सत्यासाठी | सत्यासाठीं |

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १६५ | भागाचें नांव | शाखांतील | शाखेंतील |
| १६६ | २ | लागतें. | लागतें, |
| १६८ | १९ | ( १ )." | ( १ )," |
| १६९ | ११ | पृथक | पृथक् |
| १७३ | ११ | मू० कडच्या | मु० कडे राहिलेल्या |
| ,, | २४ | °साक्षात्क° | °सात्क° |
| १७४ | ५ | का अस्थि | का रक्षा |
| ,, | ,, | व रक्षा टाकलीं. | टाकली |
| ,, | ,, | त्यावर | तीवर |
| १७८ | १५ | येइ. | येई. |
| १७९ | ५ | ईश्वरच | ईश्वरच, |
| ,, | १८ | खिस्ती | ख्रिस्ती |
| १८० | १२ | मिलालें | मिळालें |
| १८३ | ९ | शु°त्ता० | शु० त्तां० |
| ,, | २७ | होय; | होय, |
| ,, | २८ | ती, | ती; |
| ,, | २९ | आगामी | परिवर्ती |
| १८४ | ५ | –ह्या | ह्या |
| १८५ | ३ | क० नी | क० नीं |
| १८६ | १ | वि० नें | वि० न्वित |
| १८७ | ८ | सरें° | खरें° |
| १८८ | ३ | चित्रेंही | चित्रें हीं |
| १९४ | १० | आल्काथार | आल्काझार |
| ,, | ११ | कोणा | कोणीं |
| ,, | २७ | दाखावि° | दाखवि° |
| १९५ | ७ | चित्र वीथि° | चित्रवीथि° |
| ,, | २९ | शरीरसाष्ठवाच | शरीरसौ–ष्ठवाचें |
| २०० | २३ | होता | होता. |
| २०१ | १२ | यांच्यांक° | यांच्याक० |
| ,, | २० | निकालेसनें | निकोलसनें |
| २०७ | ४ | ठेवणे | ठेवण |
| २०८ | २९ | °च्छदें करून | °च्छदेंकरून |
| २१२ | १७ | काम्मो | काम्पो |
| २१७ | पृ०अं० | २१ | २१७ |
| ,, | ९ | त्यांच्यांकडून | त्यांच्याकडून |
| ,, | १० | थोडेंतरी | थोडातरी |
| २१८ | २२ | वंध्यात्व | वंध्यत्व |
| २२३ | ४ | वाढीनेंव | वाढीनें व |
| २२६ | ११ | असल्याचें, | असल्याच |
| ,, | ,, | आलें | आलें, |
| ,, | २३ | पा० ण्या० | पा० ण्यां० |
| ,, | २८ | तशी | तशीं |
| २२७ | १९ | .( ५ ) | ( ५ ). |
| २२९ | १९ | °धवराचें | °धावरचें |
| ,, | ,, | चांगले | चांगलें |
| २३१ | १७ | लेःबकानें | लेखकानें |
| ,, | २० | आलीं | आलीं. |
| २३३ | १८ | भांडण: | भांडण |
| ,, | ,, | पुन्हां | पुन्हां: |
| ,, | १९ | उद्भवलें | उद्भवलें. |
| ,, | २३ | थास | यास |
| ,, | २६ | ( क० १०.) | ( क० १० ) |
| २३४ | २९ | आनंदाच्या | प्रमेयांच्या अगदीं विरुद्ध, मानवी मूळ शक्तींच्या त्याच्या अंदाजाच्या |
| ,, | ,, | दिसतें. | दिसलें. |

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २३६ | ९ | असतें; | असतें, |
| २३७ | १३ | मनाविकार, | मनोविकार, |
| ,, | २४ | माबनाच्या | मानवाच्या |
| २३८ | ६ | °माणचें | °माणेंच |
| २३९ | ९ | नाशीं | नांशीं |
| २४० | २२ | °णाचे | °णाचें |
| २४१ | २२ | अगोदर, | अगोदर |
| २४२ | १८ | उ०णाथ | उ०णार्थ |
| २४३ | ७ | कंदा– | कदा– |
| २४५ | ५ | ग०णा, | ग०णा |
| २४७ | ८ | धडला | घडला |
| २४८ | ५ | ब्यवधा° | व्यवधा° |
| ,, | १८ | कधी कधीं | कधीं कधीं |
| ,, | २० | नियमान° | नियमना° |
| २४९ | २३ | सातत्य | सातत्य |
| २५३ | ११ | महत्त्ब | महत्त्व |
| ,, | १२ | हे,' | हे' |
| ,, | २७ | चाळसि | चाळीस |
| २५४ | २७ | खिस्ती | ख्रिस्ती |
| २५६ | २ | त्रास्तेलस | त्राक्तेतस |
| २५७ | १४ | शद्बांत | शब्दांत |
| २५९ | १७ | क्ररॅ | क्रूर |
| २६० | २३ | ओघांशीं | ओघाशीं |
| २६० | २७ | प्रदाप्त | प्रदीप्त |
| २६२ | ८ | त्यांच्यांशीं | त्यांच्याशीं |
| २७० | १० | होतीं; | होतीं, |
| २७३ | ८ | मंताचा | मताच्या परिणामांचा |
| ,, | ,, | इतिं°वर | इति°चा |

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २७३ | ९ | वर | चा |
| ,, | ,, | भि०णावर होणाऱ्या परिणामाचा म्हणजे | भि०णाचा म्हणजे |
| २७५ | ९ | मध्यवर्तीं | मध्यवर्ती |
| २७६ | ७ | ऊदाहरणें | उदाहरणें |
| २७७ | १२ | माणसालां | माणसाला |
| ,, | १३ | सव– | सर्व– |
| २७८ | ३० | तें | ते |
| २८० | २२ | क्ररप° | क्रूरप° |
| ,, | २६ | जव्हां | जेव्हां |
| २८१ | १७ | पहिला | पाहिला |
| ,, | २८ | क्ररपणा | क्रूरपणा |
| २८३ | २४ | यावर | या व |
| २८८ | ११ | चलवळी° | चळवळी° |
| २९२ | ३ | मताचीं | मताची |
| ,, | ८ | आत्म्यावर | आत्म्यावर |
| ,, | २३ | तीं | ती |
| २९३ | ८ | होतें; | होतें, |
| ,, | १७ | शतुका° | शतका° |
| २९४ | १९ | गेलें, | गेलें |
| २९५ | २ | हस्त पुस्त° | हस्तपुस्त° |
| ,, | २० | दिलें व; | दिलें; व |
| २९६ | २८ | राजक्रांन्ति | राज्यक्रान्ति |
| ३०२ | ५ | आहे; | आहे, |
| ,, | १७ | गोष्टी क० | ठरविणें, |
| ,, | २१ | ठेवून, | ठेवून |
| ३०३ | १४ | परीणाम | परिणाम |
| ,, | १६ | असणारीं | असणारी |
| ,, | २३ | करणेंहीं | करणेंही |

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३०५ | ८ | फ्लूतार्कच | फ्लूतार्कचें |
| ३०६ | १ | म० तूत | म० तून |
| ३१० | ९ | येथूत | येथून |
| ,, | २४ | केला. पण | केला पण |
| ,, | २५ | बदीचा | बंदीचा |
| ३११ | ३० | लिहिला; | लिहिला |
| ३१८ | २५ | वनाची | वनाचीं |
| ३२० | २४ | सो°थाची | सो°थाचीं |
| ३२५ | २४ | अंधुक° | अंदुक° |
| ३२६ | २ | धर्मसस्था° | धर्मसंस्था° |
| ,, | १६ | स्वस्त:च्या | स्वत:च्या |
| ३२९ | १६ | सर्वांशा | सर्वांशीं |
| ,, | २२ | म्हणाला. | म्हणाला, |
| ,, | २४ | या ले° | ले° |
| ३३३ | १ | ओणखा | आणखी |
| ३३५ | १ | तार°नाच | तार°नाचें |
| ,, | ४ | तारणा भोग° | तारणाभोग° |
| ३३६ | २७ | कल्पनत | कल्पनांत |
| ३४४ | ४ | पडावें | पाडावें, |
| ३४६ | २४ | जगसमु° | जनसमु° |
| ३५० | ९ | फांकला. | फांकला, |

## ग्रंथसंपादक व ग्रंथप्रसारक मंडळीचे उपयुक्त ग्रंथ.

# बृहद्योगवासिष्ठसार.

( ३२ हजार श्लोकांचें सरळ गोष्टीच्या रूपानें मराठी भाषांतर. )

### चार भागांत संपूर्ण ग्रंथ–किंमत ७ रुपये.

' वासिष्ठमहारामायण ' या नांवाच्या वाल्मीकिमुनिप्रणीत, बत्तीस सहस्र श्लोकांचा एक सर्वोत्तम संस्कृत ग्रंथ आहे. त्यांत श्रीवसिष्ठानें रामास केलेला विस्तृत अध्यात्म–उपदेश ग्रथित केला आहे. श्रीसिष्ठमुनि वक्ते व दाशरथिराम श्रोता, असा दैवी योग यांत आलेला आहे; इतकें सांगितल्यावर त्याविषयीं अधिक लिहिण्याची गरजच राहत नाहीं. या ग्रंथाचीं सहा प्रकरणें असून, तो बृहद्योगवासिष्ठ अथवा योगवासिष्ठ या नांवानें प्रसिद्ध आहे. ह्या अद्वैतवेदान्त–सिद्धान्त प्रतिपादक ग्रंथाचें मराठी भाषांतर आचार्यभक्त **विष्णु वामन बापट शास्त्री** यांजकडून सोप्या मराठी भाषेंत करविलें आहे. या ग्रंथाच्या प्रथम भागांत वैराग्य, मुमुक्षु, व्यवहार व उत्पत्ति या तीन प्रकरणांचें ( म्हणजे बत्तीस सहस्र श्लोकांतील नऊ सहस्र श्लोकांचें ) भाषांतर आलें असून, दुसऱ्या भागांत स्थिति व उपशम या चवथ्या व पांचव्या प्रकरणाचें ( म्हणजे आठ हजार श्लोकांचें ) भाषांतर आलें आहे, आणि तिसऱ्या व चवथ्या भागांत १५००० श्लोकांचें भाषांतर घेऊन निर्वाण प्रकरण पुरें केलें आहे. ग्रंथाचे शेवटीं–या विस्तृत ग्रंथाचा मथितार्थ वाचकांस थोडक्यांत समजावा म्हणून त्याचें एक स्वतंत्र परिशिष्ट, आणि कठीण पारिभाषिक शब्दांचा अक्षरानुक्रमानें स्पष्टार्थ, याचें एक परिशिष्ट, याप्रमाणें–दोन परिशिष्टें जोडलीं आहेत. एकंदरींत मराठी वाचकांस हा ग्रंथ सुलभ होईल, अशी व्यवस्था केली आहे. चारी भाग मिळून एकंदर पृष्ठसंख्या सुमारें १८०० च्या वर झाली असून टाईप व कागद चांगला वापरला आहे. चारी भाग मिळून या संपूर्ण ग्रंथाची किं. १० रुपये आहे; परंतु वाचकांच्या सोईकरितां हें चारी भाग एकत्र करून दोन व्हाल्यूममध्यें सोनेरी नांव एम्बास केलेल्या संपूर्ण ग्रंथाची किं. ७ रुपये ठेविली आहे. ट० ख० वेगळा.

# कथाकल्पतरु.

( विविध पुराणें, भारत, भागवत, रामायण, यांतील निवडक हजारों कथा यांत आहेत. स्त्री-पुरुषांची करमणूक करून ज्ञान देणारा असा हा कथांचा कल्पतरूच आहे. )

## दोन भागांत संपूर्ण ग्रंथ.—किंमत ६ रुपये.

मराठी वाचकांस आपणांतील विविध पुराणें, भारत, भागवत, रामायण, इत्यादि इतिहासप्रसिद्ध ग्रंथांतील रहस्य थोडक्यांत समजावून द्यावें, अशा उद्देशानें सुमारें ३०० वर्षांपूर्वी कृष्णकवि व मधुकरकवि या उभयतांनीं मिळून हा ओवीबद्ध ग्रंथ तयार केला आहे. या ग्रंथाचे पूर्वार्ध आणि उत्तरार्ध असे दोन मुख्य भाग असून, पूर्वार्धाचे सात स्तबक व उत्तरार्धाचे सात स्तबक, मिळून १४ स्तबक, म्हणजे पोटभाग आहेत. पूर्वार्धांतील सात स्तबकांचे अध्याय १२६ असून त्यांची ओवीसंख्या २०,०६८ आहे,व उत्तरार्धांतील सात स्तबकांचे अध्याय १४६ असून त्यांची ओवीसंख्या १८,७०३ आहे. अशा प्रकारें हा महाभारतासारखा विशाल ग्रंथ असून त्यांत हजारों कथा व उपकथा आहेत. जनमेजय राजा श्रोता व वैशंपायन ऋषि वक्ता, याप्रमाणें श्रोत्यावक्त्याचा योग आणून अठरा पुराणें, श्रुति, स्मृति, भारत, भागवत, रामायण आणि इतर भाषेंतील ग्रंथ यांतील मुख्य मुख्य महत्त्वाच्या अनेक कथा, या कथाकल्पतरूंत गोविल्या आहेत. त्यायोगें हा नांवाप्रमाणें कथांचा कल्पतरूच बनला आहे. ह्या ओवीबद्ध मूळ ग्रंथाची किंमत २० रुपये आहे. अशा ह्या अपूर्व ग्रंथाचें सरळ गोष्टीच्या रूपानें हें भाषांतर आबालवृद्ध स्त्रीपुरुषांचे सोयीकरितां तयार केलें आहे. या संपूर्ण ग्रंथाची किंमत १० रुपये आहे; परंतु वाचकांच्या सोईकरितां पूर्वार्ध व उत्तरार्धासह हा संपूर्ण ग्रंथ ६ रुपयांत देण्याची व्यवस्था केली आहे. फक्त पूर्वार्ध किंवा फक्त उत्तरार्ध घेणें असल्यास प्रत्येकाची किंमत ४ रुपये प्रमाणें आकारली जाईल. टपाल खर्च वेगळा.

# अष्टोपनिषदें.

**( मूळ मंत्र, अन्वय, अर्थ, विवरण, भाष्य, भाषांतर, प्रस्तावना, उपसंहार, सूची, यांसह स्वतंत्र पुस्तकांत बांधलेलीं ८ उपनिषदें. )**

हिंदु धर्माला आधारभूत असणारें तत्त्वज्ञान, आपल्या आर्यऋषिप्रणीत उपनिषद–ग्रंथांत उत्तमप्रकारें सांगितलें आहे. " आम्हांस जिवंतपणीं उपनिषदांचा परिचय झाला, हें आमचें महद्भाग्य होय; " असें जर्मन पंडित शोपेनहार व डॉ० मोक्षमूलर म्हणत असत. रा० ब० महाजनि लिहितात.–' दशोपनिषदांची योग्यता लहानसान नाहीं. गीतामहात्म्यांत म्हटलें आहे कीं,–' सर्व उपनिषदें ह्या गोमाता होत. त्यांना दोहणारा गोपालनंदन होय. पार्थ हा वत्स, दूध पिणारे सुबुद्ध व गीता हें दुग्धामृत. तात्पर्य, दशोपनिषदें हीं भगवद्गीतेचें मूळ व भगवद्गीता ही दशोपनिषदांचें सार होय. अर्थात् उपनिषदांची योग्यता अधिक आहे. अशा ह्या सर्वमान्य उपनिषद्–ग्रंथांचा लाभ मराठी भाषा बोलणाऱ्या सर्व बालगोपालांस सुलभ रीतीनें व्हावा म्हणून प्रो० **चिंतामण गंगाधर भानु** यांच्या सहायानें आम्हीं हें काम हातीं घेतलें आहे; आणि आतांपर्यंत–**ईश, केन, काठकोप, प्रश्न, मुंडक, मांडूक्य, ऐतरेय व तैत्तिरीय** याप्रमाणें आठ उपनिषदें–मंत्र, अन्वय, अर्थ, विवरण, भाष्य व भाषांतर यांसह; प्रस्तावना, अनुक्रमणिका, उपसंहार व सूची देऊन पूर्ण केलीं आहेत. पहिलीं तीन उपनिषदें–श्रीमच्छंकराचार्य, श्रीरामानुजाचार्य, श्रीमाधवाचार्य व स्वामी दयानंद यांच्या भाष्य व भाषांतरासह छापलेलीं आहेत, व पुढील पांच उपनिषदांत श्री. शंकराचार्य यांचें भाष्य व भाषांतर आलें असून इतर आचार्यांचा मतभेद दाखविला आहे. हीं आठही उपनिषदें स्वतंत्र पुस्तकरूपानें कापडी जाड पुठ्यांत बांधिलीं असून, त्यांच्या किंमती पुढील प्रमाणें ठेविल्या आहेत. १ ईशावास्योपनिषद् किं० रु० १॥, २ केनोपनिषद् किं०रु० १॥, ३ काठकोपनिषद् किं० रु० ५, ४ प्रश्नोपनिषद किं० रु० २, ५ मुंडकोपनिषद् किं० रु० २, ६ मांडूक्योपनिषद् किं० रु० ३ ७–८ ऐतरेय व तैत्तिरीय उपनिषद् ( दोन्ही एकत्र बांधलेलें पुस्तक ) किं० रु०२॥ याप्रमाणें आठ उपनिषदांची किंमत रु० १७॥ आहे, परंतु हीं आठही उपनिषदें एकदम मागविलीं असतां १२ रुपयांत देण्याची व्यवस्था केली आहे. टपालखर्च वेगळा पडेल. यापुढील छांदोग्योपनिषत् छापत आहे.

# सुलभ–पुराण–ग्रंथमाला.

हिंदु लोकांचे चार वर्ण व चार आश्रम, त्यांच्या रीतिभाति, नीति व आचार, विचार या विषयींच्या माहितीचें आगर म्हणजे आपले पुराणग्रंथ होत. पुराणांत या विषयांची माहिती असून, शिवाय सृष्टीची उत्पत्ति, तत्त्वज्ञान, धर्म, भारतवर्षीय भूगोल, राजवंशांचे इतिहास, भक्तांचीं चरित्रें, ऋषींचीं कुळें, वगैरे असंख्य विषय आहेत. पुराण–ग्रंथ नसते, तर वेदांचा अर्थ नीट लागताना, पूर्वींच्या समाजाविषयींचें यथार्थ ज्ञान झालें नसतें, व इतिहासाविषयाचे जिज्ञासु, अंधकारांत चांचपडत राहिले असते. असें अनेक विद्वानांचें मत आहे. सारांश, आपल्या पुराण–ग्रंथांचें ज्ञान मराठी वाचकांस असणें अवश्य आहे, हें निर्विवाद होय; पण सध्यां उद्योग–धंद्यांमुळें कित्येक लक्ष श्लोकात्मक पुराण–ग्रंथ विकत घेण्याचें सामर्थ्य व ते वाचण्यास लागणारी फुरसत फार थोड्यांना असते. शिवाय संस्कृत भाषा चांगल्या प्रकारें न जाणणारास ते समजण्याचीही अडचण. अशा अनेक कारणांमुळें त्या ग्रंथांकडे दुर्लक्ष होत आलें आहे. या सर्व अडचणींतून मार्ग काढण्यासाठीं आणि पुराण–ग्रंथांचें ज्ञान सामान्य जनतेलाही सुलभ करून देण्यासाठीं, ही **सुलभ–पुराण–ग्रंथमाला** सुरू केली आहे. आणि आतांपर्यंत खालीं लिहिलेलीं पुराणें प्रसिद्ध केलीं आहेत.

१ **मत्स्यपुराण**—कागदी पुठ्ठा किं० रु० ।।।- कापडी पुठ्ठा १ रु.

२ **गणेश पुराण**-- ,, ,, ,, -।।।- ,, १ रु.

३ **पद्मपुराण**—( पूर्वार्ध ) पृष्ठसंख्या ४०० कापडी पुठ्ठा किं० १॥ रु०

---

# महाराष्ट्र–कविचरित्र–भाग ३ रा.

महाराष्ट्र-कविचरित्राचा हा तिसरा भाग छापून तयार झाला आहे. पूर्वींच्या दोन भागाप्रमाणेंच हा भागही श्रीयुत जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर यांनीं विविध ग्रंथांच्या व माहितीच्या आधारें तयार केला असून, यांत १ गोराकुंभार, २ नरहरी सोनार, ३ परिसा भागवत, ४ भानुदास, ५ सेना न्हावी, ६ कान्हूपात्रा, ७ जगमित्र नागा, ८ जनी जनार्दन, ९ श्रीनाथदास, १० प्रेमाबाई, ११ निळोबा, १२ दिनकर गोसावी रामदासी, १३ शिवरामस्वामी कल्याणकर, १४ उद्धवचिद्धन, १५ चिदानंद स्वामी, १६ कचेश्वर, १७ शिवदिन केसरी, १८ विठोबा अण्णा दफ्तरदार, १९ दामोदर गणेश जोशी, व २० श्रीकृष्ण जगन्नाथ भट्ट बांदकर याप्रमाणें वीस कवींचीं चरित्रें त्यांच्या काव्यांतील निवडक उताऱ्यांसह आलीं आहेत. पुस्तक कापडी जाड पुठ्यांत बांधलें असून वर्गणीदाराकरितां त्याची किंमत बारा आणे ठेविली आहे. टपाल व्ही. पी. खर्च ३ आणे.

# कथासरित्सागर.

( १८ लंबक व १२४ तरंगांचें गोष्टीच्या रूपानें मराठी भाषांतर )

## चार भागांत संपूर्ण ग्रंथ—किंमत ३ रुपये.

श्रीगुणाढ्य कवीनें रचलेल्या सात लक्ष विचित्र कथांपैकीं 'बृहत्कथा' नामक जी प्रसिद्ध एकलक्ष श्लोकात्मक कथा काहे, तिच्या आधारानें सोमदेवभट्टानें 'कथा-सरित्सागर' नामक सर्वोत्तम ग्रंथ रचिला आहे. या ग्रंथांत अर्जुनाच्या कुलांतील वत्सराजापासून वासवदत्तेच्या ठायीं झालेल्या नरवाहनदत्ताचें चरित्र प्रमुखत्वें उत्तम रीतीनें वर्णिलें आहे. परंतु त्यांत चित्ताकर्षक विचित्र व उपदेशपर अशा अनेक लहान मोठ्या मनोरंजक कथा आल्या आहेत. रत्नावली, नागानंद, प्रियदर्शिका, पंचतत्र, मालतीमाधव. मुद्राराक्षस इत्यादि अनेक लोकमान्य पुस्तकें याच ग्रंथाच्या आधारें वेगवेगळ्या कवींनीं केलीं आहेत. इतकें सांगितलें म्हणजे या ग्रंथाच्या महत्त्वाबद्दल विशेष लिहिण्याची जरूर राहत नाहीं. तात्पर्य, अरेबियन नाईट प्रमाणें यांत अनेक मजेदार कथा आहेत. कै० वे० शा० वामन शास्त्री इस्लामपूरकर यांनीं या ग्रंथाचें भाषांतर क्रमशः प्रसिद्ध करण्याचा उपक्रम कांहीं वर्षांपूर्वीं चालविला होता; पण त्या मोठ्या ग्रंथांतील कांहीं भाग छापून निघून बाकीचा भाग तसाच अप्रसिद्ध राहिला. कै० शास्त्रीबुवांनीं जे ६ भाग प्रसिद्ध केले होते; त्यांची किंमत ९ रुपये असून आजमितीस ते सर्व भागही मिळत नाहींत. ही अडचण दूर व्हावी आणि या मनोहर ग्रंथाचा लाभ मराठी वाचकांस थोडक्यांत मिळावा, अशा हेतूनें वे० शा० विष्णु शास्त्री बापट यांजकडून आम्हीं हा ग्रंथ सरळ गोष्टीच्या रूपानें तयार करविला आहे. या प्रसिद्ध ग्रंथाचे अठरा लंबक व एकशें चोवीस तरंग असून, पंचतंत्राप्रमाणें प्रत्येक तरंगांत एकांत एक अशा दोन-दोन चार-चार सुंदर कथा आहेत. संग्रहीं ठेवण्यास योग्य व आबालवृद्ध स्त्री-पुरुषांचें हटकून मनोरंजन करणारें असें हें एक पुस्तक आहे. हा समग्र ग्रंथ चार भागांत पूर्ण केला आहे. प्रत्येक भागाची किंमत १॥ रुपया आहे, परंतु वाचकांच्या सोईकरितां त्यांची किंमत ३ रुपये केली आहे. टपाल खर्च वेगळा.

# राजधर्म.

श्रीमंत महाराज गायकवाड सरकार यांच्या आज्ञेनें व त्यांच्या उदार आश्रयाखालीं हें पुस्तक बडोदावरीष्ठकोर्टांचे न्यायमूर्ति रा. कृष्णराव विनायक शारंगपाणी बी. ए एलएल. बी; ज्योतिःशास्त्रमार्तंड अमृतराम शास्त्री यांनीं-मनु, याज्ञवल्क्य, वसिष्ठ नारद, विष्णु इत्यादि स्मृतिग्रंथांच्या आधारें हें पुस्तक तयार केलें असून त्यां राजधर्म, प्रजारक्षण, नीमणूक, राजनिति, निधि, करादान, व्यवहार, दंड, संग्राम व प्रकीर्ण अशीं वेगवेगळीं १० प्रकरणें आहेत. प्राचीन वर्णव्यवस्था व त्य काळची समाजस्थिति याचा बोध, या पुस्तकावरून चांगला होतो. हें पुस्तक मूळ स्मृतिवचनें देऊन त्याखालीं त्याचा अर्थ गुजरातीभाषेंत पण देवनगरीटाईपां दिला आहे. आरंभीं विस्तृत अनुक्रमाणिका जोडली असून पुस्तक ग्लेज कागदाव छापून कापडी जाड पुठ्यांत बांधलें आहे. किं. रु. १॥ ट. व्ही. खर्च ४ आणे.

---

# श्रीआनंदरामायणसार.

श्रीवाल्मीकि रामायण पंचवीस हजार ग्रंथात्मक आहे, हें सर्वश्रुत आहे. प त्यांत रामादिकांचा जन्म, रामाचा वनवास व रावणवध हेच मुख्य भाग आहे आणि रामाला राज्याभिषेक झाल्यानंतर त्यानें काय केलें, राजविलास कसे भोगले दानधर्मादि कृत्यें कशीं केलीं, त्याचा नित्यक्रम कसा होता, त्याचें बंधूवर प्रे कसें होतें, त्याला व त्याच्या भावांना पुत्र किती होते, कसे होते, त्यांचे विव कोठें, कधीं, कसे झाले; त्यांनीं राज्यें कोठें व कशीं स्थापिलीं, शेवटीं वैकुंठीं क गमन केलें, याचा विस्तारपूर्वक उल्लेख यांत असून आनंददायी अशा अनेक क आहेत; व विशेषतः राज्याभिषेकापासून अखेरपर्यंत रामानें काय काय केलें, या येथें उत्तम प्रकारें विस्तार केलेला आहे. स्त्रिया व पुरुष या सर्वांचें सारखें म रंजन होऊन रामकथेचा उत्तम बोध होईल, असा गोष्टीच्या रूपानें लिहिलेला ग्रंथ असून तो रफ कागदावर छापला आहे. किं० १ रुपया.

सर्व पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करावा:—

दामोदर सांवळाराम आणि मंडळी,

ठाकुरद्वार, पोष्ट काळबादेवी,—मुंबई.

---